९२५
म ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध.....
सं. क्र. ९२७
९८४८

# स्मरणी

कै. कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकरांच्या
नवाकाळमध्यें प्रसिद्ध झालेल्या
आठवणींचा संग्रह

आवृत्ति पहिली

सन १९४९

REFBK-007158

किंमत ४ रुपये

॥ श्री ॥

# खाडिलकर-स्मरणी

कै. कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकरांच्या
नवाकाळमध्यें प्रसिद्ध झालेल्या
आठवणींचा संग्रह

प्रकाशक व मुद्रक
रा. रा. यशवंत कृष्ण खाडिलकर
" श्रीदत्तात्रय प्रिंटिंग प्रेस " १३ शेणवी वाडी,
खाडिलकर रोड, गिरगांव, मुंबई नं. २

REI BK-0007158

आवृत्ती पहिली

सन १९४९

किंमत ४ रुपये

विक्रीस तयार नवे ग्रंथ विक्रीस तयार

# खाडिलकरांचा लेखसंग्रह भाग दुसरा

यांत कै. कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकरांचे १९१८ ते १९२९ पर्यंतचे 'केसरी' 'लोकमान्य' व 'नवाकाळ' मधील लेख असून, कीर्तन परिषद, नाट्य संमेलन व साहित्य संमेलन प्रसंगींचीं खाडिलकरांचीं अध्यक्षीय भाषणें या संग्रहांत आहेत. पानें ६००, किंमत ६ रुपये.

# खाडिलकरांचा लेखसंग्रह भाग पहिला

यांत १८९३ पासून १९१० पर्यंतचे केसरींतील व विविधज्ञान विस्तारांतील कै. कृ. प्र. खाडिलकरांचे लेख असून पृष्ठसंख्या ६००, किंमत ६ रुपये.

**पहिलें महायुद्ध (कै. कृ. प्र. खाडिलकरकृत) पांच खंड किं. ५ रु.**

# कृ. प्र. खाडिलकर यांचें चरित्र

कै. खाडिलकर यांच्या वर्षश्राद्धाला प्रसिद्ध झालें असून त्यांचे पुतणे श्री. का. ह. खाडिलकर यांनीं हें 'कृष्ण चरित्र' अठरा अध्यायांत अत्यंत तन्मयतेनें लिहिलें आहे.

पृष्ठें ४०० व भरपूर चित्रें. किंमत ४ रुपये.

पुस्तकें:—नवाकाळ, मुंबई नं. ४; चित्रशाळा प्रेस, पुणें, व दुकान मुंबई; श्रीदत्त एजन्सी, बुधवार चौक, पुणें; महालक्ष्मी वस्त्रभांडार, टिळक रोड, महाल, नागपूर; 'नवाकाळ' चे ठिकठिकाणचे एजंट व सर्व पुस्तक विक्रेते यांजकडे मिळतील.

# आभार

नवाकाळमध्यें कै. कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांच्या ज्या आठवणी त्यांच्या देहावसानंतर एक वर्षपर्यंत प्रसिद्ध होत होत्या त्यांचा संग्रह या ग्रंथांत करण्यांत आला आहे. पृष्ठसंख्येची मर्यादा संभाळण्यासाठीं कांहीं ठिकाणीं आठवणींचा संक्षेप करावा लागला आहे, त्याबद्दल आठवणींचे लेखक व वाचक क्षमा करतील अशी आशा आहे. कै. काकासाहेबांबद्दलच्या आपुलकीनें नवाकाळकडून विनंति जातांच आठवणी देणाऱ्या सर्व लेखकांकडेच या ग्रंथाचे संपूर्ण श्रेय असून, त्यांचे या स्थळीं कृतज्ञतापूर्वक आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. या स्मरणीबाबत पुण्याचे 'नवाकाळ 'चे वार्ताहर श्री. गो. रा. बाळ यांनीं घेतलेल्या मेहनतीचा साभार उल्लेख करणें जरूर आहे.

नवाकाळ ऑफिस
गिरगांव, मुंबई
ता. १७–११–४९

प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| **काकासाहेबांचें आत्मनिवेदन** | |
| आत्मनिवेदनपर आठवणी | १ |
| भाषणांतील आत्मनिवेदनपर आठवणी | १८ |
| केसरींत प्रवेश | २४ |
| बोलण्यांतील आत्मनिवेदनपर आठवणी | २६ |
| नेपाळची हकीकत | ३० |
| केसरीवरून दोनदां खो | ४१ |
| कै. शिवरामपंत परांजपे यांच्याबद्दलच्या आठवणी | ४५ |
| कै. वासुकाका जोशी यांच्याबद्दलच्या आठवणी | ५० |
| लो. टिळकांच्या दराऱ्याचे उपकार | ५३ |
| **नेपाळ प्रकरणाची अधिक माहिती** | |
| कोल्हापूरचे 'रा. दामू जोशी' | ५६ |
| कविभूषण प्रा. गणेश बळवंत खापर्डे | ६२ |
| **काकासाहेबांच्या वृत्तपत्रविषयक आठवणी** | ६४ |
| **काकासाहेबांविषयींच्या पत्रकारांच्या आठवणी** | |
| कै. डॉ. रा. ह. भडकमकर | १०० |
| श्री. ज. स. करंदीकर, केसरी | १०१ |
| श्री. दा. वि. गोखले, केसरी | १०६ |
| श्री. जयंतराव टिळक, केसरी | ११० |
| श्री. रा. गो. भिडे, केसरी | ११२ |
| श्री. र. के. खाडिलकर, लोकमत | ११४ |
| श्री. त्र्यं. र. देवगिरीकर, चित्रमयजगत् | ११६ |
| श्री. गो. बा. महाशब्दे, नवाकाळ | १२० |

श्री. त्र्यं. वि. पवते, मुंबई १३०
श्री. ह. मो. जोशी, लोकशक्ति १३५
श्री. प्र. ह. खाडिलकर, उगारखुर्द १३७
श्री. अ. ह. गद्रे, आद्यमौजकार १४६
श्री. श्री. शं. नवरे, प्रभात १४८
श्री. गो. रा. बाळ, नवाकाळ,पुणें १५०

**काकासाहेबांचे वाङ्मयविषयक विचार**

प्रा. न. र. फाटक १५३

**काकासाहेबांविषयीं नटवर्गाच्या आठवणी**

नटसम्राट नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व १८४
श्री. अण्णासाहेब कारखाननीस, महाराष्ट्र ना. मं. १९५
श्री. दत्तोपंत देशपांडे, महाराष्ट्र ना. मं. २०५
नटश्रेष्ठ श्री. केशवराव दाते, महाराष्ट्र ना. मं. २१५
श्री. पंडितराव नगरकर, सुलोचना सं. मं. २३१
नटवर्य माधवराव नारायण टिपणीस, महाराष्ट्र ना. मं. २३४
नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर, बलवंत ना. मं. २४२
नटवर्य गणपतराव बोडस २५१
संगीत कलानिधि मास्तर कृष्णराव २५३
संगीत चूडामणी पं. विनायकराव पटवर्धन २५७
श्री. दादा परचुरे, किर्लोस्कर ना. मं. २६०
श्री. यशवंत ना. आठवले, गंधर्व ना. मं. २६३
श्री. ग. कृ. बोडस, नाटककार २६५
नटवर्य श्री. गोविंदराव टेंबे २६६

**काकासाहेबांविषयीं साहित्यसेवकांच्या आठवणी**

वीर वामनराव जोशी, अमरावती २६९

श्री. भा. वि. ऊर्फ मामासाहेब वरेरकर २७०
श्री. ना. रा. बामणगांवकर २७८
'श्री'कर्ते श्री. न. ग. कमतनूरकर २८५
श्री. ग. त्र्यं. माडखोलकर २९६
श्री. वसंत शांताराम देसाई ३१२
प्रा. श्री. म. माटे ३१९
कवि आनंदराव टेकाडे ३२१
सरदार मा. वि. किबे ३२४
प्रि. के. रा. कानिटकर ३२५
आचार्य श्रीराम गोसावी ३२६
श्री. पु. र. गद्रे, नाशीक ३२९
श्री. द. गो. दिक्षित ३३०
श्री. शं. ना. सहस्रबुद्धे ३३३
म. भा. भू. ज. र. आजगांवकर ३३५
श्री. सौ. कमलाबाई किबे ३३८

**काकासाहेबांविषयीं राजकीय नेत्यांच्या आठवणी**

ग. ज. राजाजी यांचें पत्र ३४०
दे. गंगाधरराव देशपांडे ३४१
दे. काकासाहेब कालेलकर ३४७
विहारचे गव्हर्नर लोकनायक अणे ३५३
दे. शंकरराव देव, चिटणीस, ऑ. इं. कॉं. कमिटी ३५७
ना. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ ३६३
मुंबईचे पंतप्रधान श्री. बाळासाहेब खेर ३७१
दे. अण्णासाहेब दास्ताने ३७४

दे. द. रा. घारपुरे ३८१
मुंबईचे माजी मेयर श्री. मथुरादास त्रिकमजी ३८९
वीर वामनराव जोशी ३९१
दे. हरिभाऊ तुळपुळे ३९४
दे. हरि गणेश फाटक ३९५
डॉ. डी. डी. साठये ३९९
वैद्यपंचानन कृष्णशास्त्री कवडे ४००
श्री. भाऊसाहेब गोखले ४१०
श्री. पुंडलिकजी कातगडे, हुदली ४११
डॉ. गोपाळराव देशमुख ४१४
भाई मो. ग. देसाई ४१८
वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी ४२१
श्री. श्री. आ. जोग, धारवाड ४२८
काकासाहेबांविषयीं वैयक्तिक आठवणी
श्री. विष्णुपंत जोशी ४३०
श्री. का. ह. खाडिलकर ४३१
श्री. वा. वि. लिमये ४३५
वैद्य स. ग. काळे ४३७
नव चित्रकार, प. ज. खाडिलकर ४४०
श्री. के. शि. खाडिलकर ४४०
श्री. गो. वा. मोघे ४४१
श्री. रामभाऊ पटवर्धन, देवल सर्कस ४४१
श्री. पुरुषोत्तम वासुदेव लिमये, संध्याकाळ ४४३
काकांचे आप्त 'षडानन' ४४५
खाडिलकर स्मरणीची सांगता ४४८

ग्रं. सं. ८१९९

# खाडिलकर

## काकासाहेबांचें आत्मनिवेदन

( कै. काकासाहेब खाडिलकर यांनीं त्यांच्या निधनाच्या चार पांच महिन्यांपूर्वी कांहीं आत्मनिवेदनपर आठवणी लिहवून घेतल्या होत्या; त्या आठवणी क्रमशः पुढें देण्यांत येत आहेत. )

### आई पाजत नसे तेव्हां--

मी जन्माला येण्यापूर्वीच माझे वडील वारलेले होते. त्यामुळें माझ्या आठवणी माझे वडील ती. प्रभाकरपंत यांच्याबद्दलच्या कांहीं नसून ज्या आहेत त्या माझ्या आईसंबंधाच्या आहेत. वडील वारल्यावर मी जन्माला आलेला असल्यामुळें जन्मानंतर किती तरी दिवसपर्यंत माझी आई मला पाजावयास घेत नसे. त्या वेळीं आम्ही ज्या वाडयांत राहात होतों त्या वाडयांत श्री. वामनराव पटवर्धन यांचे वडील रहात असत. माझे वडील सांगलीच्या तीन कारभाऱ्यांपैकीं एक कारभारी होते आणि त्यांच्यामार्फत वामनरावांच्या वडिलांना त्यांची पन्नास रुपयांची संरजामी तैनात सुरू झाली होती. माझे वडील वारल्यावरहि ते आम्ही रहात असलेल्या वाडयांतच रहात होते. वामनराव आणि मी समवयस्क होतों आणि ज्यावेळीं माझी आई मला प्यावयास घेत नसे त्या काळांत वामनरावांची आजी मला प्यावयास घेत असे. माझ्या जन्मानंतर कांहीं महिन्यांनीं आईचा माझ्यावरचा राग गेला आणि ती मला प्यावयास घेऊं लागली. पण या घटनेचा परिणाम मानसशास्त्रदृष्ट्या माझ्यावर फार झाला. वामनरावांच्या घरचाच मी असल्याप्रमाणें मी त्यांच्या घरांत

जात येत असें. माझ्या जन्मानंतर पांच चार वर्षांनीं वामनरावांच्या वडिलांची बदली झाली आणि नंतर दोन वर्षांनीं ते सांगलीस नायब कारभाऱ्याच्या हुद्यावर परत आले. त्यानंतर त्यांचें बिऱ्हाड आमच्या घरीं नव्हतें. शेजारींच त्यांनीं जागा घेतली होती. पण त्यानंतरहि त्यांच्या घरीं माझें जाणें येणें आणि घरोबा कायम राहिलेला होता. वामनरावांच्या आईला आम्ही मनूकाकू म्हणत असूं. त्याचें माझ्यावर वामनरावाप्रमाणेंच प्रेम होतें. मनू काकूंच्या घरीं गेलें असतांना त्या वामनरावांबरोबर मलाहि खावयास देत आणि तें घेतांना मला कधीं संकोच वाटला नाहीं. अशा रीतीनें वामनरावांच्या घराण्याचा आणि आमचा मिलाफ झालेला होता.

## माडीवरून पडल्यानें कायमचा फेंगडेपणा

आतां आईच्या आठवणींकडे वळूं. माझी पहिली आठवण मी अडीच वर्षांचा असतांनाची आहे. आम्ही ज्या वाड्यांत रहात होतों तो नंतर नारायण नाईक यांनीं घेतला आणि नारायण नाइकांचा वाडा म्हणून ओळखला जाऊं लागला. तो वाडा आमच्या मालकीचा असतांना त्याची रचना अशी होती कीं या घराची वरचीं बाजू गच्चीसारखी उघडी होती. नारायण नाइकांनीं घर घेतल्यावर त्यांत आस्ते आस्ते दुरुस्त्या करून दुमजली स्वरूप त्याला दिलें. मी जेव्हांची आठवण सांगत आहें तेव्हां घर तळमजल्याचें होतें आणि वरच्या गच्चीवजा उघड्या जागेंत जाण्यास जिना होता. जिना चढून मी वर गेलों. तेथें आधारासाठीं हातानें धरण्यासारखें कांहीं नव्हतें. मी कडेला येऊन खालीं चौकांत पाहूं लागलों आणि तसें पहात असतांना वरून खालीं चौकांत पडलों. डोक्याला खोक पडली आणि आईनें कळवळून धांवत येऊन मला घेतलें. नंतर आई सांगत असे कीं, त्यावेळीं माझें पायाचें हाड मोडलें होतें आणि बैराग्यानें तें सांधून पुन्हां बसविलें. ही हाड मोडल्याची हकीकत मला आठवत नाहीं. पण आई सांगत

ग्रंथ संग्रहालय पुणे
क्र. न. ७१४८...३
३७१३५३

असे आणि मांडीच्या हाडावर त्याचा अद्याप पर्यंत परिणाम झालेला दिसत आहे. पायाचें हाड त्यावेळीं वाकलेलें असल्यामुळे पायांत ... ... ... मला मुष्किलीचें होतें आणि त्यामुळें पायांत बाक येऊन त्यावेळीं ते फेंगडे झालेले अद्याप कायम आहेत.

## आईच्या जोरकस काव्याचें संस्कार.

माझा हा फेंगडेपणा मी मोठा झाल्यावर लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आला नाहीं याचें श्रेय माझ्या आईला आहे. सांगलीस आमच्या घराच्या शेजारीं असलेल्या मुरलीधराच्या देवळांत पुराण आणि कथा ऐकण्यास आई जात असे. आईबरोबर मीहि जाऊं लागलों. पण कथा पुराणाला न बसतां मुरलीधराच्या देवळाच्या आसपास असलेल्या बगीच्यामध्यें मी खेळत रहात असे. माझा नित्याचा क्रम असा होता कीं, घरीं गेल्यावर निजावयाच्या वेळीं कथेमध्यें हरिदासानें काय सांगितलें आणि पुराणांत तूं काय ऐकलेंस असें आईला विचारावयाचें आणि आईनें रसभरित भाषेमध्यें ऐकलेल्या कथांचें निरूपण करावयाचें. रसभरित असें विशेषण मीं कां दिलें आहे ? पुढें मी मोठा झाल्यावर पुण्याला माझी मोठी मुलगी गंगू हिला तिच्या आग्रहावरून आई पुराणांतल्या गोष्टी सांगत असे. मी खाली आलें असतांना अधूनमधून तिच्या गोष्टीकडे माझें लक्ष जाई आणि आईचें रसभरित वक्तृत्व ऐकावयास मिळे. मूळ कथेंत कोठें कांहीं अस्पष्टपणा असेल किंवा न्यून असेल तर रसाळपणाच्या जोरावर ती तें सफाईनें भरून काढीत असे. मी महाभारत वाचतांना माझ्या बुद्धीला महाभारतांत स्पष्ट नमूद नसलेल्या गोष्टी दिसत असत. पण ही प्रेरणा कशी होते हें मला समजत नसे. आईच्या गोष्टी ऐकल्यापासून माझ्या ध्यानीं आलें कीं माझ्या लहानपणीं आईनें केलेल्या रसभरित वर्णनांत त्याचा उगम आहे. लहानपणीं निजावयाच्या वेळीं आईनें सांगितलेल्या गोष्टींचा ठसा माझ्या कोवळ्या मनावर उमटूं लागला आणि त्यामुळें जोरकसपणाच्या काव्याचे माझ्या मनावर संस्कार झाले.

## जोरकसपणानें फेंगडेपणा झाकला

माझे वडील अत्यंत करारी होते, मीहि करारीपणांतच जन्माला आलों; पण जोरकसपणाचें वाळकडू आईकडून पाजण्यांत आल्यामुळें लहानपणा सोडून दिला तर पुढील आयुष्यांत मी फेंगडा आहें असें कोणाच्या दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं. नदीतीरावर जाऊन त्यावेळीं मी सुरपाट खेळावयास लागलों आणि मी करारी असल्यामुळें सुरपाट खेळत असतांना दुय्यम जाग्यावर काम करणें मला केव्हांहि पटत नसे. सुरपाटाच्या सुराची किंवा मधल्या रेघेची जागा मिळविण्याची हांव मीं धरली आणि ती जागा मला मिळालीहि. सुरपाट खेळणाराला सुरपाटाच्या खेळाचे डावपेंच माहीत असावे लागतात आणि त्याला ती जागा देतात. खेळतांना मधल्या रेघेवरून धावावें लागतें. तेव्हां मी धावण्यांत पटाईत झालों. माझ्या करारी स्वभावामुळें मी धावण्यांत पटाइत झालों, पण माझ्या आईनें लहानपणींच जोरकसपणाच्या काव्याची दीक्षा मला दिलेली असल्यामुळें या पटाईतपणाचें श्रेय करारीपणापेक्षां जोरकसपणाच्या तिच्या शिकवणुकीलाच मी देतों.

## कोंडण्याच्या शिक्षेवर करारीपणाचा इलाज

करारी स्वभावासंबंधानें आणि सुरपाटाच्या वेळच्या माझ्या धावण्याच्या जोरकसपणानें दोन गोष्टी मला आठवतात. पहिली हकीकत करारीपणाबद्दलची आहे. मी आठ नऊ वर्षांचा असतांना माझ्या आईचें सोवळें-ओवळें फार असे. आई कधीं धूतवस्त्र नेसून स्वयंपाकाला लागत असे किंवा कधी धाबळी नेसून स्वयंपाक करी, असा रिवाज होता. आई धूतवस्त्र नेसून स्वयंपाक करीत असतांना व्रात्यपणानें अंगांत सदरा घालून मी तिला शिवत असे आणि नंतर धाबळी नेसून तिला उरलेला स्वयंपाक उरकावा लागे. या माझ्या व्रात्यपणावर मला कोंडून घालण्याचा उपाय माझी आई वारंवार योजूं लागली. आमचें घर नारायण नाइकांच्या मालकीचें झालें होतें

सं. नं. नि. ल. ५...

## काकासाहेबांचें आत्मनिवेदन*

घ आम्हाला रहाण्याला त्यांनीं मागच्या सोप्याची जागा दिलेली होती. या सोप्याला दोन खोल्या होत्या. त्यांतील धाकटीशी जागा मोकळी असे आणि तिच्याच शेजारी चिंचोळी धाकटी खोली होती. या चिंचोळ्या खोलींत मला कोंडून घालण्याचा आईचा क्रम असे. पण मी करारी असल्यामुळें आईचा हा क्रम मी ढासळूं शकलों. आईनें दोनतीनदां कोंडून घातल्यावर एकदां मी आंतून कडी लावून घेतली आणि नंतर आंतली कडी काढण्याकरितां आईला माझीं आर्जवें करावीं लागलीं. स्वयंपाक झाल्यावर आईनें बाहेरची कडी काढून मला बोलावलें त्यावेळीं मीं सांगितलें, तुझी तूं एकटीच जेव आणि नंतर मला बोलावून घे. माझे हे शब्द आईला दुःखद झाले आणि माझीं आर्जवें करून आंतली कडी काढून टाक असें तिला म्हणावें लागलें. या माउलीला अशा प्रकारच्या दुःखद प्रसंगांतून जावें लागलें म्हणून मला जेव्हा जेव्हां त्या गोष्टीची आठवण होते, तेव्हां तेव्हां आतां फार वाईट वाटतें. माझ्या व्रात्यपणाबद्दल मला त्या माउलीनें कोंडून घालण्याची शिक्षा केली यांत वास्तविक पहातां कांहींच बिघडलें नव्हतें.

## स्थूल शरीराचा जोरकसपणा

दुसरी हकीकत सुरपाटाच्या वेळच्या धावण्याबद्दलची आहे. सांगलीस असतांना मी इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत हाडकुळा होतो. पांचव्या, सहाव्या व सातव्या इयत्तेंत असतांना मला पहिल्या नंबरची चार रुपयांची स्कॉलरशिप मिळत असे. नंतर मी पुण्यास कॉलेजांत जाऊं लागलो त्यावेळींहि मी प्रीव्हियसमध्यें असतांना व फर्स्ट बी. ए मध्यें असतांना स्कॉलर होतों. पुण्याच्या थंड हवेंत माझ्या अंगावर पुष्कळसें मांस चढलें. सुखावलेल्या स्थितींतलें तें मांस होतें आणि त्यांत वातुळपणाचा अंशहि नव्हता. नंतर सीनियर बी. ए. च्या अभ्यासासाठीं मी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांतून डेक्कन कॉलेजांत दाखल झालो. त्यावेळीं मला जो तो वातुळ समजत असे. वातुळ-

पणा अंगीं येण्यास व्यायामाचा अभाव असणें जरूर असतें. पण व्यायाम करावयास मी कधीं चुकत नसें. डेक्कन कॉलेजामध्यें असतांना सुरपाटाच्या डावांत मी पळूं कसा शकतों म्हणून जो तो आश्चर्य करीत असे. अशाच एका प्रसंगीं सुरपाटाच्या पाटीवर सडपातळ बांध्याचा एक मुलगा उभा राहिला आणि मला त्यानें त्याच्या पाटींतून जाण्यास सांगितलें. मला वातुळ म्हणून हंसणारा आमच्या वर्गातील तो मुलगा होता. त्याचें आव्हान मी स्वीकारलें, आणि त्याला झुकांड्या देऊं लागलों. झुकांड्या देतांनाची माझी चपळाई पाहून तो मनांतल्या मनांत थिजला आणि एका झुकांडीच्या वेळीं त्याचा तोल जाऊन त्याच्या पाटींतून मी जोरानें पळत गेलों. नदीतीरावर सुरपाट खेळत असतांनाच्या धावण्याची आठवण त्यावेळीं मी त्याला करून दिली.

## वाड्याचा लिलाव व आईचें दुःख

आमच्या सांगलीच्या वाड्याची मालकी श्री. नारायण नाइक उकिवडे यांच्याकडे गेली त्यावेळची आठवण मला आहे. आमच्या वाड्यांत डाळिंबीचें झाड होतें आणि त्या झाडाजवळ उंभे राहून मालकी लिलांव चालला होता. मी सातआठ वर्षांचा असतांना ही गोष्ट घडली. त्यावेळीं मी आईकडे जाऊन तिला विचारलें कीं हे काय करीत आहेत. तिच्या डोळ्यांतून अश्रू आले आणि तिनें मला सांगितलें कीं मालकी लिलाव चालला आहे. नारायण नाईक उकिवडे यांच्या नांवानें लिलाव चाललेला असल्यामुळें तेच घराचे मालक होणार असें तिनें मला सांगितलें. कोर्टातील बातमी आईला होती आणि नारायण नाईक हेच वाड्याचे मालक होणार असें धरूनच ती चालली होती.

## कृष्णाचा वाजा

मी आठदहा वर्षांचा असतांना या वाडयांत सांगली इलाख्याचे नायब कारभारी ( नारायण नाइकांच्या मार्फत ) रहात होते. त्यांची तोंड धुण्याची जागा माझ्या खोलीजवळ होती. सकाळी उठून तोंड धुण्याच्या वेळीं, कृष्णाचा बाजा सुरू झाला, असें ते मोठयानें म्हणत असत. सकाळीं उठून आई कृष्णास्नानास नदीवर जावयाची आणि मी उठल्यावर आईग आईग असें म्हणून रडत रहावयाचा असा नित्याचा क्रम होता. माझ्यावर टीका होत आहे हें मला त्यावेळीं कळत असे. पण आईग आईग असें म्हणून रडावयाचा मी थांबत नसें. नायब कारभारी हे स्वभावानें फार चांगले होते आणि त्यांच्याकडून आमचीं विचारपूस होत असे. हरिपूरच्या यात्रेला जाण्याकरितां मी त्यांची गाडी मागत असें आणि ती ते खुषीनें देत असत. आमच्या आळींत एका दुकानांत त्यांचे कारकून बसत असत आणि त्यांनाहि सांगून ठेवलेलें असें कीं, यांच्या नडल्या पडल्याला उपयोगी पडा.

नंतर वर्ष सहा महिन्यांनीं बिवलकर कारभारी त्यांच्या जागीं रहावयास आले. बिवलकर कारभाऱ्यांची एक सवय अशी होती कीं जेवण झाल्यावर ते इस्पिटें खेळावयास मला बोलावत असत आणि ते व मी असे दोघे मिळून इस्पिटें खेळत बसत होतों. आठ दहा मिनिटांनीं खेळ संपवून ते झोपीं जात आणि तासाभरानें उठल्यावर ते कचेरींत जात असत.

## बंधूची कर्तबगारी व बढती

माझी मुंज झाली तेव्हां माझे वडील बंधु मॅट्रिकची परीक्षा पास झाले. आमची घरची स्थिति खालावलेली असल्यामुळें त्यांना सांगलीजवळच्या वाडी गांवात शाळेंतील शिक्षकाचें काम शाळा खात्याच्या इन्पेक्टरकडून देण्यांत आलें. पगार अवघा दहा रुपये होता. बिवलकर कारभाऱ्यांनीं वडील बंधूंना सांगितलें कीं तुझा पगार थोडा आहें हें मी माझ्या ध्यानांत

ठेवीन. तूं ही नोकरी करूं लाग. वडील बंधूंना एकदोन महिनेच वाडीच्या शाळेंत शिक्षकाचें काम करावें लागलें आणि नंतर दुप्पट पगार होऊन सांगली हायस्कूलमध्यें त्यांची बदली झाली. तेथें एकदोन वर्षें काम केल्यावर त्यांना बिवलकर कारभाऱ्यांनीं बढती देऊन आपल्या हाताखालीं घेतले. एकदां कडब्याची गंजी कशी घालतात यावर रिपोर्ट करण्याचें काम त्यांनीं वडील बंधूंना सांगितलें, आणि वडील बंधूनीं रिपोर्ट तयार करून दिला. तो त्यांना अतिशय पसंत पडून त्यांची कर्तबगारी कारभाऱ्यांना पटली आणि वडील बंधूंची पुढें बढती झाली.

## जोरकसपणानें बोबडेपणा गेला

बिवलकर कारभारी आमच्या घरांत असतांना दुसऱ्या मजल्याचें काम सुरू झालें आणि तें काम पुरें झाल्यावर नारायण नाइक तेथें रहावयास गेले. त्यावेळीं मी पांचव्या इयत्तेंत होतों. शाळेच्या वार्षिक सम्मेलनाच्या वेळीं पांचवीच्या मुलांना वक्तृत्वाच्या समारंभांत भाग घेतां येत असे. वक्तृत्वाच्या चढाओढीचे त्यावेळीं बिवलकर कारभारी अध्यक्ष होते. त्यांच्या-पुढें उभा राहून मी अर्धा तास अस्खलित भाषण केलें. 'अरे तूं बोबडा होतास आणि इतकें अस्खलित भाषण कसें केलेंस' असें त्यावेळीं ते मला म्हणाले. घरी गेल्यावर मी आईला विचारलें, 'मी बोबडा होतों काय?' आई म्हणाली बोबडा होतास, पण जोरानें बोलून बोबडेपणाची संवय तूं मागें टाकलीस. तिच्या जोरकसपणाच्या शिकवणकीचा प्रभाव तो होता.

## वडील आणि चुलते

माझे वडील आणि त्यांचे वडील बंधु काशिनाथपंत दादा असे दोघे आमचे मूळ ठिकाण जें नारिंग्यानजीकचें गिरावळ गांव त्या गांवाहून एकदमच देशावर आले. देशावर येतांना त्यांनीं नरसोबाच्या वाडीस दत्ताचें दर्शन घेतलें आणि नंतर हें दर्शन घेण्याचा रिवाज त्यांनीं सतत पाळला. माझे

वडील बुद्धीनें चलाख असल्यामुळें कुलकर्ण्याची परीक्षा त्यांनीं पूर्वीच दिली होती. हरिपूर येथें येऊन लगूंच्यामार्फत सरकारी नोकरींत त्यांनीं शिरकाव केला आणि आपलें दैव काढलें. त्यांचे वडील बंधु काशिनाथपंत दादा हे हरिपूरच्या खाडिलकरांची नोकरी पत्करून उगार गांवांत राहिले. हरिपूरच्या खाडिलकरांच्या कुळांतील लोक शिलासी च अत्तराचें दिवे लावणारे निघाले. ते अत्तराचे दिवे लावीत असतांना त्यांचें दिवाळें निघालें आणि काशिनाथपंत दादांना तें सोयीचें झालें. दिवाळें काढणाऱ्यांपाशीं पेंढाऱ्यांच्या जमिनी होत्या आणि त्यांनीं त्या आपल्या मालकीच्या करून घेतल्या होत्या. त्या जमिनी काशिनाथपंतांनीं अल्पायासानें आपल्या नांवावर करून घेतल्या. काशिनाथपंत दादा या जमिनीचे मालक होण्यास आणि माझे वडील सांगलीच्या दरबारच्या नोकरींत नांवालौकिकास चढण्यास एकच गांठ पडली. त्याचा परिणाम असा झाला कीं आपला भाऊ मोठ्या हुद्यावर आहे म्हणून शेताचे सारे काशिनाथपंत दादा भरीनातसे झाले. त्यावेळीं काशिनाथपंत तारुण्याच्या ऐन भरांत होते. सबंध ऊस हातांत धरून तो मोडून न काढतां त्यांचें एकेक करंडें ते उपसून काढीत असत. दोन दोन तीन तीन कळशा दूध ते काढीत असत आणि पांचदहा बोटें रेशीमकांठ असलेली धोतरजोडी नेसत असत. कांहीं जमिनींत कापूस पेराचा, आणि आपल्या निर्वाहापुरतें धान्य पेरावें आणि बाकी जमीन खुशाल पडीत टाकावी असा त्यांचा क्रम होता.

## सोनें गेलें केरसुण्या आल्या

एका साली अमेरिकेंत कापूस सात आठ पटीनें महाग झाला व हिंदुस्थानांत कापसाचे भाव कडाडले, आणि गुजराथी व्यापारी कापूस खरेदी करण्यासाठीं हिंडूं लागले. अशा एका व्यापारानें एकावेळीं दहा हजार रुपये किंमतीचें सोनें काशीनाथपंतांना त्यांच्या जवळच्या कापसाबद्दल देऊं केलें. माझी

आई तेव्हां उगारास होती. इतक्या सोन्यावर व्याजबट्टा करून नांवाजलेले सावकार आपणांस होतां येईल असें तिला वाटलें. पण आईचें म्हणणें काशिनाथपंतांना पटलें नाहीं. पुढच्या वर्षी हल्लींच्या दुप्पट दर येतील असें त्यांनीं तिला सांगितलें आणि घरांत चालून येत असलेलें सोनें त्यांनीं हातचें दवडलें. पुढच्या वर्षी कापसाचे भाव अमेरिकेंत उतरले ते इतके कीं मूळच्या भावापेक्षां हिंदी कापसाच्या किंमती निम्म्या झाल्या. तेव्हां काशिनाथपंतांना आपला कापूस घेऊन वेंगुर्ला बंदरांत विकावा लागला. कापसाची किंमत नेहमींहून निम्मी आली आणि तीहि रोख न घेतां त्या पैशाचा विनियोग केरसुण्यांचा व्यापार करण्याकडे त्यांनीं केला. त्याहि व्यापारांत अखेर खोटच आली आणि माझ्या आईची सावकारीची महत्त्वाकांक्षा विलयास गेली.

## दत्तभक्त घराणें

त्या सुमारास माझे वडील मिरज आणि सांगलीच्या दरम्यान असलेल्या विहिरीवर रहाणाऱ्या एका साधूच्या भजनीं लागले होते. तो साधु नेहमीं आमच्या घरीं येत असे. आल्यावर वडील बसत असत त्या आसनावर ते बसत असत आणि आईपाशीं कांहीं खाण्यास मागत. तळहातावर जेवढें मावेल तेवढेंच खात असत आणि तें खाऊन झाल्यावर माझ्या वडिलांना ते 'कुंभार'–विविध रचनात्मक कार्यकर्ता–असें संबोधीत असत. माझ्या वडिलांनीं आणि त्यांचे थोरले बंधु काशिनाथपंत दादा यांनीं वाडीला श्रीदत्ताच्या दर्शनाला जाण्याची प्रथा कायम ठेवली होती, आणि माझ्या वडिलांनीं गुरुचरित्राची हस्तलिखित प्रत तयार केली होती, ती अद्याप आमच्या घरीं आहे.

आमचे वडील वारल्यानंतर दोन वर्षांनीं शेतांचा सारा न भरल्यामुळें उगारच्या शेतांचा जाहीर लिलाव करण्यांत आला. असा लिलाव करणें हें बेकायदा आहे अशी काशिनाथपंतांची तक्रार होती. मी इंग्रजी सातव्या

इयत्तेंत असतांना काशिनाथपंत आमच्या घरीं आले आणि तेथेंच त्यांचें देहावसान झालें. त्यावेळीं त्यांचे ते तक्रारीचे कागद त्यांच्याजवळ होते आणि त्यांनीं ते कागद माझ्या स्वाधीन करून ही तक्रार तूं पुन्हां कर असें त्यांनीं मला त्यावेळीं बजावलें. काशिनाथपंतांचे एक चिरंजीव विष्णुपंत हे सांगलीला एक्झिक्युटिव्ह ऑफिसरच्या जागेपर्यंत चढले होते आणि कांहीं वर्षांपूर्वी त्यांनीं पेन्शन घेतलें आहे. काशिनाथपंतांची पहिली बायको वारली आणि त्यांनीं दुसरें लग्न केलें; त्यानंतर त्यांचा पहिल्या बायकोपासून झालेला थोरला मुलगा वेगळा झाला. त्यांच्या वंशांतील एक आबा खाडिलकर हे बी. ए. एलएल. बी. होऊन सांप्रत बेळगांव–शहापूर येथें वकिली करीत आहेत आणि दुसरे पांडुरंग खाडिलकर हे एम्. ए. असून प्रख्यात शाहीर आहेत.

काशिनाथपंतांच्या पहिल्या कुटुंबाच्या एका चिरंजीवांचें–वासुअण्णांचें–लग्न झालेलें नव्हतें. त्यांनीं नरसोबाच्या वाडीस मोठी तपश्चर्या केली आणि त्यानंतर त्यांना माझ्या वडील बंधूंनीं व्हँक्सिनेटरची जागा मिळवून दिली. ते सांगलीस असतांना दर शनिवारीं दत्ताची पालखी निघत असे आणि त्यांच्या बरोबर मीहि पालखी पाहण्यास जात असें. आमच्या घराण्यांत मूळची दत्तभक्ति होती. वासुअण्णांच्यामुळें माझ्या ठिकाणीं तिचा उद्भव झाला आणि वयाच्या साठाव्या वर्षी सांगली वाडीस दत्ताचें मंदिर बांधलें.

## पहिला निबंध व आंब्याच बक्षीस

लहानपणीं दर रविवारीं आमचा खेळाचा कार्यक्रम ठरलेला असे. कुंटयांच्या वाडयांत वामनराव पटवर्धन यांचे वडील–त्यांना आम्ही काका म्हणत असूं–रहावयास गेल्यापासून कुंटयांच्या वाडयांतील चौक हा आमचा दुपारचा खेळावयाचा अड्डा होता. तेथून नंतर आम्हीं नदीकाठीं सुरपाटयाचा

खेळ खेळावयास जात असूं—दुपारीं खेळावयास जाण्यापूर्वी एक तास मी दादा छापखान्यांच्या घरीं खर्डे गिरवावयास जात असे. कुंटयांच्या वाड्यांतील त्या आमच्या अड्डयाला यशवंतराव कुंटे यांनीं आंब्यांच्या दिवसांत आंबे आम्हांस खावयास देऊन उत्तेजित केलें होतें. वामनराव पटवर्धन यांचे वडील—काका—हे आपल्या मळ्यांतील आंबे आम्हांस खावयास देत असत. आम्ही चार पांच जण मिळून आंबे खात असूं. एकदां वामनरावांचे वडील—काका—यांनीं असे उद्गार काढले कीं, स्त्रीशिक्षण या विषयावर निबंध लिहून तो जो वाचून दाखवील त्याला एक आंबा जास्त मिळेल. ही बातमी कळल्यावर दादा छापखान्यांच्या घरीं गेल्यावर खर्डे गिरवीत न बसतां स्त्रीशिक्षणावर एक निबंध मीं तयार केला. निबंधांत काय लिहिलें होतें तें मला नीटसें आठवत नाहीं. पण स्त्रियांचें शिक्षण निराळें असावें आणि कुटुंबांतील बापकांचें शिक्षण वेगळें असावें असा मुद्दा त्यांत होता हें मला आठवतें. आमच्यापैकीं चार पांच जणांनीं निबंध लिहिले होते. कोणाचा निबंध सात मिनिटांचा होता, कोणाचा दहा मिनिटांचा होता. माझ्या निबंधवाचनाला चौदा पंधरा मिनिटें लागलीं; म्हणून मला एक आंबा जास्त मिळाला आणि वामनरावांच्या वडिलांच्या ध्यानांतून मीं मांडलेला मुद्दा निसटलेला नाहीं असें मला त्यांनीं बजावून सांगितलें.

## पहिलें नाटक देवास दिलें

या बजावण्याचें उत्तेजन मिळाल्यामुळें इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंत असतांना मीं एक नाटक लिहिलें. वामनरावांचे वडील—काका—यांना तें वाचून दाखविलें. त्यांनीं मला शाबासकी दिली आणि माझ्या वडील बंधूंना तें वाचण्याची त्यांनीं शिफारस केली. वडील बंधूंनीं नाटक वाचलें, पण त्यांचा अभिप्राय मला कळला नाहीं. तो अभिप्राय माझ्या विरुद्ध नव्हता असें

सं. नं.....१३

मागाहून कळलें. त्यावेळीं श्री. बापूसाहेब सरदेसाई आमच्या हायस्कूलमध्यें शिक्षक होते. त्यांच्या जवळ वडील बंधूंनीं तें नाटक वाचण्यासाठीं मागितलें केली. इंग्रजी तिसरींत असलेला एक मुलगा नाटक लिहितो आणि त्याचा वडील भाऊ त्या नाटकाची शिफारस करतो याचें त्यांना मनापासून वाईट घाटलें. त्या 'कृष्ण्याला बजावून सांग कीं विद्यार्थीदशेंत असेपर्यंत तूं नाटक लिहितां कामा नये आणि तूं लिहिलेलें नाटक आम्हीं कोणी वाचतां कामा नये' असें ते म्हणाले. पहिल्या नाटकाला अशा रीतीनें खो बसला आणि पहिलें लिहिलेलें नाटक देवाला दिलें, असा संकल्प करून मी त्या नाटकाचा नाद सोडून दिला. माझे चुलते काशिनाथपंत दादा यांनीं दिलेले त्यांच्या जमिनीच्या बेकायदा विक्रीबद्दलचे कागदपत्र आणि त्याच्या शेजारी हें पहिलें नाटक ठेवून अडंगळींत मीं तें टाकून दिलें. पुढें प्लेगच्या दिवसांत त्या अडगळीबरोबर हें पहिलें नाटक अग्निमुखीं पडलें.

## कांचनगडची मोहना

माझें पहिलें नाटक देवाला द्यावें लागलें आणि तें अग्निमुखीं पडलें हें बर नमूद केलें आहेच. बी. ए. ची परीक्षा पास झाल्यावर मी दुसरें नाटक लिहिलें तें सवाई माधवराव यांचा मृत्यु हें होय. हें विविधज्ञान-विस्तारांत त्यावेळीं प्रसिद्ध झालें आणि नंतर महाराष्ट्र मंडळीकडून तें बसविण्यांत आलें. त्यावेळीं नाना फडणवीसाच्या पात्रासंबंधानें कांहीं फेरफार मीं केले. ही गोष्ट नेपाळांतून मी परत आल्यावर व केसरींत काम करूं लागल्यावर झाली. माझें तिसरें नाटक 'कांचनगडची मोहना' हें होय. कांचनगडची मोहना हें नाटक केसरींत असतानांच लिहिण्याचें माझ्या मनांत होतें पण प्लेगमुळें मी सांगलीस गेल्यावर तें तेथें लिहिलें. पुण्यास परत आल्यावर तें चित्रशाळेंत छापलें. त्यावेळपर्यंत चित्रशाळेंत टाइपचें काम होत नव्हतें. त्यावेळीं ती दिशा बदलून टाइपाचें काम चित्रशाळेंत होऊं लागलें आणि हें नाटक

चित्रशाळेंत छापलें गेलें. कोल्हापूरच्या एका क्लबकडून कांचनगडची मोहना या नाटकाला अडीचशें रुपये बक्षीस मिळालें होतें. तें नाटक मी माझ्या नांवानें प्रसिद्ध केलें नव्हतें. माझें नांव नसलेलें तें नाटक पुण्याच्या स्टूडंटस क्लबमार्फत बसविण्यांत आलें. केसरीवरील पहिल्या राजद्रोहाच्या खटल्यांतील दीड वर्षांची शिक्षा भोगून लो. टिळक नुकतेच परत आले होते, आणि त्यावेळीं मद्रास काँग्रेसला जाण्याच्या तयारींत होतें. मद्रासच्या काँग्रेसला टिळक व वासूकाका जोशी यांच्याबरोबर जाण्याच्या तयारींत श्री. केळकरहि होते. नाटकाचा पहिला प्रयोग अहमदनगरला व्हावयाचा होता आणि त्यानंतर आणखी दोन तीन प्रयोग होईपर्यंत मंडळींना तेथें रहावें लागणार होतें. नाताळच्या सुटींत प्रयोग व्हावयाचें ठरलें होतें. श्री. केळकरांनीं मला विचारलें कीं नाटकांच्या सर्व प्रयोगांच्या वेळीं तुम्ही अहमदनगरला हजर रहाणार असाल तर आतांच तसें सांगा. मी उत्तर केलें कीं नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या वेळींच मी हजर रहाणार आहे आणि नंतर परतणार आहें.

पहिला प्रयोग आटोपल्यावर दुसरे दिवशीं नगरहून निघून रात्रीं ९॥ वाजतां मी पुण्यास येऊन पोहोचलों, आणि मी आलों असल्याचा निरोप श्री. केळकरांच्याकडे पाठविला. त्या दिवशीं रात्रीं २॥ च्या गाडीनें टिळक मद्रासकडे जाण्यास निघणार होते. केळकरांचें नांव केसरीवर असल्यामुळें त्यांनीं केसरीचें काम सोडून मद्रासला येऊं नये असें टिळकांच्या मनांत होतें, असें नंतर मला वासूकाकांच्या सांगण्यावरून कळलें. मी नगरहून ठरल्याप्रमाणें वेळेवर परत आल्यामुळें टिळकांच्या मनांत नसतांनाहि केळकरांना मद्रासला जातां आलें.

## मोहनेचें पात्र

अहमदनगरला कांचनगडची मोहना नाटकाचा पहिला प्रयोग होण्यापूर्वी मी पुण्याला नाटकाच्या चाललेल्या तालमी पहावयास गेलों होतों. कॉलेजांत

त्याचप्रमाणें हायस्कूलमध्ये शिकत असलेली मंडळी नाटकांत कामें करीत होती. मी पाहिलें कीं मंडळींचें पाठांतर चांगलें वजन पाडणारें आहे. पण मोहनेचें काम करणारा मुलगा मला काळा दिसला. माझ्याबरोबर तालीम पहाण्यास पुण्याची कांहीं मंडळी आली होती.त्यामध्यें पुणें हायस्कूलमधील ड्राइंग खात्याचे मास्तर होते. हा मुलगा काळा दिसतो तेव्हां त्याचें काम उठावदार होणार नाहीं अशी शंका माझ्या मनांत आली आणि मीं ती ड्राइंग खात्याच्या मास्तराजवळ बोलून दाखविली. पण त्यांनीं असें आश्वासन दिलें कीं, मुलगा काळा असला तरी स्टेजवर रंगून आल्यावर गोरा दिसेल-या आश्वासनावर मीं समाधान मानलें आणि त्यांच्याबरोबर अहमदनगरला जाण्यास निघालों. त्यावेळीं नगरला जाणारी गाडी संध्याकाळीं तेथें पोहचत असे. नगरला गेल्यावर मी जेवावयास गेलों आणि ड्राइंगखात्याचे मास्तर मुलांना रंगवावयास बसले. यावेळीं ग्रीजचा उपयोग रंगतांना करण्याची पद्धति माहीत नव्हती आणि पिवडी वगैरे रंगण्यासाठीं उपयोगांत आणीत असत. जेवणखाण उरकल्यावर मी थिएटरमध्यें गेलों.

## पहिल्या प्रयोगाचा फजीतवाडा.

प्रेक्षकवर्ग मध्यम स्थितींतला होता आणि कांहीं वकील मंडळीहि हजर होती. मला नगरला कोणीं ओळखणारें नव्हतें आणि म्हणून मी प्रेक्षकांत जाऊन बसलों. पडदा वर गेला आणि मोहनेच्या व यमुनेच्या प्रवेशास प्रारंभ झाला. एक दोन प्रवेश झाल्यावर हंबीरराव–मोहनेचा प्रवेश आला. त्यांत हंबीरराव मोहनेला तूं कितीतरी सुंदर आहेस असें ऐकवत होता. वकिलांनीं चेष्टा करण्यास सुरवात केली आणि ती सर्व मला ऐकूं येत होती. हंबीररावाला डोळे नसले पाहिजेत, नाहीं तर त्यानें मोहनेला सुंदर म्हटलें नसतें, अशी टीका ते करीत होते. प्रारंभींच्या प्रवेशांत मोहनेचें सोंग टाकाऊ दिसत नव्हतें. पण एक दोन प्रवेशानंतर मात्र चेहऱ्याचा रंग वाळून

मोहनेचा रंग हिरवाचार दिसूं लागला होता. नाटकाच्या प्रस्तावनेंत मी अशा अर्थाचे वाक्य लिहिलें होतें कीं नाटक चुटपुट लावल्याशिवाय राहणार नाहीं. चुटपुट हे शब्द जोरानें उच्चारून, खरीच चुटपुट लागेल, अशा प्रकारची चेष्टा करण्यांत येत होती, आणि ती माझ्या मनाला झोंबत होती.

प्रतापरावाची भूमिका करणारा मुलगा कॉलेजांत शिकणारा होता आणि त्याची नक्कल चांगली पाठ होती. पण एका सरदाराच्या घरचा जरीचा अंगरखा त्यानें अंगांत घातला होता, तो त्याला घट्ट होत होता आणि अंगांत तो कसाबसा घातलेला होता. त्यामुळें त्याची चेष्टा होत होती. पिलाजीरावांचें पात्र तोतरें होतें. तालमीच्या वेळीं तो तोतरेपणा माझ्या ध्यानीं आला नव्हता. दोन चार वाक्यें सफाईनें बोलावींत आणि नंतरच्या वाक्याला च च करून अडखळावें असा त्याचा क्रम रंगभूमीवर चालू होता. पहिल्या अंकाच्या अखेरीस आंतमध्यें गेल्यावर बाहेर बसून नाटक पहाणें माझ्याकडून होत नाहीं असें मीं सांगितलें; आणि त्यांच्या म्हणण्याला न जुमानतां मी आंतच बसलों आणि आंत बसूनच मीं उरलेलें नाटक ऐकलें. नाटकास सीनसिनरी कांहीं नव्हती. माझ्या अनुभवास आलें कीं नुसत्या बोलण्याच्या सफाईवर अवलंबून राहून नाटक रंगत नाहीं. तीन दिवसांच्या अंतरानें नाटकाचा दुसरा प्रयोग करून मंडळी नगरहून परतली, आणि मी पहिला प्रयोग झाल्यावर ड्रॉइंग मास्तरांना घेऊन दुसऱ्या दिवशीं पुण्यास परत गेलों.

## उत्तर रामचरिताची लेखनावर छाप

माझ्या लेखनावर भवभूतीच्या उत्तर रामचरितम् या नाटकाची छाप पडलेली आहे. हायस्कुलांत असतांना अप्पाशास्त्री गोडबोले यांच्यापाशीं मीं तें नाटक वाचलें होतें. कॉलेजांत असतांना पहिल्या बी. ए. साठीं हेंच नाटक होतें. त्यामुळें नाटकांतील पद्यभाग मला तोंडपाठ होता. सहा महिन्यांच्या परीक्षेंत प्रो. माधवराव आपटे यांनीं प्रश्नपत्रिकेंत एक श्लोक इंग्रजी

भाषांतरासाठीं घातला होता. मला श्लोक पाठ असल्यामुळें श्लोकाची पहिली ओळ मीं वाचली आणि पुढचा श्लोक वाचला नाहीं. पहिल्या ओळी-नंतरच्या तीन ओळींत पुढें प्रो. माधवरावांनीं पाठ बदलले होते. पण मीं पहिली ओळ वाचून पुढचा श्लोक पाठ असल्यामुळें पुढचा भाग वाचला नाहीं आणि त्यामुळें पाठभेद लक्षांत न घेतां मीं श्लोकाचें इंग्रजी भाषांतर करून टाकलें. हा मुलगा भाषांतर पाठ करूनच लिहितो असा शेरा मला या परीक्षेंत मिळाला. बाकी त्या पेपरमध्यें मला चांगले मार्क मिळाले होते. प्रोफेसरसाहेबांनीं माझी चूक माझ्या निदर्शनास आणली तेव्हां मीं सांगितलें कीं मूळ श्लोक मला पाठ येत होता आणि त्यामुळें श्लोकाच्या पुढच्या तीन ओळी मीं वाचल्या नाहींत आणि त्यांत केलेले पाठभेद माझ्या लक्षांत आले नाहींत.

मला उत्तर रामचरिताचे एकामागून एक श्लोक पाठ येत होते म्हणून उत्तर रामचरिताचा माझ्या लेखांवर व नाटकांवर परिणाम झाला. उत्तर रामचरितांत 'सततमति स्वेच्छादृश्यो नवोनव एष यः' असें वचन आहे त्यावरून मानापमानांत भामिनीच्या तोंडीं 'पाही सदा मी परि केवि नाथ भासे मला नवोनव' असें मीं पद घातलें आहे. यांतील 'नवोनव' या शब्दाकडे मी वाचकांचें विशेश लक्ष वेधूं इच्छितों. सीतेचे मुलगे लवांकुश यांचें वर्णन करतांना 'नमयतीव गतिर्धरित्रीम' असें वर्णन आहे. भामिनीच्या तोंडीं 'नमवी पहा भूमि हा चालतांना, सुचवीत तिज तूच मजपुढें निर्धना' असें पद त्यांतील कल्पनेला अनुसरून मीं घातलें आहे.

## अर्थगौरव व स्वभावदर्शन

उपमा कालिदासस्य, भारतेः अर्थगौरवम् हा श्लोक प्रसिद्ध आहे. अर्थगौरव या शब्दांत स्वभावदर्शनाचा—कॅरॅक्टर पेंटिंगचा—भाव येतो. पण उत्तर रामचरितांतील कांहीं कांहीं विधानांनीं सुचविल्या जाणाऱ्या स्वभाव-

दर्शनाचा–कॅरॅक्टर पेंटिंगचा–भाव या अर्थगौरव शब्दांत येत नाहीं. उत्तर रामचरिताच्या पहिल्या अंकांत 'इयमपि तदा जानकी' असें म्हणून सीतेचें वर्णन केलें आहे आणि त्यानंतर 'अये मध्यमाम्बावृत्तमन्तरितमार्येण' असे लक्ष्मणाचें वाक्य आहे. या एका वाक्यानें रामाचें जें स्वभावदर्शन होतें तें अर्थगौरवम् या शब्दांनीं व्यक्त होत नाहीं. दुसऱ्या अंकांत पहिल्या प्रवेशांत रामाच्या तोंडीं 'सीताविवासनपटोः करुणा कुतस्ते' असें शम्बूकाला मारल्यानंतरचे उद्गार आहेत. सीतेला टाकल्यामुळें रामाला किती वाईट वाटत होतें हें एवढ्या उद्गारांवरून स्पष्ट होतें. तिसऱ्या अंकांत सीतेच्या आठवणीनें राम मूर्च्छित होऊन पडतो आणि भगवति तमसेच्या सांगण्यावरून सीतेनें केलेल्या स्पर्शानें शुद्धीवर येतो. यावेळीं भागिरथीच्या वरानें सीता व तमसा अदृश्य अशा स्थितींत असतात. राम शुद्धिवर आल्यावर सीता आपला आनंद बोलून दाखविते आणि हिरण्मयी सीता प्रतिकृतीमुळें रामाला होणाऱ्या आनंदामुळें त्या सोन्याच्या सीतेला धन्यवाद देते. त्यावेळीं 'आयी वत्से, एवमात्मा स्तूयते' असें तमसेच्या तोंडचें वाक्य आहे. या एका वाक्यानें सीतेचें जें स्वभावदर्शन–कॅरॅक्टर पेंटिंग–झालें आहे तें अर्थगौरवम् या सदरांत मोडत नाहीं.

# भाषणांतील आत्मनिवेदनपर आठवणी

( कै. काकासाहेब खाडिलकर यांचें सांगलीस ता. १९।१२।३७ रोजीं सांगली हायस्कूलमध्यें फर्स्ट गेस्ट ( अतिथि ) या नात्यानें त्रिसुपर्णावर व्याख्यान झालें. या भाषणांत त्यांनीं सांगितलेल्या आत्मनिवेदनपर आठवणी पुढें दिल्या आहेत. )

## बोबडा होतों, तो शुद्धजीवि झालों

माझा जन्म सांगलीस झाला. माझें पहिलें शिक्षण सरकारी मराठी शाळेंत

सांगलीसच झालें. दुसरें शिक्षण ह्याच सांगलीच्या हायस्कूलमध्यें झालें. याशिवाय या हायस्कूलमध्यें मी बी. ए. झाल्यावर दोन वर्षें शिक्षकाचें काम केलें आहे. असा हा माझा सांगलीशीं व सांगली हायस्कूलशीं घरोबा असल्यामुळें पहिला पाहुणा–फर्स्ट गेस्ट–म्हणून आपल्यापुढें उभें रहातांना मला आनंद वाटत आहे.

आतांच ह्या संमेलनानिमित्तानें बक्षिसें देण्यांत आलीं. पन्नास वर्षांपूर्वी अशाच संमेलनांत मला बोलण्याबद्दल बक्षीस मिळालें होतें. पांचव्या इयत्तेंत असतांना बोलण्याच्या चढाओढींत मला पहिलें बक्षीस मिळालें होतें. पुढेंहि मला अशींच बक्षिसें मिळत गेलीं. त्यावेळीं मी बक्षिसाच्या लालुचीनें बोलत असें. आज पन्नास वर्षानेंहि मी फिरून बोलत आहें. पण बक्षिसाच्या अपेक्षेनें नाहीं.

मी एक मोठा वक्ता आहे असें सांगण्यांत आलें. त्यांतला गौरवाचा भाग सोडून दिला तर मला मुलांमध्यें बोलण्याची संवय आहे येवढें खरें. ह्या मुलांमध्यें बोलण्याच्या संवयीच्या जोरावर पुढील आयुष्यांत बाहेरगांवीं बोलण्याचा जेव्हां मला प्रसंग आला तेव्हां त्या प्रसंगांतूनहि मी पार पडलों आहें. हें त्यावेळच्या संमेलनानें मजवर केलेले उपकारच आहेत. त्यावेळीं ही संमेलनांतील चढाओढ नसती तर तसा अभ्यास झाला नसता व कदाचित् आयुष्याला निराळीच दिशा लागली असती. पण ही संमेलनाची जी गोडी निर्माण झाली त्या गोडीच्या जोरावर पुढील आयुष्याची गाडी ढकलतां आली. मला जर कोणी विचारलें कीं, तुम्ही लिहायला व बोलायला कसे शिकलां? तर मी सांगेन कीं, असाच संमेलनांत बोलूं लागलों ती गोडीच लागली. त्यावेळीं मी बोबडें बोलणारा होतों पण आतां शब्दजीवी झालों आहे. त्या लहानपणाच्या बोलण्यांतून उत्पन्न झालेल्या गोडीनेंच हें

कार्य केलें आहे. पूर्व वयांतील कार्यांतील गोडीमुळें पुढच्या वयांतील कार्यें तडीस जातात. क्रिकेटच्या खेळांत जी गोडी लागली त्यामुळेंच मला वाटर्लूची लढाई जिंकतां आली असें प्रसिद्ध इंग्रज सेनापति वेलिंग्टन यानें बोलून दाखविलें आहे. लहानपणीं ह्या गोडीच्या निर्मितीचे प्रसंग लहानच असतात, पण मोठ्या गोष्टीकरितां लागणारें बीज त्यांतच सांठविलेलें असतें, व त्यामुळें पुढील आयुष्याचें पाऊल पडत असतें.

## टेनिसचा चँपियन प्लेअर

ह्याच संमेलनाच्या गोडीमुळें मी दोन वर्षें संमेलनाचा सेक्रेटरी होतों. गोडी निर्माण झाली कीं, ती माणसाला काम करावयास लावते. ह्याच संमेलनांत निर्माण झालेल्या गोडीमुळें मी टेनिस जिमखान्याचाहि सेक्रेटरी झालों. माझ्या जोडीला माझे मित्र आबासाहेब करमरकर असत. मी व आबा त्यावेळचे सांगलीचें चँपियन प्लेअर होतों. कारण दुसऱ्या कोणास फारसें खेळावयास येत नसे. 'एरंडोपि द्रुमायते' अशी त्यावेळीं परिस्थिति होती; पण संमेलनांत लागलेल्या गोडीमुळेंच हें जिमखान्याचें काम करावेसें वाटलें.

ह्या खेळांत काय अगर बोलण्यांत काय, यश मिळविण्याकरितां मी काय युक्ति करीत असें तें विचाराल तर खेळण्याच्या वेळीं 'ग्रेसफुल' खेळण्याकडे माझी वृत्ति नसे. तें काम आबांचेकडे होतें. माझी नेहमीं जोरानें खेळण्याकडे प्रवृति असे. 'फास्ट सर्व्हिस' करायची, सपाटून जोरानें खेळायचें. त्यामुळें नेहमीं आम्हांला माझ्यामुळें जय मिळे, पण स्तुति मात्र व्हायची आबांची ! सपाटून जसा खेळत असे तसाच सपाटून बोलत असें, जोरानें बोलायचें हीच माझी युक्ति.

## जोरकसपणानें कार्य होतें

मी जेव्हां प्रथम वक्तृत्वाचें पहिलें बक्षीस मिळविलें त्यावेळीं तें त्यावेळचे कारभारी बिवलकर यांचें हस्तें मिळालें. बिवलकर व आम्ही एकाच

वाडयांत रहात होतों. त्यामुळें मी बोलण्यांतलें बक्षीस मिळविलेलें पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, 'अरे तूं बोबडा ! तूं बोललास कसा ?' मलाहि ते असें कां बोलतात हें कळेना म्हणून मी घरीं जातांच आईला विचारलें, 'मला बोबडा कां म्हणतात ' म्हणून ! त्यावेळी आईनें सांगितलें ' होतास तू चार वर्षांपूर्वी बोबडा, आतां बरा झाला आहेत.' हा मी बरा कसा झालो ह्याचा विचार करतांना जोरानें बोलूं लागलों म्हणून बरा झालों असें मला समजून आलें. जोरानें बोललें कीं, बोबडेपणा नाहींसा होतो. माझा बोबडेपणा आतां मला म्हातारपणीं समजूं लागला व नडूं लागला असला तरी जोरानें बोलायला लागलो कीं बोलायला येतें, जोरानें काम करूं लागलों की कार्य होतें, हें विसरतां कामा नये. याच गोष्टीमुळें मला आतांपर्यंत कांहीं तरी कार्य करतां आलें आहे. टेनिसमधील फास्ट सर्विसचा जोराच्या खेळाचा–गुणच मला पुढील आयुष्यांत फार उपयोगी पडला. जोरानें बोलून मी माझें बोबडेपणाचें व्यंग काढून टाकूं शकलों. पण आतां दत्त मंदिरांतील प्रवचनांच्या वेळीं वेदांतील मंत्र म्हणूं लागलों म्हणजे माझी जीभ जड आहे ह्याची मला प्रचीति येते. तरुण वयांत जोरानें बोलतांना जीभ जड वाटली नाहीं. पण आतां वार्धक्य आलें आणि वार्धक्य म्हणजे दुसरें बाळपण. तेव्हां पुन्हां बोबडे शब्द उच्चारले जाणें साहजिकच आहे.

## म्हातारपणची युक्ति

मी जेव्हां संहिता व उपनिषदें वाचूं लागलों तेव्हां हे वेदांतील कठिण शब्द व अवघड मंत्र म्हणतांना जीभ जड जाऊं लागली. बाळपणीचा दोष जोरानें शब्दोच्चार करून जसा घालविला तसा आतां घालवावा म्हटलें तर म्हातारपणीं इतका जोर येणार कोठून ? तेव्हां हा दोष घालविण्याकरितां काय युक्ति योजावी याचा शोध घेऊं लागलों; तों तैत्तिरीय आरण्यकांत शेवटीं नारायण उपनिषद आहे. ह्या उपनिषदास मंत्रोपनिषद असें म्हणतात.

वेदांतील निरनिराळ्या मंत्रांचे लहान लहान गट पाडून हें उपनिषद बनविलें आहे. त्यापैकीं एका गटास त्रिसुपर्ण म्हणतात. त्रिसुपर्णाच्या सायनाचार्यांच्या भाष्याचा प्रारंभच सायनाचार्यांनीं असा केला आहे कीं, विद्या संपादन करण्याच्या कामीं आपल्या पापाकडून जे व्यत्यय येतात ते दूर करण्यास ह्या मंत्राचें पठण उपयोगी पडतें. ज्ञान प्राप्त व्हावें अशी आपली इच्छा असते, पण अडथळे उत्पन्न होतात; आणि ज्ञानाकडचा ओढाच कमी होंतो. अशा वेळीं काय केलें असतां ज्ञान प्राप्त होईल ती युक्ति तेथें सांगण्यांत आली आहे व आपल्याला जें मिळत नाहीं तें प्राप्त करून घेण्याची ही युक्ति तुम्हां विद्यार्थ्यांनाहि सांगावीं असें वाटल्यावरून मी ती सांगत आहे.

मी तुमच्याप्रमाणें एक विद्यार्थी आहे तेव्हां त्रिसुपर्णाच्या मंत्रांतील उपदेशाचा तुमच्याप्रमाणें मलाहि थोडा फार उपयोग होईल. विद्येबद्दलचा आळस, विद्येकडे दुर्लक्ष हा रोग माझ्यांत आतां क्रॉनिक—जुनाट—झाला आहे. त्यामुळें मला उपयोग कमी झाला तरी तुम्ही विद्यार्थी तरुण आहांत, तुम्हांला हुरूप आहे, तुम्हाला याचा चांगलाच फायदा होईल. माझ्यासारख्या मरण जवळ आलेल्यांनाहि हें औषध घ्यावेंच लागतें; पण तें तुम्ही तरुणपणीं वेळींच घेतलें तर गुणकारी झाल्याशिवाय कसें राहील ? तुम्हां तरुण मंडळींना आपण कांहीं करीयर करावी—कीर्ति मिळवावी, अशी महत्त्वाकांक्षा असते—ओढ असते. पुष्कळदां असें होतें कीं, शाळेंत काढलेली भावी आयुष्याची स्वप्नें स्वप्नेंच ठरतात. शाळेंत केलेले बेत पुढें अनुभवाला कमीच येतात. पण मनुष्य कांहीं तरी मोठे बेत केल्याशिवाय रहात मात्र नाहीं. मी असें करीन—मी अशा मोठेपणाला जाईन; ही महत्त्वाकांक्षाच मुख्य आहे. ही आकांक्षा फलद्रुप झाली नाहीं—भावी आयुष्यांत तो मोठेपणा अनुभवाला नाहीं आला तरी बेहत्तर पण मोठें होण्याची ही महत्त्वाकांक्षा—

मोठें होण्याची ही महत्त्वाकांक्षा–मोठें होण्याची ही गोडी कायम ठेवा, म्हणजे यशाच्या मार्गाला लागायला लागलीच सुलभ झालें असें समजा.

## आमच्या वेळचा पराक्रमहीन काल !

आपण भाग्यवानाच्या जन्मांस आलां आहां. जबाबदारीनें व स्वार्थ-त्यागानें कामें अंगावर घेण्याची वेळ आतां आली आहे. आमच्या मुलांना नोकऱ्या कशा मिळतील ह्या विवंचनेंत तुमचे आईबाप आहेत खरे, पण हिंदुस्थानचा जीवनक्रम स्वार्थत्यागाच्या पायावर आज काँग्रेसनें उभारला असल्यामुळें आणि तो प्रत्यक्ष अंमलांत आणण्यास आज सुरवात झाली असल्यामुळें जीवनक्रम कोणचा ह्याबद्दल तुम्हांस विवंचना राहिलेली नाहीं. आमच्या वेळीं ही विवंचना होती, तशी विवंचना ह्यापुढें रहाणार नाहीं. पगार मोठे मिळणार नाहींत हें खरें; पण कामास तुटवडा नाहीं. ह्याकरितां मी तुम्हांस भाग्यवान असें म्हणतों. नोकऱ्या मागण्याचे वेळीं काय करूं असें विचारण्याची पाळी तुम्हांवर येणार नाहीं. डोंगराएवढें काम तुमच्यापुढें पडलें आहे व तें कार्य उचलणारे लाखों स्वार्थत्यागी लोक तुमच्याबरोबर रहाणार आहेत. तुमच्यापुढील कार्य फार मोठें आहे आमच्या वेळेचें कार्य त्या मानानें अगदीं क्षुल्लक. मी वर्तमानपत्रांत लेख लिहून व सभेंत बोलून मोठी कामगिरी केली असें सांगण्यांत आलें, पण तुमच्या पुढील कार्याच्या दृष्टीनें हें वर्तमानपत्रांतील लिहिणें व सभेंतील बोलणें म्हणजे क्षुल्लक बाब समजली पाहिजे. आम्ही एक तऱ्हेच्या हतभागी कालांत जन्मलों. रुपेरी बेडीनें आम्ही जखडलों होतो. आज मृत्यु समीप आला असतां आमची स्थिति फारशी पालटलेली नाहीं. पन्नास वर्षांपूर्वी मी बोलूं लागलो व आज पन्नास वर्षांनीं तुमच्यापुढें फर्स्ट गेस्ट म्हणून उभा आहे तो नुसता बोलत आहे. ह्याचें कारण पराक्रमहीन कालांत मी जन्माला आलों.

तरुणांनो ! तुमचा काळ तसा नाहीं, पन्नास वर्षांनंतर याच ठिकाणीं पहिला पाहुणा-फर्स्ट गेस्ट-म्हणून येण्याची जेव्हां तुम्हांला संधी मिळेल त्यावेळीं आपण छातीला हात लावून सांगाल कीं, माझ्या हातानें मी हा देश मिळविला आहे. मी देशाचा आधारस्तंभ आहे. मी माझ्या हातापायांनीं काम करून ह्या देशाची उभारणी ( Nation--Building ) केली आहे असें त्यावेळीं तुम्ही मोठया अभिमानानें सांगूं शकाल. ह्याचें कारण महात्मा गांधींच्या प्रेरणेनें निर्माण झालेलें काँग्रेसचें राज्य आज अस्तित्वांत आलें आहे. आमच्या वेळीं तसें नव्हतें. त्यामुळें आमची आंधळ्यासारखी स्थिति झाली होती. आतां काँग्रेसचें स्वार्थत्यागी डोळस राज्य चालू झालें असल्यामुळें आतां आंधळ्याच्या काठीची तुम्हाला गरज नाहीं.

## केसरींत प्रवेश

('खाडिलकरांची ॐकाराची उपासना' या ग्रंथांत काकासाहेबांनीं आपला 'केसरी' मध्यें प्रवेश कसा झाला याची आत्मनिवेदनपर हकीकत दिली आहे. सदर हकीकत पुढें दिली आहे. )

संसाराचे काळजीखालीं मन खचून गेल्यावर जीं स्वप्नें पडतात तीं सूचक असतात. काळजीचें ओझें मनाला असह्य वाटूं लागलें म्हणजे आत्म्याची शक्ति जागी होते; 'असें कर' म्हणून स्वप्नामार्फत अर्धवट मार्ग दाखविते. सेकंड एल. एल. बी. ची टर्म संपल्यावर पुढें काय करावयाचें ह्याची मला काळजी लागली होती; परीक्षेला बसण्याइतपत अभ्यास झालेला नव्हता; कोठें लिहिण्याची सोय होईल काय ह्या विवंचनेंत मी होतो; ही विवंचना सुरू झाल्यानंतर स्वप्नांत 'केसरी' हीं अक्षरें दोनदां स्पष्ट दिसलीं. जागेपणींहि लय लाविला असतांना तोच प्रकार स्पष्टपणें अनुभवास आला.

पुढें दे. नारायण वापूजी कानिटकर ह्यांची व माझी गांठ श्री. गणपतराव पागे ह्यांचेमार्फत पडली. त्यावेळीं मीं लिहिलेलें 'सवाई माधवराव' हें नाटक आणि श्री. गोळ्यांनीं लिहिलेल्या 'ब्राम्हण व त्यांची विद्या' ह्या पुस्तकावरील माझी टीका 'विविधज्ञान विस्तार' ह्या मासिकांतून प्रसिद्ध झाली होतीं. 'विविधज्ञान विस्तार' हें मासिक दे. नारायण वापूजी कानिटकर ह्यांच्या वाचण्यांत येत असे. माझे दोनहि लेख त्यांच्या वाचनांत आलेले होते. माझा अभ्यास झालेला नाहीं असें शेवटची टर्म भरीत असतांना मीं म्हटल्यावरून त्यांनीं 'केसरी'चें नांव सुचविलें.

पुढें टर्मचे दिवस पुरे होतांच शुक्रवारीं मुंबई सोडून शनिवारीं सकाळीं पुण्यास गेलों. जातांक्षणीं दे. नारायण वापूजी कानिटकर ह्यांना भेटलों. दोनप्रहरीं लो. टिळकांना भेटून काय तें सांगतों, असें उत्तर आलें. मी संध्याकाळीं पुन्हां भेटावयास गेलों तेव्हां मला 'लो. टिळकांकडे उद्यां घेऊन जातों' असें दे. कानिटकरांनीं सांगितलें. मी कोण आहें, आणि माझे लेख कसे आहेत, ह्याविषयीं दे. कानिटकरांनीं सर्व कांहीं सांगावयाचें होतें तें सांगून टाकलेलें होतें. म्हणून रविवारीं गांठ पडली असतांना एकदम 'केसरी'साठीं अग्रलेख लिहिण्यास लो. टिळकांनीं मला सांगितलें. तो विषय "राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता" हा होता. श्रीगणपतीमहोत्सवाला आरंभ होण्यास १८९६ सालीं दोन आठवड्यांचा अवधि होता. मला विषय देतांना कशा तऱ्हेनें लिहिला असतां त्यांना तो पसंत पडेल हें सांगून अमूक अमूक पुस्तकांतून त्याची माहिती आलेली आहे हेंहि मला सांगून टाकलें !

रविवारचा दिवस माहिती गोळा करण्यांत मी घालविला आणि सोमवारीं सकाळीं अग्रलेख लिहून टाकला. माझा तो लेख माझे मित्र रा. वामनराव पटवधन व रा. गणपतराव अभ्यंकर ह्यांना वाचावयास दिला. त्यांनीं पसंत

केल्यावर लो. टिळक यांचेकडे तो लेख घेऊन गेलों. लो. टिळकांनीं वाचून पाहिला, आणि प्रुफें तपासण्याकरितां तुम्हांस येण्याची आवश्यकता नाहीं, मीच प्रूफें तपासून देतों, असें मला सांगितलें. दुसऱ्या दिवशीं 'केसरीं'त माझा अग्रलेख प्रसिद्ध झाला. नंतर लो. टिळकांनीं त्याच विषयावर दुसरा लेख लिहिण्यास मला सांगितलें. तोहि लेख 'राष्ट्रीय महोत्सवाच्या वेळीं सुशिक्षितांनीं काय केलें पाहिजे' हा मी लिहिला आणि दुसऱ्याच दिवशीं तोहि प्रसिद्ध झाला. इतक्यांत श्रीगणपतीमहोत्सवास १८९६ सालीं प्रारंभ झाला होता आणि व्याख्यानांची झोड उठून गेली होती. त्या व्याख्यानांची हकीकत लिहून काढण्याचें काम माझ्यावरच लो. टिळकांनीं सोपविलें होतें. त्यावेळीं माझे वडील बंधु मंगळवेढ्यास मुन्सफ होतें; त्यांना समजलें कीं पुण्यास येऊन मी 'केसरीं' त नोकरी करीत आहें. माझे दोन लेख वाचून ते खूष झाले, आणि मीं लिहिलेली व्याख्यानांची केसरींतील हकीकत वाचून त्यांनीं माझे कौतुक केलें आणि तसें पत्रीं लिहून मला कळविलेंहि. वडील बंधु काय म्हणतील ह्या काळजींतून मी मुक्त झालों. स्वप्नांत दोनदां आणि जागेपणीं एकदां 'केसरी'चा व माझा संबंध कसा जुळून आला; ह्यासंबंधानें हकीकत जशी घडून आली तशी विस्तारानें येथें देण्यांत आली आहे.

# बोलण्यांतील आत्मनिवेदनपर आठवणी

(कै. काकासाहेब खाडिलकर यांच्या बोलण्यांत अधून मधून आत्मनिवेदनपर आठवणी येत असत, त्या पुढें दिल्या आहेत.)

## लहानपणचा अभ्यास व खेळ

लहानपणीं तिसरी इयत्ता इंग्रजीची पास होईपर्यंत माझें लक्ष अभ्यासापेक्षां खेळाकडेच फार होतें. घरीं असा मी फारसा अभ्यास करीतच नसें आणि

सपाटून खेळत असें. वर्गांत मास्तर शिकवीत असतांना मात्र माझें पूर्ण लक्ष तिकडे असे आणि त्यामुळें विषय समजण्याला मला कधीं अडचण आली नाहीं. थोडयाशा ध्यासानें शाळेंत अभ्यास मागें न पडतां परीक्षा उतरत असत. वडील बंधु तात्या नेहमीं फिरतीवर असत आणि त्यामुळें माझ्यावर लक्ष ठेवण्याचें काम आईच आपल्या समजुतीप्रमाणें करीत असे. शाळेंत मुलगा दररोज व्यवस्थित जात आहे व नापास न होतां वरच्या इयत्तेंत जातो यावर तिचें समाधान होतें. इंग्रजी चौथ्या इयत्तेंत गेल्यापासून मात्र खेळणें सुटलें नाहीं, तरी अभ्यासाची ओढ लागली आणि मी लक्ष लावून अभ्यास करूं लागलों. इंग्रजी चौथ्या इयत्तेपासून पुढें नेहमीं मला स्कॉलरशिप्स मिळत राहिल्या.

## संध्येऐवजीं नदींत डुंबणें

लहानपणीं मुंज झाल्यावर मला संध्या शिकवली होती आणि ती मला पाठ येत होती. पण खेळण्याच्या नादामुळें संध्या मी करीत नसें. आईच्या लक्षांत हें आल्यावर तिनें मला आमच्या उपाध्यायांकडे नेले आणि कृष्णाला संध्या येत नाहीं असें सांगून ती शिकवण्यास उपाध्यायाला तिनें सांगितलें. उपाध्यायांचा मुलगा माझ्या वयाचाच होता. माझ्या मुलाबरोबर संध्या करण्यास त्याला येऊं दे असें उपाध्यायांनीं आईला सांगितलें, व त्याप्रमाणें संध्या करण्यास मी उपाध्यायांच्या घरीं जाऊं लागलों. पहिल्या दिवशीं उपाध्यायांनीं मजकडून संध्या म्हणवून घेतली व ती मी बरोबर म्हटली. तुला तर सर्व संध्या येत आहे, आतां दररोज येऊन माझ्या मुलाबरोबर संध्या-करीत जा, असें उपाध्यायांनीं सांगितलें, व त्याप्रमाणें कांहीं दिवस संध्या सुरळीत चालली होती. पण नंतर संध्या करण्यासाठीं मी उपाध्यायांच्या अनुमतीनें त्यांच्या मुलालाच बरोबर घेऊन नदीवर जाऊं लागलों आणि

संध्येऐवजी नदींत यथेच्छ डुंबण्याचा कार्यक्रम राजरोस सुरू झाला. अशा रीतीनें नित्य संध्या संपुष्टांत आली.

## रामनामामुळें बुडतांना वाचलों

लहानपणीं हूडपणामुळें आणि घरांत वचक ठेवणारें वडील मनुष्य नसल्यामुळें संध्या, पूजाअर्चा यांजसारखीं नित्यकृत्यें कधीं नियमानें माझ्याकडून झालीं नाहींत व लहानपणींचें वळण नसल्यामुळें पुढेंहि संध्या पूजाअर्चा मी कधीं नियमानें केली नाहीं. पण लहानपणापासून मी संध्या वगैरे करीत नसलों तरी निरीश्वरवादी असा मी लहानपणापासून कधींच नव्हतों. आईच्या तोंडून ऐकलेल्या कथापुराणांमुळें देवावर माझी मोठी श्रद्धा लहानपणापासूनच होती. एकदां लहानपणीं पुरांत पोहोण्यास पडलों असतांना दमून गटंगळ्या खाऊं लागलों आणि धारेला लागून वाहून जाऊं लागलों. पाण्यावर माझी शेंडी दिसत होती. तिकडे एका इसमाची नजर जाऊन त्यानें मला वर काढलें आणि अपमृत्यु टळला. घरीं गेल्यावर मी आईला सांगितलें कीं बुडत असतांना रामाचें नांव मी घेत होतों. रामाचें नांव घेतलें म्हणजे तरतो असें तूं सांगत असतेस ना ? तें खरें झालें आणि रामाचे नांव घेतल्यामुळें मी बुडतांना वांचलों.

## महाराष्ट्र कंपनीचा 'मोहना' नाटकाचा प्रयोग

पुण्याच्या स्टूडंट्स् क्लबनें कांचनगडची मोहना नाटकाचे कांही प्रयोग केल्यानंतर त्या नाटकाचें पुस्तक छापलेलें असल्यामुळें कांहीं काळानंतर त्या नाटकाकडे महाराष्ट्र नाटक मंडळीचें लक्ष गेलें. नाटकाच्या पुस्तकावर लेखकाचे नांव छापलेलें नव्हतें. तेव्हां महाराष्ट्र मंडळीनें पुण्यास चित्रशाळेंत नाटक करण्याच्या परवानगीविषयीं चौकशी केली व लेखक कोण त्याची माहिती विचारली. श्री. वासुकाका जोशी यांनीं त्यांना सांगितलें, नाटकाच्या

सं. नं. नि. ९२७२

लेखकाशीं तुम्हांला काय करावयाचें आहे ? नोटक करण्याची परवानगी मी तुम्हाला देतों, तुम्ही खेळ करा. याप्रमाणें परवानगी मिळाल्यावर महाराष्ट्र नाटक मंडळीनें कांचनगडची मोहना खेळ बसवून तो करण्यास सुरवात केली. हा नवा खेळ घेऊन कंपनी पुण्याच्या मुक्कामास आली तेव्हां मी नेपाळहून पुण्यास आलेलो होतों. महाराष्ट्र नाटक मंडळीनें हा खेळ पुण्यास लावला तेव्हां तो पहाण्याची स्वाभाविक उत्सुकता मला होती.

## व्याख्यान संपवून नाटक अर्धें पाहिलें

नाटकास जाण्यापूर्वी रात्रीचा फराळ मी करीत असतांना लो. टिळकांकडून मनुष्य त्यांचे बोलावणें घेऊन आला. कशासाठीं बोलावलें असावें याचा तर्क करीत मी टिळकांकडे गेलो त्यावेळीं ते फराळ करीत बसले होते. त्यांनीं मला सांगितलें कीं, आज अमुक अमुक गणपतीपुढें माझें व्याख्यान आहे; त्यासाठीं योजलेले अध्यक्ष येऊं शकत नाहींत तेव्हां आजच्या सभेचे अध्यक्ष तुम्ही व्हा. व्याख्यान गीतेच्या अमुक अमुक श्लोकावर आहे. त्यावर तुम्ही विचार करून ठेवा आणि मी तुम्हास खुणावेपर्यंत सुरवातीस तुमचें भाषण चालू द्या.

सभा साधारण तासाभरांत आटोपेल आणि नाटकास जाण्यास फारसा उशीर होणार नाहीं असें मला वाटत होतें. सभेस सुरवात झाली आणि अध्यक्ष म्हणून बोलावयास मी उभा राहिलों. दर पांचचार मिनिटांनीं टिळकांकडे पहात होतों आणि त्यांच्याकडून कांहीं खूण झाली नाहीं म्हणजे भाषण पुढें चालू ठेवीत होतों. पंधरा वीस मिनिटेंपर्यंत त्यांजकडून कांहीं खूण झाली नाहीं आणि माझें भाषण तोंपर्यंत चालू होतें. नंतर टिळकांचें भाषण सुरू झालें. तें सुमारें १॥ तासपर्यंत चाललें होतें. त्यांचें भाषण संपते केव्हां आणि थिएटरकडे जावयास मिळतें केव्हां, अशी माझी चुळबुळ अध्यक्षांच्या

खुर्चीवरून सुरूं होती. सभा संपल्यावर मी नंतर तेथें थांबलों नाहीं. मी माझ्या नाटकाचा पुण्यांतील पहिला प्रयोग पहावयास जात आहे असा निरोप टिळकांना कळविण्याकरितां श्री. बाबा विद्वांसाजवळ मी सांगितला आणि टिळकांचा निरोप न घेतांच थिएटरकडे गेलों. तोंपर्यंत नाटकाचे दोन अंक संपून गेले होते.

## नाटकांवर लो. टिळक खुष

लो. टिळकांनीं माझी कांचनगडची मोहना, कीचक वध, विद्याहरण, स्वयंवर, वगैरे नाटकें पाहिलीं होतीं आणि माझ्या नाटकांवर ते खूष असत. नाटकांतील निरनिराळ्या पात्रांचे conflicting interests एकमेकांच्या विरुद्ध जाणारे हितसंबंध उठावदार रीतीनें दाखविण्याचें तुम्हाला फार चांगलें साधलें आहे आणि त्यामुळें तुमचीं नाटकें मनाची पकड चांगली घेतात असें ते म्हणत असत.

बालगंधर्वांच्या गाण्यावरहि लोकमान्य टिळक खूष असत. तुम्हाला गाणें समजतें काय, अशा प्रकारचा प्रश्न मी एकदां केला होता. गाणें समजलें नाहीं तरी तें गोड आहे किंवा नाहीं ते कानांना कळतें, असें त्यांनीं उत्तरादाखल सांगितलें होतें.

# नेपाळची हकीगत

## पूर्व पीठिका

१९०१च्या सुमारास कलकत्ता काँग्रेसच्या अधिवेशनाकरितां लो. टिळक व वासुकाका जोशी हे कलकत्त्यास गेले होते. तेथें त्यांना मुलींच्या बंगाली

शाळेला भेट देण्याचें आमंत्रण आलें व शाळा पहाण्यासाठीं ते गेले. शाळेची व्यवस्था माताजी नांवाच्या बाई पहात असत. भेटीसाठीं गेले असतांना त्या दोघांशीं माताजी मराठींत बोलूं लागल्या. बंगाली शाळेवरची बाई मराठी बोलते याचें दोघांनाहि आश्चर्य वाटलें; पण त्यापेक्षां अधिक आश्चर्य हें कीं माताजींनीं नेपाळचें बोलणें काढलें आणि नेपाळच्या महाराजांची ओळख करून देण्याची तयारी दाखवून त्यांनीं तिकडे जावें असें सुचविलें.

माताजींचें पूर्व वृत्त असें कीं त्या मूळच्या तंजावरच्या. लहान वयांतच त्यांना वैधव्य आलें. त्यानंतर त्या उत्तर हिंदुस्थानांत यात्रेला म्हणून गेल्या. यात्रेंत हिंडत असतांना त्या नेपाळांत पशुपतेश्वरच्या दर्शनाला गेल्या आणि त्या तेथेंच नेपाळचे त्यावेळचे महाराज धीर समशेरजंग यांच्याजवळ राहिल्या. माताजी रूपानें चांगल्या होत्या. त्यानंतर धीर समशेरजंग महाराज यांचा खून होऊन वीर समशेरजंग महाराज गादीवर आले. त्यावेळीं महाराजांनीं दिलेलें जडजवाहिर वगैरे घेऊन माताजींनीं नेपाळ सोडलें. दरभंग्याच्या महाराजांजवळ जडजवाहिर ठेवून कलकत्त्याला त्या आल्या व त्यांनीं मुलींची शाळा काढली. कलकत्त्याला त्या आल्या तरी नेपाळचे माताजींचे संबंध सुटले नव्हते. नेपाळचे कर्नल एंजिनियर कुमार नरसिंग यांची व माताजींची चांगली ओळख होती. या ओळखीचा कांहीं उपयोग होऊन नेपाळमधून कांहीं देशाचें कार्य व्हावें अशी माताजींची इच्छा होती. माताजींच्या पश्चात त्यांच्या स्मरणार्थ पशुपतेश्वराच्या देवळाच्या पाहिऱ्यांवर गंगामातेची एक घुमटी बांधलेली आहे.

## नेपाळची कामगिरी पत्करली

त्यांच्या बोलण्यानें लो. टिळक व वासुकाका जोशी यांचें नेपाळबद्दलचें कुतुहल जागृत झालें आणि नेपाळला जाण्यास ते निघाले. पाटणा मार्गानें ते रेल्वेनें नेपाळास चालले होते. पण सरहद्दीच्या रेल्वे स्टेशनवरून संस्थानांत

जाणाऱ्यांचा परवाना जवळ नसल्यामुळें त्यांना परतावें लागलें. पशुपतेश्वराच्या यात्रेच्यावेळीं तेवढे यात्रेकरूंना परवान्याशिवाय नेपाळांत जाऊं देत असत.

नेपाळहून परत आल्यावर वासुकाका जोशी यांनीं नेपाळची व माताजींची हकीकत मला सांगितली आणि त्या कामांत भाग घेण्यास मी तयार झालों. माताजींशीं पत्रव्यवहार चालू होताच. नेपाळच्या सर–सेनापतींची गांठ माताजींनीं घालून द्यावी असें माताजींना पत्रानें कळविण्यांत आलें. नेपाळचे महाराज हे नामधारी व खरी सत्ता सेनापतीची असते. त्यावेळीं सेनापति चंद्रसमशेरजंग बहादूर हे होते. पत्रव्यवहारांत सेनापतिसाहेबांशीं गांठ पडण्याची व्यवस्था करण्यांत आली आणि वासुकाका व मी कलकत्त्याला गेलों. तेथें सेनापतींची गांठ पडण्यास कालगति फार झाली, पण अखेर गांठ झाली. त्यावेळीं नेपाळचे विद्यार्थी शिक्षणासाठीं जपानला पाठविण्याची सूचना वासुकाकांनीं केली व शिक्षणाप्रीत्यर्थ नेपाळचे विद्यार्थी जपानला पाठविण्यांतहि आले.

या मुलाखतींत सेनापतींनीं विचारलें कीं तुम्हांला कौलें तयार करतां येतात काय ? वासुकाका जोशी यांनीं एकदम होय म्हणून सांगितलें. त्यावेळीं नेपाळच्या राजवाड्याचें काम चालू होतें. त्या राजवाड्यावर घालण्यासाठीं कौलें पाहिजे होतीं. तीं मंगलोरी कौलें तयार करण्यासाठीं मी व वासुकाकांनीं नेपाळला जावें असें त्या भेटींत ठरलें आणि आम्हीं परत आलों.

कलकत्त्याहून मी आणि वासुकाका जोशी परत आल्यावर वासुकाकांनीं मला सांगितलें कीं, तुम्ही जर नेपाळला गेलांत तर माझ्यापेक्षां अधिक उपयोग होईल. कारण तुम्ही अधिक शिकलेले आहांत आणि वाटाघाटी करतांना तुम्ही जेवढें बोलूं शकाल व करूं शकाल तेवढें मला जमणार नाहीं. तेव्हां नेपाळला तुम्हीच जावें हें अधिक बरें. वासुकाकांचें हें म्हणणें मीं मान्य केलें आणि कौलाच्या कारखान्यासाठीं मी नेपाळला जावें असें ठरलें.

## शस्त्रांच्या कारखान्याची योजना

नेपाळांत जाऊन तेथें रायफली तयार करण्याचें यंत्र न्यावयाचें व तेथें हत्यारें तयार करावयाचीं अशी मूळ कल्पना होती. नेपाळला जाण्यापूर्वी त्या यंत्राबद्दलची व्यवस्था करावयाची होती. यंत्राचे नकाशे त्यावेळीं ग्वाल्हेरला मेकॅनिक केतकर होते त्यांचेकडे होते. त्या नकाशांकरितां २५० रुपये द्यावयास पाहिजे होते. अमरावतीचे श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांच्याकडून हे २५० रुपये मीं घेतले. कांचनगडची मोहना हें माझें नाटक मी त्यांना अर्पण केलें होतें. त्यामुळें त्यांच्याशीं माझा परिचय होता. खापर्ड्यांकडून २५० रुपये घेऊन यंत्राचे नकाशे मिळविले. जर्मनीच्या क्रप्स कारखान्याचे एजंट त्यावेळीं कलकत्त्याला होते. त्यांच्या मार्फत यंत्राची ऑर्डर दिली. यंत्रासाठीं पांच हजार रुपये उभे करावयाचे होते. त्या कामीं छत्रे सर्कशीच्या मालकांची मदत झाली. त्यांच्याकडून यंत्राकरितां घेतलेले पैसे पुढें नेपाळकडून मिळाल्यावर परत केले. मेकॅनिक केतकरसाहेबांना चंद्रसमशेर महाराजांनीं आपला शस्त्रास्त्रांचा कारखाना दाखविला होता, आणि हा कारखाना तुम्ही चालवावा अशी मनीषा बोलून दाखविली होती. पण पगारासंबंधानें त्यांचें जमलें नाहीं.

## बंदुकीचा सराव व सर्कशींत घोडेस्वारीचें शिक्षक

नेपाळला जाण्यापूर्वी सुमारें तीन महिने मी छत्रे यांच्या सर्कशींत राहिलों होतों; आणि तेथें असतांना घोड्यावर बसण्यास मी शिकलों. बंदूक पूर्वी मीं हाताळलेली होती. सांगलीस असतांना गाडगीळ सराफांच्याकडे बंदूक होती. ती घेऊन सांगलीचे सिनाप्पा कोतवाल, गाडगीळ वकील व मी असे तिघेजण सांगलीहून हरिपूरच्या वाटेवर जात असूं. वाटेंत एक ओहोळ लागतो. त्या ओहोळाच्या दोनहि बाजूला दरड असे. एका दरडीवर नारळ

ठेवून दुसऱ्या दरडीवर उभे राहून नारळावर नेम धरून तो फोडावयाचा अभ्यास आम्ही त्यावेळीं करीत असूं. ज्याच्या गोळीनें नारळ फुटे त्याला दोन काडतुसें मिळत.

## माताजींकडचा मुक्काम

नेपाळला जाण्याची अशा रीतीनें पूर्वतयारी झाल्यावर पावसाळा उलटल्यावर मी कलकत्त्याला माताजींकडे गेलों. तेथें माताजींकडेच उतरलों होतों. बरोबर दोन माणसांच्या स्वयंपाकास पुरतील एवढीं भांडीं घेतलीं होतीं. माताजींकडे असतांना माझा स्वयंपाक माझा मीच करीत होतों. नेपाळला गेल्यावरहि सुरवातीचे कांहीं महिने स्वयंपाक माझा मीच करीत असे. त्यानंतर मी तेथें एक स्वयंपाकी ठेवला होता.

नेपाळला कलकत्त्याहून ज्या इसमाबरोबर जावयाचें होतें तो इसम येण्यास कांहीं दिवस उशीर लागला. दरम्यानच्या काळांत माझा मुक्काम माताजींकडे होता. माताजी सकाळ संध्याकाळ भरपूर गप्पा मारीत व नेपाळची माहिती देत. नंतर नेपाळकडचा मनुष्य आला आणि त्याच्याबरोबर मी नेपाळला गेलों. कलकत्त्यास येण्यापूर्वी मी वाटेंत जबलपूरला उतरून तेथें कौलांचा कारखाना पाहून तेथील कौलांचें काम समजावून घेतलें होतें. त्याचप्रमाणें आणखी एक कौलांचा कारखानाहि पाहिला होता. जबलपूरला कौलांकरितां कोणत्या प्रकारची माती वापरतात ती पाहून तिचा नमुनाहि बरोबर घेतला होता.

## नेपाळांत कौलांनीं घेतलेली कसोटी

नेपाळला जातांना माझ्याबरोबर नेपाळचे कर्नल इंजिनियर कुमार नरसिंगराणा यांना माताजींनीं पत्र दिलें होतें. कौलांच्या कारखान्याची माहिती असलेला मनुष्य म्हणूनच नेपाळांत माझी ओळख करून देण्यांत आली.

कौलांच्या निमित्तानें दरबारांत प्रवेश करून घ्या, मग पुढचा मार्ग कसा काढावयाचा तें तुमचें तुम्हालाच कळून येईल असें मला सांगण्यांत आलें होतें.

नेपाळची कामगिरी यशस्वी होण्यास मंगलोरी कौलें तयार करण्याचें काम यशस्वी होणें जरूर होतें. तें कसें काय पार पडतें याची काळजी मला सारखी वाटत होती. जबलपूरचे हणमंतराव कुळकर्णी ऊर्फ अप्पा हे माझे हाताखालीं होते. कौलांच्या कारखान्याची माहिती त्यांनीं थोडी फार करून घेतली होती. नेपाळांत गेल्यावर मंगलोरी कौलें तयार करण्याच्या कामास सुरवात केली. पण भट्ट्या जमतां जमेनात आणि हें कौलांचें काम यशस्वी होतें कीं नाहीं अशी चिंता एकसारखी वाटूं लागली.

कौलांची भट्टी बरोबर साधून मनपसंत कौलें तयार होईनात. त्यावेळीं मन कावरें बावरें झालें. कौलें करतां येतात असें सांगून नेपाळांत आलों आणि तीं जर जमलीं नाहींत तर येथल्या लोकांना काय वाटेल असें सारखें मनाला वाटत होतें. परमेश्वराचें अधिष्ठान आपल्या या उद्योगाला आहेच, आपण आपणाकडून प्रयत्नांची शिकस्त करीत आहों, तेव्हां यश आलेंच पाहिजे, अशी श्रद्धा होती; पण यश येईना. अखेरचा प्रयत्न म्हणून शक्य ती काळजी घेऊन भट्टी लावली आणि अनन्यगतिक होऊन परमेश्वराची प्रार्थना केली. माझी लाज परमेश्वरानेंच राखावयाची होती. त्याची काकुळतीनें प्रार्थना केली कीं तुझ्या भरवंशावर येथपर्यंत आलों, आतां एवढी लाज राख ! अगोदरची खबरदारी म्हणून म्हणा, परमेश्वरास प्रार्थना पोहोंचली म्हणून म्हणा, भट्टी उलगडून पाहिली तों कौलें उत्तम साधलीं आहेत असें दिसून आलें. पुढें अडचण राहिली नाहीं. कौलें अपेक्षेप्रमाणें तयार झालीं आणि नेपाळच्या राजवाड्यावर तीं चढलीं.

## शस्त्रांच्या यंत्राची क्रप्सकडे ऑर्डर

कौलांचें काम सुरू असतांनाच शस्त्रांच्या यंत्राच्या कामासाठीं माझ्या कलकत्त्याला खेपा होत होत्या आणि मुंबईकडेहि एखादे वेळीं जात येत होतों. कलकत्त्याच्या क्रप्स कंपनीच्या एजंटनें यंत्राचे कागद नेपाळकडेहि पाठविले होते. पण अर्थातच त्याला नेपाळकडून उत्तर गेलें नव्हतें. क्रप्स कंपनीच्या एजंटाकडे मी कलकत्त्यास गेलों आणि त्याला एक यंत्राची आर्डर दिली आणि त्याचे पांच हजार रुपयेहि भरले होते. पण त्या एजंटाचें असें म्हणणें होतें कीं एका यंत्राच्या ऑर्डरनें भागणार नाहीं, निदान पांच सहा यंत्रें तरी घ्यावयास पाहिजेत त्यावेळीं ऑर्डर घेतां येईल. मी मध्यंतरीं सांगलीस असतांना एजंटनें ह्याप्रमाणें कळविलें आणि त्याच्याकडे भरलेले पांच हजार रुपयेहि त्यानें मनीऑर्डरनें सांगलीस पाठवून दिले. नेपाळांत मी कृष्ण राव असें मद्रासी धर्तीचें नांव लावत होतों. एजंटशीं पत्रव्यवहार करतांना याच नांवानें मी तो करीत असें. एजंटची मनीऑर्डर कृष्ण राव याच नांवानें सांगलीस आली. त्या नांवावर आलेली मनीऑर्डर मला कशी काय मिळते अशी धाकधूक वाटत होती. पण ती विशेष आयास करावे न लागतांना मिळाली आणि एक विवंचना दूर झाली.

## नेपाळला सामानांतून नेलेलें पिस्तुल

त्यानंतर मी सांगलीहून नेपाळला जाण्यापूर्वी कलकत्त्याला गेलों आणि एजंटला असें समजावून सांगितलें कीं यंत्र काम कसें काय देतें हें पहाण्यासाठीं तूर्त एकाच यंत्राची ऑर्डर दिली आहे. एक यंत्र घसंत पडलें म्हणजे तुमच्या म्हणण्याप्रमाणें आणखी यंत्रांची आर्डर देऊं ! त्यावर एजंटाची समजूत पटली आणि त्यानें एका यंत्राची ऑर्डर स्वीकारली. कलकत्त्याच्या खेपेस सदर एजंटानें मला एक अगदीं छोटेंसें पिस्तुल दाखविलें, आणि त्याच्या

गोळयाहि माझ्याजवळ त्यानें दिल्या होत्या. हें पिस्तुल नेऊन तुमच्या इंजि-नियरना दाखवा असें त्यानें मला सांगितलें. तें पिस्तुल तयार करण्याचें यंत्रहि आम्हीं मागवावें असा त्याचा आग्रह होता. नेपाळच्या इंजिनियरला पिस्तुल नेऊन दाखवण्याचें काम मीं पत्करलें आणि सामानांत तें पिस्तुल ठेवून तें नेपाळमध्यें घेऊन गेलों. कोठें झडती वगैरे होऊन पिस्तुलाचा तपास लागतो कीं काय असें प्रवासांत सारखें वाटत होतें. पण तसा कांहीं प्रकार न होतां नेपाळपर्यंत पिस्तुल जाऊन पोहोंचलें आणि कर्नल इंजिनियरच्या हातीं मीं तें दिलें. अशा रीतीनें रायफलीच्या यंत्राची ऑर्डर देण्याचें काम उरकलें आणि यंत्र केव्हां येतें याची मार्गप्रतीक्षा सुरू झाली.

## नेपाळांतील कालक्रमणा

नेपाळांत कौलांचें काम पुरें झालें तोंपर्यंत एकूण तीन वर्षें पुरीं होत आलीं होतीं. या अवधींत एका दक्षिणी ब्राम्हण कुटुंबाच्या घरांत मी रहात होतों. महाराष्ट्रीय ब्राम्हण मांसाशन कोणत्याहि प्रकारचें करीत नसल्यामुळें त्यांच्याकडे नेपाळांत पशुपतेश्वराच्या पूजेचें काम वर्षानुवर्षें चालत आलेलें आहे. कांदा लसूणहि हे दक्षिणी ब्राम्हण खात नसत. पण मी कांदा खात असें, त्याचें तेथील लोकांना आश्चर्य वाटें. नेपाळांत असतांना मला तेथें एकदां थंडीताप जडला व कांहीं महिने त्यानें माझी पाठ पुरवली होती. या तापांत तोंडाची चव गेली होती, आणि भाताबरोबर लोणचें खावयास मिळावें असें फार वाटत असे. त्या बाजूला लोणचें कोठून असणार ? पण पुजाऱ्याच्या घरीं लोणचें जपून ठेवलेलें होतें. त्यांतील थोडेंसें मला आजारीपणांत मिळालें. परत आल्यावर लोणचें खातांना नेपाळच्या लोणच्याची आठवण मला कितीतरी दिवस होत होती.

नेपाळांत असतांना बाहेर जातांना मी सुरवार वापरीत असें आणि पायांत

बूट घालीत असें. अंगांत कोट व डोक्याला टोपी असे. महाराजांच्या भेटीला जातांना तेथील दरबारी पद्धतीचा पोशाख वापरावा लागे. महाराजांच्याकडे जातांना कोटाच्या आंत दरबारी पद्धतीचा पोशाख घालत असें. नेपाळांत बर्फ फार पडतें. सकाळीं उठावें तोंपर्यंत रस्ते, खिडक्या वगैरे बर्फानें आच्छादिलेले असत. त्यामुळें तेथें बूट घातल्याशिवाय बाहेर पडावयाची सोयच नसे. 'टाइल भट' या नांवानें मी तेथें ओळखला जात असें,आणि राजवाड्यांतून महाराजांचें बोलावणें येई तें 'टाइल भट' या नांवानें येई. दरबारीं कागदपत्रांत माझें नांव येण्याचा प्रश्नच नव्हता. कारण कर्नल इंजिनियर कुमार नरसिंहराणा यांच्या मार्फतच माझा दरबारशीं संबंध होता. नेपाळांत असतांना मीं स्वयंपाकी जो ठेवला होता तो गांजेकस होता. बायकांचें बंड नाटकांतील जंगल्याचें पात्र या गांजेकसावरून रेखाटलेलें आहे. बायकांच्या बंडाची भौगोलिक पार्श्वभूमि नेपाळकडचीच आहे.

## कौलांनंतर आगकाड्यांचा कारखाना,—व शस्त्रांचाहि !

कौलांचें काम संपल्यावर त्या कामगिरीबद्दल एकूण तीन हजार रुपये कर्नल इंजिनियर यांजकडून मिळाले. त्यापैकीं एक हजार माझ्या हाताखालीं काम करणारे अप्पा कुळकर्णी यांस दिले. हें काम संपल्यावर नेपाळांत आगपेट्यांचा कारखाना चालवाल काय, असें कर्नल इंजिनियर कुमार नरसिंगराणा यांनीं विचारलें. आगपेट्यांच्या कारखान्याचें काम करण्यासाठीं म्हणून मी नेपाळांत पुन्हां यावयाचें आणि शस्त्रांचें यंत्र तोंपर्यंत येईल तें चालूं करावयाचें असें बोलणें झालें. बंदुकांच्या यंत्राचें सामान या वेळेपर्यंत हिंदुस्थानांत येऊन पोहोंचलें होतें आणि नेपाळची वाट तें चालत होतें.

नेपाळच्या मुक्कामांत माझे मदतनीस जे अप्पा कुळकर्णी त्यांच्या ओळखीनें

कोल्हापूरचा दामू जोशी नेपाळांत येऊन आमच्यांत दाखल झाला. त्यावेळीं बेलापूरला एक स्वामीचा मठ होता त्या मठापैकीं अप्पा व दामू हे दोघेहि होते. हे स्वामी बेलापूरचे स्वामी म्हणून ओळखले जात व ५७ च्या बंडापैकीं तात्या टोपे ते हेच होत असें कुजबुजलें जात असें. दक्षिणेचे कांहीं संस्थानिकहि या स्वामींच्या भजनीं होते. पेशवाईच्या बंडवाल्या पुढाऱ्यांपैकीं एक स्वामी आहेत असें मानणाऱ्यांपैकीं दामू त्याचप्रमाणें अप्पा हे होते. अप्पाच्या ओळखीनें दामू नेपाळांत आल्यावर नेपाळची एकंदर हकीकत त्याला अप्पाकडून समजलेली होती.

## यंत्राच्या मोडलेल्या गाडयाचें दुश्चिन्ह

नेपाळांतील कौलांचें काम रांपत आलें त्या सुमारास जर्मनीहून मागितलेलें बंदुका तयार करण्याचें यंत्र हिंदुस्थानांत येऊन त्या यंत्रानें नेपाळची हद्द ओलांडली व ते गाडयावर चढून नेपाळचा रस्ता चालू लागलें. या सुमारास क्रप्स कंपनीचा कलकत्त्याचा एजंट आपल्या देशास परत जावयाचा होता आणि त्यानें मला मुंबईस भेटावयास बोलावलें होतें. नेपाळची सरहद्द पायरस्त्यानें गांठून नंतरचा प्रवास करावयाचा असल्यामुळें नेपाळहून मुंबईच्या भेटीच्या पूर्वी सुमारें दोन महिने मी निघालों. नेपाळहून येत असतांना वाटेंत बंदुका करण्याचें आलेलें यंत्रहि पहावयास सांपडावें अशी इच्छा होती. त्याप्रमाणें मार्ग आक्रमतांना यंत्रहि पाहिलें. मी ज्यावेळी तें पाहिलें त्यावेळीं पेटारे गाडयावर होते पण गाडा वाट चालतांना मोडून पडलेला होता. यामुळें दुसऱ्या वाहनाची वाट यंत्र पहात होतें. यंत्राच्या मोडलेल्या गाडयानें जणूं कांहीं भावी घटनांची सूचना देण्याचें काम चालविलें होतें.

मुंबईस आल्यावर मी क्रप्स कंपनीच्या एजंटास भेटलों आणि पुढच्या पांच चार यंत्रांची ऑर्डर देण्याविषयीं बोलणें केलें. हीं यंत्रें येण्यास पांच

वर्षांचा अवधि लागणार होता. नेपाळांत आगपेटयांच्या कारखान्यांसाठीं म्हणून जावयाचें आणि हीं यंत्रें आल्यावर रायफलींचा कारखाना सुरू करावयाचा अशी योजनाहि मुक्रर झाली होती.

## योजना फुटली व फिस्कटली

पण अपेक्षेपेक्षां निराळ्या गोष्टी घडून यावयाच्या होत्या. नेपाळ-हून दामू जोशी कोल्हापूरला गेला. तेथें त्याला कोल्हापूर प्रकरणांत अटक झाली आणि तेथें त्याचा अतोनात छळ झाला. दामूला माहीत असलेली हकीकत त्याच्याकडून कळावी म्हणून हा सर्व छळ होता. त्या छळाला दामूनें दाद दिली नाहीं. तेव्हां निराळेंच अस्त्र त्याचेवर कोल्हापूरच्या महाराजांनीं सोडलें. दामूकडे वारंवार ते अशी साखर पेरूं लागले कीं आपण शिवाजीचे अवतार असून त्यांच्याप्रमाणेंच स्वातंत्र्य आपणास प्रस्थापित करावयाचें आहे. तेव्हां असल्या प्रयत्नांची जी माहिती असेल ती आपणाजवळ सांगण्यास हरकत नाहीं. हें ऐकतांच दामू विरघळला आणि त्यानें नेपाळ–प्रकरणाची सर्व हकीकत कोल्हापूरच्या महाराजांजवळ सांगून टाकली.

त्याबरोबर सर्व यंत्रें जोरांत सुरूं झालीं. नेपाळची हकीकत कोल्हापूरच्या महाराजांकडून सरकारकडे गेली, आणि चिरोल साहेबांना कळली. कृष्णराव व क्रप्स कंपनीकडून आलेलें यंत्र यांचा जारीनें तपास सुरू झाला. नेपाळ सरकारकडे पृच्छा करण्यांत आली. नेपाळ सरकारनें यंत्राची वासलात लावली. त्याचप्रमाणें पशुपतेश्वराची पूजा करणारा जो महाराष्ट्रीय ब्राम्हण होता, त्याची ताबडतोब तेथून रवानगी करण्यांत आली. यंत्राची आपणांस काहींच माहिती नाहीं असें दरबारनें सांगितलें, आणि माझ्याबद्दलच्या चौकशीस अशा प्रकारचें उत्तर दिलें कीं, आमच्याकडे कौलांच्या कारखान्यावर कृष्ण राव नांवाचा मनुष्य होता हें खरें आहे, पण तो असल्या भानगडींत पडणारा नव्हे, याची आम्हाला खातरजमा आहे. दरबारच्या ह्या उत्तरानें

म्हणजे चंद्रसमशेर महाराजांच्या या जबाबानें मला या प्रकरणांतून सोडविलें. अशा रीतीनें नेपाळमधील शस्त्रास्त्रांच्या कारखान्याच्या उद्योगाची इतिश्री झाली.

# केसरीवरून दोनदां खो

## जॅक्सन-खुनाच्या कटाचा ससेमिरा व केसरींतून खो

नेपाळ प्रकरण संपुष्टांत निघालें तरी त्यानंतरहि सरकारी ससेमिरा माझ्या मागें होताच. १९०८ सालीं लो. टिळक तुरुंगांत गेले आणि केसरी-मराठावर माझें नांव आलें. त्यानंतर नाशिकला जॅक्सन साहेबांचा खून झाला आणि त्याचा संबंध माझ्याशीं असावा अशा समजुतीनें तसे धागेदोरे जुळविण्याचा आटोकाट प्रयत्न झाला. त्यावेळीं दिल्लीला असलेल्या एका महाराष्ट्रीय अंमलदारानें माझ्याविरुद्ध रिपोर्ट केल्याचीहि बातमी होती. पण माझा या खुनाशीं संबंध कांहींच नव्हता, आणि पोलिसहि तो जोडूं शकले नाहींत.

नेपाळ-प्रकरणावरून सुरू झालेला पोलिसचा हा ससेमिरा मागें असतांनाच केसरी-मराठ्यावरून माझें नांव निघालें व १९०९ च्या अखेरीस मला केसरी-मराठा सोडावा लागला. लो. टिळक तुरुंगांत गेल्यापासून केसरी-मराठ्यावर आपलें स्वतःचें नांव यावें असा श्री. केळकरांचा आग्रह होता, आणि मला त्यांनीं त्याबद्दल विचारून कांहीं काळानें तसें करण्यास त्यांनीं माझी कबुलीहि घेतली होती. त्यानंतर जॅक्सन-खुनाचें प्रकरण झालें. मंगळवारच्या केसरीचीं प्रुफें सोमवारीं संध्याकाळीं मी नित्याप्रमाणें पहात असतांना श्री. विद्वांसांनीं मला सांगितलें कीं, तुम्ही तुमच्या मजकुराचीं प्रुफें पहा. केळकरांचीं प्रुफें केळकर पहातील. मीं कारण विचारलें, तेव्हां दुसरे

दिवशीं केसरीवर केळकरांचें नांव येणार असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्यांनीं असेंहि सांगितलें कीं, तुमच्या विरुद्ध पोलिस रिपोर्टस् आहेत. तेव्हां केसरीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें तुमचें नांव केसरी–मराठ्यावरून काढलें आहे.

## जसें कांहीं मला पोलिसच्या स्वाधीन करीत आहां

तुम्ही अशा यावेळीं आणि पोलिस रिपोर्ट माझ्याविरुद्ध आहेत हें माहीत असतांना मला न विचारतां केसरीवरून माझें नांव काढून मला असलेलें केसरीचें संरक्षण काढून घेत आहां, आणि एकप्रकारें मला तुम्ही पोलिसच्या स्वाधीन करीत आहां, यावरून तुम्हाला माझी जरुरी नाहीं असें स्पष्ट होतें, असें त्यांना सांगून मी त्यावेळीं केसरी कचेरींतून बाहेर पडलों. अशा रीतीनें १९०९ सालच्या अखेरी अखेरीस केसरीवरून मी सुटलों.

यावर त्यावेळीं कांहीं न बोलतां श्री. विद्वांस गप्प राहिले. पण त्यांच्याकडून माझे हे उद्‌गार नंतर लो. टिळकांच्या कानावर गेले, आणि त्याचा उल्लेखहि नंतर लो. टिळकांच्या बोलण्यांत आला. १९२० सालीं लो.टिळकांनीं केसरी द्विसाप्ताहिक करण्याचें ठरविलें. आणि ट्रस्टची योजना मुक्रर केली. त्यावेळीं त्यांनीं मला विचारलें, मीं केसरीचा ट्रस्ट करावयाचें ठरविलें आहे आणि तुम्हाला एक ट्रस्टी करणार आहें. याबद्दल मी प्रथम तुम्हाला विचारीत आहें. तुम्ही हॉटी–रागीट–आहां हें मला माहीत आहे. म्हणून तुम्हाला प्रथम विचारीत आहें.

## कोणत्याहि एका पत्राची जबाबदारी पत्करण्यास तयार

त्यावर मीं सांगितलें कीं, तुम्हाला पाहिजे त्या पत्राची, केसरीची किंवा मराठ्याची, जबाबदारी माझ्यावर सोंपवा. त्या पत्राचें धोरण वगैरेची सर्व मुख्त्यारी माझी राहील. माझी त्याला मान्यता आहे. त्यानंतर द्विसाप्ताहिक केसरी माझ्याकडे रहावा असें ठरलें आणि श्री. केळकरांनीं त्याला मान्यता दिली.

केसरी द्विसाप्ताहिक झाल्यावर द्रौपदी नाटक पुरें करण्यास वेळ मिळणार नाहीं म्हणून मी द्रौपदी नाटक पुरें करण्यासाठीं रजा घेतली व माझ्या रजेच्या काळांत म्हणून केसरीवर श्री. केळकरांचें नांव आलें. त्यावेळीं लो. टिळकांनीं पुन्हां मला विचारलें, केसरीवरचें तुमचें नांव तुम्हाला नकळत निघत नाहीं ना ? तुमची संमति आहे ना ? संमति नसेल तर मला आतांच सांगा. आपली संमति आहे असें मीं सांगितलें. नंतर केसरीचें श्री. केळकरांच्या नांवाचें डिक्लेरेशन करण्यांत आलें.

## छत्र आणि गुरू गमावला

१९२० सालीं लो. टिळकांचें देहावसान झालें. द्रौपदी नाटक लिहिण्यांत मी गुंतलेलों असतांना जुलै महिन्यांत माझे थोरले बंधु हरिपंत तात्या वारले. डोक्यावरचें छत्र गेलें म्हणून विव्हल अंतःकरणानें बंधूंच्या उत्तरक्रियेच्यावेळीं मी सांगलीस गेलों. तेथें असतांनाच लो. टिळक अत्यवस्थ असल्याची श्री. विद्वांस यांची तार आली आणि मी तसाच मुंबईस गेलों. सातारचे श्री. दादासाहेब करंदीकर माझ्यानंतर मुंबईस आले. सरदारगृहांत गेल्यावर लो. टिळकांची गांठ झाली. त्यांची भेट झाल्यावर त्यांनीं आंघोळ–जेवण वगैरे उरका असें सांगितलें. लो. टिळक शुद्धीवर असतांनाची ही त्यांची व माझी शेवटचीच भेट. त्यानंतर लो. टिळक जे बेशुद्ध झाले ते पुन्हां पूर्ण-पणें शुद्धीवर आलेच नाहींत. पुण्याला मी परत आलों, तो बंधु आणि गुरु यांना गमावून आलों. लो. टिळकांच्या पश्चात् ता. १० च्या केसरींत लो. टिळकांचें पुण्यस्मरण करणारा अग्रलेख मीं लिहिला. केसरींतील तो माझा शेवटचा लेख होय.

## केसरीचा संबंध सुटला

लो. टिळकांच्या पश्चात् त्यांचे दिवस वगैरे करण्याच्या बाबतींत टिळक–

पुत्रांची हरकत होती व त्यावर आपला विश्वास नसल्याचें त्यांचें म्हणणें होतें. मी रागावून याबाबतींत टिळक—पुत्रांना बोललों होतों. श्री. केळकरांनीं जर तुमचा विश्वास दिवस करण्यावर नसेल तर करूं नका असें सांगून त्यांची अनुकूलता मिळविली होती. टिळक-पुत्रांनीं केसरीचा नवा ट्रस्ट केला त्यावेळीं मला ट्रस्टी होण्याबद्दल विचारण्यांत आलें. केसरी किंवा मराठा यापैकीं कोणत्याहि एका पत्राची पूर्ण अखत्यारी आपणाकडे यावी असें मी लो. टिळकांच्या ज्या जावयाच्याबरोबर माझ्याकडे निरोप आला होता, त्याच्याजवळ सांगितलें, पण तें मान्य झालें नाहीं. टिळक-पुत्रांच्या सहीनें केसरी-मराठ्याचा जो ट्रस्ट जाहीर झाला त्यांत अर्थातच माझें नांव नव्हतें. केसरीचा आणि माझा संबंध अशा रीतीनें लो. टिळकांच्या पश्चात् कायमचा सुटला. मुंबईंत राष्ट्रीय पक्षाचें एक मराठी दैनिक असावें अशा वाटाघाटी पूर्वी होत असत. लो. टिळकांच्या पश्चात् त्यांच्या स्मरणार्थ दैनिक मुंबईंत काढण्याच्या कल्पनेनें जोर धरला. डॉ. देशमुख, डॉ. भडकमकर यांच्या या बाबतींत वाटाघाटी चालू असतांना द्रौपदी नाटकासाठीं माझा मुक्काम मुंबईस असल्यानें त्या वाटाघाटींना मी हजर असे. या नव्या दैनिकाचें संपादकत्व मी संभाळावें असें मला सांगण्यांत आलें आणि १९२१ सालीं पुणें कायमचें सोडून मी मुंबईस आलों.

## महात्माजींच्या आयुष्याविषयीं लोकमान्यांचा अभिप्राय

लो. टिळकांच्या निधनापूर्वी कलकत्त्याचें काँग्रेसचें जादा अधिवेशन मुक्रर झालें होतें आणि ह्या अधिवेशनासाठीं लो. टिळकांचें नांव पुढें आलें होतें. पण लो. टिळक अध्यक्षपद पत्करण्यास तयार नव्हते. तुमचें नांव सुचविण्यांत येत आहे, तुम्हीं अध्यक्षपद कां पत्करत नाहीं असें मीं त्यांना विचारलें होतें, त्यावेळीं त्यांनीं असें उत्तर दिलें होतें कीं, महात्मा गांधींच्या रूपानें एक प्रचंड शक्ति राजकीय क्षेत्रांत प्रवेश करीत असून

कॅलकर्त्याचा असहकाराचा ठराव अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा वेळीं अध्यक्षाच्या खुर्चीवर राहून अधिवेशन चालविण्याच्या कामांत जखडला जाण्यापेक्षां चर्चेंत भाग घेण्यासाठीं मी मोकळा असणें जरूर आहे. महात्मा गांधींच्या नव्या आयुधानें त्यांचें लक्ष पूर्णपणें वेधून घेतल्याचें त्या संभाषणांत मला आढळून आलें.

# कै. शिवरामपंत परांजपे यांच्याबद्दलच्या काकासाहेबांच्या आठवणी

( कै. शिवरामपंत परांजपे यांच्या चरित्र–ग्रंथाकरितां कै. काकासाहेबांनीं आठवणी लिहिल्या होत्या. त्या पुढें दिल्या आहेत. )

## कै. परांजप्यांचें स्मरण देणारा 'नवाकाळ'

'नवाकाळ' या नांवाचें वर्तमानपत्र मीं सुरू केल्यावर 'लोकमान्य' वर्तमानपत्राची स्थिति फार डबघाईस आली. चालकांकडून तें पत्र बंद करण्यांत येईल असा अंदाज होता. तें पत्र आपणांस चालविण्यास मिळेल काय, आणि तो प्रसंग आल्यास 'नवाकाळ' हीं अक्षरें मोठीं छापून त्यांत 'लोकमान्य' पत्र सामील केलें आहे असें लिहावयाचें किंवा उलटून लिहावयाचें अशा विचारांत मी होतों. त्यावेळीं दे. शिवरामपंत परांजपे मला मुंबईस भेटावयास आले. सहज बोलतांना 'लोकमान्य' पत्राविषयीं बोलणें निघालें. मीं माझ्या मनांतील विचार त्यांच्यापुढें मांडले आणि काय करावें असा प्रश्न त्यांना विचारला. मी 'नवाकाळ' हा शब्द रागारागानें बोलत असतांना सहज स्फूर्तीनें कसा उच्चारला याचें वर्णन केलें; व 'लोकमान्य' पत्राविषयीं माझा जिव्हाळा कसा हें त्यांना ठाऊक होतें. दे. परांजपे यांनीं 'नवाकाळ'

हे शब्द सहजस्फूर्तीनें मीं उच्चारले या माझ्या विधानावर जोर दिला व नंतर ते म्हणालें कीं, कधींकाळीं 'लोकमान्य' तुमच्या हवालीं करण्यांत येईल ही तुमची आशा व्यर्थ आहे. तुम्हांला लोकमान्यांतून निघून जावें लागलें, हें ध्यानांत ठेवा; आणि माझें स्मरण 'काळा' चा 'नवाकाळ' होऊन लोकांसमोर ठेवीत आहा हें विसरूं नका. ही भविष्यवाणी दे. परांजपे यांनीं मला ऐकवली आणि भलतेसलते विचार मनांत येऊं देऊं नका, असा मला आग्रह केला. दे. परांजपे हे महात्माजींच्या मतांकडे झुकल्यामुळें आपल्या हयातींत काळ हें पत्र नामशेष होतें कीं काय, अशी भीति त्यांना वाटावयास लागली होती. कारण व्यंगोक्तीचा उपयोग करून त्यांनीं आपली भाषाशैली दृढ केली असल्यामुळें नव्या जमान्यांत त्यांची लिखाणाची पद्धति त्यांना उपयोगी पडत नसे. लोकमान्यास मीं डबघाईस आणलें आहे असें त्यांच्या अनुभवास आलें होतें. 'नवाकाळ' मधील लेख महात्मा गांधींना उचलून धरणारे असतात त्यामुळें त्यांची काळजी दूर झाली, असावी असें मला वाटलें. नंतर मी माझ्या या विचारांना दूर केलें.

## 'पळीपंचपात्रीची टीका'

आम्ही दोघे आमच्या मंडळांत एकमताचे होतों. तपशिलांत सुद्धां आमचीं मतें एकमेकांशीं जुळत असत. दे. कवडे यांच्या दवाखान्यांत आम्ही बसण्याचा अड्डा पडल्यावर आम्हां दोघांची घसट झाली आणि मन मोकळें करून आम्हीं बोलूं लागलों. त्यापूर्वी सार्वजनिक सभेंत बसण्याचा अड्डा होता, पण तेथें बोलण्याचालण्याचा योग कमी येत असे. दे. परांजपे यांनीं तुळशीबागेजवळचा वाडा खरेदी केला होता, आणि तो दे. कवडेशास्त्र्यांच्या दवाखान्याच्या लगतच—म्हणजे फार दूर नाहीं—असल्यामुळें ते केव्हां केव्हां एकटेच अड्डयांत येऊन पडून रहात असत. अशावेळीं मी तेथें गेल्यावर

मजशीं खुलासेवार बोलत असत. अशा रीतीच्या बोलण्याचालण्यावरून मला आढळून आलें कीं आम्हीं बारीक सारीक गोष्टींतहि भिन्न मताचे नाहीं. पुण्यांत एखाद्या दवाखान्यांत काय किंवा एखाद्या सुवासिक तेलाच्या दुकानांत काय, अशा पद्धतीनें मंडळी एकत्र जमण्याचे अड्डे असतात, तसाच दे. कवडेशास्त्री यांच्या दवाखान्यांत अड्डा होता. दवाखान्याची जागा विपुल होती आणि दोन ठिकाणीं बैठकी टाकलेल्या असत. टिळकपक्षीय मंडळी या अड्ड्यांत जमत असत. वाईचे लेलेशास्त्री पुण्यास असतांना कधीं-कधीं येत असत. एकदां असें झालें कीं, लेलेशास्त्री हे आले असतांना मला कोणीं सांगितलें कीं, माझ्या 'मानापमान' नाटकावर दुसऱ्याच्या टीकात्मक लेख लेलेशास्त्र्यांच्या मासिकांत प्रसिद्ध झाला आहे. मी सदर मासिकाचा अंक लेलेशास्त्र्यांजवळ मागितला असतांना दे. अण्णासाहेब परांजपे मला म्हणाले, पळीपंचपात्रीची टीका आहे. तुमच्यासारख्या नाटककारांनीं त्यांत घेण्यासारखें कांहीं नाहीं.

## चालती बोलती हंसतमुख गंभीरता

( २ ) उंच देहयष्टि, त्या देहयष्टीला साजेसा भरदारपणा, त्यांचा तो वाटोळा चेहरा, पाणीदार डोळे, त्यांचे तें ऐटीनें घातलेलें पागोटें, तो सफेत अंगरखा व ती भिकबाळी,—दे. परांजपे यांजकडे पहाणाराला वाटावें, आपण गंभीरता चालती बोलती पहात आहों. पण विनोदाचे ते भोक्ते होते. कोट्या करणें त्यांना फार आवडत असे. गांभीर्यानें बोलत असतांना मध्येंच विनोदी कोटी सोडून द्यावयाची आणि श्रोत्यांकडे आपण सस्मित पहावयाचें अशी त्यांची बोलण्याची खुबी होती. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाचा आत्मा हा होता. वक्तृत्वाचे भरांत ते आलेले असतांना ते एकादी कोटी करीत व हंसत हंसत प्रेक्षक समुदायाकडे पहात—तत्क्षणीं टाळ्यांचा कटकडाट होत असे!

लिहिण्याची त्यांची धाटणी त्याच नमुन्याची होती. श्री. परशुरामपंत चिंचाळकर त्यांचे मित्र होते. आपण लिहिलेलें पुस्तक त्यांनीं दे. परांजपे यांजकडे अभिप्रायासाठीं दिलेलें होतें. परशुरामपंत चिंचाळकर त्यांच्या बैठकींत नेहमीं बसणारे होते. दे. परांजपे यांचा त्या पुस्तकावरचा अभिप्राय चित्रमय जगत्च्या एका अंकांत प्रसिद्ध झाला आहे. श्री. चिंचाळकर यांना वाक्यें लांबलचक लिहितांना वाक्यांत कोठें स्वल्पविराम किंवा कोठें अर्धविराम न वापरतां लिहिण्याची सवय होती. एकंदरींत श्री. चिंचाळकर यांच्या लिखाणाची दे. परांजपे यांनीं तारीफ केली. पण सदर खोडीचा नामनिर्देश करण्याचें त्यांनीं टाळलें होतें. दे. परांजपे हे रसिक होते. कै. गडकऱ्यांचें भावबंधन नाटक पहाण्यास आम्ही दोघेजण मिळून गेलों होतों. कामण्णा हें त्या नाटकांतील पात्र त्यांच्या विशेष आवडीचें होतें. सस्मित असें प्रेक्षकांकडे पहात रहाण्याची त्याची हातोटी दे. परांजपे यांना फार आवडलेली होती. नंतर आम्ही आंत गेलों असतांना कामण्णांना बोलावून त्याची पाठ थोपटून शाबास म्हणण्यास परांजप्यांनीं कमी केलें नाहीं.

## काळांतील माझें लिखाण

विनोदी कोटया वापरून प्रतिपक्षाविषयीं वाचकांच्या मनांत अवहेलना उत्पन्न करावयाची असा कटाक्ष कै. परांजपे यांच्या लिहिण्याच्या पद्धतींत असे. माझी लिहिण्याची पद्धति फार निराळी आहे. त्यामुळें 'काळां'त लिहितांना मला चुकल्यासारखें होऊन जाई. मी केव्हां केव्हां 'काळां'त लिहीत असें. एखाद दुसऱ्या रकान्यापुरतें माझें लिखाण असे. एकदां असें झालें कीं, माझ्यावर संबंधच्या संबंध काळ लिहून काढण्याचा प्रसंग आला. त्या प्रसंगीं दे. परांजपे यांच्या शैलीचें अनुकरण करण्याचा शक्य तितका प्रयत्न मीं केला, पण प्रयत्न फसला असें माझें मलाच वाटलें. पुढें

दे. परांजपे यांजकडून सांगण्यांत येऊं लागलें कीं वाचकांना माझें लिखाण फार आवडलें आणि तें लिहिणारा कोण याची विचारणा करण्यांत येऊं लागली. दे. परांजपे यांच्या ठिकाणीं माझ्याविषयीं वसत असलेल्या आपुलकीचेंच तें लक्षण नव्हे काय ?

## 'कांदा चालतो ना ?'

माझ्यावरच्या राजद्रोहाचा खटला सेशन कोर्टांत चालण्याच्यापूर्वी मला भेटावयास दे. परांजपे आले होते. सेशन कोर्टासंबंधानें कांहीं किरकोळ बोलणें झाल्यावर त्यांनीं मला विचारलें कीं, 'कांदा तुम्हाला चालतो काय ?' त्यांना कांद्याचा वास चालत नसे आणि तुरुंगांत असतांना कांद्याच्या पायीं त्यांची स्थिति अत्यंत दुःखद झाली होती, असें वर्णन कै. वासुकाका जोशी करीत असत. त्यांनीं विचारलेल्या प्रश्नाचा रोख मला तत्काळ समजला आणि 'कांदा चालतो मला' असें उत्तर मीं दिलें. मग कांहीं हरकत नाहीं असें उत्तर दे. परांजपे यांजकडून आलें आणि आम्हीं दोघें हंसलों.

## निधनवार्ता ऐकून तुरुंगांत रडलों

दे. शिवरामपंतांची ती हंसतमुख मूर्ति मला अद्यापहि आठवते आहे. ती भरपूर उंचीची भरदार देहयष्टि, तो आनंदी स्वभाव आणि ती विनोदी शैली मी तुरुंगाच्या बाहेर आल्यावर कित्येक वर्षें माझ्या नज़रेस पडत राहील असा माझा अंदाज होता, पण त्यांच्या मृत्यूची बातमी मी तुरुंगांत असतांनाच समजली. वार्ता ऐकून मी रडलों. एक महान लेखक, प्रसिद्ध वक्ता आणि आमच्या पक्षाचा योग्य नेता नाहींसा झाला याचें मला फार वाईट वाटलें. तुरुंगांत जातांनाची त्यांची माझी भेट ही शेवटचीच भेट ठरली.

# कै. वासुकाका जोशी यांच्याबद्दलच्या काकासाहेबांच्या आठवणी

( कै. वासुकाका जोशी यांच्याबद्दलच्या आठवणी कै. वासुकाकांच्या मृत्यूनंतर एक वर्षानें काकासाहेबांनीं चित्रमय जगतमध्यें लिहिल्या होत्या त्या चित्रमय जगतमध्यें प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या आठवणीं पुढें दिल्या आहेत. )

## माझा कैवारी

नेपाळांत मी गेलों असतांना माझ्या भेटीसाठीं नेपाळांत वासुकाका जोशी आले होते. त्यावेळीं त्यांचा आणि माझा दाट संबंध आला, आणि त्याचें रूपांतर मैत्रींत झालें. पुढें मी केसरींत काम करूं लागल्यापासून माझा कैवार घेण्यास ते कधीं चुकले नाहींत.

चित्रशाळेंत माझें कांचनगडची मोहना नाटक प्रथम छापलें. त्यापूर्वी चित्रशाळा कारखान्यांत टाइपाचें काम होत नव्हतें. टाइपाचें पुस्तक म्हणून माझ्या पुस्तकास पहिलाच मान मिळाला. पुढें कांचनगडची मोहना नाटकाच्या लेखकाविषयीं 'महाराष्ट्र नाटक मंडळी' कडून विचारपूस चालली असतांना ते नेपाळहून लवकरच परत यावयाचे आहेत असें वासुकाकांनीं उत्तर दिलें. नाटक करण्याच्या हक्काबद्दल महाराष्ट्र नाटक कंपनीकडून बोलणें झालें असतांना, 'तुम्ही खेळ तर बसावा, मागाहून हक्काचा ते आल्यावर विचार करतां येईल;' म्हणून कै. वासुकाकांनीं सांगितलें. तेव्हांपासून माझीं नाटकें छापण्यास व त्याची विक्री करण्यास चित्रशाळेनें सुरवात केली. पुढें मी माझ्या मालकीचा दत्तात्रय छापखाना मुंबईस काढल्यावर

C9450

नाटकांच्या छपाईचें काम तेवढें मुंबईस होऊं लागलें, पण पुस्तकांची विक्री करण्याचा व्यापारी संबंध चित्रशाळेशीं कायमच राहिला.

कै. लो. टिळकांच्या मृत्यूचे अगोदर टिळकांनीं मी व श्री. केळकर यांनीं केसरीचे ट्रस्टी व्हावें, पुढील सालापासून केसरीच्या उद्योगांत आपण लक्ष घालूं नये असें ठरविलें. पण लो. टिळकांच्या निधनानंतर माझें नांव ट्रस्टींमधून श्री. केळकरांनीं विरोध केला म्हणून किंवा मुलांनीं विरोध केला म्हणून गाळण्यांत आलें. घडलेली हकीकत मी वासुकाकांना सांगितली. त्यावेळीं, तुमचें आणि त्यांचें पटावयाचें नव्हतेंच, असें ते उद्गारले. नंतर दे. गंगाधरराव देशपांडे यांचेकडून मला सांगण्यांत आलें कीं मुंबईस निघणाऱ्या 'लोकमान्य' पत्राचा मी संपादक व्हावें. मला दे. गंगाधरराव देशपांडे यांचें म्हणणें मान्य झालें व मी पुणें सोडून मुंबईस आलों.

## 'लोकमान्य' सोडला, 'नवाकाळ' काढला

लोकमान्य पत्राचा मी सुमारें दोन वर्षें संपादक होतों. या अवधींत डायरेक्टर झालों होतों. डॉ. भडकमकर व श्री. लिमये हे एक्स ऑफिशिओ डायरेक्टर होते. मी ज्या दिवशीं हकीकत लिहीत आहें त्या दिवशीं डॉ. साहेबांनीं एक्स ऑफिशिओ डायरेक्टरच्या जागेचा राजीनामा दिला होता. व त्यांच्या जागीं श्री. मंडलीक निवडून आले. रा. लिमये यांना डायरेक्टर बोर्डाचा मेंबर या नात्यानें बोर्डाच्या ठरावाप्रमाणें दीडशें रुपये पगार मिळत होता. ते मॅनेजरचें काम करतात म्हणून त्यांना आणखी सुमारें तीनशें रुपये देण्यांत यावेत अशी सूचना डायरेक्टरांच्या बोर्डापुढें आली होती. त्यादिवशीं माझी व श्री. गंगाधरराव देशपांडे यांची गांठ झाली असतांना ती सूचना मागें घेण्यांत येईल तेव्हां तुम्ही डायरेक्टर या नात्यानें सभेस हजर रहाण्याची जरुरी नाहीं असें मी सांगितलें. तेव्हां ते सायंकाळीं मुंबई सोडून गेले.

पुढें त्या दिवशीं रात्रीं कै. डॉ. नानासाहेब देशमुख यांच्या घरीं डायरेक्टरांची सभा भरली. श्री. मंडलीक डायरेक्टर या नात्यानें सभेस आलेले होते. अहमदाबादची काँग्रेस होऊन गेलेली असल्यामुळें, व महात्मा गांधींपासून होतां होईल तों अलिप्त रहाण्याचा संकल्प केळकर पार्टीनें केलेला असल्यामुळें बहुमताचे जोरावर श्री. लिमये यांना मॅनेजरचा जादा पगार देण्याचा ठराव माझें मत विरुद्ध असतांना पास करून घेण्यांत आला. मी चिडून गेलों. आपल्याकडील बहुमत विरुद्धपक्षाचे हातीं गेलें आहे असें मला दिसलें. हा त्रास चुकविण्यासाठीं मीं 'नवाकाळ' काढणार आहें असें जागच्या जागीं जाहीर केलें. ही बातमी कै. वासुकाकांना इत्थंभूत कळविण्यांत आली. हा त्रास तुमच्या मागचा चुकणार नाहीं असें मला वाटलेंच होतें, आणि 'नवाकाळ' ची व्यवस्था घाईघाईनें करूं नका असें त्यांनीं मला लिहिलें. नंतर ते मुंबईस आले आणि नवाकाळची व्यवस्था येथील इंदुप्रकाश छापखान्यांत त्यांनीं लावून दिली.

## वासूकाकांचें बिनव्याजी कर्ज

मी दत्तात्रय छापखाना काढल्यावर माझ्या मालकीच्या त्या छापखान्यांत 'नवाकाळ' पत्र निघूं लागलें. या छापखान्याकरितां कर्ज काढावें लागलें आणि चित्रशाळेनें मला सुमारें वीस हजार रुपये कर्ज बिनव्याजानें दिलें. नंतर कांहीं वर्षांत तें फेडण्यांत आलें. मित्रकार्य म्हणून मला हें कर्ज मिळालें; कर्जासंबंधानें व व्याजासंबंधानें ते मला कधीं एका शब्दानेसुद्धां बोलले नाहींत.

## दत्तमूर्तीची निवड

तुरुंगांतून सुटल्यावर सांगली येथें कृष्णा तटाकीं मीं जमीन खरेदी केली. तेथें मी दत्तमंदिर बांधणार आणि दत्ताची स्थापना करणार असें कळल्यावर

ते मुंबईस आले. कोणकोण दत्ताच्या मूर्ति करतात याबद्दल त्यांची व माझी वाटाघाट झाली. आयती मूर्ति मिळाल्यास पहावें म्हणून ते बाजारांत गेले आणि अडीचशें रुपयांस एक मूर्ति ठरवून आले. आम्हीं ती मूर्ति तीन दिवसांत न घेतल्यास ती मालकानें दुसऱ्यास विकून टाकावी असा करार होता. मूर्तीत आयच आहे किंवा कसें या शोधांत तीन दिवस घालवल्यावर मीं ती मूर्ति खरेदी केली आणि सांगलीस नेऊन तेथें दत्तमंदिरांत तिची स्थापना केली. स्थापनेच्या दिवशीं वासुकाका आले नाहींत. नंतर कांहीं महिन्यांनीं आले आणि जो तो मूर्तीच्या कारागिरीविषयीं वाहवा करीत आहे, असें पाहून परम खुष आहे.

# लो. टिळकांच्या दराऱ्याचे उपकार

( 'खाडिलकरांची ॐकाराची उपासना' या काकासाहेबांच्या ग्रंथांत आत्मनिवेदनपर निवेदन आलेलें आहे. तो भाग पुढें दिला आहे. )

'स्वप्नांत' दोनदां आणि जागेपणीं एकदां 'केसरी' हीं अक्षरें दिसून माझा व लो. टिळकांचा संबंध घडून आला आणि त्यामुळें लो. टिळक मला नांवें ठेवतील असा त्यांचा धाक मला वाटूं लागला. पुढें नाटकी मंडळींचा सहवास घडल्यामुळें तेथील ठळक ठळक दोष मला लागायला पाहिजे होते. पण लो. टिळकांच्या दराऱ्यामुळें आणि त्यांनीं मला केसरीकार ह्या नात्यानें त्यांच्या बरोबरीच्या उन्नतीच्या मार्गाला लावल्यामुळें नाटकी मंडळींच्या अंगच्या ठळक ठळक दोषांपासून माझा बचाव झाला, हे लो. टिळकांचे माझ्यावर उपकार झाले आहेत, असें येथें मी नमूद करून ठेवीत आहें. केसरीकार म्हणून ज्या उन्नतीच्या मार्गावर मी चढलों त्या मार्गाचा हा गुण आहे. अगदीं प्रारंभापासूनच मला दत्त-भक्तीचा छंद असल्यामुळें

प्राणायाम करण्याकडे माझ्या मनाची प्रवृत्ति होती. ह्यामुळें ॐकाराकडे माझें लक्ष लागलें.

## प्राणायामांतील प्रगति

नाटकें लिहूं लागलें असतां किंवा वर्तमानपत्रांतील मजकूर मी लिहीत असतांना केव्हां केव्हा माझें मन एकाग्र होत असे; आणि दहा पंधरा वर्षांपूर्वीपासून मन एकाग्र होऊं लागलें म्हणजे मला अनाहत ध्वनि ऐकूं येण्याचा पाया रचला गेला. परंतु 'बिंदू'वर प्रयोग करण्यास मला माझ्या दुर्दैवानें सवड दिली नाहीं. सहा सात वर्षांपूर्वी माझ्या अंगीं कांहीं पातकें—उदाहरणार्थ रागीटपणाचें आणि अभिमानाचें पातक—होतीं म्हणून अर्धांगवायूनें आजारी झालों; म्हणून उपनिषदें वाचणें व ह्या वाचनामुळें सुचणारे विचार एकत्र करणें ह्याखेरीज माझ्या हातून आतां कांहीं होणारें नाहीं. सध्यां मला ऐकूं येणाऱ्या अनाहत ध्वनीचा फायदा मी असा करून घेतों कीं रोग ओसरूं लागला म्हणजे त्या ठिकाणचा अनाहत ध्वनि मन एकाग्र करून मी ऐकूं लागतों; आणि त्यामुळें अधिक जोरानें माझा रोग ओसरूं लागतो. बिंदूवर लक्ष ठेवण्याचा मी प्रयत्न करूं लागलों म्हणजे त्या प्रयत्नांत मला आतां यश येत नाहीं; मनाची एकाग्रता सुटते आणि कांहींच्या कांहींच मनोराज्यास सुरवात होते. वृद्धापकाळीं अजूनहि माझ्या पातकांचा जोर आहें, पण भेसळ करावयास ज्ञानेश्वर महाराज कां सांगतात हें माझ्या बुद्धीला समजतें व पटतें. हठयोगांत आणि राजयोगांत लययोगाचीं भेसळ केल्यावांचून दुसरा मार्ग नाहीं.

## तीस चाळीस वर्षांतील उद्योगांची वरीं वाईट ओझीं

(नागपूरच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या प्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना काकासाहेबांनीं प्रास्ताविक उद्गारांत जें आत्मनिवेदन केलें

* ग्रं. नं. 9346.2 ३१३१५३ *

तो भाग पुढीलप्रमाणें आहे.)

माझ्या मागें गेल्या तीस चाळीस वर्षांतील निरनिराळ्या प्रकारच्या उद्योगाचीं बरी वाईट ओझीं आहेत, आणि त्यांतील कांहीं कांहीं ओझीं फार जड असून सोबतीच्या संतांच्या पाठीवर तीं लादल्याशिवाय मला कोणताच मार्ग पाय न अडखळतां किंवा ठेंच न लागतां आक्रमितां येत नाहीं. माझी स्वतःची दुबळेपणाची अशी स्थिति असल्यामुळें दुसऱ्यास त्रास द्यावयास बाहेर जा कशाला अशा तऱ्हेचा घरकोंबडेपणा मला स्वीकारावा लागत आहे. पण इतिहासप्रसिद्ध भोसल्यांच्या नागपूरचे लोक वीरवृत्तीचे असल्यामुळें नागपूरच्या कर्तबगारीवर भिस्त ठेवून माझ्यांतील दोष आपण सहजगतीनें खालीं दडपून टाकाल आणि संमेलनाचें कार्य निर्विघ्नपणानें आपण तडीस न्याल असा मला भरंवसा आहे.

---

# नेपाळ प्रकरणाची अधिक माहिती

## कोल्हापूरचे रा. 'दामू जोशी' यांच्या आठवणी

(कै. काकासाहेब खाडिलकर यांच्या आत्मनिवेदनांतील नेपाळ प्रकरणांत कोल्हापूरचे 'दामू जोशी' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या गृहस्थांचा उल्लेख आहे. श्री. दामू जोशी यांनीं नेपाळ प्रकरणीं पुढीलप्रमाणें आठवणी दिल्या आहेत.)

श्री. काकासाहेब खाडिलकर यांचा व माझा संबंध व प्रत्यक्ष परिचय फक्त नेपाळांत १९०३ सालीं झाला. माझा प्रथम परिचय रा. हणमंतराव कुळकर्णी उर्फ अप्पा यांच्यामार्फत झाला. आम्ही गेलों तत्पूर्वी तेथें श्री. काकासाहेब खाडिलकर, रा. अप्पा व रा. रंगनाथ गोविंद तिखे असे तिघेजण गेलेले होते. रा. तिखे हे उमरावतीचे होतें. आम्हीं सर्व काटमांडूला रहात असूं. हें राजधानीचें शहर आहे. कांटमांडूपासून तीन मैल पूर्वेला पशुपतेश्वर आहे. काटमांडूला एक दक्षिणी ब्राम्हण संस्थानिक आहेत. त्यावेळीं त्यांचें तीन लाखाचें उत्पन्न होते अशी बोलवा होती. 'भट संस्थानिक' असें त्यांना म्हणत. त्यावेळीं त्या घराण्याचे मालक लहान होते. आम्ही तेथें असतांना ह्या मालक मुलाची मुंज झाली इतके तें लहान होते. यांच्या वाडयांत श्री. खाडिलकरांनीं बिऱ्हाडाला जागा घेतलेली होती. तें घर चार मजली होतें. चौथ्या मजल्यावर स्वयंपाक, तिसऱ्या मजल्यावर बैठक, दुसऱ्या मजल्यावर अडगळ व खालचा मजला मोकळा असे राहात असूं. तिकडे सर्वांचीच अशा पद्धतीनें राहण्याची रीत

होती. कारण खालच्या मजल्यावर आजूबाजूस घाण फार असे. डांस चिलटें फार. शौचकूपाची व्यवस्था यथातथाच. आमच्या वाड्यांत मात्र ती व्यवस्था होती. पाणी मुबलक असे. गारठा भयंकर, त्यामुळें पाणी मुबलक असलें तरी स्नान चार आठ दिवसांनींच करीत असूं. स्वयंपाक आमचा आम्हीच करीत होतों. पण स्वयंपाक करण्याबद्दल तक्रार नसे. ह्याचें कारण गारठ्यामुळें चुलीजवळ बसावेंसें वाटे. तेव्हां स्वयंपाक करायला मिळावें म्हणूनच जास्त धडपड असे. जो प्रथम उठेल त्यानें चूल पेटवायची व ज्यानें चूल पेटवाव-याची त्याला स्वयंपाक करण्याचा हक्क मिळत असे. म्हणून अगोदर उठून चूल पेटविण्याची संधि पहात असूं.

श्री. खाडिलकर थोडे स्वतंत्रपणें रहात. आंतल्या बाजूस त्यांची खोली असे व बाहेरच्या बाजूस आम्ही तिघे राहात होतों. सकाळीं दहाचे सुमारास जेवणें आटपून आम्ही सर्व कौलाच्या कारखान्याकडे जात असूं. तो का खाना चिन्हाडाचे जागेपासून मैल दीड मैल लांब होता. संध्याकाळीं सहाला परत येत असूं. श्री. खाडिलकर हे सर्व कामावर देखरेख करीत व तेच कार-खान्याचे मुख्य अधिकारी म्हणून मानले जात. ते त्यावेळीं टोपी घालीत असत. कोट, टोपी, विजार व कधीं कधीं धोतर असा त्यांचा पोषाक असे. पायमोजे, बूट या गोष्टी थंडीमुळें जरुरीच्याच असत. त्यामुळें ते पायमोजे बूट वापरीत असत. त्यांना कृष्णराव भटजी म्हणत. कारण सर्वच दक्षिणी ब्राम्हणांना तिकडे भटजी म्हणतात.

कारखान्यांत तीन चारशे मजूर होते. कौलांबाबत नेपाळ दरबारचे प्रयत्न श्री. खाडिलकर जाण्यापूर्वीपासून चालू होते असें वाटतें. श्री. खाडिल-कर काय, रा. अप्पा काय अगर मी काय, कौलें तयार करण्याची माहिती यथातथाच. रा. अप्पानींच थोडीशी जास्त माहिती मिळविली असावी. पण श्री. खाडिलकरांनीं प्रयोग करकरून कौलांचा जम बसविला. आठ महि-

न्यांनीं मी जेव्हां तेथून निघालों त्यावेळीं रोज दोन दोन हजार कौलें प्रेसमधून निघत होतीं व आम्ही अ ठ आठ हजारांची भट्टी लावीत असूं. दोन भट्ट्या होत्या. तेथील मेकॅनिकल इंजिनियर कुमार नरसिंग हे वरचेवर कारखान्यावर येत व पंतप्रधान श्री. चंद्रसमशेरजंग बहादर हे केव्हां केव्हां येत. श्री. खाडिलकरांची व त्यांचीं बोलणीं होत ती इंग्रजीमध्यें होत असत.

काटमांडूची वस्ती त्यावेळीं अठरावीस हजारांची असेल. कोंकणासारखीं लांब लांब घरें असत. हें शहर डोंगरांत वसलेलें आहे. नेपाळांत नेवारी लोक राहतात. गुरखा हा नेपाळांतील एक विभाग आहे. त्या विभागांतील लोकांनाच गुरखे म्हणतात व तेथील सैनिक ते गुरखे सैनिक. नेपाळांतील सर्वच सैनिक गुरखे नाहींत. नेवारी व रजपूत सैनिक तेथें आहेत. काटमांडूजवळ प्रसिद्ध पशुपतेश्वराचें देवालय आहे. काटमांडू व पशुपतेश्वर वगैरे तेथील सर्व देवस्थानें दक्षिणी ब्राह्मणांकडेच आहेत. ह्याचें मुख्य कारण नेवारी ब्राह्मणहि मांसाहारी आहेत. प्रत्येक दक्षिणी ब्राह्मण कुटुंबाला त्यावेळीं एक हजार रुपये तरी सालिना उत्पन्न असावें. देवपूजा करून रहाणें ह्याशिवाय दुसरा व्यवसाय ते करीत नसत. दक्षिणी ब्राह्मणांचीं अंदाजें एक हजार वस्ती तेथें असावी. पशुपतेश्वर, गोसावीकुंड अशीं प्रेक्षणीय स्थळें जवळ आहेत. हीं पहाण्यास रा. अप्पा, तिखे व मी जात असूं. श्री. खाडिलकर मात्र आमच्या बरोबर फारसे येत नसत. ते आमच्यापेक्षां वयानें मोठे होते. त्यामुळें ते जरा अलगपणानें वागत. त्यांचा स्वभावहि थोडा रागीट होता. नेपाळी अधिकाऱ्यांनाहि त्याचा एक दोनदां परिचय झाला असावा. त्यामुळें कारखान्याबाबत अधिकाऱ्यांकडे जाण्यायेण्याची कामगिरी रा. अप्पाचेकडे जास्त असे.

श्री. खाडिलकर हे जे नेपाळांत गेले ते तेथील इंजिनिअर कुमार नरसिंग यांच्या मध्यस्थीनेंच. हे त्यावेळचे प्र.इम मिनिस्टर श्री. चंद्रसमशेर जंग

बहादूर यांचे चुलत बंधु होते. श्री. चंद्रसमशेखर जंग बहादूर हे रजपूत घराण्यांतले होते. खासगीकडे व दरबारांत रजपूत रीतरिवाज चालत. ब्रीचेस सारखी विजार, हैदराबादी फॅशनचा तंग कंबरपट्ट्याचा लांब कोट, त्याला खालीं घोळ व गळपट्टा असा त्यांचा सरदारी पोषाख असे. प्राइम मिनिस्टर हेच सर्वाधिकारी होते. सर्व गोष्टींचा निकाल त्यांच्या एकट्यांच्या शब्दानें होत असे. तेथील खटले प्राइम मिनिस्टरापुढें चालत व ते लगेच देतील ती शिक्षा कायम. खटला चालविण्याची पद्धत और असे. प्राइममिनिस्टर दरबारचे माडीवर खिडकींत बसत. बाहेर उघड्यावर आरोपी व फिर्यादी उभे रहायचे. खालून मोठ्यानें बोलून सर्व हकीकत सांगायची व ती ऐकून लगेच त्यांनीं निकाल द्यायचा. त्यावेळच्या शिक्षा म्हणजे कडेलोट, हात तोडणें, वाघाच्या पिंजऱ्यांत घालणें अशा तऱ्हेच्या असत. तेव्हां तेथील राज्यकारभाराची पद्धत दराऱ्याची व चमत्कारिक असे. म्हणून आम्ही त्या बाजूकडे फारसे फिरकत नव्हतों.

नेपाळांत खाण्यापिण्याची मात्र समृद्धि होती. रुपयास **मण** तांदूळ. गहू, हरभरा, रुपयास पोतें पोतें. वनगाईचें उत्तम दूध **एक आण्यास** एक शेर. म्हैस हें जनावर तेथें अपवित्र मानलें जातें त्यामुळें म्हशीचें दूध काढीतच नाहींत. वनगाईचेंच दूध सर्व घेतात. श्री. खाडिलकर हे जरी वयानें मोठे असले व स्वतंत्र-तुटकपणें इतर वेळ वागत असले तरी जेवण्याखाण्याचे वेळीं खेळीमेळीनें वागत. रा. तिखे हा थोडा चेष्टेखोर होता व तो एखादे वेळीं खाडिलकरांशीं सुद्धां विनोद करीत असे. एकदां गंमत अशी झाली कीं खाडिलकरांना मांडीला करट झालें. त्यांचा स्वभाव दुसऱ्याला आपला उपद्रव बिलकूल होऊं द्यायचा नाहीं असा असल्यामुळें करट झाल्याचें त्यांनीं आम्हा कोणालाच सांगितलें नाहीं. तसेंच ते सहन करीत होते. आपला आपण उपचार करीत असावेत. एक दिवस रात्रीं झोपेंत असतानांच करट

फुटलें असावें. पण त्याची दाद त्यांना नव्हती. कारण ते नेहेमींप्रमाणें उठून बाहेर आले. घोतर रक्तबंबाळ झालेलें आमच्या नजरेस आलें. तिखे चेष्टेखोर--त्याला विनोद करण्याची लहर आली. तेव्हां त्यानें 'प्रकरण' हा शब्द वापरून विनोद केला. पण 'प्रकरण' हा शब्द ऐकतांच श्री. खाडिलकर संतापले. पण तिखेनें शांतपणें 'रागावतां काय ? रक्तबंबाळ धोतर किती झालें आहे तें पहा तरी' असें उत्तर दिलें. तेव्हां त्यांचें लक्ष तिकडे गेलें व ते हसूं लागले. 'करट फुटलें वाटतें' असें म्हणाले; व आम्हीहि मग खो खो हंसलों.

दिल्लीहून कोठें अज्ञातस्थळीं पाठविण्याच्या दृष्टीनें जरी श्री. वासुकाकांनीं आम्हांला नेपाळकडे पाठविलें होतें तरी श्री. खाडिलकरांच्या कामांत मदत व्हावी या दृष्टीनें कौलाच्या कारखान्याची माहिती त्यानीं मला घेण्यास सांगितलें होतें. त्याचप्रमाणें श्री. खाडिलकर व रा. अप्पा हे कोणत्या कामगिरीवर नेपाळांत आहेत त्याची कल्पना आम्हाला होती. शस्त्रनिर्मितीचा कारखाना तयार करायच्या खटपटींत श्री. खाडिलकर होते. ह्या बाबतींतला सर्व पत्रव्यवहार श्री. खाडिलकरच करीत असत. शस्त्रनिर्मितीच्या व्यवहारा-बाबत कधी कधी ते फक्त रा. अप्पाशींच वाटाघाटी करीत व त्याचेकडून थोडेंफार आम्हाला कळे. कलकत्त्याच्या जर्मन कॉन्सलमार्फत यंत्रसामग्री मिळविण्याची खटपट चालू होती. ह्या कारखान्याशीं जर्मन कॉन्सलचा पत्रव्यवहार चालू होता. श्री. कुमार नरसिंग यांना ह्याबाबतची सर्व माहिती असावी व त्यांचे मार्फत श्री. चंद्रसमशेरजंग बहादर यांनाहि ती मिळत असावी. मी तेथें चार पांच महिने राहिल्यानंतर बरगंजला--म्हणजे सरहद्दीवर कांहीं मशिनरी आणल्याचें आठवतें. त्यानंतर तीन महिन्यांनीं म्हणजे मी तेथें गेल्यापासून आठ महिन्यांनी श्री. खाडिलकरांच्या बरोबर मी तेथून निघालों.

नेपाळांतून श्री. खाडिलकर, रा. तिखे व मी एकदम निघालों. श्री. खाडिलकर कलकत्त्यास जाणार होते. रा. अप्पा नेपाळांत राहिले, पण ते काटमांडूला न राहतां पशुपतेश्वराला गेले. आही सर्व काटमांडूहून एकदम हललों. वाटेंत आम्हांत बापूभट नांवाचा नाशिकचा गृहस्थ भेटला. तो फार आजारी होता व नाशिकपर्यंत त्याला कोणी तरी पोंचवावें अशी त्यानें श्री. खाडिलकरांचीं आर्जवें केलीं. श्री. खाडिलकर कलकत्त्यास जाणार होते. रा. तिखे उमरावतीस जाणार होते. तेव्हां मीच त्या बापूभटाला पोंचवावें असें खाडिलकरांनीं सांगितलें. पाटणापर्यंत आम्ही सर्व एकत्र होतों. तेथून श्री. खाडिलकर कलकत्त्याला गेले. रा. तिखे उमरावतीस उतरले व मी मनमाडला उतरून पुण्यास आलों. श्री. खाडिलकरांची कलकत्त्यास सहा हजारांची चोरी झाली, असें मीं पुढें ऐकलें. पुण्यांत रा. वासुकाका जोशी यांना भेटून कोल्हापुरास आलों. नेपाळची सर्व हकीकत त्यावेळी मीं श्री. वासुकाकांना सांगितली. आम्हीं सर्वच तेथून निघालों ते पुन्हां परत कोणीच गेलों नाहीं अशी माझी समजूत आहे.

मी कोल्हापुरास आल्यानंतर माझी श्री. खाडिलकर, रा. अप्पा. रा. तिखे कोणाचीच आजवर गांठ पडली नाहीं. श्री. वासुकाकांना मी १९०७ मध्यें भेटलों होतों. त्यावेळी ते हुबळींहून पुण्यास चालले हं ते व मिरज स्टेशनवर मीं त्यांना गाठले. तेथून पुण्यास मिळून गेलों. पण पुणें स्टेशनवर कोल्हापूरचे फौजदार माझे मागावर आले आहेत, असें दिसतांच मी श्री. वासुकाकांना सोडून पुढें झालों. नंतर मी पुण्यास श्री. वासुकाकांचीं गांठ घेतली व त्याचवेळीं इतर गोष्टी घडल्यांमुळें परत आलों. पुन्हां माझी व श्री. वासुकाकांची गांठ झाली नाहीं. याचें कारण मी 'सरकारजमा' झालों अशी त्यांनीं समज करून घेतली व मीहि घरेच्च दिवस फरारी होतों.

# कविभूषण प्रा. बळवंत गणेश खापर्डे यांच्या आठवणी

'नेपाळ-प्रकरणाचें गूढ' या मथळ्या खालीं ता. ३१ ऑगस्ट १९४८ च्या 'केसरी" च्या अंकांत पान २ वर कांहीं संपादकीय मजकूर आला आहे. "लोकमान्य टिळक व त्यांचे कांहीं सहकारी व केसरी कचेरींतील कांहीं लोक यांनाच हें प्रकरण माहीत होतें" असें प्रारंभींच जें त्या लेखांत म्हटलें आहे तें खरें आहे. लोकमान्य टिळकांच्या ह्या "कांहीं सहकाऱ्यां" पैकीं एक माझे वडील कै. ती. दादासाहेब खापर्डे हे होत; आणि केसरी कचेरींतल्या कांहीं लोकांप्रमाणेंच उमरावतीस आमच्याहि घरांतील कांहीं लोकांस हें प्रकरण माहीत होतें व त्यांत आम्हीं मुलेंहि होतों.

आम्हांस हें प्रकरण कळण्याचें कारण हें कीं, लोकमान्य टिळकांनीं जेव्हां कै. काकासाहेब खाडिलकरांना नेपाळांत पाठविण्याचें ठरविलें, तेव्हां कै. काकासाहेबांच्या मदतीसाठीं म्हणजे त्यांची काळजी घेण्यास व सेवाशुश्रूषा करण्यास, त्यांच्याबरोबर देण्याकरितां लोकमान्यांनीं कै. ती. दादासाहेबांजवळ एखाद्या विश्वासू माणसाची मागणी केली. त्यावेळीं आमच्या वाड्यांत पुष्कळच विद्यार्थी रहात असत. त्यांचें राहणें, जेवणखाण, शाळेंतील शुल्क, पुस्तकें, सर्व आमच्याकडे असे. त्यांत तेव्हां रंगनाथ तिखे ह्या नांवाचा एक विद्यार्थी होता. त्या काळीं कै. ती. दादासाहेबांना सार्वजनिक कामाकरितां किंवा वकिलीच्या धंद्याकरितां प्रवास पुष्कळच करावा लागे. त्या त्यांच्या प्रवासांत केव्हां केव्हां हा रंगनाथ तिखे त्यांच्याबरोबर असे. कां कोण जाणे, पण कै. ती. दादासाहेब त्याला 'रंगनाथ' म्हणून हाका न मारतां

'रघुनाथ' म्हणून हाका मारीत असत ! पण त्याचें 'रंगनाथ' च नांव होतें हें आमच्या घरच्या सर्वांसच पक्कें माहीत होतें. मला वाटतें ह्या रंगनाथाच्या वडिलांचें नांव 'गोविंद' होतें. पण ह्याबद्दल माझी आतां खात्री नाहीं. ह्या रंगनाथाची ती. दादासाहेबांनीं ह्या कामासाठीं निवड केली व त्याला कै. खाडिलकरांबरोबर दिलें. त्याप्रमाणें तो त्यांच्याबरोबर नेपाळांत गेला होता. तिकडून परत आल्यावर तो पुनः आमच्या घरीं पुष्कळ दिवस येऊन राहिला होता व त्यावेळीं तो आम्हाला तिकडल्या पुष्कळ गोष्टी सांगत असे, हें मला पक्कें आठवतें.

नेपाळांत बंदुकीचा कारखाना काढण्याचा प्रयत्न चालू आहे हें आम्हांला त्याच्याकडूनच हळूहळू कळलें. त्याप्रमाणें तो दोनदां आमच्या घरून नेपाळला गेला व दोनदां परत आला, असेंहि मला साधारण आठवतें. पण त्याविषयीं खात्री नाहीं. कदाचित् तो एकदांच जाऊन एकदांच परत आला असेल. ह्या नंतर पुष्कळ दिवस तो बेपत्ता होता. आम्हांला त्याच वेळीं असें कळलें होतें कीं, ह्या नेपाळ–प्रकरणाचा इंग्रज सरकारला सुगावा लागून रंगनाथच्या मागेंहि पोलिसांचा ससेमिरा लागला आहे. पण ह्यानंतर कांहीं वर्षांनीं हाच रंगनाथ साधूच्या किंवा संन्याशाच्या वेषांत पुनः आमच्या घरीं येऊन सर्वांना भेटून कांहीं थोडे दिवस राहून गेला. पुनः मग कांहीं दिवस त्याच्याविषयीं कांहींच कळलें नाहीं. मग एकदम कळलें कीं तो मेला. आज तो हयात असता तर ह्या प्रकरणीं किती तरी माहिती मिळाली असती !

———

# काकासाहेबांच्या वृत्तपत्रविषयक आठवणी

काकासाहेब हे अत्यंत श्रेष्ठ पत्रकार म्हणून गणले जात असून, त्यांनीं मी प्रथम नाटककार व नंतर पत्रकार आहें असें म्हणून आपल्या संबंध जीवनाला व्यापणाऱ्या पेशाचा उल्लेख केलेला आहे. पत्रकारांच्या सृष्टींतील श्रेष्ठ दर्जा त्यांना जो प्राप्त झाला त्याच्या मुळाशीं त्यांचे या व्यवसायाबद्दलचे मूलभूत सिद्धांत होते आणि ते ध्यानीं घेणें जरूर आहे.

## जनता हें वृत्तपत्राचें दैवत

वर्तमानपत्र हें लोकांकरितां असतें हें पत्रकारानें विसरतां कामा नये, असा त्यांचा कटाक्ष असे. वर्तमानपत्र हें आपल्या विद्वत्तेच्या प्रदर्शनासाठीं, आपापसांतील उखाळ्या पाखाळ्या काढून वैयक्तिक भांडणें भांडण्यासाठीं किंवा आपल्या परिचयांतील लोकांना प्रसिद्धि अगर त्यांच्या युक्तिवादाला उत्तरें देण्यासाठीं नाहीं हें ते आग्रहानें सांगत असत. सर्वसाधारण जनता हें वर्तमानपत्राचें पहिलें दैवत आहे, आणि जनतेच्या हिताला प्राधान्य देऊनच वृत्तपत्राचें धोरण आंखण्यांत आलें पाहिजे. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा किंवा लोभ यांची छाया वृत्तपत्राच्या धोरणावर कधीं पडतां कामा नये. जनतेच्या हिताला पहिलें आणि प्रधान स्थान देऊन त्या हिताला पोषक असें धोरण आंखण्यांत आल्यावर त्या धोरणाचा प्रचार हें वर्तमानपत्राचें प्रमुख कार्य ठरतें. हा प्रचार बातम्यांच्या रूपानें व युक्तिवादाच्या द्वारें करावयाचा असतो.

## बातम्या देण्यांतलें धोरण

बातम्या देण्याच्या बाबतींत काकासाहेबांचा कटाक्ष असे कीं, वाचक अनेक वर्तमानपत्रें वाचतो आणि बातम्या आणि माहिती इतर वर्तमानपत्रां-

करून त्याला मिळालेली असते, असें समजून चालतां कामा नये. वाचक आपलें एकच वर्तमानपत्र नित्य वाचतो असें गृहीत धरून आपल्या पत्रांतून पत्रकारानें बातमी आणि माहिती दिली पाहिजे. बातम्या देतांना त्यांची साखळी सांधली गेली पाहिजे व दुवा तुटल्यामुळें कोणतीहि बातमी तुटक अशी वाचकाला वाटतां कामा नये. वृत्तपत्राचा अंक एखादे दिवशीं बंद असला तर नंतरचा अंक काढतांना नुसत्या ताज्या बातम्यांचाच परामर्ष न घेतां मधल्या दिवशींच्या बातम्याहि संक्षेपानें आल्या पाहिजेत आणि बातम्यांची सांधेजोडहि बरोबर झाली पाहिजे असें तें सांगत असत.

बातमी ही वाचकाला समजेल अशा स्वरूपांत व शब्दांत ती आली पाहिजे, असें काकासाहेब सांगत असत. शब्द बोजड किंवा अवघड वापरले जाऊं नयेत, आणि रूढ मापेंतच ती मांडली जावयास पाहिजे. वर्तमान-पत्राचा वाचक हा जाडजूड भाषा जाणणारा जसा असतो त्याचप्रमाणें रस्त्यावरचा साधा सामान्य वाचतां लिहितां येणारा कामगार आणि शेतकरीहि असतो. साध्या रूढ शब्दांत लिहिलेली गोष्ट विद्वानालाहि कळूं शकते, पण बोजड व अवघड मापेंत लिहिलेली गोष्ट मात्र सामान्य माणसाला कळूं शकत नाहीं. आपलें वर्तमानपत्र हें सर्वसामान्य लोकांसाठीं असल्यामुळें कोणालाहि समजेल अशा धर्तीचा मजकूर त्यांत असला पाहिजे असें ते म्हणत असत.

या बाबतींतील त्यांची एक आठवण उद्बोधक आहे. नवाकाळ पत्र निघाल्यावर त्याच्या जाहिराती ज्या येत असत त्यांच्या शेवटीं मॅनेजर असें लिहिलेलें असे. मॅनेजर या शब्दाऐवजीं व्यवस्थापक असा शब्द वापरावा अशी सूचना त्यांना करण्यांत आली, त्यावेळीं त्यांनीं मॅनेजर असाच शब्द पाहिजे असें सांगितलें आणि तोच कायम ठेवला. नंतर खुलासा करतांना त्यांनीं असें सांगितलें कीं, मॅनेजर हा शब्द रूढ झाला आहे आणि

मॅनेजर म्हणतांच त्याचा अर्थ, त्याचीं कामें याची तावडतोब कल्पना लोकांना येते. व्यवस्थापक या किंवा अशा प्रकारच्या शब्दानें वाचकांना हा सर्व बोध होतोच असें नाहीं. तेव्हां लोकांना चटदिशी समजणारा शब्द सोडून दुसरा शब्द घालून लोकांना गोंधळांत कशाला पाडावयाचें ? ज्यांच्याकरितां मजकूर लिहावयाचा त्यांना मॅनेजर हाच शब्द चांगला समजतो. मॅनेजर ह्या शब्दाचा उलगडा करतांना त्यांचें जें धोरण त्यांनीं सांगितलें तेंच वृत्तपत्रांतील बातम्यांबद्दल होतें.

## बिनचूक बातम्यांची दक्षता

बातम्या देतांना त्यांत कोठें दुवा चुकतां कामा नये त्याचप्रमाणें त्या बिनचूक स्वरूपांत आल्या पाहिजेत, यावर काकासाहेबांचा रोख असे. मूळ बातमी जी इंग्रजींत आलेली असते ती सर्वसामान्य वाचकांच्या वाचण्यांत येत नाहीं. वर्तमानपत्रांत जें आलें तेंच बरोबर असलें पाहिजे असें मानण्याचा वाचकांचा कल असतो. अशा स्थितींत अनवधानानें किंवा आज्ञानानें जर एखादी बातमी द्यावयाची राहिली किंवा चुकीच्या रूपांत दिली तर वाचकांच्या बाबतींत मोठा अन्याय झाल्यासारखा होतो असें ते म्हणत. बातमी वाचून तिचें महत्त्व पत्रकाराला कळलें नाहीं किंवा अर्थच चुकीचा वाटला तर तें काकासाहेब एक वेळ क्षम्य समजत. अर्थातच असा गोंधळ करणारांना त्यांचेकडून कडक इषारा मिळत असे. पण जर बातमीच वाचली न गेल्यामुळें वगळली गेली किंवा समजून घेण्याचा प्रयत्न न केल्यामुळें चुकीच्या स्वरूपांत आली तर मात्र त्यांना तें सोसवत नसे. मागें चीनचें यादवी युद्ध सुरू असतांना मध्यचीन व उत्तर चीन यांची गफलत कामावर असलेल्या पत्रकाराकडून झाली आणि त्या चुकीच्या समजुतीवर नवाकाळचा सात कालमी मथळा देण्यांत आला. या चुकीबद्दल काकासाहेबांनीं नवाकाळची कचेरी त्यादिवशीं दणाणून सोडली होती. बातम्या वगळल्या

६७
सं. नं. वि

गेल्या किंवा चुकल्या तर त्याबाबतींत काकासाहेबांकडून अलिबात माफी होत नसे आणि त्यामुळें रात्रींच्या व्यवस्थेसाठीं कामावर असलेल्या पत्रकारास दुसरे दिवशीं कचेरींत येतांना धाकधुक वाटत असे. कांहीं वेळ कोठें कांहीं क्षोभदर्शक भाषा ऐकूं आली नाहीं म्हणजे आपलें आदले दिवशींचें काम ठीक झालें असें समजून तो निर्वेधपणानें कामाला लागत असे.

## मथळे म्हणजे मार्गदर्शक फलक

बातम्यांप्रमाणेंच बातम्यांचे मथळे सोपे सुटसुटीत असे असले पाहिजेत असें ते म्हणत असत. मथळे बोजड असतां कामा नयेत, आणि ते चटकन समजणारे व चुरचुरीत वाटणारे असे असले पाहिजेत. बातमीकडे कोणत्या दृष्टीनें पहावें हें मथळ्यावरच्या योगानें आपण वाचकांना सांगत असतों, त्या दृष्टीनें ते मार्गदर्शक फलकासारखे असतात. जितपत बातमी तितपत त्या बातमीची भाषा तसेंच मथळ्याची भाषा व मथळ्याचा टाइप असला पाहिजे असें ते सांगत असत. साधी बातमी, पण ती सर्व काव्यमय भाषेंत लिहिली किंवा अगडबंब मथळा तिला घातला तर त्यायोगें जो रेढबपणा उत्पन्न होतो तो त्यांना खपत नसे. याबाबतींत तारतम्य बरोबर पाहिजे असें ते म्हणत असत. एकदां एका नाटकाच्या धर्मार्थ प्रयोगाची थोडक्यांत हकीकत नवाकाळमध्यें देतांना पुढच्या रांकेत अमुक अमुक बडी माणसें 'झळकत' होतीं असें लिहिलें होतें. 'झळकत' होतीं म्हणजे काय असा त्यांनीं दुसरे दिवशीं प्रश्न विचारला आणि नाटकाच्या साध्या रिपोर्टांत काव्याला जागा नाहीं असें त्यांनीं त्या लेखकाला सुनावलें. बातमी हें वृत्तपत्राचें महत्वाचें अंग असल्यामुळें त्या बाबतींत ती कोठें, किती, कशी द्यावी या बाबतींत तारतम्य यत्किंचित्हि सुटलेलें काकासाहेबांना कधीं खपत नसे.

## वृत्तपत्राची मांडणी व सजावट

बातम्यांची मांडणी चांगल्या रीतीनें झाली पाहिजे यावर काकासाहेबांचें विशेष लक्ष असे. जेवणाचें पान आणि वृत्तपत्राचें पान यांची तुलना ते करीत असत. जेवणाच्या पानावरचे जिन्नस जसे चांगले झाले पाहिजेत त्याचप्रमाणें ते जेथल्या तेथें व्यवस्थित प्रमाणांत वाढले गेले पाहिजेत. अव्यवस्थित रीतीनें पान जर वाढलेलें असेल तर तें पाहिल्याबरोबरच जेवणाराची प्रसन्नता नाहींशी होते, आणि जिन्नस कितीहि चांगले असले तरी जेवणाकडे त्याचें लक्षच लागत नाहीं. पानावर वाढलेल्या पदार्थांत रुचि-वैचित्र्य पाहिजे, सकसपणा पाहिजे आणि प्रमाणबद्ध अशी व्यवस्थित मांडणी पाहिजे. तसें असेल तर पान पाहिल्याबरोबर जेवणाराला समाधान वाटतें. वृत्तपत्रांच्या पानाचेंहि तसेंच आहे. वृत्तपत्राचें पान डोळ्यांसमोर आल्याबरोबर वाचकांचा संपूर्ण अनुकूल ग्रह होईल अशा रीतीनें वृत्तपत्राच्या पानाची सजावट झाली पाहिजे असें ते सांगत असत.

वृत्तपत्राची व्यवस्थित मांडणी होण्यास पत्रकाराच्या डोळ्यांसमोर रचनेचा आराखडा संपूर्ण रीतीनें अगोदरपासून खेळत असला पाहिजे, असें काकासाहेब म्हणत आणि त्यासाठीं रंगभूमीचा दृष्टांत ते उपयोगांत आणीत असत. नाटकांतील विशिष्ट देखावा नाटककाराचे दृष्टीसमोर अगोदरपासून खेळत असतो आणि त्या देखाव्याला उठावदारपणा येईल अशा रीतीनें रंगभूमीची सजावट, पात्रांची मांडणी, पोषाख वगैरेची रचना करण्यांत आलेली असते. ज्या दर्जाचें पात्र असेल त्या दर्जाचेच पोषाख त्या पात्राला देण्यांत येतात. रंगभूमि म्हणजे सकल कलांचा नीटस, उठावदार व मधुर अविष्कार! नाटककाराच्या डोळ्यांसमोर ज्याप्रमाणें नाटकांतील देखावे अगोदरपासून खेळत असतात त्याप्रमाणें पत्रकाराच्या डोळ्यासमोर मजकुराची मांडणी अगोदरपासून खेळत असली पाहिजे आणि प्रत्येक बातमी तिच्या कमी अधिक महत्त्वाप्रमाणें योग्य ठिकाणी आकर्षक स्वरूपांत व

ध्यंगरहित अशी रचली जाऊन नाटकांतील देखाव्याप्रमाणें वृत्तपत्राची सजावट उठावदार, नीटनेटकी व कलापूर्ण झाली पाहिजे, असें त्यांचें सांगणें असे. काकासाहेब हे आपणांस प्रथम नाटकी व नंतर पत्रकार म्हणवीत असत, आणि नाटककाराच्या कलामय नजरेनेंच ते वृत्तपत्रीय कामगिरीकडे पहात असत.

वृत्तपत्राच्या सजावटीच्या बाबतींतील काकासाहेबांची एक आठवण लक्षांत घेण्यासारखी आहे. आठवड्याचा नवाकाळ सुरू झाला त्यावेळीं पहिल्या अंकाच्या मुख्य पानाची रचना त्यांनीं सांगितली होती. पण त्या पानाकरतां एक जाहिरात आली आणि त्या जाहिरातीची सोय करून तें पान भरण्यांत आलें. काकासाहेबांच्या समोर छापलेल्या अंकाची पहिली प्रत गेली आणि त्या पानाची सजावट त्या जाहिरातीमुळें बेडौल झाली आहे असें पहातांच संतापून जाऊन त्यांनीं छपाई थांबविली; त्या पानाची रचना बदलून ठरल्याप्रमाणें करून घेतली आणि नंतर त्या अंकाची छपाई पुरी झाली. तुम्हीं नुसते पत्रकार आहांत मी नाटककार व पत्रकार आहें, असें म्हणून वृत्तपत्राची मांडणी प्रमाणबद्ध व उठावदार होण्याचें महत्त्व त्यावेळीं त्यांनीं सांगितलें होतें.

## वृत्तपत्रांतील विविधता व रोचकता

वृत्तपत्रांचें धोरण इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां लोकहित साधण्याच्या दृष्टीनें निश्चित केल्यावर धोरणाला वावडया नसलेल्या अशा मनोरंजनात्मक व माहितीपूर्ण मजकुराच्या पुरवठा वाचकांस पत्रकारानें केला पाहिजे, असें काकासाहेब म्हणत असत. दररोजच्या जीवनांतील निरनिराळ्या प्रश्नांच्या बाबतींत आपला वाचक बहुश्रुत राहील आणि विविध माहिती त्याला मिळत राहील अशी खबरदारी पत्रकारानें घेतली पाहिजे असें त्याचें धोरण असे.

'केसरी' पत्रांत ते दाखल झाल्यावर केसरींची पूर्वीची प्रचारात्मक एकदेशीय रचना बदलून तींत त्यांनीं परिवर्तन घडवून आणलें तें या दृष्टीनें लक्षांत घेण्यासारखें आहे. 'केसरीं' त त्यांनीं आपल्या पद्धतीनें विविधता व रोचकता आणली आणि केसरींत मजकूर विषयवारीनें व्यवस्थित असा येऊं लागला. 'नवाकाळ' मध्येंहि त्यांनीं विविधता व रोचकता आणण्यासाठीं निरनिराळीं सदरें सुरूं केलीं. शेती आणि शेतकरी, व्यायाम–आरोग्य, अदालत व इन्साफ, शास्त्रीय माहिती, ग्रंथग्रंथकार यासारखीं जीं सदरें त्यांनीं 'नवाकाळ' मध्यें सुरू केलीं. त्यांमध्यें वाचकाला नित्योपयोगी माहिती मिळून तो बहुश्रुत होईल अशी त्यांची दृष्टि असे. देशी परदेशी वृत्तपत्रांतून या निरनिराळ्या सदरांना उपयुक्त असा जो मजकूर येईल तो ते टिपून काढीत व त्यावर खूण करून ठेवीत. त्या मजकुराचा नंतर त्या त्या सदरांत समावेश होई. या सदरांतून शेतीचे देशोदेशींचे प्रयोग येत, व्यायामाच्या पद्धतीची माहिती असे, नव्या शास्त्रीय शोधांचें वर्णन असे, कायद्याच्या कोर्टांत चर्चिले जाणारे कूट प्रश्न अंतर्भूत होत, त्याचप्रमाणें आठवड्यांतून दोनदां लघु-कथाहि देण्यांत येत असत. सर्वसाधारण वाचकांची अभिरुची संभाळणें, त्याला उपयुक्त अशी माहिती पुरविणें आणि प्रचलित प्रश्नांविषयीं वाचकाला बहुश्रुत ठेवणें या गोष्टी 'नवाकाळ'च्या निरनिराळ्या सदरांच्या योगानें साधल्या जात असत.

'लोकमान्य' पत्र त्यांच्या संपादकत्वाखालीं निघूं लागलें तेव्हां त्यांत बातम्यांचा ताजेपणा राखण्याच्या दृष्टीने इंग्रजी वृत्तसंस्थांच्या बातम्या प्रथ-मच मराठी पत्रांत सुरू झाल्या. 'नवाकाळ'मध्यें परदेशी बातम्याहि ताज्या येऊं लागल्या आणि आज ताज्या बातम्या हें प्रत्येक मराठी वृत्तपत्राचें प्रमुख अंग बनलेलें आहे. असोसिएटेड प्रेस, रॉयटर सारख्या वृत्तसंस्थांच्या बातम्यांचा खर्च मराठी वृत्तपत्रांना कितपत झेपेल हा प्रारंभीं प्रश्नच होता

आणि त्यावेळीं तें धाडसच समजलें जाण्यासारखें होतें. पण काकासाहेबांनीं याबाबतींत धडाडी दाखविली आणि ती मराठी वृत्तपत्रांच्या विकासासहि कारणीभूत झाली. तशाच प्रकारचें धाडस त्यांनीं 'नवाकाळ'मध्यें चित्रें छापण्यास सुरुवात करितांना दाखविलें.

'नवाकाळ'ची आर्थिक स्थिति समाधानकारक नसतांनाहि त्यांनीं ब्लॉक तयार करण्याचें खातें उभें करण्याचा सुरवातीचा डोईजड खर्च पत्करला आणि ह्याबरोबरच तें खातें चालविण्यासाठीं दरमहा लागणारा खर्चाचा बोजा त्यांनीं अंगावर घेतला. मराठी दैनिकांत काकासाहेबांच्या धाडसानें प्रथम चित्रें दररोज नियमित येऊं लागलीं. चित्रें छापून 'नवाकाळ' पत्र खपविलें जातें असें उपहासानें म्हणणाऱ्यांच्या वृत्तपत्रांनाहि आज सर्वांग-पूर्णतेसाठीं चित्रें छापावीं लागत आहेत.

## अग्रलेख सांगण्याची धाटणी

काकासाहेबांच्या वृत्तपत्रीय वैशिष्ट्यांत त्यांच्या अग्रलेखांचा उल्लेख खास करावा लागेल. केसरी, नवाकाळ, यामधील किंवा इतर लेख ते स्वतः हातानें लिहीत नसत. अग्रलेख ते डिक्टेड करीत म्हणजे तोंडाने सांगत आणि लेखक तो लिहून घेई. सकाळीं नवाकाळ कचेरींत आल्यावर वृत्तपत्रांचें वाचन उरकून पान खाल्ल्यावर त्यांच्या कचेरीच्या जागेंत खेपा सुरू होत आणि अशा खेपा सुरू असतांनाच अग्रलेखाची मांडणी तयार होत असे. मथळा आणि सुरवातीचा मजकूर किंचित् हलक्या आवाजांत सांगितला जाई आणि नंतर आवाज एकदां चढला कीं, अग्रलेखाचा शेवट गांठीपर्यंत खड्या आवाजांत अग्रलेखाचा मजकूर ते सांगत असत. त्यांनीं उच्चारलेला वाक्यखंड लिहून टाकला कीं, लेखकानें हुंकार द्यावयाचा आणि नंतर हुंकार आल्यावर पुढचा मजकूर त्यांनीं सांगावयाचा असा त्यांचा क्रम असे.

लेख सांगत असतांना ते मध्यें कधी थांबत नसत किंवा संदर्भासाठीं वृत्तपत्र पुन्हां उलगडत नसत. अग्रलेख लिहीत असतांना कोणी मध्यैंच कामानिमित्त आला तर त्याला मी कामांत आहें असें सांगून किंवा त्याचें काम चटकन उरकून त्याला निरोप देत. एखाद्या वस्त्राच्या घडया उलगडून ज्याप्रमाणें तें ग्राहकासमोर व्यापारी टाकतो त्याप्रमाणें मेंदूंत व्यवस्थित तयार करून ठेवलेला अग्रलेख ते कचेरींत खेपा घालतां घालतां सांगून टाकत असत. अग्रलेख लिहीत असतांना ते मधून मधून किती कॉप्या झाल्या असा प्रश्न लेखकाला विचारीत असत. त्यावरून किती कॉलम मजकूर झाला याचा अंदाज घेऊन त्या हिशोबांत ते पुढचा मजकूर सांगत असत.

चित्रमयजगतमध्यें ते पहिल्या महायुद्धाचे लेख क्रमशः लिहीत असत. त्यावेळीं सुमारें दोन दिवसांत सकाळ दुपार मजकूर सांगून ते संपवीत असत. नाटकाखेरीज इतर मजकूर त्यांनीं क्वचित्च हातीं लिहिला असेल. नाटकें वहीवर पेन्सिलीनें हातानें ते लिहीत असत. जर लेखक गैरहजर असला तर दुसऱ्या कोणाला तरी ते लिहून घ्यावयास बोलावीत व तेंहि जमण्यासारखें नसेल त्याच दिवशीं स्वहस्तें ते लेख लिहीत. पण असे प्रसंग क्वचित्च येत. 'नवाकाळ'चे संपादक असतांना त्यांनीं एका दिवाळीनंतर एक दिवशीं बरेच जण गैरहजर असल्यामुळें चार पांच कालमचा लेखांचा मजकूर हातीं लिहिला. नेहमींची संवय नसल्यामुळें बोटें दुखूं लागलीं असे उद्गार या दिवशीं त्यांनीं काढले होते.

काकासाहेबांचा पत्रव्यवहार फारसा नसेच आणि कोणाला उत्तरें लिहावयाच झालीं तर तीं दुसऱ्यासच मजकुराचा आशय सांगून ते लिहावयास सांगत. त्यामुळें वृत्तपत्रांत काम करतांना त्यांना हातांत टाक धरण्याचा प्रसंग क्वचित्च येई. नाटकांखेरीज केव्हांहि आपण अमूक एक वर्षांत टाक हातीं धरलेला नाहीं अशा प्रकारचे उद्गार विशेष प्रसंगीं ते काढीत असत.

## अग्रलेखांची सिद्ध केलेली विशिष्ठ बैठक

दैनिक वृत्तपत्रांतील अग्रलेखांविषयीं काकासाहेबांची विचारपूर्वक सिद्ध केलेली विशिष्ट बैठक होती व तिला धरून त्यांचे दैनिक वृत्तपत्रांतील लेख असत. अग्रलेखाच्या मथळ्यांविषयीं त्यांचा विशेष कटाक्ष असे. दैनिक वृत्तपत्र मनुष्य सकाळीं कामधंद्याला लागण्यापूर्वी हातांत घेतो. मथळ्यावरून वाचनीय मजकुराची निवड करून झटपट तेवढा मजकूर वाचून काढतो व वृत्तपत्र बाजूला करतो. मथळ्यांवरून लेखांत विषय काय आहे तें जर त्याला चटकन् समजलें तर विषयाच्या गोडीनें तो लेख तो वाचतो. त्यामुळें मथळा हा विषयसूचक असला पाहिजे, तसाच तो सुटसुटीत व आकर्षक वाटला पाहिजे, असें ते म्हणत असत. मथळा नुसता चटकदार असेल आणि विषयसूचक नसेल तर तो ते बदलावयास लावीत असत, अशीं अलीकडचीं उदाहरणें किती तरी आहेत.

अग्रलेखांत जो विषय हाताळावयाचा त्याला प्रारंभींच हात घातला गेला पाहिजे असें ते म्हणत. एखाद्या इमारतीच्या उभारणीप्रमाणें आर्टिकलची उभारणी प्रमाणबद्ध व डौलदार असावी असें ते म्हणत असत. आर्टिकलमध्यें अनेक मुद्दे मांडण्याचा प्रयत्न न करतां एकच मुद्दा ठसठशीत रीतीनें मांडला जावा आणि पोषक अशा प्रकारचे गौण मुद्दे, उपमा, दृष्टांत व आधार यांनीं ते सजवलेले असावे, पण उपमा–दृष्टांतांच्या व गौण मुद्यांच्या गर्दीत मूळ मुद्दा मात्र दृष्टीआड होतां कामा नये असें त्यांचें सांगणें असे. अग्रलेखांतील प्रतिपादनांत त्याच मुख्य मुद्यावर पुनः पुन्हां येऊन तो वाचकांच्या गळी पूर्णपणें उतरविणें, म्हणजे त्याच मुद्याचें 'हॅमरिंग' करणें हे त्यांच्या दृष्टीनें महत्वाचें असे. आर्टिकलची सुडौल बांधेसूद उभारणी व कालोचित मुद्यांचें ठाशीव प्रतिपादन हें त्यांच्या अग्रलेखाचें वैशिष्टय असे.

वृत्तपत्रीय लेखांतच नव्हे तर नाटकांच्या बाबतींतहि एखादा मुद्दा कोठें तरी कसा तरी घुसडण्यास व त्यापायीं लिखाणाची प्रमाणबद्धता गमावण्यास ते तयार नसत. याच नाटकांत हा मुद्दा आलाच पाहिजे असें नाहं, पुढच्या एखाद्या नाटकांत योग्य ठिकाणीं त्याचा उपयोग करता येईल असें ते म्हणत असत.

## दैनिकांतील अग्रलेखाचें स्वरूप

दैनिक वृत्तपत्रांतील आर्टिकल म्हणजे सुमारें पांच सात मिनिटांचें लोकांना उद्देशून केलेलें वक्तव्य असून, त्या दिवसाच्या प्रमुख विषयाबद्दलची विशिष्ट विचारसरणी लोकांसमोर ठेवण्याचा आर्टिकलचा हेतु असतो असें काकासाहेब म्हणत असत. लोकांना समजेल अशा रीतीनें त्यांचा वकूब लक्षांत घेऊन ठसठशीत रीतीनें विषय मांडला जावा, भाषापद्धति बोजड किंवा क्लिष्ट नसावी, तसेंच विषयप्रतिपादनांत गुंतागुंतहि फार नसावी असें ते सांगत असत. दैनिकांतील अग्रलेख हा भाषणवजा असावा असें ते मानत असल्यामुळें त्यांत आर्टिकल प्रसंगानुसार फारच वाढले तरच ते परिच्छेद पाडत असत. भाषण करतांना आपण परिच्छेद पाडत नाहीं किंवा 'अस्तु' सारख्या शब्दांचा उपयोग करून भाषणाचे खंडहि पाडत नाहीं. किंबहुना निरनिराळ्या मुद्यांचा सांधा बरोबर जमवून मुद्दा बदलल्याचें लोकांच्या लक्षांतहि येऊं न देतां सफाईदार रीतीनें भाषणाचा ओघ सतत चालू ठेवतों. त्याचप्रमाणें आर्टिकलचा ओघहि अखंड व त्यांत छेद न पडतां चालला पाहिजे असें ते म्हणत. लंडन टाइम्सची आर्टिकलेंहि परिच्छेद न पाडलेलीं असतात, तोच प्रकार त्यांनीं स्वीकारार्ह मानला होता.

आर्टिकल लिहिणारांना ते असें म्हणत कीं, तुम्हीं मित्रमंडळींत किंवा भिन्नभिन्न कार्यकर्त्यांत चर्चा करीत असतां आणि त्यांत आलेल्या मुद्यांना उत्तरें देण्याचा उपक्रम तुमच्या लेखांतूनहि होतो. पण वृत्तपत्रांतील लेख हे

तुमच्या भोंवतींच्या मित्रमंडळीसाठीं नसतात, तर तुमचे जे हजारों ग्राहक असतात त्यांना उद्देशून असतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ठिकठिकाणचे कार्यकर्ते आणि तुमच्या पक्षाचे लोक तुमचे लेख वाचत असतात. विशिष्ट गोष्ट चांगली असते हें त्यांना पटलेलें असतें, पण त्यावर त्यांना युक्तिवाद ऊर्फ आर्ग्युमेंट करतां येत नाहीं. ही सामान्य कार्यकर्त्यांची गरज तुमच्या लेखांतील विचारसरणीनें, युक्तिवादानें भरून काढण्याचें काम वृत्तपत्रांतील आर्टिकलचें आहे. त्यासाठीं लोकांना ग्रहण करतां येईल असा सहज पण ठसठशीत युक्तिवाद, परिणामकारक पण चटकन समजेल अशी भाषाशैली आणि पक्की विचारसरणी ही आर्टिकलमधून मांडली गेली पाहिजे असें ते म्हणत असत.

काकासाहेबांच्या आर्टिकलच्या शेवटीं बहुधा प्रश्नचिन्ह असे आणि 'नवाकाळ'मध्यें तेंच पुढें चालू आहे. या प्रश्नचिन्हाविषयीं त्यांचा उलगडा असा असे कीं, वाचकाला उद्देशून आर्टिकलमध्यें विशिष्ट युक्तिवाद केल्यावर वाचकाचें एकंदर विषयाशीं मतैक्य असल्याबद्दलचा विश्वास शेवटच्या प्रश्नाच्या रूपानें व्यक्त करण्यांत येत असतो. सूचक प्रश्नांत अनुकूल उत्तरच अपेक्षित असतें. १९२९ सालीं त्यांना तुरुंगाची शिक्षा झाली त्यावेळींहि अग्रलेखाच्या शेवटचें प्रश्नचिन्ह कायम ठेवण्यास त्यांनीं बजावलें होतें.

काकासाहेबांची अग्रलेख लिहिण्याची विशिष्ट शैली होती, आणि त्यामुळें त्यांचे अग्रलेख परिणामकारक व प्रभावी ठरत असत. एकदां मूलभूत गृहीत गोष्ट ऊर्फ डेटा स्वीकारल्यावर भूमितीचा सिद्धांत पायरी पायरीनें पटकरल्यावांचून गत्यंतर रहात नाहीं त्याचप्रमाणें काकासाहेबांनीं मांडलेली मूलभूत गोष्ट ऊर्फ डेटा मान्य केल्यावर युक्तिवादाच्या एकेक पायरीनें त्यांचा सिद्धांत कबूल केल्यावांचून गत्यंतर रहात नसे इतके त्यांचे अग्रलेख

शास्त्रशुद्ध, सयुक्तिक व सुबक मांडणीचे असत. काकासाहेब अग्रलेखांत उपमा दृष्टांत योजीत असत त्याचप्रमाणें भाषेच्या सजावटीकडेहि लक्ष पुरवीत असत, पण उपमा दृष्टांतांच्या व भाषेच्या आकर्षणामुळें मुख्य मुद्दा दुर्लक्षिला जाणार नाहीं अशी खबरदारी ते घेत. सिद्धांतापेक्षां सजावट डोईजड होतां कामा नये अशी त्यांची दृष्टि असल्यामुळें आपल्या अग्रलेखांत ते एखादाच उपमा–दृष्टांत घोळवीत असत आणि प्रसंगानुरूप भाषा वापरत असत. अंतःकरणाच्या उमाळ्यानें त्यांचे लेख असल्यामुळें त्यांत आवेश व जोरदारपणाहि काळजाला भिडण्याइतका असे. केसरींतील व लोकमान्यांतील आणि नवाकाळमधील त्यांचे अग्रलेख त्या दृष्टीनें आजहि अभ्यासूंना वाचनीय ठरणारे आहेत.

अग्रलेखांत भाषेचा अव्यवस्थितपणा किंवा गलथानपणा त्यांना यत्किंचितहि चालत नसे. त्यांची स्वतःची भाषा कणखर व कमावलेली होती आणि एखाद्या वाक्यांत त्याच त्याच शब्दांची द्विरुक्ति त्यांना पसंत नसे. एकाच अर्थाचे निरनिराळे शब्द वापरून ते अशा प्रकारची द्विरुक्ति स्वतः टाळीत त्याचप्रमाणें दुसऱ्याच्याहि लिखाणांत शब्दांची द्विरुक्ति ते येऊं देत नसत. दुसऱ्या बाजूचें खंडण करतांना विशिष्ट आदरणीय व्यक्तीविषयीं अनादराचा शब्द ते येऊं देत नसत, आणि अशा आदरणीय व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला वळसा घालूनच तिचा युक्तिवाद ते हलक्या हातानें खोडून काढत असत.

विषयानुरूप भाषा वापरण्यावरहि त्यांचा फार कटाक्ष असे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत नवाकाळमध्यें जे युद्धाचे 'आठवडे' येत असत ते त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणें लिहिले जात आणि त्यांच्या पसंतीला ते उतरत असत. अग्रलेखाची सजावट करतांना 'फोडणी, खमंगपणा' अशाप्रकारचे शब्दप्रयोग त्यांत अधूनमधून येत असत. एकदां एक युद्धविषयक अग्रलेख

वाचवून घेत असतां वरीलसारखे शब्दप्रयोग ऐकून ते हंसले. हंसण्याचें कारण त्यांनीं असें सांगितलें कीं, युद्धविषयक लेख लिहीत असतांनाहि जेवणांतल्या उपमा आल्यावांचून रहात नाहींत. एकदां एका आचाऱ्यानें घनघोर युद्धाचें वर्णन करतांना भोपळ्याच्या फोडी कापाव्यात त्याप्रमाणें शिपाई कापले गेले असे आवेशानें सांगितलें असा संस्कृत श्लोक आहे. तो त्यांनीं याप्रसंगीं म्हणून दाखविला आणि भाषेची सजावट रसानुकूल नसेल तर त्यामुळें रसभंग होतो असें त्यांनीं सांगितलें.

## वैयक्तिक वाद व वृत्तपत्राचा दुरुपयोग

वर्तमानपत्रांतून वादविवाद करण्यास किंवा टीकाकारांना उत्तरें देण्यास काकासाहेब हे नाकबूल असत. वर्तमानपत्रांतील जागा वैयक्तिक वादविवाद माजविण्याकरितां किंवा उखाळ्या-पाखाळ्या काढण्याकरितां वापरणें हा दुरुपयोग आहे असें ते मानत असत. वृत्तपत्रांतील जागेचा दुरुपयोग वैयक्तिक स्वरूपाच्या वादासाठीं न करण्याच्या या धोरणाला ते शेवटपर्यंत चिकटून होते. त्यांचें 'मेनका' नाटक रंगभूमीवर आल्यावर त्या नाटकावर केसरींत सुमारें दीड पानाची टीका आली, आणि त्यांत वैयक्तिक स्वरूपाची टीका मोठ्या प्रमाणांत होती. या टीकेला ते 'नवाकाळ'मधून उत्तर देतील अशी अपेक्षा होती आणि वर्तमानपत्र तर त्यांच्या हातांतच होतें. पण वैयक्तिक वादांत वर्तमानपत्राची जागा खर्ची घालून वाचकांच्या दृष्टीनें तिचा दुरुपयोग करण्यास काकासाहेब तयार झाले नाहींत, आणि केसरींतील मेनकेवरील टीकेला आपल्या पत्रांत त्यांनीं शब्दानेंहि उत्तर दिलें नाहीं.

कै. तात्यासाहेब केळकरांच्या 'गतगोष्टी' प्रसिद्ध झाल्या त्यावेळींहि 'नवाकाळ'मधून त्या 'गोष्टी'ना उत्तर देण्यास त्यांनीं मना केली होती. 'गतगोष्टीं'त काकासाहेबांबद्दल निंदाव्यंजक असा मजकूर असून वस्तुस्थितीचा विपर्यासहि

असल्यामुळें त्यांचें खंडण 'नवाकाळ'मधून व्हावें असें वाटत होतें व कित्येकांनीं तशी अपेक्षाहि बोलून दाखविली होती. काकासाहेबांपर्यंत या बाबतची गुणगुण जातांच गतगोष्टींत काय मजकूर आला आहे याची माहिती त्यांनीं विचारून घेतली आणि 'नवाकाळ'मधून त्याला उत्तर येतां कामा नये असें बजावलें. त्यावेळीं त्यांनीं सांगितलें कीं, मराठी नाटकांविषयीं लिहितांना कोणालाहि माझें नांव ओलांडून जातां येणार नाहीं आणि केसरीची ट्रस्टीशिप मला देऊं करण्यांत आली होती–हें गतगोष्टींत आलेलें आहेच–एवढें बस आहे. त्या पुस्तकांत इतर काय लिहिलें आहे तें पहावयाचें कारण नाहीं.

वैयक्तिक टीकांना उत्तरें 'नवाकाळ'मधून न देण्याच्या त्यांच्या आग्रहाचा अलिकडचा प्रसंग म्हणजे मुंबईत निघणाऱ्या 'साहित्य' या द्वैमासिकांत नाट्यमहोत्सवानिमित्त प्रसिद्ध झालेल्या अंकांत श्री. तात्यासाहेब केळकरांचा एक लेख होता. लो. टिळक तुरुंगांतून सुटून आल्यावर त्यांना काकासाहेबांनीं आपल्या नाटकांचा सेट नजर केला तेव्हां टिळकांनीं तो फेकून दिला असें 'ऐकिवांत' असल्याचें विधान त्या लेखांत होतें. त्या अकारण आणि अप्रासंगिक उल्लेखाबद्दल काकासाहेबांना विचारतां ती 'ऐकीव' कथा खोटी असल्याचें त्यांनीं ठासून सांगितलें. पण 'नवाकाळ'मध्यें मात्र ती ऐकीव कथा खोटी असल्याचा मजकूर छापण्यास त्यांनीं अनुकूलता दर्शविली नाहीं. वैयक्तिक वादाकरितां वर्तमानपत्राची जागा राबविली जातां कामा नये हें आपलें धोरण त्यांनीं शेवटपर्यंत कायम ठेविलें.

## प्रचाराची एकाग्रता ढळवणारे टीकाकार

काकासाहेब टीकाकारांना उत्तरें देत बसण्याच्याहि विरुद्ध होते. टीकाकारांना उत्तरें देत बसलें म्हणजे उद्दिष्टावरची नजर ढळते आणि पायाखालची वाट चुकते असें ते सांगत असत. आपण आपलें एक विशिष्ट धोरण ठरवून तदनुसार वृत्तपत्रांतून प्रचार करण्याची कामगिरी पार पाडीत

असतों. दृष्टि धोरणावर खिळलेली असते आणि प्रचाराचा मार्ग आपण चालत असतों. वाचक हें ओळखूनच आपलें पत्र घेत असतो. हा प्रचार परिणामकारक होऊं लागला कीं, टीकाकार पुढें येऊन गवगवा करूं लागतात. टीकाकारांच्या आक्षेपांना आपण उत्तर देऊं लागलों कीं, त्याप्रमाणांत प्रचाराचें काम मागें पडतें, धोरण सुटतें आणि तेवढ्यापुरते टीकाकार त्यांच्या उद्देशांत सफल होतात. टीकांना उत्तरें देण्यांत वृत्तपत्रांतील जागेचा अपव्यय होतो, कारण ती जागा ज्या कारणासाठीं वापरली जावी अशी आपली इच्छा आणि वाचकांची अपेक्षा असते त्या कारणासाठीं वापरली जात नाहीं, म्हणजे त्या जागेचा अपव्यय होतो. टीकाकाराला उत्तरें देण्यांत एकदां बुद्धि जुंपली गेली म्हणजे ध्येयावर ती एकाग्र रावत नाहीं आणि तिची प्रचाराची एकतानता नाहींशी होते. स्थळ, काळ व बुद्धीचा अपव्यय टीकाकारांना उत्तरें देत बसल्यानें होतो आणि वाचकांचा द्रोह आपल्या हातून घडतो असें ते म्हणत असत.

टीकाकारांना ते बेडकांची उपमा देत असत. आपण नाकासमोरच्या ध्येयावर नजर ठेवून पायाखालचा रस्ता कापत असतों, आणि आजूबाजूला बेडकांचें ओरडणें सुरू असतें. आपलें लक्ष ओरडीकडे जास्त वेधलें गेलें कीं गति मंद पडते आणि आपण एखादा दगड हातांत घेऊन आवाजाच्या रोखानें भिरकावून देतों किंवा हातांत काठी वगैरे घेऊन पायाखालचा रस्ता सोडून आवाजाच्या रोखानें जाऊं लागतों. आवाजाचा पाठलाग करण्याच्या ईर्ष्येनें पायाखालची वाट सुटली कीं काट्याकुट्यांत जाऊन पडावें लागतें, ओरडणारा बेडूक पटकन उडी मारून पलीकडे गेल्यानें कधींच काठीच्या तडाख्यांत येत नाहीं. एका बाजूचा आवाज बंद झाला असें वाटतें न वाटतें तोंच तिसऱ्या बाजूनें आवाज ऐकूं येऊं लागून त्या बाजूस जाऊन पराक्रम गाजविण्याच्या आहारीं आपण जातों. अशा या उद्योगांत पायांत

काटेकुटे मोडतात, कपडे फाटतात, पायाखालचा मार्ग सांपडतांना पुन्हा पंचाईत येते, विशिष्ट प्रचारावर व उद्दिष्टावर मन खिळविणें कठीण जातें, आणि वाचकांनीं आपल्याकडून केलेल्या अपेक्षांचा भंग होऊन त्यांचा द्रोह केल्याचें पाप मस्तकीं फुटतें.

टीकाकारांच्या मार्गें लागून मार्गभ्रष्ट होण्यापेक्षां उद्दिष्टावरची नजर ढळूं न देतां प्रचाराचा मार्ग निष्ठेनें आक्रमीत जावें असें ते म्हणत असत. अगदींच कोणी वाटेंत आडवें आलें तर मार्ग मोकळा करून घेण्यापुरते त्याच्याशीं दोन हात करावेत, पण उद्दिष्टावरची नजर व पायाखालचा मार्ग चुकूं देऊं नये टीकाकाराचें ओरडणें हें यशाचें चिन्ह असल्यामुळें पायाखालचा मार्ग दुप्पट उत्साहानें आक्रमावा असें ते म्हणत असत.

## प्रचाराची निष्ठा व प्रभाव

प्रचार हें वृत्तपत्राचें प्रधान अंग असल्यानें तें कार्य व्यवस्थित रीतीनें पार पाडण्यावर काकासाहेबांचा कटाक्ष असे. त्या दृष्टीनें वर्तमानपत्राची भूमिका ही वकिलासारखी आहे असें ते म्हणत असत. एकदां लोकहिताची बाजू अमूक आहे असा बुद्धीचा निश्चय झाला कीं त्या बाजूशीं एकजीव होऊन वृत्तपत्रानें ती बाजू सावरली पाहिजे, रंगविली पाहिजे, उठावदार केली पाहिजे आणि लोकांसमोर ठेवली पाहिजे. जनतेच्या न्यायासनासभोर वृत्तपत्रानें आपली बाजू मांडावयाची असते आणि अनुकूल निर्णय घ्यावयाचा असतो. अर्थात् आपल्या पक्षाला वावडी असलेली गोष्ट वृत्तपत्रांत कोणत्याहि स्वरूपांत येतां कामा नये. कित्येकदां मजकुराच्या स्वरूपांत नाहीं तर जाहिरातीच्या स्वरूपांत विरुद्ध बाजूचा प्रचार मांडला जाण्याचा संभव असतो. अशा वावडया स्वरूपाच्या जाहिराती त्यांनीं अगाऊ जागरूक राहून कित्येकदां नाकारल्या होत्या.

विरुद्ध पक्षाच्या पथ्यावर पडणारा अर्थातच आपल्या पक्षाला वावडा

असा मजकूर टाळून भागत नाहीं. आपल्या पक्षाची बाजू उठावदार रीतीनें मांडली गेली पाहिजे. त्याबाबतींत काकासाहेबांची नजर घारीसारखी तीक्ष्ण असे. आपल्या पक्षाला अनुकूल असा युक्तिवाद, कोटिक्रम किंवा माहिती कोठेंहि आली कीं ती काकासाहेबांच्या नजरेंतून चुकत नसे. वृत्तपत्रांतून किंवा मासिकांतून आलेल्या तशा प्रकारच्या मजकुरावर लगेच काकासाहेब खूण करीत आणि त्यांच्याजवळच्या नोंदवहींत त्याची नोंद होई. ठिकठिकाणीं आलेल्या अशा मजकुराची नोंद करण्याकरितां काकासाहेबांची एक नोंद-वही असे. नोंदवहींत मजकूर नोंदला गेला कीं त्यांतील युक्तिवादाचा किंवा माहितीचा परामर्श स्फुटाच्या, अग्रलेखाच्या किंवा माहितीवजा मजकुराच्या स्वरूपांत 'नवाकाळ'मध्यें घेतला जाई, व त्यांच्या पक्षाला अनुकूल असा कोणताहि युक्तिवाद, कोटिक्रम किंवा माहिती ठसठशीत स्वरूपांत त्यांच्या वाचकांसमोर आल्याशिवाय रहात नसे. त्यामुळें त्यांच्या पक्षाचे लोक ज्याप्रमाणें 'नवाकाळ' घेत त्याप्रमाणें विरुद्ध बाजूचे लोकहि दुसऱ्या बाजूचें परिशीलन करण्याकरितां काकासाहेबांचें वृत्तपत्र घेत असत.

आपल्या या कामगिरीचा त्यांना स्वत:लाहि जबर आत्मविश्वास होता. आपल्या राजकीय सहकाऱ्यांना ते म्हणत, तुम्ही एकदां तारेवर चढून कसरत सुरू करा तर खरे, ढोलगें वाजविण्याचें काम माझें आणि तें मी कसें करीत रहातों तें तुम्ही पहात रहा. पुष्कळदां असें होत असे कीं, प्रचाराच्या आकर्षणामुळें तारेवर कसरत करणारापेक्षां ढोलगेवाल्याकडेच प्रेक्षकांचें लक्ष जास्त वेधत असे.

## जनतेच्या वरिष्ठ न्यायासनाचा कौल महत्त्वाचा

विविधज्ञान विस्तारांतील लेखापासून ते नवाकाळमधील लेखांमधील काकासाहेबांचें सर्व लिखाण लोकांना उद्देशून असे. त्यांच्या वृत्तपत्रीय कामगिरीचें मुख नेहमीं लोकसन्मुख असे. वृत्तपत्रीय रकान्यांतून ते कोणाशीं

बोलले असतील तर तें लोकांशींच आणि कोणत्या शक्तीला त्यांनीं आवाहन केलें असेल तर तें लोकांच्या शक्तीलाच. लोकांच्या दृष्टीनें आपली बाजू असमर्थनीय ठरतां कामा नये असा त्यांचा कटाक्ष असे. सरकारी न्यायासनाच्यापेक्षां वरिष्ठ न्यायासन जनतेचें असून त्या न्यायासनाला आपण दोषी वाटतां कामा नये आणि त्या न्यायासनाची सहानुभूति गमावली जातां कामा नये अशी त्यांची दृष्टि असे. नवाकाळवरील निरनिराळ्या खटल्यांच्या वेळीं आपली बाजू सरकारी न्यायासनासमोर सिद्ध झाली न झाली तरी लोकांना ती बरोबर वाटली पाहिजे अशी खबरदारी ते घेत.

नवाकाळवरील सोलापूरच्या कलेक्टरचा खटला व राजद्रोहाचा खटला लढवितांना लोकांचें वरिष्ठ न्यायासन त्यांच्यासमोर असे. त्यानीं कांहीं वर्षें स्वाधीन भारत हें हिंदी दैनिक चालविलें होतें आणि त्यांत इंदूरच्या एका लक्षाधीशाच्या आर्थिक स्थितीबद्दल आक्षेपाई वाटणारें विधान आल्यामुळें सदर लक्षाधीशानें स्वाधीन भारतवर व त्या पत्राचे मालक म्हणून काकासाहेबांवर फौजदारी दावा लावला होता. सदर लक्षाधीशाची आर्थिक स्थिति बरी नसल्याचे विधान करण्यासारखे कांहीं व्यवहार त्यावेळीं घडले होते हें सदर खटल्यांत साक्षीपुराव्याच्यावेळीं निदर्शनास आणण्यांत येत होतें. त्या खटल्याची हकीकत नवाकाळमध्यें संक्षेपानें देण्यांत येत होती. असा संक्षेप करतांना काकासाहेबांना वरील जो मुख्य मुद्दा लोकांसमोर यावयास पाहिजे होता तो व्यवस्थित रीतीनें आला नाहीं. स्वाधीन भारत कोर्टांत खटला जिंको किंवा हरो, पण स्वाधीन भारतमध्यें यलो जर्नालिझमला शोभणारें बदनामीचें निराधार विधान आलें असें लोकांना वाटतां कामा नये, या दृष्टीनें महत्वाचा खटल्याचा जो भाग होता तेवढाच तुमच्या रिपोर्टांत गळला आहे, असलें अनवधान व निष्काळजीपणा शोभून दिसत नाहीं, अशा शब्दांत त्यांनीं त्यावेळीं आपली सक्त नाराजी व्यक्त केली होती.

## व्यवसायाची दैवत म्हणून उपासना

वृत्तपत्रव्यवसायाला काकासाहेब धंदा म्हणून न समजतां दैवत म्हणून समजत असत आणि दैवत या दृष्टीनें या व्यवसायाची सेवा एकनिष्ठेनें केली पाहिजे असें प्रतिपादन ते करीत असत. वृत्तपत्राच्या व्यवसायाबद्दलच नाहीं तर जो व्यवसाय आपण पत्करला तो एकनिष्ठेने करीत राहिलें पाहिजे, असें ते म्हणत असत. मनुष्य आपल्या उद्दिष्टानुसार त्या उद्दिष्टाला पोषक असा व्यवसाय शोधतो, पसंत करतो आणि पत्करतो. उद्दिष्टानुसार व्यवसाय पसंत करून पत्करतांना इष्टानिष्टतेबद्दल काय तो विचार करावा; पण एकदां व्यवसाय पत्करल्यावर मग त्याच क्षेत्रांत आपल्या बुद्धियुक्तीच्या सर्व शक्ती लावून त्या व्यवसायाशीं आपलें दैव बांधून टाकावें आणि त्या व्यवसायाबरोबर जो उत्कर्ष किंवा अपकर्ष वाट्याला येईल तो पत्करावा असें ते म्हणत असत.

काकासाहेब या बाबतींत शेतकऱ्याचें उदाहरण घेत. शेतकरी हा जमीन ही आपली मायमाऊली समजतो आणि जमिनीवर खस्ता खाऊन तिच्यावर आपली उपजीविका करतो. शेती हें आपलें दैवत असें तो जोंपर्यंत समजतो तोंपर्यंत शेतीच्या व्यवसायांतच त्याची सर्व शक्ति गुंग असते. त्याच्या हातून ही एक आपल्या दैवताची तपश्चर्या घडत असते. त्या तपश्चर्येचें फळ अखेर इतरांच्यापेक्षां त्याच्या पदरीं अधिक प्रमाणांत पडल्याशिवाय रहातहि नाहीं. उलटपक्षीं शेतकरी आपल्या जमिनीला दैवत मानून अनन्य भावानें शेतकाम करीत नसेल तर इतर धंद्यांत अधिक कमाई होते असें दिसल्याबरोबरच त्याचें चित्त डळमळूं लागतें. चित्त डळमळलें कीं हातीं असलेल्या धंद्यांत गोडी वाटेनाशी होते; मन एकाग्र होत नाहीं व त्यांतील वाकबगारी वाढत नाहीं. नव्या धंद्यांतहि चटकन प्रवेश किंवा स्थिरता प्राप्त न होतां 'हेंहि नाहीं आणि तेंहि नाहीं' असें अपेशी जीवन

वाटयाला येतें. गोडी वाटून आपण जो व्यवसाय पत्करतो, तो दैवतासारखा होऊन बसतो. पण गोडी नसतांना निव्वळ लाभासाठीं जर एखादा व्यवसाय पत्करला तर त्यांत तळमळ किंवा ओढ नसल्यामुळें अधिक लाभाचा दुसरा व्यवसाय आढळला कीं, पहिला सोडून दुसऱ्यांत व दुसरा सोडून तिसऱ्यांत याप्रमाणें मनुष्य थारेपालट करीत रहातो. या मार्गानें पुष्कळदां वैयक्तिक हित साधतेंहि किंवा उतरती भांजणीहि पदरीं येते. पण दैवत म्हणून एकाद्या व्यवसायांत अंतर्यामीच्या ओढीनें व गोडीनें आपल्या शक्ती जर राबवल्या नाहींत तर तो व्यवसायहि भरभराटीला चढत नाहीं, आणि अर्थात्च त्या व्यवसायांत राबणारालाहि तो लाभदायक होत नाहीं.

दोनदां स्वप्नांत आणि एकदा जागृतावस्थेंत 'केसरी' हीं अक्षरें डोळ्यासमोर येऊन वृत्तपत्राचा व्यवसाय काकासाहेबांनीं आवडीनें व स्वेच्छेनें आणि लोकजागृतीचें उद्दिष्ट त्या व्यवसायाच्या अंगिकारानें साध्य होईल अशा श्रद्धेनें पत्करला आणि अखेरपर्यंत ते त्या व्यवसायांत आपल्या शक्ती खर्ची घालत होते. आयुष्याच्या ऐन प्रारंभीं त्यांनीं हा व्यवसाय पत्करला आणि महाप्रयाणाच्या दिवशींहि दुपारीं नित्याप्रमाणें 'नवाकाळ' कचेरींत येऊन त्यानीं वृत्तपत्रांचें परिशीलन केलें, रात्रीं 'नवाकाळ'चा अग्रलेख नित्याप्रमाणें त्यांनीं पाहिला आणि त्यानंतर सुमारें दोन तासांनीं दैवताची उपासना खंडित होऊं न देतां त्यांनीं देह ठेवला.

## पापापासून दूर ठेवणारी निर्लोभ निष्ठा

काकासाहेबांची परमेश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धा होती आणि तो जनता-जनार्दनस्वरूपीं आहे असें ते मानीत असत. या जनताजनार्दनाच्या सेवेसाठीं, त्याच्या शक्तीला आहवाहन करण्यासाठीं त्यांनीं वृत्तपत्राचा व्यवसाय आयुष्यभर चालविला. तसा चालवितांना त्यांनीं कधीं लाचारी पत्करली नाहीं, मिंधेपणा स्वीकारलां नाहीं, लोकहिताच्या विचाराशिवाय दुसऱ्या

कोणत्याहि विचारविकारांचें प्राबल्य होऊं दिलें नाहीं. कसलाहि लोभ मनांत आला कीं कार्य पापविद्ध होतें आणि कार्याची त्याचप्रमाणें कर्त्याची हानि होते. ही हानि टाळण्याचा मार्ग लोकहितावर खिळलेली दृष्टि विचलित होऊं न देणें हा होय, असें काकासाहेब सांगत असत. विश्वव्यापी व विश्वस्वरूपी परमेश्वराची लोभशून्य कर्तबगारीनें आराधना करणारी व्यक्ति अखेर वसुधैव कुटुंबकम् होऊन परमेश्वराशीं एकरूप पावते अशा प्रकारचें वर्णन काकासाहेबांच्या वैदिक ग्रंथांत आहे. वृत्तपत्रीय व्यवसाय त्यानीं याच निष्ठेनें चालविला आणि अधिकाधिक उन्नत अशी मानसिक अवस्था प्राप्त करून घेऊन त्यांनीं आपल्या सेवातत्पर जीविताचें सार्थक केलें.

## सेवेनें प्राप्त होणारा योगक्षेमाचा हक्क

वृत्तपत्राचा व्यवसाय हें दैवत आहे व या व्यवसायांत आपल्या शक्ती समर्पण करणाराचा चरितार्थ या व्यवसायांत चांगल्या रीतीनें चालला पाहिजे असें ते म्हणत असत. वृत्तपत्रांत जीवेंभावें कामें करणारांना उदर-निर्वाहाची काळजी उरतां कामा नये आणि त्यासाठीं त्यांना इतरत्र पहावें लागूं नये. एखाद्या दैवताची पूजाअर्चा अहर्निश करणाराला जर उदर-निर्वाहाकरतां इतरत्र धडपड करावी लागली तर तेवढ्यापुरतें त्याचें त्याच्या दैवताकडे दुर्लक्ष होतें व सेवेंत खंड पडतो, त्या दृष्टीनें दैवतापुढें ठेवण्यांत येणारी दक्षिणा किंवा प्रसाद पुजाऱ्यानें घेण्यांत कांहीं चोरी नसते किंबहुना त्याच्या सेवेनें त्याला तो हक्क प्राप्त झालेला असतो. त्याचप्रमाणें वृत्तपत्र-व्यवसायांत आपलें आयुष्य वेचणारांना आपला योगक्षेम त्या व्यवसायाच्या आश्रयानें चालविण्यांत कमीपणा तर नाहींच, पण त्यांचा तो हक्क आहे असें ते म्हणत असत.

वृत्तपत्रें हा चरितार्थाचा धंदा सांप्रत होऊं पहात आहे अशाप्रकारचा आक्षेप घेण्यांत येतो. काकासाहेब असें म्हणत असत कीं प्रामाणिकपणानें

कोणताहि धंदा करून चरितार्थ चालविण्यांत दोष नाहीं, त्याचप्रमाणें वृत्तपत्राचा व्यवसाय करून उपजीविका करणें यांतहि कमीपणा नाहीं किंवा दोष नाहीं. द्रव्याच्या हव्यासानें एखादा व्यवसाय न पत्करतां गोडीमुळें पत्करलेला असला म्हणजे अपकर्षाचा काळ असेल त्यावेळीं मनुष्य अधिक उद्योगी बनतो, आणि प्रयत्नांची शिकस्त करतो. उलट पक्षीं उत्कर्षाचा काळ असेल त्यावेळीं हातीं आलेला पैसा फक्त स्वत:च्या स्वार्थाकरितां न वापरतां आपल्या दैवताची म्हणजे वृत्तपत्र व्यवसायाची प्रतिष्ठा कशी वाढेल याच दृष्टीनें विनियोग झाला पाहिजे असें ते म्हणत असत.

## मिंधेपणाचें ग्रहण टाळणारा लोकाश्रय

पैसे मिळविण्यासाठीं आपल्या दैवताचा दुरुपयोग मात्र होतां कामा नये असें ते सांगत असत. वृत्तपत्राचा व्यवसाय हा निव्वळ पैसे मिळविण्यासाठींच असेल तर मनुष्य वाममार्गाला जाण्यास कमी अधिक लोभ समोर येतांच तयार होतो. वृत्तपत्रांतून असले नमुने वारंवार दिसतात. असल्या वाममार्गाचा अवलंब केल्यानें वृत्तपत्र हें लोकांचें न रहातां वैयक्तिक फायद्याचें साधन बनतें, त्याची प्रतिष्ठा जाते आणि त्या वृत्तपत्रालाच नव्हे तर संबंध सांप्रादायाला कमीपणा येऊन दैवत दूषित होतें. वृत्तपत्रांत ऋजू मार्गानें, प्रामाणिकपणानें योगक्षेम चालविण्यास कोणाची भीति नाहीं, पण पैशालाच प्राधान्य देतात ते या दैवतालाच दूषित करतात असें ते म्हणत असत.

वृत्तपत्राचें लोकसेवेचें व्रत निस्पृहपणाने पार पाडण्याच्या दृष्टीने वृत्तपत्रांनीं वर्गणीच्या व जाहिरातीच्या स्वरूपांत येणाऱ्या पैशाशिवाय इतर पैसा आपोआप चालत आला तरी तो पत्करूं नये असें काकासाहेब सांगत असत. वृत्तपत्रांना अशारीतीने देऊं करण्यांत येणारा पैसा जरी सशर्त नसला तरी कांहीं अपेक्षेनेंच दिलेला असतो. तो एकदां स्वीकारला म्हणजे मिंधेपणा

येतो व तो मिंधेपणा निस्पृहपणाला व लोकहिताच्या दृष्टीला नकळत ग्रहण लावल्याशिवाय रहात नाहीं. वृत्तपत्र लोकांचें आणि लोकांकरितां म्हणून चालावयाचें तर तें लोकांच्या आश्रयावरच त्यांजकडून सेवेच्या मोबदल्यांत मिळणाऱ्या पैशावर चाललें पाहिजे. त्या व्यतिरीक्त इतर स्वरूपांत वृत्तपत्रांना मिळणाऱ्या पैशानें मिंधेपणा व ओशाळेपणा कळत न कळत शिरतो. तसा मिंधेपणा वृत्तपत्रांत शिरल्यावर जनसेवेचें कार्य जरी वृत्तपत्राकडून पार पडत असलें तरी त्यांत स्वेच्छेपेक्षां परेच्छाच प्रभावी जास्त असते. तसें होऊं नये म्हणून आपण होऊन चालत येणाऱ्या मदतीच्या द्रव्यापासूनहि दूर राहिलें पाहिजे असें काकासाहेब म्हणत. आणि याप्रमाणें त्यांचें वर्तनहि चोख असे.

## काकासाहेबांनीं नाकारलेल्या देणग्या

याबाबतींत दे. गंगाधरराव देशपांडे यांच्या साक्षीने घडलेल्या एका प्रसंगाची आठवण लक्षांत घेण्यासारखी आहे. प्रतिसहकार पक्ष निघाल्यानंतर स्वराज्य पक्षाच्या एका बड्या पुढाऱ्याचा मुक्काम मुंबईंत असतांना त्यानें काकासाहेबांना भेटीसाठीं बोलावून घेतले आणि दे. गंगाधरराव देशपांडे यांच्यासह काकासाहेब भेटीसाठीं गेले. नवाकाळमधून होणाऱ्या स्वराज्य पक्षाच्या प्रचाराबद्दल सदर पुढाऱ्यानें आपलें समाधान व्यक्त केलें आणि नवाकाळला मदत म्हणून त्यानें दहा हजार रुपयांचा चेक काकासाहेबांच्या हातीं दिला. नवाकाळची अर्थिक स्थिति त्यावेळीं बेतासबात होती आणि कर्जबाजारीहि होतेंच. मदत बिनशर्त होती. पण काकासाहेबांनीं कसलाहि मोह मनांत न येतां तो चेक तेथल्या तेथेंच परत देऊन टाकला आणि सांगितलें कीं, नवाकाळला अर्थिक सहाय्याची अपेक्षा नाहीं. नवाकाळला मदत करण्याची तुमची इच्छा असेल तर तुमच्याकडून वृत्तपत्रांना जाणाऱ्या बातम्या नवाकाळला चटकन मिळतील एवढें करा.

घवघवीत देणगीला अशा रीतीनें काकासाहेब पाठमोरे झाले एवढेंच नव्हे तर या बाबतचा उल्लेखहि त्यांनीं कधीं केल्याचें ऐकिवांत नाहीं. दे. गंगाधरराव यावेळीं उपस्थित असल्यामुळेंच या प्रसंगाची हकीकत ऐकावयास सापडत.

अशाच प्रकारच्या आणखीहि आठवणी सांगता येण्यासारख्या आहेत. मध्य हिंदुस्थानांतील एक महाराष्ट्रीय संस्थानिक कांहीं प्रकरणांत अडकून राज्य सोडण्याचा त्यांचेवर प्रसंग आला त्यावेळीं नवाकाळचा पाठिंबा देवाण घेवाणीनें मिळविण्याच्या उद्देशानें सदर संस्थानिकांचे दूत मुंबईस आले असतांना काकासाहेबांनीं त्यांची भेट घ्यावयाचेंहि नाकारलें. तसेंच मध्य हिंदुस्थानांतील एका संस्थानिकानें राज्यारोहण समारंभानिमित्त नवाकाळकडे कांहीं रक्कम देणगी म्हणून पाठविली असतां काकासाहेबांनीं ती उलटटपालीं परत पाठवून दिली आणि नवाकाळला जें सहाय्य करावयाचें तें बातम्यांच्या स्वरूपांत करावें असें त्यांनीं सोबतच्या पत्रांतून कळविलें

## सुखदुःखांतहि दैवताचीच सेवा

वैयक्तिक सुख किंवा दुःख आपल्या दैवताच्या आराधनेच्या आड येऊं देतां कामा नये असा काकासाहेबांचा दंडक होता आणि तो त्यांनीं वृत्तपत्रीय कामगिरी बजावतांना शेवटपर्यंत पाळला. सुखाच्या काळांतहि मनुष्यानें सुस्त न बनतां आपल्या उद्योगांत दंग राहिलें पाहिजे त्याचप्रमाणें वैयक्तिक दुःखाचा कडेलोट होतो त्यावेळींहि दुःखाच्या आहारीं जाऊन प्राप्त कर्तव्याची हेळसांड होऊं देतां कामा नये अशी काकासाहेबांची शिकवण असे. 'सुखदुःख समे कृत्वा' आपल्या दैवताची आराधना समतोल मनानें करीत रहाण्याचा नियम ते स्वतः आचरणांत आणीत असत.

याबाबतींत काकासाहेब कै. लोकमान्य टिळकांचें उदाहरण सांगत असत. लोकमान्य टिळकांचा हातातोंडाशीं आलेला थोरला मुलगा विश्वनाथ हा मृत्यु पावला. त्यानंतर दुसरेच दिवशीं लोकमान्य टिळकांनीं मनस्थिति समतोल ठेवून केसरीचा अग्रलेख लिहिला. काकासाहेबांच्या मातुश्री वारल्यानंतर काकासाहेबांनीं तिसरे दिवशीं चित्रमयजगत्साठीं नित्याप्रमाणें लेख तयार केला. वृत्तपत्रीय नित्यकर्तव्याची हेळसांड कोणत्याहि परिस्थितींत न करण्याचा त्यांचा कणखरपणा अलीकडच्या दोन प्रसंगीं विशेष दिसून आला. १९४१ सालीं काकासाहेबांचा धाकटा मुलगा बाहेरगांवीं मृत्यु पावल्याची हकीकत त्यांना पत्रानें दोन प्रहरीं कळली आणि या मृत्यूनें त्यांचें अंतःकरण पिळवटून निघालें. डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या आणि दुःखाच्या आवेगानें चालतांना हेलपाटे जात होते. त्यावेळीं दोनप्रहरीं काकासाहेबांचा ताज्या तारा वाचून घेण्याचा प्रघात होता. तशा त्या दुःखांतहि तारा वाचण्याची वेळ होतांच त्यांनीं तारा आणवल्या आणि त्या वाचवून घेतल्या. त्याचप्रमाणें आपल्या स्वतःच्या मुलाच्या मृत्यूची बातमी दुसरे दिवशींच्या नवाकाळमध्यें कशी द्यावयाची याच्याबद्दलच्याहि सूचना त्यांनीं मनाच्या तशा स्थितींत देण्यास कमी केलें नाहीं.

काकासाहेबांचा थोरला नातू गेला तो काकासाहेबांवरील शेवटचा आघात होता. १९४७ सालीं नवाकाळचा २५ वा वाढदिवस मोठ्या प्रमाणावर करण्याच्या योजना आंखल्या जात असतांनाच त्यांचा थोरला नातू मृत्युमुखीं पडला. 'मी इतकीं वर्षें जगलों तें हेंच पहाण्यासाठीं काय, माझें आयुष्य विफल झालें आहे', अशा प्रकारचे उद्गार त्यांनीं त्याप्रसंगीं हृदयाची आत्यंतिक कालवाकालव होऊन काढले. आयुष्याच्या अखेरीपर्यंत हा शेवटचा घाव भरून आला नाहीं. नातवाच्या मृत्यूच्या दुसरे दिवशीं ते नित्याप्रमाणें नवाकाळ कचेरींत आले आणि वृत्तपत्रें वगैरे पाहून ते निघाले. तोंपर्यंत

त्यांचा थोरला मुलगा कचेरींत येऊन दाखल झाला. भरल्या डोळ्यांनीं त्याच्याकडे पाहून गदगदलेल्या आवाजांत ते त्याला म्हणाले 'लाग, आतां आपल्या नेहमींच्या कामाला लाग. नेहमींचें काम करीत रहाणें हाच दुःखांत विरंगुळा असतो. या बाबतींत लोकमान्य टिळकांचें उदाहरण तूं लक्षांत ठेव. त्यांचा मुलगा गेला त्याच्या दुसऱ्या दिवशीं त्यांनीं नेहमींसारखा केसरीचा अग्रलेख लिहिला. त्यांचें स्मरण ठेव,' कोठें लोकमान्य व कोठें आम्हीं पामर, असे काढलेले उद्गार त्यांच्या कानावर पडतांच ते म्हणाले, 'होय, पण उदाहरण मोठ्यांचेंच समोर धरून त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करीत असावें. सुख दुःख समे कृत्वा हें गीतेंतील वचन कधींहि विसरूं नये.'

## दैवताच्या सेवेकरितां व्रतस्थ जीवन

काकासाहेब मुंबईला १९२१ सालीं आल्यावर प्रारंभीं लोकमान्यांत आणि नंतर नवाकाळमध्यें त्यांनीं कसलीहि कसर न ठेवतां आपलें शरीर व बुद्धि राबविली. लोकमान्यांत व नवाकाळमध्यें सुरवातीचे कांहीं महिने ते सकाळीं, संध्याकाळीं व रात्रीं असे तीनदां जात. दैनिक वृत्तपत्राच्या कामाला लागल्यापासून वर्षांतून एकदांच दिवाळीच्या तीन दिवसांच्या सुटींत ते पुण्याला जात. बाहेरगांवच्या सभा परिषदेनिमित्त जावें लागलें तरच ते कचेरींत गैरहजर असत. विश्रांतीसाठीं ते बाहेरगांवी जाऊन असे महिना पंधरा दिवस कधीं राहिले नाहींत. पुण्याहून मुंबईला आले त्यावेळीं त्यांस मधुमेहाचा आजार जडलेला होता. मुंबईची हवाहि त्यांना नवी होती. आजारीपणाचा व्यत्यय न येतां दैनिक पत्राचें काम अखंड करितां येण्यासाठीं तनदुरुस्ती राखणें जरूर होतें. घड्याळासारखा नियमित जीवनक्रम त्यांनीं ठेवलेला होता आणि जेवणखाणहि परिमित व नियमित असे. दैनंदिन जीवनांत यमनियम पाळून शरीरप्रकृतीच्या व्यत्ययाशिवाय दैनिक पत्राचें काम त्यांनीं पार पाडलें. दैनिक वृत्तपत्राच्या कामाला पहिलें स्थान त्यांनीं

दिलें होतें आणि तदनुषंगानें त्यांचें सार्वजनिक व नित्यजीवन नियमित झालेलें होतें.

## परमेश्वरी पाठिंब्यावरील हक्क

स्वतःच्या जबाबदारीनें नवाकाळ चालवीत असतांना त्यांनीं भलेबुरे दोनहि प्रकारचे दिवस पाहिले आणि दैवताची आराधना करतांना ते कधीं चलितचित्त झाले नाहींत. घरखर्चासाठीं ते ठराविक रक्कम आपल्या पत्नीच्या स्वाधीन करीत आणि त्यांत काटकसर करून घरांत थोडेंसे सोने नाणें त्यांची पत्नी शिल्लक टाकत असे. नवाकाळ चालवितांना दोनदां दररोजच्या खर्चांत काटकसर करून बाजूला टाकलेलें सोनें नाणें त्यांना काढावें लागलें. राष्ट्रमतासाठींहि पूर्वी त्यांना एकदां घरांतील दागिने असेच काढावे लागले होते. एकदां नवाकाळ आंतबट्ट्यानें चाललेला असतांना घरांतील सोनें काढून भागलें नाहीं. त्यावेळीं काकासाहेबांनीं सांगलीस कृष्णाकाठीं जमीन विकत घेऊन दत्ताची प्रतिष्ठापना केली होती. पैशाची गरज भागविण्यासाठीं त्यावेळीं त्यांनीं दत्ताच्या घुमटीसकट मळी गहाण टाकली. 'शेवटीं देव गहाण टाकला' असे उद्गार त्यावेळीं त्यांनीं काढले, त्यावरून त्यांची त्यावेळची भावना व त्याबरोबरच मनाचा कणखरपणा समजून येतो. आपत्तीच्या काळीं कसलीहि कसर न ठेवतां आपल्या सर्व आर्थिक, शारीरिक, बौद्धिक शक्ति खर्ची घालून प्रसंगाला तोंड दिलें पाहिजे त्याशिवाय परमेश्वराच्या पाठिंब्यावर आपला हक्क शाबीत होत नाहीं असें ते म्हणत असत. अर्थातच आर्थिक परिस्थिति सुधारतांच त्यांनीं दत्ताचें देऊळ मटीसकट सोडविलें, इतकेंच नव्हे तर देवळाचा ट्रस्ट करून देवळाचा नित्य खर्च व्यवस्थित चालेल इतक्या रकमेची तरतूद त्यांनीं केली.

आपत्तींत खचतां नये त्याचप्रमाणें उर्जितावस्थेंत योगक्षेम व्यवस्थित

चालण्याइतक्या पैशावर आपला हक्क ठेऊन राहिलेला पैसा दैवताच्या उत्कर्षासाठींच वापरला पाहिजे असें काकासाहेब मानत असत व त्याप्रमाणें ते वागत असत. स्वतःच्या इमारतीशिवाय वृत्तपत्राला स्थैर्य व स्वास्थ्य नाहीं असें पाहून वृत्तपत्रांत मिळालेला पैसा या कामीं त्यांनीं लावला. त्याचप्रमाणें वृत्तपत्राची कमाई ही एकट्यादुकट्याच्या परिश्रमाची नसून त्यांत काम करणाऱ्या सर्व लहान थोरांच्या कामगिरीचें तें फळ असतें असें ते मानत असल्यामुळें वृत्तपत्राला बरे दिवस येतांच त्यांत कामें करणारांपर्यंत आर्थिक सुस्थितीचें लोण पोहोंचेल अशी खबरदारी घेण्यास ते कधीं चुकले नाहींत.

## 'लोकमान्य' सुटण्याचा प्रसंग

काकासाहेबांनीं लोकमान्य पत्र सोडलें तो प्रसंग त्यांच्या अन्तेवासियांच्या नित्य स्मरणांत रहाण्यासारखाच होता. काकासाहेबांचा स्वभाव मूळचाच अबोल आणि त्यांतहि बाहेरचा संबंध असलेल्या गोष्टी घरीं ते क्वचितच बोलत असत. त्यांच्या घरच्या लोकांना बाहेरच्या गोष्टी त्यांच्या ऐवजी इतरांच्याकडूनच कळत असत. लोकमान्य कंपनीच्या ज्या डायरेक्टर बोर्डाच्या सभेंत वाद होऊन काकासाहेबांनीं लोकमान्य पत्र सोडलें ती सभा उरकून काकासाहेब मध्यरात्रींच्या सुमारास घरीं परत आले. निजतांना एक पेलाभर पाणी पिऊन निजण्याची त्यावेळची त्यांची पद्धति होती. खोलींत ते खेपा घालीत असतांनाच पाण्याचा पेला त्यांच्यापुढें करण्यांत आला. त्यांचा चेहरा लालभडक दिसत होता, आणि नजरहि चिडलेली दिसत होती. काय झालें हें विचारण्याची अर्थात्च कोणाची हिंमत नव्हती. पाणी प्याल्यावर दिवा मालवला व चकार शब्दहि न काढतां ते झोपीं गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नित्यविधि आटोपून नेहमींच्या वेळीं नित्याप्रमाणें ते बाहेर पडले. लोकमान्य कचेरींत ते गेले असाच सर्वांचा समज होता

साधारण नऊ वाजण्याच्या सुमारास त्यावेळीं लोकमान्यांत असलेले श्री. पागे आले आणि काकासाहेबांची लेखासाठीं चौकशी करूं लागले. काकासाहेब लोकमान्य कचेरीकडे गेले आहेत असें त्यांना सांगतां त्यांनीं ते लोकमान्य कचेरींत अद्याप आलेले नाहींत असें सांगितलें. इतरत्र काम असल्यामुळें ते उशीरा लोकमान्यांत जाणार असतील अशी सोयीची कल्पना घरच्या लोकांनीं करून घेतली. पण त्याचबरोबर कसलीशी शंका प्रत्येकाच्या मनांत उद्भवली, तथापि ती बोलून न दाखविण्याची खबरदारी मात्र प्रत्येकजण घेत होता. काकासाहेब नित्याप्रमाणें १०॥–११ च्या सुमारास परत आले. जरावेळानें श्री. पागे येऊन गेल्याचें त्यांना सांगण्यांत आलें. तें ऐकून किंचित् थांबून काकासाहेब म्हणाले, हं, मीं आजपासून लोकमान्य सोडला आहे.

ऐकणारे सर्व क्षणभर स्तिमित झाले. त्यांच्या पत्नीनें त्यांना विचारलें, आतां पुढें काय करावयाचें ? काकासाहेब या प्रश्नाला जसें कांहीं तयारच होते. त्यांनीं हंसल्यासारखें करून उत्तर दिलें, 'दुसरें पत्र काढावयाचें, नवाकाळ या नांवाचें' एवढें बोलून ते आपल्या खोलींत गेले आणि त्यांच्या नित्याच्या येरझाऱ्या, नित्याचा कार्यक्रम पुढें सुरू झाला. झालेला प्रकार व पुढचा निर्णय एका वाक्यांत सांगून ते मोकळे झाले.

## 'केसरी' सुटला त्यावेळीं

१९१० सालीं त्यांचा केसरी सुटला त्यावेळची हकीकतहि कांहीशी अशीच आहे. केसरी सोडल्याच्या दुसरे दिवशीं सकाळीं ते नित्याप्रमाणें बाहेर पडले आणि सुमारें अर्ध्या तासांतच वह्या आणि पेन्सिली घेऊन परत आले. ते इतक्या लवकर कसे परत आले याची चौकशी झाली, त्यावेळीं त्यांनीं घरीं सांगितलें कीं केसरीवरून मी सुटलों आहें. तोंपर्यंत केसरी सुटल्याचें घरीं कोणालाच माहीत नव्हतें. आतां पुढें ? असा प्रश्न

त्यांना त्यावेळींहि विचारण्यांत आला. तेव्हां बरोबर आणलेल्या वह्यांकडे बोट दाखवून त्यांनीं हंसून सांगितलें, 'नाटक लिहावयाचें!' त्याच दिवशी त्यांनीं मानापमान नाटकाची श्री लिहिली आणि वर्षाभरांत मानापमान नाटक रंगभूमीवर आलें.

## नवाकाळसाठीं कावाडकष्ट

काकासाहेबांन 'आयुष्याच्या शेवटच्या पायरीवर' उभे असतांना म्हणजे पन्नाशीच्या सुमारास नवाकाळ पत्र सुरू केलें. ज्या वयांत मनुष्य साधारणतः निवृत्तीचा विचार करूं लागून त्या दृष्टीची आखणी करीत असतो त्यावेळीं त्यांनीं नवाकाळ पत्राचा नवा व्यवसाय सुरू केला आणि त्या कामीं आपल्या सर्व शक्ति तरुणाच्या उत्साहानें व धडाडीनें खर्चीं घातल्या. नवाकाळच्या पूर्वतयारीच्या काळांत व नवाकाळच्या दररोजच्या कामकाजाची घडी नीट बसेपर्यंत त्यांनीं अविश्रांत मेहनत घेतली. नवाकाळसाठीं छाप खान्याची तरतूद करणें, त्यासाठीं यंत्राची व इतर व्यवस्था करणें वगैरे गोष्टी ज्या पूर्वी त्यांना कधीं कराव्या लागल्या नव्हत्या त्या त्यांनीं आयुष्याच्या उतरंडीला लागल्यावर सुरू केल्या आणि धडाडीच्या पण आडाखेबंद धोरणानें त्यांत यश मिळविलें. नवाकाळचा पहिला अंक रंगपंचमीला प्रसिद्ध झाला. त्याच्या आदल्या दिवशींची रात्र काकासाहेबांनीं श्री. वासुकाका जोशी वगैरेंच्यासह छापखान्यांत जागून काढली. यंत्राची लहर रात्रीच्यावेळीं बिघडली होती ती ताळ्यावर आल्यावर नवाकाळच्या पहिल्या अंकाची छपाई बऱ्याच उशीरा सकाळीं सुरू झाली आणि ९ वाजण्याच्या सुमारास नवाकाळचा अंक घेऊन काकासाहेब घरीं परत आले. त्यानंतर एकूण व्यवस्था नीट लागेपर्यंत शारीरिक कावाडकष्ट तर होतेच पण त्याचबरोबर मानसिक विवंचनाहि होत्या. केसरींत किंवा लोकमान्यांत ज्या साह्यक शक्ति होत्या त्या नवाकाळच्या बाबतींत प्रतिकूल ठरल्या होत्या

आणि एक प्रकारच्या संघटित विरोधाला तोंड द्यावें लागत होतें. अशा प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं धडाडीनें नवाकाळसाठीं जास्तींत जास्त काबाड-कष्ट उपसले आणि अतिश्रमाचा त्यांच्या प्रकृतीवर कायम स्वरूपाचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. वृत्तपत्रीय दैनिक व्यवसायाच्या सुमारें दहा वर्षांच्या काबाडकष्टांनीं त्यांना दहा वर्षांनीं अधिक म्हातारें केलें.

हातीं घेतलेलें काम काकासाहेब कसलीहि कसूर न ठेवतां धडाडीनें पार पाडीत, पण ती धडाडी कधींहि आंधळी नसून 'आडाखेबंद' असे. कोणतेंहि काम हातीं घेतांना त्यांतील जास्तींत जास्त वाईट अपेश कोणत्या स्वरूपाचें असेल त्याचा आडाखा ते मनाशीं बांधून ठेवत असत; आणि सर्व शक्तिनिशीं यश मिळविण्यासाठीं ते जोरानें उद्योग करीत रहात असत. चांगल्यासाठीं धडपडत असावें आणि वाईटासाठीं मनाची तयारी असावी अशी त्यांची व्यवहारनीति होती आणि तिला धरून यशापयशाचे आडाखे त्यांनीं मनाशी बांधलेले असत. या आडाख्यांची खालची मर्यादा जोंपर्यंत ओलांडली जात नसे तोंपर्यंत काकासाहेबांचें शांत स्वरूप सहसा सुटत नसे. पण आडाख्यांतील किमान अपेक्षा ओलांडली गेल्याचें कोणत्याहि बाबतींत त्यांना आढळून आलें कीं त्यांचा क्षोभ उसळून येऊन ते रुद्रस्वरूप धारण करीत. काकासाहेब क्षुब्ध होतील अशी अपेक्षा असेल त्यावेळीं त्यांचा शांतपणा अचल रहावा व इतरांची अपेक्षा नसतांना एखाद्यावेळीं भडका उडावा असे चमत्कार नवाकाळमध्यें जे अनुभवास येत त्यांच्यामागें काकासाहेबांनीं बांधलेले या प्रकारचे आडाखे असत.

## राजद्रोहाच्या खटल्याच्या वेळचा कणखरपणा

काकासाहेबांना १९२९ सालीं राजद्रोहाचा खटला होऊन एक वर्षाची शिक्षा झाली त्यावेळीं त्यांच्या कणखर धोरणाचें प्रत्यंतर आलें. खटला भरण्यांत आल्यावर जास्तींत जास्त शिक्षेचा अंदाज मनाशी बांधून त्यांनीं

त्या दृष्टीची मनाची तयारी व व्यवसायाची व्यवस्था शांतचित्तानें केली व नित्यक्रम कणखरपणानें सुरू ठेवलें. तुरुंगवासाच्या संकटाविषयीं घरांत चुकूनहि कधीं ते शब्द बोलले नाहींत. खटल्याच्या निकालाचा दिवस उजाडला आणि घरांतील मंडळींना किमानपक्षी जपून संभाळून रहा, काळजी करूं नका असें कांहीं ते सांगतील अशी अपेक्षा करण्यांत येत होती. जेवण उरकून जणूं कांहीं नित्याप्रमाणें बाहेर जावयास त्यांनीं कपडे चढविले. परत किती दिवसांनीं येतात कोण जाणें असें घरांतील प्रत्येकाला वाटत होतें, पण त्यांनीं स्वतः भावनाविवशता दाखविली नाहीं आणि बाकीच्यांनाहि तशी संधि त्यांनीं दिली नाहीं. कपडे चढवून ते घरांतून बाहेर पडूं लागले. तेवढयांत त्यांना देवाला नमस्कार करून जाण्यास सुचविण्यांत आलें. मिनिटभर ते विमनस्क झाल्यासारखे झाले, पण तेवढयांत स्वतःला सावरून सूचनेचा स्वीकार करून देवाला त्यांनीं नमस्कार केला आणि मागें वळूनहि न पहातां त्यांनीं रस्ता धरला. तो रस्ता तुरुंगाकडे जात होता.

त्यादिवशीं संध्याकाळच्या वेळीं ज्युरीला उद्देशून केलेलें न्यायमूर्तींचें भाषण संपलें आणि निर्णयाकरितां ज्यूरी सभाविन्मुख झाली. खटल्याचा निकाल काय होणार तो सर्वांनाच दिसत होता. थोडक्याच वेळांत ते 'हिज मॅजेस्टीज गव्हर्नमेंट'चे पाहुणे बनणार होते. काकासाहेबांना कोणीतरी विचारलें, मुलांना कांहीं सांगावयाचें आहे काय? काकासाहेबांचे दोनहि मुलगे जवळपास होते. भावनाविवश मनाला घातलेला कणखरपणाचा बांध फुटण्याचा तो आणखी एक प्रसंग 'मला मुलांना कांहीं एक सांगावयाचें नाहीं' असें सांगून त्यांनीं टाळला. खटल्याचा निकाल न्यायमूर्तींनीं सांगितल्यावर तो धडसा कानीं न पडल्यामुळें काय शिक्षा झाली अशा प्रश्न त्यांनीं विचारला. एक वर्ष शिक्षा व दोन हजार रुपये दंड, असें

सांगण्यांत येतांच ते म्हणाले, दंडाचा भार नवाकाळवर पडणार नाहीं. तुरुंगांत मी नाटक लिहून काढीन. तुरुंगवासाच्या काळाची त्यांनीं मनानें योजलेली ही व्यवस्था होती.

## तुरुंगांतील हालांना तपाचें रूप

त्यावेळच्या तुरुंगांत वर्गीकरण नव्हतें आणि राजकीय व सामान्य सर्वच कैदी एका मापानें मोजले जात. ज्या कणखरपणानें त्यांनीं तुरुंग पत्करला त्याच कणखरपणानें त्यांतून ते पार पडले. तुरुंगाच्या कष्टांतून पळवाट काढून त्यांतून कसें तरी पार पडावयाचें असें न मानतां तुरुंगाला त्यांनीं शिस्तीच्या शिक्षकाचें रूप दिलें. तुरुंगांत जातांना त्यांना तंबाखूची संवय होती. ती त्यांना नडेल असें वाटत होतें. पण ते तुरुंगांत गेल्यानंतर दहा पंधरा दिवसांनीं झालेल्या पहिल्याच भेटींत त्यांनीं सांगून टाकलें कीं, तंबाखूची आपणास आठवणहि होत नाहीं. प्रकृति चांगली राखण्याकरितां तुरुंगांत असतांना चाळीस पन्नास नमस्कार ते नियमानें घालीत. त्याचप्रमाणें तुरुंगाच्या आवारांत किती वेळांत किती चालणें होतें याचा हिशोब बसवून दररोज ते ठराविक मैलांचे चालणें करीत. तुरुंगांत प्रारंभीं कांहीं काळ त्यांना दूध मिळत होतें, पण नंतर तें बंद झालें. सकाळ–संध्याकाळ भाकरी आणि सकाळीं डाळ व संध्याकाळीं कसली तरी पाल्याची भाजी त्यांना मिळत असे. पण त्या अन्नाबद्दल खंत करीत न बसतां भाजी किती एकजीव होईपर्यंत शिजवलेली असते यांचेंच कुतूहलपूर्वक निरीक्षण ते करीत असत. तुरुंगांतून बाहेर पडल्यावरहि कित्येक दिवस जाहीर भाषणांतून व खाजगी बोलण्यांतून तुरुंगाच्या शिस्तीबद्दल व तेथील अन्नाच्या शिजवणूकीबद्दल ते प्रशंसेनें बोलत असत. लो. टिळक आपल्या लेखांनीं तुरुंगांत गेले त्याची निष्कृति या तुरुंगवासानें होत आहे अशा मनस्थितींत त्यांनीं तुरुंगांतील शारीरिक व मानसिक कष्टांना एकप्रकारच्या तपाचें रूप दिलें होतें.

## वृत्तपत्रें व पत्रकारांबद्दलची आपुलकी

काकासाहेब वृत्तव्यवसाय चालवीत असतांना त्या व्यवसायांत असणाऱ्यांच्या बाबतींत आपुलकीनें व उदारतेनें वागत असत. ज्याची जशी हिंमत आणि कुवत असेल त्याप्रमाणें स्वतंत्र रीतीनें स्वतःच्या पायावर त्याला उभें रहातां यावें अशा दृष्टीनेंहि कोणत्याहि कर्तबगारीच्या कार्यांत ते मदत करीत असत. तुरुंगांत जाणारांचा तनखा ते अव्याहत चालू ठेवीत. नवाकाळमध्यें कामें करणारांची कोणतीहि आवड अपुरी न रहातां आपलें वैशिष्टय समाजांत दाखविण्यास त्याला संधी मिळावी अशी सोय ते करीत आणि त्यासाठीं पैशाकडे ते कधीं पहात नसत.

नवाकाळमध्यें मध्यंतरीं निरनिराळीं मासिकें त्याचप्रमाणें साप्ताहिकें छापलीं जात असत. तथापि या सर्व वृत्तपत्रांशीं व्यवहार करतांना त्यांना काकासाहेब सांभाळूनच घेत असत. नवाकाळमध्यें छापल्या गेलेल्या नियतकालिकांत नवाकाळची सर्व बाकी चुकती केलेली अशीं नियतकालिकें विरळाच होतीं. पण बाकीकरितां त्यांनीं कोणाला कधीं अडविलें नाहीं. त्यांनीं शक्य तितकें सवलतीचेंच धोरण ठेवलें. बाक्यांच्या वसुलीकरितां काकासाहेबांनीं कधीं कोर्ट कचेऱ्यांचा आश्रय केला नाहीं. नाटक कंपन्यांच्या बाबतींत काकासाहेबांची जी संभाळून घेण्याची व्यापक दृष्टि होती ती वृत्तपत्रांच्या बाबतींतहि होती आणि नवाकाळमध्यें छापल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांच्या बाबतींत ती पूर्णपणानें व्यक्त होत असे.

बाहेरच्या वृत्तपत्रांच्या व पत्रकारांच्या बाबतींतहि ते दिलदारपणानें वागत. दुसऱ्या वृत्तपत्राला उपयोगी पडण्याची लहान मोठी संधी ते कधीं दवडत नसत त्याचप्रमाणें बाहेरचा पत्रकार कधीं कांहीं अडचणीनें त्यांच्याकडे आला तर शक्य तोंवर तो विन्मुख जात नसे. असें सहाय्य मागणाराच्या

खरेखोटेपणाचीहि चिकित्सा ते करीत नसत. खोटेपणा असला तर दोष ज्याचा त्याच्याकडे जाईल, आपणाला योग्य वाटेल ती मदत करून आपण मोकळें व्हावें असें त्यांचें धोरण असे. एकाकाळीं वृत्तपत्र व्यवसायांत प्रख्यातीला पोंहोंचलेला पण नंतर स्वतंत्र वृत्तपत्रव्यवसाय करतांना अपेशी ठरलेला एक इंग्लिश पत्रकार एकदां सकाळीं काकासाहेबांच्याकडे आला व म्हणाला, पत्राचें काम अडून राहिलें आहे, तेव्हां आतां पंचवीस रुपये द्या, आठ पंधरा दिवसांत पैसे परत आणून देतों. काकासाहेबांनीं कसलीहि चिकित्सा न करतां सुमारें पांच मिनटांत सदर इसमाला पैसे व निरोप दिला. पैसे अर्थातच पुढें परत आले नाहींतच. पण काकासाहेबांनीं ह्या गोष्टीचा कधी उच्चारहि केला नाहीं आणि तो विचारहि त्यांच्या मनांत कधीं आला नसेल.

# काकासाहेबांविषयींच्या पत्रकारांच्या आठवणी

## कै. डॉ. रा. ह. भडकमकर, पुणें

श्री. काकासाहेब यांच्याशीं माझा पहिला परिचय लोकमान्यांचे मृत्युचेवेळीं आला. श्री. दादासाहेब खापर्डे, व ते तेथें होते. पण त्यावेळचें संपूर्ण संभाषण आठवत नाहीं.

लोकमान्यांचे मृत्यूचे पूर्वी तीनचार दिवस मुबइत एक वृत्तपत्र आपल्या पक्षाचें असावें अशी वाटाघाट झाली होती व लोकमान्यांनीं अशीच इच्छा प्रदर्शित केली होती. तेव्हां त्यांचे मृत्यूनंतर त्यांचें स्मारक वृत्तपत्र रूपानेंच करायचें ठरलें व ह्याबाबत दे. गंगाधरराव देशपांडे यांनींच मुख्य पुढाकार घेतला होता.

त्यानंतर लोकमान्य काढायचें ठरलें व चुटकळ परिचय झाला. श्री. नानासाहेब देशमुख व मी त्यांना संपादक होण्याकरितां विनंति करण्याकरितां गेलों. तेव्हां धोरणाचें स्वातंत्र्य असल्याशिवाय संपादक होणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें. धोरण काँग्रेसशीं विसंगत असणार नाहीं व त्यांत संपूर्ण अधिकार अशा अटी मान्य झाल्यावर ते संपादक झाले.

त्यांचा स्वभाव फार करारी होता नोकरवर्गानें शिस्तीनें वागलें पाहिजे असा त्यांचा नेहमीं आग्रह असे. लिमये, मी व मंडळी मॅनेजिंग एजन्टस होतों. त्याबाबत तंटा झाला. धोरणाचें जमेना; पत्रव्यवस्थेबाबत उगीचच्या उगीच ढवळाढवळ करूं लागले. म्हणून खाडिलकरांच्याबरोबर मींहि काम सोडलें. त्या काळांतच त्यांचा माझा परिचय जास्त झाला.

श्री. खाडिलकरांची अग्रलेख लिहिण्याची पद्धत लोकमान्यांचे सारखीच असे. लोकमान्यांची ही पद्धत मीं पंढरपूरच्या प्रदर्शनाचे वेळीं पाहिली होती. अग्रलेख लिहायचा म्हणजे अगदीं वक्तशीर व व्यवस्थित लिहिण्याकडे कटाक्ष असे व इतर संपादक वर्गानें तसेंच वागलें पाहिजे असा त्यांचा आग्रह असे.

# श्री. ज. स. करंदीकर, केसरीचे दूरदृष्टि व संयम

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे
दा. क. ७९५

१९१२ सालीं सिडनहॅमशाहींत दडपशाहीचा कळस झाला होता. टिळकांचें नांव देखील स्मरणांतून जावें अशाविषयीं नोकरशाहीचे अट्टाहास प्रयत्न चालू होते. टिळकांचें चित्र असलेल्या नोटवह्याहि जप्त करण्यांत येत. त्यावर्षी गणपतीच्या उत्सवाच्या वेळीं टिळकांच्या नांवाच्या जयजयकारालाहि बंदी करण्यांत आली. आपल्या जयजयकारबंदीच्या हुकमाची कडक बजावणी आपण केली अशी प्रतिष्ठा मिरवण्याकरितां कोणावर तरी खटले भरण्याचा पोलिसांनीं बेत केला आणि त्यांच्या डोळ्यांत सलणारे रा. सदाशिवराव बापट व माजी समर्थ विद्यालयाचे दोन विद्यार्थी अर्जुनवाडकर व हुन्नूरकर अशा तिघांना पोलिसांनीं अटक केली आणि त्या तिघांनीं 'टिळक महाराज की जय' असें म्हटलें असा त्यांजवर आरोप ठेवून खटला भरला. मॅजिस्ट्रेट शिक्षा देणार हें भविष्य दिसतच होतें. तेव्हां त्यावेळच्या राष्ट्रीय क्लबांत असा प्रश्न निघाला कीं, या तिघांना दंड झाल्यास व्यक्तिशः ते दंड भरूं शकत नाहींत व दंड न भरल्यामुळें त्यांस तुरुंगांत जावें लागलें तर आपल्या पक्षाची ती नामुष्की आहे. तेव्हां त्यांचा दंड भरण्याकरितां आपल्या राष्ट्रीय क्लबानें फंड जमवावा.

त्यावेळीं काकासाहेब खाडिलकर म्हणाले कीं, हें काम तुम्हीं अगदीं खासगी रीतीनें करा; फंड जमविण्याकरितां यादी फिरविल्यास ती गोष्ट पोलिसांच्या कानावर जाईल आणि मग दंड जबर होण्यांत त्याचें पर्यवसान होईल. परंतु ही सावधगिरीची सूचना अंमलांत आली नाहीं. 'भ्रष्टकर्णी भिद्यते मंत्रः' हीच म्हण खरी ठरली. फंड जमवीत असल्याचा बोभाटा पोलिसांच्या कानीं जाऊन पोलिसांनीं ती गोष्ट मॅजिस्ट्रेटच्या कानावर घातली, आणि जबर दंड करण्याविषयीं मागणी केली. फंड जमला अवघा दोनशें रुपये. (त्यांत पांडुअण्णा शिराळकर यांनीं बरीच मोठी रक्कम दिली.) आणि पोलिस म्हणाले कीं, एक हजार रु. फंड जमला आहे, तेव्हां तितका दंड करावा. अखेरीस मॅजिस्ट्रेटनें सदाशिवराव बापट यांस २०० रु. आणि दोघां विद्यार्थ्यांस प्रत्येकीं १०० असे मिळून चारशें रुपये दंड ठोठावला. फंडाची रक्कम अपुरीच पडली आणि मग अर्थातच केसरी ऑफिसांतून श्री. बाबा विध्वंस यांनीं बाकीची भरती करून आरोपीस सोडवून आणले.

काकासाहेब खाडिलकर यांना कोणत्याहि गोष्ठीचा बभ्रा करण्याची चीड असे, आणि कोणतीहि गोष्ट या कानाची त्या कानाला कळूं न देतां करण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. अशा दूरदृष्टीमुळेंच आणि संयम राखल्यामुळेंच सर्व गोष्टी करून सवरून देखील ते त्या वेळच्या दडपशाहीच्या कहरांत सुरक्षित राहूं शकले आणि ज्यांना असा संयम राखतां आला नाहीं असे कित्येकजण कांहीं न करतां फुकटच्या बढाईनें फशी पडले.

## अस्साच सेनापति पोर्ट आर्थर घेऊं शकतो

१९११ सालीं जपानचा माजी बादशहा परलोकवासी झाला. त्याच्या मृत्युनंतर जपानांतील कांहीं सामुराई सरदारांनीं जपानी पद्धतीप्रमाणें हाराकिरी

सा. सं. ...१०३...

केली. त्यांत सेनापति नोगी व त्यांची पत्नी या उभयतांनींहि राजनिष्ठेनें व कर्तव्यबुद्धीनें हाराकिरी करून घेतल्याचें रोमांचकारी वृत्त प्रसिद्ध झालें. ही हाराकिरी म्हणजे शुद्ध वेडेपणा होय असें वाटलें व कित्येकांनीं त्यांची टवाळीहि केली. काकासाहेबांना इतरांचें हें मत बिलकुल मान्य नव्हतें. गणपति उत्सवांतील एका व्याख्यानांत त्यांनीं मुद्दाम हा विषय मांडून जपानांतील हाराकिरीच्या पद्धतीची मीमांसा केली आणि स्वकर्तव्यापुढें प्राणांना तुच्छ लेखण्याची संवय अंगीं जडण्याकरितां असलें प्राणदानाचे धडे घालून दिले जातात असें सांगून ते म्हणाले कीं, जो सेनापति अशी हाराकिरी करणें हें आपलें श्रेष्ठ कर्तव्य मानतो व तें बजावण्याची ज्याची सदोदित तयारी असते असा कणखर वृत्तीचा सेनापतीच पोर्ट आर्थर घेऊं शकतो. पोर्ट आर्थर काबीज करणें हें एक त्यावेळचें दिव्यच होतें. त्याकरितां से. नोगीला हजारों सैनिक अक्षरशः बळी द्यावे लागले. स्वतःच्या प्राणाचें बलिदान करण्याची ज्याची केव्हांहि तयारी असते त्याच सेनापतीला आपल्या सैनिकांना बलिदान करण्याचा आदेश देण्याचा अधिकार पोंचतो. हाराकिरी, सती, जोहार इत्यादि प्रकारामुळें मनाला असा कणखरपणा येतो आणि त्या कणखरपणाच्या योगानेंच पोर्ट आर्थरसारख्या मृत्यूच्या जबड्यांत उडी घालण्याची सेनापतीची व सैन्याची तयारी असते. 'असा कणखर मनाचा सेनापतीच पोर्ट आर्थर घेऊं शकतो' हें वाक्य उच्चारतांना काकासाहेबांच्या चेहऱ्यावरील आविर्भाव व त्यांच्या शब्दांतील आवेश अविस्मरणीय आहेत.

## अचूक राजकीय भविष्यें

युरोपांतील राजकारण अत्यंत गुंतागुंतीचें असतें. त्यांतच पुनः मुत्सद्यांचे दाखवावयाचे दांत वेगळे असल्यानें मुत्सद्यांच्या जाहीर भाषणावरून पुढें काय होणार याचें निश्चित अनुमान काढणें कठीण असतें. तरीपण काकासाहेब

यांनीं राजकारणांतले आडाखे इतके ओळखून ठेवले होते कीं, ते पुढील भविष्य अचूक सांगत असत. बाल्कन युद्धाला प्रारंभ होण्याच्या पूर्वीच एक आठवडा त्यानीं रा. दत्तोपंत लिमये ( केसरीचे सहसंपादक ) यांना बाल्कन संस्थानांचा नकाशा तयार करून ठेवण्यास सूचना दिली होती. त्या युद्धांत तुर्की राष्ट्राचा पराजय होणार हें भविष्य तर त्यांनीं वर्तविलेंच होतें, पण त्याबरोबर युरोपांत तुर्कीचा पराजय होतांच आशियांतील सगळीं मुसलमानी राष्ट्रें मृतप्राय स्थितींतून जागृतावस्थेंत येतील व त्यांचा संघ बनेल हेंहि त्यांनीं 'बाल्कन युद्धा'च्या परिणामांत नमूद करून ठेवलें होतें

साराजेव्हो येथें आस्ट्रियन राजपुत्राचा खून पडतांच युरोपांत महायुद्ध पेटणार याचें त्यांनीं भाकित सहजच केलें. आयर्लंडांत अल्स्टर वेगळा करून फूट पाडण्याची ब्रिटिशांची कारवाई सुरू झालेली पहातांच त्यांनीं हिंदुस्थानांतहि 'संस्थानें' आणि 'मुसलमान' यांचे अनेक 'आल्स्टर'. निर्माण करण्यांत येतील हें ताडलें होतें. कलकत्त्याची राजधानी दिल्लीला नेणार हें कळल्यावर प्रांतिक स्वायत्तता देण्याची ही पूर्व तयारी आहे व आपल्या स्वातंत्र्याला प्रांतिक स्वायत्ततेपासून प्रारंभ होणार तेव्हां प्रांतिक स्वायत्ततेचा पाया भक्कम करण्याच्या तयारीला आपण लागावें असें ते सांगत असत. सारांश राजकारणांत कोणाचीं पावलें कशीं पडणार हें आगाऊ ओळखून आपण आपले डावपेच तदनुरूप ठरवावे, या गोष्टीवर त्यांचा नेहमीं कटाक्ष असे व त्यांचे हे आडाखे सहसा चुकत नसत.

## सर्वगामी लेखनशैली

कृष्णाजीपंत खाडिलकरांनीं केसरींत लिहूं लागल्यावर लो. टिळकांच्या भाषेचें अनुकरण करून टिळकांची लेखनशैली आत्मसात केली, यांत त्यांचें लेखनचातुर्य व्यक्त झालेंच. पण काकासाहेबांची लेखनशैली एकांगी नसून

सर्वंगामी होती. 'काळ' पत्र सुरू झाल्यावर शिवरामपंत परांजपे यांनीं त्यांत जे अनेक नवे नवे प्रकार सुरू केले त्यांत स्फुट सूचनांची हाराप्रमाणें एकांत एक गुंफण करण्याची विशिष्ट शैली स्वीकारली होती. वस्तुतः परस्पराशीं संबंध नसलेल्या वेगवेगळ्या विषयांचा मोठ्या कुशलतेनें धागादोरा जुळवून जगुकाय सर्व स्फुट सूचना परस्परांशीं संलग्न असून एकाच विषयांची तीं अंगोपांगें आहेत असा त्यांच्या लिखाणांतून भास होई. अशी बुद्धीची करामत इतर कोणास साधावयाची नाहीं अशी प्रौढी ते मिरवीत. त्याविषयीं चर्चा होत असतां एकदां काकासाहेबांनीं शिवरामपंतांचें आव्हान स्वीकारून एका अंकांत आपण ही करामत करून दाखवूं असें सांगितलें आणि खरोखरच एका अंकांतलें सगळें लिखाण काकासाहेबांनीं शिवरामपंतांच्या धर्तीवर इतकें बेमालूम लिहिलें कीं, ह्या अंकांतील लिखाणाबद्दल, हें गुप्त माहीत नसलेल्या वाचकांकडून शिवरामपंतांची पाठ थोपटली गेली! अशा रीतीनें काकांनीं आपल्या लेखणीची चमक दाखविली.

## नाटककार हा धंदा

काकांचा स्वभाव स्वाभिमानी व स्वावलंबी असे. टिळकांच्या कारागृह-वासांत काका केसरी संस्थेंतून बाहेर पडले त्यावेळीं नाटकें रचणें हाच एक व्यवसाय आपणास साधेल असें निश्चित करून ते त्या मार्गाला लागले. कित्येकांना नाटककार म्हणवून घेण्यांत कमीपणा वाटे. पण काकांना त्यांत कमीपणा न वाटतां अभिमान वाटे. १९११ च्या मार्च महिन्यांत खानेसुमारी झाली त्यावेळीं काकांनीं आपला धंदा 'नाटककार' म्हणून स्पष्ट नमूद केला. त्यांच्या कित्येक मित्रांनीं त्यांना असें काय म्हणून नमूद केलेंत, असें विचारलें असतां काका थट्टेनें म्हणाले, "मी आतां संपादक नाहीं हें जगजाहीर झालें आहे. तेव्हां मी 'बेकार' म्हणून लिहून

देऊं कीं काय? उपजीविकेचा कोणताच धंदा नाहीं असें मीं म्हटलें, तर मला गोत्यांत घालूं पहाणारें सरकार 'उडाणटप्पू' म्हणून माझ्याकडून जामीनहि मागेल!" अर्थात्च हा केवळ विनोद होता. पण त्यांतलें खरें इंगीत हेंच कीं, 'नाटककार' हा व्यवसाय करून त्यावरच आपण स्वावलंबनानें कीर्ति व धन मिळवूं शकूं असा त्यांना आत्मविश्वास वाटूं लागला होता. याचें गमक हेंच कीं, १९१० सालच्या दडपशाहींत त्यांचें 'कीचकवध' हें नाटक जप्त झालें. त्यावेळीं कित्येकांनीं तुम्ही हायकोर्टाकडे दाद मागा, हायकोर्टांतून ही जप्ती उठेल, असा कायद्याचा सल्ला दिला. त्यावर काकासाहेब म्हणाले, "अहो, हायकोर्टांत दाद मागण्यासाठीं खेटे घालावयाचे व खर्चांत पडावयाचें, त्यापेक्षां तेवढयाच कालावधींत मी दुसरें नाटक लिहीन आणि जप्त झालेल्या नाटकाची नुकसानी भरून काढीन, इतकी मला हिम्मत आहे." यांत काकासाहेबांचा आत्मविश्वास आणि बाणेदारपणा स्पष्ट प्रतीत होतो.

# श्री. दा. वि. गोखले, केसरी,

## युद्धांतील डावपेंचांचें शिक्षण

'चित्रमयजगत्'मध्यें पहिल्या महायुद्धाच्या वेळीं श्री. कृष्णाजीपंत खाडिलकर हे दर महिन्याला युद्धासंबंधींच्या हकीकतीचे व त्यांतील डावपेचांच्या विश्लेषणाचे लेख लिहीत असत, व त्यांत पुढील महिन्यांत काय होईल याचाहि ते अंदाज देत असत. एकदां चित्रशाळेंत ते व मी असतांना एक मोठीच मौज झाली. मी त्यावेळीं चित्रमय जगत्मध्यें प्रत्येक महिन्यांत "स्वराज्याचा लढा" ही लेखमाला लिहीत होतो. त्याकारणानें चित्रशाळेंतच

ते व मी बसलों असतांना कै. वासुकाकांचे आप्त असलेल्या चित्रशाळेच्या एका व्यवस्थापक अधिकाऱ्याला वेडाची एक लहर आली व त्या लहरींत काकांना तुमचे युद्धाचे सर्व अंदाज चुकले असे तो तावातावानें सांगूं लागला.

या त्यांच्या लहरीमुळें थोडी अस्वस्थता निर्माण झाली. पण या प्रसंगानेंच श्री. कृष्णाजीपंतांनीं आपल्या लेखाच्या व भविष्याच्या उद्दिष्टाविषयीं अधिक स्पष्टीकरण केलें. त्यांनीं सांगितलें कीं, 'युद्धासंबंधाचे कांहीं अंदाज चुकतात हें खरें. आपल्याजवळ साधनसामग्री अपुरी, यामुळें असें होतें. माझा युद्धासंबंधींचें लिखाण लिहिण्याचा मुख्य उद्देश हा आहे कीं, लोकांनीं सध्यांच्या स्मशान–शांततेच्या निद्रेंतून जागें होऊन पौरुषाचा, पराक्रमाचा व युद्धाचा विचार करून त्याचें शास्त्र अवगत करून घ्यावें. मी हें लिखाण घडलेल्या गोष्टींपेक्षांहि त्यांतील डावपेचांचें शास्त्र लोकांना परिचित व्हावें, या उद्देशानें करतों. हें लोकशिक्षण आहे व त्याचा उपयोग पुढील पिढीस खास होईल.'

कृष्णाजीपंत हे युद्धाचा मजकूर कसा लिहीत असत हें ज्यांना माहीत आहे त्यांना, भला मोठा नकाशा टेबलावर पसरून ते डावपेंचांचा अभ्यास करतांना एखाद्या युद्ध–कुशल सेनापतीप्रमाणेंच मनन करीत आहेत असेंच वाटे.

## चळवळीच्या यशाची किल्ली

लो. टिळकांनीं होमरूलची चळवळ धडाक्यानें सुरू केली होती. बेळगांव जिल्ह्यांत सभा, परिषदा सारख्या होत होत्या. स्वतः लोकमान्य हे या सभांना हजर असत. बेळगांव जिल्ह्यापैकीं अथणी येथें जी परिषद भरली होती, त्या परिषदेचे अध्यक्ष श्री. कृष्णाजीपंत खाडिलकर हे होते. अध्यक्ष या नात्यानें कृष्णाजीपंत यांनीं केलेलें भाषण म्हणजे लोकमान्यांनीं घालून

दिलेल्या स्वराज्यसूत्रावरील भाष्यच होतें. लोकमान्यांनीं या भाषणाचीं, आपण भाषण करतांना स्तुति केली. खाडिलकर, गंगाधरराव, अण्णासाहेब परांजपे, टिळक, अशी एकापेक्षां एक चढी माणसें तेथें असल्यानें सभा, परिषदा कशा होत हें सांगणें नकोच.

परिषदेनंतर लोकमान्य हजर नसतांना कृष्णाजीपंत या बाबतींत असें म्हणाले कीं, 'लोकमान्यांचें मोठें चक्र चालू झालें कीं, आमची लहान सहान चाकें सहजच फिरूं लागतात, हीं चाकें एकमेकांशीं संबंधित ठेवण्यांतच लोकमान्यांचें यश आहे,' असें सांगून त्यांनीं पुढील सिद्धांत सांगितले, "कोणतीहि राजकीय चळवळ यशस्वी करावयाची असेल तर त्या चळवळीच्या कार्यकर्त्यांत अत्यंत स्नेहभाव असावा लागतो. तो तसा असला म्हणजे गुण वाढतात आणि उणेपणा भरून निघतो. आज आम्हीं मंडळी जें काम करतों, त्यांत एकप्रकारचा स्नेहभाव असल्यामुळें व सर्वांचें गुरु लोकमान्य असल्यामुळें आमची एक बाभळीची गांठ बनलेली आहे, व त्यांतच यश आहे." या त्यांच्या चिकित्सेंतच त्यांची भावना उत्तम प्रकारें दृष्टोत्पत्तीस येते.

## शिष्यत्वाचें भाग्य

वऱ्हाड प्रांतांत लोकमान्य टिळकांनीं स्वराज्य संघाच्या प्रचाराकरितां दौरा काढला होता. या दौऱ्यांत लोकमान्यांच्या बरोबर कृष्णाजीपंत व मी होतों. एकवार मौज अशी झाली कीं, एका रस्त्यावर शेतकऱ्यांचा मोठा जमाव जमला होता. त्या रस्त्यावरून पहिली मोटार गेली, त्यांत कृष्णाजीपंत होते. कृष्णाजीपंत हे लोकमान्यांसारखें पागोटें घालीत व उपरणेंहि घेत. त्यांची मोटार त्यांना लोकमान्य समजून लोकांनीं अडविली व टिळकांची मोटार येईपर्यंत व लोकांची समजूत पटेपर्यंत त्यांना थांबावें

लागलें. पुढें नंतर टिळक आले व नेहमींप्रमाणें यथास्थित स्वागत झालें.

ही गोष्ट ऐकून पुण्यांत कवडेशास्त्री यांच्या दुकानीं एकानें कृष्णाजीपंतांची थट्टा केली व त्यांना नकली लोकमान्य म्हटलें. त्यावेळीं कृष्णाजीपंतांनीं त्यास उलट उत्तर दिलें कीं, 'लोकमान्यांसारखे दिसून त्यांचा पाहुणचार घेणें हें कांहीं लहान भाग्य नाहीं. आम्हीं लोकमान्यांसारखे दिसलों किंवा त्यांचे शिष्य म्हणून आम्हांला म्हटलें तर तें आम्हीं आमचें भाग्यच समजतों. तुम्हां करण्टयांच्या कपाळीं तें नाहीं.' या उत्तरामुळें सर्वत्र चुपचाप झालें, हें सांगणें नकोच.

## इंग्रजी अग्रलेख

अमृतसर येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास कृष्णाजीपंत गेलेले नव्हते. केळकर व मी आणि संपादक वर्गांतील कांहीं मंडळी अमृतसरला लोकमान्यांच्या बरोबर होती. अमृतसरच्या अधिवेशनांत मुख्य ठरावावर पुष्कळच वाद झाला. तो येथें देण्याचें कारण नाहीं. लोकमान्यांनीं सुचविलेली उपसूचना वादाला निघून शेवटीं सभेंत समेट झाला व ठराव एकमतानें संमत झाला. केसरींत व मराठयांत यासंबंधानें काय लिहावें हें सूचित करण्याकरितां लोकमान्यांनीं पुण्यास तार केली व अमुक विशिष्ट पद्धतीनें याची चर्चा करा असें कळविलें. कृष्णाजीपंत पुण्यांत होते, व केसरीचे तर ते त्यावेळीं संपादकच होते. त्यांनीं त्याप्रमाणें केसरींत अग्रलेख लिहिला. मी त्यावेळीं मराठा पत्राचा संपादक होतों. पण मी होतों अमृतसरला. तेव्हां मराठा पत्रांतहि त्याच अनुरोधानें कृष्णाजीपंत यांनीं इंग्रजींत अग्रलेख लिहिला, व मराठयाच्या त्यावेळच्या संपादकावरील जबाबदारी कमी केली. मी पुण्यास आल्यावर चौकशी करितां मला ही गोष्ट समजली. माझ्या माहितीप्रमाणें त्या कालखंडांत इंग्रजींत लिहिलेला कृष्णाजी-

पंतांचा हाच एक लेख होता. तो सफाईदार आणि बुद्धिवादानें भरलेला व टिळकांचा दृष्टिकोन स्पष्ट करणारा होता, हें सांगण्याचें कारण नाहीं.

## कोर्ट–प्रकरण नको

कृष्णाजीपंतांनीं मुंबईस जाऊन लोकमान्य पत्राचें सम्पादकत्व पत्करावें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें ते मुंबईस गेले. याबाबतींत कांहीं कागदोपत्री करार–मदार व्हावयाचे होते. मला हा कागद नेमका कोणता हें आठवत नाहीं. पण स्पष्टपणें आठवतें कीं, सॅण्डहर्स्ट पुलाजवळील कोपऱ्यावरील बंगल्यांत डॉ. भडकमकर रहात असत, तेथें मी व गंगाधरराव देशपांडे असे दोघे गेलों होतों व या कागदासंबंधीं थोडी चर्चा झाली. त्यावेळीं कागदावर सही करण्यापूर्वी कृष्णाजीपंतांनीं गंगाधररावांना अगदीं स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, कायदेशीर कागद, करार–मदार, कोर्ट व दावे असल्या प्रकरणांत पडण्याची आपली बिलकूल इच्छा नाहीं. माझा शब्दावर विश्वास असतो. तथापि कागदावरच सही करावयाची असेल तर ती केवळ तुमच्या सांगण्यावरून मी करीन. त्याची सर्व जबाबदारी तुमच्यावर आहे, आणि जर प्रसंगच आला तर मी तसें सांगून मोकळा होईन. या कागदावर साक्षीदार म्हणून गंगाधरराव व मी सह्या केल्या होत्या. खटले–खोकले, वकील, कागद वगैरेसंबंधीं कृष्णाजीपंतांना कण्टाळा किती असे हें ते वारंवार सांगत त्याची प्रचीति यावेळीं आली.

# श्री. जयंतराव टिळक, लोकमान्यांचे नातू

## काकासाहेबांची गुरुभक्ति

१९४८ सालीं काकासाहेबांच्या भेटीचा लाभ पुण्यास त्यांच्या राहत्या घरीं मला सहजगत्या झाला. नवाकाळचे बातमीदार श्री. बाळ यांच्या-

बरोबर त्यांच्या रहात्या घरीं मी आंत पाऊल टाकलें. बाहेरच्याच सोप्यावर वार्ध्यक्यानें क्षीण झालेले काकासाहेब एका आराम खुर्चीवर बसले होते. एक पंचा, एक सद्रा व डोळ्याला जाड काचांचा चष्मा एवढाच पेहेराव त्यांच्या अंगावर होता. मी खालीं वाकून त्यांना नमस्कार केला व समोरच्या बाकावर बसलों. कांहींतरी बोलावयास पाहिजे म्हणून हळूच चाचरत म्हणालों. "शेवटी आपल्या भेटीचा इतक्या दिवसांनी योग आला...." माझें वाक्य पुरें होण्याचे आंतच काकासाहेब म्हणाले, 'छे! छे! भलतेंच काय बोलतोस, लोकमान्यांनीं हा पिंड बनविला, वाढविला, सांभाळला! लोकमान्य गेले; आम्ही राहिलों! त्यांच्या दर्शनाचा तर आतां केव्हांच योग नाहीं. तूं आलास, आनंद झाला. लोकमान्यांच्या घराण्यांतील म्हणून आम्ही तुझ्याकडे पाहतों.' काकासाहेबांच्या या उद्‌गारांनीं तर मला काय बोलावें हेंच सुचेना. टिळक–भक्ति साकार होऊन तर प्रत्यक्ष माझ्यापुढें उभी नाहीं ना! असें क्षणभर मला भासलें. काकासाहेब आपलें वार्ध्यक्य विसरले. त्यांच्या क्षीण प्रकृतीमुळें त्यांना फार बोलवत नसे. लोकमान्यांच्या दिव्य-स्मृतीनें त्यांच्यांतील वार्धक्याची क्षीणता पार पळाली. पुढें सतत अर्धा तास ते बोलत होते. 'काय सांगूं! माझ्या लेखांसाठीं लोकमान्यांनीं शिक्षा भोगली. नेपाळ प्रकरणांतून त्यांच्या पुण्याईनें मी सुटलों. तो तर इतिहास आहे. पुढें काळ बदलला. देशाच्या राजकारणांत नवे नेते आले. त्यांचें नेतृत्व मीं स्वीकारलें. पण लोकमान्य माझे गुरु होत. मी 'टिळकाईट' होतों व आहें' काकासाहेबांना पुढे बोलवेना. बोलण्यामुळें त्यांना होणारे श्रम आम्हां दोघांनाहि जाणवत होते; परंतु त्यांना मध्येंच थांबविणें आम्हां दोघांनाहि अशक्य होतें. त्यांचें बोलणें थांबतांच त्यांना वंदन करून आम्ही दोघे हळूच उठलों व बाहेर पडलों.

काकासाहेबांचें तेंच पहिलें व शेवटचें दर्शन ठरलें. काकासाहेबांची

एवढीच स्मृति माझ्याजवळ आहे. लोकमान्यांविषयींच्या त्यांच्या पूज्य भावनांना कदाचित् माझ्या ओबडधोबड लेखनशैलीने धक्का तर लागणार नाहींना असें वाटलें. तरी पण ही आठवण लिहिली केवळ काकासाहेबांच्या एकुलत्या एका स्मृतीच्या जतनासाठीं ! ( ' केसरी 'वरून )

# श्री. रा. गो. भिडे, केसरी.

कै. काकासाहेब खाडिलकर यांचा व माझा परिचय सन १९१५ सालीं मी केसरींत आल्यानंतर झाला. त्यावेळीं मी स्वराज्य संघांत काम करीत होतों. सातारा येथें एक अधिवेशन मुंबईचे श्री. जमनादास द्वारकादास यांचे अध्यक्षतेखालीं झालें. त्यावेळीं काकासाहेबांबरोबर मलाहि जावें लागलें होतें. चिंतामणराव वैद्यहि होते.

## भावनामय वर्णनाची शैली

एकदां अध्यक्ष श्री. जमनादास यांजशीं बोलत असतां सातारच्या गत वैभवाबद्दल स्वाभाविक बोलणें निघालें असतां मी सहज उद्गारलों. 'Satara, once the Capital of the Maratha Empire'. हे माझे शब्द ऐकतांच श्री. काकासाहेब यांनीं गतवैभवाचें इतकें भावनामय वर्णन केलें व प्रस्तुत स्थितीविषयीं इतकी हृदयस्पर्शी टीका केली कीं, आम्ही सर्वच त्यांच्या वाक्प्रवाहांत वाहून गेलों. इतकेंच नव्हे तर श्री. जमनादास उठले व खिडकींतून त्यांनीं अजिमताऱ्याला अक्षरशः वंदन केलें. येथील प्रत्येक अणुरेणु त्या थोर स्वातंत्र्यवीरांच्या निःश्वासानें पूनीत झाला आहे, असें गौरवून याच ठिकाणीं स्वराज्याची मुहूर्तमेढ उभारली जाणार असा विश्वास प्रकट केला. ती आशा कशी सफल झाली हें आपण पहात आहोंतच.

## आत्मीयतेचा प्रत्यय

काकासाहेबांच्या आत्मीयपणाचा या ठिकाणीं मला स्वतःला एक प्रत्यय आला. माझ्या पायांत एक भला मोठा काटा मोडला. कामाच्या गर्दीत प्रथम तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. पण पुढें मला चालतां येणें कष्टप्रद होऊं लागून पाय चांगलाच सुजला. काकासाहेबांनीं हें पाहून मला विचारलें, कां हो, लंगडतां ? मी त्यांना कांटा मोडल्याची हकीकत सांगतांच ते म्हणाले ' थांबा, आतां आपण पाय बरा करूं !' असें म्हणून त्यांनीं आपली चंची सोडली. त्यांतून नाचकण, बिब्बा इत्यादि वस्तू काढल्या ब ' हं काढा काटा व बिब्बा घाला ' असें सांगितलें. त्यांच्या चंचींत हें साहित्य पाहून मला आश्चर्य वाटलें. तें पहातांच ते म्हणाले, 'केवळ तंबाखूसाठीं मी चंची बाळगत नाहीं. आपली जुनी पद्धत अशी आहे कीं, बाहेर गांवीं जातांना अशा आवश्यक वस्तूंचा संग्रह त्यांत असला पाहिजे, म्हणजे कोठेंहि अडत नाहीं.

प्रसंगीं मला त्यांच्या लेखकाचें काम करावें लागलें. एकदां ते केसरीसाठीं अग्रलेख सांगतांना मी चुळबूळ करूं लागलों. त्यांच्या लक्षांत ही गोष्ट येतांच मीं त्यांस म्हटलें दोन मिनिटांत बाहेर जाऊन येतों. लेख अगदीं रंगांत आला होता. माझेंहि मन त्यांत रंगलें होतें, व अशा स्थितींत त्यांना विचारावें कसें अशा शंकित अवस्थेंत मी होतों. पण त्यांनींच माझी सुटका केली व विनोदानें म्हणाले, अहो, निसर्गापुढें तुम्ही काय करणार ! लवकर या.

## अखेरची भेट

ते पुण्यास उन्हाळ्यांत येऊन चित्रशाळेजवळ बापट यांचे वाडयांत ते रहात त्यावेळची हकीकत. मजबरोबर श्री. मामासाहेब

देवगिरीकर होते. इतक्या वर्षांनीं मला ते ओळखतात कीं नाहीं याची शंका वाटत होती. परंतु मी जातांच त्यांना नमस्कार केला. त्याबरोबर ओळख देऊन केसरींतील मंडळींची आस्थापूर्वक चौकशी केली. अनेक जन्या आठवणी निघाल्या. त्यांना आनंद वाटला. यानंतर त्यांनीं भिकारदास मारुतीजवळ एक घर घेतलें तेथें ते रहात. सायंकाळच्या वेळीं अंगणांत इझीचेअर टाकून त्यावर पडून रहात. त्यावेळीं असेच ते बसले असतां मी तेथें गेलों व तेच दुर्दैवानें माझें अखेरचें दर्शन ठरलें. त्यावेळीं ते केसरीच्या जुन्या फायली चाळून पहात असत. मी गेलों त्यावेळीं ते स्वस्थ पडून होते. जवळपास कोणींहि नव्हतें. मी जातांच मी अमूक असें सांगतांच त्यांना भेटीबद्दल आनंद झाला व स्मरण ठेवून तुम्हीं आलांत बरें वाटलें, असे सहजोद्गार त्यांनीं काढले. त्यांची तनू कृश झालेली पाहून मनास चांगलाच धसका बसला. प्रकृतीबद्दल सहज विचारलें असतां 'आतां आम्ही गेल्यांतच जमा. आहे तोंवर होईल तें काम करावयाचें इतकेंच,' असें ते म्हणाले. आपण आपलें आत्मचरित्र लिहिल्यास तें पाहिजे, असें मीं सुचविलें. तेव्हां, काय परमेश्वर करील तें खरें, इतकेच त्याबद्दल उद्गार त्यांनीं काढले. हें मला घडलेलें त्यांचें अखेरचें दर्शन !

## श्री. र. के. खाडिलकर, लोकमत, पुणें

१९१८ सालीं शिक्षणासाठीं मी पुण्यांत आल्यावर कै. काकासाहेब यांच्या कुटुंबीयांची व माझी ओळख झाली. पण त्यावेळीं काकासाहेबांशीं बोलण्याचें धाडस करणें अशक्यच होतें. १९२५–२६ सालीं "नवाकाळ" मध्यें मी विद्यार्थीदशेंत असतांना कांहीं वेळ काम करीत असें. त्यावेळीं बरेच वेळां काकासाहेबांनीं सांगितलेला अग्रलेख लिहून घेण्याचें काम

माझ्याकडे येई. ठाशीवपणा आणि एकाच प्रतिपाद्य मुद्याला बळकटी आणण्यासाठीं केलेला युक्तिवाद, या गोष्टींमुळें अग्रलेखाची परिमाणकारकता वाढे. भाराभर तपशील किंवा उपमा-अलंकार यांची खिचडी यांच्या अग्रलेखांतून आढळणार नाहीं.

## आपुलकी व उदार मनोवृत्ति

१९३८ सालीं योगायोगानें पुण्यांतील 'लोकमत' दैनिकाची संपादकीय जबाबदारी पत्करल्यावर ती. काकासाहेबांच्या लिखाणांतील वरील गुण अंशतः उचलण्याचा प्रयत्न माझ्याकडून कळत वा नकळत होत असे. भागिदारींत चालविलेलें "लोकमत" बंद पडल्यावर "नवभारत" दैनिकमीं स्वतःच्या जबाबदारीवर तत्काळ सुरू केलें. त्यावेळीं प्रथमच ती. काकासाहेबांना माझ्या या प्रयत्नाबद्दल केवढा आपलेपणा वाटला, याचा मला अनुभव आला. पुण्याच्या एका मुक्कामांत "नवभारत" पत्र कसें चाललें आहे, त्याला स्थैर्य येण्याची कितपत शक्यता आहे, या गोष्टींची अगदीं बारकाईनें त्यांनीं चौकशी केली. दे. गंगाधररावजी देशपांडे हे अगोदरच तेथें आलेले होते. त्यांच्या जवळ बोलतां बोलतां काकासाहेबानीं "नवभारत" च्या विषयीं बोलणें काढलें. त्या पत्राला शक्य असल्यास दे. गंगाधररावजीनीं थोडीफार आर्थिक दृष्टया मदत करावी असेंहि काकासाहेबांनीं सुचविलें. "नवभारत" पत्राचें धोरण हें कॉंग्रेसपेक्षां थोडें स्वतंत्र असतांहि काकासाहेबांनीं त्याला मदत मिळविण्याविषयीं आपला शब्द खर्च करावा ती गोष्ट त्यांच्या उदार मनोवृतीची साक्ष देणारी आहे.

ती. काकासाहेबांच्या मनांत पुण्यांत एक दैनिकपत्र असावें असें होतें. १९४७ सालीं फिरून "लोकमत" काढण्यासंबंधीं त्यांच्याशीं मीं चर्चा केली. त्यावेळीं सुद्धां साप्ताहिकापेक्षां दैनिक सुरू करणें आणि शक्य तर

सायंदैनिक सुरू करणें चांगलें, असा त्यांनीं अभिप्राय दिला होता. दैनिकाची जबाबदारी मीं घेतली तर कांहीं प्रमाणांत आर्थिक सहाय्य "नवाकाळ" कडून मिळणें शक्य आहे, असेंहि त्यांनीं सांगितलें होतें. पण माझी प्रकृति नादुरुस्त असल्यामुळें मी दैनिक पत्राची जबाबदारी घेण्यास तयार नव्हतों. "नवाकाळ" चें दैनिक भावंड त्यांच्या हयातींत पुण्याला सुरू होण्याचा योग नव्हता!

## श्री. त्र्यं. र. देवगिरीकर, चित्रमयजगत्, पुणें

काकासाहेब खाडीलकर हे चित्रमयजगत्मध्यें महायुद्धाचें मासिक समालोचन करीत असत, पण मी चित्रमयजगत्मध्यें येण्यापूर्वीची ही हकीकत आहे. चित्रमयजगत्मधील काकासाहेबांचे युद्धविषयक लेख वाचण्याकरितां वाचक आतुर असत. काकांचा लेख आल्याशिवाय अंकहि बाहेर पडत नसे. त्यावेळीं चित्रमयजगत्नें खपाची जी सीमा गांठली होती, तितकी आजवर गाठतां आली नाहीं. चित्रमयजगत्च्या स्थैर्याला, लोकप्रियतेला आणि भरभराटीला कै. खाडिलकर यांचेच युद्धविषयक लेख कारणीभूत झाले यांत शंका नाहीं.

### दोन काका

या गोष्टीची जाणीव वासुकाका जोशी व शंकरराव जोशी या दोघांनाहि होती. काकासाहेब खाडिलकर यांचा विशेष स्नेह शंकररावांवरोवर होता. ते दोघेहि समवयस्क होते. म्हणून काकासाहेब पुण्यास असतांना अगर पुण्यास आल्यावर शंकररावांचेकडे उतरत. दोघांचीं मनमोकळीं बोलणीं होत.

एके दिवशीं दुपारीं दोन वाजतां वासुकाका माडीवर आमचे कचेरींत आले आणि म्हणाले, खाडिलकरांच्या दैनिकाचें नांव 'नवाकाळ' ठरलें,

मी आतां पुढील व्यवस्थेकरतां मुंबईस जातों. 'नवाकाळ' काढण्याचें ठरल्यावर वासुकाका व शंकरराव या दोघांनीं त्या पत्राकरतां काय धडपडी केल्या हें मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. चित्रशाळेंतलें एक मशीन त्यांनीं पाठविलें, टाइप पाठविला आणि पुष्कळ दिवसपर्यंत चित्रशाळेंतून नवाकाळला लागणारे ब्लॉक्सहि दररोज पाठविले जात.

## सत्कार समर्थांचा गंभीर प्रसंग

मला एक प्रसंग चांगला आठवतो. काकासाहेब वर्ध्याची शिक्षा भोगून बाहेर आले होते. मुंबईहून ते पुण्यास आले. चित्रशाळेंत सांजसकाळ ते येत. चित्रशाळेंतल्या आम्हा लोकांच्या मनांत आलें कीं, काकांचा सत्कार करावा. तेव्हां मी हळूच ही गोष्ट शंकररावांजवळ काढली व शंकररावांनीं काकासाहेबांची संमति मिळवून देण्याचें कबूल केलें.

कै. काकासाहेबांनीं आमची विनंति मान्य केली. आम्ही चिटगुपींच्या वाडयांत कामगारांची सभा घेतली. मींच प्रास्ताविक भाषण केलें. शंकरराव, वासुकाका दोघेहि त्या सभेला हजर असावेत. कै. काकासाहेब सत्काराच्या भाषणाला उत्तर देण्याकरतां उभे राहिले. आम्हाला कल्पना नव्हती कीं, इतक्या साध्या समारंभाला इतकें गंभीर स्वरूप येईल. काकासाहेब गांहिवरले आणि त्यांच्या डोळयांतून घळघळा अश्रु वाहूं लागले. ते कृतज्ञतेचे अश्रू होते व ती कृतज्ञता वासुकाकांनीं केलेल्या अमोल सहाय्याबद्दल व्यक्त होत होती. 'मला जर वासुकाकांनीं सहाय्य केलें नसतें, तर मी नवाकाळ काढूं शकलों नसतों' असे उद्‌गार त्यांच्या तोंडून निघाले. आमचेहि वासुकाकांबद्दल बरेवाईट ग्रह होते; पण ते सर्व काकासाहेबांच्या अश्रूंनीं धुवून निघाले.

त्यावेळीं १९३० सालीं मिठाच्या सत्याग्रहाची मोहीम सुरू होती. वातावरण सारखें दुमदुमत होतें. कै. काकासाहेबांच्या त्यावेळच्या पुण्यांतील

वास्तव्याचा फायदा घेऊन आम्ही पुण्यांतून समर्थ विद्यालयाच्या पहिल्या स्वयंसेवक तुकडीला निरोप देण्याचा समारंभ कै. काकासाहेबांच्या हस्तेंच करविला. आणि त्याच्याच अगोदर थोडा वेळ त्यांच्या हस्तें पुणें नगर-वाचन मंदिरांत कै. शिवरामपंत परांजपे यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ घडवून आणला. त्यानंतर कै. काकासाहेबांच्या हस्तें पुण्यास सार्वजनिक कार्यक्रम फारसे झाले नाहींत.

## महाराष्ट्राची हक्काची जागा

कांदेवाडींतील नवाकाळ कचेरी म्हणजे आम्हां पुणेकरांची एक हक्काची उतरण्याची जागा होती. महाराष्ट्रांतले प्रमुख पुढारी नवाकाळ वाडींत उतरत. त्या सर्वांचें स्वागत अत्यंत प्रेमानें व घरगुती नात्यानें केलें जाई.

त्याहिपेक्षां दुसरा एक प्रसंग माझ्या स्मरणांतून जाणार नाहीं. काँग्रेसनें प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुका लढविण्याचें प्रथमच ठरविलें. श्री. शंकरराव देव, श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. जेधे, श्री. अच्युतराव पटवर्धन, श्री. रमणिकलाल मेहता व मी असे सहा सभासद होतों. उमेदवार निवडणुकीची बैठक आम्हीं नवाकाळ कचेरींतच घेतली. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आमच्या बैठकी चालत. ह्या सर्व वाटाघाटी चालू असतां खालीं तळ पडावेत त्याप्रमाणें जिल्ह्यांतील उमेदवार, त्यांचे पाठीराखे, काँग्रेस कमिटयांचे अधिकारी तेथें बसून रहात. निवडणूक मंडळालाहि त्यांची जरुरी असे. त्यावेळीं दे. भ. काकासाहेब खाडिलकरांना आमची इतकी वर्दळ सोसावी लागली कीं, आमचा जीव कोंडून जाई. खाडिलकरांनीं तक्रार कधीं केली नाहीं. उलट आलेल्या मंडळींच्या रहाण्याजेवणाची घरा-प्रमाणें व्यवस्था टेवली. आपलें जें आहे तें देशाचें आहे अशी एक उदार बुद्धि त्यांच्यांत होती व त्याचें प्रत्यंतर वारंवार येई.

## अनासक्त वृत्ति

वासुकाका जोशी यांचें वय जसजसें होत गेलें तसतसे लोक त्यांना म्हणत, काका, तुम्ही मृत्युपत्र करा. १९२० पासून तर सरकारी दडपशाहीचा नांगर केव्हां फिरेल याचा नेम नव्हता. त्यामुळेंहि या मृत्युपत्राची निकड लावण्यांत येई. पण काका म्हणत 'पेशवाई गेली तरी आम्ही हळहळलों नाहीं, माझी चित्रशाळा गेली तर त्याची हळहळ कशाला!' वासुकाकांप्रमाणेंच काकासाहेबांची अनासक्त वृत्ति होती. दैनिक चालविणें आणि तें मुंबईस चालविणें अत्यंत कठीण. अशा स्थितींत चढउताराचे कांहीं प्रसंग नवाकाळवर येत. पण त्यावेळीं काकासाहेब म्हणत "मी पुण्याहून येतांना काय बरोबर आणलें होतें? तेव्हां गेल्याचें मला दुःख नाहीं व राहिल्याचें सुख नाहीं. आपण काम करीत रहावें म्हणजे झालें." काकासाहेबांना अनेकांनीं मदतीचीं आश्वासनें दिलीं, सहाय्य करण्याचे कबूल केलें. पण त्यांनीं अखेरपर्यंत कोणाचें सहाय्य न घेतां तत्त्वनिष्ठेनें आपलें पत्र चालविलें. अशीं उदाहरणें आजच्या काळांत सांपडणें कठीण.

वासूकाका व शंकरराव यांच्या मृत्युनंतर चित्रशाळेचे व खाडिलकर कुटुंबाचे संबंध पूर्ववत् कायम राहिले. पुण्यास आपल्याला घर असावें असें त्यांना फार दिवसांपासून वाटे आणि ती त्यांची इच्छा मृत्युपूर्वी दोनतीन वर्षें पुरी झाली होती. पण त्यापूर्वी जागेच्या दुर्मिळतेमुळें कोठें रहावयाचें हा प्रश्नच असे. तथापि चित्रशाळेनें व शंकररावांच्या मंडळीनीं आपल्याकडून करतां येईल तितकी त्यांची पुण्यांत एक वर्षी सोय केली व ती त्यांनाहि पसंत पडली. चित्रशाळेचे व खाडिलकरांचे संबंध त्यांचा थोरला मुलगा चित्रशाळेचे ट्रस्टी झाल्यामुळें अधिकच दृढावले आहेत.

वासुकाकांनीं विलायतेस जातांना एक मृत्युपत्र केलें होतें. त्या मृत्युपत्रांत

त्यांनीं काकासाहेबांना एक ट्रस्टी म्हणून नेमलें होतें, एवढेंच नव्हे तर खाडिलकरांच्या चिरंजीवांच्या शिक्षणाचा खर्च चित्रशाळेनें करावा असें म्हटलें होतें. श्री. अप्पांवर व कै. विनायकावर वासुकाकांचें अपत्यनिर्विशेष प्रेम होतें, तेच प्रेमाचे धागेदोरे लक्षांत घेऊन श्री. य कृ. खाडिलकरांना आम्ही आमच्यांतले एक मानलें आहे.

## ' चांगलें आहे '

मीं वासुकाकांचे चरित्र लिहिलें व तें चरित्र कै. काकासाहेबांनीं आणि श्री गंगाधरराव देशपांडे यांनीं वाचावे अशी मला तळमळ लागली होती. त्यापैकीं, श्री. गंगाधररावनीं तें चरित्र वाचून आपला संतोषाचा अभिप्राय मला लिहून कळविला. त्याबद्दल मला कृतकृत्यतेचें समाधान लाभलें. पण काकासाहेबांच्या अभिप्रायाचें काय ? विशेषतः त्यांतील नेपाळ प्रकरणासंबंधी बरोबर—चूक जाणून घेण्याची मला इच्छा होती. सुदैवानें काकासाहेबांनीं त्यावर पसंतीचा अभिप्राय दिला आणि सबंध चरित्रहि ' चांगलें आहे ' असे दोनच शब्द उच्चारून माझ्या श्रमाचें सार्थक केलें, याबद्दल मला आनंद वाटतो.

## श्री. गो. बा. महाशब्दे, नवाकाळ,

दे. काकासाहेब खाडिलकर यांनीं ' लोकमान्य ' पत्राचें संपादकत्व सोडून ' नवाकाळ ' पत्र सुरू केल्यानंतर एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच मी ' नवाकाळ 'मध्यें कामाला लागलों. त्यावेळीं माझें वय जेमतेम २१ वर्षांचें होतें. हुबळी येथें अमेरिकेंतून नुकतेच परत आलेले डॉ. एन. एस. हर्डीकर यांच्या नेतृत्वाखालीं आम्हीं कांहीं लोकांनीं ' वार्ताप्रसारक संघ ' नांवाची संस्था काढली होती. आमच्या संघाकडून येणाऱ्या बातम्यांना दे. काकासाहेबांच्या पत्रांत प्रामुख्यानें व हमखास जागा मिळत होती.

## दिल्ली काँग्रेसच्या कँपमध्यें

१९२३ सालीं दिल्ली येथें मुंबई, महाराष्ट्र, कर्नाटक वगैरे भागांतून आलेल्या काँग्रेसच्या प्रतिनिधींची स्टेशनजवळच्या एका धर्मशाळेंतील प्रशस्त हॉलमध्यें उतरण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. दे. गंगाधरराव देशपांडे वगैरे आमच्या पुढाऱ्यांच्या शेजारींच दे. काकासाहेबांचाहि बिछाना टाकलेला होता. दे. काकासाहेबांना मी प्रथम त्या ठिकाणीं पाहिलें अधिवेशनाहून परत मुक्कामावर आल्यानंतर पुढाऱ्यांमध्यें विशेषतः रात्रींच्या वेळीं कडाक्याचा वादविवाद होत असे. हॉलमध्यें बिछान्यांच्या दोन रांगांच्यामध्यें असलेल्या मोकळ्या जागेंत काकासाहेबांच्या फेऱ्या चालूच असावयाच्या, पण चाललेल्या चर्चेकडे त्यांचें पूर्ण लक्ष असावयाचें. मध्येंच उभे राहून वादांत एखादा मुद्दा दोन चार वाक्यांत ते पुढें आणीत आणि पुनः आपल्या फेऱ्या चालू ठेवीत.

काँग्रेसचें अधिवेशन संपण्याच्या अगोदरच काकासाहेब मुंबईला परत जाण्यासाठीं निघाले तेव्हां त्यांना स्टेशनवर पोहोंचविण्याची कामगिरी गंगाधररावांनीं माझ्याकडे सांगितली. काकासाहेबांचा एक बिछाना आणि बरोबर एक लहानशी ट्रंक होती. ती ट्रंक उघडण्यासाठीं त्यांनीं खिशांत किल्ली शोधली, पण किल्ली त्यांना कोठेंहि मिळेना. वाटेंत थोडीं पेशावर-कडचीं सुन्दर द्राक्षें त्यांना घेऊन देऊन स्टेशनवर गाडींत बसविलें. या सुमारें तासाभराच्या सहवासांत त्यांच्याबरोबर माझें फारसें बोलणें झाल्याचें मला आठवत नाहीं. पुढें मी 'नवाकाळ'मध्यें आल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं मला समजलें कीं, ट्रंकेमध्यें काकासाहेबांना मुंबईहून निघतांना दिलेला फराळाचा डबा होता आणि वाटेंतच कोठेंतरी किल्ली हरवल्यामुळें तो फराळाचा डबा जशाचा तसाच मुंबईला परत आला होता.

## 'नवाकाळचा झालो'

दिल्ली काँग्रेसनंतर चार पांच महिन्यांनीं डॉ. हर्डीकर मला बरोबर घेऊन काकासाहेबांना भेटण्यासाठीं त्यांच्या घरीं गेले. तेथें मी 'वार्ताप्रसारक संघा'चा चिटणीस म्हणून काम करीत असल्याची माहिती त्यांनीं काकासाहेबांना सांगितली आणि 'या मुलाला तुम्हीं नवाकाळमध्यें कामाला घ्याल काय?' म्हणून विचारलें. त्यावर काकासाहेबांनीं क्षणाचाहि विचार केल्याचें मला आठवत नाहीं. त्यांनीं ताबडतोब 'उद्यांपासूनच या' असें सांगितलें आणि तेव्हांपासून मी 'नवाकाळ'चा झालों.

मी 'नवाकाळ'मध्यें नोकरी करीत होतों तरी मी एक काँग्रेस कार्यकर्ता होतों, आणि काँग्रेसचें कार्य करण्याच्या बाबतींत मला काकासाहेबांकडून कधींहि अडथळा आला नाहीं. पुढें पुढें तर त्यांच्याकडून उत्तेजनच मिळत गेलें. मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीचे ते कांहीं वर्षें उपाध्यक्ष होते व अध्यक्ष सौ. सरोजिनी नायडू या बऱ्याच वेळा गैरहजर असतांना अध्यक्षस्थान काकासाहेबांनाच स्वीकारावें लागत असे. आजच्या काँग्रेस हाउसमधील टिळक मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मधल्या इमारतींत तळमजल्याच्या हॉलमध्यें या बैठकी भरत असत. आंत पसरलेल्या चटयांवर सभासदांची बैठक असे. तें दृश्य अद्यापि मला आठवतें. कमिटीचें काम चालविण्याच्या त्यांच्या पद्धतींत व्यवस्थितपणा आणि नियमितपणा चांगलाच दिसून येत असे. शहरांतील काँग्रेसच्या हालचालींच्या बातम्या आपल्या वृत्तपत्रांत चुकतां कामा नये, याबद्दलहि त्यांचा कटाक्ष असे.

## संपादकीय धोरण

काकासाहेबांची अग्रलेख लिहिण्याची वेळ ठरलेली होती व त्यावेळीं अग्रलेख लिहून घेण्यासाठीं आमच्यापैकीं कोणाला तरी जावें लागत असे. त्यांत मधून मधून माझी पाळी येत होती. त्यांची अग्रलेख लिहिण्याची पद्धति

मला मोठी ठसठशीत आणि आकर्षक वाटली. ठराविक दोन अडीच कॉलमची मर्यादा संभाळून तेवढ्यांत आपले सर्व विचार ठसठशीतपणें बसविण्याचें तंत्र काकासाहेबांनीं इतकें आत्मसात् केलें होतें कीं, चुकूनहि या मर्यादेचें त्यांच्याकडून कधीं उल्लंघन होत नसे. भाषा ठसठशीत आणि विचार स्पष्ट त्यामुळें लेख लिहून घेणाऱ्याला आपण विशिष्ट विषयावर अधिकारी व्यक्तीचें व्याख्यानच जणूं ऐकत आहों असें वाटत असे. लॉर्ड कर्झन यांच्या मृत्यूची बातमी वाचल्यानंतर 'एका घमेंडखोराचा मृत्यु' म्हणून त्यांनीं जो अग्रलेख सांगितला तो अद्यापहि मला त्यांच्या जाज्ज्वल्य विचारांचा पुरावा म्हणून आठवतो.

काकासाहेबांच्या 'नवाकाळ'मधील अग्रलेखांमध्यें राजकीय विषयाखेरीज दुसऱ्या विषयांना सहसा स्थान मिळत नसे. पण आपल्या पत्रांत बातम्या मात्र सर्व प्रकारच्या आल्या पाहिजेत याबद्दल त्यांचा आग्रह असे. संध्याकाळचीं वृत्तपत्रें वाचून त्यांतील परदेशी बातम्यांचें महत्त्व ओळखून ते त्या बातम्या आपल्या पत्रांत याव्या म्हणून खुणा करून ठेवण्यास कधीं चुकत नसत. त्याबरोबर स्थानिक महत्त्वाच्या, कोर्टांतील खटल्याच्या अगर कांहीं गमतीदार हकीकतीहि त्यांच्या नजरेंतून कधीं सुटत नसत.

मुंबईत बावला खुनाचा खटला बराच गाजला. या खटल्याच्या खालच्या कोर्टांत व हायकोर्टांत झालेल्या कामाचें रिपोर्टिंग करण्याची कामगिरी मुख्यतः माझ्याकडे व माझे दुसरे सहकारी एस. व्ही. देशपांडे यांचेकडे आली होती. खटला आपल्या पत्रांत शक्य तितका सविस्तर यावा याविषयीं काकासाहेब उत्सुक असत. हायकोर्टांत खटला शेवटच्या दिवशीं संध्याकाळीं बराच वेळ चालला. योगायोग असा कीं, त्याच दिवशीं संध्याकाळीं आमच्या 'नवाकाळ' क्लबमध्यें सर्वांचा एकत्र जेवणाचा बेत होता व

काकासाहेब आमच्या पंक्तीला येणार होते. कोर्टांत अखेरचें काम संपून ज्यूरी निर्णय देण्यासाठीं गेली असल्यामुळें मी व देशपांडे कोर्टांतच अडकून राहिलों होतों. शेवटीं खटल्याचा निकाल ऐकून व कोर्टांतील गर्दी कमी झाल्यावर आणि सर्व आरोपींना तुरुंगांत नेलेले पाहून परत येण्याला आम्हाला बराच उशीर झाला. आम्ही येऊन पहातों तों काका-साहेब वगैरे सर्व मंडळी आमच्यासाठीं खोळंबून राहिली होती. खटल्याचा निकाल वगैरे हकीकत ऐकण्याची काकासाहेबांची उत्सुकता पाहून आम्हाला आश्चर्य वाटलें. इतकेंच नव्हे तर बराच उशीरापर्यंत कचेरींत राहून काकासाहेबांनीं बातमी कशी द्यावयाची, किती व कोणते मथळे द्यावयाचे, कोणत्या पानावर बातमी छापावयाची या बाबतींत बारीक सारीक सूचनाहि दिल्या.

## सुळावरची पोळी

रोज सकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक वृत्तपत्रांतील संपादकाची रात्रपाळी म्हणजे एक सुळावरची पोळी असते. मी 'नवाकाळ' मध्यें काम करूं लागल्यानंतर थोड्याच महिन्यांनीं रात्रपाळीचें काम माझ्याकडे आलें. मी एक दिवस रात्रीं १२ वाजेपर्यंत काम केलें. बारा वाजतां हातीं आलेल्या पुडक्यांतील तारांवर ओझरती नजर टाकली आणि आपलें काम पुरें केल्याचें समाधान मानून घरीं जाऊन झोपलों. पण उजडण्यापूर्वीच आमचे एजंट श्री. विठ्ठलराव बागवे यांनीं येऊन मला झोपेंतून जागें केलें आणि इतर वर्तमानपत्रांचे सकाळचे अंक माझ्या डोळ्यांपुढें धरले. त्या सर्वांत देशबंधु दास यांच्या निधनाची बातमी अगदीं ठळकपणें काळ्या ठसठशीत बॉर्डर-मध्यें प्रसिद्ध झाली होती. ती बातमी नजरेस पडतांच माझी झोप पार उडून गेली आणि भीतीनें अंगाला घाम सुटला. कारण, 'नवाकाळ' मध्यें ती बातमी नव्हती. मी धांवतच कचेरींत गेलों, आणि रात्रीं बारा वाजतां

पाहून ठेवलेलें तारांचें पुडकें कापऱ्या हातानें पुनः चाळलें. शेवटच्या कागदाच्या शेवटीं बारीक अक्षरांत 'O. R Das is dead' असे तीन शब्द मला दिसले. माझ्या नजरेंतून ती बातमी सुटली होती आणि बाजारांत आलेल्या 'नवाकाळ' मध्यें ती बातमी नव्हती.

माझ्या गुन्ह्याची मला स्पष्ट जाणीव झाली आणि खिन्न मनानें मी परत येतों तोंच काकासाहेबांकडून बोलावणें आलें. मी गेलों त्यावेळीं ते संतापानें लाल झाले होते आणि मला पाहिल्याबरोबर खुलासा वगैरे सुद्धां कांहीं न विचारतां त्यांनीं 'कचेरींतून तुम्हाला पाहिजे तेवढे पैसे घेऊन जा आणि उद्यांपासून कामावर येऊं नका' असें सांगितलें. वृत्तपत्र–व्यवसायाशीं या प्रसंगानें माझा अजिबात संबंध तुटला, या कामाला मी नालायक ठरलों असें मला वाटलें. तो सर्व दिवस डोळ्यांपुढें अंधार होता. पण संध्याकाळीं काकासाहेब नेहमींप्रमाणें कचेरींत गेले व त्यांनीं मला दुसरे दिवसापासून कामावर येण्याचा निरोप पाठविला. मी पुनः भेटलों तेव्हां सकाळच्या त्यांच्या चेहऱ्यावरील संतापाचा मागमूसहि नव्हता. माझ्याकडून घडलेला एक मोठा व अक्षम्य प्रमादसुद्धां विसरून जाण्याइतका मोठेपणा त्यांनीं त्यावेळीं दाखविला व म्हणूनच मी आजपर्यंत या व्यवसायांत राहूं शकलों.

## सोलापूरचा अल्लुनुकसानीचा खटला

'नवाकाळ' वरील बदनामीच्या फिर्यादीचा प्रसंग मी नवाकाळमध्यें आल्यानंतरचाच आहे. सोलापूर येथें हिंदु–मुसलमानांत तेढीचें वातावरण पैलावलें असतांना एके दिवशीं रात्रीं आमच्या सोलापूर येथील बातमी-दाराकडून त्यावेळीं तेथें डी. एस. पी. असलेले मि. डंकन मॅक्डोनाल्ड यांच्याविरुद्ध कांहीं आक्षेपार्ह मजकुराची तार आली. त्या दिवशीं रात्रपाळीला मीच असल्यामुळें त्या तारेची वासलात लावावयाची जबाबदारी माझी

होती. तारेंतील मजकूर अर्थात् खळबळ उडविणारा होता आणि इतकी खळबळ उडविणारी बातमी आपल्या पत्रांत जरूर दिली पाहिजे असें मला वाटलें. मजकूर खळबळीचा म्हणून तो छापण्याचा मोह झाल्यामुळें व बातमी पाठविणारे बातमीदार जबाबदार आहेत या कल्पनेनें मीं ती बातमी 'नवाकाळ'मध्यें जशीच्या तशी देण्याचें धाडस केलें. 'When in doubt, No' असा वृत्तपत्रीय व्यवसायांतील एक निरपवाद दंडक आहे. सहसंपादकांना ती तार दाखवावी असा जो विचार माझ्या डोक्यांत आला. मीं तार बाजूला ठेवून दिली असती तर वरील दंडक मीं योग्य रीतीनें पाळला असें झालें असतें. काकासाहेबांकडे अंक गेला आणि त्यांतील ती बातमी त्यांनीं वाचली. त्यांनीं कचेरींत मनुष्य पाठवून ज्या मूळ तारेचें तें भाषांतर होतें ती तार मागवून घेऊन वाचून पाहिली. अर्थात् मूळ तारेचें तें शब्दशः भाषांतर होतें एवढें लक्षांत आल्यानंतर त्यांनीं त्याबद्दल माझ्याकडे कोणतीहि चौकशी केली नाहीं. पण ह्या बातमीबद्दल फिर्याद होईल असें त्यांनीं कचेरींत बोलून दाखविलें व त्याप्रमाणें थोड्याच दिवसांनीं फिर्याद झाली. कांहीं लोकांनीं काकासाहेबांना या बाबतींत माफी मागून मोकळे होण्याचाहि सल्ला दिला होता. त्यांनीं खटला लढविण्याचें ठरविलें. कित्येक दिवसपर्यंत फिर्याद चालून शेवटीं त्यांना त्यांत जबर दंड झाला व कोर्टखर्चाचाहि बराच भुर्दंड बसला. एखादा राजकीय खटला लढवावा इतक्या हिरीरीनें ते ही फिर्याद लढले.

खटला चालू असतांना श्री. तात्यासाहेब केळकर काकासाहेबांना भेटण्यासाठीं आले होते. त्यावेळीं या खटल्यासंबंधीं त्यांचा जो हास्यविनोद चालला होता तो अद्यापहि आम्हाला चांगला आठवतो. खटल्याचा निकाल काय होणार हें माहीत असूनहि त्यांनीं तो शेवटपर्यंत लढविला आणि हजारों रुपयांचा खर्च व मानसिक यातना कर्तव्य म्हणून त्यांनीं सहन केल्या.

खटला चालू असतांना व संपल्यानंतरहि कित्येक दिवसपर्यंत या संकटाला पर्यायानें मीच कारण झाल्याबद्दल माझ्या मनाला मात्र सारख्या वेदना होत होत्या. पण यांत माझी कांहीं चूक झाली आहे आणि माझ्यामुळें आपल्यावर ही आपत्ति आली आहे, याची जाणीव त्यांनीं मला शब्दानें अगर कृतीनें बिलकूल होऊं दिली नाहीं. त्यांतच मला त्यांच्या खंबीर पण उदार मनोवृत्तीचें दुसरें प्रत्यंतर मिळालें.

## राजद्रोहाच्या खटल्याचा अंक

काकासाहेबांच्या संपादकीय जीवनांतील सरता स्मरणीय प्रसंग म्हणजे १९२९ सालीं त्यांच्यावर झालेला राजद्रोहाचा खटला. याहि प्रकरणांत माझा अप्रत्यक्ष पण थोडा संबंध आलाच. 'मुंबईंतील दंगे व बोल्शेव्हिक बिल' हा लेख ज्या अंकांत प्रसिद्ध झाला त्या अंकाचेंहि रात्रपाळीचें काम माझ्याकडे होतें.

पहाटे तीन वाजण्याच्या सुमाराला अंकाचीं सर्व पानें छापण्यासाठीं तयार झालीं आणि मीहि काम आटोपून घरीं जाण्याच्या तयारींत होतों. इतक्यांत अग्रलेख व संपाची इतर हकीकत असलेल्या पानाचा फॉर्म मशीनवर जात असतां कांहीं तरी अपघात होऊन तो फॉर्म कोसळला, झालें. जवळ जवळ पांच सहा तासांचें काम अशा रीतीनें विस्कळीत झालें. अंक छापण्याची वेळ जवळ येत चालली होती. काकासाहेबांना ही हकीकत कळविण्यांत आली तेव्हां ते स्वतः कचेरींत आले. घरीं जाण्यास निघालेले कंपॉझिटर पुन्हां कामाला लागले आणि ज्या कामाला निदान तीन चार तास लागले असते, तें काम त्यांनीं तासादीड तासांत आटोपलें आणि अवघ्या अर्ध्या तासाच्या उशीरानें अंक छापण्याला सुरवात झाली. स्वतः काकासाहेब हा सर्व वेळ एखाद्या तरुणाच्या उत्साहानें सर्व कामाकडे स्वतः लक्ष देत होते.

दोन दिवसांनंतर डेप्युटी पोलिस कमिशनर खा. ब. पेटीगारा हे काकासाहेबांना राजद्रोहाच्या आरोपावरून पकडण्यासाठीं आले तेव्हां सरकारनें

आक्षेपार्ह मानलेल्या मजकुराचा तो हाच अंक निघाला. त्याचा पंचनामा करतांना, अग्रलेखाचें प्रूफ पाहिल्याच्या माझ्या हाताच्या दुरुस्त्या प्रुफावर होत्या म्हणून खा. ब. पेटिगारा यांनीं माझीहि सही घेतली.

राजद्रोहाच्या खटल्यांत झालेली शिक्षा भोगून काकासाहेब साबरमती जेलमधून नऊ महिने व कांहीं दिवसांनंतर सुटले. तो दिवस माझ्या रात्रपाळीचा होता. तुरुंगवासाच्या कालावधीचा त्यांच्या सुटकेचा मजकूर लिहितांना मीं उल्लेख केला होता. दुसरे दिवशीं ते मुंबईला आल्यानंतर त्यांचें स्वागत करतांना मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीतर्फे काँग्रेस हाउसमध्यें जाहीर सभा भरली असतांना केलेल्या भाषणांत त्यांनीं या नऊ महिन्यांच्या कालावधीचा उल्लेख करून एक सुंदर रूपक रचलें. नऊ महिन्यांच्या अवधीनंतर आपला पुनर्जन्मच झाला आहे असें सांगून त्यांनीं पुढें लवकरच सुरू होणार असलेल्या व्यापक चळवळीचा उल्लेख करून स्फूर्तिदायक संदेश दिला.

## शेवटची रात्र

काकासाहेब तुरुंगांत गेल्यानंतर त्यांचे चिरंजीव संपादक झाले. काकासाहेब तुरुंगांतून परत आल्यानंतर त्यांनीं संपादकीय कामगिरी आपल्याकडे घेतली नाहीं. तथापि संपादकांसह आमच्या सर्वांच्या दृष्टीनें खरे संपादक काकासाहेब हेच होते. महत्त्वाच्या प्रसंगीं धोरणाविषयीं सूचना देणें, दररोजचे अग्रलेख वाचून घेणें वगैरे कामें शेवटपर्यंत त्यांनीं चालूच ठेवलीं. अगदीं शेवटच्या दिवशीं सुद्धां रात्रीं ११ बाजेपर्यंत त्यांचा हा जीवनक्रम अखंड चालू होता. रात्रीं ११ वाजतां मी कचेरींत रात्रीचें काम करीत असतांना काकासाहेबांच्या प्रकृतीविषयीं त्यांच्या सूनबाई डॉ. गोखले यांना टेलिफोन करण्यासाठीं म्हणून खालच्या मजल्यावर

कचेरींत आल्या. त्यानीं डॉक्टरांना काय टेलिफोन केला तेंहि मीं ऐकलें. पण त्यावरून पुढें एक तासाच्या आंतच काय प्रसंग येणार आहे याची कल्पना आली नाहीं. नेहमींचा कांहीं तरी साधा आजार असावा असेंच वाटलें. थोड्या वेळानें वरच्या मजल्यावरून मला बोलावणें आलें, तेव्हांहि पुढच्या प्रसंगाची कल्पना नसतांना मीं काकासाहेबांच्या खोलींत पाऊल टाकलें. काकासाहेबांचें डोकें त्यांच्या चिरंजीवांच्या मांडीवर होतें. समोर बसलेल्या डॉक्टरांच्या हातांत त्यांची नाडी होती आणि काकासाहेबांची ती झुंजार प्राणज्योति त्यांच्या शरीराचा अखेरचा निरोप घेऊन चालली होती. माझे दोन्ही हात नकळत जोडले गेले आणि तेथील लोकांच्या डोळ्यांतील अश्रूंना माझ्या अश्रूंनीं साथ दिली.

## सहृदयतेचा पदोपदीं प्रत्यय

१९३० सालीं चळवळ सुरू झाल्यापासून आतांपर्यंत मला एकंदर चार तेळां तुरुंगांत जाण्याचे प्रसंग आले. माझ्याप्रमाणेंच 'नवाकाळ'मधील दुसरे सहकारी श्री. भा. रा. धुरंधर, श्री. प्र. ह. खाडिलकर, श्री. राऊत, श्री. चिं. ना. महाजन यांनाहि तुरुंगवास घडला. पण आमच्या तुरुंगवासापेक्षां काकासाहेबांचा तुरुंगवास किती तरी खडतर होता. कारण, १९३० सालानंतर राजकीय कैद्यांची जी वर्गवारी झाली तिचा फायदा काकासाहेबांना मिळालेला नव्हता. प्रत्येक खेपेला तुरुंगांतून आल्यानंतर तुरुंगांत कसे दिवस गेले वगैरेबद्दल ते आस्थेवाईकपणें चौकशी करीत असत. त्यांच्या या सहृदयतेमुळें आम्हाला तुरुंगवास सुद्धां हक्काच्या पगारी रजेसारखा विश्रांतीचा वाटला. काकासाहेबांच्या या सहृदयतेचा मला पदोपदीं प्रत्यय आल्यामुळेंच 'नवाकाळ' हा एक कारखाना आणि काकासाहेब हे आमचे मालक या भावनेऐवजीं 'नवाकाळ' हें एक कुटुंब ही भावना माझ्या मनांत कायम राहिली आहे. त्यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचें

अभिनंदन करण्याकरितां मुंबईचे मराठी पत्रकार त्यांच्याकडे गेल्यावेळीं, संघाचा अध्यक्ष या नात्यानें काकासाहेबांसमोर उभा राहून औपचारिक भाषण करण्याचा पहिलाच प्रसंग माझ्यावर आला. त्यावेळीं ही भावना स्वाभाविकपणेंच माझ्या तोंडून व्यक्त झाली आणि आजहि माझी तीच भावना कायम आहे.

## श्री. त्र्यं. वि पर्वते, मुंबई.

खाडिलकरांची व माझी दाट ओळख अशी केव्हांच झाली नाहीं. समोरासमोर बसून त्यांचें व माझें कांहीं संभाषण फक्त एकदांच झालें.

### इषारा खरा ठरला

कोणत्या शर्तीवर 'इंदुप्रकाश' 'लोकमान्यांत' सामील केला जावा याचा मसुदा यंदे शेटजी डेमोक्रॅटिक पब्लिशिंग कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरांचे म्हणजे लोटवालाशेटजींचे मुनीम म्हणून ठरवीत होते. संपादक व लोटवाला यांनीं घातलेल्या शर्तींची अंमलबजावणी करण्याची व्यवस्था बघण्यासाठीं 'लोकमान्य' कंपनींत नेमण्यांत यावयाचा डायरेक्टर या नात्यानें लोटवाला यांच्या विश्वासांतील मनुष्य ही माझी भूमिका होती. यंदे व मी बसलों असतांना त्यांनीं सुचविलें कीं, सामीलनाम्याचा कागद खाडिलकरांना दाखवावा. 'लोकमान्या'चे संस्थापक व संपादक ते होते त्यामुळें त्यांना हें आवडणार नाहीं अशी शंका काढली. परंतु यंदे यांनीं त्यांना हांक मारलीच व माझी ओळख करून दिली. मी उठून उभा राहिलों व त्यांना वांकून नमस्कार केला. माझ्या अगदीं अपेक्षेबाहेर खाडिलकरांनीं हात धरून मला खालीं बसविलें आणि बरोबरीच्या स्वतंत्र पत्राच्या संपादकांनीं उठून एवढी खडी ताजीम देण्याचें कारण नाहीं,

असें किंचित स्मित करून सांगितलें. शतीं त्यांनीं वाचून पाहिल्या व 'उभयपक्षांना मान्य असल्यावर तिऱ्हाइतानें त्यांत बोलण्यासारखें काय आहे?' असे उद्‌गार त्यांनीं काढले. स्वराज्य पक्षाचें राजकारण व समाजवादाचा पुरस्कार या दोन गोष्टींची सांगड घालणें सुरवातीला सोपें वाटलें तरी पुढें तें कठीण होईल असा इषारा मात्र त्यांनीं दिला. त्यांनीं दिलेला इषारा त्यांनीं सांगितलें त्याहूनहि पूर्वी खरा ठरला असें माझ्या अनुभवास आलें.

'नवाकाळ'मध्यें 'इंदुप्रकाश' सामील करून कां घेत नाहीं? त्याला येणाऱ्या जुन्या जाहिरातींचा वगैरे फायदा होईल असें यंदे शेटजींनीं त्यांना कांहींसें थट्टेनें आणि कांहींसें 'जमलें तर ठीकच झालें' अशा बुद्धीनें सुचविलें. खाडिलकरांनीं एका क्षणांत सांगितलें "असल्या उचापती मला नकोत. एकमेकांच्या पायांत पाय घालून अडखळण्यापेक्षां ज्यानें त्यानें आपापल्या मार्गानें जावें हें उत्तम."

## सभासंचालन

या सुमारास त्यांच्या भेटी मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या सभांमधून होत. श्री. सौ. सरोजिनी नायडू अध्यक्ष व खाडिलकर उपाध्यक्ष अशी योजना बरीच वर्षें होती. आपण होऊन भाषणें वगैरें तें कधीं करीत नसत. अध्यक्षस्थानीं बसण्याची वेळ त्यांना पुष्कळ वेळां येई त्यामध्यें अधिकारी पक्षाची बाजू उचलून धरायची व विरोधी पक्षाची मुस्कटदाबी करायची असेंच त्यांचें धोरण दिसे. परंतु कोणतीहि वैयक्तिक अढी मात्र त्यांत नसे. त्यावेळीं बोरीबंदरला स्वराज्य सभेच्या दिवाणखान्यांत सभा भरत. परत येतांना पांच सात मंडळी ट्राममध्यें बसली कीं सर्वांचीं तिकिटें खाडिलकर काढीत. यामध्यें डांगे, जोगळेकर, नाडकर्णी, साठये, मी वगैरे त्यांचे प्रतिपक्षीच बहुधा असत!

## पेणची महाराष्ट्र प्रांतिक परिषद

पेण मुक्कामीं खाडिलकरांच्या अध्यक्षतेखालीं महाराष्ट्र प्रांतिक परिषद भरली होती. त्यांच्या भाषणांत महात्माजींनीं आंखून दिलेल्या कार्यक्रमांत कांहींहि बदल ते तुरुंगात असतांना करूं नये असें प्रतिपादन होतें. त्याच धोरणाचा स्वागताध्यक्ष श्री. चिंतामणराव वैद्य यांचा मुख्य ठराव परिषदेपुढें होता. त्याला पु. गो. जोशी (एरंडोल), दा. वि. गोखले (पुणें) व ल. ब. भोपटकर (पुणें) यांच्या तीन उपसूचना आल्या होत्या. सूचनांचा अनुक्रम जोशी यांची पहिली, गोखले यांची दुसरी व भोपटकर यांची तिसरी असाच होता. तेव्हां त्याच्या उलट अनुक्रमानें त्या सभेपुढें टाकणें ही योजना नियमांना धरून होती. परंतु गोखले यांची उपसूचना खाडिलकर सभेपुढें प्रथम ठेवूं लागले. सहेतुकपणें त्यांनीं असें केलें असें वाटत नाहीं. कारण सभेच्या नियमांचा भंग होतो या मुद्यावर जोर देऊन केळकरांनीं हरकत घेतली आणि खाडिलकरांनीं ताबडतोब त्यांचें म्हणणें मान्य केलें. याचवेळीं खाडिलकर कांहीं थोडें बोलण्याचा यत्न करीत होते. केळकरांनीं उपसूचना मताला टाकतांना अध्यक्षांनीं भाषण करणें शिस्तीला धरून नाहीं, अशी पुनः हरकत घेतली. खाडिलकरांनीं तीहि हरकत मानली. मतमोजणी झाल्यावर भोपटकरांची उपसूचना नापास झाली, परंतु गोखले यांची उपसूचना मात्र बहुमतानें पास झाली आणि लगेच केळकरांनीं अध्यक्षांना त्यांच्या कामांत मदत करण्याकरितांच कीं काय जणूं खाडिलकरांना सांगितलें कीं, जोशी यांची तिसरी उपसूचना आतां मताला घालण्याचा प्रश्न उपस्थितच होत नाहीं. अखेर वैद्यांच्या ठरावाला गोखल्यांची उपसूचना जोडली जाऊन ठराव सभेनें एकमतानें मंजूर केला व कौन्सिलप्रवेश-वाद पुढें पुष्कळच रंगला.

## आवेशपूर्ण व्याख्यानाचा मंत्रवत् परिणाम

अगदीं प्रथम मी त्यांना भाषण करतांना १९१३ सालीं जगन्नाथाच्या चाळींतील गणेशोत्सवांत पाहिले. विषय कांहीं तरी गीतेंतला होता एवढीच पुसट आठवण आहे. व्याख्यानांत त्यांनीं काय सांगितलें तें आठवत नाहीं, व तेव्हां समजलें असेंहि वाटत नाहीं, मात्र त्यामध्यें आवेश व अस्खलितपणा होता हें पक्कें आठवतें. टिळक सुटून आल्यावर होमरूलची चळवळ सुरू झाल्यावर मात्र त्यांचीं पुष्कळ व्याख्यानें ऐकलीं. त्यांपैकींच एका प्रसंगाची आठवण सांगतों. बेझंटबाईंना मद्रास सरकारनें अटक केली व त्यांना स्थानबद्ध केलें. त्याच्या निषेधासाठीं शांतारामाच्या चाळीच्या पटांगणांत सभा होती. अध्यक्ष खुद्द टिळक होते. खाडिलकरांपासून आठ दहा हातांच्या अंतरावर आम्हीं मित्रमंडळी बसलों होतों. "बेझंटबाईंना स्थानबद्ध करून लोकांपासून दूर ठेवलें असलें तरी त्यांची प्रतिमा प्रत्येकाच्या अंत:करणांत ठाण देऊन बसलेली आहे व त्यांची आणि त्यांच्या कामगिरीची विस्मृति कोणाला होणें शक्य नाहीं" अशा अर्थाचें ते कांहीं बोलत होते. त्यावेळीं अगदीं मंत्र घातल्याप्रमाणें सगळी सभा स्तब्ध होती. त्यांनीं केला असतां तो हुकूम सर्वांनीं तडक पाळला असता असें वातावरण त्यांनीं उत्पन्न केलें.

## वक्तृत्वांतील तन्मय-तदाकार वृत्ति

प्रतिपाद्य विषयाशीं तन्मय होऊन, तदाकार होऊन एक प्रकारची समाधीच लागावी असा असाधारण गुण त्यांच्या वक्तृत्वांत होता. आपल्या वक्तृत्वाच्या ओघांत आपणच वाहून जावें असें उत्कटत्व त्यांत होतें. मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इमारतींत एका लहानशाच श्रोतृसमूहासमोर ते एकदां उत्तर रामचरितावर बोलत होते. भवभूति हा कवि, उत्तर

रामचरित हें नाटक आणि करुणरस यांवद्दल खाडिलकरांना विशेषच प्रेम होतें. रामाचें चरित्र व चारित्र्य किती उदात्त, थोर, धीरगंभीर होतें याचें विवेचन करतां करतां ते अगदीं रामचंद्रमय झाले व एखाद्या सहृदय व समर्थ नटाप्रमाणें ती भूमिकाच आपण वठवीत आहों अशा प्रकारची त्यांची समाधि लागली. त्यांना गहिंवर आला, तोंडांतून शब्द उमटेना, डोळ्यांतून अश्रुधारा सुरू झाल्या आणि हें व्याख्यान मग तेथेंच आटपलें. इतकें सहृदयतेनें परिपूर्ण, भावनोत्कट भाषण मीं इतर कोणाचें क्वचित्च ऐकिलें असेल. इतर कोणीहि वक्ते स्वत:ला इतके विसरून जातील हें प्राय: अशक्य वाटतें.

## अस्खलित इंग्रजी भाषण

खाडिलकरांचें एकुलतें एक इंग्रजी भाषण मीं ऐकिलें आहे. खाडिलकरांना १९१९ सालीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत इंग्रजी भाषण करतांना मीं प्रत्यक्ष ऐकलेंच असल्यामुळें त्यांच्या इंग्रजींतील प्राविण्याविषयीं मला कांहीं शंकाच वाटत नाहीं. मी त्यावेळीं कॉलेजचा विद्यार्थीच होतों. परंतु अनेक पट्टीच्या वक्त्यांचीं इंग्रजी भाषणें ऐकून चांगली चोखंदळ बनलेली माझी अभिरुचि खाडिलकरांच्या भाषणावर खूष झाली होती. व्हर्सायचा तह आणि त्यांतून निघालेला राष्ट्रसंघ असा विषय त्यांनीं घेतला होता. हा विषय त्यांचा अगदीं हातखंडा त्यामुळें विषयाची म हिती व त्या अनुबंधांतील इंग्रजी परिभाषा ही त्यांना करतलामलकवत् असल्याप्रमाणें वाटली.

We have been making treaties after treaties since the treaty of Vienna, but peace is still far, far away and there will ever be little prospect of permanent peace so long as human nature continues to be what it i हें अगदीं सफाईनें व बिलकूल न अडखळतां उच्चारलेलें त्यांचें वाक्य तर मला अगदीं काल ऐकल्यासारखें आठवत

आहे. त्या वेळच्या महाराष्ट्रीय इंग्रजी वक्त्यांत खाडिलकर व भट यांचींच भाषणें इंग्रजी भाषा, सफाईचे उच्चार ( म्हणजे ॲक्सेंट, एम्फसिस आणि इंटोनेशन या तीनहि दृष्टींनीं ) आणि समर्पक विषयविवेचन या कसोटया लावल्या असत्या तर उत्कृष्ट वठलीं असा माझा अभिप्राय आहे.

# श्री. ह. मो. जोशी, लोकशक्ति पुणें.

## आग्रहामागची शिस्तीची विचारसरणी

काकासाहेबांचा स्वभाव आग्रही–प्रसंगीं दुराग्रहीहि–असतो असें त्यांचे-संबंधीं मीं ऐकलेलें होतें. परंतु त्यांच्या आग्रहीपणामागें स्वच्छ व शिस्तीची विचारसरणी असे ही फार थोडया लोकांना कल्पना असेल. त्यांचा व 'नवाकाळ' पत्राचा गौरव पुण्यांत व्हावा अशी साऱ्या पत्रकारांची फार इच्छा होती. 'नवाकाळ'ची २५ वर्षांची यशस्वी कारकीर्द झाल्यानें नवाकाळचें मुंबईस अभिनंदन केलें गेलें होतें. तसेंच के. काकासाहेबांचीं ७५ वर्षें पुरीं झाल्यानें त्यांचाहि गौरव मुंबईंत झाला होता. १९४८ च्या मे महिन्यांत त्यांचा पुणें येथें मुक्काम असतां पुणें पत्रकार संघातर्फे असाच गौरव करण्याचा सर्वांचा विचार होता.

काकासाहेब मुंबईस परत जाण्याच्या योजनेंत होते व श्री. य. कृ. खाडिलकर हे येथें येऊन तशी सर्व तयारी करून गेले होते. परंतु मुंबईस जाण्यास अद्याप अवधि होता.

"आम्हां सर्व मण्डळींची इच्छा आपल्यास कळलीच आहे. तुम्हांला कांहीं त्रास न होतां कोठेंहि तळ-मजल्यावरच–आपण रोज चित्रशाळेकडे जातां तेथेंच चौकांत–हा समारंभ करूं" मीं त्यांच्याजवळ म्हटलें.

"तसें आतां कांहीं जुळायचें नाहीं. अप्पालाहि आतां सवड होणार नाहीं." त्यांनीं तुटक उत्तर दिलें.

"अप्पांना आणण्याची मी व्यवस्था करतों. आपल्याशीं बोलणें करण्यांत मजकडून उशीर झालेला असल्यानें मला विशेष वाईट वाटतें. अप्पा येतील."

"अप्पाला आतां त्रास नको; पुढें पाहूं."

"मग अप्पा राहूं देत; आपण एकटे असलांत तरी चालेल."

"गौरव–सत्कार–नवाकाळचा आहे; नवाकाळचा अप्पा संपादक आहे. तो मला स्वीकारतां येणार नाहीं. आपण पुढें पाहूं."

पुढच्या वर्षांचा आतां हवाला पत्करण्यांत अर्थ नाहीं असें माझ्या मनांत सारखें येत होतें. पण आग्रह करण्यांत उपयोग नाहीं हेंहि मी ओळखून होतों. तरीहि––

"मग हा विषय संपला असें मानूं?" असें मीं विचारलें.

"हं. त्यांत काय विशेष महत्त्व आहे? अप्पाशीं ठरवून पुढचे वर्षीं आपण करूं."

पुढचे वर्षाचाच नव्हे तर तो योग आम्हीं कायमचा गमावला होता.

हे मान–सन्मान त्यांना आतां मोठे नव्हते हें खरें. येथील पत्रकारांच्या-साठीं थोडी तसदी घेण्यास ते तयार झाले असते. परन्तु त्यासाठीं विशेष यातायात करण्यास तयार नव्हते व संपादक श्री. य. कृ. खाडिलकरांना सोडून हा समारंभ करून घेण्यास तर त्यांची तयारीच नव्हती. त्यांच्या आग्रहामागें विशिष्ट विचारांचें अधिष्ठान असे.

## परमेश्वरावर व अंगिकृत कार्यावरची अलोट श्रद्धा

'नवाकाळ' कचेरींत माझें जाणेंयेणें जरी बऱ्याच वेळ झालें तरी काकांचेकडे जाण्याचा प्रसंग अगदीं विरळा असे. त्यांच्यावरील कौटुंबिक आपत्तीचेच वेळीं मी बहुधा त्यांना भेटलों असेन. त्यांच्या लाडक्या व

सेवाभावी नातवाच्या मृत्यूनंतर त्यांना भेटणें हें अत्यंत शोककारी होतें. कांहीं दिवस लोटल्यानंतरच आम्हीं गेलों होतों. इतक्या अलोट आपत्तींतहि काका केव्हांच खचून गेलेले सांपडले नांहींत. परमेश्वर व अंगीकृत कार्य यांवरील अलोट श्रद्धेशिवाय हें सामर्थ्य टिकूंच शकत नाहीं.

त्या भेटींत मन भग्न झाल्याचा असा उद्‌गार त्यांचे तोंडून निघाला नाहीं. सौ. गौरीबाईंचे मृत्युनंतरहि त्यांना भेटलों होतों. त्याहि वेळीं ते आपल्या दुर्बल शरीराकडून शक्य तें काम करून घेत असलेलेच पाहिले.

अखंड कर्तव्यनिष्ठा हाच त्यांच्या जीवनाचा आधार होता असें वाटतें. 'लोकशक्ति' दैनिक करतेवेळींहि मी त्यांना मुद्दाम भेटलों होतों. त्यामुळें 'नवाकाळ'वर थोडा परिणाम होणार होता, परंतु त्या भेटींत त्यांनीं 'लोकशक्ती'चें स्वागत करून उपयुक्त असाच सल्ला दिला. पुढें जेव्हां जेव्हां भेट होई तेव्हां ते 'लोकशक्ती'ची आस्थेनें चौकशी करीत. स्पर्धा अगर विरोध भावाचा लवलेशहि त्यांच्या मनाला कधीं शिवला असेल असें मला वाटलें नाहीं.

त्यांनीं केलेली कष्टमय सेवा ही त्यांच्या प्रज्वलित देशप्रेमामुळें होत असे. त्यांचा आग्रह, त्यांचा उग्र स्वाभिमान हाहि त्यांच्या देशप्रेमाचा भाग होता. अलोट कष्ट सोसण्याचें त्यांचें सामर्थ्य हें त्यांच्या ईश्वरभक्तीनें व देशप्रेमानेंच त्यांना दिलें होतें.

## श्री. प्र. ह. खाडिलकर, उगारखुर्द

१९१२ ते १९१७ अशीं पांच वर्षें पुण्यास व १९२१ ते १९२३ अशीं दोन वर्षें मुंबईस मी काकांच्या घरींच होतों. १९२१ ते १९३९ अखेरपर्यंत अठरा वर्षें लोकमान्य व नवाकाळ पत्रांत मीं त्यांच्या हाताखालीं

काम केलें व शेवटचें दर्शन १९४८ च्या मेमध्यें दत्तदर्शनास ते सांगलीस आले तेव्हां घडलें. या नाहीं त्या स्वरूपांत छत्तीस वर्षांत त्यांच्याशीं माझा जो संबंध आला त्यांतील अठरा वर्षांत वृत्तपत्रव्यवसायांत त्यांच्या हाताखालीं काम करतांना जे ठळक प्रसंग घडले त्यांतील कांहीं निवडक आठवणी नमूद करतों.

## करारीपणा

कोणतीहि गोष्ट सहज पत्करावयाची नाहीं आणि एकदां विचारपूर्वक अंगिकारली कीं पुन्हां तिची चिकित्सा करीत बसावयाचें नाहीं किंवा पळवाट शोधीत राहावयाचें नाहीं अशी त्यांची वृत्ति होती. १९२१ च्या १ आगस्टला लोकमान्यांच्या पहिल्या पुण्यतिथीस काँग्रेसचा असहकारितेचा पुकारा झाला व खादी घालण्याचें ठरलें. त्याप्रमाणें त्यांनीं पगडी उतरून ठेवून खादीची टोपी घातली ती कायमची.

लोकमान्य कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाच्या सभेंतील चर्चा त्यांना अपमानकारक वाटली व त्याच जागीं ते राजीनामा देऊन आले ते परत लोकमान्य कचेरींत गेले नाहींत.

१९२९ मध्यें राजद्रोहाचा खटला झाल्यावर त्यांनीं नवाकाळच्या संपादनाची व रोजचा दैनंदिन कारभार पाहाण्याची जबाबदारी सोडली. नंतर आमरण त्यांनीं रोजच्या कारभाराच्या तपशीलांत लक्ष घातलें नाहीं, किंवा नवाकाळसाठीं लेख लिहिण्यास लेखणी उचलली नाहीं.

## संयम

काका वृत्तीनें करारी तसे रागीट, एवढेंहि मनाविरुद्ध झालेलें त्यांना खपत नसे. आत्मचिंतनाची त्यांना आवड आत्मचिंतनाला कोणत्याहि कारणानें व्यत्यय आला कीं ते संतापत. पण लोकमान्याच्या सुरवातीस ते जितके क्रोधी

आहेत तितकेच संयमी आहेत असें आढळून मला आश्चर्य वाटलें. प्रथम लोकमान्य फ्रेंच पुलाजवळील नाक्याच्या इमारतींत होता तो दोन महिन्यांत केनेडी पुलाजवळच्या गल्लींत गेला. छापखाना व ऑफिस त्या जागेंत नेल्यावर त्या जागेंत रंगरंगोटी वगैरे कामें चालूं होतीं. सुरवारतीस अग्रलेख व स्फुटें असा पांच पांच कॉलम मजकूर काका एकटेच लिहीत. त्यांचा मजकूर लिहिण्याचें काम सुरवातीस मजकडे होतें. सुरवातीस त्यांच्या खोलींतील सीलिंगच्या फळ्या खरवडण्याचें काम चालूं होते. हें काम संपावयास २।३ दिवस लागले. खरवडण्याचा खर खर आवाज होत असतांनाच त्यांचें मजकूर सांगण्याचें काम चालूं असे.

## अचाट स्मरणशक्ति

त्यांच्या मजकुराच्या लेखनाचें काम करतांना दुसरी एक गोष्ट अजब वाटली. ती म्हणजे परदेशच्या राजकारणावर लेख लिहितांना भूभागाचा वगैरे तपशील ते सांगत तो ऐकून. काका टिपणें ठेवीत नसत किंवा संदर्भग्रंथहि बाळगीत नसत. मजकूर सांगतांना रोजचीं वर्तमानपत्रेंहि ते संदर्भासाठीं क्वचित्च वापरीत. त्यांचें निरीक्षण व निवड तीव्र असल्यामुळें त्यांना हवा असलेला तपशील लिहिण्याचे वेळीं हजर असे. जरुरीशिवाय ते वाचत नसत; पण जेव्हां वाचत तेव्हां वाचन संपल्याशिवाय त्यांची बैठक मोडत नसे. ज्या विषयांत लक्ष घालावयाचें त्यांत पारंगत व्हावयाचें अशी त्यांची वाचनाची रीत होती; व त्याला अनुकूल अशीच त्यांची अचाट स्मरणशक्ति होती.

## पत्रांतील मजकुरावदलच्या मर्यादा

दैनिकासाठीं बातम्यांचा सारांश काढणें येथपासून अग्रलेख लिहिणें येथपर्यंत मी प्रगति करत असतांना वेळोवेळीं काका सूचना देत त्यांचा

मतलब असा.—बातम्यांचा सारांशांत टीकात्मक कांहीं लिहावयाचें नाहीं, बातम्यांचे किंवा लेखाचे मथळे सार्थ असावेत, भडक किंवा आकर्षक पण भलता अर्थ उत्पन्न करणारे असूं नयेत. सभांच्या अहवालांत काव्य घालूं नये; पुस्तकें, नाटकें व बोलपट यावरील अभिप्राय देतांना सत्य सांगावें; पण प्रिय असेल तेवढेंच सत्य सांगावें. अग्रलेखांत सरकारवर टीका करतांना ती मुद्देसूद असावी. नुसती ठांसून विधानें असूं नयेत. प्रसिद्ध झालेल्या हकीकतीची व माहितीची मांडणी अशी करावी कीं, सरकारबद्दल जो अभिप्राय आपणास प्रगट करावयाचा आहे तो त्या मांडणींतून आपोआप प्रकट व्हावा. सरकारवर अमुक टीका करावयाची म्हणून न करितां मांडलेल्या वस्तुस्थितींतून ती निष्पन्न होईल, अशी लेखाची मांडणी असावी; असें ते सांगत. अग्रलेखाच्या अखेरचें प्रश्नचिन्ह 'याशिवाय दुसरा निष्कर्ष काय?' असें वाचकांना विचारून त्यांच्या खात्रीचा होकार घेण्याकरितां असे. एखादें सदर पत्रांत सुरू करावयाचें तर तें कायम चालू राहील व विशिष्ट पानावर येत राहील अशी खबरदारी ते घेत व घ्यावयाला लावीत.

## परदेशी बातम्या व लेख

परदेशी बातम्यांसाठीं लोकमान्य—नवाकाळसाठीं प्रथम रॉयटरकडून थोड्या बातम्या येत. वर्तमानपत्रांतील विशिष्ट परदेशी बातम्याच काकासाहेब खुणा करून देत व तेवढ्याच देण्यांत येत. काका परदेशी प्रश्नासाठीं जे लेख लिहीत त्याला धरून ही बातम्यांची निवड असे. काका हिंदी राजकारणावर ज्या प्रश्नाचा परिणाम होण्यासारखा असेल आणि हिंदी राजकारण काँग्रेस ज्या तऱ्हेनें चालवीत आहे त्या पद्धतीला पोषक अशा विषयांची निवड करून लेख लिहीत. असहकारितेच्या चळवळीच्या वेळीं चीनमध्येंहि राजकारण रंगाला आलें होतें. त्यांत असहकारितेच्या विचार

सरणीला ज्या पोषक गोष्टी घडत त्यांची चर्चा काकांनीं चीनबद्दलच्या अग्रलेखांत केली आहे. परदेशी राजकारणांत मुसलमानी राष्ट्रांतील राजकारणाला काकांच्या निवडींत प्रमुख स्थान असे तुर्कस्थान, इराण, अफगाणिस्थान ह्या बाबतींत इंग्लंडचीं पावलें कशीं पडत आहेत व त्याचा हिंदी राजकारणावर काय परिणाम होईल हें सांगण्यावर त्यांचा कटाक्ष असे. मुसलमानी राष्ट्रें इंग्लंडच्या छायेंतून ज्या प्रमाणांत सुटतील त्या प्रमाणांत इंग्लंडची हिंदुस्थानवरील पकड ढिली पडेल अशी काकांची विचारसरणी असे व या दृष्टीनें मुसलमान राष्ट्रांतील प्रश्नांची सहानुभूतीनें ते चर्चा करीत. मुसलमानी प्रश्नांची लोकमान्यामधून वारंवार होणारी सहानभूतिपूर्वक चर्चा पाहून 'इंदुप्रकाश'नें काकांना मौलाना खाडिलकर असें म्हणण्यास सुरवात केली होती.

लोकमान्य व नंतर नवाकाळमध्यें जे संपादकीय लेख येत ते सर्वशः राजकारणाचेच असत. इतर प्रश्नांना आपल्या पत्रांत प्राधान्य द्यावयाचें नाहीं असा काकांचा कटाक्ष होता. राजकारणांतहि इंग्रजांच्या हातची सत्ता लोकांच्या हातीं कशी येईल हा विचार व प्रयत्न यावरून वाचकांचें लक्ष दुसऱ्या प्रश्नाकडे लागूं नये या करितां इतर प्रश्नांच्या बाबत नवाकाळमध्यें स्वतंत्र म्हणजे स्वराज्याचा राजकारणाशीं संबंध येईल त्याला सोडून स्थान देण्यांत येत नसे.

## काँग्रेसनिष्ठेचें बंधन

हिंदी राजकारणाच्या बाबतींत स्वतःचीं कांहीं स्वतंत्र मतें असलीं तरी काँग्रेसच्या अधिकृत धोरणाला विरोध होईल असा त्यांचा आग्रह धरावयाचा नाहीं असा काकासाहेबांचा कटाक्ष होता. लोकमान्यामध्यें असतांना फेर नाफेर वाद उपस्थित झाला, त्यावेळीं कायदेमंडळावरील बहिष्कार जोंपर्यंत

काँग्रेसनें काढला नाहीं तोंपर्यंत काँग्रेस चुकते असें म्हणून तो काढावा असा प्रचार करण्यास त्यांचा विरोध होता. पुढें काँग्रेसनें ते बहिष्कार उठवून कौन्सिल प्रवेश केला तेव्हां त्याचा प्रचार नवाकाळमधून सुरू झाला. नवाकाळच्या अग्रलेखावरील चित्र व जागा या लंडनच्या टाइम्सच्या पद्धतीवर ठरविण्यांत आल्या. आंध्रचे टी. प्रकाशम् यांच्या 'स्वराज्य' या इंग्रजी दैनिकावर तिरंगी झेंडयाचें चित्र घातलें होतें तसें नवाकाळवर घालावें असें एका उपसंपादकानें सुचविलें. तेव्हां काका म्हणाले, "काँग्रेसच्या झेंडयाला कायमपणा नाहीं, तो बदलण्याचा संभव आहे, अशा स्थितींत त्याला स्थान देणें इष्ट नाहीं." काँग्रेसनिष्ठेचें बंधन मानून त्या मर्यादेंत आपले विचार मांडावयाचे हें आपलें धोरण त्यांनीं 'नवाकाळ' च्या पहिल्या अग्रलेखांत 'काँग्रेसच्या धोरणाचीं आपलीं मतें मांडण्यासाठीं नवाकाळ सुरू करीत आहों' अशा शब्दांत जाहीर केलें होतें. महात्माजींच्या असहकारितेच्या चळवळीचा व विधायक कार्यक्रमाचा या धोरणानेंच त्यांनीं पुरस्कार केला. त्यांना खादीची चळवळ विशेष मान्य होती व दारूबंदी हा त्यांना स्वतःलाहि जिव्हाळ्याचा प्रश्न वाटत होता. या दोन्हींचा निरसलपणें नवाकाळांत परामर्ष घेतला जाई. यावरून बॅ. बॅप्टिस्टा हे त्यांना 'खादीसंत' असें म्हणत असत.

## खादी आणि ग्रामपंचायत

महात्माजींना खिलाफत चळवळींत राजद्रोहाबद्दल सहा वर्षें शिक्षा झाली व पुढें काय करावयाचें असा प्रश्न पडला. नवाकाळांतून डॉ. तपस्वी बाबासाहेब परांजपे प्रचार करीत असलेल्या ग्रामपंचायतीचा प्रचार करावा असें मला वाटलें व तसें मीं काकांना विचारलें. तेव्हां ते म्हणाले, "ग्रामपंचायती व मंडळें यांचा अनुभव पूर्वी आम्ही घेतला आहे. आर्थिक

दृष्टया खेडयांतील मंडळी कोणाच्यातरी शब्दाला मानावयास तयार झाल्याशिवाय या गोष्टी यशस्वी होत नाहीं. खादीमुळें एक आर्थिक बंधन उत्पन्न होतें. त्या बंधनांत येणाऱ्या मंडळीकडून पुढें ग्रामपंचायती नीट चालविल्या जातील. तेव्हां ग्रामपंचायतीस आवश्यक असें आर्थिक बंधन निर्माण होण्यासाठीं खादीचा प्रचार करणें जरूर आहे, तोच आज केला पाहिजे.'' त्यावेळीं माझें फारसें समाधान झालें नव्हतें. थोडेसें माझ्या प्रयत्नामुळें उगारखुर्द येथें १९३३ मध्यें सांगली संस्थानांतील पहिली ग्रामपंचायत स्थापन झाली. या पंचायतीशीं या नाहीं त्या स्वरूपांत माझा पहिल्यापासून संबंध येतो. त्यांत मला जो अनुभव आला त्यांत काकांचे उद्‌गार सार्थ वाटले. एका आर्थिक बंधनानें लोक एकत्रित आल्याशिवाय केवळ चांगली विचारसरणी किंवा संस्था लोकसंघटना निर्माण करूं शकत नाहीं असें दिसून आलें.

## नवाकाळ आणि संध्याकाळ

'नवाकाळ' हें आपल्या दैनिकाचें नांव ठरवितांना कै. शिवरामपंत परांजपे यांच्या 'काळ' पत्राचें स्मरण काकांच्या मनांत होतेंच; पण त्याबरोबरच १९०८ सालचा स्वदेशी-बहिष्कार चळवळीचा काळ आणि नवाकाळ सुरू करतांनाचा असहकारितेचा काळ हा फरकहि त्यांना व्यक्त करावयाचा होता. लंडनचा 'टाइम्स' हें त्यांचें आदर्श दैनिक होतें त्याचाहि या नांव देण्याशीं संबंध होता. तथापि मला हें नांव कां ठेविलें याबद्दल त्यांनीं आणखी असें सांगितलें कीं, 'नांवाचा ब्लॉक करण्यास व तो ठीक दिसण्यास त्यांत मात्रा व वेलांटया नसाव्यात. त्या दृष्टीनें नवाकाळ नांव ठीक आहे.' नवाकाळची साप्ताहिक आवृत्ति सुरू करतांना या खुलाशाचा पगडा त्यांच्या मनावर होता. संध्याकाळचें दैनिक १९३९

मध्यें काढण्याचें ठरल्यावर बऱ्याच नांवांत त्यांनीं 'संध्याकाळ' नांव पसंत केलें. त्याच्या सामान्य अर्थापेक्षां अधिक अर्थ त्या दैनिकावर दिलेला संध्येंतील मंत्र व अग्रलेखावरील 'तमसो मा ज्योतिर्गमय' ह्या वचनानें त्यांनीं दिद्दर्शित केला आहे.

## 'न मे भक्तः प्रणश्यति'

'लोकमान्या'च्या अग्रलेखावर त्यांनीं 'मामनुस्मर युध्यच' हें गीतेंतील वचन लोकमान्यांना उद्देशून घातलें होतें. भक्तिभावानें ते केसरींत गेले होते आणि लोकमान्यांच्यावर त्यांची अत्यंत निष्ठा होती; पण लोकमान्यांनीं चालविलेल्या आणि त्यांच्या नांवानें काढलेल्या पत्रांतून व्यवहारपटूंनीं त्यांची एकतऱ्हेनें उचलबांगडी केली. तेव्हां सर्वतोपरी स्वतंत्र दैनिक काढतांना त्यावर 'लोकमान्यांचा खरा भक्त आहे, तो नाश पावत नाहीं' असें त्यांनीं वरील वचन घालून आपल्या हितशत्रूंना ठासून सांगितलें. लोकमान्य सोडण्याचें कारण त्यांनीं एकदां एका वाक्यांत सांगितलें, 'I don't want to be exploited'. नवाकाळ काढल्यावर डेलीमेलमुळें दैनिक चालविण्याच्या बाबतींत स्थित्यंतर झालें. चित्रें घालणें भाग झालें. त्याकरितां ब्लॉक करण्याचें खातें सुरू केलें. याकरतां बराच खर्च करावा लागला होता व त्या वेळच्या नवाकाळच्या स्थितींत तो जास्त होता. तो खर्च कारणीं लागला; पण न लागला तर काय, ह्याचाहि विचार काकांनीं केला होता. ते मला म्हणाले, 'it is a gambling. जमलें तर ठीक नाहीं तर चरितार्थासाठीं नाटकें लिहीन.' या व राजकीय गंडांतरांतून नवाकाळ वांचला व नवाकाळवाडी थाटली. नाटकांप्रमाणेंच दैनिक हें पैसे मिळण्याचें साधन असल्याचें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें.

## धंद्याबाबतची दृष्टि

'केसरीं'तून काकांचें उच्चाटन करतांना त्यांना व्यवहार जमत नाहीं व माणसें राखतां येत नाहीं असें कारण पुढें करण्यांत आलें. ही गोष्ट त्यांना लागून राहिली होती. लोकमान्य किंवा 'नवाकाळ' चालवितांना त्यांनीं या आरोपांचा निराधारपणा शाबीत करून दाखविला. 'गोड लागला म्हणून ऊस मुळासकट खाऊं नये' अशी त्यांची नाटकांप्रमाणेंच दैनिकाच्या धंद्याबद्दलहि दृष्टि होती. लोकमान्यांत त्यांना पांचशें रुपये पगार होता तरी त्यांनीं सुरुवातीस दरमहा तीनशेंच उचलले. एका कंपनीच्या दैनिकाचे संपादक किंवा नवाकाळचे मालक असतांना त्यांना कचेरीस लांबून यावें लागत होतें, तरी कधीं व्हिक्टोरियासाठीं पैसे खर्च केले नाहींत. घरगुती व वैयक्तिक खर्च मर्यादेंत ठेवला तरी नवाकाळसाठीं आवश्यक वाटणारा खर्च त्यांनीं सुरवातीस व नंतर प्रसंग पडला तेव्हां कर्ज काढूनहि केला. ऋणानुबंधी व इतरहि लोकांना उद्योग देतां येईल तितक्यांना ते देत. महत्त्वाच्या कामासाठीं माणसाची निवड करतांना ते वेळ घेत, पण एकदां माणसाची निवड केल्यावर त्याच्या कार्यक्षेत्रांत ते सहसा ढवळाढवळ करीत नसत.

## बुद्धिभेद होऊं दिला नाहीं

वर्तमानपत्र स्वराज्यासाठीं आहे. त्याबद्दलच्या विचाराखेरीज अन्य विचारांना आपल्या दैनिकांत थारा देऊन लोकांचा बुद्धिभेद होऊं द्यावयाचा नाहीं असा पत्र चालविण्यांत काकांचा जसा कटाक्ष होता तसाच पत्राचा धंदा करण्यांतहि होता. पत्राचा वाचक आपल्या लेखणीच्या जोरावर वाढवावयाचा, अन्य आकर्षणांनीं वाढविण्यांत आपली बुद्धि व पैसा खर्च करावयाचा नाहीं असें त्यांचें धोरण होतें. नवाकाळचा वर्षाला खास अंक काढावा ही कल्पना त्यांच्यापुढें मांडली असतांना त्यांनीं आपल्या या

धोरणाचा खुलासा केला. आपल्या लेखणीच्या कर्तृत्वाबद्दल आपल्या वाचकांचा बुद्धिभेद होऊं नये ह्याकरितां याप्रमाणें ते जपत !

## श्री. अ. ह. गद्रे, आद्यमौजकार, मुंबई,

१९१७–१८ सालची पुण्याची गोष्ट. ह्या वेळीं वैद्यपंचानन कवडे शास्त्री यांच्या औषधालयांत टिळक पक्षांतील सर्व थोरथोर मंडळी सायंकाळीं गप्पागोष्टी करण्यासाठीं जमत असत. दे. भ. अण्णासाहेब परांजपे आणि दे. भ. काकासाहेब खाडिलकर यांची तेथील उपस्थिति नित्याचीच असे. मी मुख्यतः लो. टिळकांच्या दौऱ्यांच्या वार्ता संदेशला पाठवीत असल्यामुळें माझा आणि टिळकपक्षांतील मंडळींचा विशेष परिचय घडून आला. माझें दुकान हें त्या वेळीं दुय्यम प्रतीचें गप्पा मारण्याचें ठिकाण झालें होतें.

## खाडिलकरांची दुरुस्ती परांजप्यांना मान्य

१९१७ ते १९१९ सालांत मीं लोकमान्यांच्या अखिल हिंदुस्थानांतील व्याख्यानांच्या दौऱ्यांचीं वर्णनें देणारीं चार पुस्तकें ( लोकमान्यांची मोहीम भाग १।२।३।४ ) प्रसिद्ध केलीं व प्रत्येकास कोणातरी मोठ्या पुढाऱ्याची प्रस्तावना जोडली. दुसऱ्या भागासाठीं मीं कै. दे. भ. अण्णासाहेब परांजपे यांची प्रस्तावना मागितली व त्यांनीं मोठ्या प्रेमानें लिहून दिली. पण ती वाचून पाहतां मला ती थोडी अधिक कडक भाषेंत लिहिली गेली आहे असें वाटलें. पण ती सुधारून घेण्यासाठीं परत अण्णासाहेबांकडे जाणें प्रशस्त नव्हे असें वाटल्यावरून मी काकासाहेब खाडिलकरांस सल्ला विचारला. त्यांनीं सदर प्रस्तावनेचें हस्तलिखित वाचून व तें दुरुस्त करून माझ्याकडे दिलें व ते मला म्हणाले:–"अनंतराव, तुम्ही अण्णासाहेबांना ही दुरुस्त प्रत न दाखवितांच छापून टाका आणि छापून झाल्यानंतर जर ते कांहीं

तुम्हांला म्हणाले तर मीं ती दुरुस्ती केली आहे असें त्यांस सांगा." सदर पुस्तक छापून झाल्यावर त्याची एक प्रत मी अण्णासाहेबांस नेऊन दिली. त्यानंतर त्यांच्या माझ्या अनेकदां भेटी झाल्या पण त्यांनीं मला दुरुस्त केल्या गेलेल्या प्रस्तावनेबद्दल कांहींच म्हटलें नाहीं. अर्थात् खाडिलकरांनीं केलेली दुरुस्ती त्यांना पसंत पडली असली पाहिजे असेंच मीं गृहीत धरलें व स्वस्थ बसलों. शक्य तितकें कायद्याच्या कक्षेंत राहूनच राजकीय लिखाण लिहिलेलें असावें असें काकासाहेब खाडिलकरांचें मत होतें, हें या छोट्या प्रकरणावरून दिसून यावयास हरकत नाहीं. अण्णासाहेब परांजपेहि तशाच मताचे होते; पण त्यांच्या लेखणींतून केव्हां केव्हां थोडी अधिक कडक भाषा उतरत असे इतकाच फरक !

## नाट्यलेखनाचें शास्त्र समजावलें

त्याच सुमारास मीं काकासाहेबांना माझें 'स्वराज्य सुंदरी' हें नाटक त्यांच्या घरीं ४–५ दिवस जाऊन वाचून दाखविलें होतें. हें नाटक त्या वेळच्या होमरूलच्या चळवळीवर होतें व त्यांत दादाभाई नौरोजी, पंचमजॉर्ज बादशहा अशीं पात्रें प्रत्यक्षपणें, आणि लो. टिळक, ना. गोखले अशीं पात्रें अप्रत्यक्षपणें मीं रंगविलीं होतीं. प्रयोगाच्या बाबतींत पोलिसांचा अडथळा उत्पन्न होऊं नये म्हणून मी त्यावर रेव्हरंड कविवर्य नारायण वामन टिळक यांचाहि अभिप्राय घेतला होता.

नाटकाचें वाचन चालू असतां काकासाहेबांनीं मला अनेक महत्त्वाच्या सूचना केल्याच, पण ओघाओघानें नाट्यलेखनाचें सर्व शास्त्रच समजावून दिलें. त्यावेळीं त्यांचें "स्वयंवर" नाटक रंगभूमीवर कमालीच्या वैभवानें गाजत होतें म्हणून मीं त्यांच्या लेखनासंबंधानेंहि त्यांस अनेक प्रश्न विचारले. गौळवाड्यांतील रुक्मिणीच्या ('खडा मारावयाचा झाला तर') स्वगत

भाषणासंबंधानें माझ्या मनांत, तें त्यांनीं कसें लिहिलें असेल, अशा प्रकारची जिज्ञासा होती. ही जिज्ञासा मी त्यांच्याजवळ व्यक्त करतांच त्यांनीं मला स्वतःच्या हातानें पेन्सिलीनें लिहिलेली वही दाखविली व ते म्हणालेः– "विशिष्ट प्रवेशाच्या रचनेसंबंधानें जो कांहीं विचार करावयाचा तो मी पूर्णत्वानें आधींच करून ठेवतों व मग तो लिहून काढतों. तें जें मी लिहितों तेंच पक्कें लिखाण असतें. मग त्यांत मी फेरफार करीत नाहीं."

"स्वराज्य सुंदरी" नाटकाच्या वाचनाच्या निमित्तानें मी तीस वर्षांपूर्वी काकासाहेबांचीं नाट्यलेखनाच्या अंगोपांगावरचीं सूक्ष्म विवेचनें ऐकलीं आणि त्यावरून मी ठामपणें असें म्हणूं शकतों कीं, काकासाहेब खाडिलकर राजकारणांत पडले नसते तर अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे प्राध्यापक झाले असते! त्यावेळीं मी तरुणच होतों. तरीहि काकासाहेब माझ्याशीं फार प्रेमळपणानें वागत असत आणि म्हणून त्यांच्या आठवणीनें मला विशेष प्रकारचा आनंद होणें साहजिक आहे.

## श्री. श्री. शं. नवरे, प्रभात, मुंबई.

मी खाडिलकरांचीं गणेशोत्सवांतील धार्मिक आणि इतर प्रसंगीं राजकीय व्याख्यानें ऐकलीं असलीं तरी खाडिलकरांशीं माझा संबंध आला नाहीं. मराठी पत्रकारांची संघटना सुरू झाल्यावर त्या निमित्तानें त्यांचेशीं बोलण्याचे फक्त दोन तीनदां प्रसंग आले. पैकीं पहिला प्रसंग जन्मांत न विसरण्यासारखा झाला.

### मानधनाला तुच्छ लेखणारी कडक देवता

वार्धक्यामुळें शरीराचा गोळा झाल्यामुळें काकासाहेबांना विचार करण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं व म्हणून ते कशांतच लक्ष घालीत नसावे अशी मी

पुष्कळ दिवसांपासून स्वतःची समजूत करून घेतली होती. पण एका प्रसंगानें माझे डोळे चांगलेच उघडले.

१९४४ सालीं फेब्रुवारी महिन्यांत कोल्हापूर येथें भरणाऱ्या मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षस्थानीं य. कृ. खाडिलकरांची निवड झालेली होती. परिषद शनिवारीं आणि रविवारीं भरणार होती. परिषदेचा कार्याध्यक्ष म्हणून पुणें पत्रकार संघानें मला कळविलें कीं, य. कृ. खाडिलकरांनीं एक दिवस आधीं निघून पुण्यास यावें कारण तेथील पत्रकार संघानें त्यांचा सत्कार करण्याचें ठरविलें आहे. य. कृ. खाडिलकरांच्या जवळ मीं गोष्ट काढली तेव्हां 'काकांची परवानगी नाहीं' असें त्यांनीं उत्तर दिलें.

माझा विश्वास बसेना. य. कृ. खाडिलकरांची थाप त्यांच्या गळ्यांत बांधण्याकरितां "मी काकांना विचारतों" असें मीं त्यांना म्हटलें आणि एके दिवशीं रात्रीं 'नवाकाळ' कचेरींत मी आत्मविश्वासानें गेलों. 'एवीतेवीं अप्पा कोल्हापूरला येणारच आहेत. तेव्हां फक्त एक दिवस त्यांनीं आधीं निघून पुण्यास उतरावें. तेथील मंडळीनीं त्यांचा सत्कार करण्याचें ठरविलें आहे' असें मीं अत्यंत नम्रतेनें काकांना सांगितलें. काकांनीं ताडदिशीं उत्तर दिलें कीं "शनिवारचा युद्धसमालोचनाचा अग्रलेख शुक्रवारीं लिहिल्याखेरीज अप्पा येथून हालूं शकणार नाहीं!"

चर्चा करण्याचे हेतूनें मी पुढें म्हणालों, "तें काम एक दिवस दुसरा कोणी तरी करूं शकेल. अप्पानीं यावें असा पुणेकरांचा अत्याग्रह आहे."

जरा रागाच्या स्वरानें काकासाहेब आवाज चढवून म्हणाले, "आपलें काम सोडून अप्पानें आपला सत्कार करून घ्यावा असें मला वाटत नाहीं. 'नवाकाळ' चें काम आटोपूनच अप्पा येथून निघेल. तुम्ही पुण्याला तसें कळवा."

अधिक आग्रह केला तर काका वळतील, या आशेनें मी आणखी दोन

तीन वेळां तो विषय घोळून पाहिला. पण काका वळले नाहींत. उलट माझ्यावर ते रागावत चालल्याचा भास मला झाला. मीं हळूंच तेथून पाय काढला !

मुंबईचे आम्हीं बरेचसे प्रतिनिधि कोल्हापुरास आधीं जाऊन पोंचलों, 'नवाकाळ' चा शनिवारचा अग्रलेख लिहून अध्यक्ष य. कृ. खाडिलकर श्री. बाबूराव फाटक यांचेसह मागाहून आले.

काकासाहेब म्हणजे कशी कडक देवता आहे याचा मला प्रथम अनुभव आला आणि प्रत्येक गोष्टींत काका कसे लक्ष घालतात तें कळून चुकलें. मानसन्मानाला काकासाहेब मनापासून किती तुच्छ लेखीत, त्याचा मला पडताळा आला ! आणखी कितीतरी संस्थाचालकांचा अगदीं तंतोतंत हाच अनुभव आहे.

## श्री. गो. रा. बाळ, नवाकाळ बातमीदार, पुणें.

काकासाहेब नवाकाळ काढणार असल्याची जाहिरात पाहिल्याबरोबर "नवाकाळ"चेंहि काम मिळालें तर पहावें, म्हणून मी प्रयत्नास लागलों. माझ्या परिचयाचे झालेले कै. अण्णासाहेब परांजपे यांच्याकडे गेलों. त्यांनीं शिफारशीचें पत्र दिलें व कै. वासुकाका जोशी यांना भेटण्यास सांगितलें. मी तें पत्र घेऊन ताबडतोब वासुकाकांच्याकडे गेलों व त्यांना पत्र दाखविलें. व वासुकाकांच्या जवळूनहि शिफारशीचें पत्र घेतलें. दोन्हीं पत्रें घेऊन मुंबईस काकासाहेबांच्या भेटीसाठीं गेलों.

### स्नेह्यांच्या शिफारसीला मान

मुंबईस सकाळींच ९ वाजतां "इंदुप्रकाश" छापखान्यांत गेलों. काकासाहेब बरोबर दहा वाजतां इंदुप्रकाश छापखान्यांत आले. प्रा. फाटकांनीं

माझी व त्यांची भेट करून दिली. मी अण्णासाहेब परांजपे व वासुकाका यांचीं पत्रें काकासाहेबांच्या पुढें ठेवलीं व फाटकांनीं माझ्याकडे पाहून हे हल्लीं इंदुप्रकाशचें पुण्याचें काम करीत आहेत असें सांगितलें. त्यानंतर काकासाहेब यांनीं मला "बरें" असें सांगितलें. त्यानंतर लवकरच नवाकाळच्या बातमीदाराचें काम मला देण्यांत आल्याचें पत्र आलें.

काकासाहेबांची व माझी ओळख नसतांना अण्णासाहेब परांजपे, वासुकाका यांच्या पत्राप्रमाणें आणि फाटक यांच्या सांगण्याप्रमाणें मला "नवाकाळ"चें काम मिळालें. काकासाहेबांनीं आपल्यावरील स्नेह्यांच्या शिफारशीप्रमाणें आपला मनुष्य या दृष्टीनें मला वागवलें आणि म्हणूनच मी "नवाकाळ"चें काम आजतागायत करीत आहें.

## केसरींतील अग्रलेखांची निवड

१९४८ सालीं गेल्या उन्हाळ्यांतहि काकासाहेब नित्याप्रमाणें पुणें येथें आले होते. त्यावेळीं त्यांना केसरींतील स्वतःचे अग्रलेख निवडून काढावयाचे होते. याबाबतींतील काम त्यांनीं माझ्यावर सोंपविलें. केसरीच्या जुन्या फायली लो. टिळकांचे नातू श्री. जयवंतराव टिळक यांच्याकडून केसरीची जरूर ती फाइल घेऊन मी दुसरे दिवशीं काकासाहेबांकडे गेलों. आणि कामास सुरवात झाली. त्यावेळीं अग्रलेखाचें हेडिंग वाचावयाचें आणि त्यांतील पाव कॉलम तरी निदान मजकूर वाचून दाखवावयाचा व त्याची निवड करतांच त्यांत खूण घालावयाची असा उपक्रम सुरू केला होता. एखाद वेळीं हेडिंगवरूनहि "तो माझा नाहीं" किंवा 'तो नको' असें ते चटकन सांगत असत. आणि एखादे वेळीं एकेका फाइलींत जास्त अग्रलेख निवडावयाचे असले तर दोनतीन दिवस फाइल संपण्यास लागत असत. यावेळीं तेथें वसंत व्याख्यानमाला चालू होती. ते अधूनमधून आज कोणतें

व्याख्यान आहे, अशीहि चौकशी करीत. अग्रलेख किती लिहून झाले याचीहि ते चौकशी करीत.

एकदां फायली घेऊन मी गेलों असतां काकासाहेब म्हणाले कीं, या फायली जड वाटल्या तर हमाल करून आणीत जा. जास्त वेळ बसावें लागलें तर ते मला दमला नाहींत ना, असें विचारीत. मी अर्थात्च नाहीं म्हणत असें. पण वाचतांना जरा आडखळूं लागलों असें त्यांना आढळतांच "आतां पुरे—उद्यां राहिलेले अग्रलेख पाहूं" असें ते म्हणत असत. जड फायली आणण्यास हमाल करा, असें सांगण्यांत व मी दमलोसें वाटतांच काम संपविण्यांत त्यांच्या मनाचा कोवळेपणा माझ्या अनुभवास आला.

# काकासाहेबांचे वाङ्मयविषयक विचार

प्रा. ल. र. फाटक, मुंबई.

काकासाहेब खाडिलकरांच्या नाटकांतील सर्वोत्कृष्ट गुणांइतक्याच जर आणखी एखाद्या गोष्टीची खऱ्या किंवा खोट्या रसिकांमध्यें उत्कटत्वानें चर्चा होत असेल तर ती त्यांच्या नाटकांतील विनोदी पात्रांबद्दल हें सहज लक्षांत येणारें आहे. काकासाहेबांवर कवित्वाची कृपा नव्हती अशी एक समजूत दृष्टीस पडते, व या समजुतीबरोबर त्यांना विनोद साधत नव्हता असाहि ग्रह आढळतो. परंतु विनोदाला किंवा हास्याला किती मान देणें कितपत सयुक्तिक–निदान काकासाहेब सयुक्तिक मानीत होते, याचा निर्णय सुचविणारीं गमकें त्यांच्या नाटकांतच आहेत. शृंगाराला त्यांनीं सर्व रसांचा राजा असें म्हटलें असून जुन्या काव्यशास्त्रांतील प्रमेयांना आधुनिक विचार-सरणीनें पुष्ट करूं पहाणाऱ्या लेखकांपैकीं कित्येकांनीं शृंगाररसाचें सर्वश्रेष्ठत्व सिद्ध केल्याचीं उदाहरणें आहेत.

## नाट्यवस्तूचें व विनोदाचें नातें

एकदां काकासाहेबांचीं नाटकें करणाऱ्या प्रमुख नाटक मंडळ्यांतील दोन तीन नट काकासाहेबांशीं नाट्य–शास्त्राविषयीं चर्चा करीत असतांना तिच्या ओघांत विनोदाचा प्रश्न निघाला. त्याबद्दल संभाषण करतांना मूळ नाट्य-वस्तूचें व विनोदाचें नातें कसें असतें किंवा असावें याचा काकासाहेबांनीं खुलासा आरंभला व त्यांतून हें नातें सेव्य–सेवकाचें असलें पाहिजे असें तात्पर्य निघालें. नाटकाच्या कथानकानें जो मुख्य परिणाम श्रोत्या–प्रेक्षकांच्या

ठिकाणीं उत्पन्न करावयाचा असेल त्याला पोषक होईल असाच विनोद नाटकांत असणें अवश्य आहे ही आपली विनोदविषयक भूमिका काका-साहेबांनीं ह्या प्रसंगीं स्पष्ट केली. विनोद हा सामाजिक व्यंगें हासवीत खेळवीत लोकांच्या निदर्शनास आणण्याचा एक उपाय असून गंभीरपणानें ह्या व्यंगाची ओळख मुख्य कथानकाच्या द्वारें लोकांना करून देत असतांना ती ओळख जड कंटाळवाणी न होऊं देण्याकरितां विनोदाचा आश्रय करावा लागतो; परंतु हा विनोद योजलेल्या परिणामकारकतेला धक्का देणारा निपजल्यास नाटकाचा हेतु सिद्ध होणार नाहीं, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. नाटकाच्या कथानकाला निश्चित ध्येय असतें. त्या ध्येयाची बडदास्त संभाळणारा विनोद जर नाटकांत घातला नाहीं, उलट लोकांमध्यें हास्य उत्पन्न करण्याची हातोटी आपल्याला साधली आहे म्हणून जर कोणी बेगुमानपणें हास्यकारक विधानांची व प्रसंगांची गर्दी उडवूं लागला तर ह्या रचनेला खऱ्या अर्थानें नाटक हें नांव शोभणार नाहीं. विनोदाचें स्थान गौण असल्याचें प्राचीनकाळच्या नाटकांवरूनसुद्धां सहज पटणारें आहे. त्याचें स्थान गौण असलें तरी त्याचें कार्य नाटकाचें जें मुख्य साध्य असेल त्याचा उठाव करण्याचें असतें. नाटकाच्या रचनेचें मुख्य साध्य एकदम डोळ्यांत भरण्यासारखें खुलण्यासाठीं विनोदासारखीं उपांगें आहेत. अवयवांनीं शरीर बनतें पण भिन्न भिन्न अवयव म्हणजे शरीर नव्हे. एखादा अवयव नसेल तर शरीरांत वैगुण्य उत्पन्न होईल. तसेंच विनोदाच्या अभावीं नाटकाच्या उभारणींत कमतरता भासेल. पण अवयव जसा शरीराच्या अव्यंग कार्यक्षमतेसाठीं तसाच विनोद सुद्धां नाटकांतील ध्येयाच्या निर्दोष परिणामकारकतेसाठीं आहे, अशा प्रकारचें काकासाहेबांचें प्रतिपादन होतें.

## विनोदी पात्रांचें प्रयोजन व कार्य

विनोदाचें विवेचन करीत असतां काकासाहेबांनीं आपल्या नाटकांतील

विनोदाचीं पात्रें चर्चेंत आणलीं. विद्याहरणांतील शिष्यवराच्या तोंडचीं कित्येक वाक्यें अतिशय 'किळसवाणी' असल्याचा आरोप ऐकूं येतो. दारुड्यांची जीभ दारूंत मिसळलेल्या वस्तूंना पूर्णपणें ओळखण्याजोगी चवचाल असते; तिला कुजलेल्या मांजरांच्या किंवा लूत भरलेल्या कुत्र्यांच्या हाडांची पूड दारूंत मिसळली असल्यास दारूच्या थेंबाचा जिभेला स्पर्श होतांच ताबडतोब समजतें, वगैरे मतलबाचीं वाक्यें ऐकतांना पुष्कळांना ओकाऱ्या येतात, असें म्हणतात. दारूबाजाला कनक-कान्ता यासंबंधांतील व्यवहाराची नीतिमत्ता अडवूं शकत नाहीं, तिचें उल्लंघन निर्विकार चित्तानें स्वतःच्या बाबतींत तो सोसतो व दुसऱ्याच्या बाबतीत करूं शकतो अशी वस्तुस्थिति इतर पात्रांच्या तोंडून वदविलेली आहे, तिलाहि कित्येकजण नाकें मुरडतात. पण मद्याच्या तिरस्काराची कमान कच–देवयानीच्या मार्फत एकीकडे चढत असून मद्याचा पुरस्कार आत्मघाताच्या दिशेनें शुक्राचार्यांच्या रूपानें चालू लागतो. या गंभीर परिस्थितीला अधिक उत्कंटता आणण्याकरितां दारुड्यांचा घमेंडखोर उच्छृंखलपणा गौण पात्रांच्या विनोदपर संभाषणांतून उघड केलेला आहे. त्याचा उद्देश मद्यपानाचा निषेध प्रेक्षकाच्या हृदयांत अधिकाधिक तीव्र होत जावा असा आहे. हा विनोद कथानकाच्या ध्येयाला पुष्टिकारक आहे.

भाऊबंदकींतल्या गौण पात्रांच्या विनोदाची व्यवस्था अशीच आहे. राष्ट्राच्या नेत्यांनीं भाऊबंदकी आरंभल्यास तिचे परिणाम मद्याभिक्षुकांच्या बायकांसारख्या समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोचूं शकतात व मग समाजांत नेत्यांच्या अनुकारणानें कशी बजबजपुरी माजण्याचा संभव असतो, याची कल्पना येण्याकरितां त्या नाटकांतील विनोद भाऊबंदकीच्या धोरणानें रंगविला आहे.

## हंसण्याच्या मुळाशीं जीवनाचें मर्म

समाजांतील ध्येयवादी संघर्षाच्या आसपास त्याच्या अनुकरणानें असे

विनोदी प्रकार प्रत्यक्ष चालू असतांना मूळच्या गंभीर ध्येयवादाचा अर्थ जो तो आपापल्या हिताच्या दृष्टीनें करूं लागतो; कित्येकदां ध्येयाचें खरें स्वरूपहि लोपतें. मेनकेतील विश्वामित्राचे शिष्य जो विनोद निर्माण करतात, तो ध्येयवादाला गढूळपणा कसा येतो, हें दाखविणारा आहे. कोणत्याहि ध्येयाचे सगळे पुरस्कर्ते कर्तृत्वानें अथवा बुद्धिमत्तेनें सारख्याच योग्यतेचे नसतात. वहात्या गंगेंत हात धुऊन घेण्याच्या प्रवृत्तीला ध्येयवादाच्या प्रचंड विस्तीर्ण आंदोलनांत पुष्कळच अवकाश असतो. या प्रवृत्तीवर पुढाऱ्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीचें दडपण असेपर्यंत तिचा उपद्रव प्रकट होत नाहीं. पण असें दडपण उठलें किंवा सैल पडलें कीं, उपद्रवाच्या उठावणीला वेळ लागत नाहीं. या उपद्रवाचें चित्र ध्येयवादाच्या गंभीर स्वरूपाशेजारीं उभें केलें की तें आपल्या विसंगतीनें विनोद उत्पन्न करतें; लोक हंसतात; रिझतात; हंसणें, खिदळणें हें स्वभावाच्या थिल्लरपणाचें लक्षण रोजच्या सामान्य व्यवहारांत मानलें जातें. परंतु सगळेंच हास्य थिल्लर नसतें. हास्याचे व्यवहारांतले अनेक प्रकार जीवनाचा झाडा घ्यायला लावणारे असतात. वाङ्मयांतील विनोद हा ध्येयाच्या निमित्तानें किंवा प्रेरणेनें जन्मास घातला जात असल्यानें तो केवळ मनोरंजक म्हणजे चित्ताला अगदीं वरवर स्पर्श करणारा नसतो. हंसण्याची लाट ओसरतांच एखाद्या जीवन-रहस्याच्या चिंतनांत मन अडकल्याचा हंसणाराला अनुभव यावा असा त्याचा रोख असतो. एरवी देखील उगीच कोणी हंसत नाहीं किंवा हंसवीत नाहीं. हंसण्याहंसविण्याच्या मुळाशीं कांहीं जीवनाचें मर्म असतेंच. तें मर्म उथळ असेल किंवा खोल असेल, तो महत्त्वाचा मुद्दा नाहीं. हंराणें व हंसविणें यांच्या तऱ्हा माणसागणिक निरनिराळ्या असतात. वाङ्मयांतील विनोदाचे प्रकारदेखील याच कारणासाठीं वेगवेगळे दिसतात. कोणाला कशामुळें हंसू येईल यालाहि नियम नाहीं. पण इतकें मात्र निश्चित कीं विनोदाला

सं. नं. १५७

जीवनाच्या एखाद्या मर्माचा आधार पाहिजे. जीवनाचे मर्म व ध्येय यांचा संबंध निराळा सांगायला नको. जीवनविषयक ध्येयाच्या नाटकांतील रेखाटणीशीं ज्याचा मुळींच संबंध नाहीं असा नाटकांतील विनोद व्यर्थ म्हणायाला पाहिजे, अशा आशयाचे काकासाहेबांचे विचार त्यांच्या बोलण्यांत तेव्हां व्यक्त झाले होते.

## पौराणिक पात्रें व त्यांचें चित्रीकरण

काकासाहेबांचें नवें नाटक जगापुढें येण्याचा अवकाश कीं त्यावर उलट सुलट टीकेचा मारा सुरू व्हावयाचा. काकासाहेब टीकेला कधींच उत्तर देत नसले तरी टीका–त्यांतल्या त्यांत प्रतिकूल टीका–मुळींच पहात नसत असें नाहीं. आपल्या नाटकांवद्दल येणाऱ्या टीकेवर नजर ठेवून ह्या साक्षेपानें आंपल्या नजरेस आणाव्या असें ते आपल्या मित्रांना सांगून ठेवीत.

द्रौपदी, रुक्मिणी, सावित्री, देवयानी, मेनका अशा पुराणांतील लोकप्रसिद्ध नायिका काकासाहेबांच्या नाटकांतून आहेत. द्रौपदी ही 'कीचकवध' आणि 'द्रौपदी' अशा दोन नाटकांत आलेली आहे. एका ठिकाणीं तिची वागणूक निराळी आहे व त्याहून भिन्न दिसणारी वागणूक दुसऱ्या ठिकाणीं आहे. द्रौपदीचें सैरंध्री या नात्याचें कथानक जितकें लोकप्रिय आहे तितकेंच तिच्या वस्त्रहरणाच्या प्रसंगाचेंहि कथानक लोकप्रिय आहे. पण 'लोकप्रिय आहे' म्हणजे काय आहे याची तपासणी करूं लागल्यास देवानें द्रौपदीला वस्त्रें पुरवून दुःशासनाच्या शक्तीची प्रतिष्ठा हिरावून घेतली व तिचा छळ करणारांचे दांत खड्डे करून सोडले हा ह्या मूळच्या कथानकाचा अंतिम अंश लोकांना अत्यंत परिचित व प्रिय आहे असें लक्षांत येईल. लोकांतल्या भाविकतेनें हाच अंश देवाच्या अतर्क्य उपकारित्वाचा महिमा वाढविण्याकरितां शेंकडो वर्षें आबालवृद्धांच्या परिचयांत आणून सोडला आहे. द्रौपदीऐवजीं भीमानें संकेतस्थानीं कीचकाला गांठलें व ठार मारलें हा

कीचकाख्यानांतील भाग याप्रमाणें लोकांच्या आवडीचा व माहितीचा आहे. रुक्मिणीचें लग्न तिच्या भावानें कृष्णाला डावलून दुसऱ्याशीं ठरवून टाकलें, तेव्हां रुक्मिणीनें कृष्णाला पत्र पाठविलें, कृष्ण तिच्या स्वीकारासाठीं गेला व त्यानें तिला पळवून नेलें अशी अगदीं थोडक्यांत रुक्मिणीची कथा आहे व त्या कथेचें मराठींत जुनें नवें असें पुष्कळच वाङ्मय आहे. महाभारतांतली शकुंतलेला जन्म देणारी मेनका व बाल शकुंतला समोर आणली असतां हातानें डोळे झांकणारा रविवर्म्याच्या चित्रांतला विश्वामित्र हीं लोकांना ठाऊक आहेत. विश्वामित्राचें कर्तृत्व वैदिक वाङ्मयांत निरनिराळ्या रीतीनें किती पसरलें आहे याची सामान्य साक्षरापाशीं दादहि नाहीं. ( काकासाहेबांनीं द्रौपदीप्रमाणें विश्वामित्राला आपल्या नाटकांत दोनदां आणलेलें आहे. परंतु एका ठिकाणीं सिद्धावस्थेंतला विश्वामित्र दाखविला आहे तर दुसऱ्या ठिकाणीं साधकावस्थेंतला विश्वामित्र दाखविला आहे. ) सारांश पौराणिक व्यक्तीसंबंधांत लोकांमध्यें कांहीं कल्पना ठाम बनलेल्या आढळतात व त्या कल्पनांना हिसके बसण्याजोगी त्या व्यक्तीची भूमिका काकासाहेबांनीं निर्माण केल्यामुळें टीकाकारांना आपलें काम सोपें वाटलें व त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या हृदयांतील कालवाकालवीनें पांढऱ्यावर काळें केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## टीकाकाराची वाजवी भूमिका

काकासाहेबांनीं एकदां टीकाकाराची दृष्टि कशी असावी व त्याच्या मर्यादा कोणत्या, याबाबतींत जिज्ञासूचें पुढील आशयाच्या विवेचनानें समाधान केलें. ' कलावंतानें अमूक व्यक्तीचें चरित्र अमूकच तऱ्हेनें कां दाखविलें नाहीं असली चर्चा करण्याचा टीकाकाराला अधिकार नाहीं. कलावंतानें ह्या व्यक्तीची जी भूमिका ठरविली असेल त्या भूमिकेची संपादणी कलेच्या नियमाला धरून योग्य रीतीनें झालेली आहे कीं नाहीं हें टीकाकारानें अवश्य पहावें. व्यक्तीची विशिष्ट भूमिका ही कलावंताने (अर्थात् येथें नाटककारानें)

कांहीं निश्चित उद्देशानें ठरविलेली असते. तो उद्देश लक्षांत घेऊन टीकाकारानें त्या उद्देशाची सफलता झालेली आहे कीं नाहीं तें पहावें व उद्देशाच्या सफलतेला बाध येण्याजोगे प्रसंग किंवा संवाद कलावंतानें आणले असतील तर त्याची टीकाकारानें जरूर हजेरी घ्यावी. जी मूर्ति समोर असेल तिच्या गुणदोषाची परीक्षा एवढेंच टीकाकाराचें कर्तव्य असतें. त्या मूर्तीला आपल्या हृदयास रुचणारा आकार कलावंतानें कां दिला नाहीं हा टीकाकाराचा प्रश्न त्याच्या कर्तव्यक्षेत्रांत अतिक्रमण करणारा ठरतो.

## सुसंगत फेरफाराची कवींना असलेली मुभा

बखरींतील कथानकें शेक्सपियरनें आपल्या नाटकांतून चितारलीं आहेत. इंग्लंडच्या इतिहासांतील अनेक जुन्या राजांचीं चरित्रें त्यानें आपल्या नाटकांत बसविलीं आहेत. प्लुटार्कनें लिहिलेल्या ग्रीक व रोमन वीर पुरुषांच्या चरित्रांनाहि शेक्सपियरच्या नाट्यकलेनें नवा पेहेराव चढविला आहे. फौस्ट नांवाच्या एका विद्याव्यासंगी व्यक्तीनें सैतानाच्या प्रेरणेनें नानाप्रकारचीं कृत्यें केल्याच्या युरोपियन दंतकथेवर पुष्कळशा नाट्यलेखकांनीं व कवींनीं युरोपांत लिखाण केलें आहे. त्यासंबंधीं युरोपांतील टीकाकार परामर्श घेतांना जो विचार बाळगतात तोच आपणहि बाळगला पाहिजे.

नाटकासाठीं विषय ठरवितांना व त्याला आपल्या नाट्यकलेनें आकार आणतांना कलावंत कांहींच विचार करीत नाहीं, केवळ लहरीनें वागतो असें मानायचें असेल तर गोष्ट निराळी. पण तो आपल्या नाटकांतील भूमिकांच्या कामगिरीचा उद्देश ठरवितांना कांहीं विचार करीत असला पाहिजे, हें मान्य असेल तर तो विचार आधीं नीट ओळखण्याचा यत्न टीकाकारानें केला पाहिजे व नंतर तो विचार साधला कीं बिघडला या दृष्टीनें त्यानें आपलें टीकास्त्र चालविलें पाहिजे.

## भवभूति–कालिदास–शेक्सपियर यांचे फेरफार

नाटकांतील भूमिकांच्याबद्दल बोलतांना काकासाहेब असें म्हणत असत कीं, महाभारतांतलें शकुंतलाख्यान जसें आहे तसेंच कालिदासानें आपल्या शाकुंतलांत कुठें घेतलें आहे? पण शाकुंतलाचा रसास्वाद घेणारे टीकाकार महाभारतांतलें शकुंतलाख्यान दृष्टिआड ठेवूनच फक्त कालिदासाच्या कृतीचा विचार करतात. शेक्सपियरनें इंग्लंडच्या राजांचीं चरित्रें जशीं वठविलीं आहेत तशींच तीं मुळांत होतीं असें इतिहासाच्या आधारानें सिद्ध करणें कठिण जाईल; परंतु ऐतिहासिक दृष्ट्या त्यानें ज्या चुका केल्या असतील त्याकडे कानाडोळा करूनच इंग्लंडचे रसिक ह्या ऐतिहासिक नाटकांवर आजपर्यंत झुलत आहेत. शेक्सपियरनें त्या त्या राजांच्या स्वभावांबद्दल त्यांचीं चरित्रें पाहून आपल्या मनांत कांहीं निश्चित कल्पना बनविल्या व त्या कल्पनांच्या अनुरोधानें त्यानें ते राजे रंगविले. इतिहासाचा उपमर्द झालेला नाहीं, अशी टीकाकारानें आपली खात्री जरूर करून घ्यावी; पण इतिहास व कला यांचे व्यवहार अगदीं निराळे आहेत याचाहि तशी खात्री करून घेतांना विसर पडूं देऊं नये.

याखेरीज पुराणकथांच्या बाबतींत आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवायला पाहिजे ती ही कीं या कथांमध्यें जुन्या वाङ्मयांतच बरेच फेरफार झालेले दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ महाभारतामधील शकुंतलाख्यान आणि पद्मपुराणांतील शकुंतलाख्यान यांत फार मोठें अंतर असून पद्मपुराणांतलें आख्यान कालिदासाच्या शाकुंतल संविधानकाशीं जुळणारें आहे. पद्मपुराण हें कालदृष्ट्या कालिदासानंतरचें तेव्हां या पुराणानें कालिदासाची चोरी केली असेल. येथें आधीचें व नंतरचें हा महत्त्वाचा मुद्दा नसून अमक्या ग्रंथांतलें कथानक तेवढें ग्राह्य किंवा पूर्णपणें विश्वसनीय व तमक्या ग्रंथांतलें

टाकाऊ असा आग्रह धरतां येत नाहीं. कथेंत फेरफार घडले आहेत हा मुद्दा महत्वाचा आहे. रामायणाचेंच पहा. रामायणाच्या मूळ कथेंत नसलेल्या किती तरी गोष्टी मागून उत्पन्न झाल्या आहेत व जोडल्या गेल्या आहेत. वाल्मिकीच्या नांवावर खपणाऱ्या रामायणांत लवकुशाचें रामाशीं युद्ध झालें अशी माहिती नाहीं. अहिरावण महिरावण यांचें प्रकरण नाहीं. परंतु या नव्या पुस्त्या कलावंतांनीं स्वीकारल्याचें आपण पहातों. रामायणांत लवकुशांचें युद्ध नसतां भवभूतीनें त्याचा आपल्या उत्तररामचरितांत मान केला म्हणून भवभूतीला कोणी दोष देत नाहीं. याच नाटकांत रामाला भवभूतीनें सीताविरहाचा जो शोक करायला लावलें आहे, त्याला तरी रामायणांत कुठें स्थान आहे !

सारांश कलाकृतीच्या परामर्शाला भवभूतीनें रामायणाची कथा कां बदलावी, कालिदासानें महाभारताच्या शकुंतलाख्यानाविषयीं बेपर्वाई कां दाखवावी, असले प्रश्न विचारण्याचा अधिकार नाहीं. रामाच्या व्यक्तित्वाची थोरवी शाबूत ठेवण्याची खबरदारी बाळगून कलावंतानें कांहीं फेरफार केले, व अशा फेरफारांनी मुळांतल्या थोरवीचें सौंदर्य जास्त वाढलें तर त्या कलावंतांची टीकाकारांनीं वाहवाच केली पाहिजे. त्या ऐवजीं आपण वाचलेल्या पुस्तकाचे किंवा आपल्याला आवडणाऱ्या कथेचे आधार देऊन जर टीकाकार कलावंताच्या नांवानें खडे फोडूं लागला तर तो बेजबाबदार आचरट आहे असेंच ठरवून त्याची उपेक्षा करण्याशिवाय गत्यंतर उरत नाहीं.

वर दिलेलें विवेचन काकासाहेबांशीं वेळोवेळीं झालेल्या संवादांतून एकत्र आणलेलें आहे.

## नाटक लिहिण्यापूर्वीचा अभ्यास

काकासाहेब आपल्या विवेचनांत मीं अमुक नाटक लिहिण्यापूर्वी काय काय वाचलें याचा आढावा सांगत नसले तरी जातां यांचा नाटकासाठीं

निरनिराळे ग्रंथ जमवावे आणि पहावे लागले त्यांना काकासाहेबांच्या व्यासंगाबद्दल बरीच माहिती देणें शक्य असून ती क्रमप्राप्त म्हणून येथें सादर केल्यास अप्रस्तुत ठरूं नये असें वाटतें.

सत्त्वपरीक्षा हें नाटक लिहिण्यापूर्वी काकासाहेबांनीं हरिश्चंद्राचें आख्यान जितक्या ठिकाणीं जुन्या नव्या वाङ्मयांत आलेलें आहे तितकें सर्व वाचून मग हरिश्चंद्र, विश्वामित्र यांच्या भूमिका निश्चित केल्या आणि नंतर तशा नाटकांत बठविल्या. 'द्रौपदी' नाटकांतील प्रसंग पांडवांचें द्यूत आणि ह्या निमित्त द्रौपदीचें वस्त्रहरण एवढाच असला तरी महाभारतामधील द्रौपदीचें सारें चरित्र मननपूर्वक वाचून मग तिच्या स्वभावाचे विशेष आपल्या नाटकांत उठावानें दाखविले. मेनकेचें मूळ सूत्र त्यांनीं रामायणांतून घेतलें आहे, पण वैदिक वाङ्मयांतील विश्वामित्राच्या कामगिरीचे संदर्भ त्यांनीं विश्वामित्राच्या स्वभावाकरितां जमेस धरले आहेत व त्या संदर्भांचा निर्देश मेनका नाटकाच्या प्रस्तावनेंत केलेला आहे. 'सावित्री' नाटकाच्या रचनेला प्रारंभ सावरमतीच्या तुरुंगांत झाला. तेथें त्यांनीं सावित्रीच्या कथानकाचीं नाटकें, काव्यें वगैरे मागून घेतलीं होतीं; त्यांचें वाचन कांहींसें आधींच सुरू होतें. सवतीमत्सराचें कथानक त्यांनीं प्रामुख्यानें रामायणावरच आधारलेलें आहे, परंतु रामायणांतील कथानकाच्या श्लोकाश्लोकाच्या विचारांत त्यांनीं अनेकदां कित्येक दिवस घालविले. नाट्यरचनेच्या कलेबरोबर काकासाहेब रंगभूमीची सुद्धां सोय पहाण्याला चुकत नसत, नाट्य हें काव्य खरें पण तें दृश्यकाव्य आहे. त्या काव्याच्या दृश्यतेचें स्थान रंगभूमि असून कलेला मर्यादा नसल्या तरी रंगभूमीला मर्यादा असतात, या जाणिवेनें नाट्यरचनेची कला व रंगभूमीवरील दृश्यत्वाचीं बंधनें यांच्यांत तडजोड कशी करावी लागते याचा आपल्या नाटकांतील्च उदाहारणें घेऊन काकासाहेब खुलासा करीत असत व तोहि टीकाकारानें किती गोष्टींचें अनुसंधान राखलें पाहिजे

याचें ज्ञान करून देण्यासाठीं असे.

## भव्य उत्कट तेंचि घ्यावें

लेखकानें लेखणी चालवण्याकरितां प्रतिपाद्य विषय कोणता घ्यावा या प्रश्नाचें उत्तर काकासाहेबांच्या संभाषणांतून असें मिळे कीं, लोकांना स्वतःच्या कल्याणाच्या दृष्टीनें गरज कशाची आहे याची नीट अटकळ बांधून मग ज्याची गरज अपरिहार्य वाटेल त्या विषयाची लेखकानें निवड करावी. लोकांच्या गरजेचे विषय सामान्यतः प्रखर स्वरूपाचे असतात. तरी सुद्धां तात्कडतोबीचा व कालान्तराचा हा विवेक बाळगून विषय निवडावे. काकासाहेबांच्या मनाच्या ठेवणींत जोरदारपणाचा अंश विशेष होता. त्यांनीं प्रत्येक शारीरिक व बौद्धिक हालचाल जोरकसपणानें करण्याची संवय स्वतःला लहानपणींच लावून घेतली होती. समर्थांच्या शब्दांत हेंच सांगावयाचें झालें तर 'भव्य उत्कट तेंचीं घ्यावें, मळमळीत टाकून द्यावें' अशी प्रतिपाद्य विषयाच्या निवडीबद्दल काकासाहेबांची धारणा होती असें म्हणावें लागेल. भव्य आणि उत्कट या समर्थांच्या शब्दांत लोकांच्या व्यापक व चिरकल्याणाच्या त्याचप्रमाणें तात्कालिक गरजेच्या विषयांचा स्वीकार व्हावा ही कल्पना आहे. काकासाहेबांची अग्रलेखाची निवड करतांनाहि अशीच योजना असे.

विषय निवडतांना आणखी एका गोष्टीची खबरदारी घेण्याबद्दल ते इषारा देत असत. लोकांच्या गरजेचा विषय जसा त्यांच्या कल्याणाचा अर्थात् जिव्हाळ्याचा असावा तसाच तो त्यांच्या बुद्धीच्या व ज्ञानाच्या आटोक्यांत असला पाहिजे तरच लोक त्याच्याकडे आस्थेनें पहातील. तो कांहीं जणांच्या आकलनांत येण्याजोगा उंची पांडित्याचा असेल तर लोक त्याकडे दुरून आदरानें पहातील, पण जवळ करणार नाहींत. म्हणून लोकांच्या रोजच्या सामान्य वाङ्मयांत त्याला मोठा मान देऊं नये; असें ते म्हणत. सामान्य विषयाला पांडित्य लागतें, पण तें पांडित्य नसून प्रतिपाद्य

विषयाचें सुबोध स्पष्टीकरण आहे, असें वाचकाला वाटण्यासारखें त्याचें स्वरूप असावें. आपल्या विद्वत्तेचा व लोकांच्या कोत्या जाणतेपणाचा मेळ घालतां आला म्हणजे लेखक यशस्वी झाला असें म्हणावें. लोकांच्या जाणतेपणाला लेखकाच्या प्रतिपादनानें क्लेश व्हायला लागले कीं त्या लेखनाचा उपयोग कमी किंवहुना कधीं कधीं त्याचा उपयोगच होऊं शकत नाहीं हें लेखकानें नेहमीं ध्यानांत ठेवावें. लेखनाला गोडी येण्याकरितां अलंकाराची योजना करावी लागते, परंतु लिहिण्याच्या ओघांत अगदीं सहजपणें अलंकाराचा उदय झाल्यास तो अलंकार शोभा व गोडी वाढवितो. पण रोजच्या घडामोडीबद्दल कांहीं अलंकार मनांत ठरवून त्याच्या अनुरोधानें लेखन केल्यास तें कदाचित् उठावदार दिसेल पण परिणामकारक होण्याची आशा नको. अशा लेखनाच्या उठावदारपणामागील कृत्रिमता वाचकाला उमगल्याशिवाय रहात नाहीं. मग तो त्याचें कौतुक करील; परंतु त्यांच्या हृदयावर कसलाच बोध ठसला नाहीं असाच अनुभव येईल. प्रतिपाद्य विषयाचें स्वरूप, लेख असेल तर पहिल्या दहावीस वाक्यांत आणि पुस्तक असेल तर प्रस्तावनेंत किंवा उपोद्घातांत स्पष्ट झालें पाहिजे. सारांश आपलें ज्ञान, वाचकाचें ज्ञान आणि प्रतिपाद्य विषय या तिहींचा बेमालूम सांधा बसविणें हें लेखकाचें कर्तव्य आहे. ग्रंथाचा किंवा लेखनाचा आरंभ अशा रीतीनें करावयाचा कीं, प्रतिपाद्य काय आहे याचा वाचकाला पत्ताच लागूं नये, त्याची दिशाभूल हटकून व्हावी हा प्रकार कादंबरींत शोभेल. पण जेथें उघड उघड लोकांना शाहणे करून सोडण्याचा संकेत असेल तेथें असली आडपडद्याची किंवा लपेटीची शैली निरुपयोगी ठरते. वाचकाच्या ज्ञानाचा आंवाका विसरून लेखकाचें कधींहि चालणार नाहीं.

## एकतानता साधल्यावर लिखाण

लेखक, त्याचा प्रतिपाद्य विषय आणि ज्याला अनुलक्षून लिहावयाचें

तो समाज यांच्यांत एकजिनसीपणा उत्पन्न करावयाचा झाल्यास कोणता आदर्श समोर ठेवावा, या प्रश्नाचें उत्तर पुष्कळदां काकासाहेब आपल्या एका आवडत्या उदाहरणानें देत असत. तें उदाहरण महाभारतामधील आहे व प्रसिद्ध आहे. त्या योगानें ते लेखकाला अवश्य असणाऱ्या आणखी एका गुणाची ओळख करून देत असत, हें मार्मिकांच्या लक्षांत येईल. कौरवपांडवांना धनुर्विद्येचें शिक्षण पुरेसें देऊन झाल्यावर द्रोणाचार्यांनीं त्यांच्या परीक्षेचा प्रसंग निर्माण केला. हा प्रसंग सार्वजनिक नव्हता. या दोघा गुरुशिष्यांपुरताच होता. द्रोणांनीं अर्जुनाला एका ठिकाणीं नेऊन तेथील झाडावर एक भास नांवाचा पक्षी दाखविला आणि मीं इषाऱ्याचा शब्द उच्चारला कीं बाण सोडून त्याला पाडलें पाहिजे असें अर्जुनाला सांगितलें. अर्जुनानें धनुष्य सज्ज करून त्याला बाण जोडला व भासावर नेम धरला. नेम धरतेवेळीं अर्जुनाला भासाबरोबर आसपासच्या इतर गोष्टींचें भान होतें. कांहीं वेळ गेल्यावर अर्जुनाला द्रोणांनीं विचारलें तेव्हां 'आतां बाकींचें कांहीं दिसत नाहीं; भास पक्षी मात्र दिसत आहे' असें अर्जुनानें उत्तर दिलें. द्रोणानीं पुनः कांहीं वेळ जाऊं दिला. मूळचा संकेत भासाचें डोकें उडविण्याचा होता. त्यास अनुसरून अर्जुन आपली एकाग्रता वाढवीत होता, द्रोणांनीं आणखी एकदां विचारून पाहिलें आणि आतां भास पक्ष्याऐवजीं मानेपासून पुढचा डोक्याचा भागच तेवढा दृष्टीस पडत आहे, असें अर्जुनाचें उत्तर ऐकतांच द्रोणांनीं इषाऱ्याचा शब्द उच्चारला. त्यासरशीं अर्जुनाच्या धनुष्यावरून बाण सुटला व त्यानें भासाचें शीर उडविलें. भास झाडावरून खालीं पडला.

काकासाहेब या उदाहरणाच्या अनुषंगानें समजावून देत असत कीं भासाच्या डोक्याशिवाय बाकीच्या सर्व गोष्टींचें ज्ञान अर्जुनाच्या दृष्टींतून गेलें. त्याचा धनुष्यावर बाणाला धरून ठेवणारा हात, बाणाचें टोंक, व

भासाचें डोकें हीं सर्व एकत्र अशी जेव्हां अर्जुनाची तदाकार वृत्ति झाली तेव्हांच त्याला आपलें निशाण बिनचूक उडवितां आलें. लेखकाला देखील आपल्या प्रतिपाद्य विषयासंबंधांत अशी संपूर्ण एकाग्रता साधावी लागते. प्रतिपाद्य विषय भास पक्ष्यासारखा सगळाच्या सगळा दिसल्यानें लेखकाचा हेतु सिद्धिस जात नाहीं. प्रतिपाद्य विषयाच्या विस्तारांतील कोणत्या मुद्यांचा ऊहापोह आपल्याला करावयाचा आहे हें आधीं निश्चित करून त्यानें आपलें सारें बुद्धिबळ त्यावर खिळविलें पाहिजे. तसें न करतां तो जर इतर पसाऱ्यालाहि आपल्या लेखनांत स्थान द्यावें अशा मोहाला बळी पडेल तर त्याचें लेखन बारगळेल, परिणामकारक होणार नाहीं.

## शुकाचार्यांचें उदाहरण

विषयासंबंधांतील एकाग्रतेचा मुद्दा काकासाहेब कधीं कधीं शुकाचार्यांच्या उदाहरणानेंहि स्पष्ट करीत. व्यासांच्या आज्ञेवरून शुक हा जनकाच्या भेटीला गेला असतां जनकानें त्याच्या हातीं कांठोकांठ तेलानें भरलेलें भांडें देऊन आपल्या दरबाराला प्रदक्षिणा करण्याला सांगितलें. दरबारांत सर्वत्र कुणाहि माणसाचे डोळे सहज वेधून जातील व मनुष्य चळेल अशा शेंकडो गोष्टी होत्या. शुकाला भांडयांतल्या तेलाचा थेंबहि खालीं पडूं न देतां प्रदक्षिणा शेवटास न्यावयाची होती. यासाठीं भांडें हालणार नाहीं व पाऊल चुकणार नाहीं, अशी दुहेरी जोखीम शुकाच्या डोक्यावर होती. त्या जोखमीशीं एकजीव होऊन गेल्यामुळें जनकानें उत्पन्न केलेल्या संकटांतून शुक निभावून गेला. अर्जुनाच्या काय किंवा शुकाच्या काय, दोन्हीं गोष्टींत एकाग्रतेच्या थोरवीचें तात्पर्य सारखेंच भरलेलें आहे. निवडून काढलेल्या प्रतिपाद्य विषयांत किंवा विषयाच्या आसपास कितीहि बुद्धीस नाचविणारी रमणीयता भरलेली असली तरी तिच्याकडे साफ दुर्लक्ष करून लेखकानें आपल्या निवडलेल्या मुद्याचें लक्ष्य डोळ्याआड होऊं देतां कामा नये. मितींत जसा

खिळा भक्कम रोवायचा झाला तर आपण त्यावर हातोड्याचे दणके देत असतों तसाच कांहींसा प्रकार इष्टार्थाच्या प्रतिपादनाचा समजावा. वाचकाच्या, प्रेक्षकाच्या चित्तांत आपला मुद्दा ठोकून घुसवावयाचा आहे, अशा भावनेनें लेखकानें आपलें प्रतिपादन केलें पाहिजे. सारी तर्कशक्ति, सारा युक्तिवाद, भावना चेतविण्याची सारी कला अशा एकाच एका रोखानें लेखकाकडून उपयोगांत आणली गेली पाहिजे. नाटकांतल्या प्रवेशांची, कादंबरींतल्या प्रकरणांची, निबंधातल्या परिच्छेदांची बांधणी अशा धोरणानें झाली नाहीं तर लेखकाचा सारा खटाटोप पत्त्यांच्या बंगल्यासारखा ठरेल. अशी एकाग्र प्रतिपादन–शैली दीर्घ अभ्यासाखेरीज आत्मसात् व्हावयाची नाहीं. काकासाहेब अर्जुनाचेंच उदाहरण घेऊन सांगत कीं, द्रोणाचे इतर शिष्य दिवसाचा कारभार संपला कीं, खुशाल झोंपीं जायचे. अर्जुन मात्र, एकटाच रात्रींच्या वेळीं धनुर्विद्येचे प्रयोग करीत बसायचा. झोपेचेंच नव्हे तर, इतर सुखें लाथाडून जेव्हां लेखक आपल्या कामगिरीचा अभ्यास करील तेव्हांच त्याला प्रतिपाद्याशिवाय बाकीच्या विषयांबाबत बेभान होऊन जातां येईल.

## एकाग्रता म्हणजेच समाधि

प्रतिपाद्यासंबंधांतली निस्सीम एकाग्रता म्हणजेच समाधि, असें १९३० सालीं तुरुंगांतून सुटून परत आल्यावर काकासाहेब म्हणत असत. तुरुंगांत ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांतील कुंडलिनीचें स्वरूप योग्य रीतीनें गळीं उतरवून घेण्याचा यत्न त्यांच्या जिज्ञासुवृत्तीमुळें घडला. तुरुंगांत त्यांना योगशास्त्राचे हठयोग–प्रदीपिका, घेरंडसंहिता वगैरे ग्रंथ उपलब्ध झाले नव्हते. बाहेर आल्यावर त्यांनीं सदर ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास करून रोजच्या जीवनांत अष्टांग योगाच्या सिद्धींतील कोणकोणते अनुभव येतात याची चिकित्सा केली. समाधि असें नांव ज्या अवस्थेला दिलेलें आहे त्या अवस्थेचें

मुख्य लक्षण एकाग्रता हेंच आहे. मनुष्य समाधीचा अनुभव रोज घेतो, पण त्या अनुभवाच्या खऱ्या स्वरूपाची तो अति परिचयामुळें अवज्ञा करतो. ज्याला ज्या विषयाची आवड असेल त्याला तो विषय प्राप्त झाला कीं, मग तल्लीनतेनें तो बाकीचें सारें जग विसरतो. आपल्या इष्टार्थाव्यतिरिक्त बाकीचें सर्व विसरून जाणें हीच समाधि. 'तुम्ही लेख लिहायला बसला व त्यांत दंग झाला कीं, तुम्हाला टेबलावर कचरा किती आहे, खुर्चींत ढेकूण किती आहेत, दौतींत शाई किती आहे, आजूबाजूस कोण बसलें आहे, उभें आहे व काय करीत आहे; छापखान्यांची यंत्रें बंद आहेत कीं गडगडाट करीत आहेत वगैरे परिस्थितीचेंहि बिलकूल भान रहात नाहीं. हीच समाधि! दंग होणें, चूर होऊन जाणें, मग्न होणें, रंगणें हे सर्व शब्द एकाग्रतेचे दर्शक आहेत. योगांतल्या समाधीचा विषय ईश्वराचा साक्षात्कार हा असला तर रोजच्या समाधीचे विषय ज्याच्या त्याच्या अभिरुचीप्रमाणें वेगवेगळे असतात. चित्रकला, शिल्पकला, गायन, वादन, इत्यादि, असे अनेक विषय आहेत. ईश्वराच्या साक्षात्काराइतकी या विषयांना किंमत नाहीं व कदाचित् ईश्वरी साक्षात्काराच्या आनंदाची उत्कटता किंवा टिकाऊपणा असे गुण या विषयाच्या गोडीनें उत्पन्न होणाऱ्या समाधानामध्येंहि नसतील. परंतु त्यामुळें इष्टार्थांत रमविणारी एकाग्रता व योगशास्त्रांतली समाधि या दोन अवस्थांच्या एकरूपतेचा मुद्दा लटका होत नाहीं.

समाधि व एकाग्रता यांच्या एकरूपतेचें उद्बोधन करीत असतां काकासाहेब ज्ञानेश्वरीचें व गीतारहस्याचें उदाहरण घेऊन आपलें म्हणणें स्पष्ट करीत असत. ज्ञानेश्वरीच्या शेवटीं 'समाधिधन' हा शब्द आला आहे. त्याचा अर्थ कडवे पारमार्थिक परंपरेनें कांहीं निराळा लावीत आले आहेत. परंतु दीर्घकाळपर्यंत एखाद्या विषयाचें निरंतर एकाग्र चिंतन करून बुद्धींत सिद्ध झालेल्या निःशंक विचारसंपत्तीच्या दृष्टीनें हा शब्द

ज्ञानेश्वरांनीं स्वीकारला असावा असें काकासाहेबांचें मत झालें होतें. पुटावर पुटें देऊन भट्टींतून यथाशास्त्र यथातंत्र भाजून काढलेल्या औषधींसारखाच दीर्घकालीन उत्कट मननांतून परिपाकानें व्यक्त होणाऱ्या विचारांचा प्रकार आहे. त्यांत संशयाचें लवमात्र किल्मिष उरत नाहीं. असा संदेहरहित विचारांचा जन्म समाधीसारख्या पराकाष्टेच्या एकाग्रतेच्या अवस्थेंत होत असतो.

## एकाग्रतेच्या अध्ययनाचें अभिनव फळ--गीतारहस्य

याची योग्य कल्पना होण्याकरितां काकासाहेब गीतारहस्याचें उदाहरण घेत असत. लोकमान्यांनीं गीतारहस्य उकलण्याचा उद्योग अखंडपणें सुमारें चार तपें चालविला होता. सिंहगडावर बंगला घेतला तो सुद्धां या उद्योगाच्या सुकरतेसाठीं होता. एकाग्रतेला एकान्तवासाची आवश्यकता असते. ज्ञान-विषयाची गोडी ज्यांच्या ठिकाणीं सदैव तरतरीत किंवा ताजीतवानी रहाण्याची शक्यता असेल त्यांना गर्दीत व गोंगाटांत सुद्धां एकाग्रता साधते; पण अशा एकाग्रतेनिमित्त गर्दीगोंगाटांत जी शक्ति खर्ची पडते ती एकान्तानें वांचते व एकाग्रतेची कार्यक्षमता वाढतें; या हिशोबानेंच लोकमान्यांनीं सिंहगडचा बंगला घेतला. मात्र गीतारहस्याच्या संशोधनाखातर त्या बंगल्याचा व्हावा तितका उपयोग झाला नाहीं हें देखील खरें आहे. लोकमान्यांची एकाग्रता हुकमी होती. आपल्या आवडत्या विषयाकडे वळण्याचा अवकाश कीं त्यांची एकाग्रता तत्परतेनें दासीप्रमाणें सेवेला सादर असायची. वर्षानुवर्ष, तपेंच्या तपें एकाच विषयाचा पिच्छा पुरविण्यांत ज्यांची बुद्धिमत्ता अध्ययन–मनन–निदिध्यासामें राबली तिचा परिपाक गीतारहस्यासारख्या अपूर्व ज्ञानाच्या ग्रंथानें दिसावा यांत नवल नाहीं. एकाग्रतेच्या संस्कारानें स्वतःच्या ठिकाणीं मळाचा गंधहि राहूं न देतां, शंकितांच्या हल्ल्याला दाद न देण्यासारखी

गीतारहस्यांतली भक्कम विचारसरणी आहे. अशी विचारसरणी अध्ययनाच्या समाधीनेंच लाभत असते. योगाच्या समाधींतलें ईश्वरी साक्षात्काराचें ज्ञान जसें लटपटीचें, लेचेंपेचें, भोंगळ नसतें तसेंच लोकांच्या कल्याण करणाऱ्या विचारांचें स्वरूप असतें. अशा विचारांचा साक्षात्कार हें ईश्वरी साक्षात्काराचें जुळें भावंड समजायला हरकत नाहीं. ईश्वर हा ज्ञान ( मय ) आहे, सत्य आहे या वचनांच्या आधारें ज्ञान व सत्य यांची अपूर्व अभिनव प्राप्ति ईश्वरी साक्षात्काराच्या आसनावर शेजारीं बसविली पाहिजे.

काकासाहेबांच्या प्रकृतींत स्वीकृत प्रतिपाद्याच्या ज्ञानार्जनानिमित्त व स्पष्टीकरणार्थ एकाग्र होऊन जाण्याचा गुण होता. अध्ययन–मननांत ते तासचे तास किंवा दिवस महिने सुद्धां घालवीत. अध्ययनापेक्षां मननावर त्याची मोठी भिस्त असे. भव्य उत्कट कल्याणकारी विचारांना जन्म देण्याचें व पोसून बळकट करण्याचें सामर्थ्य मननास आहे अशी त्यांची पक्की धारणा होती.

## गीतारहस्यांत पांहिलेलें लोकमान्यांचें जीवन–रहस्य

गीतारहस्यावर काकासाहेबांची विशेष भक्ति होती. लो. टिळकांनीं लोकोद्धारार्थ ज्या संकटाकुल चळवळी केल्या, त्या न करतां नुसता हा एकच ग्रंथ आपल्या आयुष्यांत लिहिला असता तरी त्यांचें नांव अजरामर झालें असतें, असें वाटण्यासारखा या ग्रंथासंबंधाचा गौरव काकासाहेब आपल्या मनांत शेवटपर्यंत वागवीत होते. व्यक्तिशः टिळकांबद्दलचा आदर त्यांच्या हृदयांतून कधींच रतिमात्र ढळला नाहीं. याचें प्रत्यंतर बोलण्याची शक्ति धड नसतांहि केवळ टिळकांच्या पुण्यस्मरणाचा आग्रह मुंबईच्या रेडियोवाल्यांनीं केला म्हणून त्यांनीं मृत्युपूर्वी टिळकांविषयीं केलेले छोटेखानी भाषण हें होय. त्यावेळीं टिळकांच्या कर्तृत्वाचें स्वरूप सांगतांना तीन चार

मिनिटें ऐन तारुण्यांतल्या वक्तृत्वाप्रमाणें त्यांचा आवाज लागला होता, हें ज्यांनीं तें भाषण ता. १ ऑगस्ट १९४८ रोजीं ऐकलें असेल त्यांना सांगायला नको. या भाषणांत गीतारहस्याचें महत्त्व त्यांनीं थोडक्यांत वर्णिलेलें आहे. टिळकांच्या लोकोद्धारमूलक ईश्वर-भक्तीचें गीतारहस्य हें अमृततुल्य फल आहे, असें त्या वर्णनांत म्हटलेलें असून गीतारहस्यांत लोकमान्यांच्या जीवनाचें सगळें तत्त्वज्ञान उतरलेलें आहे, अशी भावना ते बोलून दाखवीत असत. प्रार्थना समाजाचे व आर्य समाजाचे किंवा अर्वाचीन काळचे तत्सम पंथाचे पुढारी लोकांपुढें जीं मतें, सामाजिक वा धार्मिक सुधारणेच्या दृष्टीनें ठेवीत असतात तीं हिंदुस्थानांतील अद्वैत वेदांताच्या पायावर शेंकडो वर्षें उभ्या असलेल्या विचारसरणीला धक्के देणारी असून त्या योगानें लोकांचा निष्कारण बुद्धि–भेद होत आहे व जीवनाला अवश्य व हितावह असणाऱ्या तत्त्वज्ञानापासून लोक चळल्यास त्यांच्या उद्धाराची गति अडखळते, हें लक्षांत घेऊन टिळकांनीं गीतारहस्याचें संशोधन केलें आणि जो बोध स्वतःस झाला तो त्यांनीं जनतेला सादर केला, अशी या ग्रंथाची काकासाहेब उपपत्ति सांगत असत.

मनुष्य एखादें सत्कार्य स्वीकारून त्यासाठीं अहोरात्र अविश्रांत झटत असतांहि इष्ट फळांचा लाभ त्याच्या वाटयास येत नाहीं. वारंवार खडतर निराशाच त्याला पदरीं घ्यावी लागते. पुनः पुन्हां निराशेची पिछेहाट करूं पहाणारे तडाखे बसत असतांहि स्वीकृताच्या यशाबद्दलची आंधळी उमेद, चिकाटी, मनुष्य ज्या तत्त्वज्ञानाच्या बळावर टिकवून धरतो, तें तत्त्वज्ञान गीतेमध्यें असल्यानें टिळकांनीं त्याची कांस धरली आणि आपलें कार्य मरेपर्यंत अखंड चालविलें. परंतु हें कार्य आपल्यापुरतेंच नसून त्याची परंपरा चढत्या रीतीनें चालविणारीं शेंकडों माणसें देशांत उत्पन्न झालीं पाहिजेत व त्यांचा धीर, त्यांचा उत्साह आपल्याप्रमाणेंच टिकला पाहिजे

याची जाणीव बाळगून टिळकांनीं आपल्या अनुभवानें ताबून सुलाखून निघालेलें तत्त्वज्ञान गीतारहस्याच्या रूपानें जनतेला अर्पण केलें. हें तत्त्वज्ञान सांगतांना टिळकांनीं जुन्या तत्त्वज्ञानाचें खरें लोकोपयोगी स्वरूप स्पष्ट केलें, एवढेंच नव्हे तर त्यांनीं जुन्या प्रमेयांतील दोष झाडून त्यांची ग्राह्यतासुद्धां वाढविण्याचें काम केलें आहे, असेंहि उदाहरणें देऊन काकासाहेब बोलत असत.

## 'रहस्यां'त रमलेली बुद्धि

आमचें वैदिक अर्थात् उपनिषदांचें तत्त्वज्ञान जीवनाचा व्यवहार कणखरपणानें चालावा म्हणून जन्मास आलें असतां बुद्धानंतरच्या काळांत त्याला जें वळण लागलें, त्यानें जीवन व तत्त्वज्ञान यांची फारकत घडली. माणसाच्या सांसारिक जीवनाशीं ज्या विचारसरणीचा उभा दावा तें तत्त्वज्ञान अशी त्याविषयीं लोकांत समजूत बळावली. जीवनाचें सुख व तत्त्वज्ञान यांच्यांतील तफावत काढून टाकणारी शिकवण गीतारहस्यांत आहे, पण अजून तें रहस्य विदेहावस्थेंत आहे. लोक त्याचें आचरण करूं लागल्याशिवाय तें कर्मभूमींत प्रभाव गाजवूं लागलें असें म्हणतां येणार नाहीं. शंकराचार्य, विद्यारण्य यांचीं वचनें जशीं कीर्तन-पुराणांत घेतलीं जातात तशीं लोकमान्यांचीं वचनें जेव्हां लोक आधाराला घेऊं लागतील व तसें आचरण करूं लागतील तेव्हां रहस्याची विदेहावस्था संपली व तें कर्मभूमींत उतरलें, असें म्हणतां येईल वगैरे खुलासा या संबंधांत काकासाहेब करीत असत.

फुरसतीच्या वेळीं मनाला गुंतविणारा इतर कांहीं विषय नसेल तर गीतारहस्य घेऊन तें वाचीत बसण्याचा काकांसाहेबांचा प्रघात होता. लो. टिळकांनीं गीतेचें रहस्य विशद करतांना जुन्या तात्त्विक ग्रंथांचा अभ्यास कसा करावा, याची खूणगांठ पटविणारें विवेचन पुष्कळच केलेलें आहे.

छापण्यापूर्वी आपल्या सहकाऱ्यांपैकीं एकट्या काकासाहेबांकडूनच गीता-रहस्याचें हस्तलिखित टिळकांनीं वाचून घेतलें, या माहितींत काकासाहेबांच्या तात्त्विक विषयाच्या अभ्यासाबद्दल टिळकांना काय वाटत होतें याचा अंदाज करतां येतो. तत्त्वज्ञानानें राजकीय चळवळीमध्यें व्यक्त होणाऱ्या उग्र सौम्य भावनांचें समर्थन वा खंडन केसरींतून काकासाहेबांचीच लेखणी करीत होती. असें सांगतात कीं, आपल्याबरोबर काम करणाऱ्यांनीं रामायण भारताचें—निदान भारताचें—एकेकदां तरी सूक्ष्म वाचन करावें अशी टिळकांची इच्छा असे व ती इच्छा फक्त काकासाहेब आणि दत्तोपंत लिमये यांनींच मना-पासून कारणीं लावली. यावरून गीतारहस्य काकासाहेबांनाच मुद्दाम आवर्जून टिळकांनीं वाचायला कां दिलें याचाहि उलगडा होण्याला हरकत नाहीं.

## वैदिक ग्रंथमालेअन्वयें 'रहस्य'—संकीर्तन

काकासाहेबांनीं गीतारहस्य केवळ अंधश्रद्धेनें वाचलें नाहीं, तर ज्या शंका उपस्थित झाल्या त्याबद्दल टिळकांजवळ वेळोवेळीं चर्चा केली व त्यांच्याकडून आपल्या शंकांचें पूर्ण समाधान करवून घेतलें. काकासाहेबांनीं गीतारहस्याविषयीं जी भावना पुढें साऱ्या आयुष्यांत आदरिली तिच्यामागें असा इतिहास आहे. परंतु अखेरच्या दहा बारा वर्षांत काकासाहेबांनीं पुरुषसूक्त, रुद्र, त्रिसुपर्ण, संध्या व कांहीं उपनिषदें यावर जीं भाष्यें लिहिलीं तीं गीतारहस्यांतील शिकवण, अन्य ग्रंथांच्या आधारानें त्यांच्या मनोगताप्रमाणें कर्मभूमींत उतरविण्यासाठीं, हें येथें ध्यानांत बाळगणें अवश्य आहे. काकासाहेबांचीं हीं भाष्यें म्हणजे गीतारहस्यांतील शिकवणीचीं फळें होत.

लेखक, प्रतिपाद्य विषय व त्याचा ग्राहक यावरून काकासाहेबांबद्दल कित्येक आठवणी निरनिराळ्या स्वरूपाच्या निवेदन केल्या तरी गीता-रहस्याच्या अनुरोधानें वरील त्रिपुटीचा एकसंधीपणा कसा उत्पन्न व्हायला पाहिजे याचें काकासाहेब जें विवरण करीत त्याची उजळणी केल्याशिवाय तो

विषय स्पष्ट होणार नाहीं. टिळकांच्या केसरींतील अग्रलेखामध्यें जें धोरण कटाक्षानें राखलें जात असे तेंच धोरण गीतारहस्याच्या सबंध रचनेंत उतरलेलें आहे; असें काकासाहेब त्याबद्दल प्रकरणाप्रकरणाचा झाडा घेऊन समजावून देत. किल्ला जिंकण्याच्या कृतीचा दाखला देऊन ते म्हणत कीं, किल्ला सर करतांना चोहोंकडे तोफांचे मोर्चे लावले तरी त्या सर्वांचा मारा ज्याप्रमाणें एका किल्ल्याच्याच रोखानें केला जातो तसाच प्रतिपाद्य विषयाच्या निरूपणाचा प्रकार असावयास पाहिजे. प्रतिपाद्याच्या अनुषंगानें कांहीं संलग्न विषय उपस्थित होतात, परन्तु त्याच्या योगानें आपली दृष्टि फाकूं न देण्याची काळजी लेखकानें न घेतली तर त्याचा लेखनपसारा वाया जाईल. गीतारहस्यांत सांख्य, योग वगैरे शास्त्रांचा टिळकांनीं अधिकारबुद्धीनें परामर्ष घेतला आहे, तो घेतांना त्या शास्त्राशीं जुळणारीं निराळ्या नांवाची आधुनिक भौतिक शास्त्रें वगळलेलीं नाहींत, परंतु या सर्व तन्हेच्या विवेचनाचा मारा कर्मयोगशास्त्र सिद्ध करण्याच्या उद्दिष्टावर केलेला आहे. तें उद्दिष्ट डोळ्याआड न होऊं दिल्यामुळें वाचकांची कोणत्याहि प्रकरणामध्यें दिशाभूल होत नाहीं. सर्वत्र त्याला निष्काम कर्मयोगाचें दर्शन घडत रहातें व त्याचेच ध्वनी ऐकूं येतात. पुनः वाचकाची बौद्धिक योग्यता ध्यानांत ठेवून नव्यानें उपस्थित होणारा प्रत्येक विषय टिळकांनीं अतिशय सुबोध केलेला आहे. पुष्कळदां गीतारहस्यांत पाल्हाळ आहे असें वाटतें. तो पाल्हाळ लोकमान्यांना टाळतां आला असता, परंतु वाचकाला कुटेंहि बुचकळ्यांत पडण्याची पाळी येऊं नये म्हणून टिळकांनीं पाल्हाळाचा दोष पत्करला पण विवरणाचा मुख्य मुद्दा सोडला नाहीं. आपण विद्वान आहों, विषय बिकट आहे व जनता ज्ञानाच्या दृष्टीनें कमकुवत आहे; परंतु तिच्याकरितां जर ग्रंथ लिहावयाचा तर शक्य तेवढें सुबोध स्पष्टीकरण हाच एक उपाय टिळकांसमोर होता. आपल्या जाणतेपणाच्या उंचीवर जनतेनें

यावें, जनतेसाठीं आपण खालीं उतरणार नाहीं अशा बाण्याचे कित्येक लेखक असतात. जनताहि सामान्यत: त्याची विचारपूस करीत नाहीं. हा प्रकार जनतेच्या परम कल्याणाच्या बुद्धीनें ग्रंथ लिहिणारांमध्यें संभवत नाहीं. लोकमान्य हे जनतेच्या कल्याणासाठीं लिहिणारे होते व तसेंच सर्वांचें ध्येय असावें असें काकासाहेबांचें प्रतिपादन व आचरण असे.

## वृत्तपत्रीय धोरणाचें तारतम्य

नवाकाळकडे अभिप्रायार्थ येणाऱ्या सर्व पुस्तकांची दाद घेण्याचा काकासाहेबांचा स्वभाव किंवा प्रघात नसला तरी साधारणपणें नवीं पुस्तकें कोणतीं प्रसिद्ध झालीं आहेत या विषयीं ते उदासीन नसत. काकासाहेबांची राजकीय, आर्थिक, सामाजिक विषयांतील मतें काय आहेत, याचा त्यांच्या सहकाऱ्यांना अंदाज असल्यामुळें त्या त्या विषयाच्या पुस्तकावरील अभिप्राय कसा लिहावयाचा याबद्दल अभिप्राय–खात्याच्या मंडळीची सहसा चूक होत नसे.

जातिभेदनिरसनाच्या बाबतींत साधारणपणें वारकरी संप्रदायाच्या विचारसरणींतील औदार्याइतकी मजल आपण ठेवावी, कालांतरानें त्यांच्या औदार्याचा विस्तार होण्याची वेळ आल्यास आपणहि त्यांच्या बरोबरीनें पुढें जाऊं, महाराष्ट्रांतील जनतेच्या जातिभेदविषयक प्रगतीची वारकरी पंथ ही कसोटी समजावी, अशा तऱ्हेच्या सूचना त्यांनीं नवाकाळमध्यें तो मजकूर लिहिणाराला दिल्या. म. गांधी अस्पृश्यतानिवारणाचे पुरस्कर्ते होते. काँग्रेसच्या कार्यक्रमांत अस्पृश्यता निवारणाला अव्वल दर्जाचा मान दिला जात होता, मग वारकऱ्यांच्या दंडकाचा अवलंब नवाकाळनें कां करावा, जनतेची अस्पृश्यतानिवारणासंबंधात किती तयारी आहे याबद्दलची अटकळ सोडून नवाकाळमध्यें ईर्ष्येच्या अतिरेकाचा पुरस्कार कां होऊं नये, या धोरणाचें सरळ उत्तर काकासाहेबांकडून मिळालें.

टिळकांना समाजांतील विषमता जावी असें वाटत होतें. त्यांनीं एकदां अस्पृश्यतानिवारणाविषयीं आपलें स्पष्ट अनुकूल मत प्रसिद्ध केलें होतें. परंतु रोजच्या राजकारणांत त्यांनीं या मतांचा पुरस्कार केला नाहीं. सामाजिक, धार्मिक विषयाची राजकारणाशीं सांगड घातल्यास राजकारणावर लोकांची दृष्टि जशी केंद्रित व्हायला पाहिजे तशी होत नाहीं, म्हणून राजकारणाला अर्थात् स्वराज्यप्राप्तीच्या ध्येयाला लोकांची दृष्टि बांधून टाकणें अवश्य, या टिळकांच्या विचारसरणीनें काकासाहेबांनीं अस्पृश्यतानिवारणाच्या विषयाबद्दल पूर्वी सांगितल्याप्रमाणें आपलें धोरण निश्चित केलें होतें.

## अहिंसा व मानवी स्वभाव

वृत्तपत्राच्या स्वातंत्र्याबद्दल काकासाहेबांचें मनोगत काय होतें, हें स्पष्ट करणारी एक गोष्ट येथें सांगण्याजोगी आहे. एकदां अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनें असा ठराव केला कीं, काँग्रेसभक्त वृत्तपत्रांनीं वर्षांतून निदान १०—१२ वेळा तरी अहिंसेचें प्रवचन करावें. तो ठराव किती वृत्तपत्रें अंमलांत आणतात याची पहाणी काँग्रेसमधील कित्येकांनीं सुरू केली. 'नवाकाळ' मध्यें ठराव पास झाला तेव्हां त्याचें महत्त्व प्रतिपादन करणारा एक लेख प्रसिद्ध झाला; पण नंतर दोन तीन महिन्यांत अहिंसेचें संकीर्तन मुळींच झालेलें नव्हतें. त्यामुळें काँग्रेसचे एक अधिकारी येऊन त्यांनीं तक्रार आरंभिली पण तिची त्यांना पाहिजे तशी दाद न लागल्यामुळें शेवटीं हा तंटा काकासाहेबांसमोर निकालाकरितां नेण्यांत आला. काकासाहेबांनीं संपादकाची बाजू ऐकल्यावर सौम्य शब्दानीं त्याचें समर्थन त्या काँग्रेसवाल्याच्या कानीं घातलें, परंतु त्याचें समाधान होण्यासाठीं 'योग्यवेळीं अहिंसेच्या पुरस्काराला चुकूं नका, जागरूकतेनें ह्या विषयावर लिहा' असेहि शब्द उच्चारले.

अहिंसा-प्रचाराच्या चर्चेच्या या वेळीं काकासाहेबांना आपण एकदां नेपाळांत सशस्त्र क्रांतीच्या उद्योगासाठीं गेलों होतों या गोष्टींचें स्मरण होऊन आतां अहिंसेचा पुरस्कार कां करावयाचा यांचेंहि त्यांनीं थोडक्यांत विवेचन केलें. देशव्यापी लोकजागृतीच्या पाठिंब्यानें सशस्त्र क्रांतीची लाट उठवायची हा विचार महात्माजींच्या नवीन अहिंसात्मक क्रांतीमार्गानें सोडावा लागला व तसें करणें उचित असलें तरी माणसाच्या प्रवृत्तीमध्यें जुलमाच्या प्रतिकारासाठीं हिंसेचा आश्रय करण्याची वृत्ति इतकी भिनलेली आहे कीं, तिचा विसर पडणें शक्य नाहीं. ह्यांतून हिंसात्मक सरकारी उपायांचा अहिंसेनें मुकाबला करण्याची कल्पना बुद्धींत समजायला फार कठीण आहे. सामान्यत: हिंसेचें समर्थन कोणी करीत नाहीं व पूर्वी जेव्हां हिंसाचरणाकडे कित्येक तरुण वळले तेव्हां देखील त्यांचा पाठपुरावा कोणीहि जबाबदार पत्रकारानें केलेला नव्हता. परंतु या बाबतींत सक्तीची अपेक्षा चुकीची आहे. पत्रकारांच्या विवेक-स्वातंत्र्यावरच भिस्त ठेवणें जास्त चांगलें, वगैरे अर्थाचे विचार ते बराच वेळ बोलत होते.

## प्रेम-भावनेच्या विटंबनेवर कटाक्ष

दुसरा प्रसंग कै. गो. चि. भाटे यांनीं लिहिलेली 'प्रेम की लौकिक' ही आत्मवृत्तपर कादंबरी प्रसिद्ध झाली तेव्हांचा आहे. 'ही कादंबरी अभिप्रायार्थ आली तर आपल्यास पहायला पाहिजे' अशी काकासाहेबांनीं अगोदरच आपल्या कचेरींत सूचना देऊन ठेवली होती. पुस्तक आल्यावर अर्थांतच प्रथम तें त्यांच्या हवालीं करण्यांत आलें. त्यांनीं साद्यंत चाळून पाहिलें व अभिप्रायलेखकामवळ ह्या पुस्तकाच्या गुणदोषाची चर्चा करून त्यांनीं अभिप्रायाचें धोरण सांगून टाकलें. त्या कादंबरींतील नायकानें लौकिक झिडकारून प्रेमाची मातब्बरी संभाळली. लौकिकाहून प्रेम श्रेष्ठ

असें त्या नायकाला लोकांच्या मनावर ठसवायचें आहे. काकासाहेबांचा ह्या चर्चेंच्यावेळीं प्रेमाच्या भावनेविरुद्ध रोख नव्हता. प्रेम केव्हांचें यावर त्यांचा रोख होता. एक मनुष्य पहिली बायको मेल्यावर दुसरें लग्न करतो. तिच्याबरोबर कांहीं वर्षें संसार झाला; तो संसार मुलांनीं फुलला व नंतर ही दुसरी बायको मेली. या पुरुषाचें वयोमान वानप्रस्थाश्रमाला योग्य अशा मर्यादेस पोंचलें असतां तो पुनः एका बाईच्या प्रेमपाशांत अडकतो, या प्रेमाचें स्तोम माजवितो, आणखी पुढें जाऊन प्रेमाच्या थोरवीपुढें लौकिकाला कस्पटासमान लेखलें अशी स्वतःच्या बढाईची ध्येयवादी टिमकी वाजवायला हा कादंबरीचा नायक धजतो. ही प्रेमभावनेची विटंबना आहे. नायक तरुण असता, त्याचें पहिलेंच लग्न असतें, अशा स्थितींत जर त्याच्यावर एका बाजूस प्रेम व दुसऱ्या बाजूस लौकिक यांच्या ओढताणीचा पेचप्रसंग ओढवला असता व त्यानें आईबापांची ममता, नातेवाईकांच्या आशा, स्वज्ञातीच्या अपेक्षा, लौकिक मिळण्याची खात्री या सर्वांवर तिलांजलि सोडून तो प्रेमाला शरण गेला असता तर त्यांत प्रेमाची शोभा होती. प्रेम ही एक पवित्र मंगल अशी भावना असून तिचें नांव कोणी, आपल्या वैवाहिक चंचलपणाला दिल्यास तो चंचलपणा झांकला जाऊं शकत नाहीं. एखाद्यानें दोन बायका मेल्यानंतर चांगल्या पोक्त वयांत तिसऱ्या लग्नाचा अव्यवस्थित बालिशपणा आचरला तर मानवी कमकुवतपणाचें एक लक्षण म्हणून त्याची कींव करतां येईल; पण असा मनुष्य कमकुवतपणा हीच लोकोत्तर बलाढ्यता असा डौल डंके वाजवून मिरवूं लागला तर त्याची उपेक्षा करून चालणार नाहीं; त्याला त्याचें समाजांतील योग्य स्थान दाखविलेंच पाहिजे. वृत्तपत्रांनीं याबाबतींत जागरूक राहून आपली जबाबदारी संभाळली पाहिजे. याप्रमाणें बोलून झाल्यावर काकासाहेबांनीं लंडन टाईम्स या पत्रांत ॲस्क्विथ साहेबांच्या पत्नीनें लिहिलेल्या आत्मवृत्तावर आलेल्या

सडेतोड अभिप्रायाचा दाखला दिला. ॲस्क्विथ हे इंग्लंडांतील लिबरल पक्षाचे पुढारी व १९१४ सालच्या पहिल्या महायुद्धाच्या आरंभीचे इंग्लंडचे मुख्य प्रधान होते. नंतर त्यांना लार्डाची पदवी देण्यांत आली. शेवटीं आर्थिक दृष्ट्या जी विपन्नावस्था भोगावी लागत होती ती कमी होण्यासाठीं त्यांनीं दोन पुस्तकें लिहिलीं व त्यांच्या बायकोनें एक पुस्तक लिहिलें. या पुस्तकांत त्या बाईनें लग्नापूर्वीच्या अनेक उच्छृंखल लीला वर्णिल्या आहेत. इंग्लंडांत अशा प्रकारांना प्रतिबंध नसला तरी त्याचें कौतुक लोकांना आवडत नाहीं व म्हणून लंडन टाईम्समें त्या पुस्तकाची सडकून हजेरी घेतली. या दाखल्याअन्वयें प्रेम कीं लौकिक · या पुस्तकाचें परीक्षण नवाकाळकडून झालें.

जातां जातां अश्लील वाङ्मयाचा जो वाद मधून मधून पेटतो व एरवी धुमसत असतो त्या बद्दलचें काकासाहेबांचें हृद्गत काय होतें तें सांगायला हरकत नाहीं. १९३३ सालीं नागपुरास भरलेल्या साहित्य संमेलनाच्या वेळीं त्यांच्यापुढें हा प्रश्न ठेवण्यांत आला. तेव्हां त्यांनीं ज्याला अश्लील म्हणतात तें लोकांना ज्या रंजकतेमुळें आवडतें तशा रंजकतेनें अश्लीलाचा निषेध इच्छिणारांनीं आपलें म्हणणें लोकांपुढें ठेवल्यास आपोआपच तथोक्त ( so-called ) अश्लीलाला बाजारांतून काळें करावें लागेल, अशा अर्थाचे उद्गार काढून अश्लीलाच्या विरोधकाला वाटेस लावलें.

## वृत्तपत्रें आणि वाङ्मय

काकासाहेबांच्या नाटकांबद्दल अनुदारपणानें बोलण्याची संवय असणारे लोक आपल्या संवयीचें समर्थन करण्यासाठीं त्या नाटकांची भाषा वर्तमानपत्री आहे असें म्हणतांना आढळतात. उलटपक्षीं खाडिलकरांनीं आपल्या नाटकी भाषेला केसरीच्या रकान्यांत आणून वृत्तपत्राचें गांभीर्य नाहींसें केलें, असा आक्षेप उच्चारणारेहि लोक केव्हां केव्हां भेटत असत.हीं परस्पर विरोधी

भिन्न मतांचीं माणसें वस्तुतः एकमेकांच्या मताला काट देतात हें सहज कळण्यासारखें आहे. टिळकच कायते एकटे जहाल भाषा वापणारे व खाडिलकरांसारखे टिळकांच्या मानानें नवे लेखक मवाळ आहेत; त्यांच्या विचारांत व भाषेंत टिळकांचा तिखटपणा नाहीं, असें मानणारांपैकीं कोणी टिळकांकडे गेले व 'तुम्ही नवीं माणसें काढून टाका, निदान त्यांना अग्रलेख लिहायला सांगूं नका, त्यांच्या लिहिण्यांत राम वाटत नाहीं' असें गाऱ्हाणें त्यानें टिळकांच्या कानीं घातलें. ज्या चार सहा लेखांवरून त्या इसमानें आपली तक्रार बनविली होती ते लेख टिळकांचे होते व टिळकांचे म्हणून त्यानें ज्या लेखांची नांवें घेतलीं ते खाडिलकरांचे होते. त्याचें गाऱ्हाणें तपशीलवार ऐकून घेतल्यावर टिळकांनीं हसत उत्तर केलें कीं, तुम्ही वाखाणलेल्या लेखांच्या नांवावरून यापुढें केसरींत लिहिण्यास मी लायक नाहीं व ज्यांना तुम्ही नालायक समजतां तेंच लायक आहेत, असें स्पष्ट दिसतें. टिळकांचें उत्तर ऐकल्यावर तक्रारखोराला तोंडांत मारून घेण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता.

या आख्यायिकेंतील मर्म काकासाहेबांचीं नाटकें व ह्यांचे लेख यांच्या परीक्षेला उपयोगी पडणारे आहेत. काकासाहेबांकडून Style is the Man या सुभाषितान्वयें खुलासा झाला होता. 'माणसांची लेखनशैली एकदां निश्चित झाल्यावर तिचा पराभव त्याच्या सर्वप्रकारच्या लेखन–व्यवहारांत दृष्टीस पडावा यांत आश्चर्य करण्याजोगें कांहीं नाहीं. वर्डस्वर्थचें गद्य आणि पद्य ही दोन्ही वृत्तांचा विचार सोडल्यास सारखींच भासतात; किंवा आपल्या देशांतील उदाहरण घेतल्यास रवींद्र बाबूचें आहे. ह्यांच्या कवित्वाच्या छटा गद्य लेखनांतहि उत्कटतेनें चमकतात. एका आईच्या कुशींतून जन्म घेणाऱ्या मुलामुलींच्या तोंडावळ्यांत कांहीं साम्य जसें हटकून सांपडतें, आईबाप माहीत नसले तरी तीं एकमेकांचीं भावंडें आहेत अर्थात् तीं एकाच आईबापाचीं

अहेत याचा बोध आपल्याला करून घेतां येतो तशीच एका लेखणीच्या पोटीं जन्म पावणाऱ्या वाङ्मयप्रकाराची जन्मस्थ समजावी. जे कोणी वृत्तपत्री नाटक अथवा नाटकी वृत्तपत्र असा शब्दांचा खेळ करतात, त्यांना आपण वाङ्मयप्रकारांच्या भाषेचे सूक्ष्म ज्ञानी आहों, असें भासवावयाचें असतें. टिळक केसरींत अग्रलेख खरडणारे, त्यांना ग्रंथाला अवश्य असणारी प्रतिपादन पद्धति कशी साधणार ? या संशयानें गीतारहस्याला केसरींतल्या अग्रलेखांची उपमा देऊन त्या ग्रंथाची किंमत उतरवूं पहाणारे शहाणे गीतारहस्याच्या प्रसिद्धीनंतर एक दोन वर्षांत निघाले होते. कादंबरी, नाटक, निबंध अथवा कविता यापैकीं कसलाहि वाङ्मयप्रकार निर्माण करीत असला तरी त्यांना जन्म देणारा मनुष्य मुळांत एकच असतो, विचार बाहेर टाकणारी बुद्धीची मूस (mould) एकच असते, त्या मुशीचा आकार व गुण त्याच्या लेखनांत प्रकट झाल्याशिवाय रहात नाहीं, याचा अशा टीकाकारांना विसर पडतो.'

## इंग्रजीवरचें प्रभुत्व

काकासाहेबांचें इंग्रजी भाषेवर प्रभुत्व नव्हतें, असा प्रवाद एखाद दुसऱ्या बहुमान्यानें आपला प्रत्यक्ष अनुभव म्हणून विकविला असला तरी त्याचें निराकरण परभारें अनेकांकडूनच आजवर झालेलें आहे. १९०८ नंतर ते 'मराठा' पत्राचे संपादक होते व त्यांच्या संपादकीय काळांत ते दुसऱ्याकडून मराठा भरून काढीत असत असा पुरावा जोंवर कोणी पुढें आणलेला नाहीं तोंवर त्यांचें व इंग्रजी भाषेचें सूत नव्हतें हा प्रवाद केवळ त्यांच्या अंगीं येनकेनप्रकारेण कमीपणा चिकटविण्याच्या प्रयत्नांपैकींच समजायला पाहिजे. त्यांचीं इंग्रजींतील अस्खलित वक्तृत्वसंपन्न व त्या भाषेवर प्रभुत्व दर्शविणारीं भाषणें ऐकल्याच्या आठवणी यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या आहेत. इंग्रजीबद्दल त्यांना भक्ति नव्हती असें फारतर म्हणतां येईल, परंतु त्यावरून

त्यांना इंग्रजी भाषेमध्यें गति नव्हती ही कल्पना चुकीची, असें सिद्ध करणारा एक प्रसंग नवाकाळच्या कांहीं अग्रलेखांवरून उत्पन्न झाला होता. महाराष्ट्र काँग्रेस कमिटी ताब्यांत ठेवण्याच्या केळकर पक्षाच्या प्रयत्नावर टीका करणारे लेख काकासाहेबांनीं लिहिले. ते लेख आपल्या अब्रूच्या चिंधड्या उडविणारे आहेत, असा त्याविरुद्ध कांगावा माजवून त्या महाराष्ट्रीयांनीं अब्रूनुकसानीची फिर्याद काँग्रेसकडे गुदरली. नेमलेल्या न्यायाधीशांमध्यें एक न्यायाधीश पं. जवाहरलाल नेहरू होते. न्यायाधीशांना लेखांचें रहस्य कळण्यासाठीं त्यांचें इंग्रजींत भाषांतर करण्याची आवश्यकता साहजिकच उत्पन्न झाली. काकासाहेबांसाठीं तसें भाषांतर मुंबई इलाख्यांतील इंग्रजीचे नामांकित लेखक व प्रोफेसर आणि इंग्रजीच्या ज्ञानाविषयीं प्रसिद्ध असलेले एक वकील अशा दोघांकडून करवून घेतल्यावर ह्या दोघांना जोडीला घेऊन काकासाहेबांनीं त्याची तपासणी केली.

ही तपासणी कांहीं तासपर्यंत काकासाहेब अतिशय एकतानतेनें करीत होते. यातेळीं काकासाहेबांचें इंग्रजीचें सूक्ष्म ज्ञान त्या दोघां पंडितांच्याहि प्रत्ययास येऊन त्यांनाहि अचंबा वाटला. एका शब्दाऐवजीं वरून समानार्थ दिसणारा दुसरा शब्द स्वीकारल्यानें अर्थाच्या छटा कशा बदलतात व त्यांतील कोणत्या छटेचा शब्द आपल्यास उपयोगी म्हणून ग्राह्य आहे याची काकासाहेबांच्या तोंडून होणारी चर्चा त्या पंडितांनाहि अतिशय मार्मिक व उद्बोधक वाटली. शब्दांच्याप्रमाणें वाक्यरचनेचाहि काकासाहेब, फेरफार सुचवीत होते त्यांतील कित्येक फेरफार भाषांतरकर्त्यांनीं पसंत केले. मराठीचें हें इंग्रजींतलें भाषांतर शाळा—कॉलेजांतील अभ्यासापैकीं नसून तें फिर्यादीविरुद्ध बचावाचें भाषांतर करावयाचें आहे याचें भान भाषांतरकारांना नव्हतें. त्यांनीं परीक्षेंत अव्वल नंबरानें पास होण्यासारखें उत्कृष्ट भाषांतर केलें होतें, पण वाद जिंकण्याला त्या भाषांतराचा उपयोग नाहीं, हें प्रत्येक

वाक्याचें भाषांतर पहातांना काकासाहेब त्या पंडितांना सुचवीत होते. थोडया वेळानें त्यांना काकासाहेबांचा हेतु लक्षांत येऊन भाषांतराची तपासणी कांहींशा जलदगतीनें होऊं लागली. काकासाहेबांना इंग्रजीचें ज्ञान किती होतें हें यावरून लक्षांत येईल.

दुसरा प्रसंग त्यांना ज्या लेखानिमित्त राजद्रोहाची शिक्षा भोगावी लागली त्या लेखाचा आहे. तो लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी दोन वेळा बारकाईनें तपासला होता. लेखकाशीं चर्चा करून कित्येक ठिकाणीं सुधारलाहि होता. लेख तपासतांना जीं वाक्यें नडतील त्या वाक्यांचें इंग्रजी भाषांतर करून त्यांतून राजद्रोह निघेल कीं काय याची परीक्षा काकासाहेब करीत होते. शेवटीं आपल्या मतें तो निर्दोष झाला अशी खात्री पटल्यावर तो छापण्यास पाठवून दिला. पुढें कोर्टांत भाषांतराची कसून झडती झाली तेव्हां तो लेख तितकासा राजद्रोहात्मक नसला तरी अनुरोधानें 'संकीर्ण समालोचना' च्या सदरांत आलेलीं स्फुटें त्या लेखांतल्या गुप्त राजद्रोहाला स्पष्ट करणारीं आहेत, याप्रमाणें पवित्रा बदलून फिर्यादी पक्षानें विजय साधला. काकासाहेबांचें इंग्रजीचें ज्ञान निदर्शनास आणणारा तिसरा प्रसंग ज्या लेखाबद्दल सरकारनें नवाकाळची जामीन रक्कम जप्त केली त्या लेखकाच्या इंग्रजी भाषांतराच्या वेळचा आहे. तेव्हां Truth is no defence या तत्त्वान्वयें न्यायाधीशांनीं 'जमानत जप्ती योग्य होती' असा निकाल दिला.

# काकासाहेबांविषयीं नटवर्गाच्या आठवणी

## नटसम्राट नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व

### तालमींनीं पुढें आणलें

काकासाहेब खाडिलकरांचें नांव निघतांच मला कै. नानासाहेब जोगळेकर यांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. काकासाहेबांच्या तालमींनीं जसें मला नट म्हणून पुढें आणलें त्याचप्रमाणें जोगळेकरांना पुढें आणलें. जोगळेकर १९०१ च्या सुमारास किर्लोस्कर कंपनींत कै. भाऊराव कोल्हटकर यांच्या पसंतीनें आले आणि नंतर भाऊरावांच्या निधनानंतर सर्वच जबाबदारी त्यांच्यावर पडली. या जबाबदारीचें दडपण त्यांच्या मनावर नित्य असे आणि त्यांतच भाऊरावांच्या वेळचे म्हणून जे लोक किर्लोस्कर कंपनींत होते ते शक्य त्या मार्गांनीं त्यांचा हिरमोड करावयास कमी करीत नसत. जोगळेकर रंगभूमीवर आपलीं पदें कसून गात. पण त्यावरहि बोडस वगैरे मंडळी उगीच किती वेळ गातां असें त्यांना म्हणत असत. त्यावर जोगळेकर म्हणत, 'अरे, कसून गात असावें मिळाला तर चान्स मोअर मिळूनहि जाईल. नाहीं तर गाण्यांत टाळाटाळ करीत नाहीं एवढें तर लोकांना वाटेल ?'

नट या दृष्टीनेंहि कै. जोगळेकर कसून काम करीत. त्यांना देवलांची तालीम मिळालेली होती. पण एकतर जोगळेकर सुशिक्षित म्हणून आणि नवे म्हणून देवलांच्या मर्जीतील नव्हते. मी १९०५ सालीं किर्लोस्कर कंपनींत प्रवेश केला. कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या शिफारशीनें गुरुद्वादशीला मी

किर्लोस्कर कंपनींत दाखल झालों. तेव्हां माझा आवाज नुकताच फुटलेला होता. माझा फुटलेला आवाज श्री. देवल यांनीं ऐकल्यावर माझ्याविषयीं निराशाच व्यक्त केली. पण जोगळेकर यांना फुटलेला आवाज कमावल्यावरे किती सुधारतो याची माहिती असल्यामुळें त्यांनीं मला पसंत केलें. त्यानंतर मिरजेच्या मुक्कामांत खुद्द देवल हे सहा महिनेपर्यंत माझ्या व जोगळेकरांच्या तालमी घेत असत. त्याचा फायदा आम्हां दोघांना झालाच. पण नट या दृष्टीनें त्यांना किंवा मला या तालमींनीं पुढें आणलें नाहीं. तें काम काकासाहेबांच्या मानापमान नाटकाच्या वेळीं त्यांच्याकडून मिळालेल्या तालमींनीं केलें.

प्रेमशोधन नाटकाच्या तालमी प्रथम गणपतराव बोडसांनीं घेतल्या होत्या. पण त्यांच्या तालमींचा गुण असा कीं नाटकांत कसा तो रंग भरेना. त्यानंतर काकासाहेबांनीं याच नाटकांच्या तालमी घेतल्या व नाटक रंगूं लागलें. काकासाहेबांच्या गद्य नाटकांचा प्रभाव कै. जोगळेकरांना माहीत होता व प्रेमशोधनाचे वेळीं त्यांच्या तालमींचा अनुभव आला. त्यानंतर काकासाहेबांजवळ जोगळेकरांनीं नवें संगीत नाटक मागितलें व कीकासाहेबांनीं तें कबूल केलें. किर्लोस्कर कंपनींत काकासाहेब येऊं लागले त्यावेळीं त्यांची व माझी ओळख झाली.

## तालमींचा वक्तशीरपणा व दरारा.

मानापमान नाटकाच्चे वेळीं काकासाहेबांचा तालमीच्या वेळचा दरारा फार असे. तालमींना दुपारीं तीन वाजतां सुरुवात होई. नाटकांत कामें करणारे सर्व नट त्यापूर्वी तेथें हजर पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असे. मध्यें कोणी उठून जाण्याची सोय नसे. लघुशंकेला कोणाला जावयाचें झालें तरी परवानगीनें जावें लागे. मानापमान नाटकाचे तालमींचे वेळीं किर्लोस्कर कंपनींतील दुपारच्या चहाची वेळ तीननंतरची होती. चहाची वेळ झाली कीं

एक एक नट तालमी सुरू असतांना चहासाठीं जात असे. काकासाहेबांच्या हें लक्षांत येतांच त्यांनीं एकदम शंकरराव मुजुमदारांना पुकारलें, आणि सांगितलें, माझ्या तालमींच्या वेळीं चहासाठीं नटांना येथून जावें लागूं नये, येथेंच प्रत्येकाला बाजूला जाऊन चहा घेतां येईल अशी व्यवस्था ठेवा. काकासाहेबांच्या तालमी दुपारीं बरोबर तीन वाजतां सुरू होत, आणि बरोबर सहा वाजतां संपत. सहाच्या ठोक्याला जर वाक्य अर्धें राहिलेलें असेल तर तेंहि न संपवितां तालमी बंद होत. हा त्यांचा क्रम पुढच्या नाटकांच्या वेळींहि सुरू असे. खेळ रंगभूमीवर येण्यापूर्वीचे थोडे दिवसच काय तो तालीम संपण्याच्या वेळेंत थोडासा फरक होत असे.

मानापमानाच्या वेळीं कै. जोगळेकरांनीं धैर्यधराच्या भूमिकेसाठीं अत्यंत कसून मेहनत घेतली. संध्याकाळच्यावेळीं तालमी आटोपल्यावर ते फिरावयास जात आणि रात्रीं पदें व नकला खड्या आवाजांत ते सुरू करीत. किर्लोस्कर मंडळीचे जुने म्हणविणारे नट त्यांची याबद्दल चेष्टा करीत व आपली झोंपमोड झाल्याची तक्रार करीत. त्यावर जोगळेकर म्हणत, माझें काम नव्या नाटकांत चांगलें झालें पाहिजे म्हणून मी ही मेहनत करीत आहें. ज्याची त्यामुळें झोंपमोड होत असेल त्यांनीं कानांत खुशाल बोळे घालून घ्यावे.

## भूमिका समजावून सांगण्याची अपूर्व हातोटी

नटाला त्याची भूमिका बरोबर समजून त्यानें ती वठवावी म्हणून काकासाहेब फार काळजी घेत. भूमिका समजल्याशिवाय आणि नट त्यांत एकरूप झाल्याशिवाय त्याचें काम कधी वठावयाचें नाहीं असा त्यांचा रोख असे. त्यामुळें नाटकांतील भूमिकांची, प्रसंगांची त्याचप्रमाणें महत्त्वाच्या वाक्यांची ते फोड करून सांगत, आणि त्यावेळचें त्यांचें विवेचन इतकें मार्मिक व रसाळ असे कीं त्यांत नटमंडळी तल्लीन होत. काकासाहेबांच्या

ग्रंथालय
I. G. 9822
713153

निरनिराळ्या नाटकांच्या तालमींत आम्हाला भारत-रामायणाचें रसग्रहण आनायासें घडलें. नुसतें ॲक्टिंग व टोनिंग न सांगतां नटाला त्याची भूमिका समजावून देण्याची त्यांची हातोटी दुसऱ्या कोणाहि तालीम मास्तराच्या ठिकाणीं मला आतांपर्यंत आढळलेली नाहीं. देवल मास्तर ॲक्टिंग, टोनिंग याच्या बाबतींत सर्व भिस्त ठेवीत आणि त्यांचें शिकवणें फार चांगलें असे. पण त्यांनीं नटाला भूमिका समजावून सांगितल्याचें मला तरी कधीं आठवत नाहीं. आपल्या सांगण्याप्रमाणें नटाकडून ते काम करवून घेत व तें त्याला जमलें नाहीं म्हणजे तो त्यांच्या मर्जीतून उतरे. काकासाहेब नटाच्या दृष्टीनें भूमिकेकडे पहात आणि त्याच दृष्टीनें त्याला ती समजावून देतांना ते त्याचा कधीं हिरमोड करीत नसत. तालमीच्या वेळीं एखादा अभिनय एखाद्या नटाला जमत नाहीसें वाटलें तर इतरांचा वेळ फुकट जाऊं नये म्हणून काकासाहेब तितकेंच ठेवीत आणि तालमी संपल्यावर त्या नटाला सर्व वाक्य व अभिनय समजावून देऊन त्याच्याकडून तो अभिनय वठवून घेत.

## 'मानापमाना'चें अलोट यश

काकासाहेबांच्या तालमींमुळें आणि जोगळेकरांच्या मेहनतीमुळें मानापमान नाटक अत्यंत गाजलें व यशस्वी झालें. याच नाटकांत गायक म्हणून व नट म्हणून जोगळेकर व मी नांव कमावून पुढें आलों. आम्ही दोघेंच नव्हे सर श्री. गणपतराव बोडसहि लक्ष्मीधराच्याच कामामुळें लोकांच्या नजरेंत भरले. पूर्वी शकार वगैरे कामें ते करीत. पण लक्ष्मीधराच्या भूमीकेनें त्यांना लौकिक मिळाला. लक्ष्मीधराची भूमिका काकासाहेबांच्या तालमीबरहुकूम ते वठवितात व त्यांतच त्यांच्या यशाचें मर्म आहे. मानापमान नाटकाला पैसा अतोनात मिळाला. नाटक रंगभूमीवर आल्यानंतरच्या पहिल्या सहा महिन्यांत या एका नाटकावर किर्लोस्कर कंपनीला छपन्न हजार रुपये

मिळाले. कर्नाटकांत आमच्या कंपनीचा मुक्काम असतांना तिकिटविक्री कंपनीच्या बिऱ्हाडींच असे. तिकिटें ध्यावयास आलेले लोक भामिनीचें काम करणारा गंधर्व व धैर्यधराचें काम करणारा जोगळेकर पाहिल्याशिवाय परत जात नसत.

## रंगभूमीवरील तीन चांदांचे सरदार गेले

अशा ऐनभरांत जोगळेकरांची नट या नात्याची कारकीर्द अस-तांनाच जोगळेकरांना देवाज्ञा झाली. त्यावेळीं त्यांचें वय चाळिशीच्या सुमारासचें असेल. ते वारले नसते तर आम्हाला किर्लोस्कर कंपनी सोडण्याचा प्रसंगच आला नसता. जोगळेकरांचें निधन म्हणजे माझ्या आयुष्यांतील सर्वांत मोठें 'फेल्युअर' होय. काकासाहेबांना जोगळेकरांच्या मृत्यूनें फार वाईट वाटलें. त्यावेळीं ते अति रडले. जोगळेकरांचा किर्लोस्कर मंडळींतील जुन्या म्हणविणाऱ्या नट वगैरेंनीं नेहमीं हिरमोड व पाणउतारा करून फार छळ केला. खाडिलकरांच्या मानापमाननें त्यांना त्या यातनांतून सोडविलें आणि रंगभूमीवरील तीन चांदांची सरदारकी मिळवून दिली. काकासाहेब म्हणत असत, तुलसी हाय गरीबकी कभी न खाली जाय। मोहा ढोर चामसे लोहा भस्म हो जाय॥ जोगळेकरांचा ज्यांनीं असा छळ केला ते आपल्या कर्मांचीं फळें आतां भोगत आहेत.

## नाटकांचें यश तालमींच्या मेहनतींत

काकासाहेबांचीं नाटकें बसविलीं जात असतांना साधारण कार्यक्रम असा असे कीं, सकाळीं ९ वाजतां गाण्याच्या तालमींना सुरवात होई. आमचे गुरुजी भास्करबुवा बखले यांच्या चाली ज्या नाटकांना होत्या त्या नाटकांच्या तालमीच्या वेळीं ते गाण्याच्या तालमी घेत. हा क्रम बारा वाजेपर्यंत चाले. त्यानंतर जेवण व वामकुक्षी झाल्यावर बरोबर तीन वाजतां काकासाहेब तालमी सुरू करीत त्या सहा वाजतां संपत. त्यानंतर रात्रीं नट आपलीं

गाणीं व नकला घटवीत असत. अशा रीतीनें सक्त मेहनत नाटक रंगभूमीवर येईपर्यंत घेतल्यावर नाटक रंगभूमीवर हटकून परिणामकारकच वठत असे.

## शीघ्रकोपी 'मास्तर'

तालमींच्या बाबतींत काकासाहेबांच्यापुढें कधीं कोणाचें कांहीं चालत नसे. त्यामुळें स्वतःला जुन्या म्हणविणारांचा अहंकार दुखावला जाई व ते काकासाहेबांच्यावर स्यामुळें नाराज रहात.

विद्याहरण नाटकांत कचाच्या तोंडी कच देवयानीच्या एका प्रवेशांत अशा आशयाचें वाक्य आहे कीं तुझा हात हातांत धरतांना लोखंडाच्या कांबींत गुलाबाच्या पाकळ्या सांपडल्या आहेत कीं काय असें वाटतें. कचाचें काम श्री. गोविंदराव टेंबे यांच्याकडे होतें. पेटी वाजविण्याच्या नाजूक कामांत तरबेज अशा आपल्या हाताला हें वर्णन लागूं होत नाहीं असें श्री. टेंबे यांना वाटलें आणि तसें त्यांनीं काकासाहेबांजवळ बोलणें काढलें. दोन चार प्रश्नोत्तरांतच काकासाहेब रागावले आणि त्यांना म्हणाले, नाटकांतील वर्णनें नटांच्या बोटाकडे पाहून घालायचीं नसतात. तुम्हाला तें वर्णन योग्य वाटत नसेल तर कचाचें काम तुम्ही पाहिजे तर करूं नका. दुसरा कच मिळेपर्यंत माझें विद्याहरण नाटक पडून राहिलें तरी हरकत नाहीं.

स्वयंवर नाटकाच्या तालमींच्या वेळचा असाच एक प्रसंग मला आठवतो. 'दादा ते आले ना' असें वाक्य म्हणून रुक्मिणी रंगभूमीवर प्रवेश करते त्यावेळचा काकासाहेबांनीं जो अभिनय शिकविला होता त्याबद्दल मी त्यांना एकदां म्हटलें, रुक्मिणी ही राजकन्या आहे, तेव्हां तिचा अभिनय राजकन्येला साजेसाच असला पाहिजे. त्यावर प्रथम काकासाहेब समजुतीच्या स्वरांत म्हणाले, अरे, राजकन्या झाली काय, किंवा गरीब मुलगी झाली काय, भावनांचा जोर असतांना त्या व्यक्त होण्याची पद्धति कांहीं वेगळी नसते. राजकन्या असली तर उंची कपडेलत्ते, दागदागिने घालील; पण

भावना गरिबाच्या काय किंवा श्रीमंताच्या काय जवळ जवळ एकाच प्रकारें प्रकट होणार. हें ते सांगत असतांना माझी समजूत पटली नाहीं असें वाटूनच कीं काय, ते एकदम उसळून म्हणाले, 'माझें स्वयंवर नाटकच तुम्ही करूं नका.' खेळ थोडया दिवसांनीं रंगभूमीवर यावयाचा आणि काकासाहेबांनीं असें सांगतांच मला त्राहि भगवन् झालें. त्यांच्याबरोबर दोन तास चौपाटीवर गेलों, नंतर त्यांचा राग ओसरला आणि खेळ रीतसर रंगभूमीवर आला.

काकासाहेब कोणतेंहि कार्य हातीं घेतल्यावर तें सर्वांगसुंदर व्हावें म्हणून इतक्या एकाग्रतेनें कसलीहि कुचराई न करतां तें करीत असत कीं, त्यांत इतरांनीं ढवळाढवळ करून व्यत्यय आणलेला त्यानां खपत नसे. स्वयंवर नाटकाच्या तालमी त्यांनीं अत्यंत कसोशीनें घेतल्या. विद्याहरण नाटकानें गोविंदराव टेंबे यांना नट या नात्यानें जसें पुढें आणलें त्याप्रमाणेंच स्वयंवर नाटकानें पंढरपूरकर बुवा आणि पेटकर यांना पुढें आणलें. भीष्मकाच्या अटकेचा प्रसंग स्वयंवराच्या तिसऱ्या अंकांत आहे. त्यांतील भीष्मकाचें व रुक्मीचें काम काकासाहेबांनीं इतकें सुंदर बसवून घेतलें होतें कीं, त्या अंकाचे वेळीं भावनावश होऊन प्रेक्षक अश्रू ढाळीत. ईश घेई अवताराला हें पदहि पंढरपुरकरबुवा अत्यंत रंगून म्हणत.

## श्रद्धा व तत्वज्ञानाचा आविष्कार

स्वयंवराच्या चौथ्या अंकांत कृष्ण रुक्मिणीच्या प्रवेशांतील कृष्णाचें काम काकासाहेबांनीं जसें भावनापूर्ण शिकविलें तसें कधीं गणपतराव बोडसांना जमलेंच नाहीं. त्या अंकांतील कृष्णाचें काम आमचे माधवराव वालावलकर बोडसांपेक्षां चांगलें करतात. श्रद्धा आणि तत्त्वज्ञान यांनीं खाडिलकरांचीं नाटकें ओतप्रोत आहेत, त्या नाटकांशीं समरस व्हावयास नटहि तशाच

मनोवृत्तीचा पाहिजे. या दोनहि गोष्टींचा जवळ जवळ अभाव बोडस–टेंबे यांच्या ठिकाणीं असल्यामुळें ते खाडिलकरांच्या नाटकांशीं समरस झाले नाहींत व त्यांच्याशीं त्यांचें कधीं नीटसें जमलेंहि नाहीं.

## संगीत नाटकांचें यश

काकासाहेबांचें सर्वांत अधिक पैसा देणारें नाटक स्वयंवर होय आणि त्या खालोखालचें द्रौपदी होय. विद्याहरण नाटकाला योग्य असा कच कधीं मिळालाच नाहीं. द्रौपदी नाटक बसवितांना भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांना मुद्दाम बोलावून त्यांच्या सूचनेप्रमाणें कपडयालत्त्यांची व देखाव्यांची सजावट केली होती. पांडवकालीन स्त्रियांचें नेसण विकच्छ असे असें त्यांनीं सांगितल्यावरून द्रौपदींतील स्त्रीपात्रें विकच्छ नेसत. मानापमान नाटकांत भामिनीच्या भूमिकेंत मी विकच्छ नेसत असें, त्यावर टीका होई. तेव्हां काकासाहेब म्हणत, लोकांना आपल्या भोंवतीं नेहमीं जें दिसतें तें आवडतें. विकच्छ नेसणें नाटकांतील कथानकाला धरून असलें आणि तुम्हाला तें शोभत असलें तरी लोकांचा कल सांभाळून त्यांना आवडेल तें करावें. द्रौपदी नाटकाच्या वेळीं तो प्रश्न उरला नाहीं व स्त्रीपात्रें विकच्छ नेसूं लागलीं.

मेनका नाटकांत विश्वामित्राचें काम जोरदार आहे आणि तशाच तडफेचीं पदें त्याला आहेत. विश्वामित्राचें काम काकासाहेबांनीं विनायकराव पटवर्धनांचें चांगलें बसवून घेतलें होतें व ते चांगले करीतहि. पण त्यांच्या गाण्याला त्यांत फारसा वाव मिळाला नाहीं. शिवाय दुसऱ्या अंकांतील इंद्रसभेच्या प्रसंगाचाच गवगवा जास्त होऊन त्यावर फार टीका झाली. त्यामुळें तें नाटक नंतर मागें पडलें. सावित्री नाटकाच्या वेळीं बोलपटांचा जमाना सुरू झाला होता. मेनका व सावित्री नाटकांचें सामानसुमानहि

अवजड होतें. एका मुक्कामांत ठराविक नाटकाचें सामान बरोबर घेऊन बाकीचें सामान ठेवून दिलें. त्यांतच मेनका सावित्रीचें सामान राहिल्यानें पुढें या नाटकांचे प्रयोग होईनासे झाले.

## देवल व खाडिलकर यांच्या तालमींचें वैशिष्ट्य

काकासाहेब हे उत्कृष्ट तालीममास्तर होते आणि त्याचवेळीं दुसऱ्यांच्या गुणाविषयींचा आदर करण्याचें मोठेपण त्यांच्या ठिकाणीं होतें. गंधर्व कंपनी निघाल्यावर कंपनींत देवल मास्तरांना बोलावण्यांत आलें. काकासाहेब माझें दैवत. तेव्हां कंपनींत आपल्याला आधार देणारें दैवत पाहिजे म्हणून बोडस—टेंबे यांनीं देवलांना आग्रहानें आणलें. देवल कंपनींत आले याबद्दल काकासाहेबांना बरेंच वाटलें, इंतकेंच नव्हे तर त्यांचा मान कंपनींत कसोशीनें राहिला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. देवलांना काकासाहेब फार मानीत असत. देवल स्वतः उत्तम अभिनय शिक्षक होते. पण विवेचनाचा म्हणजे भूमिका समजून देण्याचा भाग त्यांच्या शिक्षणांत विशेष नसे. त्याचप्रमाणें त्यांच्या सांगण्याप्रमाणें अभिनय व टोनिंग नटाला जमलें नाहीं तर त्या नटाच्या बाबतींत ते उदासीन होत आणि नटाचा प्रोत्साहनाच्या अभावीं हिरमोड होई. बोडस हे देवलांचे शिष्य आणि अभिनय-शिक्षक आहेत, पण नटाला एखादी गोष्ट समजली नाहीं तर तशा नटाच्या अभिनयाची चेष्टा ते उडवितात व त्यामुळें नटाच्या गुणांचा विकास होत नाहीं. बोडसांना एकहि नट तयार करतां आला नाहीं त्याचें कारण हें आहे.

## नट, नाटककार, रंगभूमि यांना वर खेचणारे खाडिलकर

काकासाहेबांच्या तालमींत आपल्या भूमिकेशीं ती समजून घेऊन करें समरस व्हावें याचें शिक्षण मिळत असे आणि त्यामुळें नटाच्या ठिकाणच्या गुणांचा विकास होऊन त्यांनीं हातीं धरलेला नट रंगभूमीवर यश मिळवीत

असे. संगीत कंपन्या पूर्वी प्राधान्येकरून गाण्यावर चालत असत. संगीत कंपन्यांच्या रंगभूमीवर नाट्य व अभिनय संगीताच्या बरोबरीनें दिसावयास लागला याचें श्रेय काकासाहेबांच्या नाटकांना व त्यांच्या तालमींना आहे. संगीत कंपन्यांना नाटक कंपन्याचें स्वरूप काकासाहेबांनीं दिलें. विशेषत: आपल्या संगीत नाटकांत त्यांनीं, माता, पत्नी, मुलगी, बहीण अशा निरनिराळ्या स्वरूपांत स्त्रीजातीची महति गाइली आणि स्त्री-जीवनाचा विकास आपल्या नाटकांतून दाखवून रंगभूमीला उदात्त व निर्मल स्वरूप त्यांनीं दिलें. नट, नाटककार, रंगभूमि या सर्वांनाच त्यांनीं आपल्या कारकीर्दीत कितीतरी वर खेचलें. संगीत रंगभूमीच्या बाबतींतील त्यांची कामगिरी अपूर्व अशीच आहे.

## जिव्हाळ्याचे संबंध

माझे आणि काकासाहेबांचे संबंध फार जिव्हाळ्याचे होते. ते मला दैवतासारखे होते आणि मी त्यांना मुलासारखा होतों. कसलीहि अडचण पडली तर मी त्यांच्याकडे जाई, आणि तेहि मला आस्थेनें सर्व सांगत. कधीं पैसे लागले तर तेहि मी त्यांच्याकडे मागत असे आणि ते देतहि असत. पैसे घेतलेले लक्षांत राहिले तर मी परतहि करीत असें. पण ते पैशाबद्दल मला आपण होऊन विचारीत नसत.

माझा आवाज वारंवार लागेनासा होत असे. त्यावेळीं काकासाहेब मला मानसशास्त्राच्या दृष्टीनें जें सांगत असत तें मला आतां आठवतें. त्यावेळीं तिकडे लक्ष लागत नसे आणि आचरणांत वळतहि नसे. ते सांगत, 'आपला आवाज ज्यावेळीं लागत नाहीं त्यावेळीं एकटे असतांना डोळे मिटून बसावें आणि आपली गळ्याची रचना डोळ्यासमोर आणून ती तपासावी. कोठली शीर आवाज लागत नाहीं त्यावेळीं काम देत नाहीं तें पहावें आणि त्या शिरेवर नित्य लक्ष ठेवावें, म्हणजे ती शीर हळूहळू

आपल्या काबूंत येते आणि दुरुस्त होते. असें केलेंत म्हणजे आवाजाचा त्रास जो तुम्हाला होतो तो होणार नाहीं. आपल्या ठिकाणचें व्यंग अशा रीतीनें आपलें आपणच दूर करावयाचें असतें.' या सांगण्याप्रमाणें काकासाहेब स्वत: वागत असत. त्यांना स्वत:ला कांहीं प्रकृतीचें अस्वास्थ्य वाटूं लागलें म्हणजे ते डोळे मिटून स्वस्थ असे बसत असत व स्वत:ची आजाराची तपासणी करीत असत हें मीं पुष्कळदां पाहिलेलें आहे.

## काकासाहेबांनीं पाहिलेलें शेवटचें नाटक

काकासाहेबांनीं आमचा मानापमान खेळ १९४० सालीं पाहिला. त्यानंतर त्यांना आमचें नाटक पहाण्याचा योग आला नाहीं. त्या खेळांत माझें धैर्यधराचें काम होतें व गौहरबाईचें भामिनीचें काम होतें. त्यावेळीं यांना अर्धांगाचें दुखणें जडलेलें होतें आणि मोतीबिंदूमुळें डोळ्यांना जेमतेम दिसत होतें. तशा स्थितींत त्यांनीं मानापमानाचा दुसरा अंक पाहिला आणि नंतर ते आंत आले. बोलतांनाहि त्यांना तेव्हां त्रास होत होता. दोघेंहि नाटकांत एकत्र काम करा तुम्हांला यश येईल, असें त्यांनीं सांगितलें आणि त्याचवेळीं आतां पहिला काळ राहिलेला नाहीं, काळ फिरला आहे असें ते म्हणाले. हें सर्व बोलतांना त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. त्यानंतर त्यांनीं आमचें नाटक पुन्हां पहाण्याचा योग नव्हता.

याच सालीं त्यांना भेटावयास मी त्यांच्या घरीं दुपारच्या वेळीं गेलों होतों. आजारी स्थितींत काकासाहेब अंथरुणावर निजलेले होते. जवळच त्यांच्या पत्नी सौ. गौरीकाकू त्यांना वर्तमानपत्र वाचून दाखवीत बसल्या होत्या. कांहीं वर्षांपूर्वी मधुमेहानें सौ. गौरीकाकूंचा एक पाय काढावा लागलेला होता. मी गेल्यावर वाचन थांबलें आणि काकासाहेब माझ्याकडे पाहून म्हणाले, 'आपण अधू असतांनाहि नवऱ्याची सेवा करते आहे.' मला

तीं दोघें बसलेलीं असतांनाचा तो प्रसंग आणि काकासाहेबांचें तें वाक्य नेहमीं आठवतें.

## ' आशीर्वाद आहेच '

काकासाहेबांचा मुक्काम पुण्याला असतांना वर्षापूर्वी मी त्यांना भेटावयास गेलों होतों. त्यावेळीं हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याच्या आनंदांत ते तल्लीन होते. " नारायण, हिंदुस्थान स्वतंत्र झालेला मी माझ्या डोळ्यांनीं पाहिला " असें त्यांनीं अगदीं कृतकृत्यतेनें सांगितलें. १८९६ पासूनचें त्यांचें आयुष्य ज्यांना माहीत त्यांनाच त्यांच्या त्या धन्यतेचें वैशिष्टय कळणार !

त्यांची माझी शेवटची भेट त्यांच्या निधनापूर्वी तीन चार महिने झाली. बाल गंधर्व संगीत मंडळीनें स्वयंवर करण्यापूर्वी त्यांच्या भेटीस गेलों होतों. सर्व हकीकत ऐकून घेतली आणि पसंती दर्शविली. स्वतः फारसे बोलत नव्हतेच. माझ्या बरोबरचे कोणीसे आपला आशीर्वाद पाहिजे असें म्हणाले. त्यावर ते हंसून ' आशीर्वाद आहेच ' असे उद्गारले. ते गेले, पण त्यांचा आशीर्वाद आहेच असेंच माझ्या मनाला नेहमीं वाटतें.

# श्री. अण्णासाहेब कारखानीस, मालक, महाराष्ट्र नाटक मंडळी

## ' कांचनगडची मोहना ' नाटकाचे कर्ते

काकासाहेबांचें " कांचनगडची मोहना " नाटक आम्ही प्रथम महाडला वाचलें. आम्हाला तें फार आवडलें. महाडला त्यावेळीं कांहीं मंडळी नाटकें करीत असत. त्यावेळीं हें नाटक प्रथम केलें. नंतर १९०४ सालीं आम्ही महाराष्ट्र ना. मं. स्थापन केली व पहिलें नाटक हेंच कंपनीनें बसविलें.

त्यावेळीं 'कांचनगडची मोहना 'कर्ते खाडिलकर नेपाळांत होते. म्हणून वासुकाका जोशी यांच्याजवळ परवानगी मागितली. त्यांनीं सांगितलें कीं, नाटकाच्या २ प्रती घ्या व नाटक बसवा. १९०५ सालीं खाडिलकर नेपाळांतून परत आले. आमच्या कंपनीचा मुक्काम पुण्यांत असतांना आम्ही त्यांना बोलाविलें. खाडिलकर आमच्या कंपनींत प्रथम आले त्यावेळीं आम्हांस ते "कृष्णंभट"सारखे बरोबर दिसले. कंपनींत आल्यावर त्यांनीं आमच्या कंपनीविषयीं माहिती छेडून विचारली. प्रथम कांचनगडच्या मोहनेच्या तालमी प्रो. भानु घेत. नंतर खाडिलकर घेऊं लागले. त्यांच्याबरोबर त्यांचे स्नेही प्रो. पानसे येत. चार वाजतां तालमी सुरू होत. खाडिलकर बरोबर वेळेवर त्यावेळीं तालमी घेण्यास येऊं लागले. त्यावेळीं या नाटकाचे प्रयोग चालू होते.

## 'सवाई माधवराव यांचा मृत्यु' नाटकाचे प्रयोग

मीं शाळेंत असतांना विविधज्ञान विस्तारांत प्रसिद्ध होत असलेलें "सवाई माधवराव यांचा मृत्यु" हें नाटक वाचलें होतें. पुण्याच्या मुक्कामांतच खाडिलकरांजवळ या नाटकाची परवानगी मागितली. उमरावतीला गेल्यावर मीं हें नाटक प्रो. भानु व दादासाहेब खापर्डे यांना वाचून दाखविलें. खापर्डे यांना तें पसंत पडलें, पण भानूंना नाना मितभाषणी आहे असें वाटलें. नंतर त्यांच्या सूचनेंवरून खाडिलकरांना नाना व बाबासाहेब (सवाई माधवरावांचे सासरे) हीं त्या नाटकांतील पात्रें बदलण्यास सांगितलीं, तीं त्यांनीं बदलून दिलीं. १९०६ च्या जानेवारींत आमची कंपनी इंदूरला होती. तेथें त्यांनीं नाटक दुरुस्त करून पाठविलें, आणि तावडतोब तें बसविलें. त्यांत सवाईमाधवरावाचें काम मीं केलें व गणपतराव भागवतांनीं केशवशास्त्री यांचें काम केलें. इंदूरला या नाटकाचा प्रथम प्रयोग केला.

तेथें शिवाजी महाराजांची थोरली मुलगी होती. त्यांच्याकडे जाणाऱ्या स्नेही शिक्षकाबरोबर तेथें माझें जाणें येणें असे. त्यांनीं "सवाई माधवराव"साठीं पोशाख तर दिलेच, पण दागदागिनेहि १० हजारांचे वापरण्यासाठीं पहिल्या प्रयोगापुरते कंपनीला दिले. नंतर आम्हीं पुण्याला आल्यावर खाडिलकरांनीं नाटक पाहिलें.

## गद्य नाटकास सुवर्णपदक

१९०५ सालीं भारत नाट्य-संमेलन प्रथम झालें. त्यावेळीं संगीत मंडळीनें एक व प्रोज कंपनीनें एक अशीं दोन नाटकें पुढील संमेलनाच्या वेळीं करावयाचीं ठरलें. १९०६ सालीं नाशिकच्या संमेलनांत "सवाई माधवरावांचा मृत्यु" हें नाटक आम्हीं केलें. त्यावेळीं संगीत नाटक मंडळीनें नाटक केलें नाहीं. त्या संमेलनांत "भारत नाट्य संमेलनानें" आम्हांस या नाटकामुळें सुवर्णपदक दिलें. काकासाहेबांनीं हें नाटक पाहिलें त्यावेळीं सवाईमाधवराव, केशवशास्त्री व नाना हीं कामें त्यांना पसंत पडलीं व या कामांची तारीफ त्यांनीं केली.

## 'कीचकवध' नाटकाचें वाचन व खेळ

नंतर १९०६ च्या पंढरपुरच्या मुक्कामाच्या पूर्वी कंपनी सोलापूरला असतांना मी पुण्याला जात येत होतों. त्यावेळीं खाडिलकरांजवळ नाटक मागितलें. यांनीं "कीचक वध" नाटकाची हस्तलिखित कॉपी माझ्या स्वाधीन केली. ती सोलापुरच्या मुक्कामांत कंपनींत वाचली. आमच्या मंडळीना तें नाटक फारच पसंत पडलें.

पंढरपूरनंतर पुण्याला गेल्यावर "कीचक वध" बसविण्याचें ठरविलें. पण माझे वडील त्यावेळीं वारल्यामुळें मी महाडला गेलों व तेथें मला रहावें लागलें. कंपनी पुण्याला आल्यावर कीचक वध नाटकाच्या तालमी खाडिलकरांच्या देखरेखीखालीं सुरू झाल्या. या तालमी सुरू असतांनाच

" बायकांच्या बण्डा " ला लिहिण्यास सुरवात झाली. १९०७ च्या मार्च-एप्रिलमध्यें " कीचक वध " नाटकाचा प्रयोग पुण्याला झाला. त्यावेळीं मी महाडलाच होतों, फक्त पत्रव्यवहार चालत असे. प्रयोग लागल्यावर प्रेक्षकांची तुफान गर्दी होऊं लागली. त्याचवेळीं किर्लोस्कर कंपनीहि पुण्याला होती. त्यांच्या खेळांनाहि गर्दी होत असे. त्यावेळीं कै. सीतारामपंत दामले ज्ञानप्रकाशचे एडिटर असतांना त्यांनीं ज्ञानप्रकाशमध्यें महाराष्ट्र मंडळी आणि किर्लोस्कर मंडळी यांवर एक अग्रलेख लिहून संगीत नाटक मंडळी-प्रमाणेंच प्रोज नाटकालाहि गर्दी होत आहे हें वैशिष्ट्य मुद्दाम नजरेला आणलें. याचें कारण कीचकवध नाटक.

## ' बंड ' यशस्वी झालें

कीचकवध नाटक सुरू झाल्याबरोबर खाडिलकरांच्या " बायकांच्या बंडा " लाहि सुरवात झाली. त्यावेळींहि मी पुण्याला नव्हतों. मीं महाडहून " बायकांच्या बंडा " बद्दल तार केली कीं, " बंड यशस्वी होवो. " त्यावेळीं महाडच्या पोस्टमास्तरनें विचारलें कीं, या तारेचा अर्थ काय ? मी म्हणालों कीं, मीं तार दिली आहे, ती करा. " बायकांचें बंड " हि लोकांना आवडलें, त्यालाहि तुफान गर्दी होऊं लागली.

## लो. टिळकांनीं दोनहि नाटकें पाहिलीं

कीचक वध व बायकांचें बंड हीं नाटकें घेऊन कंपनी मुंबईला गेली. ती सुरतेच्या काँग्रेसची वेळ होती. मुंबईला दोन्ही नाटकांचे प्रयोग धूमधडाक्यानें शनिवार-रविवार असे चालू होते. आडवारीं आम्हीं इतर नाटकें लावीत असूं. सुरतेची काँग्रेस उधळून मंडळी मुंबईला आली. त्यावेळीं लो. टिळक व त्यांच्याबरोबर असलेली मंडळी यांनीं ही दोन्हीं नाटकें पाहिलीं. टिळकांनीं " बायकांचें बंड " पाहिलें त्यावेळीं त्यांनीं खाडिलकरांना सांगितलें कीं,

तुम्हीं या नाटकाला प्रस्तावना लिहा. त्यांनीं "रॉयल एशिआटिक सोसायटी" मधील "सेक्स अँड कॅरेक्टर" या नांवाचें पुस्तक आलें आहे, तें तुम्हीं जरूर वाचा असें खाडिलकरांना सांगितलें. मला ही गोष्ट खाडिलकरांनीं सांगितली व पुस्तक मिळविण्यास सांगितलें. त्यावेळीं लायब्रेरियन गुप्ते होते. त्यांनीं मला १५ दिवसांसाठीं तें पुस्तक दिलें. मीं खाडिलकरांच्या स्वाधीन केलें. नंतर कांहीं दिवसांनी खाडिलकरांनीं माझ्या स्वाधीन तें पुस्तक केलें. पण खाडिलकरांनीं प्रस्तावना लिहिली नाहीं. कारण त्यांचें त्यांनाच माहीत. हें पुस्तक एका जर्मन तरुणानें लिहिलें असून पुस्तक लिहिल्यावर त्या जर्मन तरुणानें आत्महत्या केली होती.

## अरविंद–लालाजींनीं कीचकवध पाहिलें

मुंबईच्या त्या मुक्कामांत सुरतहून परतलेल्या सर्व पुढाऱ्यांना आम्हीं नाटकाला बोलावलें. अरविंदबाबूंनीं "कीचकवध" पाहिलें. त्यांना नाटक समजावून दिलें. त्यावेळीं त्यांनीं केलेल्या भाषणांत नाटकाची तारीफ केली व बंगालमधील प्रतापादित्याची माहिती सांगितली. लाला लजपतरायनीं नाटक पहात नसल्याचें सांगितलें. पण पंजाबच्या फंडासाठीं नाटक लावीत ाल तर मी येईन असें ते म्हणाले. नंतर फंडासाठीं आम्हीं 'कीचकवध' ावलें व लाला लजपतराय आले.

## भाऊबंदकीचें यश

त्यानंतर माणिकतोळा बाँब केस झाली. त्यावेळच्या केसरींतील लेखांमुळें टिळकांना शिक्षा झाल्यामुळें खाडिलकर केसरीचे संपादक झाले. त्यावेळीं खाडिलकरांच्या जवळ आम्ही नाटक मागितलें. टिळकांच्या शिक्षेची कल्पना त्यावेळीं त्यांच्या मनांत घोळत असल्यामुळें खाडिलकरांनीं "भाऊबंदकी" नाटक लिहून रामशास्त्री हें पात्र रंगविलें. १९०९ सालीं सोलापूरला

कंपनी असतांना हें नाटक आमच्याकडे त्यांनीं पाठविलें. त्यांत राघोबादादा (भागवत), रामशास्त्री (त्र्यंबकराव प्रधान), आनंदीबाई (माधवराव टिपणीस), नाना (अप्पा टिपणीस), सखारामबापू (अण्णा कारखाननीस), कोंकणस्थ स्त्री (पोतनीस), देशस्थ स्त्री (केशवराव दाते) अशीं कामें खाडिलकरांनीं वाटून दिलीं व पुढें तीं लोकप्रियहि झालीं.

"भाऊबंदकी" बसविल्यावर कंपनी पुण्याला आली. त्यावेळीं "कीचक वध" नाटकाला सयाजीराव महाराज यांना बोलावलें. त्यांच्या मनावर नाटक पाहून फारच चांगला परिणाम झाला. मी त्यावेळीं भाषण करून पानसुपारी देण्यास गेलों असतांना ते मला म्हणाले, 'मला नाटक फार आवडलें. तुम्हीं बडोद्याला या.'

## 'कीचकवधा' वर काहूर

"कीचक वध" नाटकाच्या लोकप्रियतेमुळें खेडोपाडीं लोक परवानगी-शिवाय "कीचक वध" करीत असत. त्याचाहि परिणाम लोकांच्या मनावर फार झाला. १९०९ मध्येंच जॅक्सनचा खून झाला. त्यामुळें "कीचक वध" नाटकाबद्दल रिपोर्ट मागविण्यांत येऊं लागले. "लंडन टाइम्स" मध्यें त्यावेळचे डिस्ट्रिक्ट जज्ज मि. किंकेड यांनीं दोन लेख "कीचक वधा" वर लिहिले. त्यांत किंकेडनीं 'टॅलेंटेड' नाटककार आहेत अशी खाडिलकरांची स्तुति केली, पण "कीचक वध" भयंकर राजद्रोही आहे असेंहि लिहिलें.

## ना. गोखले यांचा अभिप्राय

"कीचक वध" नाटकाच्या विरुद्ध प्रचार झाल्यामुळें आम्हीं त्याचा अंदाज घेण्यासाठीं मुद्दाम ना. गोखले यांना नाटकाला बोलावलें. नाटक पाहिल्यावर ना.गोखले यांनीं श्री. हरिभाऊ आपटे यांच्यामार्फत असा

अभिप्राय कळविला, कीं या नाटकाचा कर्झनशीं संबंध लावतात, पण तो शेवटपर्यंत टिकत नाहीं. त्यावेळीं फर्ग्युसनचे प्रिन्सिपाल असलेले राजवाडे हेहि या नाटकाला येऊन त्यांनीं ज्ञानप्रकाशमध्यें आपण होऊन एक लेख लिहिला. त्यांतहि ना. गोखल्यांच्या अभिप्रायाप्रमाणेंच लिहिलें. त्यांत त्यांनीं नाटकाचे दोष दाखविले होते, पण त्याचें निराकरण करणारा लेख मीं शिवरामपंत परांजपे यांच्या "काळ" मध्यें लिहिला. आम्हाला बातम्या कळत कीं, गव्हर्नरसाहेबांनीं "कीचक वध" नाटक मराठीच्या स्कॉलर्सकडे अभिप्रायाकरितां पाठविलें आहे.

## प्रेस ॲक्टचा पहिला बळी 'कीचक वध'

नंतर आम्हीं १९१० मध्यें बडोद्याला गेलों. फेब्रुवारींत प्रेस ॲक्ट झाला, व त्याला पहिला बळी "कीचक वध" पडलें. बडोद्याच्या मोठ-मोठ्या लोकांनीं पुण्याला "कीचक वध" पाहिलें असल्यामुळें त्यानीं आग्रहपूर्वक खटपट केली कीं, हें नाटक बडोद्याला लावावें. पण तेथील पोलिस ऑफिसर आमच्याकडे आला व म्हणाला कीं, येथें "कीचक वध" केलेंत तर आम्ही तें बंद पाडूं ! हें आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितलें व कोणातरी बडया अधिकाऱ्याची लेखी परवानगी दिलीत तरच आम्ही येथें "कीचक वध" करूं असेंहि सांगितलें. महाराजांच्या नेहमींच्या आमंत्रणावरून मी मुद्दाम गेलों होतों. तेथें ते माझ्याशीं बोलले असले तरी खाजगीरीतीनें भेटावें म्हणून मीं प्रयत्न केले. पण त्यांत मला यश आलें नाहीं.

## 'बाजी देशपांडे' ऐवजीं 'प्रेमध्वज'

खाडिलकरांच्या मनांत "बाजी देशपांडे" नाटक लिहावयाचें होतें. पण त्यांना सर्व बेत बदलावा लागला व ते संगीताकडे वळले. त्यामुळें आम्हाला नाटकाची पंचाईत आली. ही गोष्ट आम्हीं खाडिलकरांना सांगितली.

खाडिलकर " मानापमान " लिहीत असतांनाच त्यांनीं " प्रेमध्वज " डिक्टेट केलें. मी लिहून घेत असें. १९१० सालीं " कीचक वध " नाटकाच्या रिपोर्टाबरोबर खाडिलकरांच्या संबंधींहि रिपोर्ट गेला. त्यांत " मोस्ट रॅबिड ऑफ एक्स्ट्रमिस्टस् " असें लिहिल्याचें मला समजलें.

## फाटाफुटीच्या प्रसंगींचें प्रोत्साहन

१९१२ सालीं महाराष्ट्र ना. मं. ची सोलापूर मुक्कामांत फाटाफूट झाली. त्या फाटाफुटीच्या वाटाघाटीच्या वेळीं खाडिलकर, प्रो. भानु, शंकरराव मुजमदार वगैरेंना मीं सोलापुरला बोलावले. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. फाटाफूट झाली. खाडिलकर एकटेच तेथें राहिले, इतर मंडळी परत गेली. त्यावेळीं मीं खाडिलकरांना सांगितलें कीं, या सर्व प्रकारानें मी बिटून गेलों आहें. तेव्हां ते मला म्हणाले कीं, कंपनी बंद करणें पुरुषार्थाला शोभत नाहीं. कंपनी स्वाभाविक मरणानें मरणार असेल तर मरूं दे, त्याला कांहीं इलाज नाहीं. पण आपण आपला पुरुषार्थ दाखवून कंपनी चालविलीच पाहिजे. इतकेंच सांगून ते थांबले नाहींत तर ते असेंहि म्हणाले कीं, तूं जर कचरत असलास तर मी भागीदारी अंगावर घेण्यास तयार आहें. त्यावेळीं मीं त्यांना सांगितलें कीं, मी आपल्या उपदेशाप्रमाणें सर्व जबाबदारी घेऊन कंपनी चालवितों. आपली मान मी गुंतवू इच्छित नाहीं. नंतर फाटाफूट होऊन अप्पा टिपणीसांनीं निराळी कंपनी काढल्यावर खाडिलकरांनीं राहिलेल्या मंडळींतच आमच्या सर्व नाटकांच्या पात्रांच्या याद्या तयार केल्या. त्यांत कंपनीचे वाढपीहि पात्रांत घेतले. याप्रमाणें नाटकें बसवा, कंपनी चालवा, असें त्यांनीं सांगितलें. यानंतर आम्हीं कानडी प्रांतांत गेलों. विजापूरला खाडिलकरांनीं केलेल्या पात्रांच्या याद्यांप्रमाणें सर्व नाटकें बसविलीं. नंतर गांवें घेत घेत १९१३ मध्यें हुबळीला आलों. तेथें सुळे व डॉ. गोरे यांचा पाठिंबा कंपनीला मिळाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ले. नं. ....२०३..

तेथें खाडिलकर " विद्याहरण " घेऊन आले. त्याचें वाचून झालें पण आम्हाला तें त्यांनीं दिलें नाहीं. नंतर माधवराव टिपणीस आणि दत्तोपंत देशपांडे मालकींतून निघून नोकर राहिले व सर्व जबाबदारी मीं खाडिलकरांच्यासाठीं पत्करली. मिरजेला आल्यावर वासुदेवशास्त्री खरे यांना भेटलों. त्यांनीं लिहिलेल्या " तारामंडळ " चें वाचन केलें व आम्हाला जुळेल असें लिहवून घेतलें. नंतर मुक्काम करीत पुण्याला आलों पण तेथें प्लेग सुरू झाला. येथपर्यंत खाडिलकरांच्या भाऊबंदकी, कांचनगडची मोहना, प्रेमध्वज, बायकांचें बंड आणि गडकरी यांचें प्रेमसंन्यास व खरेशास्त्री यांचें तारामंडळ यांवर मी कंपनी चालवीत होतों.

## सत्वपरीक्षा नाटकाचे प्रयोग

१९१४ मध्यें आम्हीं नागपुरला असतांना खाडिलकरांनीं " सत्त्वपरीक्षे " चे दोन अंक आमच्याकडे पाठविले व नंतर खाडिलकर स्वतः " सत्त्वपरीक्षा " बसविण्यास आले. तेथें पूर्ण बसविण्यांत आलें. कंपनीच्या पात्रांची जुळवाजुळव करण्याचा खाडिलकरांचा प्रयत्न जोरानें चालला होता. बापुराव राजहंस यांना आणण्यासाठीं त्यांनीं फारच प्रयत्न केले व ते यशस्वी झाले. बालगंधर्वानींहि त्यांना आमच्या कंपनींतच ठेवण्याचे शक्य ते प्रयत्न केले. बापुराव राजहंस आमच्या कंपनींत राहिले.

## काकासाहेबांच्या नाटकांमुळें यश

नंतर आम्हीं १९१५ च्या जानेवारींत मुंबईला आलों. त्यावेळीं गंधर्व मंडळीहि मुंबईला होती. अप्पा टिपणीसहि त्याचवेळीं मुद्दाम मुंबईला कंपनी घेऊन आले. अशा स्थितींत महाराष्ट्र ना. मं. नें खाडिलकरांच्या नाटकामुळें टिकाव तर धरलाच, पण आमचा मुंबईचा मुक्काम यशस्वी झाला. नंतर १९१८ सालीं महाराष्ट्र ना. मं. दत्तोबा देशपांडे व केशवराव दाते यांना समाईक मालकी देऊन मीं कंपनी सोडली. खाडिलकरांनीं आमच्या कंपनीवर

आपलेपणानें दृष्टि ठेवली, त्यामुळेंच आमच्या कंपनीला जीवदानहि मिळालें.

## लो. टिळकांनीं नाटकें पाहिलीं

लो. टिळकांनीं कैदेंतून १४ सालीं आल्यावर खाडिलकरांचीं बहुतेक सर्व नाटकें पाहिलीं. त्यांत एक नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे सवाई माधवराव हें नाटक पहाण्यास टिळक येणार आहेत असें खाडिलकरांनीं सांगितलें. तेव्हां सदोबा पाटील या पात्रानें जरा फाजीलपणा न करतां संयमानें काम करावें असेंहि खाडिलकरांनीं सांगितलें. टिळक सवाई माधवराव पहाण्यास आले होते.

भाऊबंदकी नाटक पहाण्यास आले असतांना परत जात असतां मी टिळकांना दरवाजापर्यंत पोहोंचविण्यास गेलों. त्यावेळीं बाबा विद्वांस टिळकांना सावरून , ज़पून घेऊन जात होते. तेव्हां मी त्यांना विचारलें कीं, टिळकांची तब्येत बरी नाहीं कीं काय ? तेव्हां विद्वांस म्हणाले कीं, त्यांच्या अंगांत ताप आहे. ताप असतांनाहि खाडिलकरांच्या जिव्हाळ्यामुळें टिळक नाटकाला आले होते.

## रागीट तितकेच प्रेमळ

टिळकांच्या पश्चात केसरीची नवी व्यवस्था होऊन खाडिलकरांना मुंबईस जावें लागलें. तेव्हां मीं त्यांना विचारलें कीं, हें कसें काय ? टिळकांचा केसरी ते कैदेंत असतांना तुम्हीं त्यांच्या मनाप्रमाणें चालविला होतात. त्यावेळीं ते सद्गदीत होऊन म्हणाले कीं, बापूनें मला आक्षेप घेतला.

खाडिलकर रागावत असत याचें कारण त्यांच्या मनाप्रमाणें व सांगण्याप्रमाणें एकादी गोष्ट झाली नाहीं तर. असाच एक प्रसंग कीचक वध नाटकाच्यावेळीं आला. एका नटाला त्यांनीं शिकवून तयार केला होता. पण तो नट " कीचक वध " नाटक पहात असतांना त्यांना दिसला नाहीं.

तेव्हां घरीं जातांना ते दत्तोबांजवळ म्हणाले कीं, माझीं नोटकें करूं नका. या म्हणण्यामुळें कंपनींतील सर्व मंडळी सचिंत बसली होती. मी महाडहून त्याच पहाटेस पुण्याला आलों होतों. मला ही सर्व हकीकत कळली व मी खाडिलकरांकडे जावयास निघालों. त्यावेळीं तुम्ही आतां जाऊं नका असें मंडळीनीं सांगितलें, पण मी गेलों. त्यावेळीं त्यांना मी म्हणालों कीं आपला माझ्यावर विश्वास असल्यामुळें मी आपणाकडे आलों आहें. मला कंपनींतील सर्व हकीकत मी आल्याबरोबर समजली. आपण तसें करूं नका, जरूर कंपनींत चला. तेव्हां खाडिलकर म्हणाले कीं, मी आतांच कांहीं येत नाहीं, पण तालमीच्या वेळीं येईन. मी परत मंडळींना ही हकीकत सांगितली. मंडळींना आनंद झाला. खाडिलकर दुपारीं ४ वा. नेहमींप्रमाणें आले. रागावले तरी जरा वेळानें खाडिलकरांना सर्व समजावून सांगितल्यावर त्यांचा राग शांत होत असे. रागीट तितकेंच ते प्रेमळहि होते.

# श्री. दत्तोपंत देशपांडे, मालक, महाराष्ट्र नाटक मंडळी

## 'कांचनगडच्या मोहने' नें महाराष्ट्र नाटक मंडळीची सुरुवात

महाराष्ट्र नाटक मंडळीचें नांव ठेवण्यापूर्वी ज्यावेळीं आम्हीं पुण्यांत जमलों त्यावेळीं आम्ही सर्वांनीं काकासाहेब खाडिलकरांच्या "कांचनगडची मोहना" नाटकाची पसंती करून त्याबाबत वासुदेवराव गुप्ते यांच्यामार्फत काकासाहेबांना नेपाळांत पत्र पाठवून परवानगी आणवली व १९०४ मध्यें नाटक बसविण्यास सुरवात केली. पुण्यालाच महाराष्ट्र नाटक बसविण्यास सुरवात केली. पुण्यालाच महाराष्ट्र नाटक मंडळीनें कांचनगडची मोहना या काकासाहेबांच्या नाटकानें आपल्या आयुष्याला प्रारंभ केला.

१९०५ सालीं मुद्दाम परिषदेसाठीं नागपूरला कांचनगडची मोहना नाटक लावलें होतें. त्यावेळीं कै. दादासाहेब खापर्डे यांनीं त्या नाटकाची मुक्तकंठानें स्तुति केली.

## 'सवाई माधवराव यांचा मृत्यू'चा प्रयोग

आम्ही पुण्याला आल्यावर कै. काकासाहेबांच्या विविधज्ञान विस्तारांतील "सवाई माधवरावांचा मृत्यु" बसविण्यास सुरवात केली. कांचनगडची मोहना या नाटकानें आम्हांस चांगलाच हात नागपूरच्या मुक्कामांत दिला. "सवाई माधवराबांचा मृत्यु" बसविण्याच्या वेळीं काकासाहेब नेपाळांतून परत आले होते. त्यांना घेऊन वासुदेवराव गुप्ते आमच्या कंपनीच्या बिऱ्हाडी आले. त्यांना "सवाई माधवरावांचा मृत्यु" नाटकाची तालीम दाखवून ताबडतोब "कांचनगडची मोहना" हि त्यांना दाखविली. हें नाटक पाहून दुसऱ्या दिवशीं कंपनीच्या बिऱ्हाडी आल्यावर त्यांनीं सांगितलें कीं, "सवाई माधवरावांचा मृत्यु" बसवूं नका. कारण त्यांना त्या नाटकांत बदल करावयाचा होता. नाटकांत बदल केल्यावर आम्ही तें नाटक घेतलें, पण पुण्यांत प्लेग झाल्यामुळें आम्ही बाहेरगांवी गेलों व तें नाटक इंदूरच्या मुक्कामाला आम्ही स्टेजवर आणलें. तेंच नाशिकच्या नाट्यसंमेलनाच्या वेळीं करून दाखविलें त्यावेळीं पहिल्या प्रतीचें नाटक ठरल्यामुळें दादासाहेब खापर्डे यांच्या हस्तें भारत नाट्य समाजातर्फे आम्हास सुवर्णपदक मिळालें.

## लो. टिळकांच्या सूचनेप्रमाणें पात्रांच्या नांवांत बदल

या नाटकाचा प्रयोग काकासाहेबांना दाखविण्यास कंपनी पुनः १९०६ सालीं पुण्यास आली त्यावेळीं काकासाहेबांनीं स्वतः नाटकाच्या तालमी घेऊन नाटक लावण्यास सांगितलें. या नाटकाच्या पुण्याच्या पहिल्या प्रयोगास लोकमान्य टिळक, ना. गोखले, नातु घराण्यांतील मंडळी, अशी

मंडळी हजर होती. या नाटकांतील कांहीं प्रयोग पाहून नातूंच्या घराण्यांतील मंडळीनीं लोकमान्यांकडे तक्रार नेली. नाटकांतील भूमिका बदला, नाहीं तर आम्ही फिर्याद करूं, असें त्यांनीं लोकमान्यांना सांगितलें. पण लोकमान्यांनीं फिर्यादीच्या दमाचा परिणाम तुमच्या विरुद्ध होईल असें सांगितल्यावर निदान नांव तरी बदला असा आग्रह नातूंनीं धरला. तेव्हां काकासाहेबांना लोकमान्यांनीं सूचना केली कीं, नांव बदला. तेव्हां काकासाहेबांनीं नांव बदललें ! या नाटकावर फारच टीका झाली. एस. के. दामले यांनींहि टीका केली. पण त्या टीकेवर शिवरामपंत परांजपे यांनीं "काळ"मध्यें टीकाकारांना सूर्याचीं पिल्लें दाखविलीं पाहिजेत अशी टीका केली. त्यानंतर टीका बंद झाल्या. हें नाटक पुढें फारच लोकप्रिय झालें.

## कीचकवधाची लोकप्रियता

बंगालच्या फाळणीच्यावेळीं "कीचक वध" नाटक काकासाहेबांनीं लिहिण्यास घेतलें. १९०६ सालीं हें नाटक कंपनीच्या स्वाधीन काकासाहेबांनीं केलें. तितक्यांत प्लेग झाल्यामुळें कंपनीला बाहेरगांवी जावें लागलें. १९०७ सालीं आम्ही पुनः पुण्यांत आल्यावर काकासाहेबांच्या तालमीखालीं हें नाटक आम्ही बसविण्यास सुरवात केली. या नाटकांतील कीचकाची भूमिका कै. भागवत यानीं बाहेर गांवीं आम्ही असतां इतकी उत्तम बसविली होती कीं ती काकासाहेबांना फारच आवडली. हें नाटक अहोरात्र काकासाहेबांच्या देखरेखीखाली बसवून २२ दिवसांत स्टेजवर आणलें. या नाटकाची चर्चा जिकडे निकडे होऊं लागली. त्यावेळीं विरोधी पक्षांचीं वर्तमानपत्रें या नाटकांत राजकारण आहे असें लिहूं लागलीं. या नाटकाचे सतत ६ महिने प्रयोग सुरू होते. या सहा महिन्यांच्या अवधींत संगीत मंडळ्यांना मुक्काम हलवावे लागले. आम्हांस या नाटकाची लोकप्रियता लाभली असतांना

थिएटरच्या अभावी बाहेरगांवीं जाणें भाग पडलें. जातां जातां " बायकांचें बंड " हें नाटक काकासाहेबांच्या नेतृत्वाखाली नाटकाच्या तालमी घेऊन १९०७ सालीं तें स्टेजवर आणून आम्ही बाहेरगांवीं गेलों.

## चार नाटकांचे अडीच हजार

या चारी नाटकांच्या लोकप्रितेमुळें संगीत मंडळ्याहि संगीत नाटकें आम्हास द्या, असें काकासाहेबांना म्हणूं लागल्या. तेव्हां भागवत यांनीं मोनॉपलीसंबंधी बोलणें काकासाहेबांजवळ काढलें. त्यावेळीं तुम्हांस काय द्यावयाचें असेल तें तुम्ही द्या, असें काकासाहेबांनीं सांगितलें. आम्ही या चार नाटकांचें काकासाहेबांना अडीच हजार रु. दिले व आम्हांस मोनॉपली मिळाली. ती मराठी नाटकांतील पहिलीच मोनॉपली होय.

" कांचनगडची मोहना " नाटक शाहू नगरवासी नाटक मंडळीनें बसविलें होतें. पण चार पांच नाट्यप्रयोगांनंतर त्यांना बंद करावें लागलें होतें. काकासाहेबांनीं उदारतेनें शाहू नगरवासी मंडळीला हें नाटक बसविण्यास फुकट परवानगी दिली होती. त्यामुळें त्यांना नाटक करण्यास बंदी करूं नका असें आम्हांस काकासाहेबांनीं सांगितलें, त्यामुळें आम्ही बंदी केली नाहीं.

## भाऊबंदकीच्या तालमी

१९०८ सालीं कंपनी बाहेर गांवी जात असतांना काकासाहेबांनीं आमच्या स्वाधीन " भाऊबंदकी " केली व भागवतांसारखा तालीम मास्तर असतांना मीच तालमी घेतल्या पाहिजे असें नाहीं, असें काकासाहेबांनीं सांगितलें. १९०९ मध्यें सोलापूरला हें नाटक बसवून तयार झालें. काकासाहेब रंगीत तालमीला सोलापूरला आले. त्यांनीं तालीम घेण्यास सुरवात केली. तालीम पाहून भागवतांची तालमीच्या बाबत काकासाहेबांनीं प्रशंसा केली. पहिल्या

प्रयोगाला काकासाहेब सोलापुरला हजर होते. एक आठवडा राहिले. नंतर मंडळी मुंबईस जात असतांना कीचक वध नाटक करणारी मंडळी कोठें आहे, अशी बडोद्याचे सयाजीराव महाराजांनीं पुण्यांत असतांना चौकशी केली. ती आम्हांस समजल्यावरून पुण्यांत कीचकवध नाटकाचा एक प्रयोग केला. महाराज आपल्या पत्नीसह नाटकाला आले. कीचक वध सयाजीराव महाराजांना आवडलें. त्यांनीं नाटकाची प्रशंसा केली.

## भागवतांचा फोटोआधीं आत्महत्येचा प्रयत्न

मुंबईला सतत चार महिने भाऊबंदकी नाटक चाललें. प्रत्येक शनिवारीं काकासाहेब मुंबईला येत असत. काकासाहेबांनीं भागवतांजवळ रघुनाथरावं पेशवे या भूमिकेचा फोटो मागितला. तोंपर्यंत भागवतांनीं आपला फोटो काढला नव्हता. सोमवारीं फोटो काढण्याचें ठरलें. पण भागवतांनीं रविवारीं रात्रीं आत्महत्येचा प्रयत्न केला, त्यांतून सुदैवानें भागवत वांचले. तेव्हां काकासाहेब त्यांना म्हणाले की, तुम्ही मला फोटो देऊं नका. तुम्हाला मी माझ्या शब्दांतून मोकळें केलें आहे.

## बडोद्याच्या महाराजांची टाळी

१९१० सालीं आम्ही बडोद्याला गेलों. तेथें बायकांच्या बंडापासून सरकारी नाटकांना सुरवात झाली. भाऊबंदकी नाटकावर तर महाराज इतके खुष झाले कीं, कधीहि नाटकाला टाळी न वाजविणारे महाराज यांनीं त्या नाटकाच्या प्रयोगाच्या वेळीं टाळी वाजविली. तेथेंच आम्ही असतांना कीचक वध नाटक प्रेसॲक्टाखालीं बंद झालें. खाडिलकरांचीं सर्व नाटकें पहाण्याची महाराजांची इच्छा होती. पण कीचक वध बंद झाल्यामुळें आम्हास तेथील मुक्काम हलवावा लागला. बडोद्याला खाडिलकरांचीं इतर सर्व नाटकें प्रेक्षकांना फारच आवडलीं.

थिएटरच्या अभावी बाहेरगांवीं जाणें भाग पडलें. जातां जातां " बायकांचें बंड " हें नाटक काकासाहेबांच्या नेतृत्वाखाली नाटकाच्या तालमी घेऊन १९०७ सालीं तें स्टेजवर आणून आम्ही बाहेरगांवीं गेलों.

## चार नाटकांचे अडीच हजार

या चारी नाटकांच्या लोकप्रितेमुळें संगीत मंडळ्याहि संगीत नाटकें आम्हास द्या, असें काकासाहेबांना म्हणूं लागल्या. तेव्हां भागवत यांनीं मोनॉपलीसंबंधी बोलणें काकासाहेबांजवळ काढलें. त्यावेळीं तुम्हांस काय द्यावयाचें असेल तें तुम्ही द्या, असें काकासाहेबांनीं सांगितलें. आम्ही या चार नाटकांचें काकासाहेबांना अडीच हजार रु. दिले व आम्हांस मोनॉपली मिळाली. ती मराठी नाटकांतील पहिलीच मोनॉपली होय.

" कांचनगडची मोहना " नाटक शाहू नगरवासी नाटक मंडळीनें बसविलें होतें. पण चार पांच नाट्यप्रयोगांनंतर त्यांना बंद करावें लागलें होतें. काकासाहेबांनीं उदारतेनें शाहू नगरवासी मंडळीला हें नाटक बसविण्यास फुकट परवानगी दिली होती. त्यामुळें त्यांना नाटक करण्यास बंदी करूं नका असें आम्हांस काकासाहेबांनीं सांगितलें, त्यामुळें आम्ही बंदी केली नाहीं.

## भाऊबंदकीच्या तालमी

१९०८ सालीं कंपनी बाहेर गांवी जात असतांना काकासाहेबांनीं आमच्या स्वाधीन " भाऊबंदकी " केली व भागवतांसारखा तालीम मास्तर असतांना मीच तालमी घेतल्या पाहिजे असें नाहीं, असें काकासाहेबांनीं सांगितलें. १९०९ मध्यें सोलापूरला हें नाटक बसवून तयार झालें. काकासाहेब रंगीत तालमीला सोलापूरला आले. त्यांनीं तालीम घेण्यास सुरवात केली. तालीम पाहून भागवतांची तालमीच्या बाबत काकासाहेबांनीं प्रशंसा केली. पहिल्या

प्रयोगाला काकासाहेब सोलापुरला हजर होते. एक आठवडा राहिले. नंतर मंडळी मुंबईस जात असतांना कीचक वध नाटक करणारी मंडळी कोठें आहे, अशी बडोद्याचे सयाजीराव महाराजांनीं पुण्यांत असतांना चौकशी केली. ती आम्हांस समजल्यावरून पुण्यांत कीचकवध नाटकाचा एक प्रयोग केला. महाराज आपल्या पत्नीसह नाटकाला आले. कीचक वध सयाजीराव महाराजांना आवडलें. त्यांनीं नाटकाची प्रशंसा केली.

## भागवतांचा फोटोआधीं आत्महत्येचा प्रयत्न

मुंबईला सतत चार महिने भाऊबंदकी नाटक चाललें. प्रत्येक शनिवारीं काकासाहेब मुंबईला येत असत. काकासाहेबांनीं भागवतांजवळ रघुनाथराव पेशवे या भूमिकेचा फोटो मागितला. तोंपर्यंत भागवतांनीं आपला फोटो काढला नव्हता. सोमवारीं फोटो काढण्याचें ठरलें. पण भागवतांनीं रविवारीं रात्रीं आत्महत्येचा प्रयत्न केला, त्यांतून सुदैवानें भागवत वांचले. तेव्हां काकासाहेब त्यांना म्हणाले की, तुम्ही मला फोटो देऊं नका. तुम्हाला मी माझ्या शब्दांतून मोकळें केलें आहे.

## बडोद्याच्या महाराजांची टाळी

१९१० सालीं आम्ही बडोद्याला गेलों. तेथें नायकांच्या बंडापासून सरकारी नाटकांना सुरवात झाली. भाऊबंदकी नाटकावर तर महाराज इतके खुष झाले कीं, कधीहि नाटकाला टाळी न वाजविणारे महाराज यांनीं त्या नाटकाच्या प्रयोगाच्या वेळीं टाळी वाजविली. तेथेंच आम्ही असतांना कीचक वध नाटक प्रेसॲक्टाखालीं बंद झालें. खाडिलकरांचीं सर्व नाटकें पहाण्याची महाराजांची इच्छा होती. पण कीचक वध बंद झाल्यामुळें आम्हास तेथील मुक्काम हलवावा लागला. बडोद्याला खाडिलकरांचीं इतर सर्व नाटकें प्रेक्षकांना फारच आवडलीं.

## भाऊबंदकीवर गंडांतर

बडोद्याहून मुंबईला येऊन आम्ही पुणें येथें आलों. तेथें "भाऊबंदकी" सुरू झाल्यावर ज्ञानप्रकाशमध्यें भाऊबंदकी नाटकावर टीका येऊं लागली. नाटककारांनीं आपल्या पक्षाच्या विरुद्ध असलेल्या पक्षावर टीका करण्याची संवय पूर्ण करून घेतली असल्याचें त्यांत लिहिण्यांत आलें. या टीकेमुळें दुसरा पक्ष म्हणजे सरकारच असें डि. मॅ. ला कीचक वध नाटकावरून वाटल्यामुळें १९१० सालीं अखेरीला त्यानें भाऊबंदकी बंद केलें! यावेळीं खाडिलकरांच्या विरुद्ध पक्षांतील मंडळी खाडिलकरांचीं नाटकें बंद करण्याचा प्रयत्न करूं लागलीं. त्यामुळें आपल्या नाटकांवर चाललेली महाराष्ट्र नाटक मंडळी, तीवर असा प्रसंग आला तर कंपनी बंद पडेल, असें काकासाहेबांना वाटल्यावरून त्यांनीं कंपनीला दुसरीं नाटकें घ्या असें सांगितलें. पण दुसऱ्या नाटकांवर कंपनीचें जीवन अवलंबून ठेवण्यापेक्षां खाडिलकरांच्या बंद केलेल्या नाटकांना पुनः परवानगी मिळविण्याचा प्रयत्न वासुदेवराव गुप्ते यांनीं केला. दुसरा पक्ष म्हणजे सरकारचा नसून आमचा प्रागतिक पक्ष, असा आमच्या टीकेचा रोख होता, असें ज्ञानप्रकाशचे संपादक नटेश अप्पाजी द्रवीड यांनीं लिहून दिल्यामुळें डि. मॅ. नीं तें पत्र पाहून भाऊबंदकी नाटकाला ताबडतोब परवानगी दिली. त्यानंतर या नाटकाचे सतत तीन महिने प्रयोग चालले होते.

यानंतर सांगलीकरांच्या आग्रहावरून आम्हीं सांगलीस गेलों. तेथें "बायकांचें बंड" हा सरकारी प्रयोग झाला, तो सरकारना फारच आवडला.

## प्रेमध्वज नाटक

नंतर आम्हीं पुण्याला आल्यावर महाराष्ट्र नाटक मंडळीवर नाटक–बंदीमुळें गण्डांतर येऊं नये म्हणून काकासाहेबांनीं "प्रेमध्वज" नाटक डिक्टेड करून आम्हांस दिलें व ताबडतोब स्टेजवर आणलें. यावेळीं कंपनी

सहा महिने पुण्याला काकासाहेबांच्याच नाटकांवर राहिली. यावेळीं गडकरी यांचें "प्रेम संन्यास" नाटक कंपनीकडे आलें, तें काकासाहेबांच्या देखतच वाचलें. काकासाहेबांना पसंत पडल्यामुळें त्यांनीं नाटक बसविण्यास सांगितलें. आपलीं नाटकें चालू असतांना दुसऱ्या नाटककारांचीं नाटकें बसविण्यास काकासाहेबांनीं उदारतेनें संमति दिली.

## भागवतांच्या मृत्यूमुळें काकासाहेबांचा दुःखावेग

त्यानंतर काकासाहेब मुंबईला किर्लोस्कर संगीत मंडळीमध्यें "मानापमान" बसविण्यासाठीं गेले. त्या नाटकाच्या तालमींच्या वेळीं आमच्या कंपनींतील भागवतांच्या देखरेखीखालीं नाट्यप्रयोगाची सर्व व्यवस्था करून घेतली. आमचा मुक्काम नागपूरला असतांना तेथें भागवत वारले. ही बातमी 'विद्याहरण' बसविण्यास काकासाहेब हुबळीला गेले असतांना त्यांना कळली. त्यावेळीं त्यांना फारच दुःखावेग झाला. स्नान वगैरे कांहींएक न करतां एका खोलींत ते स्वस्थ बसून राहिले होते. त्यांनीं त्यादिवशीं निर्जळी एकादशीप्रमाणें उपवास केला. इतकें काकासाहेबांचें भागवतांवर प्रेम होतें.

## फुटलेल्या नटमंडळीला निर्वाळा व सबलत

आम्हीं "प्रेमसंन्यास" बसवून सोलापूरला १९१२ मध्यें गेल्यावर तेथें महाराष्ट्र नाटक मंडळी फुटली. ती फुटूं नये म्हणून काकासाहेबांनीं ८ दिवस कंपनींत राहून नानाप्रकारें प्रयत्न केले. पण काकासाहेबांचें न ऐकतां महाराष्ट्र ना. मंडळींतून १५ नट निघून गेले. फुटून गेलेल्यांना काकासाहेबांनीं असा निर्वाणीचा निर्वाळा दिला कीं, दुसरीं माणसें आणून महाराष्ट्र नाटक मंडळी चालेल. विजापूरला आम्हीं गेल्यावर तेथें काकासाहेबांच्या यादीप्रमाणेंच प्रेमध्वजाच्या तालमी कारखानीस यांनीं घेतल्या

व नाटक स्टेजवर आणलें. नंतर आम्हीं हुबळीला गेल्यावर तेथें काकासाहेब मुद्दाम नव्या संचांत नाटकें बसविण्यास आले होते. काकासाहेबांनीं फुटलेल्या नटांना दिलेला निर्वाळा खरा होऊन त्यांच्या शब्दाप्रमाणें महाराष्ट्र ना. मंडळीचीं नव्या संचांत नाटकें चांगलीं होऊं लागलीं.

फुटलेल्या नटांनीं काकासाहेब खाडिलकरांच्या नाट्काशिवाय तरणोपाय नाहीं असें समजून परवानगीशिवाय काकासाहेब यांचें "भाऊबंदकी" नाटक फुटलेल्या नटांच्या नाटक मंडळीनें बसविलें. हें काकासाहेबांना कळतांच त्यांनीं धुळ्याला जाऊन या मंडळीवर कायदेशीर तजवीज करण्यास मला सांगून माझीं नाटकें करूं नका असें त्यांना कळविण्यास सांगितलें. नाटक बंद पडल्यावर त्या कंपनीतर्फे काकासाहेबांना विनंति करण्यांत आली कीं, आम्हांस आपलें "भाऊबंदकी" नाटक करण्यास परवानगी द्या. तेव्हां काकासाहेबांनीं परवानगी दिली व स्वामित्वाबाबत रक्कम ठरवून ती महाराष्ट्र नाटक मंडळीला द्या, असें त्यांना काकासाहेबांनीं कळविलें.

महाराष्ट्र नाटक मंडळीचीं प्रोज नाटकें आम्हांस संगीत करून द्या; अशी विनंति संगीत मंडळींच्या मालकांनीं काकासाहेबांना केली असतांना काकासाहेबांनीं स्पष्ट सांगितलें कीं, महाराष्ट्र नाटक मंडळीकरितां मीं लिहिलेलीं नाटकें संगीत करून देणार नाहीं.

## सत्त्वपरीक्षेचा प्रयोग

१९१४ मध्यें नागपूरला 'सत्वपरीक्षा' नाटक बसविण्यास काकासाहेब आले. त्यांच्या देखरेखीखालीं तालमी सुरू केल्या. नाटक बसवीत असतांना काकासाहेब स्वतःच टोनिंग व ॲक्टिंग शिकवीत असत. दुसरा कोणताहि नाटककार तसें करीत नसे. नंतर 'शिवसंभव' नाटक काकासाहेबांच्याच सांगण्यावरून आम्हीं घेतलें. त्या नाटकाच्या तालमीहि काकासाहेबांनीं घेतल्या.

नंतर वासुदेवराव भोळे "अरुणोदय" नाटकाच्यावेळीं नाटक पूर्ण करण्यास अडले, तेव्हां मुंबईला काकासाहेब लोकमान्यांत असतांना मी व औंधकर १९२३ मध्यें काकासाहेबांकडे गेलों. अरुणोदय नाटक काकासाहेबांना वाचून दाखविल्यावर त्या नाटकाची दिशा फिरवून काकासाहेबांनीं नाटकाच्या पूर्णत्वाला महत्त्वाच्या सूचना केल्या. अरुणोदय घेऊन आम्हीं मुंबईस मुक्काम टाकला.

त्यावेळीं लोकमान्य दैनिकांतून निघाल्याच्या दिवशींच आमच्या बिऱ्हाडीं काकासाहेब आले व लोकमान्याचा संबंध मीं सोडला, मी स्वतः वर्तमानपत्र काढणार आहें, असें त्यांनीं त्याचवेळीं आम्हांस सांगितलें.

"नवाकाळ" चा पहिल्या दिवशीं रात्रीं आम्हीं काकासाहेबांच्या बरोबर इंदुप्रकाशमध्यें बसलों होतों. त्यांनीं त्या दिवशीं रात्रीं जागून पहिला अंक काढला. त्यावेळीं त्यांचीं वृत्ति समाधानाची दिसली.

## मुक्त कीचकवधाची रक्कम नाकारली

आम्हीं उमरावतीला मुक्काम केला असतांना "कीचकवध" नाटकाला परवानगी मिळविण्याच्या संबंधांत प्रयत्न सुरू केले. मध्यप्रांत सरकारनें नेमलेल्या कमिटीपुढें "कीचकवध" करून दाखविलें. त्या कमिटीच्या रिपोर्टावर "कीचकवध" ला परवानगी मिळून प्रयोग लावला. त्यावेळीं कीचकवधाला भरमसाट उत्पन्न मिळूं लागल्यामुळें काकासाहेबांना आम्हीं विनंति केली कीं, याबद्दल जास्त कांहीं रक्कम घ्या. पण काकासाहेबांनीं जास्त रक्कम घेण्याचें नाकारलें. तुमच्या प्रयत्नाला यश आलें, तुम्हींच प्राप्ति घ्या, असें त्यांनीं आम्हास कळविलें. आम्हीं होऊन काकासाहेबांना कांहीं रक्कम पाठवली, पण तिचा स्वीकार त्यांनीं कीचकवध नाटकाची रक्कम म्हणून न करतां पुढें ते देणार असलेल्या "सवती मत्सर" नाटकाच्या खातीं ती रक्कम लिहा, असें त्यांनीं आम्हास कळविलें.

## नाटक कंपन्यांबाबत उदारता

"सवती मत्सर" १९२९ सालीं मुंबईस लावलें. कंपनीला वेळीं अवेळीं सहाय्य करण्यांत काकासाहिब मागें पुढें पहात नसत. प्रसंग विशेषीं अडीअडचणीच्या वेळीं स्वतःच्या सहीची प्रामिसरी लिहून ती दुसऱ्यास देऊन कंपनीला काकासाहेब मदत करीत असत. काकासाहेबांनीं रोकड रक्कमहि दुसऱ्या नाटक मंडळीला दिल्याचें मला माहीत आहे. मोनॉपली रकमेची मागणी त्यांनीं आमच्याकडे कधींहि केली नाहीं. उलट ठरलेल्या रकमेपेक्षां कमी रक्कमहि नाटकांबाबत काकासाहेबांनीं घेतली आहे.


"नवाकाळ" काढल्यावर नाटक मंडळ्यांच्या जाहिरातीचे पैसे राहिले, तरीहि त्यांनीं जाहिराती बंद केल्या नाहींत. निव्वळ पैसे मिळविणें हाच माझा नवाकाळ चालविण्याचा उद्देश नसल्यामुळें "नवाकाळ" च्या जुन्या एजन्टांच्या बाक्या देऊनहि नवीन एजन्ट होत असले तरी मी ते करण्यास तयार नाहीं, असेंहि मला त्यांनीं कांहीं ठिकाणच्या एजन्टच्या बाबतींत सांगितलें. महाराष्ट्र नाटक मंडळीच्या बाकीबाबत त्यांनीं एका पत्रानें किंवा शब्दानें त्यांनीं मला लिहिलें किंवा विचारलें नाहीं.

## संताप आणि गहिंवर

एकदां एक नट कंपनींतून निघाला. त्याची भूमिका काकासाहेबांना आवडल्यामुळें त्याला बोलबून आणण्याचा आग्रह माझ्याजवळ काकासाहेबांनीं धरला. मी त्या नटाच्या पाया पडलों, त्या रात्रीचें १०० रुपये त्या नटास देण्यास मी तयार झालों, पण तो नट येईना. तेव्हां काकासाहेब संतापले, त्यांना तोच नट पाहिजे होता. पण संतापून काकासाहेब घरीं गेल्यावर त्यांना त्या रात्रीं झोप लागली नाहीं, असें आम्ही दुसऱ्या दिवशीं त्यांच्याकडे गेलों असतांना समजलें व त्या नटाबाबत सर्व हकीकत काका-

साहेबांना सांगितल्यावर काकासाहेब म्हणाले कीं, मी विनाकारण तुमच्यावर रागावलों. त्यावेळीं ते गहींवरून आले होते.

काकासाहेबांनीं भाऊसाहेब गोखले यांच्या बाईकीस [illegible] फौचक चष; बायकांचें बंड, भाऊबंदकी, प्रेमध्वज हीं नाटकें लिहिलीं.



# नटश्रेष्ठ श्री. केशवराव दाते

## प्रथमदर्शन व भीति

कै. काकासाहेब खाडिलकर यांना मीं प्रथम पाहिले ते १९०७ सालीं. महाराष्ट्र नाटक मंडळींत मी नुकतेंच म्हणजे दोनचार दिवसांपूर्वीच पदार्पण केलें होतें. कीचक वधाचे प्रयोग जोरांत सुरू होते. व बायकांच्या बंडाचे तीन–चार प्रयोग झालेले असूनहि त्या नाटकाच्या तालमी सुरू होत्या. अशा एका तालमींत काकासाहेबांचें प्रथम दर्शन मला झालें. बायकांच्या बंडांतील चौथ्या अंकांतील तालीम चालली होती. प्रमिलेच्या गळ्यांत अर्जुनाच्या धनुष्याची दोरी होती. प्रमिलेची गुरु सत्यभामा तेथें येऊन अत्यंत संतापानें प्रमिलेकडे पहात म्हणते:–प्रमिले, काय पहातें मी हें!... सत्यभामेचें काम करणारे रानडे नांवाचे इसम होते. काकासाहेबांच्या मनांत सत्यभामेचा जो क्रोधाचा अविर्भाव होता तो त्या पात्राला जमेना. वरील वाक्य पांच–सहा वेळां शिकवून झालें; तरीहि त्या पात्राला जमेना. तेव्हां ते एकदम ओरडले. मी हा प्रकार पाहून तर घाबरून गेलों व हळूच शेजारच्या इसमास विचारलें "कोण हो हे?" तो म्हणाला "अहो हे खाडिलकर नाटककार" झालें, मला वाटूं लागलें कीं, उगीच आपण नाटकांत आलों. निदान या कंपनींत तरी यायला नको होतें.

पुष्कळांना असें वाटण्याचा संभव आहे कीं, नट या नात्यानें काका-

साहेबांशीं माझा पुष्कळच निकटचा संबंध आला असेल. परंतु तसें घडलें नाहीं. याला विशेष दोनतीन कारणें अशीं कीं, माझा बुजरा स्वभाव. माझ्या या स्वभावास पुष्टी देणारें दुसरें कारण असें कीं, ज्या मंडळीच्या परंपरेंत मी वाढलों त्या महाराष्ट्र नाटक मंडळीची पद्धत. नाटककारांचा पितृतुल्य मान महाराष्ट्र नाटक मंडळीशिवाय दुसऱ्या कोणत्याहि कंपनींत राखला जात नसे असा माझा समज आहे. नाटककाराचे गादीपासून चार हात दूर मालकच बसत असत. तिथें माझ्यासारख्या सामान्य माणसाला स्थान कुठें असेल हें आपोआपच समजेल.

## क्रोधावर हुकुमत

पुढें पुढें काकासाहेबांच्या नाटकाच्या तालमी जसजशा मी पाहूं लागलों, व प्रत्यक्ष त्या तालमी मलाच मिळूं लागल्या तशी तशी त्यांच्याविषयींची माझी भीति कमी होत चालली व भीतीचें स्थान आदरानें घेतलें. बायकांच्या बंडाच्या तालमीचा प्रसंग १९०७ सालचा. परंतु १९२७–२८ सालींहि तोच स्वभाव कायम होता. फरक इतकाच कीं क्रोधावर त्यानीं हुकमत फार बसविली होती. ११२८ सालीं 'सवती मत्सराच्या' तालमी चालल्या होत्या. एका जुन्या नटाला ते शिकवीत होते. एकच एक वाक्य पांच सात वेळा शिकवल्यावर एकदम चिडून ओरडले ' २५ वर्षें नाटकांत घालविलींत, काय हजामती केल्यात " मी तर हॉलमधून पळून जाण्याच्याच विचारांत होतों. परंतु लगेच शांत आणि प्रेमळपणानें, पुढील वाक्य त्या नटाला ते शिकवूं लागले. हें असें तालमींच्यावेळीं होत असतां, नाटकाच्यावेळीं मात्र अंकाचा पडदा पडल्यावर आंतमध्यें येऊन सर्वांना शाबासकी देण्यास सहसा चुकत नसत.

## अभिनयाचें विवेचनपूर्ण शिक्षण

मला त्यांच्या पुष्कळ दिवस तालमी मिळाल्या त्या दोन भूमिकांच्या–

प्रेमध्वज व हरिश्चंद्र ! प्रेमध्वज नाटकांत माझ्याकडे प्रथम पद्मावतीची भूमिका होती. नंतर माझ्याकडे काकासाहेबांनीं प्रेमध्वजाची भूमिका देऊन प्रेमध्वजाच्या माझ्या एकटयाच्या तालमी ते महिना सव्वा महिना रोज घेत असत. तालमींत व तालमीनंतर त्या भूमिकेचीं बाह्यांगें व अंतरंगें ह्याचें खूप विवेचन करीत. ती भूमिका हाच नटाच्या शिक्षणांतील माझा पहिला धडा असें म्हणावयास हरकत नाहीं.

१९१४ सालीं 'सत्त्वपरीक्षा' बसविण्यास ते नागपूर येथें आले होते. त्यांनीं दिलेल्या हरिश्चंद्राच्या तालमीनें, मला दुसरा धडा मिळाला असें समजण्यास हरकत नाहीं. 'सत्वपरीक्षे' च्या तालमी ते घेत असतां, कित्येक वेळां इतके सद्गदीत होत कीं, दोन चार मिनिटें तालमी थांबवाव्या लागत. अशा भावनोत्कट शिक्षकाच्या हाताखालीं आम्ही अभिनयाचा अभ्यास केला नसता तर आम्हांला करंटेच म्हणावें लागलें असतें. या दोन भूमिकांच्या शिक्षणाची जी शिदोरी काकासाहेबांनीं गांठीं बांधली त्या जोरावरच आतांपर्यंतचा माझा नाट्य–प्रपंच मी करूं शकलों. नाट्य शिक्षणांत, शब्द, स्वर, श्वसन, अर्थ, आविर्भाव व सर्वांत महत्त्वाचें 'मनन' यावर त्यांचा फार भर असे. आपल्याला जें जें माहीत आहे तें सर्व शिकविण्याची त्यांची जी वृत्ति त्यापुढें त्यांच्या तापटपणाचा आम्हांला कधीं राग आला नाहीं. कारण प्रत्येक गोष्ट उत्तम झाली पाहिजे या त्यांच्या मनाच्या ठेवणीचा तो एक आविष्कारच होता.

## शीघ्रकोप व संयम

त्यांच्या तापटपणाबद्दल त्यांना घडलेली अद्दल एकदां त्यांनींच सांगितली होती–तरुण वयांत ते सांगलीला शिक्षकाचें काम करीत असतां, त्यांनीं एका मुलाला मारल्याबद्दल त्या मुलाची मातोश्री काकासाहेबांच्या मातोश्रीकडे

तक्रार घेऊन आली. काकासाहेबांच्या मातोश्री त्यांना बोलल्या. तेव्हां काकासाहेबांनीं आपल्या मातोश्रींच्या समोर शपथ घेतली कीं, यापुढें कुठल्याहि मुलाला छडी किंवा हात लावणार नाहीं. आणि ही शपथ पुढें त्यांनीं आयुष्यभर पाळलेली दिसते. कारण स्वतःच्या मुलांनाहि कधीं त्यांनीं बोट लावल्याचें त्यांच्या चिरंजीवांना आठवत नाहीं.

वक्तशीरपणाबद्दलहि काकासाहेब स्वतः जागरुक असत. याबाबत दुसरा कोणी चुकला तर याच तापट स्वभावाप्रमाणें त्याची हजेरी घेण्यास ते कमी करीत नसत. सवती–मत्सरच्या तालमींच्यावेळीं ह्याच कारणावरून मी त्यांच्या रागाचा एकदां विषय झालेला होतो. एकदां असें झालें कीं, नाटकाचें कापड खरेदी करण्याकरितां मी बाजारांत गेलों. तालमीच्या वेळीं मी परत येईन अशी कल्पना, परंतु नाटकाकरतां खरेदी करण्यास गेलों असतां जें व्हायचें तेंच झालें. मला दोन तास उशीर झाला. त्यावेळीं रागीट नजरेशिवाय दुसरें कांहीं झालें नाहीं; परंतु दुसऱ्या दिवशीं खूपच कानपिचक्या मिळाल्या. नाटकाची सजावट मुख्य कीं नाटकाच्या तालमी महत्त्वाच्या, या समजुतीच्याच स्वरानें हें प्रकरण मिटलें. हा तापट स्वभाव पुढें पुढें पुष्कळच कमी झाला होता. आपल्या तापट स्वभावाची जाणीव काकासाहेबांना सदोदित असावी असें 'मेनका' नाटकांतील विश्वामित्राच्या भाषणावरून दिसून येते. मेनका नाटकांतील विश्वामित्र, क्रोध जिंकूं इच्छिणाराच विश्वामित्र रंगवला आहे. एके ठिकाणीं विश्वामित्र म्हणतो–मेनके, मी कसला दयासागर ! मी कसला विश्वामित्र ! मी कसला पतितांचा उद्धार करणार ! क्रोध माझा नष्ट झाला नाहीं, इतकेंच नव्हे तर क्रोध मला आवरतांहि येत नाही..... काम मला कह्यांत ठेवतां येतो, पण क्रोधाला मी हां हां म्हणतां बळी पडतों..... काम आणि क्रोध, यांना आवरणाऱ्या मंत्राचें ध्यान मी सांप्रत करीत असतों.'

## आत्मस्तुतीबद्दल व परनिंदेबद्दल मौन

सामान्यतः अशा तापट स्वभावाच्या माणसांत आत्मप्रौढीनें दुसऱ्याची उणी काढण्याचा धर्म केव्हां केव्हां दिसतो. पण याबाबत काकासाहेबांचें मौन कमालीचें दांडगें होतें. संपादकाच्या खुर्चीवरून त्यांनीं कोणाचीं व्यक्तिविषयक व्यंगें काढलीं असतील असें मला वाटत नाहीं. खाजगी बैठकींतहि कोणा राजकीय प्रतिपक्षांतील माणसाची, नाटककाराची किंवा सामान्यहि नटाची निंदा त्यांच्या तोंडून मी ऐकली नाहीं. ज्यावेळीं दुसऱ्याची निंदा मनुष्य सहज करील किंवा स्वतःची प्रतिष्ठा मिरवील असे दोनतीन प्रसंग काकांच्यासंबंधी मला आठवतात.

मेनका नाटकामधील विनोदी भागावरून त्यावेळच्या वृत्तपत्रांतून जी मोठी वावटळ उठली–विशेषतः केसरींतील लेखांनीं–त्यासंबंधी त्यांचें मत पहावें म्हणून मी पुष्कळ आडवळणांनीं प्रयत्न केला. पण यासंबंधी त्यांचें मौन कायम होतें. मी बोलावें किंवा विचारावें त्यास नुसतें हुं हुं म्हणत. मी म्हणालों 'गुरु आणि संप्रदाय हे जेथें आले तेथें आपल्या नाटकांतील चित्रणाप्रमाणेंच दृष्यें दिसतात. याची मौज आमचे राजकीय पक्ष नष्ट झाल्यावर सुद्धां तशीच राहील... ..निदान केसरीनें तरी याची दखल घेण्यास नको होती...'काका स्तब्धच. मी धीर करून विचारलें. आपल्याला काय वाटतें? ते माझ्याकडे पाहून नुसते हंसले व नेहमींच्या फेऱ्या सुरू झाल्या. या देवाला या विषयांत कळे लावण्यांत अर्थ नाहीं असें समजून मी तो विषय शेवटीं सोडून दिला.

## 'गुलामगिरींतून सुटलों'

एक प्रसंग असा कीं एक दिवस कंपनीच्या बिऱ्हाडीं काकासाहेब अकस्मात आले. चेहरा शांत व अत्यंत समाधानी दिसत होता. कांहीं विशेष

असावें असें मला वाटत होतें; पण विचारण्याची छाती नव्हती. तेव्हां हवापाण्याच्या गोष्टी होतां होतां वर्तमानपत्राच्या गोष्टी निघाल्या. मध्येंच काका एकदम म्हणाले, आज एका गुलामगिरींतून सुटलों. लोकमान्याच्या संपादकत्वाचा राजीनामा देऊन बाहेर पडलों आहें. त्यांच्या चेहऱ्यावरील दिसणाऱ्या भावनांचा उलगडा मला आतां झाला. त्या संस्थेंत कांहीं गडबड सुरू आहे असें त्यांच्याकडूनच एकदां समजलें होतें. संपादकीय लेख बोर्डाच्या पॉलिसीप्रमाणें आले पाहिजेत असें सांगण्यांत येईल अशा तऱ्हेची खात्रीलायक बातमी त्यांना समजली होती. तो प्रसंग येण्यापूर्वीच राजीनामा देऊन मोकळेपणाचें सुख ते घेत होते. मला तर त्यावेळीं काकांकडे पाहून "कांचनगडची मोहना" या नाटकांतील प्रतापरावाची आठवण झाली. प्रतापराव एके ठिकाणी म्हणतो ".....ज्या युद्धामुळें माझ्या घराण्याची पाळंमुळंसुद्धां बादशहा खणून काढील अशा युद्धाचा भार मी आपण होऊन माझ्या शिरावर घेतला आहे. अशा वेळीं .....तुझ्या अधिकाराच्या गुलामगिरीचें जड जूं मी असें फेकून देतों, असें बादशहाला बजावण्याचा प्रसंग अधिक आनंदाचाच वाटला पाहिजे," नंतर सर्व हकीकत त्यांनी खुलासेवार सांगितली. परंतु बोर्डांतील मंडळीबद्दल कमीपणाचा एक शब्दहि निघाला नाहीं. त्यांच्या धोरणाप्रमाणें तें बरोबरच होतें. आपण काय, आणि कसें वागायचें हें आपणच ठरवायचें असतें.

## गुरूनें दिलेली शिदोरी

कांहीं काळानंतर दुसरा असाच एक प्रसंग आला. त्यांत दुसऱ्याचें नांव निघण्याची फारशी संधि नव्हती; पण काकांचें अंतःकरण मात्र भावी कार्याच्या आनंदांत निमग्न असलेलें, कृतज्ञता व श्रद्धा यांनीं भरलेलें दिसत होतें. काकांची तितकी उत्साही व आनंदी मुद्रा मी पूर्वी पाहिली नव्हती व पुढेंहि पाहिलेली आठवत नाहीं.

"नवाकाळ" वर्तमानपत्र काढण्याचें ठरलें होतें. कोणाचें काय सहाय्य घ्यायचें वगैरे बोलणीं चाललीं असतां, भांडवलाची गोष्ट निघाली. तेव्हांची काकांची मुद्रा मी केव्हांच विसरणार नाहीं. ते म्हणाले, गुरूंनीं—बळवंतरावांनीं—पांच हजार रुपयांची शिदोरी दिली आहे. त्याचा उपयोग त्यांच्याच कार्याकरितां करायचा. हें बोलतां बोलतां त्यांचा आवाज घोगरा झाला व तो विषय थांबला.

## द्रौपदी व मेनकेचें चित्रण

एकदां मेनकेच्या भूमिकेसंबंधींहि काकासाहेबांशीं बोलणें निघालें. मी म्हणालों, लोकांचा समज असा कीं मेनका म्हणजे जवळ जवळ कलावंतीण आणि आपण तिला एकदम पतिव्रता बनविली, त्यामुळें अपेक्षाभंग होतो. काका म्हणाले, सर्वसामान्य मनुष्य पौराणिक कथांच्या मुळापर्यंत जात नाहीं त्यामुळें असें होतें आणि पौराणिक कथांना फार पूर्वीपासून निरनिराळीं वळणें अनेक लेखकांनीं व कवींनीं आपापल्या दृष्टिकोनांतून दिलीं आहेत. त्याच्च कथा आपापल्या देशकालपरिस्थितींतून कवि, प्रवचनकार, वेदांती, हरिदास, नाटककार सांगत असतो. त्यामुळें सभोंवारच्या रंगाच्या छटा त्यावर येत असतात व तें स्वाभाविक आहे. मूळ कथा नीट वाचल्या गेल्या तर वाईट काय झालें, बरें काय झालें हें आपोआप समजून येईल.

द्रौपदीच्या भूमिकेविषयीं मी त्यांच्याशी एकदां बोललों होतों. मी म्हणालों कीं, लोक म्हणतात की, द्रौपदी फारच उर्मट रंगविली आहे. तिच्या तोंडी घातलेली भाषा शोभत नाहीं. काका म्हणाले, माझ्या पदरचें मी त्यांत फारसें घातलें नाहीं, नाटकांत लोकांना तसें वाटतें याचें कारण एवढेंच कीं, महाभारतांत तिच्या तोंडीं निरनिराळ्या ठिकाणीं जी भाषा वापरली आहे ती मी एकाच ठिकाणी वापरलीं आहे इतकेंच. हें बोलत असतां मयसभा निर्माण होण्यांत द्रौपदीच्या इच्छेचाच कसा भाग होता याची गोष्ट काकांनीं

सांगितली. ते म्हणाले कीं, "आपल्या हातून पांडवांची कांहीतरी सेवा घडावी म्हणून मयासुर धर्मराजाकडे गेला. धर्मराजानें व त्याच्या आज्ञाधारक बंधूंनीं सांगितलें कीं आम्हांला कांहीं नको, परंतु तुझा आग्रहच असेल तर आमच्या कृष्णदेवाकडे जा. ते जी कामगिरी तुला सांगतील ती आम्हांला मान्य आहे. अर्थात् मयासुर कृष्णाकडे गेला व म्हणाला 'पांडव मला कांहींच कामगिरी सांगत नाहींत तेव्हां मी आपल्याकडे आलों आहें' कृष्ण म्हणाला, 'वेड्या, त्या भावांकडे तूं कशाला गेलास! तूं द्रौपदीकडे जा, ती तुला बरोबर कामगिरी सांगेल' त्याप्रमाणें द्रौपदीनें त्याला मयसभेची कामगिरी सांगितली. कौरवांना वैभवानें दिपवून सोडायचें हीच द्रौपदीची महत्त्वाकांक्षा व त्यांतूनच पुढें मोठें भारत निर्माण झालें. काकांचें म्हणणें "द्रौपदी थोर खरी परंतु स्त्रीच होती व सामान्य माणसांप्रमाणें तिच्याहि मनांत षड्रिपू वास करीत होते. परंतु तिच्यांतील उत्कट कृष्णभक्तीला मात्र पार नव्हता." काकांचे बोलण्यावरून, वीररसात्मक भक्तीचें चित्रण त्यांनीं द्रौपदीच्या रूपानें केलेलें आहे. त्या दृष्टिकोनांतून द्रौपदी नाटक वाचलें असतां, आनंद झाल्यावांचून खात्रीनें रहात नाहीं. नमुना म्हणून द्रौपदीची कांहीं भाषणें पहा.

"श्रीकृष्णाच्या, माझ्या भावाच्या अग्रपूजेचा हक्क हिसकावून घेऊं पहाणारांना धिःकारण्याचा आणि हंसण्याचा अधिकार मला आहे..... श्रीकृष्णाच्या पूजेंतल्या प्रत्येक पत्रीगणिक जीव खर्चावा लागला तरी ही द्रौपदी जीव खर्ची घालील.....पांडव पाहिजे तर पुन्हां वनवास सोसतील, दरिद्री होतील, पण जिवांत जीव असेतों श्रीकृष्णाचीच अग्रपूजा करतील, श्रीकृष्णाची निंदा भूतलावर कोणालाहि करूं देणार नाहीं." ह्यासारखीं द्रौपदीची दुसरींहि सुन्दर भाषणें ऐकत असतां, काकांचें वीरवृत्तीचें सर्व आयुष्य डोळ्यासमोर उभें रहातें.

## महाभारतांतील मानवी पात्रें

काकासाहेबांशीं एकदां द्रौपदी नाटकांतील दुर्योधनाविषयीं बोलणें निघालें होतें. मीं म्हटलें, ठराविक सांच्याचा खलपुरुष दुर्योधनाला आपण केला नाहीं, हीहि गोष्ट द्रौपदी नाटकांत नवीनच वाटते. काका म्हणाले, खरें आहे तें. महाभारतांत आलेली प्रत्येक महत्त्वाची भूमिका मानवी गुणदोषांनीं युक्त अशीच आहे, म्हणजेच मानवी आहे. दुर्योधन ज्यांच्या हिताच्या आड आला असेल त्यांना तो दुष्ट खलपुरुष वाटणार व तेवढ्यापुरताच तिऱ्हाइताच्या दृष्टीनें तो खलपुरुष असतो. दुर्योधन ज्यावेळीं मरण पावला त्यावेळीं आकाशांतून देवांनीं त्याच्यावर पुष्पवृष्टि केली, ती काय तो दुर्गुणांचा पुतळा म्हणून कीं नीच म्हणून ?

येथें एक सांगणें आवश्यक वाटतें कीं, काकासाहेबांच्या तोंडचीं जीं वाक्यें घातलीं आहेत तीं शब्दशः त्यांचीं आहेत, असें नाहीं. कारण फार काळापूर्वी झालेलीं हीं संभाषणें आहेत. त्यांच्या बोलण्याचा जो भावार्थ माझ्या मनांत ठसून राहिला त्याचें वर्णन मी करीत आहें. पुराणांतील कथा सांगूं लागले म्हणजे काकासाहेब फार रंगून जात असत आणि त्यामध्यें त्यांचा दृष्टिकोनहि स्पष्ट दिसत असे.

आपल्या नेहमींच्या बोलण्यांत दाखला देतांना " अर्थस्य पुरुषो दासः " हें सुभाषित आपण नेहमीं वापरतों. कौरव–पांडवांमधील द्यूतप्रसंगीं द्रौपदीनें भीष्माची विनवणी केली असतां त्याच्या भाषणांत हें वाक्यार्ध आलें आहे. भीष्माच्या बोलण्याचा नेहमीं असा अर्थ केला जातो कीं, मी कौरवांचें अन्न खातों आहें त्यामुळें त्यांचा मिंधा आहें. काका म्हणाले, भीष्म कौरव–पांडवांचा पितामह असतां तो कौरवांचें अन्न खातो हें आधीं खरें नाहीं. तेव्हां भीष्म अशी पोकळ सबब सांगून वेळ मारून नेईल असें वाटत नाहीं.

पुरुष अर्थाचा दास खरा, परंतु हा 'अर्थ' कोणता? भीष्मासारखा क्षात्रधर्मी कोणत्या अर्थाचा दास असूं शकेल? बापाजवळ प्रतिज्ञा केल्यामुळें स्वत:चा प्रपंच असा त्यास राहिलेला नव्हता. तेव्हां याचा 'अर्थ' कोणता? परिस्थितीनें त्यानें प्रतिज्ञा केल्यापासून पुढें पराक्रम गाजवण्याची, लढण्याची, खुमखुमी शमवण्याची जी संधी त्याला मिळाली नव्हती ती भारतीय युद्धानें मिळाली. तो कौरवांचा सेनापति झाल्यापासून पांडव रोज त्याच्याकडे जाऊन तुमचा मृत्यु कशांत आहे तें सांगा म्हणून त्याची विनवणी करीत होते. भीष्म 'उद्यां सांगेन, उद्यां सांगेन' असें म्हणत पांडवांकडील हजारों योद्धे मारीत होता. सरतेशेवटीं श्रीकृष्णानें ज्यावेळीं भीष्माविरुद्ध हातांत शस्त्र धरलें त्यावेळीं भीष्माला खरा आनंद झाला. कारण तोच त्याच्या पराक्रमाचा उच्चांक होता. प्रत्यक्ष भगवंतानें हातांत शस्त्र धरलें, म्हणजे त्यावेळच्या सर्व क्षत्रियांत भीष्म श्रेष्ठ असें एक प्रकारचें विजयपत्र त्याला मिळालें. क्षत्रीय वीराचा खरा 'अर्थ' हा होय. या 'अर्था'चा भीष्म दास होता. मनुष्याच्या मनांतील कोणतेंहि इच्छित पराक्रमानें साध्य करून घेणें यालाच पुरुषार्थ म्हणतात; आणि या दृष्टीनेंच 'अर्थस्य पुरुषो दासः' हें खरें आहे.

हा सारा प्रसंग काका असा कांहीं रंगवून सांगत असत कीं, यांच्या मनांत या प्रसंगावर नाटकच लिहिण्याचें असावें. आणि मी त्यांना तसें म्हणालोंहि. त्यावेळीं ते म्हणाले छे, छे, तसें कांहीं नाहीं. तुम्हीं म्हणतां त्याप्रमाणें नाटकाला प्रसंग चांगला आहे खरा, पण असे रंगविण्यासारखे प्रसंग पुराणांतून पुष्कळ मिळण्यासारखे असतात. आपल्या दृष्टीला ते पहातां आले पाहिजेत इतकेंच. पुराणें व संस्कृत काव्य यांचा जबरदस्त व्यासंग काकानीं केला होता. एका गृहस्थानें तर मला असें सांगितलें कीं, भवभूतीचें 'उत्तर रामचरित' काकांना जवळ जवळ मुखोद्गत असे.

## विकारांच्या व विचारांच्या झगड्याचीं नाटकें

पौराणिक कथा नाट्यरूपानें त्यांच्या मनांत वावरत असत असे दाखले त्यांच्या नाटकांतील अनेक उल्लेखांवरून देतां येण्यासारखे आहेत. त्यांच्या "कांचनगडची मोहना" या नाटकांत दारूबाज म्हातारा दादासाहेब कोठारे म्हणतो "अहो शुक्राचार्य दारू पीत असत म्हणून कचाला संजीवनी विद्या प्राप्त करून घ्यायला संधी मिळाली." एवढ्यावरूनच मला असें नाहीं म्हणायचे कीं, त्यांनीं पुढें अठरा वर्षांनंतर लिहिलेलें विद्याहरण नाटक त्यावेळींहि त्यांच्या मनांत लिहिण्याचें असेल. परंतु त्यांच्या नाट्यप्रेमी मनांत नकळत त्याची घडण घडत असावी. नाट्यप्रेमी वाचकांना करमणूक म्हणून असे संदर्भ काकांच्या नाटकांत आढळले तर त्यांना मौज वाटेल.

काकासाहेबांच्या 'सत्व–परीक्षा' नाटकानंतर त्यांनीं गद्य नाटक असें एकच लिहिलें आणि तें 'सवती–मन्सर' हें होय. परंतु काकांच्या गद्य नाटकांनीं जी कीर्ति मिळविली ती 'सवती–मत्सरा' नें मिळविली नाहीं. त्याला इतर कांहीं कारणांबरोबरच आमचा दुबळा नटसंच हें एक प्रमुख कारण असावें असें मला वाटतें. काकांना ही गोष्ट दिसत नव्हती असें कोण म्हणेल ? पण काका चुकूनसुद्धां ही गोष्ट आम्हां नटमंडळींशीं बोलले नाहींत. कांहीं काळानंतर–मला वाटतें 'सावित्री' नाटक रंगभूमीवर आल्यानंतर असावें–मी एकदां काकांना म्हणालों कीं, नाटकाच्या बांधणींत किंवा प्रसंग उत्कर्षाला नेण्याच्या पद्धतींत पूर्वीच्यापेक्षां फारसा फरक झाला नसतां हीं नाटकें पकड कां घेत नाहींत ? पूर्वीच्या नाटकांप्रमाणें भावनांचा घवघवीतपणा ह्यांत दिसत नाहीं हें कारण असावें काय ?

काका म्हणाले 'तुमची शंका बरोबर आहे. माझ्या लिहिण्याच्या तंत्रांत फरक वगैरे कांहीं झाला नाहीं. पण मनोविकारांचा झगडा ज्यांमध्यें जास्त असतो त्याचें बाह्य दर्शनहि ठसठसीत असतें; त्यामुळें प्रेक्षकांचें मन त्याकडे

चटकन ओढलें जातें. विचारांचा संग्राम विकारांच्या संग्रामाहून जरा कमी दिखाऊ, सहज लक्ष वेधून न घेणारा , त्यामुळें तुम्हीं म्हणतां तो परिणाम होत असेल. यावर माझ्या मनांत त्यांना विचारावेसें वाटलें कीं भावनाप्रधानच लिखाण आपण जास्त कां लिहीत नाहीं ? परंतु हें बोलण्याचा धीर कांहीं मला झाला नाहीं. मध्यें कांहीं वेळ आम्हीं कांहींच बोललों नाहीं. परंतु माझ्या मनांतील प्रश्न जणूं समजूनच कीं काय, ते बोलले कीं " मनामध्यें पूर्वी योजलेल्या साऱ्या गोष्टी एकदां लिहून टाकायच्या, झालें. "

त्यावेळचा त्यांचा स्वर व भाषण हें मला तर बाह्य विषयांपासून हळूहळू निवृत्त होऊं पहाणाऱ्या मनुष्याचें वाटलें, व पुढें उत्तरोत्तर ती काकांची वृत्ति वाढत गेली असें दिसतें. कारण त्यांच्या शेवटच्या ' त्रिदंडी संन्यास ' या नाटकांतील काकांचा दृष्टिकोन निदान मला तरी नीटसा समजला नाहीं. भाऊबंदकी नाटकानंतर लगेच ' त्रिदंडी–संन्यास ' लिहिण्याचा त्यांचा मानस होता. त्यावेळीं काकांच्या मनांत विशेषतः नारदाची भूमिका रंगवण्याचें होतें. विचारसूत्र ( Theme ) उपहासगर्भ मार्गांनीं शिकविणें, कार्याला प्रवृत्त करणें हें होतें. त्यावेळीं त्यांच्या बोलण्यांत आलेली ही गोष्ट प्रत्यक्ष नाटकांत मला दिसली नाहीं. त्याला कारणहि माझ्या कल्पनेप्रमाणें ते बाह्य गोष्टींपासून मनानें निवृत्त होत चालले होते हेंच होय. असें असतांहि त्यांच्या मनावर संगीताची पकड मात्र जबरदस्त असावी. आणि तशी नसती तर ' बायकांचे बंड ' व ' त्रिदंडी संन्यास ' संगीत करून रंगभूमीवर आणण्यास गोड गळ्याव्यतिरिक्त इतर कांहीं विशेष सामग्री नसलेल्या व्यक्तींस त्यांनीं परवानगी दिली नसती असें वाटतें.

## मनाबरोबर बुद्धीहि रममाण झाली पाहिजे

स्वतः संगीत शिकण्याकरितां त्यांनीं किती मेहनत घेतली हें माझ्यापेक्षां

गंधर्व मंडळींतील नटच जास्त सांगूं शकतील. संगीताची मोहिनी त्यांच्या मनावर किती होती हें त्यांनींच 'मानापमाना'च्या प्रस्तावनेंत स्पष्ट केलें आहे. संगीताचा अभ्यास करण्यांत त्यांचे दोन हेतू स्पष्ट होते. एक, संगीत नाटक लिहितांना पदांच्या चाली, राग, इत्यादींमधील मर्म व बारीक भेद समजण्यास अडचण पडूं नये व दुसरा हेतु असा कीं, प्रवचनकार किंवा कीर्तनकार यांचा पेशाहि प्रसंगीं करतां यावा. त्यांच्या गद्य नाटकांवर गंडांतरें येऊं लागलीं त्यावेळीं यदाकदाचित् जर नाटकांत अडथळा आला तर लोकशिक्षणाचें कार्य कीर्तनकाराचा पेशा पत्करूनहि करायचें, असें त्यांच्या मनांत होतें. एका कीर्तनकारांच्या संमेलन प्रसंगीं त्यांनीं असे उद्गार काढले होते कीं, आम्ही नाट्यलेखक मूळचे कीर्तनकारच्च आहोंत. गाण्याचा अभ्यास करतांना ते कीर्तनकारांचीं पदें गाबूनच तो करीत असत. जीवनांतील कोणत्याहि विषयाचा अभ्यास करावयाचा ठरविल्यानंतर तो अत्यंत भक्तिपूर्वक व ईश्वरावरील निष्ठेसम करावयाचा ही त्यांची वृत्ति होती.

मला एकदां ते म्हणाले कीं, कलेमध्यें काय किंवा मनुष्य करीत असलेल्या व्यवसायामध्यें काय, नुसतें मन रममाण होऊन पुरतच नाहीं; तर बुद्धीहि रममाण व्हावी लागते. कलेमध्यें मन सहज रममाण होईल, पण बुद्धीला मात्र मोठ्या प्रयत्नानें रमवावें लागतें. यावेळीं गीतेंतील 'व्यवसायात्मिका बुद्धि' यावर एक लहानसें प्रवचन त्यांनी केलें. गाण्याच्या त्यांच्या अभ्यासावरील भक्तीचें एक उदाहरण असें कीं, त्यांच्या स्वराच्या पेढीवर देवाप्रमाणें फुलें वाहिलेलीं असायचीं व तिची स्थापनाहि स्वतंत्र अशी असायची.

## गाण्याची आवड

गाण्याची आवड काकांना फार पूर्वीपासून असावी. मानापमान लिहिण्याच्या पूर्वीची एक गमतीदार गोष्ट आहे ती सांगतों. १९०८-९ सालीं पुणें

मुक्कामीं आमच्या कंपनीच्या बिऱ्हाडीं मी आपल्या खोलींत मोठ्या जोरानें ब रंगांत येऊन Bath room संगीत आळवीत होतों. त्याच वेळीं काका कंपनींत आले व श्री. कारखानीस व ते बोलत बसले. अण्णा कंपनींत आहेत याची मला दाद नव्हतीच.त्या दोघांनीं माझें गर्दभगान ऐकलें असावें.

मला निरोप आला कीं काकासाहेब आले आहेत व ते तुम्हाला बोलावीत आहेत. हें ऐकून मी तर थंडच झालों. मी खाली येऊन त्यांच्यासमोर अपराध्यासारखा उभा राहिलों. काकासाहेब म्हणाले कोण? तू गात होतास कायरे? म्हण पाहूं काय म्हणत होतास तें? बऱ्याच वेळानें आतां गाण्या-वांचून आपली सुटका नाही असें दिसून आल्यानंतर तंगडी धरून ओढत नेत असलेल्या मेंढराप्रमाणें मी गाणें म्हटलें. आणि पदहि कोणचें! असें तसें नव्हे. तर फाल्गुनराव गद्य नाटकांतील 'सुखांत चंद्रानना पातली' ही चार ओळीची दिंडी. गाणें पुरें होतांच मी तेथून पाय काढला. मागें त्या दोघांचें काय बोलणें झालें तें हरि जाणें. काकांच्या संगीताच्या आवडी-मुळें वरील प्रसंग घडून आला कीं, माझ्या गाण्यामुळें काकांची गाण्याची आवड वाढली हें वाचकांनीं ठरवावें. पण ज्या अर्थी पुढें त्यांचा संगीताचा नाद सुटला नाहीं त्याअर्थी माझ्या गाण्यानें त्यांना धक्का खास दिलेला नसावा.

नाट्य आणि संगीत यांची जोडी उत्तर वयांतहि त्यांच्या मनांत पक्की जागा घेऊन बसली असावी. याचें दुसरें एक उदाहरण असें कीं १९३४ सालीं आम्ही नाट्य मन्वन्तरची 'आंधळ्यांची शाळा' पहाण्यास त्यांस बोलावलें होतें. नाटक संपल्यावर जेव्हां ते आंत आले, तेव्हां नटनटींची त्यांना ओळख करून दिली. सर्वांचें सहर्ष कौतुक केल्यानंतर सौ. वर्तकांकडे पाहून म्हणाले, तुम्हीं गात नाहीं का? त्यांच्या उत्तराआधींच मीच त्यांना नाहीं म्हणून सांगितलें. काका म्हणाले, यांचा गळा गोड आहे कीं नाहीं आणि असला तर बायकांची साधीं गाणीं घातलीं तरी चालतील. यांना एक

दोन गाणीं तुम्ही ठेवाच. पुनर्जन्मावर जर विश्वास ठेवला तर आपल्या हेतु-सिद्धीसाठीं संगीत कलेला रामविणारे काकासाहेब, भविष्यकाळीं मराठीं रंगभूमीच्या खऱ्याखुऱ्या ऑपेराचे कंपोजर व पायोनियर होतील.

## प्रेमळ व रसिक

त्यांच्या प्रेमळ व रसिक वृत्तीचें एक हृद्य दृश्य माझ्या मनापुढें नेहमीं येतें व त्याच्या काल्पनिक दर्शनानेंहि मला आनंद होतो. तें मीं समक्ष पाहिलें नाहीं. पण लोकांच्या प्रत्यक्ष पाहिलेल्या वर्णनावरून माझ्या मनापुढें उभें केलें आहे. :—

सनातनी आचारांचा, खादीचा साधा पोषाख धारण करणारा, उग्र चेहऱ्याचा, एक वयस्कर नाटककार, आपल्याइतक्याच वयाच्या, आपल्या पांगळ्या झालेल्या पत्नीस आस्थापूर्वक नाटकगृहांत पुढील रांगेंत आणून बसवीत आहे. पत्नीच्या आरामाची सर्व काळजी वारंवार घेत आहे व स्वतः लिहिलेलें संगीत नाटक रंगभूमीवर सुरू झाल्यावर त्याचा आस्वाद उभयतां हंसत प्रसन्न मनानें घेत आहेत. ह्या चित्रांतील हीं दोघें म्हणजे, काकासाहेब आणि सहसा कधीं बाहेर न दिसणाऱ्या त्यांच्या पत्नी होत असें आपणांस सांगितलें, तर माझ्याप्रमाणेंच सुखद आश्चर्याचा एक मजेदार धक्का बसून, नाटक पहाण्यापेक्षां यांचें हें चित्र पहाण्यांत आपण जास्त गुंगून जाणार नाहीं का? ज्यांच्यांतील पराकाष्ठेची वृत्ति सहसा कधींहि बाहेर दिसत नसे, त्या काकासाहेबांचें हें प्रासंगिक चित्र पाहून मला तर फार फार कौतुक वाटत असे.

## नटांविषयीं मातेचें वात्सल्य

काकांच्या सहवासानें आम्हां नटांपैकीं कुणाचें किती कल्याण झालें तें वर्णन करण्याचें स्थळ ही "स्मरणी" नव्हे. माझ्या प्रमाणेंच त्यांच्या

सहवासाचा लाभ झालेल्या नाट्य व्यावसायिकांनीं आपापल्या मनावरील काकांच्यामुळें झालेल्या परिणामाचीं वर्णनें केलीं, तर मला वाटतें काकांच्या-विषयीं एक मोठा ग्रंथ सहज होईल. नाटकधंद्यांतील सर्व लोकांशीं काकांनीं आपलें नातें अत्यंत प्रेमाचें ठेवलें होतें. याला कारण त्या त्या लोकांचा चांगुलपणा हें जरी असलें तरीपण तुलनेनें पहातां त्यांच्याविषयीं काकांच्या मनांत जो मातेच्या प्रेमाचा ओलावा होता त्याची सर येणें कठीण, आणि ही गोष्ट प्रत्येक नाट्यव्यवसायी कबूल करील. रंगभूमि व तिचा व्यवसाय यांच्याविषयीं काकांना वाटणारा अभिमान व प्रेम किती होतें याची माहिती या स्मरणींतील माझ्या पूर्वीच्या लेखकांनीं वाचकांना करून दिलीच आहे. परंतु खुद्द काकांच्या शब्दांचा पुरावा द्यावयाचा झाला, तर सांगली येथील नाट्योत्सव-प्रसंगीं त्यांनीं जो संदेश पाठविला तो वाचकांनीं पहावा. त्या संदेशांत काका लिहितात कीं "मी प्रथम नाटकी आणि मग सर्व कांहीं" माझ्या मतें याहून अर्थपूर्ण उद्गार दुसरे नसतील.

## नाटकवाल्यांची आई

त्यांच्या या प्रेमाची कदर मात्र आम्ही नाटकवाले पुष्कळवेळां जाणते अजाणतेपणानें ठेवीत नाहीं हें दुर्दैव होय. त्यांनीं निर्माण केलेल्या भूमिकांचे धिंदवडे काढण्यास खुद्द काकांच्या हयातीतच कांहीं लोकांनीं सुरवात केली व काकांनीं त्यांच्या संन्यस्त वृत्तीमुळें त्या गोष्टीकडे दुर्लक्षहि केलें. परंतु आतां त्यांच्या मृत्यूनंतरहि त्यांनीं निर्माण केलेल्या भूमिकांचें विडंबन पोट भरण्याकरितां किंवा कुणाचे शोक पुरविण्याकरितां, आमच्या अभिनयाच्याद्वारें आपण करतां कामा नये. एवढी तरी शुद्ध कृतज्ञता आम्ही त्यांच्या ऋणाइत नद्धांनीं ठेवली पाहिजे.

गेल्या टिळक पुण्यतिथीस रेडिओवर ध्वनिक्षेप करण्याकरतां काकांनीं जो

संदेश पाठवला होता, त्यांत त्यांनीं लोकमान्यांना यथार्थ अशी आईची उपमा मोठ्या भक्तिभावानें दिली होती. लोकमान्यांपुढें ज्या भक्तीनें काकांनीं मस्तक नम्र केलें, त्याच भावनेनें नाटकवाल्यांच्या या कै. तपस्वी मातोश्रीच्या स्मृतीला वन्दन करून माझी 'स्मरणी' पुरी करतों.

# श्री. पंडितराव नगरकर, सुलोचना संगीत मंडळी,

## संगीत बायकांचें बंड

१९३५ सालीं आमच्या "सुलोचना संगीत मंडळी" चा मुक्काम मुंबई येथें होता. कै. काकासाहेब यांचें नाटक आम्हांस मिळावें अशी आमची इच्छा होती. त्यांच्या भेटीचा योग कै. बाळासाहेब पंडीत यांनीं घडवून आणला. प्रथम श्री. बाळासाहेब यांनीं आमच्या प्रो. फडके कृत "संजीवन" नाटकाकरितां कै. काकासाहेब यांना आमंत्रण दिलें. आमंत्रणाप्रमाणें कै. काकासाहेब नाटकाला आले. अंकाच्या मध्यंतराचे वेळीं कै. बाळासाहेब यांनीं कै. काकासाहेब यांना चहाकरितां आंत आणलें व माझी व सुलोचनाबाई यांची त्यांच्याशीं ओळख करून दिली.

सुलोचनाबाई यांनीं "नवीन नाटक देवकी आम्हांला मिळालें तर बरें" अशी गोष्ट कै. काकासाहेब यांचेजवळ काढली. कै. काकासाहेब यांना सुलोचनाबाई यांचें काम पसंत पडलें होतें व त्यांनीं "उद्यां त्याबद्दल बोलूं." असें सांगितलें. नंतर दुसरे दिवशीं आम्ही त्यांच्या घरीं गेल्यावर त्यांनीं सांगितलें, "बायकांचें बंड" हें प्रोज नाटक संगीत करून देतों, तें तुम्ही प्रथम बसवा व नंतर दुसरें नवीन नाटक देईन.

त्याप्रमाणें बायकांचें बंड या नाटकाचें आमचें नक्की झालें व त्याप्रमाणें तालमीहि सुरू झाल्या. तालमी रोज सायंकाळीं ५ वाजतां सुरू व्हायच्या.

कै. काकासाहेब हे बरोबर ५ मिनिटें अगोदर यावयाचे. कधींहि ५ मिनिटें उशीर झाला नाहीं.

## संताप व संयम

तालमींना सुरवात होऊन १०–१५ दिवसांतच त्यांच्या रागाचा प्रसंग असा आला कीं, त्यामुळें माझी तर अगदीं त्रेधा तिरपीटच उडाली. काकासाहेब तालमीस आले म्हणजे मी चाली काय काय काढल्या हें सांगावयाचें व पदें काय काय केलीं असतील तीं पहायचीं. हें काम प्रथम व्हायचें व पदांचें काम संपल्यानंतर तालमींना सुरवात व्हायची. शेवटच्या दोनतीन चाली काढावयाच्या राहिल्या होत्या व बाकी सर्व पदें तयार झालीं होतीं. इतर व्यवसायामुळें माझे चालीकडे फारसें लक्ष लागेना. अस्ताई चालीची चांगली झाली, पण अंतरा कांहीं चांगला जमेना. दोन्ही दिवस काकासाहेब तालमीला आल्याबरोबर मला अगदीं सौम्य शब्दांत विचारीत "चाल झाली का तयार?" मी खाली मान घालून उत्तर देई "अद्याप कांहीं जमली नाहीं." हें प्रथम दोन दिवस काकासाहेबांनीं ऐकून घेतलें व तिसऱ्या दिवशीं नेहमींप्रमाणें अगदीं सौम्य शब्दांत हाच प्रश्न केला व मीहि नेहमींप्रमाणेंच खालीं मान घालून तेंच उत्तर दिलें.

मी उत्तर देतांच काका संतापून एकदम म्हणाले कीं, "तुम्हाला काय मी हजामतीकरितां येथें येतों असें वाटतें?" पुढें दोन मिनिटें ते काय बोलत होते हें कांहीं मला कळलेंच नाहीं इतका मी बधिर झालों; पण शेवटचें वाक्य मात्र कानांवर आलें. "मला माझें नाटक द्यावयाचें नाहीं." त्यांचा आवाज एकदम इतका पहाडी झाल्याबरोबर बाळासाहेब, सुलोचनाबाई, वगैरे सर्व मंडळी दाराचेमागें उभे राहून हा प्रकार ऐकत होती. पण पुढें कोणीहि येईना.

सुलोचनाबाई घाबरत घाबरतच पुढें गेल्या. तोंपर्यंत काकासाहेब शांत झालेले होते सुलोचनाबाईना ते शांतपणें म्हणाले, "मीं पंडितराव यांना चालीबद्दल विचारलें. चाल होईल १।२ दिवसांत तयार. चला. तालमीला सुरवात करूं." तालमीला सुरवात झाली व पुन्हां नेहमींसारखें शांत प्रसन्न वातावरण सुरू झालें. नंतर व्यवस्थितपणें नाटक रंगभूमीवर आलें व त्याचे प्रयोगहि फारच चांगल्या रीतीनें यशस्वी झाले.

## त्रिदंडी संन्यास नाटक

काकांची इच्छा कीं, आपलें नवीन नाटक "त्रिदंडी संन्यास" हें सोलापूर येथें रंगभूमीवर आणावें. आम्हीं त्यांना सांगितलें कीं, नवीन नाटक पुणें, मुंबई येथें रंगभूमीवर आणलें तर बरें. पण त्यांची इच्छा सोलापूर येथें नाटक रंगभूमीवर आणावें अशी पडली. त्यावेळीं ते नाटकाकरितां सोलापूर येथें आले व आमचे बिऱ्हाडींच राहिले होते. ह्यावेळीं त्यांचा सहवास तीन महिने मिळाला. या मुदतींत ते बोलतांना रंगून जात व तत्त्वज्ञानावर बोलत रहात. तें आम्हांला जरी धड समजत नसे तरी आम्ही त्यांत रंगून जात असूं.

एकदां एक फार गंमतीची गोष्ट झाली. आम्हीं दुपारीं जेवण्यास बसलों असतां आमचें लक्ष सहज त्यांच्या आवुड झालेल्या शेंडीकडे गेलें. मी व सुलोचनाबाई एकमेकांकडे पाहूं लागलों. शेवटी धीर करून विचारलें कीं, "काका, शेंडी काय झाली?" यावर काकांनीं उत्तर दिलें कीं, 'तुमचेकडील कुत्र्यांची लहान पिल्लें माझे गादीजवळ येतात व मी झोपलों असतांना माझ्या शेंडीशीं खेळत बसतात. त्यामुळें कंटाळा आला व शेंडीच आखुड करून टाकली' असें म्हणून हसावयास लागले. आम्हां दोघांना मात्र शरमल्यासारखें झालें.

## औदार्य

काकासाहेब यांचें औदार्य मात्र अतिशय वाखाणण्यासारखें होतें. त्यांचें आम्हांवर किती प्रेम होतें त्याची थोडीशी हकीकत सांगतों. आम्हीं "त्रिदंडी संन्यास" नाटक मोठया हुरूपानें रंगभूमीवर आणलें. पण काय झालें कोणास ठाऊक! पहिल्या प्रयोगाला चिक्कार उत्पन्न व नंतरच्या प्रयोगांना उत्पन्न कमी येऊन कंपनीच्या नाडया आखडूं लागल्या. आपल्या आग्रहामुळें कंपनीला सोलापूरला नाटक करावें लागलें व मुक्काम हलविणेंहि त्रासाचें झालें आहे हें समजून काकासाहेब यांनीं मुंबईला जाऊन कंपनीचा मुक्काम हलविण्याची पैशाची सर्व व्यवस्था केली. त्यामुळें तर त्यांच्या उपकाराचें केवढें तरी ओझें आमचेवर पडलें. त्यांच्या उपकाराची परत फेड मात्र आमचेकडून होवो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

# नटवर्य माधवराव नारायण टिपणीस, महाराष्ट्र ना. मं.

### महाराष्ट्र मंडळीच्या बिऱ्हाडीं काका

सन १९०६ सालीं संध्याकाळची पांच साडेपांचची वेळ होती. नुकतीच तालीम संपून महाराष्ट्र नाटक मंडळीची सर्व मंडळी फिरावयास गेली होती. कसबा पेठेंतील कसबा गणपतीजवळच्या पुरंदरे–वाडयांत महाराष्ट्र मंडळीचा मुक्काम होता. मी तालमीच्या दिवाणखान्यांत फिरत होतों. इतक्यांत श्री. वासुकाका जोशी व त्यांच्याबरोबर एक गृहस्थ येऊन उभे राहिले. मी त्यांना लोडाजवळ नेऊन बसवलें तोंच वासुकाकांनीं मला सांगितलें कीं, हेच कांचनगडच्या मोहनेचे नाटककार कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर. काकासाहेबांना मी प्रथमच पहात होतों. काकासाहेबांची कंपनींत ही पहिलीच

खेप होती. मी आश्चर्यांत पडलों. तोंच वासुकाका त्यांना म्हणाले, मोहनेचें काम करणारे हेच माधवराव टिपणीस.

तितक्यांत चहा आला. सुमारें दीड तास ते कंपनींत होते. त्यावेळचा त्यांचा पोषाख वर्णन करण्यासारखा होता. अंगांत काळसर पांढरट कोट, डोक्याला सांगलीचा तांबडा रंग असलेला रुमाल, धोतरहि तांबूस झांक असलेलें असेंच होतें. तो गंभीर चेहरा, ते बारीक पण भेदक डोळे, तें शिवाजीसारखें नाक, आणि तो लांबट चेहरा पाहून माझ्या मनांत नानाप्रकारच्या कल्पना उद्भवल्या. या दीड तासांत गुरुवर्यांनीं निदान पंधरा वीस तरी विडया पेटवल्या असतील..

उद्यां आर्यभूषण नाटकगृहांत मोहना नाटक आहे असें मीं सांगितलें. 'तर उद्यां नाटकाला आलेंच पाहिजे' असें गुरुवर्य म्हणाले. इतर मंडळींच्या चौकशा गुरुवर्यांनीं केल्या. दुसऱ्या दिवशीं आर्यभूषण नाटकगृहाचा पडदा वर गेला. पहिल्याच प्रवेशांत माझें काम होतें. मला काका प्रेक्षकांत दिसले. महादेव घाबरूं नको, नीट काम कर, असें माझे नाट्यगुरु वासुदेवराव भावे यांनीं मला सांगितलें.

चौथा अंक झाल्यावर गुरुवय आंत आले. भागवत, अप्पा टिपणीस, प्रधान पुढें गेले. महादेव कुठे आहे, असा काकासाहेबांनीं प्रश्न केला. मला पण तेथें जावें लागलें. चांगलें काम केलेंत, असें त्यांनीं सांगितलें. चहापान झालें. नाटक संपलें.

## मोहनेच्या कामाविषयीं मार्गदर्शन

दुसरे दिवशीं काकासाहेब कंपनीच्या बिऱ्हाडीं आले. प्रो. भानू व प्रो. पानसे तेथें हजर होते. काकासाहेब येतांच प्रो. भानू व प्रो. पानसे गादीवरून उठून खालीं बसले. पण काकासाहेब गादीवर बसेनात. प्रो. भानू

म्हणाले, तुम्ही कंपनीचे नाटककार आहां, तुम्ही गादीवर बसणें योग्य होईल. काकासाहेब म्हणाले, मी तुमचा शिष्य आहें. तुमच्यासमोर मी गादीवर कसा बसूं ? शेवटीं काकासाहेब मुख्य गादीवर बसले.

नंतर आदले दिवशींच्या नाटकाबद्दल चर्चा सुरू झाली. ते म्हणाले, एकंदरींत तुमचें मोहनेचें काम उत्तम होतें, पण कांहीं प्रसंगीं तुमच्या हालचालींनीं रसभंग होतो. दुसऱ्या अंकांतला बागेंतला हंबीररावाचा प्रवेश घ्या. परपुरुष जवळ असतांना स्त्री कशी वागेल ? मोहना ही एक देशभक्ताची स्त्री आहे, व हंबीरराव शत्रुपक्षाकडील वीर आहे. त्याच्याशीं मोहना कशी वागेल याचा विचार करा. त्यावेळीं गंभीरतेशिवाय दुसऱ्या कोणत्याहि भावना उत्पन्न होणार नाहींत असा अभिनय या अंकांत पाहिजे. पहिल्या अंकांतील शेवटच्या प्रवेशांतील मोहनेचा अभिनय कामुक स्त्रीसारखा होतो. सात वर्षांचा जिला मुलगा आहे अशी एका देशभक्ताची स्त्री, पतीशीं जशी वागेल तसा त्याबद्दलचा मोहनेचा अभिनय पाहिजे. चौथ्या अंकांत वियोगाच्या देखाव्याच्या वेळीं तर मोहनेचा अभिनय अत्यंत गंभीरतेचा पाहिजे. प्रेक्षक नाना भावनांचे असतात. अशाप्रसंगीं नटांनीं फार जबाबदारीनें काम करावयाचें असतें. भलत्या अभिनयानें किंचितहि रसभंग होऊं देणें म्हणजे रंगभूमीशीं कृतघ्नपणा करणें होय. काम चांगलें होतें. मेहनत केलीत, चांगलें शिक्षण घेतलेंत तर, भावीकाळांत उत्तम नट व्हाल.

## तशा वृत्तपत्रांचा तसा उपयोग !

या सुमारास मॅकबेथच्या तालमी सुरू होत्या. प्रो. भानु हे नाटक बसवीत होते काकासाहेबहि अधूनमधून तालमीला येत. नाटककार प्रो. अण्णासाहेब परांजपे आठवड्यांतून तीनदां येत. निरनिराळ्या मतांचीं व विचारांचीं हीं माणसें कंपनीच्या बिऱ्हाडीं एकाच बैठकीवर बसत. दिवसा युद्ध व रात्रीं भेटीगाठी हें महाभारतांतील उदाहरण या बैठकीला लागू पडत असे.

स. नं. .....२३७.

कंपनीचा पुण्याचा मुक्काम संपण्याच्या सुमारास प्रो. भानूंनीं कंपनीतर्फे लोकांना चहापार्टी दिली. त्याप्रसंगीं काकासाहेब हजर होते. चिवडा चमचमे खाण्यास सुरवात झाली त्यावेळीं विनोदानें प्रो. पानसे म्हणाले, वर्तमानपत्राचा या कामालाहि उपयोग होतो. सकाळीं पोरांना व चिवडा खातांना थोरांना. त्यावर बराच हंशा झाला, पण काकासाहेब गंभीर होते. ते एकदम म्हणाले, तशाच वर्तमानपत्राचा तसा उपयोग होतो. केसरीचा होत नाहीं.

या त्यांच्या शब्दांबरोबर एकदम गंभीरतेचें वातावरण पसरलें. नंतर जरा वेळानें प्रो. भानूंनीं पुन्हां विनोदाकडे बैठकीचा ओघ वळविला व चहापार्टी संपली.

## कीचकवध नाटकाच्या तालमी

कीचकवध नाटक बसविण्यासाठीं महाराष्ट्र मंडळी पुण्याला आली. भीमाच्या कामासाठीं श्री. त्र्यंबकराव प्रधान पुन्हां कंपनींत आले. त्यावेळीं कंपनी शुक्रवार पेठेंत रिसवडकर यांच्या वाड्यांत उतरली होती. तालीम हॉलमध्यें मधल्या गादीवर काकासाहेब व बाजूला प्रो. भानू व प्रो. पानसे बसले होते. तालमीला सुरवात झाली. भीमाचा आवेश काकासाहेबांना पसंत पडला. नाटक अठराव्या दिवशीं स्टेजवर आणण्याचें ठरलें.

कीचकवधाच्या तालमींच्या वेळीं काकासाहेबांच्या डोक्यावर टिळकपंथीय पुणेरी पगडी होती. अंगांत शुभ्र लांब कोट होता. पायघोळ धोतर व पांढरें उपरणें होतें. विडी त्यावेळीं साफ सुटलेली होती.

पहिल्या प्रवेशाला सुरवात झाली. काकासाहेब म्हणाले कीं, सैरंध्री रंगभूमीवर कशी येईल ? स्त्रियांच्या चाली तीन चार प्रकारच्या असतात. आनंदानें येणारीं स्त्री चटचट पाऊलें टाकीत येईल. विचारी स्त्री गजगतीनें पावलें टाकीत येईल. चंचल स्त्री मागेपुढें पहात हालत डलत येईल. येथें

सौदामिनीबरोबर येतांना सैरंध्री नाराज असते. तेव्हां नाखुषी दाखविणाऱ्या चालीनें या. मी त्याप्रमाणें चालत आलों तेव्हां काकासाहेब म्हणाले, चेहऱ्यावर मनोविकार मुळींच दिसत नाहींत. चेहऱ्यावर खिन्नता दिसली पाहिजे. नंतर त्यांनीं स्वतः त्याप्रमाणें चालून व अभिनय करून दाखविला.

प्रो. पानसे चटकन म्हणाले, नेपाळच्या हवेंत अभिनयाचा बराच अभ्यास झालेला दिसतो. काकासाहेबांनीं त्यांना रागावून सांगितलें, मध्येंमध्यें बोलूं नका हो. काकासाहेब तालीम घेऊं लागले म्हणजे प्रो. भानू यांच्याशिवाय कोणाच्या सूचना ऐकत नसत.

कीचकवधाच्या तिसऱ्या अंकांत कीचक सैरंध्रीचा हात धरून तिला ओढून नेत असतांना 'धांवा, धांवा, या गरीब गाईचें या दुष्टापासून रक्षण करा' असा टाहो द्रौपदी फोडते. 'कोणता बैल मरावयाला पुढें येतो पाहूं या' असें कीचक उन्मत्तपणें म्हणतो. इतक्यांत त्याची पत्नी रत्नप्रभा व बहीण सुदेष्णा पुढें येतात व कीचक सैरंध्रीला सोडतो असा प्रसंग आहे. येथें अभिनय बरोबर वठला नाहीं, भावना उचंबळल्या नाहींत, तर प्रेक्षकांत हंशा पिकेल असें काकासाहेबांनीं बजावून सांगितलें. कांहीं प्रसंगच असे असतात कीं, लग्नाच्या बायकोसमोर पुरुषांना गमच खावी लागते, या कीचकाच्या वाक्याला थिएटर टाळ्यांनीं कडाडून जात असे. हा प्रवेश अत्यंत काळजीपूर्वक मेहनतीनें काकासाहेबांनीं बसवून घेतला.

## पुण्यांत सर्वत्र कीचकवध

अशारीतीनें सर्व नाटक बसविल्यावर अठराव्या दिवशीं कीचकवध रंगभूमीवर आलें. पहिला प्रयोग झाल्यावर दुसरे दिवशीं कंपनींत येतांच काकासाहेबांनीं धर्मराज कीचकवधाची भीमाला परवानगी देतो तो प्रवेश लिहून आणला. धर्मराज जेवढा समतोल शांत राहील तेवढाच भीम उतावळा

दिसेल, दोघांच्या भावना अत्यंत विरोधी आहेत, या भावना या प्रवेशांत वठावयाला पाहिजेत, असें सांगून तो प्रवेश त्यांनीं बसवून घेतला.

याचवेळीं प्रो. भानू व काकासाहेब नाटकाविषयीं बोलत असतांना तेव्हाचे पुण्याचे एक पोलिस अधिकारी तेथें आले. ते एकदम म्हणाले, कालचें नाटक फारच उत्तम झालें. इतकें बोलून ते थांबले. त्यावर अधिक खाराखुरीनें विचारतां, ते म्हणाले, आमच्या साहेबाकडे फार कडक रिपोर्ट गेले आहेत. एका प्रतिष्ठित इसमानें तर नाटक पहातांच सरकारी अधिकाऱ्यांचा खून करावा असें वाटतें, असें कळविलें आहे. प्रो. भानू दीर्घ श्वास टाकून म्हणाले, महाराष्ट्राला हा शापच आहे. नंतर ते अधिकारी म्हणाले, सध्यां पुण्याला कीचकवध नाटकावांचून दुसरा विषयच नाहीं. गल्ल्यांतून, बोळांतून, मुलांमध्यें भीम व कीचक यांच्या कुस्त्या चाललेल्या पहावयास सांपडतात.

## संगीताचें बंड मोडलें

पुणें मुक्कामीं बायकांचें बंड या नाटकाच्या तालमी जोरांत सुरू असतांना एके दिवशी श्री. नारायणराव राजहंस (बालगंधर्व) व कै. नानासाहेब जोगळेकर तेथें आले. काकासाहेब तालमींत गुंतलेले होते व त्यांचें लक्ष तिकडे गेलें नाहीं. मी त्यांना पुढें आणून बसविले आणि त्यांची काकासाहेबांशीं ओळख करून दिली. दुसरे दिवशीं काकासाहेब त्यांच्या सौभद्र नाटकाला गेले. त्यानंतर त्यांनीं नारायणराव–बालगंधर्व, जोगळेकर, गणपतराव बोडस यांच्या कामाची कंपनींत तारीफ केली. तेव्हांच संगीताची ललकारी त्यांच्या हृदयांत उठली आणि ती १९११ सालीं मानापमानच्या रूपानें बाहेर आली असें मला वाटलें. बायकांचें बंड नाटक लागलें त्यावेळीं किर्लोस्कर कंपनीचें मतिविकार नाटक होतें. गावांतले लोक बोलूं लागले, संगीताचें बंड बायकांच्या बंडानें मोडलें.

सौदामिनीबरोबर येतांना सैरंध्री नाराज असते. तेव्हां नाखुषी दाखविणाऱ्या चालीनें या. मी त्याप्रमाणें चालत आलों तेव्हां काकासाहेब म्हणाले, चेहऱ्यावर मनोविकार मुळींच दिसत नाहींत. चेहऱ्यावर खिन्नता दिसली पाहिजे. नंतर त्यांनीं स्वतः त्याप्रमाणें चालून व अभिनय करून दाखविला.

प्रो. पानसे चटकन म्हणाले, नेपाळच्या हवेंत अभिनयाचा बराच अभ्यास झालेला दिसतो. काकासाहेबांनीं त्यांना रागावून सांगितलें, मध्येंमध्यें बोलूं नका हो. काकासाहेब तालीम घेऊं लागले म्हणजे प्रो. भानू यांच्याशिवाय कोणाच्या सूचना ऐकत नसत.

कीचकवधाच्या तिसऱ्या अंकांत कीचक सैरंध्रीचा हात धरून तिला ओढून नेत असतांना ' धांवा, धांवा, या गरीब गाईचें या दुष्टापासून रक्षण करा ' असा टाहो द्रौपदी फोडते. ' कोणता बैल मरावयाला पुढें येतो पाहूं या ' असें कीचक उन्मत्तपणें म्हणतो. इतक्यांत त्याची पत्नी रत्नप्रभा व बहीण सुदेष्णा पुढें येतात व कीचक सैरंध्रीला सोडतो असा प्रसंग आहे. येथें अभिनय बरोबर वठला नाहीं, भावना उचंबळल्या नाहींत, तर प्रेक्षकांत हंशा पिकेल असें काकासाहेबांनीं बजावून सांगितलें. कांहीं प्रसंगच असे असतात कीं, लग्नाच्या बायकोसमोर पुरुषांना गमच खावी लागते, या कीचकाच्या वाक्याला थिएटर टाळ्यांनीं कडाडून जात असे. हा प्रवेश अत्यंत काळजीपूर्वक मेहनतीनें काकासाहेबांनीं बसवून घेतला.

## पुण्यांत सर्वत्र कीचकवध

अशारीतीनें सर्व नाटक बसविल्यावर अठराव्या दिवशीं कीचकवध रंगभूमीवर आलें. पहिला प्रयोग झाल्यावर दुसरे दिवशीं कंपनींत येतांच काकासाहेबांनीं धर्मराज कीचकवधाची भीमाला परवानगी देतो तो प्रवेश लिहून आणला. धर्मराज जेवढा समतोल शांत राहील तेवढाच भीम उतावळा

दिसेल, दोघांच्या भावना अत्यंत विरोधी आहेत, या भावना या प्रवेशांत वठावयाला पाहिजेत, असें सांगून तो प्रवेश त्यांनीं बसवून घेतला.

याचवेळीं प्रो. भानू व काकासाहेब नाटकाविषयीं बोलत असतांना तेव्हाचे पुण्याचे एक पोलिस अधिकारी तेथें आले. ते एकदम म्हणाले, कालचें नाटक फारच उत्तम झालें. इतकें बोलून ते थांबले. त्यावर अधिक खाराखुरीनें विचारतां, ते म्हणाले, आमच्या साहेबाकडे फार कडक रिपोर्ट गेले आहेत. एका प्रतिष्ठित इसमानें तर नाटक पहातांच सरकारी अधिकाऱ्यांचा खून करावा असें वाटतें, असें कळविलें आहे. प्रो. भानू दीर्घ श्वास टाकून म्हणाले, महाराष्ट्राला हा शापच आहे. नंतर ते अधिकारी म्हणाले, सध्यां पुण्याला कीचकवध नाटकावांचून दुसरा विषयच नाहीं. गल्ल्यांतून, बोळांतून, मुलांमध्यें भीम व कीचक यांच्या कुस्त्या चाललेल्या पहावयास सांपडतात.

## संगीताचें बंड मोडलें

पुणें मुक्कामीं बायकांचें बंड या नाटकाच्या तालमी जोरांत सुरू असतांना एके दिवशी श्री. नारायणराव राजहंस ( बालगंधर्व ) व कै. नानासाहेब जोगळेकर तेथें आले. काकासाहेब तालमींत गुंतलेले होते व त्यांचें लक्ष तिकडे गेलें नाहीं. मी त्यांना पुढें आणून बसविले आणि त्यांची काकासाहेबांशीं ओळख करून दिली. दुसरे दिवशीं काकासाहेब त्यांच्या सौभद्र नाटकाला गेले. त्यानंतर त्यांनीं नारायणराव–बालगंधर्व, जोगळेकर, गणपतराव बोडस यांच्या कामाची कंपनींत तारीफ केली. तेव्हांच संगीताची ललकारी त्यांच्या हृदयांत उठली आणि ती १९११ सालीं मानापमानच्या रूपानें बाहेर आली असें मला वाटलें. बायकांचें बंड नाटक लागलें त्यावेळीं किर्लोस्कर कंपनीचें मतिविकार नाटक होतें. गावांतले लोक बोलूं लागले, संगीताचें बंड बायकांच्या बंडानें मोडलें.

सोलापूरच्या मुक्कामांत माऊबंदकी हें नाटक कै. भागवतांनीं बसविलें. रंगीत तालमीला काकासाहेब गेले होते व त्यांनीं प्रयोगहि पाहिले. पुण्याला कंपनीचा मुक्काम आल्यावर त्यांनीं आनंदीबाईच्या माझ्या कामाच्या तेवढ्या पुन्हां तालमी घेतल्या. बाकी नाटक ठीक बसलें आहे असें त्यांनीं सांगितलें. 'तुळोजी, नारायणच्या नुसत्या मुसक्या बांधून चालावयाचें नाहीं,' असें प्रवेश झाल्याबरोबर आनंदीबाई उच्चारते. तें वाक्य बसवून घेतांना काकासाहेबांनीं सांगितलें कीं, यावेळच्या अभिनयांत तिचा सर्व स्वभाव व्यक्त झाला पाहिजे. आठ दिवस त्यांनीं आनंदीचें काम बसवून घेतलें.

## 'सवती मत्सर'च्या तालमी

मुंबईच्या मुक्कामांत नानाशंकर शेटच्या वाडींत सवती मत्सरच्या तालमी चालल्या होत्या. सर्वांत मोठें व कठीण असें दशरथाचें काम माझ्याकडे होतें. रोज सहा सहा तास नाटकाच्या तालमी चालत. काकासाहेबांच्या डोक्यावर तेव्हां गांधी टोपी होती. काकासाहेबांची शिकविण्याची पद्धत अशी होती कीं, त्यांच्या शाब्दिक छडयांचा मार घेतांना तालमीपेक्षां कोठें तरी पळून जावें असें मला तरी वाटत असे. एकदां दशरथाच्या भाषणाच्या चोपड्या मी चहाच्या दुकानांत विसरून आलों. त्या चार दिवसांनीं परत मिळाल्या. एकेदिवशीं सकाळपासून काकासाहेब दशरथाचें काम मला शिकवीत होते. माझें काम त्यांना मनपसंत वाटत नसल्यामुळें खूप रागावत होते. दुपारचे दोन वाजले. शेवटीं केशवराव दाते आले आणि माऊंना जेवावयास जाऊं द्या असें म्हणाले, त्यावेळीं सुटका झाली.

त्या दिवशीं नेहमींची दुपारची तालीम झाल्यावर मी काकासाहेबांच्या जवळ जाऊन बसलों व त्यांना म्हणालों, हें दशरथाचें काम मला नको. त्यावर काकासाहेब हंसले व म्हणाले, मी काम शिकवीत आहें. काम उत्तम

होण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. तुम्हीं निष्ठेनें रहा, व जबाबदारीनें भूमिका पार पाडा म्हणजे झालें. एकनिष्ठेनें तपश्चर्या केली म्हणजे काय होत नाहीं ?

## आईबापांपेक्षांहि जास्त लाड पुरविले

त्यानंतर काकासाहेबांची व माझी भेट त्यांच्या ७३ व्या वाढदिवसाच्या वेळीं झाली. शरीर अगदीं जीर्ण झालें होतें. त्यांच्याकडे पहातांना पूर्वीचे निरनिराळ्या वेळचे काकासाहेब आठवून, मला हुंदके येत होते. त्यांची माझी ही शेवटचीच भेट.

माझ्या आप्तेष्टांनीं, प्रत्यक्ष आईवडिलांनीं माझे लाड पुरविले नसतील तितके मला मोठमोठीं कलापूर्ण कामें देऊन काकासाहेबांनीं पुरविले आणि माझी हौस इतकी पूर्ण केली कीं, इतरांचीं कामें पाहून कोणाचा द्वेष करण्याची भावनाच मला कधीं शिवली नाहीं. त्यांनीं मला कलेचें शिक्षण दिलें, निर्व्यसनीपणाचे धडे दिले, पैशासाठीं कोणाला नाडूं नये हें धोरण त्यांनीं मला आखून दिलें, काकासाहेबांनीं एवढीं गद्य व पद्य नाटकें लिहिलीं, पण पैशासाठीं कधीं कोणत्याहि कंपनीला दुखविलें नाहीं.

कै. तात्यासाहेब कोल्हटकर नेहमीं माझ्यापाशीं म्हणत असत कीं, वीररस, शृंगाररस व शोकरस खाडिलकरांनींच लिहावेत व प्रत्यक्ष शिकवावेत.

काकासाहेबांचें नैतिक आचरण, त्यांची साधी रहाणी, त्यांचा स्पष्ट-वक्तेपणा, आम्हीं नाटकवाल्यानींच काय पण इतर सर्व समाजानेंच आदर्शवत् मानण्यासारखा होता. त्यांचें हृदय विशाल, उदार होतें. साऱ्या नाटकवाल्यांबद्दल, नटांबद्दल, नाटक्यांबद्दल त्यांची दृष्टि संपूर्ण आपुलकीची होती. त्या माझ्या गुरूच्या चरणांवर साष्टांग नमस्कार घालूं नको तर कोणाच्या चरणांवर घालूं ?

# नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर, बलवंत नाटक मंडळी

## काकासाहेबांची प्रथम भेट व रंगभूमीवर प्रवेश

नट, नाटकमंडळ्या व नाट्यव्यवसाय यांना आजच्या समाजांत प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रामाणिक व निष्ठापूर्वक प्रथम प्रयत्न काकासाहेब खाडिलकरांनींच केला व त्यांत ते यशस्वी झाले. काकासाहेबांचें आम्हां 'नाटक्यां' वर फार मोठें ऋण आहे. समाजाच्या विपरीत टीकेकडे दुर्लक्ष करून नटानें आपल्या कलेंत रममाण व्हावें म्हणून काकासाहेब मनापासून झटत असत.

खुद्द माझीच गोष्ट मला अजून आठवते. १९११ सालची गोष्ट. शिक्षण अपुरें, राजकीय कटांत नांव गोवलें गेलेलें, सगळीकडून निराधार अशी अवस्था मला प्राप्त झाली होती. त्या बावरलेल्या मन:स्थितींत माझ्या डोळ्यासमोर फक्त एकच एक गोष्ट दिसत होती. न्यू इंग्लिश स्कूलमधील संमेलनांत मी केलेलें काम, झुंझारराव ! त्या कामाची खूपच स्तुति झालेली होती. माझ्यांत खरोखर कांहीं नाट्यगुण असेल तर त्या गुणाचाच अशा परिस्थितींत उपयोग होऊं शकेल असें मला सारखें वाटूं लागलें. त्या दृष्टीनें विचार करतां माझ्या डोळ्यासमोर नटवर्य गणपतराव जोशी यांचें एकच नांव चमकूं लागलें. मनांत आलें व मी त्यांच्याशीं पत्रव्यवहार केला. गणपतरावांनीं देखील लगेच मला भेटावयास बोलावलें. भेटावयाला निघालों. पुण्याला माझे एक आप्त श्री. स. वि. बापट यांच्याकडे उतरलों. माझी ती अर्धवट हुरहुरलेली, अर्धवट आनंदी अवस्था मी त्यांना सांगितली. त्यांनीं एकदम विचारलें, "मग महाराष्ट्र नाटक मंडळींत कां जात नाहीस ?"

मीं म्हटलें, "जाईन कीं, पण तिथें प्रवेश कसा मिळणार?" बापटांनीं सांगितलें आपण काकासाहेब खाडिलकरांची भेट घेऊं.

मी मुंजाबाच्या बोळांत खाडिलकरांच्या घरीं गेलों. खाडिलकरांचा स्वभाव खूप तापट आहे असें मीं ऐकलें होतें. छातींत धडधडत होतें. काकासाहेबांच्या व्यक्तित्वाचा माझ्यावर चांगलाच प्रभाव पडला. मी माझी हकीकत सांगितली. त्यांनीं माझ्याकडे निरखून पाहिलें आणि मग, नाटकांतलें एखादें भाषण मला म्हणावयाला सांगितलें. परीक्षा देतांना माझा विश्वास थोडासा डळमळलाच. मी झुंजारराव्यांचें एक भाषण म्हणून दाखविलें. माझें मलाच समजलें कीं, मी परीक्षेंत उतरणें शक्य नाहीं. पण काकासाहेब साधे परीक्षक नव्हते. त्यांनीं माझ्यांत कुठेंतरी नाटयगुणाचा जंतु पाहिला असावा. पुन्हां चार दिवसांनीं त्यांनीं मला बोलावलें. माझाहि आतां धीर चेपला होता. मला वाटतें या खेपेस माझें भाषण ऐकून त्यांचें थोडें समाधान झालें असावें. कारण काकासाहेबांनीं मला महाराष्ट्र नाटक मंडळीच्या मालकांना चिठी दिली, व त्या प्रशस्तिपत्रकाच्या जोरावर ऑगष्ट १९११ मध्यें मी धुळें येथें महाराष्ट्र नाटक मंडळींत पाऊल टाकलें.

## कला व व्यवहाराचा मेळ

काकासाहेब कित्येक वेळां अशा कांहीं चमत्कारिक गोष्टींचा आग्रह धरत कीं त्यांचा हेतु चटकन लक्षांतच येत नसे. नाटक हा धंदा ठरल्यानंतर त्याची व्यवहारिक बाजू किती कसोशीनें सांभाळावी हें काकासाहेबांच्या कडूनच शिकावें. धंदा करायला निघालेल्या लोकांच्या डोळ्यांतून सुटलेली गोष्ट काकासाहेबांच्या लक्षांत त्वरित येत असे.

१९१८ मधील गोष्ट. मानापमान नाटक आम्हांला—बळवंत संगीत मंडळीला—मिळणें शक्यच नव्हतें. त्या नाटकाचे हक्क शंकरराव मुजमदार

यांच्याकडे होते. शेवटीं एक तोड निघाली. आम्हीं उर्दू नाटकांचे प्रयोग करीत असूं. काकासाहेबांनीं आमचीं हीं नाटकें पाहिलीं होतीं. तेव्हां मानापमान हिंदी भाषेंत बसवावें असा मार्ग निघाला. या नाटकांतील एका सीनसाठीं आम्हीं तीनशें रुपये खर्च केले. काकासाहेबांना तें समजल्यावर ते एकदम भडकले. 'हिंदी नाटकावर इतका अवास्तव खर्च कां केला ?' काय बोलणार मी ? त्यांच्या पुढें बोलायची प्राज्ञा नव्हती. पण मग आमच्या नव्या 'वीर विडंबन' नाटकाच्या वेळीं जेव्हां तोच सीन उपयोगांत आणला तेव्हां त्यांना समाधान वाटलें व त्यांनीं तसें बोलून देखील दाखविलें.

## प्रात्यक्षिकांतील कानपिचकी

मी कांहीं विनोदी भूमिका करणारा नट नव्हे. पण मीच लक्ष्मीधर व शिष्यवराची भूमिका करावी असा त्यांनीं आग्रह धरला. विनोदी काम माझ्या मनोवृत्तीला साजणारें व जमणारें नव्हतें. परंतु काकासाहेबांनीं सांगितल्यावर त्यांना 'नाहीं' म्हणणें मला शक्यच नव्हतें. हिंदी मानापमानाच्या तालमी सुरू झाल्या. नेमके माझे तेवढे प्रवेश तालमींत गाळले जातात. एक दिवस तालीम संपवितांना चोरांचा प्रवेश करा अशी काकांनीं आज्ञा केली ? लक्ष्मीधराचा प्रवेश सुरू झाला. त्या प्रवेशांत 'तुज मी शरण' पर्यंत सर्व ठीक झालें. नंतर काकासाहेबांनीं एकदम सांगितलें, 'हं म्हणा गाणं.' माझी घाबरगुंडी उडाली. गाण्याचा सूर म्हणजे काय हें मला माहीत नाहीं, आणि गाणें म्हणणार कसें ? त्यांनीं कोल्हापुऱ्यांना फर्मावलें, 'कृष्णा, सूर धर.' मग माझें काय झालें असेल ? पेटीच्या सुरांत सूर नव्हता. तो सूर एकीकडे, माझा सूर दुसरीकडे. आणि अशा घेडगुजरी सूरभेसळींत माझें गाणें झालें. काकासाहेब कांहीं बोलले नाहींत. स्थितप्रज्ञासारखे ते गाणें ऐकत होते.

ह्या सगळ्या प्रकारांत माझें मलाच इतकें कांहीं लाजल्यासारखें झालें म्हणतां ! खालीं मान घालून मी नेहमींप्रमाणें काकासाहेबांना पोंचवायला बाहेर गेलों. तेव्हां ते हळूच म्हणाले 'हें पहा, तुम्हीं संगीत कंपनी काढली आहे. तुम्हांला संगीताची माहिती असावयास नको का ? नाहीं तर साधारण नटाकडूनहि तुमची अडवणूक व्हायची.' पण ही गोष्ट त्यांनीं मला सरळ सांगितली नाहीं. गाण्याचा प्रवेश येईपर्यंत ते कांहीं बोलले नाहींत व मग प्रात्यक्षिकांत कानपिचकी दिली.

आपण करीत असलेल्या धंद्याची शक्य तों सर्वांगीण माहिती असावी यावर काकासाहेबांचा फार कटाक्ष. त्याचप्रमाणें नाटक धंद्यांत महत्त्वाच्या भूमिका शक्य तों आपापसांत अगर विश्वासांतल्या माणसांतच वाटल्या जाव्यात असें त्यांचें म्हणणें असे. आमच्या भावबंधन नाटकाचा प्रथम प्रयोग त्यांनीं पाहिला. दिनकर कामण्णाचें काम त्यांना फारच आवडलें. पण नंतर नेहमींप्रमाणें त्यांनीं मला एकदम विचारलें, 'तुम्ही मालक किती आहांत ?' मला कांहीं अर्थच कळेना. माझा निर्विकार चेहरा पाहून ते तीव्र स्वरानें म्हणाले, "कामण्णाची भूमिका तुम्ही कां केली नाहीं ?" मी, कोल्हापूरे व दिनानाथ असे मालक होतों. शेवटीं ते म्हणाले "इतकी महत्त्वाची भूमिका दुसऱ्यावर तुम्ही कां सोपवावी ? सगळें भावबंधन नाटक त्या भूमिकेवांचून पडेल नाहीं का ?" दिनकर कंपनी सोडून जातेवेळीं काकांच्या म्हणण्याप्रमाणें खरेंच असें झालें असतें, पण इतर कारणामुळें तसें कांहीं झालें नाहीं.

## आपलेपणाची दृढभावना

एकदां एखाद्याला काकासाहेबांनीं आपला म्हटला म्हणजे झालें. 'बायकांचें बंड' नाटक संगीत करून आमच्या कंपनीसाठीं द्यावें अशी भी बिनंति केली. ते म्हणाले 'दिनानाथला चाली काढायला सांग' मला

आनंद झाला. दिनानाथांनीं चाली काढल्या कीं नाटक आम्हाला मिळणार. परंतु त्या अर्ध्या वाक्यावर मी माझ्या मनांत इमले रचतों न रचतों तोंच ते पुढें म्हणाले, 'चाली तयार झाल्यावर नारायणरावांना (बालगंधर्वांना) दाखवा.' त्या दुसऱ्या वाक्यार्धाबरोबर मी मनानें धाडदिशीं खालीं आदळलों. हो, चाली तयार करून नारायणरावांना त्या पसंत पडल्या तर 'बायकांचें बंड' गंधर्व कंपनीहि करणार कीं! त्यांच्या संगीत नाटकावरील बालगंधर्वांचा हक्क अबाधित असला पाहिजे ही त्यांची भूमिका होती.

नारायणरावां (बालगंधर्वां) वरून आठवण झाली. त्यांच्या अभिनयांतील अत्यंत सूक्ष्म अशा प्रेमळपणाचें व लाडिकपणाचें श्रेय काकासाहेबांकडे जातें. लाडांत येऊन बोलतांना हनुवटीचीं मजेदार व नाजूक हालचाल करावी असा पहिला धडा काकासाहेबांनींच दिला. ती गंमत अशी. 'प्रेमध्वज' नाटकाच्या तालमी चालल्या होत्या. पोतनीस पद्मावतीचें काम करीत होते. प्रसंग प्रेमाराधनेचा. नायक देवीला हार घालीत असतांना तें वाक्य आहे.— 'तें काययसं—काय तें तुलाहि माहीत नाहीं अन् मलाहि माहीत नाहीं.' यावेळीं 'काययसं' शब्द उच्चारतांना हनुवटीची गोड हालचाल करावी अशी त्यांनीं सूचना दिली. अभिनयांतील लहान लहान बारकावे देखील कौशल्यपूर्ण पद्धतीनें आविष्कृत झाले पाहिजेत यावर त्यांचा भर असे.

## अधिकारवाणीची संजीवनि

१९२३ सालीं आमचे "बलवंत नाटक मंडळी" करितां इतिहासाचार्य वासुदेवशास्त्री खरे यांनीं लिहिलेल्या 'संगीत उग्रमंगल' या नवीन नाटकाच्या यशस्वी नाट्यप्रयोगानंतर, एक तपापेक्षां अधिक काळ गाजलेल्या 'संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा' या नाटकाचे कर्ते वीर वामनराव जोशी यांचेकडून आम्ही आमचे मंडळाकरितां 'संगीत रणदुंदुभि' नांवाचें नवीन नाटक लिहवून घेतलें होतें.

हें नाटक रंगभूमीवर आणतांना त्यांत कोणत्याहि प्रकारें वैगुण्य राहतां कामा नये असें आम्हीं ठरविलें होतें. त्या दृष्टीनें देखावे व पोषाख यासंबंधींच्या चर्चा चालू होत्या. गायनाचार्य वझेबुवा यांच्याकडून नाटकांतील पदांसाठीं चाली घेण्याचें काम चालू होतें. कोल्हापुरचे मुक्कामांत आमचे नाटकाचे तालमींनाहि सुरवात झाली होती.

कांहीं कामानिमित्त एक दिवस साहेब (ती. अच्युतराव कोल्हटकर) तेथें आले. 'रणदुंदुभि'चें हस्तलिखित मीं त्यांना वाचावयास दिलें. उत्कटता हें साहेबांचें वैशिष्ट्य! नाटक वाचून ते बेहद्द खूष झाले. रंगभूमीसाठीं आम्ही काय काय करीत आहों याची त्यांना कल्पना दिली. तें सर्व ऐकून त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

या नाटकाचे रंगीत तालमीला गुरु, काकासाहेब, अच्युतराव व इतर निकटची १५–२० मंडळी अशी तालमीसाठीं बोलाविली होती. तालीम झाली, मंडळी चहापानासाठीं जमली, आणि एकाकी एखादा स्फोट व्हावा त्याप्रमाणें आमचे साहेबांची टीका सुरू झाली. त्यांनीं यच्चयावत् गोष्टींवर भरपूर तोंडसुख घेतलें आणि चहापान करून स्वारी निघून गेली.

त्यावेळच्या आमच्या मनःस्थितीवर आपल्या अधिकारवाणीनें संजीवनी देणारा आचार्य तेथें उपस्थित होता. जिव्हाळ्याच्या गोडव्या स्वरांत काकासाहेब म्हणाले, " भिण्याचें कांहीं कारण नाहीं. नाटक अत्यंत यशस्वी होईल ही खात्री ठेवा. नाटकांतील प्रत्येक गोष्ट प्रेक्षकाचा चित्तवेध करणारी आहे. नाटककाराचे व तुमचे पांग फेडण्याला नाटक पूर्ण समर्थ आहे. आतांच्या टीकेकडे लक्ष देऊं नका. उद्यां याच नाटकाची तोंडभर स्तुति हे टीकाकारच करतील " आणखी पुष्कळशा गोष्टी सांगून त्यांनीं नाटकाच्या यशाबद्दल आमचें मन निशंक केलें. या नाट्याचार्यांच्या सिद्धवाणीनें प्रत्यक्ष प्रयोगाचे वेळीं मूर्तस्वरूप धारण केलें हें सांगण्याचें कारण नाहीं. पण

दुसरें भविष्यकथनहि तितकेंच खरें झालें. या रंगी तालमीच्या दुसऱ्या दिवसापासूनच अच्युतरावांनीं या नाटकाच्या यशाबद्दल स्तुतीचा सतत वर्षाव सुरू केला.

## नाट्याशीं शेवटपर्यंत एकनिष्ठ

'संन्यस्त खड्ग' नाटकाच्या रंगीत तालमीच्या प्रसंगीं या नाटकांतील परिणामकारक नाट्यप्रसंगामुळें गांधीवादी काकासाहेब हाडाचे नाटककार होते, हें याप्रसंगीं मोठ्या उत्कटतेनें पहावयाला मिळालें. तालीम आटोपल्यावर ते म्हणाले 'अहो शेवटीं धर्म तुम्हीं प्रकट केलाच आहे, तेव्हां ती तरुण–तरुणी मृत्युमुखीं पडलीं आहेत त्यांनाहि त्या धर्ममूर्तीकडून सजीव करून टाकाना ? म्हणजे आनंदी आनंद होईल !' नाट्यप्रसंग जिवंत निर्माण केला गेला असेल तर त्यांत तल्लीन होऊन जाणें हेंच सच्चा नाट्याचार्यांचें लक्षण !

नाटक धंद्यावर त्यांचें अतिशय प्रेम. राजकारणापेक्षां देखील अधिक, असें म्हटलें तरी चालेल. नाट्याचा बाजार त्यांनीं कधींच मांडला नाहीं. नाट्याशीं ते शेवटपर्यंत कृतज्ञ राहिले. आमची कंपनी कोणत्या आर्थिक परिस्थितींत आहे हें त्यांना माहीत होतें. परंतु 'विद्याहरण' व 'मानापमान' घेतल्यानंतर मी त्यांना पैशाबद्दल विचारलें. अर्थातच त्यांना कंपनीची पैशाची पेटी किती भरली आहे तें माहीत होते, त्यामुळें मी पैशाबद्दल विचारतांच त्यांनीं विचारलें, "पैसे पेटींत आहेत का ?" मी ओशाळून उत्तर दिलें 'नाहीं. पण जमाखर्चासाठीं म्हणून विचारलें' तेव्हां ते म्हणाले, 'नसलेल्या पैशाचा कसला जमाखर्च ? जेव्हां पेटींत पैसे येतील तेव्हां मी घेईन.' मी गप्पच बसलों. नंतर कांहीं दिवसांनीं काकासाहेबांना नवाकाळसाठीं जामीन द्यावा लागला. मला ही बातमी नागपूरला समजली. लगेच एक हजार रुपये त्यांना धाडून दिले. तेव्हां काकासाहेबांनीं उद्गार काढलेले माझ्या

अजून स्मरणांत आहेत. ते म्हणाले, "शेवटीं ऐन प्रसंगीं नाटकाचाच पैसा उपयोगी पडला."

## नटांनाहि लौकिक आहे

१९१२ मध्यें पुणें मुक्कामीं कै. न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांचें 'तोतयाचें बंड' हें पहिलें वहिलें नाटक, कै. य. ना. ऊर्फ अप्पा टिपणीस यांच्या श्री भारत नाटक मंडळीनें रंगभूमीवर आणण्याचें श्रेय मिळविलें होतें. नाटक रंगभूमीवर येण्यापूर्वीच्या रंगीत तालमीचा प्रसंग आहे. 'केसरी' ऑफिसपैकीं बरीच मंडळी व नाटक मंडळीची परिचित इष्टमित्र मंडळी तालीम पहावयाला आली होती, त्यांत प्रामुख्यानें काकाहि होतेच. चहापानानंतर इतरेजन गेल्यावर शेलकी मंडळी तेवढी मागें राहिली. तालीम पाहून तात्यांचा चेहरा प्रसन्न तर झाला नव्हताच, उलट ते नाराज झालेलेच स्पष्ट दिसत होते.

त्यांच्या त्या नाराजीला कारणेंहि सबळ होतीं. नाटकांतील प्रमुख भूमिकापैकीं नाना फडणवीस ( ही भूमिका अप्पा टिपणीस करीत होते ) व हैबती ( ही भूमिका त्र्यंबकराव प्रधानांकडे होती ) या दोघांच्याहि नकला जशा पाठ असावयाला पाहिजे होत्या तशा नव्हत्या हें एक, व रंगीत तालमीनंतर जबाबदार नाटक मंडळीच्या प्रत्यक्ष नाट्यप्रयोगांत किती अंतर पडतें याचा बरोबर अंदाज नसणें हें दुसरें. 'तोतयाचे बंडा'ची सरकारी परवानगी मिळविण्यासाठीं अप्पा टिपणिसांना खरोखर जिवाची आटापीट करावी लागली होती. त्यामुळें त्यांची नक्कल अर्धी कच्ची होती. त्र्यंबकराव प्रधानांविषयीं सांगायचें म्हणजे इतकेंच कीं, नकला पाठ न करतां कामें करणें हा त्यांचा एक स्वभावविशेषच होऊन बसला होता. त्यांचा मुद्राभिनय अवर्णनीय होता, त्याच्च जोरावर ते कामें करीत.

अशा स्थितींत तात्यांनीं प्रयोगाला परवानगी देण्याचें नाकारलें. अप्पा टिपणीसांनीं प्रयोगापर्यंत आपण चांगली तयारी करतों असें मोठ्या अजीजीनें विनंति करून त्यांना सांगितलें. हा वेळपर्यंत काका स्वस्थ होते. अशावेळीं एक अनुभवी नाटककार म्हणून त्यांचा सल्ला अवश्य होता. काकांनीं तात्यांना सांगितलें 'नाटक चांगलें होईल. रंगीत तालमींत आणि प्रयोगांत चौपट अंतर पडतें. शिवाय आपल्याप्रमाणेंच त्या नटांनाहि चांगला लौकिक आहे. ते आपली जबाबदारी ओळखून वागतील असें मला वाटतें !'

त्यावेळीं जरी तात्यांनीं परवानगी नाकारली तरी पुढें सर्वांचा विशेष आग्रह पडल्यामुळें एकदांची दिली.

काकांचे भविष्याप्रमाणें प्रयोग खरोखरचा उत्तम उठला; नव्हे, चांगला लोकप्रिय झाला.

## काकांचे आडाखे

बाहेरगांवांहून मुंबईस आल्यानंतर एकवेळ काकांच्या भेटीला जाण्याचा माझा नेहमींचा परिपाठ असे. त्याप्रमाणें भेटीला गेलों असतां, सहज एक प्रश्न केला. (हा प्रश्न नुकतेंच 'मेनका' नाटक रंगभूमीवर पाहिल्या नंतरचा आहे) 'कांचनगडची मोहना' पुन्हां लिहितां येईल का ?' ते म्हणाले, 'त्या वयाच्या विचारांचें–विकारांचें द्योतक तें नाटक आहे. आतां नाटकाचें कथानक मनांत घोळूं लागलें म्हणजे प्रथम त्याची बैठक तत्त्वज्ञानाकडे झुकूं लागते. आतां पुन्हां मोहना लिहितां येणें शक्य नाहीं.' या उत्तरामुळें मला झालेल्या आनंदाचें वर्णन करतां येणें शक्य नाहीं.

नाटक मंडळींतील वास्तव्यामुळें कांहीं गोष्टींविषयीं काकांनीं आडाखे बांधून टाकले होते. नाटक मंडळींतील माणसाला कंपनीचें कसें काय चाललें आहे म्हणून विचारावें, उत्पन्न जोरांत असेल तर तो धाडधाड शनिवार

बुधवारचे आंकडेच तोंडावर टाकील आणि उत्पन्न साधारण होत असेल तर तो सांगेल, नाटक फारच रंगतें. येणारे प्रेक्षक मोठे खूष होऊन जातात, वगैरे वगैरे. ही प्रेक्षकांची खुषी उत्पन्नाच्या नाराजीचें गमक असे.

## कामाची वाटणी

१९१९ जानेवारी १८ ला 'बलवंत नाटक मंडळी'चा पहिला वाढदिवस पुण्यास झाला. सकाळीं चहापान, फोटो वगैरे, दुपारीं भोजन, व रात्रीं नाढक असा कार्यक्रम होता. निमंत्रित मंडळींत तात्यासाहेब केळकर व काकासाहेब होते. सकाळचे फोटोचे कार्यक्रमाला तात्यासाहेब आले. पण काकासाहेब आले नाहींत. दुपारचे भोजनाला काकासाहेब आले पण तात्यासाहेब आले नाहींत. जेवण आटोपल्यावर मीं म्हटलें, 'सकाळीं आपण आलां नाहीं. तात्यासाहेब आले होते.' त्यावर ते एकदम म्हणाले 'आमचे केसरी ऑफिसमध्यें अशीच कामाची वाटणी झाली आहे. फोटो वगैरे कार्यक्रम तात्यांनीं संभाळावयाचे व भोजनासारखे कार्यक्रम मी संभाळावयाचे. रात्रीच्या नाटकाच्या कार्यक्रमाला आम्ही दोघेहि हजर राहूं.'

# नटवर्य गणपतराव बोडस

## अशिक्षित नटाचें कौतुक

१९०७ सालीं मी किर्लोस्कर मंडळींत असतांना कै. काकासाहेब खाडिलकरांना मी प्रथम किर्लोस्कर मंडळीच्या नाटकाला आलेले पाहिले. त्यावेळीं ते व कै. तात्यासाहेब केळकर वरच्यावर किर्लोस्कर मंडळीच्या नाटकांना येत असत. एका सौभद्र नाटकाच्या प्रसंगीं हे दोघेहि अंत आले असतांना स्वत: खाडिलकरांनीं माझ्या कृष्णाच्या भूमिकेबद्दल शाबासकी दिली होती. त्याच वर्षी नाट्यसंमेलन पुण्यांत किर्लोस्कर मंडळीच्या

विद्यमानें भरलें होतें. त्या संमेलनाचे अध्यक्ष कै. काकासाहेब खाडिलकर हेच होते. त्या नाट्य–संमेलनांत शाकुंतल नाटकाबद्दल चढाओढीची परीक्षा ठेवण्यांत आली होती. त्या परीक्षेला मी एकटाच नाटक मंडळीपैकी होतो. इतर सर्व कॉलेज विद्यार्थी होते. त्यापैकीं नंबर दोनचें बक्षीस मला मिळालें होतें. त्याहि प्रसंगीं माझ्यासारख्या एका अशिक्षित नटाबद्दल खाडिलकरांनीं अतिशय आनंद प्रदर्शित केला होता.

१९०९–१० सालीं किर्लोस्कर मंडळीचीं नाटकें पुण्यांत होत असतांना खाडिलकर नित्य नाटकाला येत असत. त्यांचा तोंडावळा उग्र असला तरी अंतःकरण मृदु आहे याची साक्ष पटत असे. मानापमान ११ सालीं स्टेजवर आलें. खाडिलकरांची नाट्यशिक्षण–पद्धति, भाषण उच्चारण्यास सांगण्याची पद्धति, याबाबतींत मी त्यांच्याशीं सहमत नव्हतों. तरी मानापमान नाटक बसवीत असतांना शिस्त पालनासाठीं मीं त्यांचा अनादर कधीं केला नाहीं. प्रत्यक्ष प्रयोगाच्या दिवशीं त्यांची भाषण पद्धती मीं अनुसरली नाहीं. पण आपल्या सांगण्याप्रमाणें कां केलें नाहीं, याचा त्यांनीं दिलदार-पणानें कधीं उच्चार केला नाहीं.

## नाट्य शिक्षणांतील नाट्य–गुण

खाडिलकर नाट्यशिक्षण देत तें अस्वाभाविक असे, असें माझ्या मतें असलें तरी त्यांतील नाट्यमूल्य उत्तम प्रकारचें होतें असें म्हणण्यास मला मुळींच प्रत्यवाय वाटत नाहीं. त्यांचा स्वभाव अतिशय दिलदार होता. ते जितके तापट तितकेच ते अंतःकरणानें हळवे होते. तापटपणानें कोणाला दुखविल्यास पुनः त्यांची गांठ पडल्यावर हळवेपणामुळें त्यांच्या डोळ्यांतून अश्रु आलेले मीं पाहिलेले आहेत. त्यांचीं नाटकें नाट्यगुणांनीं परिपूर्ण अशींच आहेत. त्यांच्या तिखट लेखणीचें पाणी अत्यंत प्रभावी होतें आणि नाट्य–प्रयोगाच्या

वेळीं त्यांच्या भाषेनें व नाटयप्रसंगानें प्रेक्षकांच्या वृत्ती थरारून जात असत ही गोष्ट अगदीं सत्य आहे.

# संगीतकला-निधि मा. कृष्णराव

## कीर्तनाकरितां व पदांकरितां गाणें

सन १९११ मध्यें गुरुवर्य गायनाचार्य भास्करबुवा बखले यांनीं भारत गायन समाज स्थापन केला. त्यावेळच्या सल्लागार मंडळांत श्री. काकासाहेब खाडिलकर हे होते. गायकवाड वाडयांत श्रीगणपति उत्सवांत गुरुवर्य बुवासाहेबांचें गायन झालें. त्यावेळीं लोकमान्य टिळक जातीनें हजर होते; तसेंच श्री. तात्यासाहेब केळकर, श्री. काकासाहेब खाडिलकर वगैरे मंडळी हजर होती.

भारत गायन समाजांत काकासाहेब बुवासाहेबांचेकडे सायंकाळीं ६ ते ७ असे १ तासभर गाणें शिकण्यास येत असत. गाणें शिकण्याचेवेळीं एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणें ते बसत असत. डोक्यावरील पगडी काढून, शिकतांना टोपी घालून बसत असत. ही टोपी समाजांतच ते ठेवीत असत. मांड, सारंग, यमन या रागांतील पाठ व सोप्या चिजा गुरुवर्य त्यांना शिकवीत असत. एवढया मोठया गृहस्थांनीं राजकारण व संपादकाचा व्यवसाय संभाळून गाणें शिकण्याचा व्याप कां करावा याबद्दल मला कुतूहल वाटे. कांहीं दिवस शिकवून एके दिवशीं गुरुवर्य बुवासाहेब काकासाहेबांना म्हणाले कीं, आपली शिकण्याची हौस व चिकाटी दांडगी आहे. परंतु आपला जो हेतु आहे तो कितपत साधेल याबद्दल मला शंका वाटते. काकासाहेबांनीं गुरुवर्य बुवासाहेबांना असें सांगितलें कीं, बुवासाहेब, मला पुढें कीर्तन करण्याची इच्छा आहे, व त्या करितां कीर्तनापुरतें तरी

गाणें मला आलें पाहिजे. शिवाय नाटकांतून गाणीं ( पदें ) करायचीं, त्याकरितां आपल्या चालींची जरुरी लागेल, तेव्हां मला त्याची पद्धतशीर ठेवण कळावयास पाहिजे ना ? म्हणून एवढी शिकण्याची हौस धरली. हें कळल्यावर साहजिकच माझ्या कुतूहलाचें निरसन झालें.

गुरुवर्य बुवासाहेबांच्या गैरहजेरींत मलाहि त्यांना शिकविणें भाग पडत असे. मी लहान मुलगा म्हणून त्यानीं शिकतांना हेळसांड कधींच केली नाहीं. उलट मला ते म्हणायचे कीं, मी चुकलो तर मला माझी चूक सांगण्यास धाबरूं नको. यावेळीं बुवांचे जागी तूं मास्तर आहेस. हें जरी म्हटलें तरी एवढ्या करारी स्वभावाच्या मोठ्या विद्यार्थ्यांस शिकवितांना मला भीति वाटणें साहजिकच होतें.

## चढा व कणखर आवाज

श्री. काकासाहेबांचा आवाज कणखर असून, चढा असे. तो इतका कीं, तीन सप्तकांपर्यंत तो चढत असे. मरहूम रहिमतखां खांसाहेब यांचा गळा अत्यंत सुरेल व तीन सप्तकी अशी त्यांची तारीफ होती. काकासाहेबांचा गळा तीन सप्तकी; मात्र कै. रहिमतखां खांसाहेबाचे विरुद्ध. यांत काय तें समजावें. हें लिहिण्याचें कारण कीं, दोघांनाहि परमेश्वराची देणगी तीन सप्तकांचे आवाजाची. फरक इतकाच कीं, एक प्रसिद्ध गवई व एक सिद्ध वक्ते. मी गुरुवर्य बुवासाहेबांचेकडे शिकत असतांना थोडयाच दिवसांत विद्याहरण नाटक श्री. काकासाहेबांनीं बसविण्यास सुरवात केली व गुरुवर्य बुवासाहेबांनीं त्यांतील चाली देण्यास मदत केली.

## गाणे शिकल्याचा पदांवर परिणाम

बुवासाहेबांचेकडे चार साडे चार वर्षें माझें संगीत शिक्षण झाल्यावर मला गंधर्व नाटक मंडळींत ठेवण्यांत आलें व ही गोष्टहि काकासाहेबांचे संमतीनेंच झाली.

मी गंधर्व कंपनींत राहिल्यावर श्री. काकासाहेबांचें पहिलें नाटक स्वयंवर हें बसविण्याचें ठरलें, व या नाटकाची संगीताची सजावट गुरुवर्य बुवासाहेबांचेकडे साहजिकच आली. पद्धतशीर शास्त्रीय गाणें याच नाटकांत दिसून आलें. त्या चालीवरहुकूम पदें तयार करतांना काकासाहेबांनीं गुरुवर्य बुवासाहेबांचेकडे गाणें शिकण्याचा जो अट्टाहास धरला त्यांतील त्यांच्या दोन हेतूंपैकीं एक हेतु तरी त्यांना साधला, असें म्हणावयास हरकत नाहीं. नवीन चालीमध्यें सुरुवातीचा मुखडा अगर तोंड याची जी किंमत अगर आकर्षकता आहे, तोच नियम पदांचेहि बाबतींत लागू आहे. या दृष्टीनें काकासाहेबांचीं नाटकांतील पदांचीं तोंडें (मुखडा) अत्यंत आकर्षक अशीं झालीं अहेत. उदाहरणार्थ—करिन यदुमनी सदना, सुजन कसा मन चोरी, मम सुखाची ठेव देवा, चंद्रिका ही जणूं ठेवि या, दे हाता या शरणागता, भक्तिभाव हा ध्या सेवा, मम मनीं कृष्ण सखा रमला, नृपकन्या तव जाया, याशिवाय आणखीं कांहीं पदें उदाहरणादाखल देतां येतील.

एकाच चालीवर रचलेल्या पदांचे २ नमुने दाखविण्यासारखे आहेत ते असेः—पहाडी रागांतील चालीवर मूळच्या चालींत कमी जास्त करून रचलेलें संशय कल्लोळ नाटकांतील पद 'मजवरी तयांचें प्रेम खरें' हें पद व मूळच्या चालीबरहुकूम रचलेलें स्वयंवरांतील पद 'एकला नयनाला विषय तो झाला' हें पद आहे. ज्यांनीं हीं दोन्हीं पदें ऐकलीं आहेत त्यांना, दोन्हीमध्यें मुखडयाच्या रचनेंत फरक कसा आहे एवढें खास कळेल व माझ्या लिहिण्याचा अर्थहि लक्षांत येईल.

गुरुवर्यांचे देखत संगीताची सजावट करण्यांत मला जो अनुभव मिळाला त्यामुळें श्री. काकासाहेबांच्या पुढील मेनका, सावित्री या नाटकांतून मी संगीताची सजावट स्वतंत्र रीतीनें केली. याशिवायहि नंदकुमार, आशा-

निराशा, विधिलिखित, कान्होपात्रा, अमृतसिद्धि अशा दुसऱ्या नाटकांतून संगीताची सजावट करून गुरुपरंपरा राखिली.

## स्टेज—इफेक्ट हे काकासाहेबांचें हातखंडा काम

श्री. काकासाहेबांनीं गद्य नाटकें जितकीं भारदस्त रीतीनें व कणखर अशीं लिहिलीं तितकेंच संगीत नाटकाचें गद्यहि कणखर व भारदस्त असेंच लिहिलें. संगीत नाटकाचा भर जास्त संगीतावर असतो, व असायला पाहिजे, असें स्वतः काकासाहेबच म्हणत असत. इतकेंच नव्हे तर नाटकांतील पदांना इतके वन्समोर ( टाळ्या ) पडलेच पाहिजेत, व कोणकोणत्या पदांना टाळ्या पडतील यांचाहि अंदाज ते बांधीत असत. त्याचा उहापोह त्यांनीं प्रत्येक नाटक रंगभूमीवर येण्याचे अगोदर माझ्याशीं केला आहे.

संगीत नाटकांतील पदांना उठाव देणारें काकासाहेबांचें गद्य हें तितकेंच तोलाचें आहे हें विसरून चालायचें नाहीं. भाषाशैली, त्या त्या पात्राचा उठावदारपणा, महत्त्वाच्या एंट्रीज, स्टेज इफेक्टस्चे बाबतींत तर कै. राम गणेश गडकरी म्हणायचे कीं, स्टेज इफेक्ट हें काकासाहेबांचें हातखंडा काम आहे, यांत त्यांचा हात धरणारा दुसरा कोणी नाहीं.

मुंबईस ब्राम्हणसभेंत त्यांच्या शोकसभेला मी अध्यक्ष असतांना अशी इच्छा प्रदर्शित केली होती कीं, श्री. काकासाहेब खाडिलकरांच्या गद्य नाटकांना जर संगीताची सजावट झाली तर मी त्यांतील संगीताची योजना त्याला साजेशीच करीन. नाटक कंपनी चालकांनीं व नाटयकलेच्या शतसांवत्सरिक उत्सव कमिटीनें याचा विचार अवश्य करावा.

वर वर पहाणाऱ्यास श्री. काकासाहेबांचा स्वभाव रागीट असावा असें वाटत असे. परंतु सहवासानें दिसायाला जितके रागीट तितकेच अंतःकरणाचे ते मृदु होते असा अनुभव येई. मलाहि सुरवातीस त्यांचेबद्दल भीति

वाटायची हें मी अगोदर नमूद केलें आहेच. परंतु त्यांचा जसजसा सहवास झाला तसतशी मला त्यांच्या प्रेमळ स्वभावाची कल्पना आली. इतकेंच नव्हे तर नाटक बसवितांना जर कांहीं आगळी शंका कुशंका त्यांना विचारावयाची झाली तर मी मोकळेपणानें त्यांना विचारीत असें व तेहि अत्यंत प्रेमानें माझ्या शंकेचें निरसन करीत. खरा सल्ला देण्याचे बाबतींत त्यांच्यासारखा माणूस विरळा, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

## संगीत-चूडामणि, पंडित विनायकराव पटवर्धन,

मी १९२२ मध्यें गंधर्व नाटक मंडळींत गेल्यावर कै. काकासाहेबांचा परिचय जास्त झाला. पूर्वी कै. पं. गु. विष्णुबुवा पळुसकरांचेमुळें पुष्कळ परिचय झाला होता. त्यामुळें कै. काकासाहेबांच्याबद्दल माझ्या मनांत पहिल्यापासूनच फार पूज्यभाव होता. १९२१ किंवा १९२२ सालीं ते गांधर्व महाविद्यालयातर्फे भरलेल्या संगीत परिषदेचे अध्यक्षहि होते. त्यावेळचें त्यांचें भाषण म्हणजे एक मेजवानीच होती.

गंधर्व नाटक मंडळींत मुंबईच्या मुक्कामांत ( मी १९२२ मध्यें गेलों तेव्हांपासून ) काकासाहेब रविवारीं सकाळीं ९ ते ९॥ पर्यंत कंपनीच्या बिऱ्हाडीं येत असत व सुमारें ११ पर्यंत बसत असत. बिऱ्हाडीं आल्यानंतर एकंदर कंपनी चालविण्याचे धोरणाबद्दलचा व कर्जमुक्त होण्याबद्दल सल्ला देण्याचें कार्य करीत असत. नाटकें कशीं होतात याबद्दलहि आपले विचार सांगत असत. दर रविवारीं नाटकास येऊन बसले म्हणजे खरा नाट्यभक्त नाटक इतके विचारपूर्वक पहात असतो हें पाहून मन थक्क होऊन जाई.

### मेनका नाटकाच्या तालमी

गंधर्व नाटक मंडळीनें १९२३ सालीं काकासाहेबांचें मेनका नाटक

घेण्याचें ठरविलें. थोडयाच दिवसांत नाटक लिहून पूर्ण झाल्यावर तालमी घेण्यास सुरवात होणार त्याचे अगोदर पात्रांची निवड झाली. त्यांत मला विश्वामित्राचें काम देण्याचें निश्चित झालें. नक्कलहि वाचून ठेवण्याबद्दल सूचना देण्यांत आल्या. पहिल्या दिवशीं दुपारीं ३ वाजतां तालीम सुरू होणार म्हणून दोन अडीच वाजल्यापासून मी थोडा आनंदांतहि होतों व भयंकर भीतीहि वाटत होती. कारण काकासाहेबांच्या तालमीबद्दल कंपनींतील नट फार भीत असत. काकासाहेब इतके वेळेवर येत असत कीं, कंपनीच्या बिऱ्हाडीं काकासाहेब येत तेवढयांत तीनचे ठोके पडत असत. आल्यानंतर पांच मिनिटांचे आंत तालीम सुरू होत असे. सुरुवातीस नटी सूत्रधारांचीं वाक्यें बोलण्यास शिकवीत असत. वाक्याचा अर्थ समजावून देऊन त्याप्रमाणें वाक्याचे भाव दाखवून देऊन मग त्याप्रमाणें पाठ करण्यास सांगत असत. अशातऱ्हेनें तालमी घेत घेत १५ ते २० दिवसांचे आंत एक अंक बसवून घेतला. एक अंक बसला कीं, हें नाटक पुढें दोन महिन्यांचे आंत बसलेंच पाहिजे असा त्यांचा आराखडा होता. तिसरा अंक बसविण्यास घेतल्याबरोबर नाटक अमुक तारखेला लावा असें निश्चित सांगत असत. मेनका नाटक महाभारतांतील आधारानेंच लिहिलें असल्यानें त्यांत फरक कसा नाटकासाठीं केला तें समजावून सांगत असत. केव्हां केव्हां तर भाषेंतील बारकावे समजावीत असत. तसेंच 'विश्वामित्र' हा ऋषी कसा झाला हा सुद्धां इतिहास सांगत असत. गायत्री मंत्राचा द्रष्टा विश्वामित्र व तें काम तुम्ही करणार आहांत तेव्हां गायत्री मंत्राचा रोज जप करीत चला, वाचेंत जोर येईल व वाचा स्वच्छ होईल असेंहि ते सांगत असत. नाटक रंगभूमीवर येण्याचे अगोदर कांहीं दिवस थिएटर-मध्यें तालमी होत असत. तेथें सुद्धां वेळेवर येण्यांत ते कधीं चुकले नाहींत. रंगीत तालीम जी झाली ती प्रथम साहित्यसंमेलनाच्या सर्व सभासदांना

व प्रेक्षकांना दाखविण्यांत आली. अशा तऱ्हेनें नाटक रंगभूमीवर येण्याचे अगोदर त्यांची मेहनत घेण्याची पद्धत असे.

मेनका नाटकाला फार खर्च येऊं नये म्हणून नाटक लिहीत असतांनाच विचार करून सर्व अरण्याचे सीन, हरणाचीं व वाघाचीं कातडीं, पांढरीं धोतरें व खडावा–रुद्राक्षमाळा हे पुरुषांचे कपडे, बायकांचे कपडेसुद्धां असतील त्यांतले चालणारे अशीच योजना केली होती. मेनकेचें काम श्री. बालगंधर्व करीत. ते कपड्यांत पैसे फार खर्च करतील म्हणून दुसऱ्या अंकापासून अगदीं साध्या वेषांतच त्यांना ठेवलें. पण श्री. बालगंधर्वांनीं या नाटकासाठीं १५–१८ हजार रुपये खर्च केलेच.

## विश्वामित्राची भूमिका कायम राहिली

मेनका नाटकांतील विश्वामित्राचे कामामुळें मी पुढें येणार, चांगला नट होणार असा मला विश्वास वाटत होता. प्रत्येक मनुष्य ( कंपनींतील ) हेंच म्हणत असे. श्री. केशवराव दाते यांनींसुद्धां हेंच मला सांगितलें. श्री. दाते यांचें सांगण्यानें तर मला फारच उत्साह वाटत असे. कारण मी त्यांचेजवळ नाट्यशिक्षण कांहीं घेतलें नसतांना त्यांना मनानें एक नाट्यगुरु म्हणून अजूनहि मानीत आहें. पण अशा आनंदांत असतांना विश्वामित्राचें काम मला झेपणार नाहीं दुसऱ्यांना द्या असें कंपनींतील कांहीं जणांनीं काकासाहेबांना सांगण्यास सुरवात केली. मला कामहि जमणार नाहीं व गाण्याच्या दिलेल्या चालीहि गातां येणार नाहींत अशी काकासाहेबांची समजूत करून दिली. पण काकासाहेबांचे विचार पक्के असल्यानें व माझी प्रत्यक्ष भेट घेऊन याबद्दलची खात्री करून घेऊन विश्वामित्राचें काम मला न देण्याबद्दलचा आग्रह त्यांनीं मानला नाहीं व मलाच विश्वामित्र केलें. मी पुढें आलों तर दुसऱ्या पार्टीचा मनुष्य पुढें येणार म्हणून कांहींना वाईट वाटत होतें. पण माझें नशीब

पुढें येण्याचें असेल तर तें कधींहि चुकणार नाहीं, अशी काकासाहेबांनीं त्यांची समजूत घालून तो विचार नाहींसा करून टाकला. असे काकासाहेब हे एक कर्तव्यबुद्धीचे पक्के असे नाट्याचार्य होते.

काकासाहेब फार रागीट होते खरे पण तितकेच प्रेमळहि होते. धैर्यधर, कच, दुर्योधन याहि भूमिकांच्या तालमी काकासाहेबांनीं मला दिल्या होत्या. काकासाहेबांच्या तालमी देण्याबद्दल व ट्रेनिंगबद्दल पुष्कळ मतभेद ऐकण्यांत येतात, पण तिकडे त्यांचें लक्ष नसे. मी ज्या विचारानें भूमिका लिहिल्या त्याच नमुन्याचें त्यांचें ट्रेनिंगहि पाहिजे असा त्यांचा हट्ट व कटाक्ष असे. त्यांची एकदां तालीम मिळाली कीं तो नट झाला पाहिजे असें त्यांचें प्रभावी दिग्दर्शन असे. हालचाल, आविर्भाव व ट्रेनिंग, त्यांना पाहिजे तसें येईपर्यंत नटाला ते अगदीं हैराण करीत असत. हें जरी खरें तरी तो नट झाल्यावर तो काकासाहेबांचे आभार मानल्याशिवाय रहात नसे.

# श्री. दादा परचुरे, किर्लोस्कर ना. मंडळी.

## मानापमानचें वाचन

सन १९१० सालीं पुणें येथें भारत नाट्य–संमेलन होतें. त्याकरितां अहमदनगरहून किर्लोस्कर संगीत मंडळीचे प्रमुख नट व चालकवर्ग आले होते. किर्लोस्कर सं. मंडळीनें चालविलेल्या रंगभूमि मासिक पुस्तकाचे कचेरींत सकाळीं मंडळी बसली असतां कै. नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व काकासाहेब खाडिलकर हेहि तेथें उपस्थित झाले. कै. कोल्हटकर व किर्लोस्कर मंडळीचे चालकवर्ग यांचे विनंतीवरून मंडळी बसवीत असलेल्या संगीत प्रेमशोधन नाटकाच्या तालमी काकासाहेबांनीं द्याव्या असें ठरलें व याचवेळीं संगीत मानापमान नाटक जें पुढें किर्लोस्कर मंडळी-

कंडूनच बसविले जाणार होतें, त्यासंबंधीं विचारणा करण्यांत आली. तेव्हां एक अंक तयार असल्याचें काकासाहेबांनीं सांगितलें व प्रस्तुत आठवणी लिहिणार दादा परचुरे यांनीं काकासाहेबांच्या रहात्या घरांतून लिहिलेला अंक आणिला व त्याच बैठकींत अंकाचें वाचन झालें.

## संगीत मानापमानचा पहिला प्रयोग

सन १९११ सालीं फेब्रुवारीपासून सं. मानापमानच्या तालमीस सुरवात झाली. संगीत मानापमान नाटकाच्या तीन रंगीत तालमी झाल्या व त्या मुद्दाम मंगळवारीं ठेवण्यांत आल्या होत्या. कारण केसरी ऑफिसला मंगळवारींच सुटी असे. या तिन्ही रंगीत तालमींस काकासाहेब हजर होते, परंतु या तिन्ही तालमी निरस झाल्या होत्या.

संगीत मानापमान नाटकाचे आदले दिवशीं सं. मूकनायक नाटकाचा प्रयोग ठेवण्यांत आला होता. बाल गंधर्व यांचा आवाज शनिवारीं इतका बसला कीं दोन पदेंहि धड त्यांना म्हणतां आलीं नाहींत. रात्रीं नाटकाहून परत आल्यानंतर त्यांचें पहिलें कन्यारत्न परलोकवासी झाल्याचें समजलें, त्या प्रसंगाचा त्यांच्या मनावर काय परिणाम झाला असेल हें सांगणें नकोच.

कै. काकासाहेब यांस सकाळीं ही गोष्ट कळतांच आजचा मानापमान नाटकाचा प्रयोग बंद ठेवा असें त्यांनीं सांगितलें. ही गोष्ट बालगंधर्व यांस बिऱ्हाडीं कळतांच बालगंधर्व मंडळींत येऊन काकासाहेब यांस म्हणाले, 'मुलगी माझी गेली, मंडळीची नव्हे.' त्याप्रमाणें नाटक झालें. पहिल्या अंकाला नाटकांत रंग भरेना, पण एकदां पात्रांची ओळख प्रेक्षकांना पटल्यावर, दुसऱ्या अंकांतील विलासधर व लक्ष्मीधर यांच्या प्रवेशापासून नाटक जें रंगलें तें चढत्या श्रेणीनें रंगतच गेलें.

## धैर्यधराचा शामियाना

१९१८ सालीं बलवंत सं. मंडळीचा मुक्काम प्रथमच पुणें येथें झाला

असतां मंडळी करीत असलेल्या हिंदी संगीत मानापमान नाटकाच्या तालमी घेण्यासंबंधीं काकासाहेबांस विनंति करण्यांत आली. काकासाहेब सकाळीं ८ ते ११ नाटकाच्या तालमी घेत. दुपारीं १ ते ५ कै. तात्यासाहेब केळकर यांच्या संगीत वीरविडंबन नाटकाच्या तालमी मंडळी घेत व रात्रीं ६ ते ९ काकासाहेब विद्याहरण नाटकाच्या तालमी घेत. एके दिवशीं काकासाहेब सकाळीं मानापमान नाटकाची तालीम घेऊन परत जात असतां मंडळीचे मालकवर्गापैकीं एक चिंतामणराव कोल्हटकर यांनीं मानापमान नाटकांतील ४ थ्या अंकांतील नवीनच तयार केलेला शामियाना मुद्दाम दाखविण्याकरितां लावून ठेविला होता तो त्यांना दाखविण्यांत आला. त्यांची अपेक्षा अशी कीं, नाटकामध्यें नवीन सीन घातल्यामुळें काकासाहेबांस बरें वाटेल. परंतु काकासाहेबांनीं त्यांस सांगितलें 'नवीन नाटकाला नवीन सीन करावयाचे असतात. जुन्या नाटकांकरितां नाहीं.' यांत काकासाहेबांचा नाटक धंद्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती व्यवहारी होता हें दिसून येतें.

## उद्यांपासून मी तालमीस येणार नाहीं

संगीत प्रेमशोधन नाटकाच्या तालमी काकासाहेब घेत असतांनाचा प्रसंग आहे. एक दिवस किर्लोस्कर संगीत मंडळीचे चालक व प्रमुख नटवर्ग यांस कोठें मेजवानी असल्यामुळें तालमीस कांहीं नट लवकर येऊं शकले व कांहीं प्रमुख नट उशिरानें आले. काकासाहेब हे वक्तशीर असल्यामुळें व तालमीस हजर असलेल्या मंडळींपैकीं उशिराचें निराकरण कोणी न केल्यामुळें काकासाहेब यांस ही गैरव्यवस्था वाटली. अशीच तुमची तालमीस व्यवस्था असल्यास उद्यांपासून मी तालमीस येणार नाहीं असें सांगून तालीम न घेतां ते निघून गेले.

किर्लोस्कर संगीत मंडळीचे व्यवस्थापक कै. शंकर बापूजी मुजुमदार

२६३
ना. ल. १९५६

व धनी कै. ना. द. जोगळेकर यांनीं काकासाहेबांचे बिऱ्हाडीं जाऊन वस्तुस्थिति सांगतांच त्यांचा गैरसमज नाहींसा झाला व दुसरे दिवसापासून तालमीस येतों, असें आश्वासन त्यांनीं दिलें.

# नटवर्य यशवंत ना. आठवले, गंधर्व ना. मंडळी

## नाटकाच्या प्रयोगाची जोपासना

मुंबईस मानापमान नाटकाचा प्रथम प्रयोग झाला. त्यापूर्वी कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांचें प्रेमशोधन नाटक बसविण्यास कै. काकासाहेब खाडिलकर किर्लोस्कर मंडळींत येत असत तेव्हां त्यांस आम्ही प्रथम पाहिले.

कोल्हटकर हे आपलें नाटक बसविण्यास कधीं येत नसत. खाडिलकरांची आपलें नाटक बसविण्याचे बाबतींत यांचे अगदीं उलट पद्धति असे. स्वतःच्या मुलाचा जन्म झाल्यापासून आई त्या मुलाचें जसें संगोपन मूल समजूतदार होईपर्यंत करते, तशी काळजी नाटकाचा पहिला प्रयोग होईपर्यंत काकासाहेब घेत असत. नाटकाच्या तालमी ते स्वतः घेत असत. त्यानंतर त्या नाटकाचे कपडे, सीनसिनरी याबाबतींत ते जातीनें लक्ष घालीत असत. नंतर सुमुहूर्त पाहून नाटकाचा प्रयोग लावणें, त्यानंतर दर नाटकास हजर रहाणें व दिलेल्या सूचनेप्रमाणें अभिनयाचे व इतर बाबतींत कोणी नट चुकला तर दुसरे दिवशीं मंडळीचे बिऱ्हाडीं आल्यावर समज देणें हा त्यांचा क्रम होता. अशा "काटेकोर" गुरूची सक्त देखरेख असल्यानें अगदीं मुख्य कामापासून सामान्य कामें करणाऱ्या नटांस सुद्धां खाडिलकरांचा वचक असे. जो तो आपलीं कामें लक्षपूर्वक करीत असे व त्याचा परिणाम म्हणजे नाटक यशस्वी व्हायचें हें ठरलेलेंच असायचें !

## कंपनींतील मुक्काम

मुंबईस हल्लीं जेथें लॅमिंग्टन पोलिस स्टेशन आहे तेथें ११ सालांत एक बैठा बंगला होता. तेथें किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम होता व तेथेंच सुमुहूर्तानें मानापमान नाटकाच्या तालमी चालू होत्या. नाटककार खाडिलकर हे तेव्हां गिरगांवांत मोहन बिल्डिंगमध्यें माधवाश्रम होता तेथें रहात असत. दुपारीं २–२॥ वाजतां ते तालमी घेण्यास मंडळीचे बिऱ्हाडीं येत असत. ८–१५ दिवस त्यांनीं माधवाश्रमांत भोजन केलें. त्यानंतर मात्र कंपनीनें अत्यंत आग्रहानें कंपनीचे बिऱ्हाडीं कंपनीचे पंक्तीबरोबर भोजनास येण्याची विनंति केली व त्याप्रमाणें खाडिलकर कंपनींत जेवणास येऊं लागले.

मानापमान नाटकाच्या वेळीं किर्लोस्कर कंपनीचे भोजनाचे पंक्तीस खाडिलकर नियमित येत असत. खाडिलकरांची अंगकांति सतेज होती. केशरी रंगाचा कद जेवणाचे वेळीं ते नेसत असत. कंपनींतील इतर मंडळी पंक्तीला सोंवळें नेसून बसत नसत. खाडिलकरांप्रमाणें, फक्त मुजुमदार व नटवर्य पेठे हे दोघेच्जण सोंवळें नेसत. पैकीं मुजुमदार हे कंपनीचे व्यवस्थापक. काळ २५ वर्षांपूर्वीचा. तेव्हां कंपनींतील मंडळीनें सोंवळें नेसून जेवायला बसावें अशी मुजुमदारांची इच्छा असे. आम्हीं मुलांनीं तर सोंवळें नेसलेंच पाहिजे अशी मुजुमदारांची सक्ती असे. म्हणून कंपनींतील सर्व मुलांस त्यांचे नांवावर मुकटे आणून दिले होते.

मानापमान नाटकाच्या तालमी जोरांत चालू होत्या. प्र. भूमिकाः–– धैर्यधर–कै. जोगळेकर; भामिनी–बालगंधर्व; लक्ष्मीधर–बोडस; विलासधर–पेठे; आक्कासाहेब–पेटकर; शीलधर–आठवले, या प्रमाणें होत्या. भूमिकांची वांटणी झाली तेव्हां शीलधर हें पात्र संगीत होतें. त्यास तीन पदें होतीं. व ती भूमिका रामा डवरी या किर्लोस्कर सं. मंडळींतील प्रमुख गायक

नटाकडे होती. परंतु त्यांचे उच्चार अशुद्ध असत. एका पदांत "सेना" हा शब्द असून ते "सयना" असा उच्चार करूं लागले. खाडिलकरांनीं पराकाष्ठा केली. परंतु तेवढ्यापुरतें बरोबर म्हणून पुन्हां स्वतंत्र तो शब्द आला कीं, "सयना" "सयना" हा अशुद्ध शब्द येण्याचें कांहीं चुकेना ! तेव्हां खाडिलकरांनीं तीं पदें वगळून गद्य स्वरूपांत ती भूमिका म्हणजे शीलधरची भूमिका प्रस्तुत लेखकाकडे दिली.

# श्री. ग. कृ. बोडस, नट, नाटककार,

## काकासाहेबांच्या नाट्यलेखनाविषयीं सूचना

मी स्वतः काकासाहेबांच्या नाटकाचा अभ्यासु विद्यार्थी असल्यामुळें त्यांच्या गद्य व संगीत नाटकांचें मीं एकाग्रतेनें परिशीलन केलें आहे. माझें पहिलें नाटक 'स्वातंत्र्ययज्ञ' इ. स. १९३१ मध्यें महाराष्ट्र नाटक मंडळीच्या रंगभूमीवर उतरलें. नाटकाचें पुस्तक घेऊन मी काकासाहेबांच्या दर्शनास गेलों व त्यांना पुस्तक अर्पण करून त्यांचा आशीर्वाद मागितला. तेव्हां त्यांना फार आनंद झाला, आणि "महाराष्ट्र मंडळींतून नटांचे नाटककार होण्याची परंपरा तुम्ही कायम राखली आहे, हें पाहून मला समाधान वाटतें." असें त्यांनीं उद्गार काढून मला प्रोत्साहन दिलें. त्यावेळीं माझ्यासारख्या नवख्या नाटककारास किती आनंद झाला असेल तें निराळें सांगणें नको.

त्यावेळीं काकासाहेबांनीं नाट्यलेखनासंबंधीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या. नाटकाचा पहिला प्रवेश फार काळजीपूर्वक लिहिणें हीं पहिली महत्त्वाची गोष्ट आहे. कारण तो प्रवेश म्हणजे पुढील इमारतीचा पाया असतो. तोच कमकुवत, डळमळीत व वेडौल असेल तर पुढची इमारत तग धरणें शक्य नाहीं.

तसेंच नाट्यवस्तूचा विकास क्रमाक्रमानें होत गेला पाहिजे. नाटकांत निवडक प्रसंग व निवडक पात्रें असावींत. उगीच फाकट पसारा कामाचा नाहीं. आवश्यक ठिकाणीं पद्यांची योजना केली पाहिजे. अस्थानीं व अनावश्यक जागीं पद्य आल्यास रसभंग तर होतोच, पण नाट्यवस्तूची हानि होते. नवरसांपैकीं नाटकांत दोन तरी रस अवश्य असले पाहिजेत. पात्रांचे स्वभावविशेष ठळक रीतीनें व्यक्त झाले पाहिजेत. आमच्या भारतीय नाट्यशास्त्रांत, 'आरंभ, यत्न, प्राप्त्याशा, नियताप्ति व फलागम' हा जो पांच अंकी नाटकांतील कथानकविकासाचा क्रम सांगितला आहे, तो सर्व दृष्टीनीं उपयुक्त असून त्या क्रमानुसार संविधानकाची योजना केल्यास नाटक यशस्वी झाल्याशिवाय रहाणार नाहीं—इत्यादि कांहीं महत्त्वाच्या सूचना त्यावेळीं काकासाहेबांनीं मला केल्या, आणि मला त्यांचा फार उपयोग झाला हें प्रांजलपणानें कबूल करण्यास मला बिलकूल संकोच वाटत नाहीं.

# नटवर्य श्री. गोविंदराव टेंबे

## खोल विचार

मीं, बालगंधर्व व खाडिलकर कधीं कधीं चौपाटीवर फिरावयास जात असूं. त्यांच्या संभाषणापासून, प्रत्येक गोष्टीचा सूक्ष्म विचार करण्याचें महत्त्व पदोपदीं पटत असे. लो. टिळकांना शिक्षा होण्यास आपले लेख कारणीभूत झाले, याचें त्यांना वारंवार दुःख होई व त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे रहात. एकेका पदाचा अर्थ ते मोठ्या मार्मिकपणानें सांगत. मला काव्याच्या अंतरंगाबाबत त्यावेळीं कांहींच समजत नव्हतें. पदाकडे पहायचें म्हणजे त्याची चाल, राग, ताल, तान, खटके, मुरक्या यापलिकडे

कांहीं दिसतच नसे. खाडिलकरांच्या संभाषणामुळें काव्यार्थ व भावना वगैरेंची मला किंचित् नजर येऊं लागली; आणि त्यांच्याबद्दलएक विशेष आदर मला वाटूं लागला. तथापि त्यांची पद्यचरना मला कोल्हटकरांपेक्षांहि कृत्रिम व खडकाळ वाटली. "मानापमानां"तील त्यांचीं पद्यें त्यांच्या इतर नाटकापेक्षां बरीच नादयुक्त आहेत.

"नाटयकला कवि कृष्णा माला घाली" या ओळींत स्वतःचा गौरव स्वतः करून घेतल्याचा दोष दिसून येतो असें मी भीत-भीत एकदां म्हटलें; त्यावर "आम्हीं तरी काय, पूर्वापार संस्कृत कवींच्या पावलावर पाऊल टाकीत जाणार-भवभूति, जगन्नाथराय वगैरे कितीतरी कवीनीं या पलीकडील आत्मगौरवाचे उदगार आढले आहेत"—असा त्यांनीं खुलासा केला. सारांश त्यांच्याशीं पुष्कळ मोकळेपणानें बोलण्यापर्यंत माझी मजल गेली होती व त्यानींहि माझी धिटाई मान्य केली होती.

## निःस्वार्थी व निस्पृह स्वभाव

'मानापमानां' तील माझ्या नव्या चालींचा अत्यंत बोलबाला झाला. चोहोंकडे 'मानापमान' नाटक गाजलें तें इतकें कीं, त्यापूर्वी कोणत्याहि नाटकाचा इतका बोलबाला झाला नव्हता. अर्थात् सुरवातीचीं आण्णा-साहेबांचीं शांकुतल, सौभद्र हीं नाटकें तितकींच महाराष्ट्रभर दुमदुमलीं होतीं; पण तो जमाना फार पुराणा.

नाटक झालें, बोलबाला झाला-पुढें काय? मला उद्योग राहिला नाहीं, आणि कसलीच प्राप्ति नाहीं. मधून मधून कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी डोकें वर काढी. अशा स्थितींत खाडिलकरांनीं मला पदांच्या चालीबद्दल आठशें रुपये देऊं केले. मीं ते साहजिकच नाकारले. कारण चाली देतांना मोबदला घेण्याची कल्पनाहि मला कधीं शिवली नव्हती. तो

केवळ हौसेचा सौदा होता. पण ते म्हणाले "आजपर्यंत मी माझ्या गद्य नाटकांची किंमत बारा आणे ठेवीत आलों आहें; तुमच्या नोटेशनमुळें मी 'मानापमान' नाटकाची किंमत एक रुपया ठेवली आहे. अर्थात् हे चार आणे तुमचे आहेत. हा चालींचा मोबदला नव्हे पण किंमतीच्या वाढाव्यावर सर्वस्वी तुमचा हक्क आहे, आणि तो तुम्हीं घेतलाच पाहिजे." ईश्वरानें ऐन भुकेच्या वेळीं हें ताट अशा प्रकारें वाढून माझ्यापुढें ठेवलें. खाडिलकरांचा तरी केवढा निःस्वार्थी व निस्पृह स्वभाव !

('माझा जीवनविहार' या ग्रंथावरून ग्रंथकर्त्याच्या अनुमतीनें)

# काकासाहेबांविषयीं साहित्यसेवकांच्या आठवणी



## वीर वामनराव जोशी, उमरावती

### नाट्यलेखनासंबंधीं चर्चा

नाट्यलेखनाचा एक अभ्यासू या नात्यानें कै. काकासाहेबांचा प्रथम परिचय मीं सन १९११ सालीं करून घेतला. १९१० सालीं "राष्ट्रमत" सरकारच्या कोपास बळी पडल्यामुळें "कर्णवधा"च्या कथानकावर एक पंचांकी गद्य नाटक मीं लिहून काढलें आणि तें कै. काकासाहेबांना चार सहा दिवसांत नाटक वाचून दाखविलें. या निमित्तानें नाट्य लेखनासंबंधानें जी चर्चा रोज ते करीत तिच्यापासून माझा फारच फायदा झाला. "नाटकांत हास्यरस नसला तर प्रेक्षकांना नाटकाचा ताण सहन करणें कठीण जातें" असें त्यांनीं मला सांगितलें. परंतु हास्यरस मला मुळींच लिहितां येत नसल्यामुळें त्यांच्या या सूचनेचा मला कधींच उपयोग करून घेतां आला नाही. तथापि या चर्चेंतील एक गोष्ट मात्र माझ्या फारच उपयोगी पडली.

### कीचकवध व भाऊबंदकी

एक दिवस बोलतां बोलतां मीं त्यांना विचारलें कीं "कीचक वधा"वर सरकारनें बंदी घातली, पण "भाऊबंदकी" सरकारच्या तडाख्यांतून सुटलें–हें असें कसें झालें?" तेव्हां त्यांनीं या फरकाचें कारण मला सांगितलें. ते म्हणालेः—"कीचक वधां"त बड्या सरकारी अधिकाऱ्यांच्या खुनास उत्तेजन देण्यांत आलें आहे असा पोलिस अधिकाऱ्यांचा त्यावर

आक्षेप होता,—परन्तु " भाऊबंदकीं "त राजवधाची (Regicide) निर्भत्सना केली आहे. तेव्हां हें नाटक राजनिष्ठेला पोषक आहे असा पोलिसांचा अभिप्राय होता. त्यामुळें " कीचक वध " बंद पडलें आणि " भाऊबंदकी " चालू राहिलें." कै. खाडिलकरांच्यासारख्या निस्सीम टिळकभक्ताच्या नाटकाकडे पहावयाची त्यावेळच्या पोलिसांची ही दृष्टि कळल्यामुळें माझें " राक्षसी महत्त्वाकांक्षा " हें नाटक मोठ्या मुष्किलीनें कां होईना पण मी पोलिसांच्या दाढेंतून बचावूं शकलों. इतकेंच नव्हे तर " स्वातंत्र्य " शब्दाचा स्पष्ट उच्चार करून व " रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ? " हा सिद्धांत निःसंदिग्ध शब्दांत लोकांपुढें मांडूनहि मला माझ्या रणदुंदुभीचा नाद दीर्घ काल घुमत ठेवितां आला. असो. यानंतर मी माझें कोणतेंहि नाटक कै. काकासाहेबांना वाचून दाखवूं शकलों नाहीं. नाटक रंगभूमीवर आल्यावर अथवा जमलेंच्च तर रंगीत तालमीच्या वेळीं मी त्यांना माझें नाटक दाखवीत असें.

# श्री. भा. वि. ऊर्फ मामासाहेब वरेरकर, मुंबई.

## पहिली भेट

काकांची माझी पहिली भेट झाली त्यावेळीं नाटककार होण्याचें भाग्य मला लाभलेलें असलें तरी मी फारसा कोणाच्या ओळखीचा नव्हतों. त्यावेळीं ते पुण्यास मुंजाबाच्या बोळांत रहात असत. मी जाऊन भेटलों त्यावेळीं ते एकटेच होते. आधींच मला त्यांची फार भीति वाटत होती आणि प्रत्यक्ष भेटीच्या वेळीं त्यांची उग्र मुद्रा पाहून मी चुरडून गेल्यासारखा झालों. काय बोलावें तें मला सुचेना. ' मी नुसता आपल्याला भेटायला आलों आहें ' असें मीं सांगितलें. तेव्हां त्यांनीं नुसता हुंकार दिला. ' मला आपलीं नाटकें

फार आवडतात ' असें मी चांचरत चांचरत म्हणालों. त्यावेळींहि त्यांनीं नुसता हुंकारच दिला. अर्थातच पुढें काय बोलावें तेंच मला कळेना. चांगला २ मिनिटें मी स्वस्थ बसलों होतों. तेहि कांहीं बोलले नाहींत. माझें कुंजविहारी नाटक त्यावेळीं रंगभूमीवर आलें होतें. त्याचा मी नुसता उल्लेख केला, तेव्हां ते म्हणाले, 'अजून मीं तें पाहिलें नाहीं.' पुन्हां स्तब्धता निर्माण झाली. मीं म्हटलें, 'मी आतां येतों.' मीं नमस्कार केला, त्यांनींहि नमस्कार केला. मी उठलों, जायला निघालों. तरीहि ते विशेष कांहीं बोलले नाहींत. जड पावलांनीं मी घराबाहेर पडलों.

## संन्याशाच्या संसाराचा विषय आवडला

यानंतरची भेट झाली ती माझ्या 'संन्याशाचा संसार' या नाटकाच्या प्रयोगास लोकमान्यांबरोबर काका आले होते त्यावेळीं. दुसरा अंक झाल्यावर सर्व मंडळी आंत आली होती. लोकमान्यांनीं त्यावेळीं थोडेसें भाषण करून नाटकाच्या विषयाबद्दल जें आपलें मत प्रदर्शित केलें होतें, त्यामुळें मी थोडासा उदास झालों होतों. काकांना मीं नमस्कार केला त्यावेळीं ते म्हणाले, तुम्ही फारच उत्तम विषय शोधून काढलात. आज कदाचित् याची किंमत कुणास कळून येणार नाहीं. तुम्हाला कांहीं काळ वाट पहावी लागेल. असा एक काळ येईल कीं या तुमच्या विषयाला राजकीय महत्त्व आल्यावांचून रहाणार नाहीं. ते पुढें म्हणाले, 'हें 'कां कीं,' मात्र तुम्ही फार सुन्दर शोधून काढलेंत' मीं म्हटलें, 'तो माझा शोध नव्हे. गुलेलूच्या तोंडची पुष्कळशीं वाक्यें मराठी बायबलांतून जशीच्या तशीं उचलून घेतलीं आहेत. त्यांतलेंच हें 'कां, कीं,' आहे.' काका थोडासा हांसण्याचा प्रयत्न करीत म्हणाले, 'असं का ? तर मग मला एकदां हें मराठी बायबल पाहिलें पाहिजे.'

लोकमान्यांच्या भाषणांत त्यांनीं परंपरेचें महत्त्व सांगून पतितपरावर्तना-बद्दल जी साशंक वृत्ति प्रदर्शित केली होती, तिला काकांच्या मोजक्या शब्दांत मला जें उत्तर मिळालें त्याचें मला एक प्रकारें आश्चर्यच वाटलें.

## सत्तेच्या गुलामाला आशीर्वाद

यानंतरची भेट झाली ती माझ्या सत्तेचे गुलाम या नाटकाच्या वेळीं. धीर करून मी त्यांना नाटकास बोलवावयास गेलों. त्यावेळीं ते म्हणाले, 'सध्यां जागरण करणें मला परवडत नाहीं. रविवारच्या खेळाला आलों असतों, पण तीच वेळ माझा अग्रलेख लिहून प्रुफें तपासावयाची असते. एकदां येऊन नाटक पहावें असें वाटत असलें तरी येणें शक्य होईलसें दिसत नाहीं.' मीं म्हटलें, 'आपण आला नाहीं तर मला फार दुःख होईल. कांहीं विशिष्ट हेतु मनांत धरून मीं हें नाटक लिहिलें आहे. आजचेंच कथानक, आजचेच प्रसंग घेऊन आजच्या राजकारणाचा प्रस्ताव करण्याचा प्रयत्न मीं केला आहे. तो आपल्याला पसंत पडला तरच मला समाधान वाटेल.'

माझें भाषण ऐकून ते क्षणभर स्तब्ध राहिले. नंतर म्हणाले, ठीक आहे, मी येतों. पहिला अंक संपतांच माझी परत प्रेसमध्यें येण्याची व्यवस्था ठेवा.'

मी आनंदानें त्यांचा निरोप घेतला. त्या दिवशीं रविवारीं ते नाटकाला आले. एक अंक पुरा होतांच गाडी तयार ठेवून मी मॅनेजरना विचारायला पाठविलें. त्यावेळीं ते त्यांना म्हणाले, 'मी नाटकाला बसतों आहें. असें करा, प्रेसमध्यें कोणीतरी माणूस पाठवा आणि अग्रलेखाचीं प्रुफें घेऊन या. नाटक पाहतां पाहतां मी प्रुफें तपासून देईन, तेवढी प्रेसमध्यें पुन्हां पोंचतीं करा.'

माझा आनंद गगनांत मावेनासा झाला. पेंढारकरांसकट सर्व नटांना मोठी ईर्षा आली होती. त्या दिवशींच्या प्रयोगाची रंगत कांहीं औरच होती. प्रत्येक नट इतर सारे प्रेक्षक विसरून एकट्या काकांसाठीं जणूं काय आपली भूमिका वजावीत होता.

नाटक पुरें होतांच काका आंत आले त्यावेळीं मी त्यांच्या पायावर डोकें ठेऊन नमस्कार केला. माझ्या पाठीवर हात ठेवून ते म्हणाले, 'नाटकें लिहावयाचीं तर अशीच नाटकें लिहा. ईश्वर तुमचें कल्याण करो.' सर्व नटांनीं येऊन त्यांना नमस्कार केला त्यावेळीं प्रत्येकाला त्यांनीं आशीर्वाद दिला. आज ती आठवण आली म्हणजे मला गहिंवर आल्यावांचून रहात नाहीं. इतक्या मोजक्या शब्दांत माझ्या उभ्या आयुष्यांत कुणीहि मला एवढें मोठें शिफारसपत्र दिलें नव्हतें. तो दिवस आम्हां सर्वांनांच मोठा आनंदाचा गेला 'आज माझ्या श्रमाचें सार्थक झालें' असें पेंढारकरहि त्यावेळीं म्हणाले. काकांचा तो आशीर्वाद फळास येऊन सत्तेचे गुलाम नाटक आजच्या घटकेला सुद्धां पहिल्या इतकेंच लोकप्रिय होऊन राहिलें आहे.

मनाला थोडासा धीर येऊन 'सत्तेचे गुलाम' काकांनीं पाहिल्यावर मी दुसऱ्या दिवशीं जाऊन काकांना भेटलों. त्यांनीं नाटकाच्या कथानकाची तारीफ केली. त्यानंतर त्या नाटकाच्या प्रयोगासाठीं केलेल्या अद्यावत् सजावटीची त्यांनीं छाननी केली. त्यासाठीं खर्च किती झाला हें विचारलें. होत असलेल्या उत्पन्नाची चौकशीहि केली. एवढ्या थोड्या खर्चांत इतके चांगले देखावे केल्याबद्दल त्यांनीं मोकळ्या मनानें तारीफ केली आणि म्हणाले, 'नाटकासाठीं अधिक खर्च करणें मला पसंत नाहीं. लोक येतात ते नाटक पहायला. परिश्रम केले पाहिजेत ते लेखनावर आणि तालमींवर. त्या दृष्टीनें या नाटकाच्या बाबतींत माझें पूर्ण समाधान झालें आहे. अशींच नाटकें लिहा आणि अशींच उत्तम रीतीनें बसवा आणि काटकसर दिसेल अशीच बसवा.' असें म्हणून त्यांनीं नमस्कार केला. तेव्हां तोच निघून जायचा हुकूम आहे असें समजून मी बाहेर पडलों.

## संपादक स्वतंत्र पाहिजे

त्यावेळीं लोकमान्य पत्राचा संपादक या नात्यानें काकांचा संबंध

सुटल्यासुळें बरीच खळबळ माजली होती. मुंबईच्या बॉंबे क्रॉनिकल पत्राच्या व्यवस्थापकांत श्री. लक्ष्मीदास रावजी तेरसी यांचा प्रामुख्यानें हात होता. ही हकीकत कळली त्यावेळीं क्रॉनिकल संस्थेमार्फत एक मराठी दैनिक काढावें असें त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं तसा निरोप देऊन मला काकांकडे पाठविलें. मी ती त्यांची योजना काकांच्यासमोर मांडली. त्यावेळीं ते म्हणाले, 'नोकर या नात्यानें संपादकाचें काम करितांना मला जे कटु अनुभव आले आहेत ते आतां पुरे झाले. संपादक हा स्वतंत्र पाहिजे. त्याच्यावर दुसऱ्या कोणा मालकाचें नियंत्रण असतां कामा नये. मीं आतां स्वतःचें पत्र काढावयाचा निर्धार केला आहे. श्री. तेरसी यांना सांगा कीं त्यांच्या सूचनेबद्दल मी यांचा फार आभारी आहें. पण मी दिलगीर आहें.'

## नाटक कंपन्यांच्या जाहिराती

त्यावेळीं नवाकाळ सुरू झाला होता आणि पत्राची कचेरी खटाववाडींत आली होती. ललितकलादर्श मंडळीचा मुक्काम त्यावेळीं नागपूर येथें होता, आणि त्या सीझनमध्यें त्यांना चांगलेंसें उत्पन्न होत नसल्यामुळें जाहिरातींची बाकी थकली आणि नवाकाळच्या मॅनेजरनीं त्यांची जाहिरात बंद केली होती. या बाबतींत काकांना प्रत्यक्ष भेटून जाहिरात चालू ठेवण्याबद्दल विनंति करण्यासाठीं पेंढारकर यांनीं मला पत्र लिहिलें होतें.

मी तें पत्र घेऊन काकांना भेटण्यासाठीं त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों, काका म्हणाले, 'बोला, काय काम आहे?'

मी बोलायला सुरवात केली, 'नागपूरहून पेंढारकरांचें पत्र आलें आहे.' मी पत्र काढून त्यांच्या हातीं दिलें. ते वाचीत असतां त्यांची मुद्रा बदलत होती. पत्र हातीं घेऊन ते आंत गेले. अंगांत कोट चढवला, टोपी घातली व ते कचेरीकडे निघाले. मी मुकाट्यानें त्यांच्या मागोमाग नवाकाळ कचेरींत आलों.

कचेरींत येतांच खड्या आवाजांत ते उद्गारले, 'ललितकलादर्श मंडळीची जाहिरात कोणी बंद केली ?' काकांचें तें अवसान पाहून ऑफिसांत असलेले मॅनेजर भीतभीतच पुढें आले आणि हळूंच म्हणाले, 'मीं बंद केली' काकांनीं तसेंच त्यांच्याकडे न पहातां प्रश्न केला, 'कां बंद केली ?' तितक्याच घाबरटपणानें त्यांनीं उत्तर दिलें 'जाहिरातीच्या बिलाचे पैसे आले नाहींत म्हणून बंद केली !'

काका खडसावून म्हणाले, 'नाहीं, नाटक मंडळीच्या बिलाचे पैसे आले नाहींत तरी जाहिरात बंद करायची नाहीं.'

## रंगभूमीबद्दल कृतज्ञता

ललितकलादर्श मंडळीची जाहिरात सुरू करण्याबद्दल नवाकाळच्या मॅनेजरला सांगितल्यावर काकांनीं जुना इतिहास सांगायला आरंभ केला. कोणत्या परिस्थितींत आपण नाटकें लिहायला लागलों, नाटकें लिहिल्यामुळेंच सार्वजनिक दृष्ट्या आपण जगून कसे राहिलों, वृत्तपत्रापेक्षां रंगभूमीनेंच आपणाला कसें मोठें केलें, लोकमान्य सोडल्यावर ज्या भांडवलावर नवाकाळ उभारला तें अल्पस्वल्प भांडवल रंगभूमीकडूनच कसें आलें होतें, वगैरे हकीकत त्यांनीं तडातड सांगितली. ते म्हणाले, 'आज तुम्ही खातां आहां तें अन्न रंगभूमीनें दिलें आहे. हें रंगभूमीचें ऋण आहे, हें ऋण कधीं फिटायचें नाहीं, या रंगभूमीच्या ऋणाशीं कृतघ्न होऊं नका. कुठल्याहि नाटक मंडळीकडून जाहिरातीचे पैसे आले नाहींत तरी त्यांची जाहिरात बंद करावयाची नाहीं, हें ध्यानांत ठेवा !' असें म्हणून तितक्याच जोरानें तणतणत ते घरीं निघून गेले. माझ्याकडे त्यांनीं पाहिलें सुद्धां नाहीं, कीं मला उत्तरहि दिलें नाहीं, कीं पेंढारकरांना असें लिहा असेंहि सांगितलें नाहीं.

तो त्या दिवसाचा प्रसंग मीं केव्हांहि विसरणार नाहीं. उभ्या महाराष्ट्रांत

कृतज्ञतेच्या भावनेचें एवढें सर्वोच्च उदाहरण शोधून सुद्धां सांपडणार नाहीं, असें त्यावेळीं मला वाटलें. आजहि मला तसेंच वाटत आहे.

अर्थातच त्या दिवसापासून पुन्हां पेंढारकरांची जाहिरात सुरू झाली. कांहीं दिवसांनीं त्यांनीं आपल्या बिलाचे पैसे दिले. पण काकांचें हें ऋण पेंढारकर आमरण विसरले नाहींत.

## टीकेला उत्तर नाहीं

कै. न. चिं. केळकर यांचें आत्मचरित्र त्यावेळीं प्रसिद्ध झालें होतें. त्या पुस्तकांतील कांहीं प्रसंग वाचून मला उद्वेग उत्पन्न झाला. मी मुद्दाम काकांना भेटायला गेलों. मला या गोष्टीच्या बाबतींत जें कांहीं वाटत होतें तें मी जीव तोडून त्यांना सांगितल. मी चिडून बोलत होतों. पण त्याचा परिणाम त्यांच्या मुद्रेवर यत्किंचितहि दिसून येत नव्हता.

ते एक शब्दहि बोलले नाहींत. क्षणभर स्वस्थ बसल्यावर मींच बोलायला सुरवात केली. मीं म्हटलें 'या कांहीं प्रसंगांची वर्णनें चुकीचीं आलीं आहेत. त्यांचा खुलासा नको का व्हायला ? वाचकांचा गैरसमज नाहीं का व्हायचा ?' त्यांनीं म्हटलें, 'त्यांत काय बिघडलें ? त्यामुळें काय असें जगाचें नुकसान होणार आहे ?' मी म्हटलें, 'पण गैरसमज कायम राहतील कीं ! इतिहासांत या प्रसंगावद्दलची ही अशी चुकीची माहिती कां राहूं द्यावी ? आपण याचा खुलासा करावा असें माझ्या अल्प बुद्धीला वाटतें !' ते निर्धारानें म्हणाले, 'तें होणें नाहीं. या माझ्या खाजगी बाबी आहेत. असल्या क्षुल्लक गोष्टींत जगाच्या माझ्याबद्दल गैरसमज झाला म्हणून माझेंहि कांहीं बिघडत नाहीं कीं जगाचेंहि कांहीं बिघडत नाहीं. सार्वजनिक कल्याणाशीं या गोष्टीचा जोंपर्यंत कांहीं संबंध नाहीं तोंपर्यंत त्याबद्दल खुलासा करणें मला मुळींच पसंत नाहीं.'

विषय एक प्रकारें संपला होता, पण माझ्यानें रहवेना. मी म्हटलें, 'आपण आपलें आत्मचरित्र कां लिहीत नाहीं ? त्यांत साऱ्या चुकीच्या विधानांचें आपोआप निराकरण होईल.' तितक्याच निर्धारानें ते म्हणाले, 'तेंहि होणें नाहीं. माझ्या आयुष्यांत अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, त्या घडल्या तशा लिहिणें माझ्या लेखीं अशक्य आहे. बरें, आतां या !' असें म्हणून त्यांनीं नमस्कार केल्यामुळें मला उठून जावें लागलें.

यानंतर वेगवेगळ्या वेळीं काकांना भेटण्याचा प्रसंग आला होता. अशा भेटी अगदीं शब्दाला शब्द होण्यापुरत्याच असत. पण एका वेळीं जेव्हां मीं जायला निघालों होतों त्यावेळीं ते म्हणाले, बसा हो जरा. त्यावेळीं मला केवढी धन्यता वाटली तें सांगतां येणार नाहीं. पूर्वीचा त्यांचा करडा स्वभाव दिवसेंदिवस निवळत जात होता. त्यांचें तें लक्षण होतें.

## काकांचें मातृवात्सल्य

कीचक वध नाटकावरची बंदी उठली त्यावेळीं मी आणि पेंढारकर काकांना भेटायला गेलों. तें नाटक संगीत करून पुन्हां रंगभूमीवर आणावें अशी माझी इच्छा होती. सैरंध्रीचें काम पेंढारकर यांनीं करावें आणि कीचकाची भूमिका करायला नाना फाटकांसारखा प्रभावी नट मंडळींत होता. इतर भूमिकांनाहि योग्य अशीं पात्रें त्यावेळीं ललितकलादर्श मंडळींत होतीं. सर्व गोष्टींचा पाढा मी त्यांच्यासमोर वाचला. त्यावेळीं ते म्हणाले, 'ऐन अमदानींत कीचक वध नाटक महाराष्ट्र मंडळीच्या हातून गेलें. आतां त्या मंडळींची परिस्थिति सुखासमाधानाची नाहीं. आधीं हें नाटक पुन्हां महाराष्ट्र मंडळीच्याकरवीं रंगभूमीवर येऊं दे, त्यांना त्या नाटकाचा पुरेसा फायदा मिळून जाऊं दे, आणि मग हें नाटक संगीत स्वरूपांत करायची तुम्हांला परवानगी देऊं.'

मीं म्हटलें, 'दोघांचेहि प्रयोग एकाच वेळीं झाले म्हणून काय बिघडलें ?'

काका म्हणाले, 'संगीताचें आकर्षण फार मोठें आहे. त्याचा महाराष्ट्र नाटक मंडळीच्या प्रयोगावर परिणाम होईल. तें मला पसंत नाहीं. घाई कशाला करतां ? थोडा वेळ वाट पहा, तेवढ्यानें कांहीं बिघडत नाहीं !'

आमची निराशा झाली खरी, पण महाराष्ट्र मंडळीबद्दल असलेल्या काकांच्या मातृवात्सल्याचें आम्हां दोघांना तितकेंच कौतुक वाटलें. रंगभूमीच्या ऋणाप्रमाणेंच एखाद्या नाटक मंडळीचेंहि ऋण काका किती कांटेकोरपणानें मानीत होते याचें हें उदाहरण त्यांच्या उदार मातृहृदयाची साक्ष द्यायला पुरेसें होतें.

## श्री. ना. रा. बामणगांवकर, अमरावती

### अस्खलित इंग्रजी भाषण

१९०७ च्या सुरत काँग्रेसची ती गोष्ट आहे. तत्पूर्वी कै. लोकमान्य टिळकांचे सहकारी म्हणून केळकर-खाडिलकर ह्या दोन पदवीधरांचीं नांवें ऐकून माहीत होतीं. सुरत काँग्रेसपूर्वी कै. दादासाहेब खापर्डे यांची सुरतेला 'राष्ट्रीय पक्षाची भूमिका' या विषयावर गुजराथीमध्यें फार मोठ्या प्रचंड समुदायापुढें व्याख्यानें चालू होतीं. पुढें कै. लोकमान्य तेथें आले. राष्ट्रीय पक्षाच्या परिषदेपूर्वी त्यांचेंहि व्याख्यान झालें. तत्पूर्वी कै. परांजपे, केळकर व खाडिलकर हेहि ह्या सभेंत बोलले. काकासाहेब या सभेंत अस्खलित इंग्रजींत बोलले हें मला आठवतें. गजराजाप्रमाणें भव्य तशीच गंभीर शरीरयष्टि व मुद्रा आणि विषय चित्ताकर्षक करून त्याचा ठसा श्रोत्यांच्या मनावर उठविण्याची त्यांची हातोटी ही माझ्या मनावर बिंबली. पण ह्यापलिकडे तेथें माझा अधिक परिचय झाला नाहीं. त्याचवर्षी मी उमरावतींत 'तरुण हिंद' नांवाचें साप्ताहिक सुरू केलें होतें. ह्या नात्यानें कांहींनीं नांवाचा परिचय करून दिला होता इतकेंच.

## पुण्याच्या मुक्कामांत परिचय

१९११।१९१२।१९१३ मध्यें उन्हाळ्यांत "महिना पंधरा दिवसाकरितां" तरी पुणें येथें मी जात असें. कै. वासुकाका जोशी यांच्याशीं प्रथम व लवकर परिचय झाला. कै. राजवाडे, कै. चिंतामणराव वैद्य, काकासाहेब खाडिलकर वगैरेंशीं परिचय वाढावयास वासुकाकाच कारण. टिळक सुटून येण्यापूर्वी वैद्य पंचायतन कवडे शास्त्री यांच्याकडे राष्ट्रीय पक्षाचे अज्ञातवासांत असलेले लोक जमत असत. माझाहि या बैठकींत शिरकाव झाला. त. बाबासाहेब परांजपे व कै. दत्तोपंत आपटे हे वऱ्हाडांतील राष्ट्रीय जीवनाचे आधारस्तंभ तेथें जमत असल्यामुळें तेथील अड्ड्याशीं मी समरस झालों. काकासाहेब, शिवरामपंत, चिंतामणराव वैद्य वगैरे जमले असतां जी चर्चा चाले त्यांत चांगल्या विषयांबरोबर विनोद व सुभाषितांचीहि रेलचेल असे. कै. काकासाहेब तेथेंच मला हंसतांना दिसत पण तेंहि हास्य अत्यंत मर्यादित. नारायण पेठेंतील त्यांच्या रहात्या घराकडे ते एकटे असतां गेलोंच तर फिरतांना व कांहींतरी विचार करीत आहेत असे ते दिसत. त्यावेळीं जर त्यांना कांहीं प्रश्न केलाच तर ते नेमकें व मोजकें उत्तर देत. महाराष्ट्र व किर्लोस्कर नाटक मंडळींतील लोक आले तरी ते विशेष बोलत असत असें नाहीं. नाटक व नाट्य याविषयीं गंभीर चर्चा चाले. त्यांच्याबरोबर नाटक मंडळीच्या बिऱ्हाडींहि मी गेलों. पण तेथेंहि गंभीर चर्चेपलिकडे मला कांहीं फारसें आढळलें नाहीं. विनोद निघालाच तर तो फारच मर्यादित.

पुढें १९१४ पासून मलाहि नाटककार होण्याचा योग आला. १९१४ मध्यें माझें "सं. भीष्म प्रतीज्ञा" नाटक मुंबईत बॉम्बे थिएटरमध्यें लेले बंधूंच्या कंपनीकडून सुरू असतांना काकासाहेब मुंबईत गंधर्व मंडळींत आले आहेत असें मला समजल्यावर मी त्यांना नाटकास घेऊन आलों.

ते अखेरपर्यंत नाटकास बसले होते. मीहि जवळच होतों. अंक संपल्यावर कांहीं तरी विचारावें असें माझ्या मनांत येई. पण हिंमत कांहीं झाली नाहीं. मी त्यांना बिऱ्हाडीं पोहोंचविलें तरी नाटकाविषयीं तेहि कांहीं बोलले नाहींत व मीहि कांहीं बोललों नाहीं. तथापि कांहीं नटांच्या होतकरूपणाविषयीं मात्र ते बोलले. मात्र गंधर्व नाटक मंडळींत ते नाट्यरचनेविषयीं बरेच उपकारक बोलले हें मला समजलें. गंधर्व मंडळी तेव्हांपासून माझ्या सलगीची झाली. पण त्या सलगीचा फायदा घेऊन आपली नाट्यकृति त्यांच्या माथीं मारावी ही महत्त्वाकांक्षा मात्र माझ्या मनाला कधीं शिवली नाहीं. कारण काकासाहेबांनीं नाटकें लिहिलीं व बसविलीं, पण तीं त्यांनीं लघळपणा करून कोणाच्या माथीं मारलीं नाहींत हा त्यांच्या शीलाचा वृत्तांत मला पूर्ण माहीत झाला होता व पटलाहि होता.

## उच्चार व आचार

सवाई गंधर्वांच्या नूतन संगीत मंडळीकरितां मीं द्रौपदी वस्त्रहरण कथानकावरील "आत्मतेज" नाटक लिहिलें. मला समजलें कीं, काकासाहेबहि "द्रौपदी" म्हणून ह्याच प्रसंगावर नाटक लिहिणार. तेव्हां काय करावें हा माझ्यापुढें प्रश्न पडला. गंधर्व मंडळीच्या बिऱ्हाडावरून परततांना मी त्यांना गांठले व माझ्या खोलींत नेलें. तेथें मी त्यांना माझ्या आत्मतेज नाटकाचें कथानक सांगितलें आणि म्हटलें, 'आपणहि ह्याच कथानकावर नाटक लिहिणार तेव्हां माझ्यावर फुकट दोन आरोप येतील. ते हे कीं चढाओढीचे बुद्धीनें मीं हें नाटक लिहिलें हा एक, आणि दुसरा आरोप हा कीं, चोरी!' तेव्हां त्यांनीं मला स्पष्ट सांगितलें कीं, 'लोक काय म्हणतात याचा फारसा विचार करूं नये. पण मी मात्र तुझें नाटक रंगभूमीवर येईपर्यंत "द्रौपदी" नाटक लिहावयास घेणार नाहीं एवढें खरें.' १९२० च्या जुलैमध्यें कै. लोकमान्यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें सं. आत्मतेजाचा पहिला प्रयोग

झाला. तो प्रयोग काकासाहेबांनीं अखेरपर्यंत बसून पाहिला व त्यानंतर "द्रौपदी" लिहावयास सुरुवात केली. पहिला अंक पेनसिलीनें लिहिल्यावर त्यांनीं गंधर्वांचे त्यावेळचे मॅनेजर यांच्याकडे दिला. मला बोलावणें आलें व प्रथम मीं वाचला. वाचतांना नायिकेचा प्रवेश केव्हां व कसा व्हावा हें जें मला साधलें नाहीं तें त्यांत साधलें व माझी चूक मला समजली हें मी त्यांच्याजवळ संध्याकाळीं गंधर्व मंडळीच्या बिऱ्हाडीं कबूल केलें. तेव्हां ते नुसते थोडे हंसले. दोन वर्षांपूर्वी सहज दिलेलें वचन त्यांनीं बरोबर पाळलें तत्त्वचिंतन व त्याप्रमाणें आचार हा त्यांच्या मनाचा मोठेपणा होय.

## उदार मनाचा पुरुष

कै. माधवराव जोशी यांचें सं. विनोद नाटक कै. काकासाहेबांनीं पाहिलें नव्हतें व ते कधीं पहावयाचे नाहींत असें माधवराव म्हणत. नूतन संगीत मंडळीच्या व्यवस्थापकास घेऊन मी स्वतः काकासाहेबांकडे गेलो व निमंत्रण दिलें. काकासाहेब नाटकास आले व ते अखेरपर्यंत बसले, इतकेंच नव्हे तर 'सदर' नाटकांतील भैरवी–दिसे पोपट मैना–हिला जेव्हां सवाई गंधर्वांनीं मालकंसांतील स्वर लावले तेव्हां त्यांच्या डोळ्यांतून अश्रू गळाले. संगीत मानापमान नाटक करण्याची दुसरे दिवशीं त्यांनीं परवानगी दिली. पैशाची अट घातली नाहीं. मालकास व मॅनेजरला आंकडा घालावयास सांगितला. पैकीं कांहीं पैसे नगदी दिले इतकेंच. परंतु पैशाकरितां त्यांनीं आडविलें नाहीं. माधवराव जोश्यांनाहि माझें नाटक पहावयास काकासाहेब आले म्हणून आनंद वाटला. माधवराव मला म्हणत "गणू, संगीताबद्दल काकासाहेब काय म्हणाले रे?" मी उत्तरलों, 'अरे म्हणणार काय? हंसत, मुखानें मजा लुटत होते. "इतक्या उदार मनाचा पुरुष आहे ही माझी कल्पना नव्हती" असें शेवटीं माधवराव म्हणाला. माधवराव टिळकभक्त खरा, पण तो एका सुप्रसिद्ध साहित्यिक सुधारकाच्या सहवासांत असल्यामुळें

काकासाहेबांकडे अनादर बुद्धीनें पहाण्याची सवय जडली होती. पण ह्या प्रसंगानें ती गेली. ही १९१९ मधील गोष्ट आहे.

## मतभेद आणि मैत्री

पुढें अहसहकाराचें युग आलें. काकासाहेब मुंबईंत लोकमान्य दैनिकाचे संपादक म्हणून राहूं लागले. मुंबईस गेलों असतांना त्यांच्या बैठकींत जाण्याचा पायंडा होताच. १९२२ मध्यें तर फेर ना फेर वाद जोरांत आला. कलकत्ता येथें देशबंधु दासांच्या बंगल्यांत अॉ. इं. काँ. कमिटीची सभा होती. त्या सभेंत बहिष्कारत्रयी किंवा कौन्सिल प्रवेश हा प्रश्न वादाला होता. काकासाहेब सभासद म्हणून हजर होते. अणे व काकासाहेब चंचीभक्त म्हणून जवळ येत. मी व बॅ. रामरावहि तेथेंच होतों. सर्व कांहीं आम्ही बोलत होतों. पण मतभेदाच्या मुद्यावर बोलत नव्हतों. पुढें पुढें तर हे भेद तीव्रच झाले. लोकमान्य सोडून त्यांनीं नवाकाळ काढला. तरी आम्हां वऱ्हाडकरांच्या मैत्रींत खंड पडला नव्हता. नागपूर झेंडा सत्याग्रहांत मी पकडला गेलों असतां 'नवाकाळ' मध्यें अग्रलेख आल्याचें मला मुंबईवरून नागपूरला आलेले भडोचचे डॉ. चंदूलाल देसाई वगैरे गुजराथी पुढाऱ्यांनीं सांगितलें. मी उदय चालवीत आहें व वीर वामनराव स्वतंत्र हिंदुस्थान चालवीत आहेत हें त्यांना माहीत होतें. मी विरुद्ध पक्षांत आहें हीहि त्यांना कल्पना होती. पण खाजगी वागणुकींत त्यांनीं अंतर पडूं दिलें नाहीं. तरी मुंबईला गेल्यावर मी व लोकनायक अणे, वीर वामनराव हे त्यांना भेटत होतों. 'उदय' करितां मशीन व टाईप पुरविण्यापर्यंत मदत करण्याचें त्यांनीं मला सांगितलें होतें. पण मींच धाडस केलें नाहीं. तात्पर्य काय कीं एकदां आपले म्हटल्यावर आपलेपणानेंच वागावयाचें, यांत शंका, कुशंका, चुगलखोरी ही कधींहि आडवी यावयाची नाहीं, अशी त्यांची स्वभावाची स्वच्छ ठेवण होती. उगीच कीर्तीची हाव नव्हती. फाजील महत्त्वाकांक्षा

नव्हती. निष्ठा म्हणजे निष्ठा व त्याकरितां त्याग करण्याची तयारी हाच त्यांचा बाणा.

## निंदेचा अभाव

पुढें होमरूलची चळवळ सुरू झाली, त्याचवेळीं पुणें येथें माझें सं. धनुर्भंग हें नाटक रंगभूमीवर चालू होतें. दे. दा. वि. गोखले हे मुंबईंत असतांना परिचयाचे असल्यामुळें कै. टिळक, केळकर, परांजपे, वैद्य व काकासाहेब सदर नाटकाचे प्रयोग पाहण्यास येण्याचा योग आला. पुढें अथणी येथें भरलेल्या बेळगांव जिल्हा परिषदेला काकासाहेबच अध्यक्ष होते. तेथेंच माझें पहिलें भाषण त्यांनीं ऐकलें. पुढें मुंबई, दादर वगैरे अनेक ठिकाणीं ते अध्यक्ष व मी व्याख्याता आणि मी अध्यक्ष तर काकासाहेब व्याख्याते असे योग आले. पण ह्या कोणत्याहि प्रसंगीं ते प्रसन्न असत. मी वयानें व विद्वत्तेनें लहान म्हणून त्यांनीं मला निरुत्साही बनविलें नाहीं. केसरीला बातमीपत्रें व कांहीं लेख लिहून पाठविण्याचा उद्योग त्यांच्याच परिचयामुळें आरंभीं आरंभी तरी म्हणजे १९०७–०८ व ९ सालांत झाला. पुढें तर मी तेथें सर्वांच्याच परिचयाचा झालों.

कै. टिळक जिवंत असेपर्यंत राजकीय मतभेदांचे वारे टिळक पक्षांत नव्हते. तथापि सुरत काँग्रेस झाल्यानंतर केळकर–परांजपे, केळकर–खाडिलकर असे वाद आहेत असे पुण्यांत इतरांकडून कानावर येई. केळकरांशीं १९१६ पूर्वी फारसा परिचय नव्हता; पण काकासाहेब स्वतः, वा कै. परांजपे स्वतः विषय निघाला तरी चुकूनहि अवाक्षर केळकरांच्या विरुद्ध बोलल्याचें मला आठवत नाहीं. पुढें टिळकांनंतर हे मतभेद नानात्हेनें तीव्र झाले; तरी केळकरांविरुद्ध खाडिलकर व खाडिलकरांविरुद्ध केळकर चकार शब्द बोलल्याचें मला आठवत नाहीं. ह्यामुळें माझी एक समजूत अशी झाली कीं, प्रत्येकाच्या निःसीम मित्रांनीं व अनुयायांनीं आपसांत बोलाचाली करून

वा एकाचे दुसऱ्याला कांहींहि सांगून व्यक्तिद्वेषाचें ठिगळ मोठें केलें असावें, आणि टिळकांसारखा उभयतांचाहि आधार गेल्यामुळें टिळकांची ही एक महाराष्ट्रांतील शक्ति विभागली गेली असली तर नवल नाहीं. पुढें असें होऊं नये म्हणून आज हा दाखला दिला.

## निंदा व स्तुति कलाग्रहणास वावडी

'नाटक मंडळ्या, नट व नाटककार' परिचयाचे होऊं लागले, बैठकी रंगूं लागल्या. कोल्हटकर संप्रदाय, खाडिलकर संप्रदाय व गडकरी संप्रदाय असे कलह नाटक मंडळ्यांत, नटांत, नाटककारांत असल्याचें कानीं येऊं लागलें. कै. तात्यासाहेब कोल्हटकर माझ्या पूर्व परिचयाचे व त्यांच्याविषयीं मला आदर. परंतु नाटककार म्हणून खाडिलकर संप्रदायाचा मी विशेष अभिमानी, आणि हा अभिमान अगदीच तरुणपणांतला असल्यामुळें खाडिलकर–विरोध व निंदा कोठें झाल्यास मला सहन होईना. ह्याकरितां एका मोठ्या नाटक कंपनींतील मोठ्या नामवंत नटाशीं माझें भांडण झालें. त्याला उचलून फेकण्याच्या बेतांत मी आलों. वीर वामनराव जवळच असल्यामुळें त्यांनीं मला आवरलें व मप्प केलें. पण डोकें संतापानें व वादानें भडकलेंच होतें.

इतक्यांत तेथें काकासाहेब आले व ते आसनस्थ झाले. थोडी शांतता झाली. पण तेथें बसलेल्या मंडळींत विषय धुमसतच होता. एकानें त्यांतील बाजू मांडावयास शांततेनेंच सुरवात केली. मींहि लागलीच आपली बाजू मांडावयास सुरवात केली. अर्थात्च त्यांत तात्यासाहेब कोल्हटकरांची थोडी निंदा व काकासाहेबांची स्तुति होती. पण काकासाहेब लागलीच उसळले. "हें नाट्यगुणांचें–कलेचें–विवेचन नव्हे; व्यक्तिनिंदा वा स्तुति ही कलाग्रहण करणारास व कलाप्रियास प्रथम त्याज्य असली पाहिजे." हें वाक्य

त्यांनीं इतक्या निश्चयानें उच्चारलें कीं, मी चारीमुंडें चीत झालों, आणि वादाचा संचार माझ्या अंगांतून नष्ट झाला. ही बैठक संपली. काकासाहेब निघून गेले व लागलींच ज्यांच्याशीं वाद झाला होता ते व मी स्नेही झालों. तदनंतर गलिच्छ वाद जेव्हां जेव्हां चाले व जेथें जेथें चाले तेथून मुकाट्यानें चालतें होणें हाच क्रम मीं स्वीकारला. अर्थात् व्यक्तिद्वेष वा मत्सर ह्यापासून काकासाहेब अलिप्त असत हें येथें प्रत्ययास आलें.

## देहत्यागाचे डोहाळे

मी सातारा येथील मराठी पत्रकार परिषदेला १९४८ सालीं अध्यक्ष निवडला गेलों. मुंबईस गेल्यावर प्रथम त्यांच्या दर्शनास गेलों. बेताचें बोलणें व बेताचें लिहिणें चालू आहे असा उपक्रम त्यांनीं सांगितला. जुने सहकारी, जुने गडी, जुने संकटकाल ह्यांची आठवण झाली. स्वातंत्र्य सोहळा पहावयास सांपडला म्हणून आनंदानें गहिंवरले. अणे आले होते व भेटले होते, पण "हिज एक्सलन्सी" अणे भेटले नाहींत असें ते हंसत बोलले. वीर वामनराव, बाबासाहेब खापर्डे, बॅ. रामराव यांचीहि त्यांनीं विचारपूस केली. अर्थात् देहत्यागाचे डोहाळे सुरू आहेत असा भास होई. पण एखादुसरें वर्ष निघून जाईल असेंहि वाटे. शेवटीं एक निःसीम टिळक-भक्त, मातृभूमीला आयुष्य अर्पण केलेला भारताचा एक विद्वान सेवक शरीर झिजवीत असतांना एकाएकीं आपणांस अंतर देऊन गेला!

# 'श्री' कर्ते श्री. न. ग. कमतनूरकर, सांगली.

## अबोल स्वभाव

तसें म्हटलें तर, कै. काकासाहेब खाडिलकर यांच्याबरोबर ज्याला जवळचा म्हणून म्हणतां येईल, असा माझा कधींच संबंध आला नव्हता

हें आधीं सांगून ठेविलें पाहिजे. अघळपघळपणानें त्यांच्याशीं बोलत रहाणें, एक कठीण काम होतें असा माझा तरी अनुभव आहे. अकारण संबंधाच्या गोष्टींची चर्चा अथवा चर्वितचर्वण करीत राहून वेळ घालविण्याचा त्यांना मनापासून कंटाळा असला पाहिजे असा मीं अंदाज मनाशीं घट्ट करून ठेविला होता. ते बोलत तें नेमकें व अवश्य तेव्हढेंच बोलत. 'संभाषण प्रवीण' म्हणून ख्यात झालेल्या कोणाहि व्यक्तीला परीक्षेसाठीं कै. काकासाहेबांपुढें नेल्यास 'नापासी' टाळतां टाळतां तो खासच मेटाकुटीला आला असता असें अजूनहि मला वाटतें.

कै. काकासाहेब विचारतील तेवढ्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन स्वस्थपणें त्यांच्या पुढच्या प्रश्नाची वाट पाहात रहाण्याचा त्यांच्या भेटींतील क्रम मी शेवटपर्यंत सोडूं शकलों नाहीं. ज्यांना मी बोलतीं करूं शकलों नाहीं, अशीं दोनच माणसें मला आजवर भेटलीं. एक माझे पिताश्री व दुसरे कै. काकासाहेब खाडिलकर! काकासाहेब सांगली हायस्कूलमध्यें विद्यार्थी असतां तेथें माझे तीर्थरूप शिक्षक होते. दोन तीन वर्षें पुढें दिसत असलेल्या शिक्षकाच्या वर्तनक्रमाचा त्या विद्यार्थ्याच्या मनावर अप्रत्यक्षपणें परिणाम होऊन मला प्रत्ययाला आलेलें तें साम्य निर्माण झालेलें होतें का? किं तें साम्य दोघांच्या मूळच्या स्वभावसाधर्म्यामुळें सहजच निर्माण झालेलें होतें? किंत्या काळांतील सर्व सुशिक्षितांची ती पैदा केलेली सामाजिक व्यवहारांतील कला होती? या तिहेरी प्रश्नाचें मला समाधानकारक उत्तर सांपडलें नाहीं!

कै. काकासाहेबांनीं जर मला आपण होऊन जवळ बोलाविलें नसतें, इवा होता तेव्हां त्यांनीं जर एका परीनें ममतेचा हात पाठीवरून फिरविल्याप्रमाणें करून मला धीर दिला नसता, तर त्यांच्या मी आसपास तरी गेलों असतों की नाहीं, त्यांच्या प्रेमळशा अंत:करण–प्रवृत्तीचें मला कधी दर्शन घडलें असतें की नाहीं, याची शंकाच आहे. आश्चर्य असें

कीं, अगदी पहिल्याच भेटींत मला काकासाहेबांचें सद्दर्शन घडलें.

'विद्याहरण' नाटकाच्या निमित्तानें कै. गडकरी यांचेकडून खाडिलकर-नाटयलेखनाकडे पाहण्याची दृष्टि-वाटेल तर दृष्टिकोन म्हणावें,-प्रत्यक्ष भेटीपूर्वी कितीतरी वर्षें मला मिळालेली होती. त्या दृष्टीनें माझ्या सामान्यशा कुवतीप्रमाणें खाडिलकरांच्या सर्व नाटकांचीं तोंवर अनेक पारायणें करून मी त्यांच्या कांहीं नाटकांचा भोक्ता व कांहीचा भक्त होऊन राहिलों होतों.

## श्री नाटकाच्या प्रयोगास काकासाहेब

आपल्या रंगभूमीवर नवीनपणानें आणलेलें नवें कोरें अथवा जुनें नाटक प्रयोगरूपानें एकदां काकासाहेबांच्या दृष्टिखालून घालण्याचा तेव्हांच्या ललित कलादर्शक मंडळीचे मालक कै. बापूराव पेंढारकर यांचा परिपाठ असे. त्याला धरून 'श्री' नाटकाच्या प्रयोगास येण्याचें पेंढारकरांनीं काकासाहेबांना निमंत्रण केलें. त्याकरितां बरोबर चलण्याचा पेंढारकरांचा आग्रह मी जाणुनबुजून डावलला होता. खाडिलकरांपुढें एका नाटकाचा लेखक म्हणून जाण्याची माझी छाती नव्हती.

श्री नाटकाच्या प्रयोगाला ज्या रविवारीं काकासाहेब येण्याचें ठरलें होतें, त्या रविवारीं थिएटरांत हजर तर रहावेंच लागलें. माझ्या बसल्या ठिकाणाहून काकासाहेबांच्या मुद्रेकडे मी एकसारखा पहात होतों. समोर चाललेल्या नाटकाचा जो कांहीं त्यांच्या मनावर परिणाम होत असेल, त्याचा अंदाज लागतो का तें पहाण्यासाठीं मी अत्यंत उत्सुक असल्यानें मी दुरून त्यांच्यावर 'दृष्टि' ठेवून होतों. पहिल्या अंकांतील विनोदी प्रवेशाच्या वेळीं टेबलावर अंथरलेल्या लुगडयाचा खुलासा जेव्हां पात्राकडून दोनदां झाला, तेव्हां काकासाहेबांचा चेहरा जरा कोठें कळेल न कळेल, अशा बेतानें हलल्यासारखा मला वाटला; बाकी अडीच तीन तास चाललेल्या

पहिल्या दोन अंकांच्या अखेरीपर्यंत त्यांच्या मुद्राविभावांत रेसभर फरक पडला असेल तर शपथ! "मोठे नाटककार हे असेच" असें मनांत आलें, तरी मी आंतून गार पडलों होतों त्या 'दृक्प्रत्यया'नें.

## टीकेकडे लक्ष द्यावयाचें कारण नाहीं

दुसऱ्या अंकाचा पडदा पडला; पेंढारकरांच्या बोलावण्यानें काकासाहेब लगेच आंत गेले. मला हायसें वाटलें. माझ्या पाहुण्यांशीं मी प्रेक्षागृहांत, जसें कांहीं झालेंच नाहीं, अशा ढंगानें बोलत बसलों. तेवढ्यांतच मला पेंढारकरांकडून बोलावणें आलें. माझ्या पाहुण्यांच्या दिमतीची सबब सांगून मी तें बोलावणें अंगाबाहेर टाकलें. 'खाडिलकर आंत बसले आहेत; त्यांनीं तुमची दोन तीनदां चौकशी केली, म्हणून बापूंनीं तुम्हाला घेऊन जायला सांगितलें आहे; चला लवकर, नाटकाला उशीर होतोय्" अशा आशयाचा 'हुकूमनामा' मंडळीचे मॅनेजर श्री. ओळसकर यांनीं लगेच माझ्यावर बजाविल्यानें नाइलाजानें मला रंगभूमीच्या आंतील बाजूस जाणें भागच पडलें.

'ललितकले'च्या रंगपटांत कै. काकासाहेबांपुढें जाऊन मीं नमस्कार केला. "कमतनुरकर आले आहेत" असें पेंढारकरांनीं सांगितलें. जवळच असलेल्या खुर्चीकडे हात करून काकासाहेबांनीं मला बसावयास सांगितलें. तरीहि मी उभाच राहिलों. बसावयास मी भीड करतों आहें अशी कल्पना होऊनच कीं काय, किंचित् हंसरा चेहरा करून काकासाहेब म्हणाले 'बसा कीं; आतां भीड धरायचं काय कारण?" त्यांच्या बोलण्यांतील 'आतां' या शब्दाचा अन्वयार्थ काय असेल, त्याचा तर्क बांधतां बांधतां मी खुर्चीच्या एका कोंपऱ्यावर टेंकल्यासारखें केलें. थोड्या वेळानें काकासाहेब आपण होऊन म्हणाले, "छान चाललें आहे" त्यांचा तो अभिप्राय श्री नाटकाच्या प्रयोगाला उद्देशून होता कीं, नाटकाबद्दल होता, याचा अंदाज मला लागेना.

"टीकेची झोड उठली आहे पण; कमतनूरकर त्यामुळें पुष्कळच रंजिस झाले आहेत" असे पेंढारकरांनीं सुचविलें. त्यावर ते म्हणाले, "ऐकतों आहें मी; मुख्य आक्षेप आहे काय टीकांत?" "एकच प्याल्याची नुसती नक्कल आहे, असा साऱ्यांचा सूर आहे." असें पेंढारकरांनीं सांगितलें. लगेच त्यावर काकासाहेब म्हणाले "मला आतांपर्यंत तसें फारसें वाटलें नाहीं. क्लब सीन्समुळें तसा भास होतो खरा; पण ती कांहीं नाटकाची ठेवण नव्हे; ते वाटेल तर काढून टाकावेत. व्यसनीपणाची ही अगदीं निराळी बाजू आहे. एकच प्याल्यांत व्यसनाच्या दुष्परिणामांचा ऊहापोह अधिक आहे. या नाटकांत सारी ॲक्शन आहे; व्यसन हें नुसतें कारण दिसतें यांत. ही एक सुसंगत गोष्ट आहे; ऊहापोहाला जागाच राहिलेली नाहीं. एका नादावलेल्या माणसाचे सारे सोहाळे असे तेवढे दाखविलेले आहेत."

"पण दोनहि नाटकांचे नायक या ना त्या व्यसनांत वाया गेले आहेत. त्यांच्या वायकांचे हाल हाल झालेले आहेत. हा सारखेपणा आहे ना?" हंसत पेंढारकर मध्येंच म्हणाले.

"असें आहे होय! मग आपण तिकडे लक्ष द्यायचें कारण नाहीं. दोन हात, दोन पाय आहेत, म्हणून एक माणूस दुसऱ्याची नक्कल आहे असें म्हणून कसें चालेल? त्याचे तोंडावळे कसे आहेत, स्वभावांत फरक आहे कीं नाहीं, हेंच आपण तुलना करतांना पहातों कीं नाहीं," काकासाहेबांनीं पेंढारकरांना उत्तर दिलें.

"मला तें माहीत आहे, आणि ठळक व उघड फरक आहेत म्हणूनच आम्हीं हें नाटक पसंत केलें. मी यांना रोज तेंच सांगतों पण हे आपले रंजिसच होऊन बसले आहेत" पेंढारकर म्हणाले.

## धीर देऊन साधे केलें

"तुम्हालाच दोन नाटकांत सारखेपणा वाटतो कीं काय?" माझ्याकडे वळून काकासाहेबांनीं विचारलें.

"पण टीकाकारांना तसा सारखेपणा दिसतो आहे ना?" मी जरा कडवटपणानें म्हणालों.

"तिकडे तुम्ही कां लक्ष देतां? आपल्याला जें जसें लिहायचें असेल तें लिहून टाकावें, त्यावर टीका काय काय होतें त्याकडे फारसें लक्षच देऊं नये आपण; नाटकावरच्या टीकांकडे तर नाटककारानें सहसा पाहूंच नये. तुम्हाला नर्व्हस व्हायचें कांहींच कारण नाहीं. नाटक चांगलें झालें आहे' काकासाहेब मला उद्देशून म्हणाले.

मला माझी भीति सोडून पार पळाली. धीरानें छाती भरून गेली, काकासाहेबांबद्दलच्या कृतज्ञतेनें कंठ दाटून आला. मला धीर देऊन 'सावध' करणारे काकासाहेब मला एकदम हिमालय पर्वतासारखे दिसूं लागले आणि अखेरपर्यंत माझी ती कल्पना अबाधितच राहिली.

त्याच्या आदल्या रविवारींच दुसरे एक महान् नाटककार श्री नाटकाच्या प्रयोगाला आलेले असतां इतर वेळेप्रमाणें पुष्कळशा मोकळेपणानें माझ्याशीं बोलल्याचें विसरून, माझ्याशीं बोलणें राहोच पण नुसतें पाहण्याचेंहि त्यांनीं टाळलेलें होतें. त्या महाभागांच्या त्या वर्तनाच्या पार्श्वभूमीवर काकासाहेबांच्या पहिल्या भेटींतील घडलेल्या प्रसंगाचें चित्र जितकें उठावदार तितकेंच हृदयंगम असल्यानें त्या चित्राकडे अधून मधून मी एकसारखा पहात आलों आहें. त्यामुळें त्यांचे सारे रागरंग माझ्या मनापुढें नेहमींच काल चितारल्याप्रमाणें आजहि ताजे आणि तेजाळ आहेत.

काकासाहेबांच्या त्या भेटीनंतर आतांपर्यंत माझ्या लिखाणावर झालेल्या भल्याबुऱ्या कसल्याहि टीकेचा माझ्या मनावर जराहि परिणाम झालेला नाहीं; पुढें होईलसें वाटत नाहीं. लिहितांना हवा असलेला मनाचा मोकळेपणा मला काकासाहेबांच्या प्रसादानें प्राप्त झालेला आहे.

सन १९२७ पासून पुढें सहा सात वर्षांत कै. काकासाहेबांच्या भेटीचे

सुयोग थोडेसेच आले. सिंहापुढें जाऊन जाऊन निर्ढावलेल्या इसापनीतींतील कोल्ह्याच्या धिटाईनें मी त्यांच्यापुढें जाऊं लागलों होतों त्या दरम्यानच्या काळांत. परन्तु त्या भेटी अगदीं व्यावहारिक स्वरूपाच्या घडल्या. " काय, केव्हां आला ? " " कसं काय ठीक आहे ना ? " असल्या कुशल प्रश्नांपुढें कधीं केव्हां मजल त्यांनीं नेलीच नाहीं. त्यांतील एक दोन आठवणी सुस्मरणीय असल्या तरी तशा महत्त्वाच्या नाहींत.

## नारद ही व्यक्ती नसून विचारवंतांची संस्था

" स्त्री–पुरुष " नाटकाच्या एका प्रयोगाला कै. काकासाहेब आले असतां त्यांनीं मला बोलावून घेतलें. पुराणांतील नारदाची नारदी झाली व तिच्या पोटीं साठ संवत्सरें जन्माला आलीं, ह्या कथेचा काडी-जुडीइतपतच आधार घेऊन तें नाटक लिहिलेलें आहे, आणि तसें म्हटलें-पाहिलें-वाचलें तर तें एक हास्यरसासाठीं प्रकृतीविशेषांवर भर देऊन लिहिलेलें नाटक आहे. तो त्याचा विशेष लक्षांत घेऊन, आपल्या भूमिकेच्या ' प्रकृती 'चा शक्य तितका आविष्कार करण्याची जबाबदारी जाणण्याइतकी बुद्धि असलेलीं पात्रें न लाभल्यामुळें त्या नाटकाचे व्हावे तसे प्रयोग तेव्हां होत नव्हते. नारदाची भूमिका मात्र दिवंगत दिनकर कामण्णा यांनीं पुष्कळशा चलाखीनें केली. नाटकांतील नायक नारद आणि त्याच भूमिकेबद्दल मला कांहीं सांगण्यासाठीं काकांसाहेबांनीं मला बोलावून घेतलें होतें, असें लगेच मला कळून आलें.

" नारद ही एकच एक व्यक्ति होऊन गेली असें मानणें चूक आहे. ती चूक तूं एकट्यानेंच केली आहेस, असें नाहीं. हरिदास–पुराणिकांच्या मोठ्या वर्गानें त्या चुकीवर आपल्या बुद्धीनें भलभलतीं आजवर पुटांवर पुटें चढविलीं, आणि नारद ही एकच व्यक्ति कल्पून ती एक उपद्व्यापी–

कळलावी–थिल्लर अशी पुराणांतील कॅरेक्टर असा लोकांना समज पक्का करून ठेविला आहे. परंतु अनेक पुराणांत आढळणारी नारद ही व्यक्ति एकच, असें म्हणतां येतच नाहीं. एखाद्या नव्या घटनेसाठीं कर्तृत्ववान लोकांना विचार करावयास लावून त्या घटनेच्या पूर्ततेसाठीं अवश्य ती चालना देणारी, ती एक पिढ्यान् पिढ्या चालत आलेली, लोकहिताबद्दल दक्ष राहून लोकजागृतीसाठीं झटणारी, विचारवंतांची संस्था होती. अथवा लोकांच्या हिताला सहाय्यकारक होणारे, प्रगतीला कारण होणारे प्रेरक असे जे मूलविचार त्या त्या काळांतील विचारवंत ऋषीमुनींच्या अंतःकरणांत स्फुरत, त्या त्या विचारांचें (मूर्तिकरण) परसॉनिफिकेशन म्हणजे नारद, असें मानणें व समजून घेणेंच प्राप्त आहे. या दृष्टीनें तुम्ही नारदाकडे पहावयास पाहिजे होतें " अशा आशयाचें सांगून त्यांनीं तिकडे रंगभूमीवर प्रयोग चालू असतांनाच आंतल्या बाजूस माझी कानउघाडणी केली.

त्या कानउघाडणीनें माझी दृष्टि एकदम साफ झाली, मेंदूला मुंग्या येताहेतसें वाटलें ! तरीपण मनाला समाधान वाटलें कीं, काकासाहेबांसारख्या महान अधिकारी व्यक्तीनें कांहीं तरी उपकारक असें माझ्या पदरांत टाकिलें आणि 'पुढची ती खरी' वाट कोणती तें मला दाखवून दिलें. तें ऋण जन्मभर डोक्यावर वाहण्यांत मला भूषण आहे !

स्त्री–पुरुष नाटकांतील माझी चूक मला त्यांनीं दाखवून दिली, म्हणून एकीकडे माझें मन 'खूष' होतें, तरी दुसरीकडे तें खट्टू झालेंच होतें. त्या खट्टूपणाच्या छाया अर्थातच माझ्या मुद्रेवर तेव्हां उमटलेल्या काकासाहेबांच्या नजरेस आल्या असाव्यात. "तुमच्याकडून अशी चूक झाली म्हणून मी नाहीं तुम्हांला हें सांगितलें; पुढें तसें होऊं नये, म्हणून मी तुमच्या जवळ हें बोललों. एकदां तुम्ही पत्करलेली ठेवण मान्य केली कीं, तुमचें नाटक छान साधलें आहे, हें दिसतेंच. पण हें आमचें पौराणिक नाटक नव्हे:

इंग्रजी दृष्टीनें पाहून आणि इंग्रजी मनानें विचार करून लिहिलेलें एक मजेदार नाटक असें म्हणायला मुळींच हरकत नाहीं." जवळ जवळ असेंच–माझा खट्टूपणा घालविण्यासाठीं असावें–काकासाहेब म्हणाले.

त्या माझ्या नाटकावरून माझ्या मनावर व विचारसरणीवर इंग्रजी वाङ्मयाची पकड असून मी संस्कृत वाङ्मयाला पारखा आहें, हें आपलें निदान काकासाहेबांनीं दुसरीकडे पुढें एक दोन दिवसांतच बोलून दाखविल्याचें मला एका खात्रीलायक व्यक्तीकडून समजलें. "काकासाहेबांनीं दुसऱ्यांच्या नाटकांबद्दल आपलें मत–नी आपण होऊन बोलून दाखविल्याचें–माझ्या अनुभवाचें हें तुमच्या नाटकाचें पहिलेंच उदाहरण" असें त्या गृहस्थांनीं सांगून सकौतुक आश्चर्य व्यक्त केलें. अर्थात, प्रत्यक्ष नाटकाबद्दल ते कांहीं त्या प्रसंगीं बोलले कीं काय, तें जाणण्याबद्दल मी उत्सुक होतोंच. विचारतां त्या गृहस्थांनीं जें मला सांगितलें तें, 'नाटक' म्हणून पाहतां त्याबद्दलचें काकासाहेबांनीं जें आपलें मत मला सांगितलें होतें त्याशीं तंतोतंपणें जमणारें होतें. तें ऐकून माझ्या मनाला खूप धीटपणा आला. त्या नाटकाबद्दल 'हम् भी कोई हय्' या आत्मनिष्ठेच्या फुक्या अभिमानाच्या ताठ्यानें एक दोन टीकाकारांनीं प्रसंगीं अप्रसंगीं, तुच्छतेनें व कुचेष्टेनें आधीं आणि नंतर टाकलेख लिहिले. तेव्हां "अभी जाव जी; चाहे इतना भूको," असें, काकासाहेबांच्या तत्संबंधींच्या मताच्या आधारानें बळकट बनलेलें माझें मन म्हणालें, आणि त्या टीकालेखांकडे ज्या दृष्टीनें पहाणें योग्य, ती दृष्टि मला आयतीच प्राप्त झाली.

तोंडावर एक आणि मागें अगदीं निराळें, असली "साहित्यिक संभावितगिरी" कै. काकासाहेबांना कशी साधणार! ते साहित्यिक थोडेच होते? ते एक थोर स्वयंसिद्ध उदात्त विचारांचे आणि उदार मनाचे नाटककार होते

धीरासाठीं पाठीवर थाप देऊन, प्रोत्साहनपर उद्‌गारांनीं माझ्यासारख्या सामान्य माणसालाहि "आगे बढो" असा आदेश देणारे ते खरेखरे नाट्यचार्य होते. त्या नाट्याचार्यांच्या नुसत्या दर्शनाचा जरी लाभ झाला, तरी मला असाधारण समाधान वाटत असे.

# 'नंदकुमार' कर्ते, श्री. वि. सी. गुर्जर, कशेळी

## अन्नदाता सुखी भव

केवळ कै. काकासाहेबांच्या कृपेमुळें, 'नवाकाळ' जवळ जवळ आपल्या जन्मापासूनच आज पंचवीस वर्षें मजकडे येत आहे. त्याचा मला इतका विलक्षण लळा लागला आहे, कीं रविवारीं येथें पोस्टाची डिलिव्हरी नसल्यामुळें, माझ्या घरापासून दीड मैल असलेल्या पोस्ट ऑफिसमध्यें स्वतः जाऊन मी 'नवाकाळ' अंक घेऊन येतों. या नित्याच्या रिवाजाप्रमाणें ता. २९ आगस्ट १९४८ रोजीं सायंकाळीं मी पोस्टांत गेलों. अंकहि वेळेवर आला आणि मिळाला. तो तेथेंच उघडून पहातों, तों आंत काकासाहेबांच्या आकस्मिक निधनाची अत्यंत शोकजनक वार्ता! ती वाचून मी अगदीं सुन्न होऊन गेलों!

काकासाहेब माझे अन्नदाते आंहेत. माझ्या आणि त्यांच्या वयांत तेरा चौदा वर्षांचेंच अंतर असल्यामुळें, त्यांना फारतर मला वडील म्हणतां येणार नाहीं. पण ज्यांनीं मला अन्नाला लावून कायमचे डोंगराएवढें उपकार करून ठेवले आहेत, असे ते माझे वडील बंधु खास होते. आणि 'ज्येष्ठो भ्राता पितुः समानः' या नात्यानें काकासाहेबांना वडिलांचें आसनच देणें मला उचित आहे.

१९१९-२० सालीं गंधर्व मंडळीनें मजकडून मुद्दाम आग्रहानें 'नंदकुमार' नाटक लिहून घेतलें. कै. काकासाहेबांसारख्या सर्वश्रेष्ठ

नाटककारांचीं उत्कृष्ट, वाङ्मयाला आणि रंगभूमीलाहि भूषणभूत नाटकें ज्या रंगभूमीवर चमकत होतीं, त्याच रंगभूमीवर माझ्यासारख्या नव्याच लेखकाची कृति येण्याची मी महत्त्वाकांक्षा बाळगावी, हा मोठा अन्याय होता. परंतु तशी महत्त्वाकांक्षा मी बाळगली नसतांहि, मंडळीचे मालक श्री. नारायणराव राजहंस व श्री. गणपतराव बोडस यांनीं अत्यंत आग्रहानें तें नाटक मजकडून लिहून घेतलें होतें. याला कारण बहुधा 'एकच प्याला' मधलीं माझीं अत्यंत यशस्वी पदें, हेंहि असेल. परंतु पुढें निरनिराळ्या कारवाया आणि कारणें होऊन माझें नाटक वारगळणार, अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. माझें अतिशय नुकसान त्यामुळें होणार होतें. या कारवायांत अनेक मोठाल्या व्यक्तींचाहि हात होता. तूर्त त्या इतिहासाशीं आपणाला कर्तव्य नाहीं. भयंकर निराशेच्या आणि नाउमेदीच्या स्थितींत मी त्यावेळीं काकासाहेबांना सर्व हकीकत निवेदन केली. होत असलेल्या भयंकर अन्यायाचें परिमार्जन कोणी करूं शकेल तर ते काका-साहेबच, असा माझा पूर्ण भरंवसा होता. त्यांच्या परम उदार, तत्त्वनिष्ठ, अन्यायाची चीड असणाऱ्या करारी स्वभावाची मला पूर्ण माहिती होती. माझे परम मित्र कै. राम गणेश गडकरी यांनीं स्वानुभवावरून मला ती यथार्थ कल्पना दिली होती. माझ्या तक्रारींचा काकासाहेबांच्या मनावर योग्य परिणाम झाला. नाटककार कितीहि नवीन असेना, तो आपला बंधु, संकटकालीं त्याला हात देणें हें आपलें अवश्य कर्तव्य, या तत्त्वावर त्यांची परम निष्ठा होती. माझ्यासाठीं अपूर्व स्वार्थत्यागाचीहि तयारी दाखवून मजवर होणारा अन्याय त्यांनीं दूर केला. 'गुर्जरांचें घेतलेलें नाटक–वचन दिल्याप्रमाणें तुम्ही करीत नसाल, तर माझें 'द्रौपदी' नाटक मी तुम्हाला देणार नाहीं,' असें काकासाहेबांनीं नारायणरावांना खडखडीत बजावलें; आणि तो त्याग माझ्यासारख्या एका नव्या नाटककारासाठीं करण्याची

तयारी काकासाहेबांनीं दाखविली. आपल्या या उपकारांचा उल्लेख त्यांनीं चुकूनहि कुणाशीं कधीं केला नाहीं. काकासाहेबांनीं घातलेल्या जरबेचा योग्य परिणाम होऊन माझें नाटक रंगभूमीवर आलें. मोनापलीचा व पुस्तकांचा बराच पैसा मला मिळाला आणि त्यावरच माझा संसार चांगल्या रीतीनें चालून मी आज सुखानें आणि शांततेनें दोन घांस खात आहें.

काकासाहेब माझे अन्नदाते आहेत. 'अन्नदाता सुखी भव' असें मी कृतज्ञतापूर्वक दर भोजनाच्या वेळीं म्हणतों, तें खात्रीनें त्यांना पोंचत असेल.

## श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, नागपूर

### अनिर्वचनीय ऋण

कै. काकासाहेब खाडिलकर यांच्याशीं माझा प्रत्यक्ष निकट संबंध कधींहि आला नाहीं. त्या दृष्टीनें त्यांच्या आठवणी लिहिण्याचा अधिकार मला नाहीं, असेंच खरोखरीं म्हटलें पाहिजे.

पण आठवणींचा हेतु मुख्यतः ऋणनिर्देश हाच असतो. निदान मी तरी या आठवणी वयाच्या तेराव्या वर्षापासून खाडिलकरांपासून घेतलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या स्फूर्तीचें जें अनिर्वचनीय ऋण माझ्या हृदयांत सतत जागृत आहे तें व्यक्त करण्यासाठींच लिहीत आहें.

एकलव्याला द्रोणाचार्यांच्या हातास्वालीं राहून धनुर्विद्येचें शिक्षण घेणें शक्य झालें नाहीं, म्हणून त्यानें आपल्या गुरुची मूर्ति करून मनोमय उपासनेनें धनुर्विद्या संपादन केली. मीं खाडिलकरांपासून जी स्फूर्ति आणि विद्या घेतली ती याच पद्धतीनें घेतली, असें म्हणतां येईल.

### ऐकलेल्या पहिल्या भाषणाचा परिणाम

खाडिलकरांचें पहिलें भाषण मीं १९१६ च्या लखनौ काँग्रेसनंतर मुंबईस

हिराबागेंत ऐकलें; त्या दिवशीं त्यांच्या कठोर पण आकर्षक व्यक्तित्वाचा जो ठसा माझ्या मनावर उमटला तो उत्तरोत्तर उजळतच गेला.

मला आतां नक्की आठवत नाहीं—पण डॉ. सान्ये आणि डॉ. वेलकर यांनीं चालविलेल्या नॅशनल युनियनतर्फे लखनौ काँग्रेसचा संदेश सांगण्यासाठीं कै. अच्युतराव कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेंतील खाडिलकरांचें तें भाषण असावें. सभागृह अगदीं काठोकाठ भरलेलें होतें. प्रथम 'साहेबां' चें प्रास्ताविक भाषण झालें. तें दणदणीत आणि विनोदी होतें. त्यानंतर खाडिलकर उठले. भाषणाची सुरवात कांहीं बरी वाटली नाहीं;—प्रथम रेंगाळत रेंगाळत बोलताहेत, असा भास झाला; पण लखनौ काँग्रेसमधील सुरतेच्या दुफळीनंतर प्रथमच काँग्रेसमध्यें परत आलेल्या लोकमान्यांच्या अपूर्व स्वागताचें वर्णन करावयाला त्यांनीं प्रारंभ केला मात्र, त्यांच्या वक्तृत्वांतील नाट्याच्या साऱ्या तेजस्वी छटा लखलखत प्रकट झाल्या. आवाजाचा चढउतार, सूचक मुद्राभिनय आणि प्रसंगाचें चित्र हुबेहुब डोळ्यांपुढें उभें करण्याची हातोटी या गुणांमुळें त्यांनीं श्रोत्यांना अगदीं मुग्ध करून सोडलें. टिळकांप्रमाणेंच डॉ. ॲनी बेझंट यांचें वर्णनहि त्यांनीं बहारीचें केलें. तें व्याख्यान ऐकून आम्ही परतलों, ते जगु भारलेल्या मनानें.

त्यानंतर मुंबईच्या व्यासपीठावर त्यांचीं अनेक व्याख्यानें मीं ऐकलीं. आवेशपूर्ण वक्तृत्वाच्या दृष्टीनें कदाचित् तीं अधिक सरस असतील; पण त्या पहिल्या भाषणाचा माझ्या मनावरील परिणाम अवर्णनीय म्हटला पाहिजे.

## कोल्हटकर आणि खाडिलकर

खाडिलकरांविषयीं ज्या थोड्याशा गोष्टी आणि गप्पा मीं ऐकल्या, त्या माझें गुरु कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या सान्निध्यांत असतांना.

विचारप्रणालीच्या दृष्टीनें कोल्हटकर आणि खाडिलकर हे दोघे अगदीं उत्तर–दक्षिण ध्रुवांसारखे दोन भिन्न टोकांना उभें होते, व दोघांची सार्वजनिक जीवनांतील कुलपरंपराहि अगदीं भिन्न होती. वाङ्मयदृष्ट्या विचार केला, तरीहि कोल्हटकर हे बुद्धिवादी आणि कलोपासक साहित्यपंडित, तर खाडिलकर हे अध्यात्मवादी आणि तत्त्वोपासक युयुत्सु. कोल्हटकर हे कालिदास आणि मोलियर यांचे चहाते, तर खाडिलकर हे भवभूति आणि शेक्सपियर यांचे भक्त. या कारणांमुळें या दोघां समकालीन प्रतिभाशाली नाटककारांच्या नाट्यकृतींतहि बहिरंग आणि अंतरंग या दोन्ही बाबतींत पराकाष्ठेचा फरक दृष्टीस पडतो.

पण, कोल्हटकर आणि खाडिलकर यांच्या दृष्टिकोनांत आणि नाट्य-रचनेंत इतका मूलभूत फरक असतांनासुद्धां कोल्हटकर त्यांच्याविषयीं नेहमीं आदरानेंच बोलत असत. खाडिलकरांचा विनोद त्यांना अगदीं आवडत नसे; व पद्यरचनेविषयींहि ते प्रतिकूलता दर्शवीत असत. तसेंच त्यांच्या वाक्याच्या विशिष्ट घडणीमुळें जे व्याकरणाचें दोष उत्पन्न झाल्यासारखें वाटत त्याबरहि कोल्हटकर टीका करीत असत. इतकेंच नव्हे, तर खाडिलकरांच्या 'सत्वपरीक्षा' आणि 'सवतीमत्सर' या दोन नाटकांची जीं कडक परीक्षणें तत्कालीन नियतकालिकांतून आलीं तीं आपल्याला बरीच समर्पक वाटलीं असल्याचेंहि त्यांनीं बोलून दाखविलें होतें. पण इतका मतभेद, दृष्टिभेद आणि रुचिभेद असतांनासुद्धां नाटककार या नात्यानें खाडिलकरांनीं प्रकट केलेली असामान्य कलाचातुरी आणि संपादन केलेलें अनन्य यश या दोहोंबद्दलहि कोल्हटकरांची वृत्ति नितांत आदराची होती.

## विद्याहरणाची कोल्हटकरांकडून स्तुति

'सवाई माधवरावांचा मृत्यु वगैरे त्यांची पहिलीं पांच गद्य नाटकें–

ज्यांचें स्वतः खाडिलकरांनींच 'पंचशरें गद्यवरें वश जी केली, नाट्यकला कवि कृष्णा माला घाली" असें यथार्थ साभिमान वर्णन केलें आहे– "हे मराठी रंगभूमीचे अत्यंत तेजस्वी अलंकार आहेत," असें तात्यासाहेब कोल्हटकर नेहमीं म्हणत. किंबहुना त्या पांच नाटकांविषयींचा हा त्यांचा ठरलेला गौरवोद्गार होता. संगीत नाटकांपैकीं 'मानापमान' हें त्यांना 'लाइट कॉमेडी' म्हणून आवडत असे; व बायकांच्या बंडानंतर एवढ्या एकाच नाटकांत खाडिलकरांना विनोद चांगला साधला आहे, असेंहि ते पुष्कळदां बोलून दाखवीत. 'विद्याहरणां'तील विनोद त्यांना अगदीं आवडत नसे; व तत्कालीन सुधारक पक्षाचें जें विडंबन 'शिष्यवरा'च्या पात्राच्या रूपानें त्या नाटकांत केलेलें आहे त्याबद्दल तर त्यांना अगदीं राग होता. पण नवलाची गोष्ट अशी कीं, ज्या विद्याहरणाच्या विनोदी बाजूविषयीं त्यांना इतकी अरुचि आणि अप्रीति वाटत असे, तें 'विद्याहरण' नाटक काव्यदृष्टया श्रेष्ठ असून, कोणाच्याहि मृत्यूचा प्रसंग येऊं न देतां, केवळ प्रणय आणि ध्येयनिष्ठा यांच्या संघर्षांतून उत्पन्न झालेल्या विदारक विफलतेमुळें ज्या करुण, गंभीर, उदात्त वातावरणांत नाटकाचें पर्यवसान होतें, त्यामुळें या नाटकाला "आधुनिक पद्धतीची उत्कृष्ट ट्रॅजेडी" म्हणतां येईल असा अभिप्राय ते नेहमीं देत. 'विद्याहरणा'ची ही स्तुति मीं त्यांच्या तोंडून अनेकदां ऐकलेलीं आहे.

## कोल्हटकरांच्या नाटकांचा खाडिलकरांवरील परिणाम

कै. तात्यासाहेब कोल्हटकरांचें आगलीनहि एक विधान मीं कोल्हटकरांच्या तोंडून अनेकदां ऐकलेलें आहे, व तेंहि अगदीं प्रांजलपणानें नमूद करीत आहें. विशेषतः त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या दोन वर्षांत त्यांच्या चरित्रलेखनासाठीं त्यांच्या वाङ्मयासंबंधीं जीं टिपणें मीं त्यांच्याकडून

तयार करवून घेतलीं, त्यांतील मजकूर सांगत असतांना त्यांनीं वारंवार असें एक विधान केलेलें होतें कीं, "खाडिलकरांच्या संगीत नाटकांवर 'वीरतनय' 'मूकनायक' 'मतिविकार' आणि 'प्रेमशोधन' या माझ्या नाटकांचा परिणाम झालेला आहे." हें विधान विशद करण्यासाठीं त्यांनीं कांहीं समान स्थळें आणि चाली यांचा निर्देशहि त्या टिपणांत केलेला होता. इतकेंच नव्हे तर 'प्रेमशोधन' नाटकाच्या तालमी घेतांना खाडिलकरांना जी संगीत रंगभूमीची दृष्टि आली, ती 'मानापमान'च्या यशाला बऱ्याच अंशांनीं कारण झाली असेंहि विधान त्यांनीं केलेलें होतें. अर्थात् हें विधान करतांना 'प्रेमशोधन' नाटक खाडिलकरांनीं बसविल्यामुळें प्रभावी आणि यशस्वी होऊं शकलें, असे कृतज्ञतेचे उद्गारहि त्यानीं काढले होते. गांधीवधानंतर ता. २ फेब्रुवारी १९४८ रोजीं नागपूर येथें झालेल्या जाळपोळींत हीं टिपणें नष्ट होऊन गेलीं. तथापि त्यांतील हीं मुद्यांचीं विधानें मी मुद्दाम या आठवणींत देत आहें. उद्देश एवढाच कीं, टीकाकारांनीं या दोन थोर समकालीन नाटककारांच्या कृतींचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांचा परस्परावर काय परिणाम झाला, याचा शोध घ्यावा.

## कोल्हटकरांनीं अनुभवलेलें तालमीचें कौशल्य

'प्रेमशोधना'च्या खाडिलकरांनीं घेतलेल्या तालमींसंबंधीं कृतज्ञता व्यक्त करतांना कै. तात्यासाहेब कोल्हटकर आणखीहि एक विधान करीत असत. तें असें कीं, तालीममास्तर म्हणून कै. गोविंदराव देवल हे नटवर्गाचे फार आवडते होते. कारण, ते नटांशीं समरस होऊन तालमी घेत, व ज्या नाटकांच्या तालमी ते घेत, तीं नाटकें सामान्यतः व्यावहारिक वातावरणांतलीं असल्यामुळें त्यांतील घरगुती स्वरूपाचे संवाद देवल फार चांगले बसवीत. पण नाटकांतील वातावरण, प्रसंग आणि संवाद हे जर उच्च दर्जाचे असले,

तर मात्र देवलांना तें नाटक बसविणें साधत नसे. खाडिलकर हे नटांपेक्षां नाटक आणि नाटयवस्तु यांच्याशीं समरस होऊन तालमी घेत. त्यामुळें नाटकांतील भूमिका आणि संवाद यांचें मर्म नटांच्या मनावर बिंबवावयास त्यांना अतिशय कष्ट पडत, व सामान्य नटांना तर त्यांची तालीम नकोशी वाटे. नाटक जितकें उच्च दर्जाचें, तितकी खाडिलकरांची तालीम उत्तम. 'प्रेमशोधना'च्या वेळीं त्यांच्या कौशल्याचा अनुभव मला आला. बालगंधर्व आणि जोगळेकर यांना प्रथम 'प्रेमशोधना'नें नट म्हणून पुढें आणले; व नंतर 'मानापमान'नें लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन बसविलें. खाडिलकरांनीं आपल्या बाणेदार वर्तनानें नाटककारांचा दर्जा आणि नाटकांचा मोबदला हीं दोन्हीं वाढविलीं यांत शंका नाहीं

## खाडिलकरांकडून कोल्हटकरांचा गुणगौरव

खाडिलकरांविषयीं कोल्हटकरांनीं कृतज्ञतेचे उद्गार काढण्याचा शेवटला प्रसंग मी महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या नागपूर येथील अधिवेशनाच्या वेळीं पाहिला. कोल्हटकर त्यावेळीं शरीरानें आणि मनानेंहि पंगु झालेले होते. शरीर क्षीण, दृष्टि अधु, वाणी विकल आणि स्मृति दुर्बल झालेली. तरी तशाहि स्थितींत ते संमेलनाच्या उद्घाटनाला हजर राहिले. ते व्यास-पीठावर हळुहळु आले, त्यावेळीं खाडिलकरांनीं स्वतः उठून त्यांचें स्वागत केलें; व आपल्या भाषणाच्या प्रारंभीं त्यांनीं कोल्हटकरांचा अत्यंत गौरवपूर्ण शब्दांनीं उल्लेख केला. दुसऱ्या दिवशीं स्वतः कोल्हटकरांनींच या प्रसंगाचें वर्णन मजजवळ केलें. तें वर्णन करीत असतांना त्यांच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रु आले, त्यापेक्षां अधिक मोलाचा कोणता करभार खाडिलकरांना त्यांच्या समकालीन तुल्यगुण नाटककार देऊं शकेल ?

## खाडिलकरांच्या नाट्यगुणांचें केळकरांकडून एका शब्दांत वर्णन

कै. ता यासाहेब केळकर यांच्याहि तोंडून कै. काकासाहेब खाडिलकर

यांच्याविषयीं उद्‌गार ऐकल्याचे प्रसंग तीन वेळां आले. पहिला प्रसंग १९२२ च्या ऑक्टोबरमधला. बडोदें येथील साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणाची पूर्वतयारी चालू असतां त्यांनीं मला एक दिवस दुपारीं भोजनोत्तर शतपावली करतां करतां अचानक विचारलें, "खाडिलकरांच्या नाटकांचा आत्मीय गुण कोणता हें जर तुम्हाला एका शब्दांत वर्णन करावयास सांगितलें, तर तुम्हीं काय उत्तर द्याल?" तो अनपेक्षित प्रश्न ऐकून मी बुचकळ्यांत पडलों. तेव्हां ते फेऱ्या घालतां घालतां एकदम मजकडे वळून हंसत हंसत म्हणाले, "कां? नाहीं सुचत? तुम्ही तर खाडिलकरांचे मोठे भक्त आहांत! आपल्या उपास्य दैवताचें वर्णन जो एका शब्दांत ठसठशीतपणें करूं शकत नाहीं, तो भक्त कसला?" त्यावर मीं म्हटलें, "एका शब्दांत वर्णन करण्याची अट घालून आपण मला पेंचांत घातलें आहे!" "पेच कसला आला आहे हो त्यांत? मर्म हें केव्हांहि एका शब्दांतच व्यक्त करतां आलें पाहिजे. Brevity is the soul of wit!-" ते हंसत हंसत उद्‌गारले; तोंच मी म्हणालो, "वीररस हा खाडिलकरांच्या नाटकांचा प्रधान गुण आहे."

## मुख्य गुण ओज

माझें हें विधान ऐकतांच ते एकदम थबकले आणि आपली भेदक नजर मजवर रोखून म्हणाले, "तुमचा नेम थोडक्यांत चुकला. मी 'रस' विचारला नाहीं, आत्मीय 'गुण' विचारला. तुमच्या म्हणण्याप्रमाणें खाडिलकरांच्या नाटकांचा प्रधानगुण जर वीररस आहे असें मानलें, तर 'मानापमान' 'विद्याहरण' आणि 'स्वयंवर' यांच्यांतील प्रधानरस कोणता आहे, असें तुम्हीं सांगाल?" त्यांच्या या प्रतिप्रश्नानें मी अधिकच बुचकळ्यांत पडलों; व त्यांना नम्रतेनें म्हणालों, "मला 'रस' आणि 'गुण'

यांच्यांतील फरक समजला नाहीं. जें सुचलें, तें मी बोललों. आतां आपणच सांगा, खाडिलकरांच्या नाटकाचा मुख्य 'गुण' कोणता तें." त्यावर ते चटकन् म्हणाले, "त्यांच्या साऱ्या नाटकांचा मुख्य गुण 'ओज' हा आहे. त्यांचे शृंगार आणि करुण हे रससुद्धां ओजगुणान्वित असतात; व त्यामुळें त्या रसांभोंवतीं एक प्रकारचें उदात्त वातावरण उत्पन्न होतें. मोहना, पद्मावती, भामिनी, देवयानी आणि रुक्मिणी या त्यांच्या नायिकांचे प्रणय-संवाद पहा, त्यांत शृंगारापेक्षां ओजच अधिक दिसेल. कोल्हटकरांच्या नाटकांतील प्रणयप्रसंगांत किंवा प्रणयसंवादांत नुसत्या शृंगाराची लज्जत भरलेली असते. ते प्रसंग पहातांना दुसरी कोणतीहि भावना मनांत येत नाहीं. पण खाडिलकरांचा शृंगार हा सुद्धां नुसता शृंगार नसतो. त्यांच्या मनोधर्मानुसार त्यांच्या नाटकांतील प्रणयभावना देखील ओजस्वी रूप धारण करून प्रकट होते. त्यांच्या करुण रसाचेंहि असेंच आहे. शुक्राचार्य, भीष्मक, हरिश्चंद्र, तारामती वगैरेंचीं करुणपूर्ण भाषणें हीं मनांत अनुकंपा उत्पन्न करण्याऐवजीं त्यांतील ओजस्वितेमुळें गंभीर भावना उत्पन्न करतात."

## रंगभूमीचें तीव्र 'सेन्स'

खाडिलकरांचा विनोद आणि पदें हीं दोनहि त्यांना अगदीं आवडत नसत; व संवादांची भाषाहि खडबडींत आणि क्लिष्ट आहे असें ते म्हणत असत. पण, 'मेनका' नाटकावरील चर्चेच्या अनुषंगानें ही सारी प्रतिकूल टीका करीत असतांनाच त्यांनीं एकदां असे उद्गार काढले होते कीं, "खाडिलकर भाषेच्या सौष्टवापेक्षां शब्दांच्या आघातांकडे जास्त लक्ष देतात. त्यामुळें त्यांचीं जीं वाक्यें नाटक वाचतांना रचनादृष्ट्या सदोष किंवा बोजड वाटतात, तींच वाक्यें रंगभूमीवर ऐकतांना ठसकेदार आणि भेदक वाटतात. त्यांचें रंगभूमीचें 'सेन्स' इतके तीव्र आहे कीं, त्यामुळें

नाटकाच्या चिरकालीन वाङ्मयगुणांकडेहि त्यांचें दुर्लक्ष होतें. खाडिलकर सर्वच बाबतींत हट्टी आणि एककल्ली अहेत. त्यांच्या वर्तमानपत्रांतील लेखनांतसुद्धां बहुश्रुतपणा किंवा सजावट यांच्यापेक्षां वाचकांच्या मनावर एका विशिष्ट विचाराचा किंवा मताचा एकसारखा आघात करीत सुटण्याची त्यांची एककल्ली प्रवृत्ति दृष्टीस पडते. कोल्हटकर, खाडिलकर आणि मी दोन तीन वर्षांच्या अंतरानें टीकाकार, पत्रकार वगैरे नात्यांनीं पुढें आलों. टिळकांनीं खाडिलकरांना जें 'केसरी'च्या स्टाफवर मुद्दाम बोलावून घेतलें तें खरोखरी त्यांचा 'ब्राम्हण आणि त्यांची विद्या' या कै. गोळे यांच्या ग्रंथावरील टीकालेख त्यांना फार आवडला म्हणून ! पण माझ्या माहितीप्रमाणें त्यानंतर कांहीं, खाडिलकरांनीं एकहि टीकालेख लिहिला नाहीं. कोल्हटकरांनीं आणि मी विपुल वाङ्मय लिहिलें. कविता, नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी, टीका, विनोद वगैरे सर्व प्रकारचें वाङ्मय आम्ही लिहिलें. खाडिलकरांनाहि आमच्याप्रमाणें विपुल बहुविध वाङ्मय सहज लिहितां आलें असतें; पण ते अगदीं एककल्ली. नाटकें, केसरी आणि 'चित्रमयजगतां'तील युद्धाचा महिना, यांच्या पलिकडे ते कधीं गेले नाहींत. मतप्रचाराच्या हव्यासामुळें त्यांचीं नाटकेंहि पुढें पुढें उतरत गेलीं."

## भिन्न प्रकृति भिन्न मार्ग

खाडिलकरांबद्दल केळकरांनीं बोलण्याचा तिसरा प्रसंग १९४४ च्या मेमधला. मी संध्याकाळच्या सुमारास कै. तात्यासाहेब केळकरांना भेटावयाला गेलों होतों. त्यांची प्रकृति थोडी अस्वस्थ असल्यामुळें ते उपरणें पांघरून आराम खुर्चीवर लेटले होते. स्वतःच्या गतजीवनाविषयीं बोलणें त्यांना फारसें आवडत नसे. पण, मन उदास असल्यामुळेंच कीं काय, त्या दिवशीं कोल्हटकरांवरून बोलतां बोलतां ते एकदम स्वतःच्या गतजीवनाकडे वळून म्हणाले, 'माणसांच्या विशिष्ट प्रकृतीमुळें त्यांच्या आयुष्याला किती भिन्न

वळण लागतें, याची कोल्हटकर, मी आणि कृष्णाजीपंत हीं तीन उदाहरणें आहेत. कोल्हटकर एल. एल. बी. झाल्यावर वकिलीला लागल्यामुळें त्यांच्या आणि आमच्या आयुष्यक्रमांत अंतर पडलें याचें मला नवल वाटत नाहीं. पण मी आणि कृष्णाजीपंत चोवीस वर्षें एका पक्षांत आणि एकाच पत्राच्या कचेरींत काढूनहि अखेर आयुष्याच्या उतरत्या दिवसांत निराळ्या मार्गांना लागलों यांत भिन्न प्रकृतिधर्माशिवाय दुसरें कोणतें कारण सांगतां येईल?'

त्यावर मीं विचारलें, "हा प्रकृतिभेद टिळकांच्या हयातींत कधींच नडला नाहीं का?" "नाहीं कसा? हरएक बाबतींत तो नडत असे; व टिळकांना काळ्या पाण्याची शिक्षा झाल्यावर दोन वर्षांनीं कृष्णाजीपंतांना जो 'केसरी' सोडावा लागला, त्याला कारणहि आम्हा दोघांची प्रकृति अगदीं भिन्न ठरली हेंच होय!" ते किंचित् विनोदानें उद्गारले.

## केळकरांना दिसलेलें खाडिलकरांचें विभूतिपूजन

त्यांचें हें विधान ऐकतांच मला त्यांनीं 'गतगोष्टीं'त खाडिलकरांविषयीं केलेल्या विधानांची आठवण झाली; व मीं त्यांना विचारलें, "या प्रकृति-भेदामुळेंच ते टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीजींचे अनुयायी झाले, नव्हे का?"

"हो. तसेंच म्हटलें पाहिजे. आमच्या राष्ट्रीय पक्षांत खाडिलकर हे प्रथमपासूनच 'मिस्टिक'—गूढतेचें आकर्षण असलेले अध्यात्मवादी; आणि 'मिस्टिक' म्हणूनच विभूतिपूजकहि! "यद्यद्विभूतिमत्सत्त्वं" या गीता-वचनाच्या दृष्टीनें पुढाऱ्याकडे पहाणारें टिळक हे अगदीं रुक्ष, तर्ककर्कश, बुद्धीच्या कसोटीवर साऱ्या गोष्टी पारखून पाऊल टाकणारे. त्यांच्यांत 'मिस्टिसिझम' अगदीं नव्हता. आमच्या पक्षांतले 'मिस्टिक' म्हणजे डॉ. अण्णासाहेब पटवर्धन! पण, टिळक 'मिस्टिक' नसूनहि खाडिलकरांची जी त्यांच्यावर अनन्यभक्ति होती, ती टिळक हे त्या काळांतली अद्वितीय

विभूति होते म्हणूनच. खाडिलकरांच्या 'केसरी'तील संपादकीय लेखनाला विभूतिपूजेच्या प्रतिपादनापासून प्रारंभ झाला, ही गोष्टहि त्यांच्या या प्रकृतीचीच निदर्शक आहे. ही त्यांची प्रकृति लक्षांत घेऊनच टिळकांनीहि त्यांना नेपाळांत पाठविलें होतें. टिळक वारल्यानंतर आमच्या पक्षांत त्यांना आकर्षक असें विभूतिमत्त्व अजिबात उरलें नाहीं. आमच्या राजकारणाची बैठकहि आध्यात्मिक नव्हती. टिळकांच्या धोरणानुसार आम्ही प्रत्येक तत्त्व आणि प्रत्येक कार्यक्रम व्यवहार—बुद्धीनें तपासून चालणारे. उलट गांधी हे महंतांचे मेरुमणि. त्यांनीं राजकारणांत इतका 'मिस्टिसिझम' आणला कीं, तितका भक्तिमार्गांत सुद्धां कोणा संत—महंतानें कधीं आणला नसेल! त्यांच्या ह्या गूढ, आध्यात्मिक राजकारणाच्या प्रभावामुळें कृष्णाजीपंत त्यांच्याकडे आकर्षिले गेले. पक्षाच्या किंवा परंपरेच्या निष्ठेपेक्षां प्रकृति-धर्मच अखेर प्रबळ ठरला!"

## केळकरांच्या मतें खाडिलकर अधिक दैववान व पराक्रमी

"पण कोल्हटकर आणि खाडिलकर यांच्यापेक्षां आपलें जीवन मला अधिक समृद्ध, अधिक यशस्वी वाटतें—"

माझें हें विधान ऐकून ते कांहीं क्षण स्तब्ध होते. नंतर खुर्चीवरून एकदम उठून ते म्हणाले "व्यावहारिक दृष्टया तुम्हीं म्हणता तें खरें आहे. पण समृद्धि आणि यश यांच्याविषयींच्या प्रत्येकाच्या कल्पना वेगवेगळ्या असूं शकतात. लोकांनीं मला 'साहित्य सम्राट' ही पदवी देऊन गौरविलें, कारण मी सर्व प्रकारचें वाङ्मय पुष्कळ लिहिलें आणि तें लोकाभिरुचीच्या कसोटीला उतरलें; इतकेंच नव्हे तर त्या त्या विषयाच्या जाणकारांनाहि तें मान्य झालें. माझ्यावर मानसन्मानांचा वर्षावहि झाला. तरीसुद्धां कांहीं बाबतींत कोल्हटकर आणि खाडिलकर हे माझ्यापेक्षां अधिक

पराक्रमी आणि दैववान ठरतात, असें मी मानतों. कोल्हटकरांचें गुरुपीठ त्यांच्या डोळ्यांदेखत निर्माण झालें; व विनोदाचे प्रवर्तक, आचार्य, म्हणूनहि त्यांचें स्थान पहिलेंच राहील. तसेंच नाटकांच्याहि एका विशिष्ट संप्रदायाचे जनक म्हणून ते गणले जातील. तीच गोष्ट खाडिलकरांची. मराठी नाटकांतील त्यांचा संप्रदाय स्वतंत्र असून, देवल, कोल्हटकर, गडकरी यांच्यासारख्या समकालीन थोर नाटककारांवर मात करून त्यांनीं मराठी रंगभूमीवर वर्चस्व गाजविलें. महाराष्ट्रांतील नाटककार आणि नट हे दोघेहि किर्लोस्करांच्या खालोखाल त्यांचें रंगभूमीवरील गुरुपीठ मानतात. 'लोकमान्य' आणि 'नवाकाळ' हीं दोन दैनिकें चालवून त्यांनीं पत्रकार म्हणूनहि अगदीं निराळ्या प्रकारचा लौकिक संपादन केला; व मराठी वृत्तव्यवसायाला आधुनिक नवीन वळण लावलें.—"

बोलतां बोलतां ते एकदम थांबले आणि खांकरून उद्गारले, "एका बाबतींत तर मी खाडिलकरांना आम्हां दोघांपेक्षांहि दैववान समजतों. आपलें गुरुपीठ, आपलीं परंपरा किंवा आपला वारसा पुढें चालविणारा पुत्र आपल्या पोटीं येणें व त्याच्यावर आपली कार्यधुरा सोंपवून उतारवयांत निवृत्त होतां येणें, हें भाग्य टिळकांना सुद्धां लाभलें नाहीं. खाडिलकरांच्या वाटयाला तें भाग्य आलें आणि आपला मुलगा कर्तबगार संपादक निघालेला त्यांनीं पाहिला, यांत माझ्या समजुतीनें, जीवितार्चे सारें साफल्य आणि सारी समृद्धि त्यांनीं साधली!—"

## सरत्या नाटकांतील उदात्त तत्त्वें

खाडिलकरांविषयीं व्यक्तिशः मला इतकें आकर्षण प्रथमपासून कां वाटतें, याचा जेव्हां मी विचार करतों, तेव्हां कै. तात्यासाहेब केळकर यांनीं केलेली त्यांच्या मनोवृत्तीची ही मीमांसा मला आठवते. माझे गुरु कै. तात्यासाहेब कोल्हटकर हे सौंदर्यनिष्ठ होते; व ज्यांच्या सान्निध्यांत मला

लेखनकलेचें शिक्षण लाभलें. कै. तात्यासाहेब केळकर हे बुद्धिनिष्ठ होते. म'झ्या ठिकाणीं या दोन्ही निष्ठा असल्या, तरी आनुवंशिक संस्कारामुळें म्हणा किंवा संस्कृत वाङ्मयाच्या व्यासंगामुळें म्हणा, माझा कल अध्यात्माकडे जास्त आहे; व त्यामुळेंच मला वाटतें, खाडिलकरांशीं प्रत्यक्ष संबंध कधीं आलेला नसतांना सुद्धां कोल्हटकर आणि केळकर यांच्या इतकेंच आकर्षण मला त्यांच्याविषयींहि वाटत आलें.

त्यांचें 'मेनका' नाटक रंगभूमीवर आल्याबरोबर माजलेलें वादळ सर्वश्रुतच आहे. कोल्हटकर आणि केळकर या दोघांनाहि निरनिराळ्या कारणांमुळें तें नाटक अगदीं नापसंत होतें. त्या नाटकावरून बोलतांना कोल्हटकर मला म्हणाले, "तुमची आवड विचित्र आहे, गजाननराव! 'विद्याहरण' नंतरचीं खाडिलकरांचीं नाटकें उतरत चाललीं आहेत, असें टीकाकार म्हणतात; तर तुम्हांला नेमकीं तींच नाटकें ज्यास्त आवडतात!" पण, तीं नाटकें आवडण्याचेंहि खरें कारण, त्यांतील मानवी जीवनाला आधारभूत असलेल्या उदात्त तत्त्वांचा मनोज्ञ आविष्कार, हेंच होय. विशेषतः 'द्रौपदी,' 'सत्वपरीक्षा' आणि 'सवतीमत्सर' या नाटकांतील धीरोदात्त स्वभावरेखन आणि गंभीर तत्त्वचिंतन मला अतिशय आवडत असे.

मला आतां नक्की आठवत नाहीं; पण साबरमतीच्या तुरुंगांतून सुटल्यावर जें भाषण खाडिलकरांनीं 'नवाकाळ' कचेरींत केलें, त्यांत त्यांनीं अशा आशयाचे उद्गार काढल्याचें स्मरतें कीं, "नित्याच्या प्रापंचिक व्यवहारांतून आपली बुद्धि बाहेर काढून तिला आपल्या आवडत्या अशा उच्च तात्त्विक चिंतनांत किंवा व्यासंगांत गुंतविणें हाच प्रपंचांतील दुःखें विसरण्याचा आणि चित्ताची समता कायम ठेवण्याचा मार्ग आहे." या मार्गाचा अवलंब केल्यामुळेंच टिळकांना तुरुंगांत 'गीतारहस्य' लिहिणें शक्य झालें, असेंहि या भाषणांत त्यांनीं सांगितल्याचें आठवतें.

## मितभाषी व मननशील

मला वाटतें, खाडिलकरांच्या या उद्गारांत त्यांच्या वैशिष्ट्याचें मर्म सांठविलेलें आहे. रंगभूमि काय किंवा वर्तमानपत्राची कचेरी काय, हीं दोन्ही म्हणजे सार्वजनिक जीवनाच्या चावडयाच होत. या चावडीवर जो मनुष्य नट, नाटककार, वार्ताहर किंवा संपादक या नात्यानें वसतो त्याची नाडी झुण्डीशीं (mob), मानवी समाजाच्या सामूहिक मनाशीं निगडित झालेली असते; व ज्या प्रमाणांत सामूहिक मनाशीं तो समरस होऊं शकतो, त्या प्रमाणांत त्याला यश मिळतें, अशी समजूत आहे. पण खाडिलकर हे तर मितभाषी आणि मननशील. मग त्यांना या दोन्ही लोकाभिमुख व्यवसायांत इतकें यश कसें आलें? झुण्डींत न मिसळतां त्यांनीं झुण्डीचें मन जिंकलें! समूहमनाशीं समरस होण्यासाठीं समूहांत मिसळावें लागतें ही समजूत, मला वाटतें, चुकीची आहे. स्वतःची उच्च तात्त्विक किंवा ध्येयात्मक भूमिका सोडून समूहाशीं जो समरस होतो, तो समूहाच्या मनाला नवीन तत्त्वांच्या किंवा कल्पनांच्या साक्षात्कारानें उन्नत करण्याऐवजीं स्वतः मात्र अवनत होतो. उलट, मानवी जीवनाची धारक तत्त्वें आणि स्वतःच्या बुद्धीला पटलेलीं नैतिक मूल्यें यांच्यावर अविचल दृष्टि ठेवून त्याच्या अनुषंगानें जो प्रतिपादन किंवा प्रचार करतो, तो जरी समूहांत न मिसळला, तरीहि त्याला समूहाचें मन आपल्या निष्ठेच्या जोरावर जिंकतां येतें. खाडिलकर या कोटींतील नाटककार आणि संपादक होते. त्यांनीं नाटकें लिहिलीं तींहि तात्त्विक भूमिकेवरून व वृत्तपत्रें चालविलीं तींहि तात्त्विक भूमिकेवरूनच. ही आपली उच्च भूमिका त्यांनीं कोणत्याहि हर्षामर्षाच्या प्रसंगांत सोडली नाहीं. या त्यांच्या तात्त्विक भूमिकेमुळेंच त्यांना स्वतःच्या वाङ्मयाविषयीं बोलणें किंवा लिहिणें कधीं रुचलें नाहीं; व कोणाच्या कोणत्याहि प्रकारच्या टीकेला उत्तर देण्याचीहि गरज वाटली नाहीं.

जणूं, आपली बुद्धि आणि आत्मा ही कोणत्याहि प्रकारच्या तत्त्वच्युतीनें म्लान किंवा मलिन होऊं नयेत, एवढी एकच चिंता त्यांनीं जन्मभर वाहिली. सर्व प्रकारचे वाङ्मयीन किंवा वैयक्तिक वाद व समास्पर्धेचीं केंद्रें यांच्यापासून अलिप्त राहून त्यांनीं जें अंतर्मुख, एकाकी जीवन आमरण व्यतीत केलें, त्यालाहि कारण त्यांची ही विशिष्ट वृत्तीच होय.

या वृत्तीमुळेंच नाटककार आणि संपादक या दोन्ही दृष्टींनीं त्यांचें चारित्र्य आदर्श होऊन बसलें. कोणत्याहि राजकीय घटनेचें, मग ती घटना राष्ट्रीय असो वा आंतरराष्ट्रीय असो–विवरण आणि विश्लेषण तत्त्वानुषंगानें करण्याच्या निरुपम शैलीमुळें त्यांच्या वृत्तपत्रीय लिखाणाला एक प्रकारची ओजस्वी मनोज्ञता येत असे, व तें वाचल्यावर विराट मानवी मनाच्या हालचालीचा कांहीं नवीनच धागा आज आपल्याला दिसला, असें वाचकाला वाटे.

स्वतःच्या बुद्धीला रोजच्या प्रापंचिक व्यवहारांतून बाहेर काढून तत्त्वचिंतनाच्या समाधींत विलीन करण्याच्या खाडिलकरांच्या या अंतर्मुख वृत्तींत, या आत्मपरतेंत कदाचित् अहंकाराचा भाग असेलहि व तो अहंकारच ओजोगुणाचें उदात्त स्वरूप धारण करून त्यांच्या साऱ्या वाङ्मयांतून प्रकट झाला असेल.

पण या आत्मस्फूर्त ओजस्वितेमुळेंच त्यांचें व्यक्तित्व आणि वाङ्मय हीं दोन्हीं आकर्षक वाटत नाहींत काय ?

## फक्त तीनच भेटी

खाडिलकरांशीं माझी प्रत्यक्ष भेट होण्याचा सुयोग फक्त तीनच वेळा आल्याचें आठवतें.

१९४४ च्या जानेवारींत आमचा 'तरुण भारत' सुरू झाल्यावर 'नवाकाळ' मध्यें सिलिंडर मशीन विकाऊ असल्याचें माझे ज्येष्ठ सहकारी

श्री. ए. श्री. पटवर्धन यांना कळलें. पुढें तें मशीन पहावयाला मी 'नवाकाळ' कचेरींत गेलों असतां मुद्दाम तिसऱ्या मजल्यावर जाऊन काकासाहेबांचें दर्शन घेतलें; व स्वतःचें नांव प्रथम सांगून त्यांना अभिवादन केलें. त्यांनींहि हात जोडून त्याचा स्मितपूर्वक स्वीकार केला.

श्री. य.कृ. खाडिलकर यांनीं काकासाहेबांच्या अनुमतीनें,हें मशीन अतिशय सवलतीनें दिलें. 'नवाकाळ' आणि 'तरुण भारत' यांची राजकीय भूमिका अगदीं भिन्न असतांनासुद्धां मशीनच्या व्यवहारांत काकासाहेबांनीं प्रकट केलेल्या या सहृदयतेबद्दल 'तरुण भारत–नरकेसरी' संस्थेचे आभार स्वतःतर्फे समक्ष निवेदन करण्यासाठीं डॉ. खरे यांनीं मला मुद्दाम त्यांच्याकडे जावयाला सांगितलें. तदनुसार मी पुन्हां त्यांना भेटावयाला गेलों होतों.

## शेवटच्या भेटींतील आशीर्वाद

त्यांच्या भेटीचा तिसरा योग १९४६ च्या मेमध्यें बेळगांव साहित्य संमेलनाच्या आधीं आला. संमेलनाध्यक्ष निवडून आल्याबद्दल मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे जो माझा सन्मान 'नवाकाळ' कचेरींत झाला, तत्पूर्वी त्यांचा आशीर्वाद मागण्यासाठीं मी मुद्दाम त्यांच्या दर्शनाला गेलों होतों. ते तिसऱ्या मजल्यावर होते. मी खालीं वाकून त्यांना अभिवादन केलें व स्वतःचें नांव सांगून आशीर्वाद देण्याची विनंति केली.

ते क्षणैक स्तब्ध होते. नंतर स्मितवदनानें माझें कुशल चिंतून त्यांनीं मला नमस्कार केला. तेंच त्यांचें मला घडलेलें शेवटचें दर्शन.

त्यानंतर पुण्यास आल्यावर कै. तात्यासाहेब केळकर यांच्याकडे जाऊन मी त्यांचा आशीर्वाद घेतला. त्यावेळीं ते उद्‌गारले, "माझ्या डोळ्यांदेखत तुम्ही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालेले पाहून मला फार बरें वाटलें. आज कोल्हटकर असते, तर त्यांनाहि आनंद झाला असता—"

त्यावर मी म्हटलें , "मी मुंबईस गेलों होतों, त्यावेळीं खाडिलकरांच्याहि पाया पडून त्यांचा आशीर्वाद घेतला–"

तात्यासाहेब कांहीं क्षण स्तब्ध होते. नंतर खाकरून उद्‌गारले, "तुम्ही योग्य तेंच केलेंत. वृत्तव्यवसाय करणारे आजचे सगळे लेखक खाडिलकरांचे ऋणी आहेत! जुन्या पिढीच्या ऋणांचें इतक्या कृतज्ञतेनें स्मरण ठेवणाराला आयुष्यांत कांहीं कमी पडूं नये, हाच आशीर्वाद तुम्हांला मी देतों!"

# श्री. वसंत शांताराम देसाई

## रंगभूमीवर नजर ठेवून नाटकें

तीन वर्षें झालीं त्या गोष्टीला! मी गडकऱ्यांचें "पुण्यप्रभाव" नाटक पाहिलें आणि "प्रेमसंन्यास" नाटक वाचलें–त्यानंतर मीं खाडिलकरांचीं एक दोन नाटकें वाचलीं. गडकऱ्यांची रोषराई–भाषेची, चमत्कृतिजनक कल्पनांची आणि भावनेच्या अनिर्बंध विलासाची–खाडिलकरांच्या नाटकांत नसल्यामुळें, मला तीं अगदीं सामान्य वाटलीं. कारण नाटक समजण्याची माझी शक्तीच त्यावेळीं अल्प होती. त्यानंतर एके दिवशीं "विद्याहरण" नाटक माझ्या हातीं आलें आणि मीं तें समग्र वाचून काढलें. गडकऱ्यांच्या नाटकांनीं मी भारला गेलों असलों, तरीहि "विद्याहरण" वाचून मला फार आनंद झाला.

त्यानंतर दोन तीन वर्षांनीं मीं महाराष्ट्र नाटक मंडळीचीं नाटकें पाहिलीं. "कांचनगडची मोहना" आणि "बायकांचें बंड" ही खाडिलकरांचीं नाटकें पाहण्याचा योग साधला. हीं नाटकें मीं वाचलीं होतीं त्यावेळीं मला तीं सामान्यच वाटलीं, पण पाहिलीं तेव्हां फार रंगतदार वाटलीं. त्यांचे प्रयोग पाहून मीं ती पुन्हां वाचलीं, त्यावेळीं वाचतांना सुद्धां

फार मौज वाटली. खाडिलकरांचीं नाटकें प्रथम पाहून नंतर वाचलीं पाहिजेत असा माझा ग्रह झाला.

तो ग्रह चुकीचा नव्हता. खाडिलकरांनीं नाटकें लिहिलीं तीं प्रामुख्यानें रंगभूमीकडे दृष्टि ठेवून, "नाटक हें नुसतें वाचण्याकरितां नसून, रंगभूमीवर करून दाखविण्याकरितां आहे" हा दंडक दृष्टिसमोर ठेवून! गडकऱ्यांनीं पुण्यप्रभाव नाटक किर्लोस्कर मंडळीकरितां लिहिलें, पण तें महाराष्ट्र मंडळीनें रंगभूमीवर आणलें. एकच प्याला नाटक शिवराज मंडळीला देतां देतां गंधर्व मंडळीच्या रंगभूमीवर आलें. याच्या उलट, खाडिलकरांच्या बहुतेक सर्व नाटकांचा नटवर्ग आगाऊ निश्चित असे. त्यामुळें नाटक लिहितांनाच त्याचा प्रयोग त्यांच्या कल्पनाचक्षूंना पाहतां येऊन, नाटकाची रंगभूमीवरील प्रयोगाची परिणामकारकता त्यांना वाढवितां येत असे. नाटकांतील प्रत्येक शब्द आणि प्रत्येक क्रिया ही प्रथम रंगभूमीकरितां आहे या धोरणानें त्यांनीं नाटकें लिहिल्याकारणानें, रंगभूमी हीच त्यांची नाटकें समजावून सांगणारी मार्गदर्शिका (interpreter) ठरत असे आणि म्हणून खाडिलकरांचीं नाटकें पाहिल्यानंतरच त्यांच्या वाचनामुळें मौज वाटते. अर्थातच, हें सूत्र सामान्य वाचकांपुरतेंच खरें आहे. नाटक वाचतां वाचतांच त्याच्या प्रयोगाची कल्पना ज्यांना आपल्यासमोर कल्पनेनें स्वतःसमोर उभी करतां येते त्या रसज्ञ, तज्ञ आणि अनुभवी वाचकांना तें लागू नाहीं.

## महाराष्ट्राचे शेक्सपिअर

आणि म्हणूनच "कांचनगडची मोहना" आणि "बायकांचें बंड" हीं दोन नाटकें रंगभूमीवर पाहिल्यावरच मला त्यांतील रसरौंदर्याची कल्पना आली. तरी देखील मी खाडिलकरांना श्रेष्ठ नाटककार समजायला तयार

नव्हतों. त्यानंतर मी त्यांचीं बहुतेक सर्व संगीत व गद्य नाटकें वाचलीं– तरीहि माझ्या मतांत बदल पडेना. मला वाटूं लागलें कीं, उत्कृष्ट नट हीं नाटकें करितात म्हणूनच तीं रंगतदार वाटतात आणि यशस्वी होतात ! बालगंधर्वांनीं खाडिलकरांचीं नाटकें केलीं आणि तीं यशस्वी झालीं यांत नवल तें काय ? मी सुद्धां खाडिलकरांइतकें चांगलें नाटक लिहूं शकेन आणि बालगंधर्वांनीं तें बसविलें तर–

माझ्या मतांची आणि रंगभूमीविषयक अनुभवांची ही अशी स्थिति असतांना मी नारायणराव बामणगांवकरांचें एक नाटक वाचलें. तें खाडिलकरांना अर्पण केलें होतें आणि त्या अर्पणपत्रिकेंत "महाराष्ट्राचे शेक्सपिअर" असा खाडिलकरांचा उल्लेख केला होता. मला तो अंधभक्तीसारखा व अतिरंजित वाटला.

## हे खाडिलकर

एके दिवशीं खाडिलकरांना मीं पाहिले. १९२२ सालीं गंधर्वांच्या मुंबईच्या मुक्कामांतील स्वयंवराचा शेवटचा प्रयोग पहायला ते आले होते. त्यांनीं रंगमंदिरांत प्रवेश करितांच "खाडिलकर–खाडिलकर" अशी शेजारच्या प्रेक्षकांत कुजबुज झाली आणि मीं खाडिलकरांना पाहिले !

बामणगांवकरांच्या नाटकांत खाडिलकरांचें जें छायाचित्र होतें तें पगडी घातलेलें होतें–आतां मी पहात होतों ते खाडिलकर खादीचा पोषाख आणि खादीचीच टोपी परिधान केलेले असे होते. तो फोटो त्यांच्या तरुणपणींचा होता. मी पहात होतों त्या खाडिलकरांचे केस त्यांच्या पोषाखाइतकेच पांढरे झाले होते. गंभीर चेहरा घेऊन ते तीन अंक नाटक पहात बसले, गाण्याचा अगर भाषणाचा परिणाम त्यांच्या चेहऱ्यावर व्यक्त होत नव्हता. फक्त एखाद्या विनोदाच्या प्रसंगीं त्या गांभीर्याला मिस्किल स्मिताची सुरकुती पडायची !

खाडिलकरांना मीं "हे खाडिलकर" म्हणून थिएटरमध्यें प्रथमच पाहिले आणि मग माझ्या ध्यानांत आलें कीं, मी यांना त्यापूर्वी चार सहा वेळां तरी पाहिलें आहे. एल्फिन्स्टन थिएटरच्या प्रवेशद्वारासमोरील चिंचोळ्या बोळकंडींतून ही स्वारी आपले बारीक डोळे जमिनीकडे लावून बाहेर पडते आहे, तिच्याभोंवतीं चार दोन मंडळी अहेत, समोर रस्त्यावर एक व्हिक्टोरिया उभी आहे व त्यांत ही स्वारी जाऊन बसल्यावर व्हिक्टोरिया चालू होते आणि ती मंडळी मागें परतत असें मीं पाहिलें होतें. बोळकंडींतून जातांना आजुबाजूला पाहणें किंवा व्हिक्टोरियांत बसल्यावर पुनः मागें वळून पाहणें या गोष्टी खाडिलकरांना माहीतच नव्हत्या. कदाचित् त्यांच्या एकनिष्ठ, ध्येयनिष्ठ आणि एकमार्गी वृत्तीचा तो परिणाम असेल!

त्यांच्या अशा गुणांच्या आणि करारीपणाच्या गोष्टी मीं त्यानंतर पुष्कळच ऐकल्या. गुर्जरांचें "अगोदर घेतलेलें" नाटक बसविल्याशिवाय आपलें नवें नाटक मिळणार नाहीं, असें गंधर्व मंडळीला बजाविणारे खाडिलकर,—द्रौपदी नाटकामुळें कर्ज झालें या लोकप्रवादामुळें गंधर्वांचें कर्ज फिटेपर्यंत नाटकाची किंमत न घेणारे खाडिलकर,—नाटक चांगलें न बसल्यामुळें गडकऱ्यांचें 'प्रेम संन्यास' किंवा कोल्हटकरांचें 'प्रेमशोधन' नाटक पडतें आहे म्हणून स्वतः त्या नाटकांच्या तालमी घेऊन त्यांचा प्रयोग निर्दोष व्हावा अशी यशस्वी खटपट करणारे खाडिलकर—अशा खाडिलकरांची आणि आपली ओळख व्हावी असें मला कां वाटूं नये?—

## नाटककारांच्या बाबतींत निर्मत्सरी

ती संधि गंधर्व मंडळीनें माझें "विधिलिखित" नाटक बसविण्यास सुरुवात केल्यावर ऑगस्ट १९२७ मध्यें आली. इतर नाटककारांच्या

बाबतींत खाडिलकर निर्मत्सरी होते. गंधर्व मंडळींतील त्यांचें आसन पराक्रमार्जित असल्याकारणानें त्यांच्या बरोबरीच्या यशस्वी नाटककारांची सुद्धां खाडिलकरांना कधीं भीति वाटली नाहीं. गंधर्व मंडळीच्या गुरुपदीं देवलांची स्थापना करण्यास त्यांनीं मान्यता दिली आणि "गडकऱ्यांचें एकच प्याला हातचें जाऊं देऊं नका" असा सल्लाहि त्यांनीं दिला. कारण स्वतःचें गुरुपद आणि एकच प्याल्याशीं तुल्यबळ असें "स्वयंवराचें" यश--याबद्दल त्यांना आत्मविश्वास होता. आणि म्हणूनच, माझ्या नाटका-संबंधांत त्यांनीं, नातवाच्या बाबतींत पितामहाला शोभेशी, कौतुकाचीच दृष्टि ठेविली. सुरुवातीच्या मामुली परिचयानंतर, माझ्या मनोभूमींत खाडिलकर या व्यक्तीचें "काकासाहेबांत" पर्यवसान झालें.

## चारित्र्याचा दरारा

काकासाहेबांच्या अति उग्र स्वभावाबद्दल मीं किती तरी कथा ऐकल्या होत्या. त्यांच्याशीं सलगी करण्याची मला छाती होईना. काकासाहेबांचा उग्र स्वभाव अस्तंगत झालेला मला दिसला, तरी त्यांचा दरारा कायम होता. गंधर्व मंडळींत त्यांनीं प्रवेश केला म्हणजे नटांच्या आणि व्यवस्थापकांच्या हृदयाचा तर थरकांप होतच असे, पण पडद्यांसारख्या निर्जीव वस्तूंचा देखील थरकाप होतो कीं काय, असें वाटायचें !

काकासाहेबांची गंधर्व मंडळींतील वागणूक सर्वस्वीं निरुपद्रवी असायची. किर्लोस्कर नाटक मंडळींत बालगंधर्वाच्या हितास्तव त्यांनीं एके काळीं ढवळाढवळ केली असेल तितकीच ! गंधर्व मंडळीच्या सुरवातीच्या पहिल्या वर्षांत त्यांनीं तिच्या अंतर्गत कारभारांत लक्ष पुरविलें असेल तितकेंच ! त्यानंतर ते अंतर्गत व्यवहारांत कधीं लक्ष देत नसत आणि म्हणून त्यांना घाबरावयाचें कोणालाच कारण नव्हतें. असें असूनहि जो दरारा होता तो

त्यांच्या चारित्र्याचा ! मालकांनीं अगर व्यवस्थापकांनीं विचारलेंच तर स्वतःला योग्य वाटेल तो सल्ला मात्र काकासाहेब देत असत–मग ते तो ऐकोत अगर न ऐकोत ! " विचारलाच तर सल्ला द्यावा—" इतकेंच धोरण त्यांनीं ठेविलें होतें.

## गंभीर रसाची बैठक

गंधर्व मंडळी मुंबईला असली म्हणजे काकासाहेबांचें आगमन अगदीं ठराविक वेळीं व्हावयाचें. रविवारीं दुपारीं ते ५ वाजतां रंगमंदिरांत यावयाचे व तास दीड तास बसून निघून जायचे. एखादें नाटक पहात बसायचे–असा प्रसंग मुक्कामांत एखादाच–व मंडळीचें नवें नाटक एकदां समग्र पहावयाचे. सोमवारीं दहा वाजतां कंपनीच्या बिऱ्हाडी यावयाचें व अकरा वाजतां चालायला लागायचें ! ठरलेली वेळ भरेपर्यंत काकासाहेब पानसुपारी व तंबाखू खात बसायचे व चालू लागायचे !

काकासाहेब आले म्हणजे त्यांना सामोरे जाऊन त्यांच्या सेवेला हजर असावयास दादासाहेब काटदरे ( गंधर्व मंडळीचे व्यवस्थापक ) कधीं चुकत नसत. रंगमंदिरांत ते काकासाहेबांना नाटकाच्या उत्पन्नाची माहिती द्यावयाचे व बिऱ्हाडीं एकंदर धंद्याची परिस्थिति सांगायचे ! परंतु, या बाबतींत दादा तरी दर आठवड्याला बोलून बोलणार किती ? काकासाहेबांचा चेहरा गंभीर आणि दादांचा मूळचा गंभीर चेहरा काकासाहेबांच्या विषयींच्या आदरामुळें अधिकच गंभीर बनलेला–अर्थात् त्या बैठकींत गंभीर रसाऐवजीं इतर रसांना मज्जाव होऊन " नसती भिन्नरस हे, गंभीर रस हा, नवरस ल्याला " असें तर काकासाहेबांचें खरें मत नसेल ना ?–असा भ्रम व्हायचा !

## मोजक्या शब्दांत अनुभवी मतें

गंधर्व कंपनींतील काकासाहेबांच्या बैठकींतील मानाचें सदस्यत्व मला

बहाल करण्याचा दादांनीं प्रयत्न सुरू केला, त्यावेळीं मला तो माझा गौरव वाटला. मी दचकत–बिचकत काकासाहेबांच्या शेजारीं जावून बसूं लागलों, एखादा शब्द बोलूं लागलों, आणि कांहीं दिवसांनीं तबकांतले एखादें पानहि खाऊं लागलों. पिकल्या पानाचे दादा काटदरे धोरणी तर खरेच ! काकासाहेबांसमोर पान खाण्यापर्यंत माझी सलगी वाढली आहे हें पाहतांच, दादांनीं त्या बैठकींतून काढता पाय घेऊन काकासाहेबांची आणि माझी गांठ घालून द्यावयास सुरवात केली ! वयामुळें काकासाहेब पुष्कळच अबोल बनले होते. तरी राजकारण आणि रंगभूमीसंबंधीं आपलीं अनुभवी मतें मोजक्या शब्दांत सांगायचे, क्वचित् एखादी कोटी करायचे व हंसायचे सुद्धां ! "मेनका नाटकाला खर्च नको म्हणून मी साधी पातळें, साधीं धोतरें आणि खडावा परिधान करणारींच पात्रें योजिलीं. पण नंतर मला भीति वाटूं लागली, कीं सोन्याच्या खडावा करून, त्यावर त्या साध्या दिसाव्या म्हणून, मळकट रंग चोपडायला नारायणराव कमी करणार नाहीं, स्वभावाला औषध नाहीं !" अशासारखीं मिस्किल टीकासुद्धां ते करीत असत.

## नाटकाचें रहस्य व यशाचें मर्म

माझी दोन्ही नाटकें रंगभूमीवर आल्यानंतर मला काकासाहेबांच्या नाटकाचें रहस्य व यशाचें मर्म समजलें. नाटक नाट्यपूर्ण पाहिजे, रंगदार पाहिजे, नटाच्या गुणांवर प्रकाश पडेल असें स्वभावचित्रण पाहिजे, अनुरूप नट पाहिजेत आणि स्वतःचें नाटक स्वतः बसविण्याची हिंमत पाहिजे, तरच नाटक यशस्वी होतें हें मला फार उशीरा समजलें. अशा अनेक गोष्टींचा संयोग जर झाला नाहीं तर नुसतें बालगंधर्वांनीं केलें म्हणून वाटेल तें नाटक यशस्वी होत नाहीं. "महाराष्ट्राचे शेक्सपिअर" असा गौरवपूर्ण उल्लेख बामणगांवकरांनीं कां केला तें कोडें मला अखेर उलगडलें.

आज नाट्यकलेंतील नवीनतेनें रंगभूमीचा कब्जा घेतला आहे–तिच्यासमोर

गडकऱ्यांची नाटकेंसुद्धां जुन्या तंत्राची वाटतात, पण काकासाहेबांचीं नाटकें जुन्या तंत्राची वाटत नाहींत ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे. किंबहुना त्यांच्या "भाऊबंदकी" वगैरे नाटकांची महति अशी आहे कीं त्यापासून तंत्रदृष्ट्या नवीनतावाद्यांना सुद्धां चार गोष्टी शिकतां येतील.

## महर्षी पदाला नेणारा कर्मयोग

काकासाहेबांना मीं शेवटीं पाहिले ते १९३९ च्या डिसेंबर महिन्यांत ! गंधर्वांच्या रंगमंदिरांत ते आले होते—त्यावेळीं त्यांची दृष्टि अधु झाली होती, समोर बसलेल्या मनुष्याची ओळख पटत नव्हती आणि पक्षघातामुळें त्यांचा एक हात निकामी झाला होता. अशा अवस्थेनंतरहि व जिवलग नातलगांच्या मृत्यूचे आघात सोशीतहि, त्यांनीं सतत नऊ वर्षेंपर्यंत उपनिषदाहि धर्मग्रंथांवर टीका लिहिल्या व आपल्या आयुष्यांतील शेवटच्या दिवशींचा "नवाकाळ" चा अग्रलेख नजरेखालीं घालून नंतरच प्राण सोडला ! आयुष्याचा प्रत्येक क्षण शेवटपर्यंत कठोर निग्रहानें, तेजस्वी तपस्येनें आणि शुद्ध शीलानें सार्थकी लावणें, हाच महर्षिपदाला नेणारा खरा कर्मयोग नव्हे काय ?

**प्रा. श्री. म. माटे, पुणें.**

## दोन आठवणी

एकदां श्री. हरिभाऊ फाटक यांनीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत "आर्यसंस्कृति" या विषयावर एक व्याख्यानमाला केली. चिंतामणराव वैद्य, काकासाहेब खाडिलकर व आणखी एक कोणी तरी गृहस्थ, तीन दिवस तिघे, असे अध्यक्ष होते. सभा सर्वथा खाजगी स्वरूपाच्या व अनौपचारिक आहेत असें हरिभाऊ यांनीं स्पष्ट केलेलें होतें. दुसऱ्या किंवा तिसऱ्या

सभेचे अध्यक्ष कृष्णाजीपंत होते. श्रोत्यांत वामनराव जोशी बसले होते. सभा खाजगी म्हणून वामनरावांनीं डोक्याची पगडी काढून पुढें बस्करावर ठेवली व भाषण ऐकूं लागले. कृष्णाजीपंतांना तें खपलें नाहीं. खुर्चीवरून बसल्या बसल्या त्रासिकपणानें ते म्हणाले "वामनराव, डोक्याला पगडी घाला" त्यांची क्रुद्ध मुद्रा आणि हातांचा निर्देश पाहून बापडे वामनराव अगदीं घाबरून गेले आणि हूं—कां—चूं न करितां त्यांनीं पगडी डोक्यावर ठेवली ! जोशी व खाडिलकर या दोघांचेहि स्वभाव कळून आले.

१९१७ सालची गोष्ट असेल. मीं एक नाटक लिहिलें होतें. तें खाकोटीस घेऊन मुंजाबाच्या बोळांत कृष्णाजीपंत रहात असत तेथें गेलों—माझें काम सांगितलें. ते म्हणाले 'ठीक आहे, वाचा' एक अंक झाल्यावर ते म्हणाले 'आतां एक एक दिवस एक एक अंक असे वाचा.' त्यांनीं माझें नाटक ऐकलें, याचेंच मला केवढें तरी समाधान वाटलें. तीनहि अंक वाचून झाल्यावर त्यांनीं पसंतीचे उद्‌गार काढले. वाचन चालू असतां ही पसंती ते दाखवीत होते पण त्यांत विशेष नव्हतें. कारण तेवढा शिष्टाचार कोणीहि संभाळतोच. पण पुढें मीं एक गैरसोयीचा प्रश्न विचारला. तो मी विचारावयास नको होता असें मला आतां वाटतें ! नाटक पसंत आहे तर विचारावयास काय हरकत, अशा समजानें मी म्हणालों, "आपण कंपनीला या नाटकाची शिफारस कराल का ?" कांहींशा कापऱ्या आवाजानेंच मीं हा प्रश्न विचारला होता. कृष्णाजीपंतांनीं केलेलें उत्तर फारच समर्पक होतें आणि तें त्यांनीं दिलें याचा मला खरोखर आनंद वाटला. ते म्हणाले "ज्या कंपनींत माझीं नाटकें घेतात, बसवितात, तिथेंच दुसऱ्या नाटकाची शिफारस मला कशी बरें करतां येईल ? तें माझ्या हिताचें नाहीं !" कृष्णाजीपंतांच्या उत्तराचें मला यत्किंचित्‌हि वाईट वाटलें नाहीं.

त्यांचा व्यवहारदक्ष स्वभाव माझ्या एकदम ध्यानांत आला !

# कवि आनंदराव टेकाडे, नागपूर.

## कविता म्हणून दाखविल्या

काकासाहेबांस मी प्रथम आमच्या नागपुरास पाहिलें. त्यावेळीं महाराष्ट्र नाटक मंडळीचा मुक्काम नागपुरास होता. त्या मंडळींत 'सत्वपरीक्षा' नाटक बसविण्याकरितां काकासाहेब आले होते. उन्हाळ्याचे दिवस होते. नेहमींप्रमाणें मी आपल्या दोन तीन सोबत्यांसह शहरांतील तलावावर हवा खाण्यास संध्याकाळीं गेलों, आणि बसण्यासाठीं चौफेर नजर टाकळी. पूर्वेकडील एका गोल प्रशस्त दगडी चबुतऱ्यावर दोन्ही गुडघ्यांना उपरणें गुंडाळून बसलेले काकासाहेब दिसले. निसर्गाच्या मनोहर दृश्याकडे मुळींच लक्ष न देतां, म्हणजे पश्चिम दिशेकडे तोंड करून न बसतां दक्षिणेकडे तोंड करून विचारमग्न स्थितींत जेठा मारून बसलेल्या काकासाहेबांस पाहून मला खरोखरीच मोठें आश्चर्य वाटलें. त्या आश्चर्यामुळेंच अद्याप ती आठवण माझ्या मनांत जशीच्या तशीच राहिली आहे.

त्या सालानंतर एक दोन वर्षांनीं, नेहमींप्रमाणें उन्हाळ्यामध्यें मी पुण्यांत असतांना गंधर्व मंडळीचा मुक्काम त्यावेळीं पुण्यास होता. एके दिवशीं संध्याकाळीं मी व माझे स्नेही श्री. नारायणराव बामणगांवकर (संपादक—उदय, अमरावती—वऱ्हाड) मिळून मंडळीच्या बिऱ्हाडीं जात असतां बामणगांवकरांनीं मला म्हटलें, "यावेळीं खाडिलकर तिथें असतात, त्यांना तूं 'तारिलें महाराष्ट्राला' आणि 'लांकडी तलवार' ह्या तुझ्या कविता म्हणून दाखव. ते चांगले मर्मज्ञ आणि भावनाप्रधान आहेत, त्यांना ह्या कविता खात्रीनें आवडतील." आम्ही दरवाजाच्या आंत पाऊल टाकतों तों काकासाहेब बैठकीवर बसलेलेच होते. त्यावेळीं त्या बैठकीवर

श्री. बालगंधर्व किंवा आणखी कोणी बसले होते कीं काय हें नक्की आतां आठवत नाहीं. आम्ही बसल्यावर श्री. वामणगांवकरांनीं काकांना माझी ओळख करून दिली आणि मला कविता म्हणावयास सांगितलें. मी 'तारिलें महाराष्ट्राला' व 'लांकडी तलवार' ह्या दोन कविता त्यांना म्हणून दाखविल्या. त्या दिवसापासून माझा काकांशीं परिचय वाढत्या प्रमाणांत झाला.

## मेनका नाटकाची तालीम पाहिली

पुढें १९२६ सालीं, महाराष्ट्र—साहित्य संमेलनाचें अधिवेशन इंदूरचे श्रीमंत रा. ब. किबेसाहेब यांचे अध्यक्षतेखालीं मुंबई येथें भरलें. त्याला मी हजर होतों. संमेलन संपल्यावर प्रतिनिधी—निवासाची जागा ( चिकित्सक समूह ) सोडून जवळच असलेल्या खटाव मकनजी वाडींतील माझे स्नेही रा. नरहरपंत रघुनाथराव ऊर्फ बाबूराव फाटक, सहसंपादक 'नवाकाळ' यांच्या बिऱ्हाडीं सामान घेऊन संध्याकाळीं ४॥ वाजण्याच्या सुमारास मी गेलों. तेथें जातांच, बाबूरावांनीं आतां सहा वाजल्यापासून 'मेनका' नाटकाची रंगीत तालीम नाटकगृहांत आहे तेव्हां आपण काकांबरोबर तालीम पहाण्यास जाऊं असें सांगितलें.

मेनका नाटकाची रंगीत तालीम पहाण्यास नाटकगृहांत जातांच बाबुराव वगैरे मंडळीस उचित ठिकाणीं बसवून मला काकांनीं आपल्याबरोबर घेऊन रंगभूमीजवळच्या दुसऱ्या रांगेतल्या अगदीं मधल्या खुर्चीवर बसविलें. 'तुम्हांला ऐकायला येत नाहीं. तुम्हीं इथें जवळच बसा' असें म्हणून काका आंत रंगपटांत गेले. नंतर पांच सात मिनिटांनीं गंधर्व मंडळीचे मॅनेजर माझ्याजवळ येऊन मला म्हणाले, 'ही जागा दुसऱ्या पाहुणे मंडळींकरतां ठेविली आहे, तेव्हां तुम्हीं त्या खुर्चीवर बसा.' असें म्हणून तेथून मला उठवून चौथ्या किंवा पांचव्या रांगेंतील खुर्चीवर नेऊन बसविलें आणि

निघून गेले. मॅनेजर गेल्यावर चार पांच मिनिटांनींच काका पुन्हां माझ्या-जवळ आले आणि म्हणाले, तेथून कां उठलांत? त्यावर त्यांना मीं सांगितलें, मॅनेजरनें ती जागा दुसऱ्याकरितां राखून ठेविली आहे असें सांगून त्यांनीं मला इथें आणून बसविलें. त्यासरशी काकांनीं माझा दंड धरून तेथून उठविलें आणि पुन्हां त्याच खुर्चीवर नेऊन बसविलें. बसतांना मी थोडी कुरबूर केली तेव्हां थोड्याशा क्रुद्ध स्वरांत काका म्हणाले, 'मी सांगतों, बसा इथें' काका निघून गेले. नंतर लगेच मॅनेजर येऊन म्हणाले, तुम्हीं पुन्हां इथें येऊन बसलां? 'मला काकांनीं इथें बसविलें' हे माझ्या तोंडचे शब्द ऐकतांच मॅनेजर चूप बसले व मुकाट्यानें निघून गेले. मॅनेजर पुन्हां माजजवळ आले नाहींत. या रस्सीखेचींत त्यावेळीं माझ्या मनाची काय अवस्था झाली असेल तें माझें मीच जाणें!

## नाटकाचें पुस्तक खेड

नंतर तीन चार दिवसांनीं सकाळीं चहा पिऊन झाल्यावर मी आणि बाबुराव फाटक मिळून नवाकाळ कचेरींत गेलों. नवाकाळची कचेरी आणि छापखाना खटाव वाडींतच होता. दोन प्रशस्त टेबलांवर व्यवस्थित लावलेल्या मेनका नाटकाच्या छापील पुस्तकांकडे पहात टेबलाजवळ काका उभे होते. नाटक रंगभूमीवर येण्याच्या आधींच पुस्तक छापलेलें पाहून मला प्रथम नवल वाटलें. पण आत्मविश्वासाची ही खूण होय असें लगेच माझ्या ध्यानांत आलें. आम्हां दोघांकडे पाहून काका थोडे हंसले आणि जामच्याशीं बोलूं लागले. पुस्तकासंबंधानें एक दोन प्रश्न त्यांना मीं विचारले. मीं त्यांना म्हटलें, नाटक रंगभूमीवर येण्यापूर्वीच छापून काढलें? त्यावर त्यांनीं कांहीं सांगितलें, पण तें मला नीटसें ऐकूं आलें नाहीं. नंतर थोड्याच वेळानें मजपुढ्याकरवीं दौत टाक आणवला व एका पुस्तकावर स्वहस्तें 'रा. रा.

आनंदराव टेकाडे यांस ग्रंथकर्त्याकडून आदरपूर्वक नजर केलें असे.' असें लिहून त्याखालीं मोडीमध्यें स्वतःची सही करून तें पुस्तक माझ्या हातीं दिलें, त्यावेळीं हंसत हंसत काका म्हणाले, पहा बरें, मी तुम्हांला गणपतीची पहिली प्रत देत आहें. सारीं पुस्तकें खपलीं पाहिजेत, असें म्हणतांच आम्हीं तिघेहि मोठ्यानें हंसलों.

काकांच्या ठिकाणीं माझी श्रद्धा आणि पूज्यभाव फार दिवसांपासून जडला होता. काकांचें 'संगीत विद्याहरण' प्रसिद्ध होतांच मुद्दाम बोलावून आप्तेष्टांच्या बैठकींत वाचल्यापासून काकांवर जी माझी श्रद्धा आणि पूज्य भाव जडला तो या क्षणापर्यंत.

# सरदार मा. वि. किबे, इंदूर

श्रीसद्गुरु श्री. माधवराव महाराज यांची समाधि इंदूर येथें बांधली आहे. त्या वास्तूंत प्रतिवर्षी श्रीसद्गुरूंच्या पुण्यतिथीच्या निमित्तानें धार्मिक कार्यक्रम होत असतो. कीर्तनकार, प्रवचनकार इत्यादि विद्वानांस निमंत्रण दिलें जातें व त्यापैकीं एक किंवा अधिकांचे सात दिवस कार्यक्रम होतात. एक वर्षी कै. काकासाहेबांस निमंत्रण केलें होतें व प्रकृति दुरुस्त नसतांनाहि निमंत्रणाचा स्वीकार करून ते इंदुरास आले होते. त्यांचा मुक्काम आमचेकडे होता.

संध्याकाळीं श्रीनाथमंदिरांत त्यांचीं प्रवचनें होत, त्यांस अलोट गर्दी जमत असे. त्यांचें विद्वत्तापूर्ण, शोधक बुद्धीनें अलंकृत झालेलें, अखंड वक्तृत्व, परिणामकारक बोध यांनीं युक्त असलेलें भाषण, सर्वांसच पटत असे व त्यांना आनंदवीत असे. या प्रवचनांचें पुस्तकहि त्यांनीं छापविलें. लोक असें म्हणत कीं, असें परिणामकारक व युक्तियुक्त धार्मिक

प्रवचन क्वचित्च ऐकण्यांत येतें. कै. काकासाहेबांची राहणी व वागणूक निरुपद्रवी व अत्यंत साधी होती. त्यांना प्रत्यक्ष पाहिल्यावर तेजस्वी राजकीय लेखक ते हेच असें लोकांस पटत नसे. काकासाहेब नाटककार असतील असेंहि मानण्यास कठीण वाटत असे. ते अत्यंत ममताळू होते. याचा अनुभव आम्हास पदोपदीं आला. त्यांची भेट केव्हांहि विसरणें शक्य नाहीं.

## प्रि. के. रा. कानिटकर, पुणें

तें १८९९ साल असावें. कृष्णाजीपंत खाडिलकर, सांगलीचे गणपतराव अभ्यंकर व विनायकराव माईणकर आणि मी असे चौघेपांच जण चौपाटी-जवळील मंगलदासच्या चाळींत रहात होतों. मी त्यावेळीं बी. एससी. झालों होतों. पण मला बी. ए. व्हावयाचें असल्यामुळें मी इंटर आर्टसचा अभ्यास करीत होतों व त्याचबरोबर एल. एल. बी. च्याहि टर्मस् भरीत होतों. आमच्या वेळीं ही खास सवलत चालू होती. दापोली येथें गोगटयांच्या शाळेंत एक टर्म मी खगोल शास्त्र शिकवीत होतों, पण ती शाळा बंद पडल्यामुळें मला मुंबईस यावें लागलें, व अशा रीतीनें सांगलीकर खाडिलकरांच्या सहवासांत येण्याचा योग आला.

कृष्णाजीपंत व त्यांचे सांगलीकर दोघे मित्र दुसऱ्या एल. एल. बी. चा अभ्यास करण्यासाठीं मुंबईस आले होते. मंगळदासाच्या चाळींत आम्हीं सर्वजण एकत्र रहात असतां निरनिराळ्या विषयांवर हरतऱ्हेच्या गप्पा व वादविवाद होत. कृष्णाजीपंत फार बोलत नसत, पण बोलत तें मार्मिक व खोंचक असे.

त्यावेळच्या सर्वच गोष्टी आतां आठवत नाहींत. परंतु एक लहान गोष्ट आठवते. त्यावेळीं देवलांचें शारदा नाटक प्रसिद्ध होऊन त्याचे

खेळहि होऊं लागले होते. त्या नाटकावर अभ्यंकरांनीं टीका करण्याची तयारी चालविली होती. नाटकाच्या निरनिराळ्या भागांवर आम्ही ऊहापोह करीत असूं. त्यांत एक दिवस 'जठरानल शमवाया नीचा। कां न भक्षिसी गोमय ताजें।' या पदावर आमची उलटसुलट चर्चा चालू असतां कृष्णाजी-पंत म्हणाले कीं, ताजें गोमय व शिळें गोमय यांच्या चवींत कांहीं फरक आहे काय? असल्यास तो नाटककाराला विचारला पाहिजे, कीं पादपूर्णार्थ ताजें हा शब्द घातला आहे? अशा प्रकारें कृष्णाजीपंत नाटकांचा कीस काढीत असत.

## आचार्य श्रीराम गोसावी, नाशिक

### करडया शिस्तींतील कनवाळूपणा

दे. खाडिलकरांविषयीं माझी पहिली आठवण फार जुनी आहे. कीर्तन परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यावेळीं श्री. काकासाहेब नाशिकला आले होते. सदर परिषद पंचवटींत शृंगेरी मठांत भरली होती व जवळच हंसराज परमानंदांची धर्मशाळा प्रतिनिधींसाठीं व अध्यक्षनिवासासाठीं घेतली होती. स्थानिक स्वागत कार्यकारिणीनें श्री. काकासाहेबांच्या व्यवस्थेसाठीं माझी नेमणूक केली होती. त्या तीन दिवसांत जवळजवळ अहोरात्र मी काकासाहेबांजवळच असें. टिळकांच्या काळची नाशिकची सार्वजनिक कार्यांत जी ठळक ठळक मंडळी होती त्यांचें क्षेम व विचारपूस त्यांनीं मोठया आपुलकीनें फुरसतीच्या वेळीं मजजवळ केली. पुढें कीर्तन परिषदेची विषयनियामक कमिटी त्यांच्या वसतिस्थानांतच बसली. त्यावेळीं जुन्या शास्त्रीमंडळींस व कीर्तनकारांस सभेचे नियम माहीत नसल्यानें, त्यांचेकडून चरेंच अप्रस्तुत व अप्रासांगिक बोलणें होई. त्यावेळीं खाडिलकर जरा तीक्ष्ण

करडेपणानेंच त्यांस गप्प बसवीत. त्यामुळें पहिल्याच बैठकीच्या शेवटीं कांहीं अर्धवटांनीं त्यांच्याविषयीं अप्रीतीचे उद्गार काढले.

ही गोष्ट सर्वत्र सामसूम झाल्यावर फुरसत पाहून काकासाहेबांचे कानीं घातली व सभेच्या नियमांचें या जुन्या मंडळींत फारच अज्ञान आहे, हेंहि त्यांना सुचविलें. तेव्हां काकासाहेब मोठया कनवाळूपणें म्हणाले "अहो, असा करडेपणा मी वरून धारण करणार नाहीं, तर सभेचीं कामें योग्य काळांत आटपायचीं कशीं? आज कांहीं शास्त्रीमंडळी माझ्या बोलण्यानें दुखावली खरी, पण मग पुढच्या सभेचें काम सुकर झालें. असा हा मास्तरपणा कधीं कधीं करावा लागतो. त्या शास्त्रीमंडळींना सांगा कीं, व्यक्तिशः त्यांना दुखविण्याचा माझा केव्हांच हेतु नव्हता. सभेचें काम सुरळित चालण्यासाठीं मी तसें बोललों."

जेवणाचे वेळीं ही गोष्ट त्या त्या शास्त्रमंडळीस जेव्हां समजून सांगितली गेली तेव्हां ती मंडळीहि मनानें स्थिर झाली व सायंकाळीं दे. खाडिलकरांचें परिषदेचे अध्यक्ष म्हणून जें ओजस्वी व कीर्तनकारांच्या कळवळ्यानें भरलेलें वक्तृत्वपूर्ण भाषण झालें, तें ऐकून तर सकाळीं खाडिलकरांचेविषयीं अप्रीतिपूर्वक बोलणारांच्याच नेत्रांत प्रेमाचीं आसवें उभीं राहिलीं.

## १९३७ चा नाशिकचा मुक्काम

यानंतर बऱ्याच काळानंतर आमचे मित्र श्री. काकासाहेब गद्रे यांनीं मुद्दाम पत्रव्यवहार करून श्री. खाडिलकरांचीं प्रवचनें १९३७ सालीं नाशकास ठरविलीं. श्रीमंत नानासाहेब व मी अशा दोघांनीं आमचे बालाजी मंदिरांत प्रवचनें व्हावीं, आम्ही सर्व व्यवस्था करूं, असें सांगितल्यावरून सदर प्रवचनें खाडिलकरांनीं बालाजी मंदिरांत उपनिषदांवर केलीं. एक त्यांचें जाहीर

प्रवचन कारंजाजवळ ज्ञानेश्वरीवर आम्ही मंडळींनीं घडवून आणलें होतें.

यावेळीं नवाकाळची सर्व सुव्यवस्था लागून काकासाहेब त्यांतून निवृत्तहि झाले होते. गांधीयुगाच्या राजकारणाची धुरा धरून व त्यांत शरीरकष्टहि सहन करून एक प्रकारची तपस्वी ऋषीची शांति त्यांच्या वाणींत आली होती. जीवनयज्ञाची एक प्रकारें सांगता होत असल्याचें समाधान काकासाहेबांच्या शब्दाशब्दांत ओसंडत होतें. त्यांनीं प्रवचनाला घेतलेला श्लोकहि मला चांगला आठवतो. " तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् । ददामि बुद्धियोगं तं येन मां उपयांति ते " हा दहाव्या अध्यायाचा श्लोक त्यांनीं विवेचनास घेतला होता.

" न मे भक्तः प्रणश्यति " हें प्रवचनाचें महावाक्य होतें. जणू काय आपलें मागलें सर्व जीवन आठवून, त्यांत ईश्वरानें केलेलें सहाय्य आठवून, थोडेसे लक्षणेनेंच पण आत्मपर काकासाहेब बोलत आहेत, असें श्रोत्यांना वाटलें. लो. टिळकांच्या केसरीची सेवा मोठ्या निष्ठेनें त्यांनीं केली होती. पण केसरीच्या संपादकाची पायाखालची वाळू घसरून गेल्यावर त्यांना थोडेसें असहाय्यसें झालें होतें. तो प्रसंग जणूं कांहीं वरील श्लोकाच्या विवेचनांत लक्षणेनें चितारून त्यावरील ज्ञानेश्वर महाराजांच्या ओव्या वाचूं लागल्यावर त्यांचे डोळ्यांत ईश्वर माउलीच्या प्रेमाचें पाणी चमकूं लागलें. तें जो जो खेळ दावी। तो तो पुढें सोनियाचा करूनी ठेवी। तैसी उपास्याची पदवी। पोपीत मी जायें ॥' या ज्ञानेश्वर महाराजांच्या ओव्या म्हणतां म्हणतां 'मुंबईच्या नव्या काळाचा' सोनयाचा खेळ परमेश्वरानें खाडिलकरांपुढें कसा धरला, याचें चित्र चाणाक्ष श्रोत्यांच्या मनापुढें तत्काळ उभें राहिलें. खाडिलकर हे केवळ देशभक्तच नव्हते, तर ईश्वरभक्तहि अंतर्यामीं कसे होते, याचा साक्षात्कार श्रोत्यांच्या मनास तावडतोब झाला.

# श्री. पु. ह. गद्रे, वकील, नाशिक

## नाशिकचा मुक्काम

माझ्या विनंतीवरून माझे बंगल्यावर १५ आक्टोबर १९३७ पासून २४ ऑक्टोबर १९३७ पर्यंत कै. काकासाहेब आले होते. त्यावेळीं कै काकासाहेबांनीं नाशिककरांचे विनंतीस मान देऊन श्रीबाळाजी मंदिरांत सात दिवस ओंकार उपनिषदावर प्रवचनें केलीं. गांवांतील सुशिक्षित वर्ग मोठया औत्सुक्यानें श्रवणाचा लाभ घेत होता. शेवटच्या दिवशीं गांवातर्फे अनेकांनीं प्रवचनांबाबत प्रशंसोद्गार काढले.

## योगाच्या प्रक्रियेचा अभ्यास

गीतेसंबंधीं मी त्यांचेबरोबर बोलत असतां सहाव्या अध्यायांत 'समं कायशिरोग्रीवं धारयन् अचलं स्थिरः' या श्लोकावर व त्यानंतर ४–५ श्लोकांवर टीका लिहितांना श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं योगाची प्रक्रिया सविस्तर वर्णन केली आहे, त्यासंबंधीं विषय निघाला. मी कै. काकासाहेबांना म्हणालों कीं, ही प्रक्रिया इतकी अवघड आहे कीं, प्राणांची पर्वा न करतांना कोणचीहि गोष्ट घसास लावण्याची जर्मन लोकांची हातोटी आहे; सबब या प्रक्रियेचा अनुभव कष्ट व जोखीम न जुमानतां फक्त जर्मन घेऊं शकतील. त्यावर कै. काकासाहेब म्हणाले कीं, मी स्वतः श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं वर्णन केलेल्या योगाचा अभ्यास चालविला होता व हळुहळू कांहीं प्रगतीहि झाली होती. परंतु त्यास लागणारें मानसिक स्वास्थ्य, आवश्यक लागणारा वेळ, आजूबाजूचें शांत वातावरण यांचा अभाव व नवाकाळचा व्याप यामुळें मला तो नाद सोडून द्यावा लागला. परंतु त्यांत अशक्य असें कांहीं नाहीं.

घरीं असतांना बहुतेक वेळ ते डोळे किलकिले करून स्वस्थ पडत. मी

धारिष्ट करून त्यासंबंधीं विचारलें असतां ते म्हणाले कीं, मीं साक्षित्वाचा अभ्यास सुरू केला आहे. डोक्यांत आलेल्या विचारांकडे त्रयस्थ दृष्टीनें पहाण्याचा ते अभ्यास करीत. पुढें पुढें विचारांचा लय होऊन ते तन्मय होत.

जातांना ते गहिंवरले व मला म्हणाले, 'तुम्हीं पुत्रवत् वागलां, माझा काल अत्यंत आनंदांत गेला. पुढें भेट केव्हां होईल ती होवो.' तेंच खरें ठरलें, पुन्हां भेट झालीच नाहीं.

## श्री. द. गो. दीक्षित, एम्. ए., वसई,

### नागपूर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

१९२३ सालीं नागपूर येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष काकासाहेब असल्यामुळें मी मोठ्या उत्सुकतेनें त्या संमेलनास हजर राहिलों होतों; व त्या वेळचें त्यांचें अध्यक्षीय भाषणहि त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणेंच जोरदार, विचारपरिप्लुत व आवेशयुक्त असें झालें. या भाषणावर त्यावेळच्या वृत्तपत्रांत अनेक अनुकूल व प्रतिकूल अभिप्रायहि आले होते; ते ज्यांनीं वाचले असतील त्यांना त्यांतील रहस्य कळलें असेलच. परंतु या भाषणांत त्यांनीं लोकमान्यांविषयीं जी एक गोष्ट मोठ्या आदरानें व गौरवानें सांगितली होती, ती माझ्या अजूनहि लक्षांत राहिली आहे.

लेखकाची भावना उत्कट झाली असतां, त्याला अनुकूल शब्द आपोआप कसे सुचतात, व ते सुचल्यावर त्याला समाधानाचा अपूर्व आनंद कसा होतो, हें सांगतांना ते म्हणाले कीं, "लो. टिळकांच्या नागपूर–वऱ्हाडकडील दौऱ्यांत मी त्यांच्याबरोबर असतांना, एक दिवस आमचा मुक्काम अकोला येथें पडला होता. त्याच्या अगोदर पुष्कळ दिवस "ब्युरॉक्रसी" या इंग्लिश शब्दाला समानार्थक असा शब्द लोकमान्य शोधीत होते, परंतु

तो त्यांना कांहीं सांपडेना. परंतु अकोला येथें असतांना, व्याख्यान देतांना सायंकाळीं त्यांना त्याचा समानार्थक असा 'नोकरशाही' हा शब्द सुचला आणि त्या दिवशीं त्यांना अवर्णनीय असा आनंद झाला. तो इतका कीं, तशा प्रकारच्या आनंदानें फुललेला त्यांचा चेहरा मला पुन्हां केव्हांहि पहावयास मिळाला नाहीं !"

संमेलन आटोपल्यावर, तेथें जमलेल्या लोकांशीं खासगी रीतीनें चर्चा करतांना, ते एकदां म्हणाले होते कीं, 'ज्या लेखांबद्दल लोकमान्यांना शिक्षा झाली होती, ते मींच लिहिले होते. त्यापैकीं पहिला लेख केसरींत जेव्हां प्रसिद्ध झाला, तेव्हां मुंबईच्या टाइम्सनें त्याची बरीच स्तुति केली. त्यामुळें मी साहजिकपणेंच बराच हुरळून गेलों. परंतु लोकमान्यांनीं त्याचवेळीं मला बजाविलें कीं, "या स्तुतीनें तुम्हीं हुरळून जाऊं नका. कारण ही स्तुति म्हणजे पुढील अरिष्टाची निदर्शक अशी आहे. मला तर अशी खात्री वाटते कीं, या लेखाबद्दलच आपल्यावर सरकारकडून तोहमत लवकरच येईल." त्याप्रमाणें लवकरच लोकमान्यांवर खटला भरण्यांत येऊन, त्यांची मंडालेस रवानगी झाली हें प्रसिद्धच आहे. काकासाहेबांच्या या दुसऱ्या आठवणीवरून लोकमान्यांची अचूक राजकीय दृष्टि जशी दिसून येते, तसाच लोकमान्यांचा काकासाहेबांवर किती विश्वास होता, व त्यांच्या अंतरंगांतील रहस्यें हि त्यांना कशीं माहीत होतीं, हें दिसून येतें.

## सभासंचालनांतील सौजन्य

नागपूर साहित्य संमेलनाच्या बैठकींत काकासाहेबांच्या स्वभावाचे व वागणुकीचेहि कांहीं विशेष प्रसंगा-प्रसंगानें माझ्या नजरेस आल्यावांचून राहिले नाहींत. यापैकीं पहिला प्रसंग विषयनियामक कमिटींतील एका बैठकींत घडून आला. ही बैठक रात्रीं १० च्या सुमाराला भरली होती.

त्यांत दुसरे दिवशींच्या साहित्य संमेलनाच्या सभेंत अश्लीलतेचा ठराव आणावा कीं नाहीं, या विषयावर बराच वाद झाला. शेवटीं काकासाहेबांनीं तेथील सभासदांपैकीं जे अनुकूल असतील, त्यांना हात वर करण्यास सांगून वादाचा निकाल करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें बऱ्याच सभासदांनीं हात वर केल्यामुळें त्यांनीं ते तोंडींच मोजून, सभेचें मत ठरावाला अनुकूल आहे, असें जाहीर केलें. परंतु त्याला विरोध करणारे जे कित्येक लोक तेथें होते, त्यांना ही गोष्ट पसंत पडली नाही. म्हणून त्यांपैकीं एकजण म्हणाले 'अशा तोंडी हात मोजण्यानें मतांची संख्या बरोबर कळत नाहीं; म्हणून आम्हांला लेखी मतें पाहिजेत. कारण काकासाहेबांना यावेळीं कदाचित् त्यांच्या वार्धक्यामुळें बरोबर न दिसलें असण्याचाहि संभव आहे." ते उद्गार ऐकल्यावर तेथील एक सभासद लगेच रागावून म्हणाले कीं, 'वार्धक्यामुळें जर काकासाहेबांना बरोबर दिसलें नसेल, तर तारुण्यामुळें तुमचेंहि कदाचित् डोकें फिरलें असण्याचा संभव आहे." परंतु ही या दोघांची हमरीतुमरी चालली असतां काकासाहेब अगदीं शांत होते.

काकासाहेबांचा हा शांत स्वभाव दुसऱ्या दिवशींच्या बैठकींतहि चांगल्या रीतीनें निदर्शनास आला. त्या बैठकींत याच ठरावावर कलकत्त्याचे एक वक्ते श्री आघारकर यानीं भाषण करण्यास श्री. काकासाहेबांजवळ परवानगी मागितली असतां, ती त्यांनीं दिली नाहीं. त्यामुळें ते गृहस्थ फार चिडले, व आपला सूर तारसप्तकांत चढवून त्यांना म्हणाले, "आपण कोणत्या नियमानें मला ही भाषणबंदी करता?" त्यावेळीं काकासाहेब रागावून, कांहीं तरी तापटपणाचें प्रत्युत्तर करतील, असें आम्हां सर्वांना वाटलें. परंतु तसें कांहीं न करतां, ते शांतपणें इतकेंच म्हणाले की, "तुम्हा सर्वांच्या मेहेरबानीनेंच मी या खुर्चीवर बसलों आहें, तुम्हांस पसंत नसेल तर मी ती सोडून जातों."

# श्री. शं. ना. सहस्रबुद्धे, अमरावती

## आत्मस्तुतीविहल अनासक्ति

ज्या श्री. खाडिलकरांना त्यांच्या नाटकांतील नाट्यकला-गुणविशेषांमुळेंच "नाट्याचार्य" ही पदवी स्वयंभूपणेंच प्राप्त झाली, त्या खाडिलकरांच्या नाटकांवर मी "नाट्याचार्य खाडिलकर" हा दीर्घ प्रबंध लिहून प्रसिद्ध केला; त्यांतील गौरवपर भाग पाहून खाडिलकरांचा आणि माझा अगदीं दाट परिचय असावा असाहि कांहींचा समज झाला असल्यास त्यांत नवल नाहीं. परंतु आश्चर्याची गोष्ट कीं, काकासाहेबांची आणि माझी तोंपर्यंत साधी मुलाखतहि झाली नव्हती. ओळख व्हावी अशी इच्छा मात्र तीव्र होती. अखेर एक दिवस-१९३४ च्या डिसेंबर महिन्यांत-मुंबईस त्यांच्या स्वत:च्या 'नवाकाळ वाडीं'त त्यांच्या घरीं जाऊन त्यांना भेटलों. पण कसली भेट आणि कसलें काय? त्यावेळीं काकासाहेब एका बाकावर काळी घोंगडी टाकून बसलेले होते. तें काळ्या कांबळीच्या बैठकीचें रुक्ष दृश्य पाहून मी अर्धा अधिक जिरून गेलों!

काकासाहेबांची आणि माझी दृष्टभेट झाल्यावर प्रथम मी कोण, कोठला, याची साधी विचारपूस करून नाट्याचार्यांनीं माझ्या येण्याचा आशय विचारतां मी मनांतून मोठ्या ऐटीनें पण वरकरणी विनय दाखवून पुस्तकावर अभिप्राय व्यक्त व्हावा अशी अपेक्षा निवेदन केली. त्यावर "तुमच्या लिखाणावर अभिप्राय देऊन तुमचा बुद्धिभेद किंवा मार्गदर्शन करण्यांत स्वारस्य नाहीं. तुमच्या स्वतंत्र दृष्टिकोनाचें म्हणजे अभिप्रायाचें लिखाण प्रसिद्ध होणें हेंच जास्त इष्ट!" या दोनच सूत्रमय वाक्यांत आणि दोन तीन मिनिटांतच, नाट्याचार्यांनीं माझी बोळवण करून मला वाटेला लावलें!

त्यावेळीं माझी अत्यंत निराशा झाली खरी, पण मी माझ्या बुद्धीनें पसंत केलेल्या माझ्या ग्रंथगुरूची आपल्या आत्मस्तुतिविषयीं अनासक्ति पाहून नाट्याचार्यांच्याबद्दलचा माझा आदरभाव द्विगुणित नव्हे तर शतगुणित झाला, आणि त्या आनंदाभिमानाच्या समाधानानें माझ्या निराशेची पूर्ण भरपाई झाली.

माझ्या "नाट्याचार्य खाडिलकर" ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगीं गु. काका-साहेब सांगलीस होते. तेथून त्यांना पुण्यास समक्ष आणून मोठ्या सन्मानानें त्यांना आपला ग्रंथ प्रत्यक्ष अर्पण करावा, या विचारानें काकासाहेबांचे जिगरदोस्त स्नेही कै. वासुकाका जोशी यांचे मार्फत मीं कमालीचा प्रयत्न केला आणि वासुकाकांनींहि मोठ्या उमेदीनें आणि हर्ष्यानें तें माझें काम अंगावर घेतलें. पण काकासाहेबांनीं त्या प्रयत्नालाहि दाद दिली नाहीं. तो मानसन्मानाचा प्रसंग निश्चयेंकरून टाळला आणि नाट्याचार्यांनीं माझी पुन्हां निराशा केली.

माझ्या ग्रंथ–प्रकाशनापूर्वी जरी नाहीं, तरी ग्रंथ–प्रकाशन होऊन त्यांतील त्यांचा गुणगौरव वाचल्यानंतर तरी त्यांच्या तोंडून त्यांच्या अभिप्रायाच्या निमित्तानें आपल्या रसिकतेचें कोड–कौतुक करून घ्यावें म्हणून मी सांगलीहून मुंबईस जात असतांना मध्यंतरी पुण्यास कै. शंकरराव जोशी ( चित्रशाळा ) यांचे घरीं त्यांना गाठून मोठ्या उत्कंठित आशेनें माझ्या ग्रंथावरील त्यांचा अभिप्राय विचारला. 'पुस्तक बरें लिहिलें आहे, भाषा वगैरे चांगली आहे,' एवढाच त्यांनीं त्रोटक अभिप्राय दिला. परंतु तेवढ्यानें माझें समाधान होण्यासारखें नव्हतें, सबब जरा खोदून विचारतां 'आठ पंधरा दिवसांच्या सवडीनें केव्हां तरी या, म्हणजे जास्त बोलतां येईल,' असें आश्वासन दिलें आणि तो विषय तेथेंच थांबला; कारण त्यांच्या त्या तशा निवांत भेटीचा योग पुढें कधीं आलाच नाहीं!

त्यानंतर त्यांच्या अत्यंत लोकप्रिय अशा 'कीचकवध' नाटकावरील माझी 'कीचकवध समीक्षा' ही पुस्तिका त्यांना देऊन त्यावर त्यांचा अभिप्राय विचारतां 'विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें पुस्तक ठीक लिहिलें आहे' इतकाच तोकडा अभिप्राय देऊन नाट्याचार्य स्तब्ध राहिले. त्यावेळींहि गुरुवर्यांकडून आपली धसघशीत पाठ थोपटून घेण्याची माझी मनीषा तशीच राहिली.

विरोधभावदर्शनानें तरी काकासाहेबांबरोबर घसटीचें बोलणें करतां येईल या बुद्धीनें 'कीचकवध' नाटकांतील शेवटच्या भैरवाच्या प्रवेशा-संबंधानें मीं माझा मतभेद त्यांच्यापुढें प्रदर्शित केला. माझा मतविरोध मी नाट्याचार्यांचे पुढें मांडला असतां 'मीं केलें आहे तेंच बरोबर आहे' एवढया एकाच नेटक्या उत्तरानें त्यांनीं माझा विषय हातानिराळा केला. माझ्या मनांत पुन्हां त्यावर छेडछाड करावी असें होतें, पण माझी हिंमत झाली नाहीं.

एकंदरींत माझ्या ग्रंथगुरूनें माझ्या आणि इतर पुष्कळांच्याहि अपेक्षे-प्रमाणें माझ्यावर कृपालोभ असा कधींच केला नाहीं, नव्हे दाखविलाहि नाहीं. तथापि त्यांचें शेवटचें 'त्रिदंडी संन्यास' नाटक त्यांच्या चिरंजीवांच्या मध्यस्थीनें मला 'सप्रेम भेट' म्हणून त्यांच्या स्वाक्षरीसह मिळालें. तेंच काय तें माझ्याजवळचें त्यांचें कृपाचिन्ह!

# म. भा. भू. ज. र. आजगांवकर

## ४३ वर्षांचा परिचय

कै. कृष्णाजी प्रभाकर उर्फ काकासाहेब खाडिलकर यांचा व माझा परिचय सुमारें ४३ वर्षांचा होता. त्यांच्या मागें आतां 'केसरी' चा जुन्यांतला जुना लेखक असा मीच हयात आहें.

१९०५ सालीं मी पुण्यास गेलों व १९१२ पर्यंत तेथें राहिलों. लो. टिळक, कृष्णाजीपंत खाडिलकर, नरसोपंत केळकर, दत्तोपंत लिमये यांचा व माझा पुढें सहा वर्षांत अगदीं दृढ परिचय झाला. काकासाहेब त्यावेळीं सोटया म्हसोबाच्या पिछाडीस एका घरांत रहात असत व मी तेथून जवळच सात तोटयांच्या हौदाजवळ वाडेकऱ्यांच्या चाळींत रहात असें. चित्रशाळेंत माझी व काकांची वरचेवर गांठ पडावयाची. एकदां काका मला मोठया आग्रहानें आपल्या घरीं घेऊन गेले होते. तेथें वीणा, तबला वगैरे गायन-साहित्याची काकांनीं नुकतीच जुळवाजुळव केली होती. 'मानापमान' नाटकांतील पदांची रचना चालू होती; व त्यासाठीं गायनाची स्वतःस थोडीबहुत माहिती असावी म्हणून काकांनीं हें साहित्य जमविलें होतें. त्या सुमारास 'केसरी' शीं असलेला काकांचा संबंध तुटला होता व 'मानापमान' हें संगीत व प्रेमध्वज हें गद्य नाटक लिहिण्यांत ते गुंतले होते.

## करारी व उपकारी स्वभाव

काकांचा स्वभाव अगदीं सडेतोड होता. पूर्ण विचारांतीं जें काय करावयाचें किंवा लिहावयाचें एकदां ठरविलें त्यांत सहसा बदल करावयाचा नाहीं, असा त्यांचा बाणा होता. त्याचप्रमाणें स्वतःवर किंवा स्वतःच्या नाट्यकृतींवर कोणी किती कडक टीका केली तरी त्याला उत्तर द्यावयाचें नाहीं असा त्यांचा नियम होता, व शेवटपर्यंत तो त्यांनीं अगदीं बिनचूक पाळला. याबाबतींत त्यांची अगदीं 'गेंडयाची कातडी' होती असें म्हटल्यास चालेल. तात्यासाहेब केळकरांचें याच्या अगदीं उलट असे; त्यांच्यावर कोणी टीका केली आणि तिला त्यांनीं उत्तर दिलें, नाहीं असें सहसा व्हावयाचें नाहीं.

१९१० च्या सुमारास मी पुण्यांत असतांना माझ्या छातींत मधून मधून कळ येऊं लागली म्हणून मीं मुंबईस येऊन येथील कांहीं डॉक्टरांकडून

तपासून घेतलें एक दिवशीं मी गिरगांवांतून चाललों असतां काका मला मोहन बिल्डिंगजवळ भेटले. ते कांहीं कामासाठीं मुंबईत आले होते. मला पहातांच त्यांनीं विचारलें, "आजगांवकर, इकडे कुठें?" माझी प्रकृति नीट नसल्याचें मी त्यांना सांगितलें, तेव्हां ते म्हणाले "चला मी तुम्हाला डॉ. नानासाहेब देशमुखांकडे घेऊन जातों" आणि त्याक्षणीं ते मला डॉक्टर नानासाहेबांकडे घेऊन गेले. काकांच्या सांगण्यावरून डॉ. नानासाहेब यांनीं मला काळजीपूर्वक तपासलें, धीर दिला आणि फी घेतली नाहीं. काकांनीं डॉक्टर साहेबांशीं करून दिलेल्या या ओळखीची परिणति शेवटीं अगदीं दृढ परिचयांत झाली व त्यामुळें मला पुढें लाभ झाला.

## हरिदासाचा पेशा आवडतो

काका मुंबईत येऊन स्थायिक झाल्यावर, पहिल्यानें भटवाडींतल्या एका इमारतींत रहात असत. तेथें मी एकदां गेलों असतां भिंतीशीं वीणा टेंकून ठेवलेला पाहिला. त्यावरून गायनवादनाचा त्यांचा अभ्यास मधून मधून बरेच दिवस चालू असावा असें मला वाटतें. संगीत नाटकें लिहिण्याचा प्रसंग येतांच, संगीताची स्वतःस थोडीबहुत माहिती असलेली बरी असें वाटल्यावरूनच त्यांनीं हा अभ्यास केला असावा. "लोकमान्यांप्रमाणेंच मला हरिदासाचा पेशा फार आवडतो," असें मजपाशीं ते एकदां म्हणाल्याचें मला आठवतें.

काका अहमदाबादच्या तुरुंगांतून सुटून आल्यावर मी त्यांना भेटावयास गेलों असतां त्यांनीं मला अनेक गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले, "तुरुंगावरील अधिकाऱ्यांनीं मला फार चांगल्या रीतीनें वागविलें, परंतु तेथें असतांना माझ्या अंगास एकदां इतका पुरळ उठला आणि त्यामुळें अशी खाज येऊं लागली कीं, मला माझा मृत्यु जवळ आला असावा असें वाटलें. डॉ. नानासाहेब देशमुख मृत्यु पावले, त्यापूर्वीं त्यांच्या अंगास असाच

पुरळ उठला होता. परंतु सुदैवानें त्यांतून लवकरच बरा झालों"

## पुण्यांत स्वतःचें घर

एकदां नाटकांची गोष्ट निघाली. आपल्या गद्य नाटकांस अधिक प्राप्ति आपणांस झाली नाहीं; पुस्तकांवर काय पैसा मिळाला असेल तेवढाच, असें त्यांनीं सांगितलें. संगीत नाटकांवर मात्र चांगला पैसा मिळाला व त्या पैशाच्या आणि चित्रशाळेचे मालक काकासाहेब जोशी यांजकडून मिळालेल्या मदतीच्या जोरावर आपण 'नवाकाळ' पत्र व 'दत्तात्रेय' मुद्रणालय सुरू केलें असेंहि ते म्हणाले. पुढें ते म्हणाले, 'एक गोष्ट माझ्या मनांत येते; ती कोणती म्हणाल तर तात्यासाहेब केळकरांना पुण्यांतच राहतां आलें आणि मला माझें नशीब काढण्यासाठीं मुंबईंत यावें लागलें. ही एक वजा केल्यास तात्यासाहेबांच्या आणि माझ्या स्थितींत फारसा फरक नाहीं. माझा स्वतःचा प्रेस आहे, स्वतःची इमारत आहे व स्वतःचें दैनिक पत्र आहे.'

मृत्युपूर्वी सुमारें सहा महिने मी कांदेवाडींत काकासाहेबांस भेटावयास गेलों होतों. ते फारच क्षीण झालेले दिसले व पहिल्यानें मला त्यांनीं ओळखलें नाहीं. नंतर ओळख पटतांच, आपण पुण्यांत एक घर विकत घेतल्याचें त्यांनीं मला सांगितलें. तेव्हां मी त्यांना त्यांच्या पूर्वीच्या उद्गारांची आठवण देऊन म्हटलें, "आतां पुण्यांत तुमचें स्वतःचें घर झालेलें असल्यामुळें, आपणास पुणें सोडावें लागलें असें वाटण्याचें आतां कांहीं कारण राहिलें नाहीं." हें ऐकून त्यांनीं स्मित केलें, फार मोठ्यानें हंसण्याची त्यांना संवयच नव्हती.

## श्री. सौ. कमलाबाई किबे, इंदूर.

कै. काकासाहेबांचा व माझा परिचय अगदीं निकटचा होता, हें वाचून अनेकांना आश्चर्याचा धक्काच बसेल. पण हें अगदी खरें आहे. ते केसरीचे

संपादक आणि मी त्याची नियमित वाचक एवढा साहित्यिक परिचय पुरे नाहीं का? मीं त्यांना प्रथम पाहिलें तें बडोद्याच्या साहित्यसंमेलनांत. खास साहित्यिकांच्या विद्येचा प्रभाव पहावा आणि दर्शनाचा लाभ घ्यावा या इच्छेनेच मी बडोद्यास गेलें होतें. त्या वेळेला साहित्यिकांच्या सदरांत माझा अधिकार नव्हता. मी एक भाविक साहित्यिक प्रेक्षक आहें, एवढेंच मला कळत होतें. त्यामुळें त्यांना मीं दुरूनच पाहिलें. मला वाटतें त्यांच्याजवळ कै. चिंतामणराव वैद्यहि बसलेले होते. त्या दोन साहित्यिक आराधकांना बघून मला धन्यता वाटली. एक महिला या नात्यानें मला प्रत्यक्ष त्यांना भेटण्याचें धैर्य झालें नाहीं.

नागपूर संमेलनांत ते अध्यक्ष असतांना त्यांनीं मला एक दोन विषयांवर आपण होऊन बोलण्यास सांगितलें. त्याबद्दल मला अद्यापहि सात्विक अभिमान वाटतो. त्यांच्या अध्यक्षतेखालीं झालेलें मराठी साहित्यसंमेलन नागपूरच्या लोकांना एक चिरस्मरणीय व अभिमान धरण्याची गोष्ट आहे. अश्लील वाङ्मय हा विषय होता. मीच शेवटली बोलणारी होतें, असें मला अंधुक आठवतें. शिवाय त्याच वेळीं त्यांनीं साहित्य परिषदेच्या कायम फंडाकरितां मागणी केली होती. त्यानंतर मराठी साहित्य–परिषदेच्या एकाहि अध्यक्षानें फंड गोळा केला नाहीं, ही एक खेदजनक गोष्ट आहे.

श्री. काकासाहेबांच्या मृत्यूची वार्ता नवाकाळमध्यें वाचली. नंतर आमच्या दृष्टीनें एक आश्चर्यकारक घटना म्हणजे त्यांचे और्ध्वदेहिक अस्थिविसर्जनविधि नाशीकच्या रामकुंडावरील आमच्या घराण्याच्या धर्मशाळेंतच केले गेले. जीवसृष्टींतील पंचमहाभूतांचा संबंध कोठून व कसा असतो, हें एक सृष्टीचें न उकलणारें गूढच आहे.

# काकासाहेबांविषयीं राजकीय नेत्यांच्या आठवणी

## गव्हर्नर जनरल राजाजी यांचें पत्र

GOVERNMENT HOUSE
NEW DELHI

14th June 1949

Dear Khadilkar

While I recall with affection all that Kaka Khadilkar was to me and my associates during the difficult and exciting times when Gandhiji's message was taken to the people of Maharashtra and had to contend against older ideas, I am not in a position to make any contribution to the Reminiscence column. I hope you will understand my difficulty.

Yours sincerely
C. Rajagopalachari

## ग. ज. राजाजी यांच्या पत्राचा अनुवाद

गव्हर्मेंट हौस
नवी दिल्ली,
१४ जून १९४९

प्रिय खाडिलकर,

महात्माजींचा संदेश महाराष्ट्रीय जनतेपर्यंत पोचविण्याच्या व जुन्या कल्पनांशीं झगडण्याच्या कठीण व प्रक्षोभजनक काळांत काका खाडिलकरांनीं मला व माझ्या सहकाऱ्यांना जें सहाय्य केलें तें मला प्रेमादरपूर्वक आठवतें, मात्र मी स्मरणीच्या सदरांत कांहीं भर घालण्याच्या परिस्थितींत नाहीं. तुम्हीं माझी अडचण ओळखाल अशी मला आशा आहे.

आपला,
सी. राजगोपाळाचारियर

## दे. गंगाधरराव देशपांडे, बेळगांव.

### पंडितजींचें द्रव्यसहाय्य नाकारलें

१९२४ च्या बेळगांव काँग्रेसमध्यें काँग्रेसमधील "स्वराज्य पक्षाला" मान्यता मिळाली व त्या पक्षाचें नेतृत्व पं. मोतीलालजींच्याकडे आलें. कांहीं काळानंतर स्वराज्य पक्षांत मतभेद उत्पन्न झाले. महाराष्ट्रांतील प्रसिद्ध वर्तमानपत्र "केसरी"चे संपादक कै. तात्यासाहेब केळकर मोतीलालजींच्या पक्षाच्या विरोधी पक्षांत प्रमुख होते. त्यामुळें आपल्या बाजूचें एक मराठी पत्र असावें असें पंडितजींना वाटलें तसें वजनदार दुसरें पत्र काकासाहेब खाडिलकरांचें "नवाकाळ" आहे हें पंडितजींना कळल्यानंतर काकासाहेबांची भेट घेण्याचें त्यांनीं ठरविलें, व त्यांचा मुक्काम मुंबईत असतांना

त्यांनीं काकासाहेबांना अमुक दिवशीं भेटण्यास कळविलें. माझी व पंडितजींची ओळख असल्यामुळें मी पंडितजींच्या भेटीच्या वेळीं त्यांचेबरोबर असावें असें काकासाहेबांना वाटून मला त्यांनीं बोलाविलें व त्याप्रमाणें काकासाहेब व मी मिळून पंडितजींच्या भेटीला गेलों. पंडितजी त्या मुक्कामांत टाटांच्याकडे राहिले होते. काकासाहेबांची व पंडितजींची रीतीप्रमाणें ओळख झाल्यानंतर काँग्रेसच्या संमतीनें स्थापन झालेल्या स्वराज्य पक्षास काकासाहेबांचा पाठिंबा असावा असें पंडितजींनीं आपलें म्हणणें मांडलें. त्याला काकांनीं आपली संमति दिली व तेंच काम काका करीत आहेत असें मीं म्हटलें. पुढें बोलतां बोलतां पंडितजींनीं पत्राला कांहीं द्रव्यसहाय्य पाहिजे कीं काय अशी पृच्छा केली. त्यावेळीं पंडितजींनीं काकासाहेबांस देण्याकरितां दहा हजार रुपयांचा चेक तयार ठेवला होता. पण काकांनीं त्यांची मदत नाकारली आणि त्यांचे आभार मानले. काकांनीं जेव्हां चेक घेण्याचें नाकारलें त्यावेळीं चेकची रक्कम वाढविण्याचें पंडितजींनीं सुचविलें. चेक कमीचा आहे असें वाटल्यावरून काकांनीं तो नाकारला अशी पंडितजींची कल्पना झाली असावी. पण काकांनीं 'मी तुमचेंच काम करीत आहें, व पुढेंहि करीन; त्याला पैसे काय करावयाचे आहेत?' असें म्हणून त्या प्रश्नाचा निकाल लावला.

त्या वेळच्या बोलण्यावरून काकांना चांगलें द्रव्यसहाय्य मिळालें असतें, यांत शंकाच नाहीं. पण कोणाकडून द्रव्य घेऊन त्याच्या मिंधेपणांत कार्य करावें हें काकांच्या स्वभावांतच नव्हतें.

## थैलीला नकार

काकासाहेब साबरमतीच्या जेलमध्यें होते व त्यांची सुटण्याची वेळ जवळ येत लागली होती. त्यावेळीं वासुकाका जोशी व मी त्यांना भेटण्याकरितां

त्यांचे चिरंजीव यशवन्त यांचे बारोबर साबरमतीला गेलों होतों. जाण्यापूर्वी वासुकाकांचें व माझें बोलणें झालें होतें व काका सुटल्यानंतर त्यांचा सत्कार करावा व त्यांच्या करितां एक चांगली थैली Purse जमवावी व ती त्यांना अर्पण करावी असें आमचें ठरलें होतें. पण काकांचा स्वभाव आम्हाला माहीत असल्यामुळें त्यांच्या संमतीशिवाय केलेला अशा प्रकारचा उद्योग त्यांना आवडणार नाहीं, याची आम्हाला खात्री होती. म्हणून जेलमध्यें त्यांना भेटून या आमच्या कामाला त्यांची संमति मिळविण्याचा प्रथम प्रयत्न करून पहाण्याचें ठरवून आम्हीं गेलों होतों. काकांची भेट झाली. आम्हाला पाहून त्यांना आनंद वाटला. ते अगदीं गहिंवरून आमच्याशीं बोलत होते. ही संधी आमचा विषय काढायला बरी आहे असें वाटून आम्ही आमची योजना अत्यंत कळकळीनें त्यांच्यापुढें मांडली. पण एका निमिषाचाहि वेळ न घेतां काकांनीं संमति देण्याचें नाकारलें व तसें न करण्याबद्दल आम्हाला निक्षून सांगितलें. त्यांच्या इच्छेविरुद्ध जाणें आम्हांला शक्यच नव्हतें.

तिसऱ्यांदा एकदां असाच प्रसंग आला होता. "नवाकाळ" त्यावेळीं अडचणींत होता व दहा हजार रुपयांची अत्यंत जरुरी होती. माझ्याजवळ काकांनीं ही गोष्ट काढली. "नवाकाळ" ची काँग्रेस सेवा इतकी भक्कम व प्रसिद्ध होती कीं, दहा हजार रुपये मिळवणें कांहीं कठीण नव्हतें. इतकेंच नाहीं, यापेक्षां मोठी रक्कम उभारणें सहज शक्य झालें असतें व तें मी करूं शकलों असतों. काकांना त्याप्रमाणें मीं विचारलें पण, या गोष्टीला त्यांनीं स्पष्ट नकार दिला. दहा हजार रुपये कर्ज मिळविण्याचा प्रयत्न करण्यास मला त्यांनीं सांगितलें. एका मित्राच्या मदतीनें ही गोष्ट होण्याला वेळच लागला नाहीं. काकांनीं ठरलेल्या मुदतीच्या आंत या देण्याचा निकाल केला हें सांगावयास नकोच.

## राष्ट्रमताकरितां सोसलेली झीज

पुण्याला ब्रह्मगिरीबुवा या नांवाचे एक निष्ठावंत कार्यकर्ते होते. लो. टिळकांविषयीं व त्यांच्या कार्याविषयीं त्यांना फार आस्था व कळकळ असे. काकांचा व त्यांचा स्नेह होता. लो. टिळकांच्या प्रेरणेनेंच मुंबईला 'राष्ट्रमत' या पत्राची पूर्वयोजना सर्व झाली होती. पण, तितक्यांतच त्यांच्यावर खटला होऊन त्यांना ६ वर्षांची शिक्षा झाली त्यामुळें राष्ट्रमताची स्थिति बरीच बिघडली. पुढें माझा व त्या पत्राचा संबंध आला. काकांच्या सांगण्यानें ब्रह्मगिरीबुवांनीं ऋण काढून राष्ट्रमताला मदत केली होती. हें कर्ज एका प्रतिष्ठित कार्यकर्त्या म्हणून गाजणाऱ्याकडूनच काढलें होतें. पण, कर्जाची वेळेवर फेड न झाल्यामुळें प्रकरण कोर्टांत गेलें व ब्रह्मगिरीबुवांच्या घरावर जप्ती आली, असें मला आठवतें. त्यावेळीं काकांनीं अर्धे रुपये भरले व मला अर्धे देण्यास सांगितलें, त्याप्रमाणें मीं दिले. पण, काकांना 'तुम्ही अर्धी रक्कम कां भरता, वास्तविक सर्वच रक्कम राष्ट्रमताकरितां खर्च झाली आहे म्हणून ती मी भरतों" असें मीं म्हटलें. परंतु, काकांनीं माझें म्हणणें मान्य केलें नाहीं. माझ्या सांगण्याप्रमाणें बुवांनीं कर्ज काढलें म्हणून मलाहि तें भरलेंच पाहिजे, याकरितां तुमचा अर्धा हिस्सा व माझा अर्धा, अशी त्यांनीं तोड काढली.

## नवाकाळची स्थापना

नागपूरच्या १९२० च्या काँग्रेसमध्यें प्रचंड मतांनीं गांधीजींचा असहकारितेचा ठराव मंजूर झाला. त्या वेळीं काँग्रेसचा प्रचार करणारें दैनिक नव्हतें म्हणून मुंबईस एक मराठी दैनिक असावें असें मला वाटलें व नागपूरासच या गोष्टीची चर्चा होऊन डॉ. भडकमकर, तात्यासाहेब केळकर, शिवरामपंत परांजपे, वासुकाका जोशी वगैरे मंडळीबरोबर चर्चा

झाली व सर्वांच्या विचारें एक पत्र काढण्याचें ठरलें. तेंच "लोकमान्य" या नांवानें पुढें प्रसिद्ध हांऊं लागलें. या पत्राचे संपादक काका व्हावेत असें मला मनापासून वाटत होतें म्हणून मीं काकांना याबद्दल विचारलें. पण काकांना त्या कामांत असलेल्या कांहीं मंडळीचा चांगला अनुभव असल्यानें काका संपादक होण्याला एकदम संमति देईनात. पण, मीं आग्रह केला. माझ्या आग्रहाला मान देऊन त्यांनीं संपादक होण्याचें कबूल केलें. त्यांच्या संपादकत्वाखालीं लोकमान्य निघूं लागलें. पण, पुढें काकांच्या सल्ल्या-प्रमाणें 'लोकमान्या' च्ये धोरणाबद्दल मतभेद उत्पन्न होऊं लागले म्हणून विशेष जिकिर न करतां काकांनीं राजीनामा दिला. त्यांनीं राजीनामा दिल्यानंतर डॉ. नानासाहेब देशमुख, शिवरामपंत परांजपे व मीं वगैरेंनीं डायरेक्टरांच्या जागेचे राजीनामे दिले. काकांनीं त्यानंतर स्वतःच्या हिंमतीवर 'नवाकाळ' ची स्थापना केली.

## 'माल' चांगला, सावधगिरीनें खरेदी करा

कोल्हापूरकडील एका गृहस्थांचा व आमचा संबंध १९०९ किंवा १९१० सालीं आला. (हे गृहस्थ आज्ञाप जिवंत आहेत. त्यांचें नांव त्यांच्या परवानगीशिवाय देणें योग्य नाहीं म्हणून देत नाहीं.) मी व माझे स्नेही गोविंदराव याळगी वगैरे त्यावेळीं सशस्त्र क्रांतीच्या वावटळींत थोडेसे सापडलों होतों. कोल्हापूरच्या गृहस्थाचे विचारहि तसेच होते म्हणून ते आमच्याकडे आले होते. पण, आमची व त्यांची ओळख नसल्यानें आम्ही त्यांच्याशीं मोकळेपणानें बोललों नाहीं. म्हणून त्यांनीं आपल्याबद्दल काका खाडिलकरांना विचारा असें आम्हाला सांगितलें. काकांची व आपली ओळख नेपाळांत झाली असें या गृहस्थानीं आम्हाला सांगितलें, असें आठवतें. नेपाळांत आमच्या जिल्ह्यांतील हणमंतराव कुळकर्णी

या नांवाचे गृहस्थ काकांबरोबर होते हें मला माहीत होतें. हणमंतराव हे कोल्हापुरास आखाडा वगैरे काढून राहिले होते. या हणमंतरावांच्या मार्फत काकांची आपली ओळख झाली असें या कोल्हापूरच्या गृहस्थांनीं आम्हाला सांगितलें. म्हणून मी काकांना या गृहस्थाबद्दल विचारलें. काकांनीं पत्र लिहून कळविलें कीं, "माल चांगला आहे, तरी सावधगिरीनें खरेदी करावा" "माल चांगला आहे" येवढी शिफारस आम्हाला पुरी झाली व त्यांचा आमचा संबंध पुढें दृढ होत गेला. त्यांच्यावर व त्यांच्याशीं संबंध असलेल्या अनेक लोकांवर घोर प्रसंग आले. पण, एक मोठा क्रांतिकारक कट महाराष्ट्र—कर्नाटकांत असल्याचें दाखविण्याचा व लो.टिळकांपासून लहान-सान कार्यकर्त्यांना त्यांत अडकवण्याचा प्रयत्न मात्र यशस्वी झाला नाहीं. कोल्हापूरच्या वरील गृहस्थानें जें खऱ्याखोट्यांचें भारूड रचलें होतें त्यामुळेंच तो प्रयत्न फसला. ही सर्व हकीकत त्या वेळच्या राजकारणाच्या दृष्टीनें महत्त्वाची असली तरी ती येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. फक्त मला येथें येवढेंच सांगावयाचें आहे कीं काकांनीं "माल चांगला आहे" म्हणून त्या गृहस्थाची जी योग्यता ठरवली गेली होती ती चुकीनें ठरवली गेली होती, असें मला म्हणवत नाहीं. काकांनीं लिहिल्याप्रमाणें आम्ही बऱ्याच "सावधगिरीनें माल खरेदी केला" म्हणून बचावलों.

## उच्च व उत्कट टिळकभक्ति

डेक्कन कॉलेजमध्यें काका होते तेव्हां मीहि त्याच कॉलेजांत होतों. तेव्हां माझी व त्यांची ओळख साधारणच होती. पण, पुढें १९०६—१९०७ सालीं लोकमान्यांच्या राजकारणांत भाग घेण्याचें मीं ठरविलें, व तेव्हांपासून काका, वासुकाका जोशी, शिवरामपंत परांजपे, नरसोपंत केळकर वगैरे पुण्यांतील मंडळींचा व माझा स्नेहसंबंध वाढत गेला. तथापि काकांच्या

विचारांचा प्रभाव माझ्यावर बराच झाला. त्यामुळें त्यांच्याबद्दल त्यांच्या अखेरपर्यंत मला जिव्हाळा होता. तरी त्यांची रहाणी मला इतकी भारदस्त वाटे कीं, आपण होऊन त्यांना कांहीं विचारावें व त्यांचेकडून खुलासा करून घ्यावा असे प्रसंग फारच कमी आले. स्वतः तेहि फारसे बोलत नसत. आपल्या विषयीं तर ते कधींच कांहीं सांगत नसत. लो. टिळकांविषयीं मात्र त्यांची भक्ति अत्यंत उच्च होती, हें मला पदोपदीं आढळून येत असे. आपल्या केसरींतील लेखांमुळें टिळकांना दोन वेळां शिक्षा झाली, ही गोष्ट काकांच्या ध्यानांतून कधींच गेली नाहीं.

तात्यासाहेब केळकर व काका यांच्या स्वभावभिन्नतेमुळें त्यांचें सर्व कामांत एकमत होऊं शकलें नाहीं व बाहेरच्या बऱ्याच लोकांना केळकरांनीं काकांना योग्य प्रकारें वागवलें नाहीं, असें वाटत होतें. तरी इतक्या आमच्या प्रदीर्घ व निकट संबंधांत काकांनीं केळकरांच्या विरुद्ध एक शब्दहि माझ्यापुढें काढला नाहीं. हा काकांचा गुण सार्वजनिक कार्यकर्त्यांत आला तरी किती तरी काम होईल.

# दे. काकासाहेब कालेलकर

## राजकारणी व वेदांती भूमिका

कृष्णाजीपंतांचा आणि माझा संबंध फार जुना असला तरी आमच्या विशेष गांठीभेटीं अशा फारशा झाल्या नाहींत.

मीं त्यांचें पहिलें व्याख्यान एकलें तेव्हांच त्यांचे संबंधानें मला आपलेपणा वाटूं लागला. कृष्णाजीपंतांच्या पहिल्या व्याख्यानाची भूमिका जशी राजकारणाची होती तशीच ती वेदांतीहि होती. अभ्यास आणि वैराग्य या दोन तत्त्वांवर त्यांनीं भर दिला होता. भाषण भारदस्त, विशद आणि

विचारप्रेरक होतें. मला स्वतःला राजकारणाबरोबर विवेकानंदी नववेदांताची गोडी होती मी बेळगांवला एक New Vedanta Society स्थापन केली होती. यामुळें कृष्णाजीपंतांचें व्याख्यान मला आवडणें स्वाभाविक होतें. पुढें पाहिलें कीं बेळगांवच्या आमच्या गंगाधरराव देशपांड्यांचा आणि कृष्णाजीपंतांचा चांगलाच स्नेह आहे. यामुळें त्यांचेशीं बोलण्याचा संकोच उरला नाहीं. आम्हीं 'राष्ट्रमत' चालवीत असूं तेव्हां तेथें कृष्णाजीपंत पुष्कळ वेळा येत. ते आले म्हणजे आम्हांला नेहमीं बौद्धिक मेजवानी मिळत असे. सखोल अभ्यास आणि व्यापक दृष्टि या दोन्हीं गोष्टींबरोबर संस्कारी विनोद ऐकावयाला मिळत असल्यामुळें कृष्णाजीपंतांना पाहतांच, आमचीं हृदयकमळें उत्फुल्ल होऊन जात.

त्यावेळचे चर्चेचे विषय आतां कोठून ध्यानांत असणार ? पण पुढें पुढें त्यांचे तोंडून क्रांतिकारी राजकारणाची मीमांसा आम्हांला मिळूं लागली. विशेष परिचय वाढल्यानंतर आपण नेपाळला कसे गेलों, तेथें काय काय करण्याचा मनसुबा होता, पण तें कसें सर्व फिसकटलें, वगैरे सर्व गोष्टी ते अगदीं विश्वासानें सांगत. नेपाळच्या राजासंबंधाच्या प्रजेंतील अंधभक्तीचें त्यांनीं केलेलें वर्णन आणि राजाचा फक्त चेहरा नजरेस पडावा म्हणून लोक किती आतुर असत याचें त्यांनीं केलेलें वर्णन मात्र अजून बरोबर आठवतें.

## अपेक्षेप्रमाणें आचरण

केसरींतून निघाल्यानंतर त्यांनीं तेजस्विता दाखविली आणि 'लोकमान्य' हें वर्तमानपत्र देखील सोडून त्यांनीं 'नवाकाळ' काढला, या सर्व घडामोडींतील आंतील कच्ची हकीकत कानीं आल्यानंतर त्यांच्या संबंधानें अधिकच आदर वाटूं लागला. सनदशीर राजकारणाकडे पाठ फिरवून क्रांतिकारी वातावरण राष्ट्रांत उत्पन्न करणाऱ्या पुढाऱ्यांकडून जरा

प्रकारच्या आचरणाची आम्हीं तरुण मंडळी अपेक्षा बाळगीत असूं तसेच त्यांचें आचरण प्रत्येक प्रसंगीं दिसून आल्यामुळें आमचा हा आदर वाढत असे.

## अभ्यासपूर्ण युद्धवाङ्मय

१९१४ च्या महायुद्धाच्या वेळीं कृष्णाजीपंत चित्रमयजगत्मध्यें दर महिन्याला एक लेख लिहीत. त्यांत युद्धपरिस्थितीचा सविस्तर आढावा येत असे आणि पुढल्या महिन्यांत युद्ध कोणचें रूप धारण करील, कोणत्या आघाडीवर विशेष पेट घेईल वगैरे गोष्टींचा कयासहि ते देत असत. यामुळें त्यांचे लेख फारच चटकदार होत. त्या सर्व लेखांचें एक पुस्तक तयार होईल तर किती चांगलें असें त्यावेळीं वाटत असे. युरोपांतील प्रत्येक महायुद्धानंतर तिकडील मोठ्या मोठ्या युद्धशास्त्रनिपुण सेनापतींनीं, राजकारणी पुरुषांनीं आणि वर्तमानपत्री बातमीदारांनीं केवढें मोठें ग्रंथसाहित्य तयार केलें आहे ! आपल्या इकडे सरकारकडून कांहीं पुस्तकें तयार झालीं असतील. तीं वगळलीं तर विशेष अभ्यासपूर्ण असें साहित्य झालेंच नाहीं. तेव्हां आज देखील खाडिलकरांचे ते लेख उपयोगी ठरतील असें आहेत.

## साबरमतीचा तुरुंगवास

पुढें एकदां कृष्णाजीपंतांना राजद्रोहाच्या बाबतींत शिक्षा होऊन त्यांना साबरमतीच्या तुरुंगांत रहावें लागलें होतें. खाडिलकरांच्या लेखामुळें टिळकांना शिक्षा भोगावी लागली; हा जणुं काय कृष्णाजीपंतांचा गुन्हा किंवा स्वामीद्रोह असावा अशा तऱ्हेनें कित्येक लोकांना बोलतांना ऐकून मला फारच चीड येत असे. टिळकांच्या केसरींत लेख लिहावयाचे ते लोकजागृतीसाठीं लिहायचे, टिळकांची प्राप्ति वाढावी म्हणून कांहीं लिहावयाचे नाहींत, असें मी त्यावेळीं उत्तर देत असें आणि खाडिलकरांच्या लेखांमुळें टिळकांना तुरुंगवास सोसावा लागला तर त्यांच्याकडे लोकमान्यत्वहि

आलें आणि केसरीच्या प्रतिष्ठेबरोबर केसरीचें उत्पन्नहि वाढलें, या गोष्टीकडे टीकाकाराचें मी ध्यान खेंचींत असें. त्याकाळीं असल्या वादविवादांत भाग घेण्याची खुमखूम माझ्यांत होती. आज त्या गोष्टीचें स्मरण झाल्यानें संकोचच वाटतो.

अशा प्रकारच्या पार्श्वभूमींमुळें खाडिलकर जेव्हां तुरुंगांत गेले तेव्हां मला मनापासून आनंद झाला. कृष्णाजीपंत दुसऱ्यांना तुरुंगांत पाठवूं शकतात आणि स्वतःहि जाऊं शकतात असें म्हणण्याची मला संधि मिळाली, याचाच तो विशेष आनंद होता.

साबरमतीचा तुरुंग म्हणजे आमच्या सत्याग्रहाश्रमाचा शेजार. तेव्हां त्यांना मधून मधून भेटावयाला जाणें स्वाभाविक होतें. त्यांच्या चिरंजीवांना घेऊन जेव्हां एकदां प्रथमच भेटीस गेलों तेव्हां कृष्णाजीपंतांना थोडासा गहिंवर आला, आणि तो पाहून जेलर फर्नेंडिस इतर कैद्यांना सांगावें त्याचप्रमाणें म्हणूं लागला, 'Dont weep, Buddha, Dont weep.' मला त्याचा खूपच राग आला. पण त्यावेळीं मी कांहीं बोललों नाहीं. पितापुत्रांच्या भेटीलाच सर्व वेळ दिलेला चांगला म्हणून मी गप्प बसलों. पुढें जेव्हां फर्नेंडिसला पुन्हां भेटण्याची पाळी आली तेव्हां मी त्याची चांगलीच कान-उघडणी केली. मीं त्याला सांगितलें कीं, तुला माहीत असावयास पाहिजे होतें कीं हा कैदी आमच्या खडकाळ महाराष्ट्रांतील निधड्या छातीचा क्रांतिवीर आहे. कणखरपणांत कधींच हार खावयाचा नाहीं आणि यांचा मुलगा देखील इतर सर्व विलोभनें सोडून बापाचीच गादी चालवीत आहे. असें पितापुत्र भेटल्यानंतर अंतःकरण उचंबळून येणें स्वाभाविक आहे. तुझ्या माझ्या देखत त्यांनीं आपलें अंतःकरण उघड होऊं दिलें हा एक त्यांचा आपल्यावर अनुग्रह आहे असेंच समजलें पाहिजे. बिचारा जेलर फर्नेंडिस नंदीबैलाप्रमाणें मान हलवून हो हो म्हणाला; पण त्याच्या डोक्यांत

किंवा हृदयांत माझें म्हणणें कितपत शिरलें असेल कोण जाणें. मीहि साबरमतीची वारी पुष्कळदां केली असल्यामुळें त्याचा माझा पुष्कळ परिचय झाला होता. जेलचे सुपरिंटेंडेंट माझ्याशीं विशिष्ट प्रकारें वागतात, असें पाहून तो मला जरा वचकून असे एवढेंच.

## मानवोचित आर्द्रता

जेव्हां कृष्णाजीपंत तुरुंगांतून सुटले तेव्हां त्यांना भेटण्यासाठीं आम्ही साबरमतीच्या तुरुंगाकडे गेलों होतों. माझ्या आठवणीप्रमाणें त्यावेळीं गुजरात विद्यापीठामध्यें एक अखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षण परिषद चालू होती. मी विद्यापीठाचा कुलनायक आणि परिषदेचा स्वागताध्यक्ष असल्यामुळें मला त्यावेळीं मुळींच फुरसत नव्हती. तरीहि वेळांत वेळ काढून साबरमती जेलकडे जाऊन मी कृष्णाजीपंतांना घेऊन आलों आणि परिषदेपुढें त्यांचें एक लहानसें व्याख्यान करविलें. आम्हां लोकांना इंग्रजीचें वावडें, यामुळें कृष्णाजीपंतांनीं त्यांना साधेल तशा राष्ट्रीय हिंदींत व्याख्यान दिलें. व्याख्यानांत त्यांनीं गांधीजींच्या थोरवीचा आणि त्यांच्या राजकारणाच्या भरीवपणाचा उल्लेख करून तरुणांना नेहमीं तेजस्वी राजकारण अंगिकारण्याचा उपदेश केला. मला वाटतें त्यानंतर अहमदाबादमध्यें ते कित्येक स्नेह्यांना भेटावयास गेले. तेथें जेलच्या अनुभवाच्या गोष्टी करीत असतांना ते अगदीं मोकळेपणानें म्हणाले कीं, केव्हां केव्हां हृदय भरून येई. मग रात्रीं अंथरुणांत पडल्या पडल्या डोळ्यांतून थोडें पाणी काढून टाकीत असें आणि मन हलकें होतांच निजून जात असें. शूर वीर लोक आपल्या बहादरीच्या गोष्टी करूं लागल्यास त्याचें मला कांहींच वाटत नाहीं. पण तेजस्वीपणानें वागणाऱ्या मनुष्यानें स्वतःच्या मनाची मानवोचित आर्द्रता व्यक्त करण्याचा मोकळेपणा दाखवावा याचा मला विशेष आदर वाटला.

## नाटकांचें तंत्र

कृष्णाजीपंतांचीं तीनच नाटकें मीं वाचलीं आणि पाहिलीं आहेत. 'कांचनगडची मोहना' 'सवाई माधवराव' आणि 'कीचक वध.' याविषयीं बोलतांना एकदां ते म्हणाले कीं, रंगभूमीसाठीं नाटक लिहिणाऱ्याला सर्व प्रकारच्या अभिरुचीच्या लोकांसाठीं नाटक लिहावें लागतें. नाटक जर यशस्वी करावयाचें असेल तर त्यांत अगदीं बेतानें कां असेना थोडा पाचकळ शृंगारहि आणला पाहिजे. एका बाजूनें अगदीं धीरोदत्त नायकहि असावा आणि दुसऱ्या टोकाला एखादा भोजनभाऊहि असावा, तेव्हांच नाट्यजगतांतील जनतेचा संतोष होत असतो. त्यांच्या तीनहि नाटकांत त्यांनीं हा आदर्श पाळलेला माझ्या ध्यानांत आला.

## कार्य खच्ची करणें हें पाप

एकदां गीतेसंबंधानें बोलतांना ते म्हणाले कीं, लोकमान्यांबरोबर दौऱ्यावर फिरत असतांना चांगले चांगले प्रख्यात गवई लोक आपल्या रागदारी चिजा गाऊन दाखवीत. बळवंतरावांना त्यांत कांहीं फारसे गम्य नसे पण आमची चैन होई. देवापुढें नैवेद्य ठेवला तर चंगळ पुजाऱ्याचीच व्हावयाची ना? कृष्णाजीपंतांनीं जें कांहीं संगीत ऐकलें त्याचे संस्कार त्यांच्या नाटकांतील पदांवर पडलेले दिसतात. ते म्हणत कीं, रागदारीचा विचार करून आणि गायकांना समोर बसवून मी प्रयत्नपूर्वक माझीं पदें रचलीं आहेत.

मुंबईला एकदां त्यांना भेटायला गेलों असतां गांधीजींच्या राजकारणाचा प्रश्न निघाला. तेव्हां ते म्हणाले कीं, त्यांच्या चळवळींत प्रत्यक्ष भाग घेतां येत नसला तरी त्यांच्या चळवळीला उचलून धरणें हीहि एक आवश्यक कामगिरी आहे. आपल्याला एखादें काम साधत नसलें तरी त्याची अवहेलना करून त्या कामाचीच खच्ची करणें हें पाप आपल्या हातून होतां कामा नये.

जेव्हां जेव्हां कृष्णाजीपंतांच्या भेटीस गेलों आहें तेव्हां तेव्हां मला त्यांच्या आसपास उन्नत वातावरण पहावयास आणि अनुभवावयास मिळालें आहे. माझ्याजवळ विशेष अशा आठवणी नाहींत, पण त्यांची आठवणच मला नेहमीं प्रेरणादायी वाटत आली आहे.

# बिहारचे गव्हर्नर लोकनायक अणे

१९१६ सालीं वेळगांव येथें भरलेल्या प्रांतिक परिषदेच्या अधिवेशन-प्रसंगीं लोकमान्य टिळकांनीं दोन महत्त्वाचीं कामें केलीं.

( १ ) सुरतेच्या काँग्रेसच्या बैठकीपासून राष्ट्रीय सभेंतून निघून बाहेर राहिलेल्या जहाल पक्षाच्या अनुयायांनीं काँग्रेस संस्थेंत बिनशर्त सामील व्हावें व लखनौ येथें भरणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास हजर व्हावें, असा ठराव मंजूर करून घेतला हें पहिलें.

( २ ) व इंडियन होमरूल लीग या संस्थेची रीतसर स्थापना हें दुसरें.

या लीगच्या स्थापनेनंतर थोड्याच दिवसांत डॉ. बिझांट यांनींहि मद्रास येथें दुसरी होमरूल लीग संस्था स्थापन केली. लखनौ येथील काँग्रेसचे अधिवेशनांत लोकमान्यांच्याच प्रयत्नांमुळें काँग्रेसलीग योजना म्हणून राजकीय सुधारणांचा एक ठराव एकमतानें मंजूर करण्यांत आला. याप्रमाणें १९१६ सालांत जहाल, मवाळ, हिंदु, मुसलमान इत्यादि पक्षांचा समेट घडवून आणून सर्व हिंदुस्थानची एकमुखी मागणी निर्माण करण्याचें महत्कार्य लोकमान्यांच्या हातून घडलें. नंतर राष्ट्रीय सभेच्या एकमुखी मागणीच्या पाठीमागें देशांतील सर्व लोकमत आहे हें इंग्रज सरकारच्या नजरेस प्रत्यक्ष आणून देण्याकरितां आपल्या होमरूल लीगच्या विद्यमानें त्यांनीं प्रचंड आंदोलन उभें केलें. त्यासाठीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतून त्यांनीं

दौरे काढले व लोकमत जागृत केलें. या त्यांच्या चळवळीमुळें जहाल पक्षांतील पुढाऱ्यांत कार्य करण्याचा नवा उत्साह संचरला व ते मोठया ईर्षेंने लोकमत–जागृतीचे कामांत आपापला भाग उचलूं लागले.

## वऱ्हाडचा लो. टिळकांचा दौरा

१९०८ ते १४ पर्यंत या पक्षांतील कर्तबगार माणसांचें राजकारण खोलीच्या आंत चहा, चिवडा व चिरूट यांच्या साधनानें गप्पागोष्टींच्या रूपानें चालत होतें. पण लोकमान्यांनीं बेळगांवला पुकारलेल्या धडाडीच्या धोरणामुळें पक्षोपपक्षाच्या संकुचित भावना नष्ट होऊन जहाल पक्षीयांना भारतवर्षांतील सर्व दिशा संचारार्थ खुल्या झाल्या. राजकारणाचें खाजगी व मजलसी स्वरूप जाऊन त्याला सार्वजनिक व मैदानी स्वरूप आलें. लोकमत–जागृती करण्याचे कामीं व विशेषतः लांबलांबचे दौरे ठरवून राजकीय असंतोषाचा वणवा चोहोंकडे भडकवून देण्याचे कामीं काकासाहेब खाडिलकर यांचें लोकमान्यांना फार सहाय्य झालें. लोकमान्यांच्या मंडाले येथील तुरुंगवासाचे काळांत महाराष्ट्र, महाविदर्भ व कर्नाटक येथील लोकमान्यांच्या जुन्या नव्या अनुयायांशीं त्यांनीं आपले संबंध कायम ठेवले होते. यामुळें लोकमान्यांचे होमरूलच्या आंदोलनांतील दौऱ्याची योजना करण्याचा भार त्यांच्यावर साहजिकच येऊन पडला. ती कामगिरी त्यांनीं किती यशस्वीपणें पार पाडली हें त्या दौऱ्याचीं रसभरीत वर्णनें जुने मित्र अनंत हरि गद्रे यांनीं लिहिलेलीं जे वाचतील त्यांस आजहि कळून येईल.

## कार्यतन्मयता व निर्विकार मनःस्थिति

या दौऱ्यांत काकासाहेब खाडिलकर कामाचा डोंगर समोर पडला असला तरी कसे शांतपणें कांहींहि चित्तविक्षेप होऊ न देतां सारखे काम करीत रहात व सर्व कामें यथायोग्य रीतीनें करून व संपवून पुन्हां हंसाखेळायला

घ जमलेल्या मंडळींबरोबर निरनिराळ्या विषयांवर चर्चा करायला मोकळे होऊं शकतात हें मला अनेकदां पहावयास मिळालें. हे सर्व लांबलांबचे दौरे मोटारीनें करावे लागत असल्यामुळें कित्येकदां जेवणखाण वेळच्या वेळीं होणें अशक्य होत असे. त्यांना कधीं कधीं रात्रीं निजायलाच नव्हे तर आंग टाकायला देखील मिळत नसे. तथापि त्यांच्या ठिकाणीं मनःक्षोभ किंवा त्रास झाल्याचीं चिन्हें ते लोकांच्या दृष्टीस पडूं देत नसत. लोकमान्यांचा कार्यक्रम ठरलेल्या वेळापत्रकानुसार पार पाडावयाचा हा त्यांचा निर्धार व त्याप्रमाणें बहुशः तो पार पाडण्यांत आला. एवढी कार्यतन्मयता आणि इतकी निर्विकार मनःस्थिति क्वचित्च दृष्टीस पडते. वऱ्हाड मध्यप्रांतांतील लोकमान्यांच्या या दौऱ्यांत काकासाहेबांच्या सहवासांत जे दिवस गेले ते दिवस मी माझ्या आयुष्यांतील बहुमोल काळ समजतों.

## अहमदनगरचें प्रांतीक अधिवेशन

हिंदी स्वराज्य संघाचें शिष्टमंडळ विलायतेंत होतें. बॅ. बॅप्टिस्टा हे मात्र हिंदुस्थानांत परत आले होते. मुंबई प्रांतिक परिषदेचें अधिवेशन अहमदनगरास बॅप्टिस्टा यांचे अध्यक्षतेखालीं भरलें त्यावेळीं स्वागत कमिटीतर्फे रौलेट-ॲक्ट विरुद्ध म. गांधी यांनीं जें सत्याग्रहाचें आंदोलन सुरू केलें होतें त्यासंबंधींचा एक ठराव विषयनियामक कमिटीपुढें विचाराकरितां मांडण्यांत आला होता. त्यावर चर्चा करतांना मी निःशस्त्र प्रतिकार व सत्याग्रह यांतील भेद थोडासा विशद करून सांगितला, व म्हणालों कीं, रौलेट कायद्याविरुद्ध जी विशिष्ट चळवळ चालू करण्यांत आली आहे ती सत्याग्रही स्वरूपाची आहे व निःशस्त्र प्रतिकारात्मक नाहीं. तेव्हां या चळवळीस पाठिंबा देतांना ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. म. गांधींना आघातप्रत्याघाताचें तत्त्व मान्य नाहीं, निःशस्त्र प्रतिकार हा सत्याग्रहाच्या तत्त्वावर अधिष्ठित आहे शठम् प्रति शाठ्यम् हा न्याय महात्माजीचे

राजकीय प्रणालींत बसत नाहीं. तेव्हां सत्याग्रही आंदोलनावर अभिप्राय काय द्यावा हा आपणापुढें विकट प्रश्न आहे. जे आंदोलनांत भाग घेऊन कायदेभंग करीत आहेत त्यांचेबद्दल सर्वांसच सहानुभूति व आदर वाटत आहे, आणि मुंबई सरकारनें त्यांना दडपून टाकण्याकरितां सुरू केलेल्या दडपशाही धोरणाचा आपण सर्वच निषेध करीत आहोंत. परन्तु सत्याग्रही आंदोलनांत जो तत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो त्याचा सूक्ष्म विचार आपण पृथक्पणें केला पाहिजे. माझ्या भाषणांत लोकमान्य येथें आपणांस सल्ला द्यावयास नाहींत हें आपलें दुर्दैव आहे, ते सत्याग्रहास तत्त्वदृष्टया संमति देतील कीं नाहीं, याविषयीं माझें मन साशंक आहे असेंहि मी म्हणालों.

## लो. टिळकांचें अंतरंग बिनचूक जाणणारे खाडिलकर

माझें भाषण झाल्यावर व इतरहि कांहीं लोकांचीं भाषणें झाल्यावर काकासाहेबांनीं मला आपलें मत सांगितलें. इंग्रजांच्या जुलमी सत्तेविरुद्ध व जुलमी कायद्याविरुद्ध होणाऱ्या प्रत्येक चळवळीस लोकमान्य पाठिंबा निःसंशय देणार व उचलून धरणार. ते लढाईचे वेळीं तात्त्विक विचाराचा कीस काढीत बसायचे नाहींत. प्रतिपक्षी नामोहरम कसा होईल इकडेच त्यांचें लक्ष राहील. येथील बैठकींत जी तत्त्वचिकित्सा सुरू आहे ती ऐकून त्यांना खात्रीनें चीड आली असती. तेव्हां माझ्या मतें रौलेट ॲक्टविरुद्ध चालू असलेल्या आंदोलनास नुसती संमतीच न दर्शवितां तींत सर्व पक्षांच्या लोकांनीं सामील होऊन तीव्रता उत्पन्न करणें अवश्य आहे असा ठराव या परिषदेनें करावा असें त्यांनीं मला स्पष्टपणें सांगितलें.

लोकमान्य १९१९ मध्यें विलायतेहून परत आल्यावर त्यांचें मुंबईतील मजुरांतर्फे स्वागत करण्यांत आलें. त्यावेळीं त्यांनीं जें भाषण केलें त्यांत रौलेट ॲक्टविरुद्ध मुंबईस झालेल्या कायदेभंगाच्या मोहिमेचा मुद्दाम

गौरवपूर्वक उल्लेख केला व 'मी देशाबाहेर असल्यामुळें त्या मोहिमेंत भाग घेण्याचें भाग्य मला लाभलें नाहीं' असा त्यांनीं खेद प्रदर्शित केला.

हें भाषण वाचल्यावर मला काकासाहेब खाडिलकरांशीं अहमदनगर येथें झालेल्या संवादाचें साहजिकच स्मरण झालें व लोकमान्य टिळकांचें अंतरंग आमच्यापेक्षां काकासाहेब खाडिलकरच अधिक बिनचूकपणें जाणतात ही जाणीव मनास झाली.

## के. शंकरराव देव, चिटणीस, ऑ.इं. कॉं. कमिटी

### काकांचें चालतें, बोलतें व बैठें चित्र

वाईजवळच्या बावधन गांवाहून पुण्याला इंग्रजी शाळेंत शिकण्याकरितां मी लहानपणीं आल्यावर मला असें आठवतें कीं, माझ्या त्यावेळच्या त्या अंधाऱ्या खोलींत रविवर्म्यानें काढलेल्या श्रीदत्ताच्या तसबिरीसमोर देशाच्या सेवेसाठीं आयुष्य खर्ची घालण्याच्या आणाशपथा मी त्यावेळच्या माझ्या मित्रमंडळींसह घेतलेल्या होत्या. लहान वयांत इंग्रजी शाळेंत शिकत असतांना देशाच्या सेवेच्या भावनेनें भारून जाण्याइतकें १९०५-०६ सालचें त्यावेळचें वातावरण होतें. असा परिणाम घडवून आणणाऱ्या ज्या चार व्यक्ति आज मला आठवतात, त्या म्हणजे लो. टिळक, शिवरामपंत परांजपे, काका खाडिलकर आणि श्री. लवाटे या होत.

शिवरामपंत परांजपे म्हणतांच त्यांची भव्य, रुबाबदार मूर्ति डोळ्यासमोर येते; लवाटे म्हणतांच पिकेटिंगच्या दिवसांत ट्रेनिंग कॉलेजजवळच्या गुत्त्यावर 'बाबांनों, दारू पिऊं नका' म्हणून शांततेनें व विनम्रभावानें सांगणारी साध्या पोषाखांतील त्यांची मूर्ति डोळ्यासमोर येते; त्याचप्रमाणें काका खाडिलकर म्हणतांच त्यांचें चालतें चित्र व बैठे चित्र डोळ्यासमोर येतें.

मी पुण्याला आलों त्यावेळीं पिकेटिंग करणाऱ्या स्वयंसेवकांच्या बैठकी लो. टिळक भरवीत असत आणि तेथें मी जात असें. त्यावेळचें खाडिलकरांचें चालतें चित्र माझ्या डोळ्यासमोर आहे. रस्त्याच्या कडेनें मंद चालीनें, खालच्या मुद्रेनें ते मार्ग आक्रमीत. त्यांची पाय ओढत चालण्याची विशिष्ट लकब होती. हातांत ते नेहमीं काठी वापरीत.

त्यांची ती चालती मूर्ति मला जशी आठवते त्याचप्रमाणें वै. कवडेशास्त्री यांच्या दवाखान्यांत राष्ट्रीय कलवाऱ्या बैठकींत गप्पा मारीत असलेली काकांची बैठी मूर्तीहि माझ्या चांगली ध्यानांत आहे. कवडेशास्त्र्यांच्या दवाखान्यांत मध्यभागीं पडदा सोडलेला असे आणि आंतल्या बाजूला राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांची बैठक असे. त्या बैठकींना मी जात असें. या बैठकींत काकांची संभाषणाची विशेष पद्धति माझ्या मनांत ठसली. बैठकींतल्या बोलण्यांतहि आपले विचार व्यक्त करण्याची काकांची पद्धति नाट्यपूर्ण असे. आवाजाची रसानुकूल चढउतार होत ते एखादा प्रसंग किंवा एखादा विचार रेखीव रीतीनें शब्दांत उतरवीत. त्यामुळें त्यांची ती बोलण्याची पद्धति व बैठी मूर्ति माझ्या आकर्षणाचा विषय त्या काळांत होऊन राहिली होती.

व्याख्यान समयीची त्यांची बोलती मूर्तीहि मला चांगली आठवते. त्यांचीं व्याख्यानें ऐकण्याचा योग पुष्कळदां आला. पण त्यांचें एक भाषण मला विशेष आठवतें. असहकाराच्या चळवळीचे सुरवातीचे ते दिवस होते. युधिष्ठिरानें १२ वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास असें तप केल्यावर त्या वेळच्या त्या तपांतून युद्धाचा समय येतांच त्याला यश मिळालें. त्याचप्रमाणें वनवास-अज्ञातवासाच्या तपश्चर्येनंतर आतां त्यांतून क्रांतिकारक घटना घडून येत असून यश आपल्याकडे धावत येत आहे, असें ते आपल्या

ओजस्वी पद्धतीनें सांगत होते व त्यांत अगदीं रंगून गेले होते. यश अगदीं हाताशीं आलें आहे, असें सांगत असतांनांचा त्यांचा चेहरा, हातांची हालचाल व आवाज मला अद्यापहि आठवतो आहे. वक्तृत्वांतील तन्मयता आणि नाट्य हें माझ्या नजरेसमोरचा त्यांच्या बोलत्या मूर्तीचें वैशिष्ट्य होय.

## नवी पिढी निर्माण करण्याचें कार्य

माझ्या विद्यार्थी दशेंत खाडिलकरांच्या कीचकवध नाटकाचें आकर्षण फार होतें. नाटक प्रभावी व तें करणारी महाराष्ट्र नाटक मंडळीहि प्रभावी होती. त्या नाटकांतील प्रत्येक वाक्यांतून त्या वेळच्या राजकीय परिस्थितीशीं जुळता अर्थ काढून विशेषतः तरुण पिढी तें नाटक पहात असे. त्यावेळच्या माझ्या परिस्थितीप्रमाणें चार सहा आण्याचें तिकीट काढून मीं हें नाटक बरेचदां पाहिलें. त्या नाटकाचा त्याचप्रमाणें भाऊबंदकी वगैरे त्यांच्या ऐतिहासिक गद्य नाटकांचा त्या वेळच्या तरुण पिढीवर फार परिणाम झाला. वक्ते, केसरींतील लेखक त्याचप्रमाणें नाटककार या नात्याची त्यांची कामगिरी चिरस्थायी स्वरूपाची आहे. देशसेवेची स्फूर्ति देऊन नवी पिढी त्या स्फूर्तीनें भारून टाकण्याचें, नवी पिढी निर्माण करण्याचें कार्य काकांच्या नाटकांनीं त्यावेळीं केलें.

त्याच सुमारास स्वामी रामतीर्थ, श्री. रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, अरविंद घोष यांच्या विचारसंपदेनें अध्यात्मवादी राष्ट्रवादाचा संचार देशांतील तरुण पिढींत केला. महाराष्ट्रांत लढाऊ राष्ट्रवादानें तरुण पिढी भारून टाकून राष्ट्रकार्याला स्वतःला वाहून घेण्याची समर्पणाची वृत्ति त्या पिढींत ज्यांनीं निर्माण केली ते लो. टिळक, शिवरामपंत परांजपे, श्री. लवाटे आणि काका खाडिलकर हे होत. वाईजवळच्या बावधनहून पुण्यास जर शिक्षणासाठीं मी आलों नसतों आणि तेथील त्याकाळचे संस्कार जर

माझ्यावर घडले नसते तर मी राजकारणांत असतों कीं नाहीं हें सांगतां येणें कठीण आहे.

काकांचे पहिल्या महायुद्धाच्या वेळचे युद्धविषयक लेख चित्रमयजगत्मध्यें येत त्यांतील त्यांच्या वैशिष्ट्यानें महाराष्ट्राला भारून टाकलें होतें. त्यामुळें चित्रमयजगत्ची प्रतिष्ठा, लोकप्रियता व ग्राहकसंख्या वाढली. त्या लेखांवरून परदेशी राजकारणाचा त्यांचा गाढ व्यासंग व अचुक आडाखे बांधण्याची त्यांची सखोलता लोकांच्या मनावर इतकी बसली कीं, पंचवीस वर्षांनंतरच्या दुसऱ्या महायुद्धाच्या वेळींहि त्यांची यावावतींतील लोकांवरील पकड कायम होती, आणि 'नवाकाळ'मधील युद्धविषयक लेख त्यांच्याच स्फूर्तीनें, प्रेरणेनें किंबहुना त्यांच्यांचकडून लिहिले गेलेले आहेत अशा भावनेनें वाचक वाचत असत.

## लो. टिळकांचा वारसा सुटला तरी चैतन्य कायम

काकांनीं 'लोकमान्या'च्या सुरुवातीस त्या पत्राचें ब्रीदवाक्य 'मामनुस्मर युद्धयच्च' व नवाकाळचें ब्रीदवाक्य 'न मे भक्तः प्रणश्यति' हें गीतेंतून घेतलें. त्यावरून त्यांची जीवननिष्ठा, अध्यात्मिकता आणि झुंजारवृत्ति चांगलीच प्रत्ययास येते. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर काकांना केसरी व पुणें सोडावें लागून मुंबईस यावें लागलें. त्यावेळीं काका टिळकांचा मार्ग सोडून दुसरा मार्ग पत्करतात कीं काय अशी शंका व्यक्त होत होती. काकांच्या जीवनाला कलाटणी मिळते कीं काय असें वाटत होतें. 'मामनुस्मर युद्धयच' हें ब्रीदवाक्य 'लोकमान्या'करितां निवडून त्यांनीं जणूं कांहीं अशी भावना व्यक्त केली कीं, टिळकांच्या पश्चात् त्यांचा वारसा जरी सुटला तरी त्यांचें जें चैतन्य त्याची आणि आपली ताटातूट कोणी करूं शकणार नाहीं आणि त्या चैतन्याला एकनिष्ठ राहून आपली झुंजारवृत्ति पण आपण

सोडणार नाहीं. 'मामनुस्मर युद्धयच' हें ब्रीदवाक्य म्हणजे महाराष्ट्राला आपल्या निष्ठेची व वृत्तीची ग्वाही देणारें एक प्रकारचें आश्वासनच होतें.

## भवितव्यतेला आव्हान देणारा आत्मविश्वास

नवाकाळ निघाला त्यावेळची परिस्थिति भिन्न होती. आपली निष्ठा व वृत्ति शाबूत ठेवून झगडत असतांना अनेक संकटें आणि विघ्नें आलीं व आपल्याला नेस्तानाबूद करण्याच्या इर्षेनें तीं तशींच येत रहाणार असें दिसत होतें. भवितव्यता त्यांना जणूं कांहीं 'कसें काय' म्हणून विचारीत होती. अशावेळीं त्यांनीं 'न मे भक्तः प्रणश्यति' अशी घोषणा करून संकटांना व विघ्नांना पुरून उरण्याचा कणखर आत्मविश्वास या ब्रीदवाक्यांच्या योगानें आव्हानपूर्वक जाहीर केला. या दोन घोषणा म्हणजे काकांचीं जीवनसूत्रें होत. गीतेच्या अभ्यासानें गीतेचें सार त्यांनीं या दोन सूत्रांत काढलें आणि तें स्वतःच्या जीवनांत उतरवलें. त्यावरून त्यांची वीरवृत्ति आणि आत्मविश्वास इतका भव्य स्वरूपांत व्यक्त होतो कीं तो मला शब्दांनीं व्यक्त करतां येत नाहीं, तथापि अंतःकरणाला त्याचा पडताळा येतो. जीवन हा एक संग्राम आहे. काकांचें जीवन म्हणजे तर अनेक आपत्तींनीं व संकटांनीं ओतप्रोत होतें. या सर्व परिस्थितींतून ते जीवननिष्ठा व झुंजारवृत्ति कायम ठेवून पार पडले. कधीं डगमगले नाहींत कीं डळमळले नाहींत. या दोन ब्रीदवाक्यांनीं त्यांचें जीवनवैशिष्ट्य जें व्यक्त होतें त्याचा फार मोठा परिणाम माझ्या मनावर झालेला आहे.

## संकटांशीं झगडण्याची वृत्ति

काकांनीं म. गांधींच्या चळवळीला उचलून धरलें आणि केळकरांनीं त्या चळवळीला विरोध केला, या घटनेघरून केळकरांची सनदशीर आणि नेमस्त प्रवृत्ति जशी दिसते त्याचप्रमाणें काकांच्या मनाची क्रांतिकारक

ठेवण दिसून येते. गांधी चळवळीचा पुरस्कार करतांना काकांना त्याग करावा लागला, क्लेश सोसावे लागले आणि परिस्थितीशीं झगडावें लागलें. केसरी सुटल्यानंतर तशाच तोडीचें प्रचाराचें साधन पत्राच्या रूपानें निर्माण करतांना काकांचें जें शील, चारित्र्य व निष्ठा त्याचप्रमाणें संकटांशीं झगडण्याची वृत्ति व्यक्त झाली त्याचा महाराष्ट्रावर फार परिणाम झाला आणि त्याबद्दल महाराष्ट्रांत त्यांचें सर्वत्र प्रशंसन व आपुलकी व्यक्त होत असलेली मला महाराष्ट्रांत हिंडतांना आढळत असे.

## चिंतनशील जीवन

काकांना मी पुष्कळदां भेटलों आहें आणि अनेकदां त्यांच्या घरीं उतरलोंहि आहें. इतका घरोबा असतांना आणि त्यांच्या विषयीं अत्यंत आदर असतांनाहि त्यांची एक प्रकारची भीति मला वाटत असे आणि ती शेवटपर्यंत मी घालवूं शकलों नाहीं. त्यांच्या अंतःकरणांत मी कधीं प्रवेश करूं शकलों नाहीं आणि त्यांच्याशीं समानतेच्या सलगीनें, सख्यत्वानें, मी कधीं बोलूं शकलों नाहीं. त्यांचें बोलणें चालणें अशा प्रकारचें असावयाचें कीं जणूकांहीं ते आपल्याला एक हाताच्या अंतरावर ठेवीत आहेत, असें वाटावें. या वर्तणुकीच्या मुळाशीं अहंकार किंवा गर्व होता अशांतला भाग नाहीं. पण त्यांचें जीवन चिंतनशील असे व बाह्य संपर्कापासून अलिप्त असें होतें. संगति, सहवास, गप्पागोष्टी यांची जरुरी चिंतनाच्या एकलकोंडेपणानंतर केव्हांतरी मनुष्याला वाटत असते आणि त्यांत तो आनंद घेतो. पण काका विचारांच्या पातळीवर नेहमीं इतके दंग असत कीं अशा प्रकारच्या मनोविनोदनाची त्यांना कधीं जरूरच वाटत नसे. उपनिषदांवरच्या त्यांच्या ग्रंथांवरून त्यांची चिंतनशीलता सहज कळून येणारी आहे.

## ईश्वराशीं संधान बांधणाऱ्या योगमार्गाचा प्रवासी

काकांचीं आध्यात्मिक पुस्तकें मीं वाचलेली आहेत, आणि मला

त्याविषयींचीं गोडी पूर्वीपासून आहे. त्यांचीं पुस्तकें वाचत असतांना ते ज्या मुक्तावस्थेचा अनुभव घेत आहेत आणि ईश्वरप्राप्तीचा मार्ग जो त्यांना उपलब्ध झालेला आहे तो आपण त्यांच्याकडून समजावून घेऊं आणि या क्षेत्रांत त्यांच्याशीं सख्य जोडूं अशी माझी फार मनीषा होती. ईश्वरप्राप्तीचा हव्यास असतांनाहि हिमालयांत चला तेथें ईश्वर दाखवितों असें मला कोणी म्हटलें तर मी हिमालयांत जाण्यास तयार होईनच असें नाहीं. पण योगमार्गानें ईश्वराशीं संधान बांधण्याचें व स्थितप्रज्ञता साधण्याचें जें हिंदु संस्कृतीचें वैशिष्टय तें काकांच्या जीवनांत व्यक्त होत असे. काकांचीं पुस्तकें मीं जीं वाचलीं त्यावरून या क्षेत्रांत ते जाणते आहेत आणि आपल्याला ईश्वरप्राप्तीच्या व मुक्तावस्थेच्या मार्गावर आणून सोडतील असें मला नेहमीं वाटत असे. त्यांच्याशीं अशा प्रकारचें सख्य जोडण्याचा क्षण कधीं तरी येईल अशी वाट पहात होतों. काकांच्या मृत्यूनें ती संधि कायमची गेली याचें मला वाईट वाटतें, आणि त्यांच्या मृत्यूनें ही माझी मोठी हानि झाली असें मला वाटत असतें.

काकांचा करारी स्वभाव, सखोल वृत्ति आणि गूढतेनें व्याप्त असें जीवन यांचा ठाव कोणालाच पहातां येण्यासारखा नव्हता. त्यांचें बाह्य जीवन हें या वैशिष्टयाचा आविष्कार होता, असेंच म्हटलें पाहिजे.

## ना. न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ,

### कोटी व खेंच

'आतां मी जवळ जवळ द्रोणाचार्य झालों आहें' असें मी म्हणालों.

'तसेंच दिसतें' असे उद्‌गार काकासाहेबांनीं काढले.

हा प्रसंग १९२० सालच्या एप्रिलच्या २९ किंवा ३० तारखेचा असावा. पुण्यांत मुंजाबाच्या बोळांत खाडिलकर मंडळी व चाफेकर मंडळी समोरा-समोर कित्येक वर्षें रहात होती, आणि या दोन कुटुंबांत अत्यंत प्रेम असल्यामुळें माझ्या लग्नांत ही सर्व मंडळी हजर होती. जेवणाच्या वेळीं दहा पांच द्रोण माझ्या पानाभोंवतीं ठेवले होते. आपल्या विद्वत्तेचा नाहीं तरी निदान विनोदाचा प्रसिद्ध नाटककार हजर असल्यामुळें रुबाब दाखवावा असा विचार मनांत येऊन वरील प्रमाणें मी बोललों. काका शेजारच्याच पानावर बसले होते व त्यांनीं वरीलप्रमाणें उद्‌गार काढले. त्याचें मर्म इतर कोणाला समजलें कीं नाहीं कोण जाणें. पण निदान मी तरी असें समजलों कीं, हें साधर्म्य केवळ द्रोणानेंच आलेलें आहे. प्रत्यक्ष जवळ येऊन त्यांच्याशीं बोलण्याचा व पहाण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.

यावेळीं मी स्नातक झालों होतों. विद्या संपवून गृहस्थाश्रमांत प्रवेश करीत होतों. तथापि याहिपूर्वी काकांची कीर्ति ऐकली होती. क्वचित् प्रसंगीं होणारें त्यांचें भाषणहि ऐकलें होतें. केसरींतील लेख कोणाचे जरी असले तरी सामान्यतः उपमा असतील ते तात्यासाहेब केळकरांचे, परराष्ट्रीय राजकारणावरील काकासाहेब खाडिलकरांचे व व्यवहार व तत्त्व यांचा मार्मिक समन्वय केलेले ते लो. टिळकांचे, असें आम्हीं समजत होतों व त्या दृष्टीनें या व्यक्तीकडे बघत होतों.

## नेत्यावर नितांत निष्ठा

१९२० सालअखेर माझा प्रत्यक्ष राजकारणांत प्रवेश झाला. पण त्यावेळच्या सुमारासच काका हे पुणें सोडून मुंबईस गेले व मुंबई हें त्यांचें कार्यक्षेत्र बनलें. २०।२१ ते २५ सालपर्यंत पुणें येथील राजकारणाचें केंद्र म्हणजे कवडेशास्त्री यांचा दवाखानाच होत. त्या ठिकाणीं संध्याकाळीं

बहुतेक प्रमुख मंडळी जमत. त्यांत शिवरामपंत परांजपे, परशुरामतात्या चिंचाळकर, भाऊसाहेब लबाटे, मधून मधून तात्यासाहेब केळकर व पुण्यास असल्यास काका हेहि दिसत. या सर्व मंडळींच्या संभाषणांत सूचक भाग घेणारे काका, सारखी बडबड करणारे सीतारामपंत दामले, मर्मभेदी वचनांनीं कोणाला सुखविणारे व कोणाला दुखविणारे शिवरामपंत परांजपे, खाजगी चर्चेत सुद्धां अभिरुची न सोडणारे केळकर, क्षुल्लक गोष्टींतून तत्त्व प्रतिपादणारे भारताचार्य चिंतामणराव वैद्य, अशी बडीबडी मण्डळी त्या ठिकाणी असत. नवीन मंडळीपैकीं मी एक होतों आणि सुरवातीला कुतुहलानें, नंतर निरीक्षक या दृष्टीनें, शेवटीं कर्तव्य म्हणून तेथें असत असें. कारण त्या ठिकाणीं काँग्रेस कमिटीचें ऑफिस असे. या अनेक व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचे थोडयाबहुत प्रमाणांत मजवर परिणाम झाले असले पाहिजेत. तथापि त्याचें विशेष विश्लेशण न करतां एवढें म्हणतां येईल कीं, नेत्यावर नितांत निष्ठा व अनुशासनशीलता याबाबतींत अधिक परिणाम काकांच्या वर्तनाचा सर्वांवर झाल्यास नवल नाहीं. राजकारणशास्त्र व अर्थशास्त्र यांच्या अध्ययनानें मनांत स्वतःच्या ज्ञानाबद्दल भलतीच कल्पना झाल्यामुळें इतरांबरोबर मीहि गांधींच्या कार्यक्रमाबाबत अविश्वास दाखवून त्यावर अव्यवहार्यतेचा शिक्का मारून दाखविण्याची संधी जेव्हां मिळे तेव्हां क्वचित्च दवडीत असें. तथापि हें करीत असतांना नम्र भावेंत मी बोलें. त्याप्रसंगीं जेव्हां काका असत, तेव्हां ते कांहीं एका विलक्षण नजरेनें माझ्याकडे बघत. त्यावेळचे त्यांचे विचार जरी उच्चारलेले नसत तरी त्यांचा भावार्थ मी समजत असें. श्रद्धा ही अव्यभिचारिणी पाहिजे. ती तशी नसेल तर ती नुसती अपूर्णच नव्हे तर आपत्तिजनक होय, हा त्यांतील भाव असे !

## पेण परिषदेंतील अनुभव

१९२२ च्या मे महिन्यांत राजकारणानें अशी उलटी कलाटणी घेतली होती की, काका हे एका राजकीय पक्षांत व मी दुसऱ्या, अशी स्थिति होती. पेणच्या महाराष्ट्र राजकीय परिषदेंत काकांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. त्यांचें भाषण त्यांच्या नेहमींच्या पद्धतीनें केलेलें होतें व प्रत्यक्ष परिषदेंत जणूं कांहीं त्यांचा पराभव करण्याच्या हेतूनें कांहीं गट आलेले होते. जुने व जाणते कार्यकर्ते कोणत्या हेतूनें प्रेरीत झाले होते हें मी सांगूं शकत नाहीं व इष्टहि नाहीं. तथापि मी मात्र राजकारण हें गतिमान असलें पाहिजे व त्यामध्यें कांहीं खळबळकारक असें कार्य असणार व त्याप्रमाणें कार्यकर्त्यांनीं वागलें पाहिजे, या मताचा होतों आणि म्हणून मुख्य ठरावावर बोलतांना तशी भूमिका घेतली होती. माझ्या भाषणांत बऱ्याच गांधीवादी मंडळींवर टीका होती, तथापि त्यामध्यें कडवटपणा नव्हता, अगदींच नर्म विनोद होता असेंहि नव्हे. भाषणानंतर "तसें भाषण बरें केलें" असे उद्गार काकांनीं काढले. त्यांच्या "तसें" शब्दांतील तीव्रता मी सहज लक्षांत घेतली. परिषदेंत विरोधी कांहीं गट आग्रही अशा स्थितींत असतांना त्यांनीं परिषदेचें संचालकत्व केलें तें नमुनेदार असें होतें. अध्यक्षांच्या मताविरुद्ध ठराव पास झाल्यावर कांहीं मंडळींनीं आनंदाचें निदर्शन केलें. तें खास सर्वस्वी सभ्यता व संस्कृति यांच्या मर्यादेंत होतें असें म्हणवणार नाहीं. तथापि मीहि त्यांत कांहीं मर्यादेपर्यंत सामील होतों ही गोष्ट खरी होती. पुष्कळ वेळां मनांतील आदर जनांत वागतांना रस्ता चुकून भलत्याच मार्गाला जातो असा अनुभव येतो, तोहि त्यावेळीं आला. २२ ते २५ व २५ ते ३० सालपर्यंत राजकारणाचे कसकसे वारे वाहिले हें येथें सांगण्याचें कारण नाहीं. तथापि

काकांच्याघरासून एक गोष्ट मी शिकलों. ती म्हणजे कोठें तरी, कोणाइर तरी आत्यंतिक निष्ठा असावी लागते ही होय. माझी निष्ठा काँग्रेस या संस्थेवर होती, त्यांची महान अशा मोठ्या व्यक्तीवर होती; हें जरी खरें असलें तरी प्रभावी निष्ठा ही आवश्यक असते हेंहि तितकेंच खरें. जेव्हां जेव्हां मी मुंबईस जाई व त्यांच्याकडेच उतरें किंवा भेटण्यास जाई त्या त्या वेळीं याच गोष्टीची अधिक छाप त्यांच्या बोलण्यांतून मजवर होई.

## रजपुती जिद

२९ सालच्या त्यांच्या खटल्याच्या वेळीं मी हायकोर्टांत हजर असें. मी वकील असलों तरी मी वकील म्हणून हजर नव्हतों व तशी माझी योग्यताहि नव्हती. तथापि मधून मधून भुलाभाईंना सुचविण्याचें धाष्टर्य मी करीत असें. खटल्याच्या वेळची काकांची धीरगंभीर मूर्ति व सहज दिसून येणारी निर्विकल्पता स्मृतींतून जाणें शक्य नाहीं. त्यांना शिक्षा झाल्यानंतर आम्हीं युवक संघाची मंडळी तेथें हजर होतों. त्यांत मेहेरअल्ली हे प्रमुख होते. त्यांनीं शिक्षेच्या निषेधार्थ मोठ्या घोषणा केल्या व झालेल्या अन्यायाचा आम्हीं आमच्या मतानें बदला घेतला. तथापि कोर्टांत झालेल्या या प्रकारामुळें काकांना अधिक त्रास झाला असें मानण्यास जागा आहे.

३०–३१ च्या चळवळीच्या काळांत "नवाकाळ" ऑफिस महाराष्ट्राच्या चळवळीचें जनरल हेडक्वार्टर झालें होतें. कांहीं वेळां सरदारगृह सोडून दिल्यास, बहुतेक वेळां आमची खलबतें "नवाकाळ" ऑफिसांत होत व अवश्य तो सल्ला काका आम्हांला देत आणि चळवळीकडे एक युद्धतंत्र या दृष्टीनें पहाण्याची माझी दृष्टी ही त्यांच्या कौतुकाचा विषय होती. त्यांचा सल्ला नेहमीं त्याच दृष्टीनें मिळत होता. रजपुती जिद्द ही एक त्यांच्या स्वभावांतील विशेष गोष्ट होती.

## एकसष्टीचा न झालेला समारंभ

३२ सालीं नाशिकच्या तुरुंगांत असतांना महाराष्ट्रांतील दोन पुढाऱ्यांच्या एकसष्टीच्या समारंभाचे प्रसंग आले. पहिला केळकरांचा. त्यावेळीं तुरुंगांतील सर्व मंडळींच्या मतें हा प्रसंग साजरा होणें हें अप्रासंगिक व अप्रस्तुत होतें. तथापि करणें कीं न करणें हें बाहेरच्या लोकांचें कार्य आहे, त्यांनीं ठरविल्यास आम्हीं अभिनंदनपर संदेश धाडावा हें इष्ट असें माझें मत होतें, व त्याप्रमाणें मीं केलेंहि. बहुतेकांना तें नापंसत पडलें. नंतर थोडयाच महिन्यांनीं काकाना ६० वर्षें पुरीं झालीं, त्यावेळीं मीं त्यांनाहि पत्र धाडलें. त्यांच्या उत्तरांत त्यांनीं जें लिहिलें तें त्यांच्या जीवनदर्शनांतील प्रतीकच आहे. वास्तविक यावेळीं माझें स्थान तुम्हां सर्वांबरोबर रहाण्याचें आहे, तें होऊं शकत नाहीं, याबद्दल वाईट वाटतें, अशा अर्थाचें तें पत्र होतें. हें सांगण्यांत या दोन व्यक्तींमधील तात्त्विक दृष्टया विरोध असलेला दृष्टिकोन दाखविण्याचा आहे, कोणाला कमी अगर जास्त लेखण्याचा नाहीं. जगामध्यें अनेकविध प्रकृतीचे लोक असतात. म्हणून जगांत रमणीयता आहे. तसें नसेल तर खरेंच मोठा प्रसंग येईल.

## विरोधी पक्षाची जाहिरातहि नाकारली

३३–३४ च्या चळवळीच्या वेळींसुद्धा आम्हीं "नवाकाळ" ऑफिसांतच जमत असूं. त्याचप्रमाणें माझ्या निवडणुकीच्या पूर्वीचें राजकारण "नवाकाळ" ऑफिसांतच शिजलें. त्यावेळीं महाराष्ट्रांत संपूर्ण काँग्रेसवादी "नवाकाळ" शिवाय एकहि दैनिक नव्हतें, व साप्ताहिकेंहि फार थोडीं होतीं. "नवाकाळ" नेंच फक्त जाहिरात म्हणून सुद्धां वालचंद शेटजींचा जाहीरनामा छापला नाहीं. एवढी काँग्रेसनिष्ठा "नवाकाळ" ची होती व आद्यापहि ती आहे. निवडून आल्यावर मी भेटण्यास गेलों त्यावेळीं झालेल्या

चर्चेंत कौन्सिलच्या कामकाजासंबंधीं त्यांचे विचार लोकांना वाटत होते त्याप्रमाणें अव्यवहार्य नव्हते. त्यांना व सौ. काकूंना झालेला आनंद जितका आभिमानाचा तितकाच वैय्यक्तिक स्वरूपाचा होता, असें मी जर न म्हणेन तर तें कृतज्ञतेला सोडून होईल. दिल्ली व सिमला येथून जाता–येतांना एकटा असो किंवा मंडळींसह असो, माझा मुक्काम या श्वशुरगृहीं असे. त्याप्रमाणें मी न गेलों तर खाडिलकर मंडळींना वाईट वाटे. खटाववाडी, कादेवाडी नाका सोडून हल्लींच्या लहानशा जागेंत गेल्यावर व खाडिलकर कुटुंबावर येणारे आपत्ति–प्रसंग लक्षांत घेऊन मी मुक्कमास न जातां फक्त भेटीस जाई. त्यावेळीं सौ. काकू माझ्यावर रागवत. तथापि मुंबईंत आल्यावर "नवाकाळ" ऑफिसांत गेलों नाहीं व काकांशीं कधीं बोललों नाहीं, असें कधींच झालें नाहीं.

## जें सार्वजनिक तेंच खाजगी

पुत्रशोक, पत्नीशोक, आर्थिक स्थित्यंतरें, राजकीय चढउतार या सर्वांना सुखदुःखे समे कृत्वा याप्रमाणें जसा योगी वागतो त्याप्रमाणें काकांची वागणूक होती. मंत्री झाल्यानंतर मी त्यांच्या भेटीस गेलों व त्यावेळीं हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्याचें पाहून त्यांचा आनंद किती मोठ्या प्रमाणांत होता हें मीं प्रत्यक्ष अनुभवलेलें आहे. हिंदुस्थानचें भवितव्य उज्ज्वल आहे, मिळालेल्या स्वातंत्र्याची न्यूनता कर्तृत्वानें दूर करून सरतें तें पुरतें करण्याची संधी आतां प्राप्त झालेली आहे असें ते म्हणत आणि हा दिवस पहाण्याचे भाग्यदिवस आपणास लाभले याबद्दल ते धन्यता मानत.

महाराष्ट्रांतील त्यांच्या पिढींतील अनेक नामवंत व कर्तृत्ववान व्यक्तींशीं माझा परिचय होता व सामान्यतः चर्चेच्या प्रसंगीं परपक्षांतील एखाद्या व्यक्तीविषयीं थोडातरी अनुदारपणा दाखविला गेला नाहीं असें क्वचित्

होई. परंतु काकांशीं चर्चा करतांना अनेक विषयांच्या अनुरोधानें कोणाहि व्यक्तीचा उल्लेख आला तरी त्यांत संभाषण खाजगी असतांनासुद्धां अनुदार-पणाचा भाव कधींहि दिसला नाहीं. किंबहुना जें सार्वजनिक ठिकाणीं बोलण्यास मनष्य कचरेल असें कधींहि त्यांच्या बोलण्यांत नव्हतें ही विशेष गोष्ट होती.

## मार्गदर्शकाची प्रवृत्ति

प्रत्यक्ष नेतृत्त्व करणें व मार्गदर्शन करणें या दोन गोष्टी मूलतः निर-निराळ्या आहेत. प्रत्यक्ष नेतृत्त्व करतांना अनपेक्षित घटनांना ताबडतोब तोंड द्यावें लागतें व तसें देत असतांना सर्वसामान्य योजनांना विसंगत डावपेंच करावे लागतात. नेतृत्व प्रभावी करावयाचें असेल तर कालज्ञता, कठोरता, कोमलता, आवाहन व आव्हान इत्यादि अनेक गुणांची संपदा अंगीं असावी लागते. मार्गदर्शन हें ज्याप्रमाणें एखादा स्थापत्य–शास्त्रज्ञ संकल्पित वास्तूचे नकाशे तयार करतो त्याप्रमाणें असतें. त्यासाठीं दीर्घ-चिंतन, सखोल ज्ञान याची आवश्यकता आहे. निर्णयानंतर अंमलांत आणण्याचें कार्य हें मार्गदर्शनापासून निराळें आहे. वरील विवेचन लक्षांत घेतां मीं जर असें म्हटलें कीं, काका हे आपल्या प्रकृतिनुसार व बौद्धिक व्यापकतेमुळें मार्गदर्शनासाठीं योग्य होते तर तें अस्थानी होईल असें मला वाटत नाहीं अगर त्यांच्याबद्दल अनादर होतो असेंहि नाहीं. ते द्रष्टे होते व तीच त्यांची भूमिका होती. त्यांचें काव्य समजण्याइतका मी साहित्यिक नाहीं; उपनिषदांवरील त्यांचीं उच्च दर्जाचीं व्याख्यानें आकलन करण्याची अगर जाणण्याची आर्तता माझ्यांत नाहीं; संपादक या नात्यानें जनमताला लावलेलें वळण हें मी चांगल्या रीतीनें समजतों आणि म्हणून मी त्यांना एक श्रेष्ठ संपादक, एक उत्कृष्ट नागरिक व एक आदर्श गृहस्थ मानतों;

आणि अशी आशा करतों कीं, त्यांच्या चारित्र्यांतील जें जें श्रेष्ठ व जें जें उत्कट आहे, तें तें महाराष्ट्रांतील नव्या पिढीला उन्नतिप्रत नेणारें असेंच होईल.

# मुंबईचे पंतप्रधान श्री. बाळासाहेब खेर

## आदर, प्रेम व आपुलकी

श्री. काकासाहेब खाडिलकर यांना प्रत्यक्ष पहाण्याचा योग १९२४-२५ च्या सुमारास आला त्यावेळीं मी लोकमान्य पत्राचें संपादकत्व पत्करलें होतें आणि लोकमान्याच्या कामाकरितां मी दोन देवळाजवळच्या लोकमान्याच्या ऑफिसमध्यें जात असें. त्यावेळीं श्री. काकासाहेब खाडिलकर हे केनेडी पुलाखालच्या गोकुळदास देवजीच्या घाडींत रहात असत. मी लोकमान्याच्या ऑफिसांत जात असतांना आणि ते नवाकाळमधून परत येत असतांना रस्त्यांत मी त्यांना त्यावेळीं पुष्कळदां पहात असें. त्यावेळीं त्यांची माझी ओळख नव्हती. तेव्हां बोलण्याचा संबंध नव्हता. पण त्यावेळीं काकासाहेबांना पाहिलें कीं, त्यांच्या पूर्वपीठिकेमुळें आणि धीरगंभीर मुद्रेमुळें मला यांच्या विषयीं आदर वाटत असे.

१९२९ सालीं काकांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला त्यावेळीं त्या खटल्याचें कामकाज सॉलिसिटर या नात्यानें आमच्या फर्मकडे होतें. त्यावेळीं काकांचा आणि माझा निकटचा परिचय झाला. त्यावेळीं खटल्याच्या बचावाबद्दलच्या सूचना करतांनांची काकांची मनोवृत्ति पाहून मला फार आश्चर्य वाटावयाचें ! त्या सूचना ते इतक्या अलिप्त मनोवृत्तीनें देत असत कीं, त्यांच्या त्या स्थितप्रज्ञतेनें मनाला मोठा विस्मय वाटत असे. खटल्याच्या बचावाची तयारी करतांना, खटला चालू असतांना आणि खटल्याचा निकाल लागल्यावरहि त्यांनीं जी असामान्य मनोवृत्ति दाखविली

त्यामुळें त्यांच्या विषयींच्या आदरांत प्रेमाची भर पडली आणि काका-साहेबांविषयीं मला आपुलकीचा जिव्हाळा वाटूं लागला. तेहि मजवर अत्यंत प्रेम करीत.

## माझा दंड भरला

१९३०—३२ च्या कायदेभंगाच्या चळवळींत माझ्यावर खटला होऊन मला आठ महिने शिक्षा व २५० रु. दंड, अशी शिक्षा झाली. दंड न भरतां दंडाच्या ऐवजी शिक्षा भोगावी असा चळवळींतील तंत्राप्रमाणें माझा आग्रह होता आणि दंड भरण्याच्या विरुद्ध मी होतों. पण त्यावेळीं काका मला आपल्यापैकींच मानत असल्यामुळें त्यांनीं माझा दंड भरण्याची व्यवस्था केली आणि शिक्षेची मुदत संपल्यावर माझ्या अपेक्षेविरुद्ध माझी सुटका झाली. दंड कोणी भरला हें त्यानंतरहि बरेच दिवस मला अज्ञात होतें. नंतर प्रसंगाप्रसंगानें काकांनीं दंड भरल्याचें मला समजलें. काकांनीं मला आपल्यापैकीं मानून माझा दंड भरला, हें कळल्यावर त्यांच्या-विषयींच्या माझ्या प्रेमादरांत एकप्रकारच्या कृतज्ञतेच्या भावनेची भर पडल्यावांचून राहिली नाहीं.

## पुढाकाराची प्रेरणा

कायदेभंगाच्या चळवळीपूर्वी आणि नंतर भी काँग्रेसच्या कामांत भाग घेत असें. पण माझें कार्य मुख्यतः वादातीत अशा विधायक क्षेत्रांतील होतें. कायदेभंगाच्या चळवळीनंतर कांदेवाडी नाक्यावर काका रहात असतांना एकदां गंगाधरराव देशपांडे आणि काका यांनीं मला बोलावून घेतलें. राजकारणांत मीं पुढाकार घेतला पाहिजे, मागें मागें रहातां कामा नये असें मला त्या दोघांनींहि आग्रहानें सांगितलें. "काँग्रेस दिवसेंदिवस अधिक जबाबदारी घेणारी प्रभावी संस्था होणार आणि त्यादृष्टीनें काँग्रेसची

संघटना झाली पाहिजे. तशा प्रकारची काँग्रेसची संघटना बनविण्यांत तुम्हीं अधिक भाग घेतला पाहिजे" असें गंगाधररावांनीं आणि काकांनीं मला निक्षून सांगितलें. तरुण पिढींतल्या कार्यकर्त्यांना पुढें येण्यास प्रोत्साहन देऊन त्यांना कार्यतत्पर करण्याची गंगाधरराव आणि काका यांची ही वृत्ति त्या प्रसंगीं दिसून आल्यानें तो प्रसंग अद्यापहि मला नीट स्मरतो आहे.

## व्याख्यानप्रसंगींची तल्लीनता

काकांचीं भाषणें मीं अनेकदां ऐकलेलीं आहेत. पण त्यांचें एक भाषण माझ्या विशेष लक्षांत राहिलें आहे. वांद्र्याच्या सरस्वती उत्सवांत त्यांचें बाङ्मयविषयक भाषण होतें आणि आमंत्रित या नात्यानें त्या प्रसंगीं मी हजर होतों. विषय साधाच होता पण काकांनीं आपल्या व्याख्यानाच्या शैलीनें त्यांत विलक्षण रंग आणला. व्याख्यानाच्या वेळीं विवेचनाच्या ओघाला धरून त्यांच्या चेहऱ्यावर होणारे फेरबदल, आवाजाचा अनुकूल चढउतार, आणि हातांच्या परिणामकारक हालचाली यांच्या प्रभावामुळें काकांप्रमाणेंच श्रोतेहि प्रतिपाद्य विषयाशीं एकरूप झाले. रुक्षशा वाटणाऱ्या विषयाला त्यांनीं रसाळ करून सोडलें. नाटकाच्या तालमी देणारे काका, नाटककार काका, वक्ते काका यांचें एकवटलेले गुणच त्यावेळीं पहावयास सांपडले असें मला वाटलें आणि अद्यापहि तो व्याख्यानाचा प्रसंग माझ्या मनासमोर ताजा असल्यासारखा आहे.

## अचल ईश्वरनिष्ठा व स्थितप्रज्ञता

काकांविषयींच्या आत्मीयतेमुळें मी काकांना वारंवार भेटावयास जात असें आणि त्यांचा आशीर्वाद घेऊन परत येत असें. काकांच्या मृत्यूपूर्वी आठच दिवस मीं त्यांची भेट घेतली होती. काकांच्या आयुष्यांत त्यांच्यावर बऱ्याच शारीरिक, कौटुंबिक आपत्ति आल्या त्या त्या वेळींहि मी त्यांना

भेटत असें. त्यावेळीं त्यांची नुसती भेट घेऊन न थांबतां मी त्यांच्या मनोवृत्तींचें सूक्ष्म निरीक्षण करीत असें. या सर्व प्रसंगीं काकांची ईश्वरनिष्ठा व स्थितप्रज्ञता अचल अशी प्रतीत होत होती. संसार सोडून अरण्यांत राहून संसारापासून अलिप्त राहतां येतें यांत नवल नाहीं. पण संसारांत राहून प्रापंचिक दुःखांचे आघात सोसत असतांना निर्विकार वृत्ति ठेवून अलिप्तता ठेवणें हें फार कठीण आहे. पाण्यांत राहून पाण्यापासून अलिप्त असणाऱ्या कमलपत्राप्रमाणें संसारांत असावें असें आम्ही ऐकतों. पण त्याचें प्रत्यक्ष उदाहरण काकांच्या जीवनांत पहावयास सांपडत असे. आपण ॐकाराचा जप करीत असतों आणि त्यामुळें ॐकाराचा अनाहत ध्वनि आपणास ऐकावयास येतो असें काका सांगत असत. तें ऐकतांना असें वाटत असे कीं, आपण एखाद्या संताच्या सहवासांत आहों आणि मन आंतरिक समाधानानें भरून जाई. काका स्वतः स्थितप्रज्ञ होते आणि आपल्या सहवासांत येणाराला त्यांच्या चारित्र्याचा प्रभाव वरच्या पातळीला नेण्यास चुकत नसे.

# दे. अण्णासाहेब दास्ताने, खानदेश

## कार्यकर्त्यांशीं समरस

काकासाहेबांचा व माझा संबंध एक प्रकारें घरच्यासारखा झाला होता. त्याचें सर्व श्रेय काकासाहेबांस आहे असें म्हणणें प्राप्त आहे. त्यांनीं मला ज्या रीतीनें वागविलें त्यामुळें घरांतल्या सर्व मंडळींनाहि असें वाटूं लागलें कीं, हे काकासाहेबांचे आप्तसंबंधी आहेत आपण त्यांचेशीं घरोब्याचा संबंध समजून वागलें पाहिजे–अथवा असेंहि म्हणतां येईल कीं, घरच्या सर्व मंडळींना त्यांनीं असें वळण लावलें होतें कीं, त्यांच्या स्नेह्याशीं देखील ते

आपले आप्तस्वकीय आहेत असें समजून वागावें. काकासाहेब असोत अगर नसोत, घरच्या सर्व मंडळींनींहि मला घरांत परकेपणा वाटूं नये असेंच वागविलें आहे.

मी माझ्या स्वभावाप्रमाणें याचें इंगित समजण्याचा प्रयत्न करीत राहिलों आहें. मला असें म्हणावेंसें वाटतें कीं, काकासाहेबांना कार्यकर्त्यांची अशी सूक्ष्म पारख असे कीं, ते खरा कार्यकर्ता म्हटला कीं, त्याच्याशीं स्वकीयाप्रमाणें समरस होत. मग तो प्रसिद्ध असो, प्रसिद्ध नसो.

## चोपड्याची भेट

काकासाहेबांचा माझा प्रथम संबंध केव्हां आला हेंहि माझ्या स्मरणांत आतां चांगलेसें नाहीं. पण मला असें आठवतें कीं, काकासाहेबांना प्रथम पूर्व-खानदेशांत चोपड्यास मीं नेले. चोपडें गांव पूर्व खानदेशांतील एका अशा कोपऱ्यांत आहे कीं, तेथें जाणें फार त्रासाचें व कष्टाचें असे. दळणवळणाचीं साधनें म्हणजे कोणीकडूनहि २० मैल तरी तांग्यानें जावें लागायचें, शिवाय मध्यें तापीचें अंति त्रासदायक पात्र पसरलेलें. तांग्यांतून तापीपर्यंत दोन्ही बाजूनें पायी बरेंच चालावें लागे. पण त्या ठिकाणीं १९१८ पासून राष्ट्रीय कामाकडे तरुणांचा फार ओढा होता. १९१८ सालीं लोकमान्यांना प्रथम चोपड्यास नेले होते. त्यावेळचें स्मरण रोमांचकारी आहे. लोकमान्यांची ठरलेली तारीख टळली, कारण त्यांना आग्ऱ्यास लोकांनीं जवळ जवळ उचलूनच उतरवून घेतले आणि त्यामुळें चोपड्यास पोंचण्यास त्यांना दोन दिवस उशीर झाला. धरणगांव रेल्वे स्टेशनपासून चोपडें २० मैल आहे. या सर्व अंतराचे रस्त्यावर खेड्यापाड्यांतली जनता २ दिवस येऊन पडून राहिली होती व लोकमान्यांचें दर्शन घेऊनच मग परतली.

साहजिकच चोपड्यासच काकासाहेबांस लोकमान्यांनंतर नेणें ओघानें आलें. त्यावेळेपावेतों त्यांच्या वक्तृत्वाची कल्पना नव्हती. त्यावेळीं त्यांचें

वक्तृत्व प्रभावी आणि कार्यकर्ते व जनता यांना कार्यप्रवण करणारें आहे असें आढळलें, आणि काकासाहेबांचा उपयोग यासाठीं किती आहे हें लक्षांत आलें व त्याचा लाभ भरपूर व्हावा असें वाटूं लागलें. त्या कामांत त्यांचा माझा संबंध आला. तेवढ्याच परिचयाचें पर्यवसान त्यांचे माझे संबंध घरोब्यासारखे होण्यांत झालें.

## मनाचा मोकळेपणा

काकासाहेब पुणें सोडून मुंबईस राहूं लागल्यानंतर ते 'लोकमान्यां'त असत हे सर्वविश्रुत आहेच. त्यावेळीं ते एका वाडींत राहत असत. त्यांचें घरीं जाण्याचा त्यावेळीं मला कांहीं प्रसंग आला. आणि त्यावेळेपासून घरोबा वाढेल असेच ते आणि घरांतील मंडळी व मुलें माझ्याशीं वागलीं. कै. सौ. गौरीबाई खाडिलकर यांचे हृदयांत असलेली राष्ट्रभक्ति आणि तदनुसार त्यांचें वर्तन हें त्याच वेळीं माझे लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं, आणि त्यांच्या राष्ट्रप्रेमाचा व निष्ठेचा परिचय त्यांनीं मरेपर्यंत दिला आहे, हें सर्वांस माहीत आहेच. काकासाहेबांचा सर्व प्रपंच सुगृहिणीस शोभेल असा संभाळून त्यांनीं पू. महात्माजींस आपल्या स्वतःच्या सुताच्या धोतराची देणगी पाठविण्याची वहिवाट शेवटपर्यंत कायम ठेवली. त्यांचे व कै. सौ. अवंतिकाबाई गोखले यांचे संस्कारी सहवासानें मुंबईस व इतरत्र स्त्रियांमध्यें राष्ट्रवृत्ति निर्माण होऊं लागून स्त्रिया कांहीं कामें करूं लागल्या.

'लोकमान्यां'त कांहीं गुंतागुंती होऊन काकासाहेबांनीं 'नवाकाळ' पत्र सुरू केलें. कोण जाणें कां, पण मला थोडी चिंता वाटूं लागली कीं, मुंबईचा खर्च व त्यांतच अनेक वर्तमानपत्रांनीं अडवून ठेवलेला बाजार यांत 'नवाकाळ' चा प्रपंच कसा चालत राहील. म्हणून मी बेताबेतानें

त्यांना प्रश्न विचारण्याचें धाडस केलें आणि त्यावेळीं एकदम त्यांच्या हृदयाचा मोकळेपणा समजला. त्यांनीं 'नवाकाळ'ची जुळवाजुळव करण्यासाठीं कै. वासुकाकांचे घेतलेलें आर्थिक सहाय्य आणि दैनंदिन उत्पन्न व खर्चाचे अंदाज, तसेंच कोणत्या वेळीं त्यांत नुकसान व कोणत्या प्रसंगीं त्यांत प्राप्ति होते याचें रहस्य, इत्यादि सर्व मोकळेपणानें सांगून माझ्या मनाला वाटणारा संकोच नाहींसा केला. त्यानंतर मीहि वेळोवेळीं माहिती घेत आलों आहे. ही वहिवाट मी श्री य. कृ. खाडिलकर यांनीं जबाबदारी पत्करल्यावर देखील ठेवली व त्यांनीं काकासाहेबांपेक्षांहि माझ्या सर्व कुटुंबाशीं घरोबा वाढण्यास मदत केली आहे. अर्थात् 'नवाकाळ'च्या संसाराबाबतहि मला निश्चित होतां येईल अशी माहिती देत राहिले.

सार्वजनिक जीवनांत लोकमान्यांशीं माझा अनेक नाजुक व महत्त्वाचे प्रसंगीं संबंध आलेला आहे. पण काकासाहेबांनीं मला जें प्रेमाचें स्थान आणि घर निर्माण करून दिलें त्याचें फार मोठें महत्त्व मला वाटलें आणि वाटत आहे. किती तरी सार्वजनिक आणि खासगी अडचणींत मला यामुळें मदत मिळालेली आहे हें मीच जाणून आहें.

## काँग्रेसच्या फैजपूर अधिवेशनास अनुकूलता

फैजपूरला काँग्रेस भरण्याचा निर्णय घेतला खरा, पण किती अडचणींना, रागद्वेषाच्या प्रपंचांना तोंड द्यावें लागेल याची कल्पना नव्हती. स्थानिक सरकारी अधिकारी, कलेक्टर वगैरे यांनीं, जमीनमालकांनीं जमिनी देऊं नयेत, यासाठीं जंग जंग पछाडले. सावदे येथील म्युनिसिपालिटी आणि सावकार यांनीं रस्ता देऊं नये यासाठीं त्यांना भडकावलें. त्यांनीं भरपूर झगडा केला. टाइम्ससारख्या वर्तमानपत्रांनीं तर फैजपूरच्या फज्जा उडवायचा कुशलते नेंप्रयत्न केला. त्यामुळें वर्किंग कमिटींतील कांहीं लोकांवरहि

परिणाम झालेला आढळला. मुंबईहून गेलेले पुढारी यांनींहि विरुद्ध अभिप्राय जाहीर केले. महात्माजींकडे तक्रारींचीं मेंडकुळी पाठविलीं गेलीं.

महाराष्ट्र प्रांतांतहि अनेक प्रकारें विरोधी सूर वाहूं लागले. खानदेशमध्येंहि आपले बाजूस काँ. अधिवेशन पाहिजे तें जमत नाहीं म्हणून विरुद्ध प्रयत्न होऊं लागले. अशा स्थितींत मुंबईस म. प्रां. काँ. क. ची बैठक पहिलें अंदाजपत्रक मंजूर करण्यासाठीं भरली. त्यावेळीं मी व काँग्रेसचे एंजिनिअर श्री. गुलाटी हे काकासाहेबांचे घरीं उतरलों होतों. कै. श्री. नरिमन यांनाहि फैजपूरकडे नेले होते त्यांनीं काँग्रेसची फजीति होऊं नये या बुद्धीनें फैजपूरांत काँग्रेस केली जाऊं नये अशासाठीं विस्तृत पत्र महात्माजींस पाठविलें. महात्माजींनीं तें मजकडे पाठविलें. त्यावर श्री. नरिमन यांनीं कोणत्या गोष्टी विचारांत घेतल्या नाहींत हें मीं महात्माजींस कळवलें. महात्माजींचें समाधान झालें.

काकासाहेबांना सर्व परिस्थिति सांगितली. त्यांनीं सर्व परिस्थितीचें बारकाईनें परीक्षण केलें आणि आपला अभिप्राय अनुकूल दिला. तेव्हांपासून धोरण व कार्यपद्धति यासंबंधीं विशेष आत्मविश्वासानें सर्व विरोधास धैर्यानें व उत्साहानें मीं तोंड दिलें.

त्यानंतर वेळोवेळीं मुंबईस जाण्याचा प्रसंग आला. त्यांनीं आपणाकडेच उतरण्यास प्रोत्साहन दिलें आणि सर्व तयारीची बारीक सारीक चौकशी करून माझा उत्साह व धैर्य वृद्धिंगत होत जाईल अशा प्रकारेंच मार्गदर्शन केलें.

ते कदाचित् फैजपूर अधिवेशनास हजर रहाणार नाहींत अशी कल्पना आली व ती सर्वस्वीं अस्थानी नव्हती; म्हणून मी त्यांना मुद्दाम आग्रहपूर्वक विनंति केली आणि माझ्या आग्रहानंतरच त्यांनीं फैजपूरला येण्याचें मान्य केलें.

## अध्यात्मचिंतन व ग्रंथनिर्मिति

ते अध्यात्मचिंतनांत दिवसांतून बराच काळ घालवींत, पण त्यांचें चिंतन हें केवळ स्वतःचे समाधानासाठीं चालत नसे, मलाहि अध्यात्म-चिंतनाची गोडी होती व आहे, व्यवहार आणि अध्यात्म यांचा अविभाज्य संबंध आहे अशी माझी अनेक वर्षांपासून खात्री पटली होती. उत्क्रांति-पथांत मानवी जीवन घडत आहे. या जीवनाची उत्क्रांति, व्यक्तिजीवन, समाजजीवन म्हणजेच व्यवहार, यांतूनच अधिकाधिक विकासित होत आहे. या विकासाचें सूत्र आणि गति सांभाळली गेली पाहिजे; इतकेंच नव्हे तर प्रतिगामी स्वरूपाचे विकारी-आघात ओळखतां यावेत, या आघातांतून अविचलपणें प्रगति आणि विकास होत रहावा, मानवी जीवनांत उत्तरोत्तर अधिकाधिक पुरुषार्थ वाढत जावेत; मानव सृष्टि भेदातीत आहे हें सिद्ध करण्यासाठीं मानवी जीवन आणि व्यवहार यांत अवश्य त्या घडामोडी व सुव्यवस्था निर्माण करण्याचा पुरुषार्थ हाच मानवी उपक्रमांतील पुरुषार्थ आहे; याहि पुढें जाऊन सृष्टिजात एकाच ईश्वरी प्रकृतीचीं अंगें आहेत, या धोरणाशीं सुसंगत व्यवहार करण्याचा प्रयत्न मानवानें करीत राहावयाचा आहे; अशी अध्यात्मचिंतनाची उपयुक्तता आहे असा कांहीं अनुभव अथवा प्रतीति माझेसारख्यासहि आहे. काकासाहेबांचे अध्यात्मचिंतनाची दिशा देखील अशीच आढळली. आपल्या चिंतनांतून मिळालेले अनुभव लक्षांत घेऊनच त्यांनीं उपनिषदांवर वगैरें ग्रंथनिर्मिति केली आणि करीत रहाण्याची त्यांची इच्छा शेवटपर्यंत होती हेंहि सर्वांस माहीत आहे.

## खडतर जीवन

काकासाहेबांचें जीवन आतां चित्रासारखें स्मरणीद्वारा जगापुढें आलेलें आहे. काकासाहेबांचें जीवन सामान्यपणें फार खडतरच गेलेलें आहे. त्यांची

प्रकृति केव्हांच ढासळावी असें हें जीवन दिसतें, पण त्यांचे अंतर्यामीं एक शुद्धीची प्रेरणा एकसारखी कार्यक्षम राहिली व ती दिवसेंदिवस वृद्धिंगत होत राहिली. त्या शुद्धीच्या जोरावर त्यांनीं जीवनकलहाला तोंड दिलें आणि आपलें जीवनकार्य यशस्वीपणें पार पाडलें, इतकेंच नव्हे तर इतरांचें जीवनांत शुद्ध आणि पुरुषार्थाच्या प्रेरणा निर्माण होत रहातील अशा रीतीनें स्पृहणीय कामगिरी करण्यांत आपल्या जीवनाचें सार्थक मानलें.

## उत्तरोत्तर उच्च पातळी गाठली

आपली प्रतिष्ठित भूमिका त्यांनी अढळ ठेवली, इतकेंच नव्हे तर त्यांत दिवसानुदिवस उत्तरोत्तर उच्च पातळी गांठली. इतरांचे जीवनास या पातळीवर येण्यास यशस्वी मदत त्यांचेकडून झालेली आहे. जशास तसें हें सज्जनपणाचें नाहीं. उलट इतरांनीं आपल्या विकारांचें प्रदर्शन केलें आणि यांत आपली हानि झाली तरी अशाहि माणसाशीं केवळ भलेपणानेंच नव्हे, तर त्यालाहि आपलें विकारी जीवन पालटण्यास मदत व्हावी यासाठीं स्वतःकडून शक्य तें त्यांनीं केलेलें दिसतें. या सर्व अंतःशुद्धीमुळेंच त्यांनीं दीर्घायुषि जीवन घालविलें आणि शेवटपर्यंत शरिरावर मात करून आपला नित्यक्रम घड्याळाप्रमाणें चालवून जनतेची शुद्धि होण्यासाठीं सेवा केली आहे. असें हें जीवन त्यांचे कुटुंबियांस उपकारक झालेलें आहे. काका-साहेबांवर पुत्रनिधन, पत्नीनिधन अशासारखे दुर्धर प्रसंग शेवटपर्यंत आले. त्यांस त्यांनीं याहि वयांत आणि शरीर जर्जर झालें असतां कसें तोंड दिलें हें पाहून आजहि त्याचे आप्त कौटुंबिक आघातांना त्यांचा आदर्श पुढें ठेवून तोंड देत आहेत. त्यांनीं जें धैर्य आणि शांति राखून आपला जीवनव्यवहार चालू राखला आहे, यास श्री. काकासाहेबांचें जीवनसंस्कार कारणीभूत दिसतात.

असल्या संस्कारी जीवनाची शक्ति त्यांच्याशीं संबंधीत असलेल्या 'नवाकाळ'

संस्था व इतर संस्थांतील लहानथोरांस आणि जगासहि देह पडल्यानंतरहि योग्य वृत्ति आणि सामर्थ्य देत रहात आहे, याबद्दल शंका वाटण्यास जागा आहे काय ?

# दे. द. रा. घारपुरे, मुंबई

## होमरूल–स्पेशलचा प्रवास व खाडिलकरांचें वैशिष्ट्य

१९१६ सालापासून मीं राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास जावयास सुरवात केली. डॉ. साठे यांनीं "होमरूल स्पेशल" काढून सर्वांची मोठी सोय करून ठेवली होती. त्या प्रवासांत माझी जागा बहुतेक दरवर्षी ठरून गेलेली होती. नानासाहेब वैद्य, अण्णासाहेब परांजपे, काकासाहेब खाडिलकर, सीतारामपंत दामले यांच्याच डब्यांत माझी जागा असे. राजकारणांत प्रत्यक्ष भाग घ्यावयास सुरवात करण्यापूर्वी राजकारणी पुढारी कसे वागतात हें पहावयाची संधि अनायासें या पहिल्या चार पांच वर्षांत मिळाली. त्या सर्वांत काकासाहेबांचें वैशिष्ट्य चटकन निदर्शनास यावयाचें. तासन्तास गाडीचा प्रवास झाला, व अनेकांच्या अनेकविध गप्पा झाल्या तरी काकांच्या तोंडून एकहि शब्द बाहेर पडत नसे. मनुष्याला एवढा वेळ तोंडांतून शब्द न काढतां बसवतें तरी कसें, याचें मला फार नवल वाटे. गाडीचा प्रवास असा बराच झाल्यानंतर, गप्पांत एखादा विषय असा निघावा कीं तो खाडिलकरांच्या वृत्तीशीं जुळावा. मग मात्र ते बोलण्यांत भाग घेत; आणि तो असा कीं, नंतर दुसऱ्यांना बोलण्याला फुरसतहि मिळत नसे. त्या विषयाचें सांगोपांग विवेचन करून, आपलें त्यासंबंधीं निश्चित मत आमच्या गळीं ते उतरवीत. या यांच्या स्वभावामुळें, प्रत्येक प्रवासांत, कसें तरी करून त्यांना बोलावयास लावावयाचें असा बाकीच्यांचा प्रयत्न असे, आणि तो

प्रयत्न अंतीं यशस्वी होई-त्यांत सितारामपंत दामले विशेष भाग घेत-मग मात्र साध्या संभाषणामध्येंहि आपण कांहीं विशेष ज्ञान संपादन करीत असल्याचा मला आनंद होत असे. कारण दामले यांनीं मुद्दाम प्रयत्न केला तरी, बहुतेक माझ्या तोंडचेंच एखादें विधान त्यांचें तोंड उघडावयास खरें निमित्त होई व नंतरहि आपलें भाषण जणूं काय मलाच उद्देशून ते करीत आहेत असें मला वाटे.

एकत्र प्रवासाचीं आमचीं अशीं एकंदर पांच वर्षें गेलीं. त्यामुळें काकांच्या स्वभावाच्या खांचाखोंचा मला बहुतेक कळून चुकल्या होत्या. एकदां दिल्लीच्या मुक्कामांत कुतुबमिनार पहावयास गेलों, तेव्हां वरती चढायचा प्रसंग आला. पण काकांनीं सरळ सांगितलें " तेवढें माझें काम तुम्हींच उरकून घ्या. तुम्हीं परत येईपर्यंत मी या चंचीचीच थोडीशी तोंड-ओळख करून घेतों " असा अपवादात्मक एखादा प्रसंग सोडला, तर काकांचा विनोद त्यांच्या नाटकांच्याबाहेर कधीं दिसून येत नसे. एका खेपेला मुंबईस उतरल्यावर-काका तेव्हां मुंबईकर झालेले होते-गांवांत जाण्याची वेळ आली. माझी त्यावेळची पद्धत जड सामान क्लोक रूममध्यें ठेवून ट्रॅमनें घरीं जाण्याची होती. पण मी क्लोक रूमकडे जाण्याचें नांव काढल्या-बरोबर काकांनीं माझा हात धरूनच मला बाजूला ओढलें. " मुंबईंत अजून व्हिक्टोरिया मिळेनाशा झाल्या नाहींत. तेव्हां तूर्त तरी या काटकसरीचें कारण नाहीं. माझ्या गाडींतूनच चला. मी तुम्हांला घरीं पोचवितों " असें थोडेसें वडीलकीच्या नात्यानें दरडावूनच ते बोलल्यावर मला गाडींत बसणें भाग पडलें. त्या दिवसापासून बोरीबंदरपुरता तरी माझा व क्लोक रूमचा संबंध अजिबात तुटला एवढें खरें.

## निकट परिचय

काकांचा व माझा विशेष निकट परिचय होण्यास १९२६ सालीं मीं

मुंबईस रहावयास आलों तेव्हांपासून सुरवात झाली. मधून मधून मी नवाकाळ कचेरींत जात असें तरी आपण होऊन कांहीं विषय काढून मी क्वचित्च त्यांच्यापुढें जात असें. जिन्यांतून चढतांना उतरतांना त्यांनीं मला पाहिलें तर एखादे वेळीं मुद्दाम हांक मारून कांहीं विचारपूस ते करीत एवढेंच. त्या अवधींत एका व्यावहारिक गोष्टीनें आम्हास विशेष जवळ ओढलें. एक दिवस श्री. फाटकांच्याकडून निरोप आला कीं, काकांनीं तुम्हास भेटून जावयास सांगितलें आहे. मुद्दाम बोलावलें जाण्याचा प्रसंग मला कधीं आला नव्हता म्हणून मला आश्चर्यच वाटलें. मी गेल्यावर त्यांनीं आपलें काम मला सांगितलें. नवाकाळ काढला त्यावेळीं जमनालाल बजाज यांनीं त्यांना कांहीं रक्कम बिनव्याजी दिली होती. अट एवढींच कीं दर सहा महिन्यांनीं ती परत करावी व आठ दिवसांनीं पुनः घेऊन जावी. "ही रक्कम तुम्ही तुमच्या श्वशुरांस विचारून मला देतां आल्यास पहा. म्हणजे माझ्यावर विशेष ताण न पडतां माझें काम होईल. बरोबर आठव्या दिवशीं रक्कम परत मिळेल." दुसरे दिवशीं श्वशुरांस सांगून त्यांचेकडून रक्कम घेऊन काकासाहेबांच्या स्वाधीन केली. त्यांनीं बरोबर आठव्या दिवशीं ती रक्कम पोंचती केली. हा प्रकार सुमारें दीड वर्ष म्हणजे तीन वेळां चालला पुढें काकांच्या तुरुंगवासामुळें तो आपोआपच बंद पडला.

## इंग्रजी मासिकाची योजना

या मुदतींत मधून मधून नवाकाळसंबंधीं कांहीं कांहीं बाबतींत ते माझ्याशींहि विशेष खुलासेवार चर्चा करीत. वर्तमानपत्राचें धोरण व त्याची पद्धति यावर आपल्या वैशिष्ट्याचा ठसा कायमचा असणें जरूर आहे व तो चुकूनहि बदलूं नये म्हणून आपण किती दक्षता घेतों हें त्यांनी एकदां सुमारें अर्धा पाऊण तास सांगितलें. त्यावेळीं नवाकाळचा जम चांगला

बसला होता व दैनिकाच्या पलीकडेहि कांहीं नवीन गोष्ट वृत्तपत्र क्षेत्रांत करावी असें विचार त्यांच्या मनांत घोळावयास लागलें होतें. मुख्यतः ही चर्चा त्यांचे मुख्य संपादक श्री. फाटक यांच्या बरोबर व्हावयाची. कारणपरत्वेंच मी हजर असावयाचा. अशाच एका प्रसंगीं इंग्रजीमध्यें एक मासिक काढण्याचा आपला विचार असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्याबरोबरच मासिकाच्या संपादक वर्गाची जुळवणी करीत आहे; व त्या यादींत तुमचें नांव घातलें आहे, असें त्यांनीं मला सांगितलें. मी चकितच झालों. वर्तमानपत्राचा संपादक किंवा लेखक होण्याची मला मुळींच हौस नव्हती. तथापि एक होतकरू कार्यकर्ता या दृष्टीनें काका माझ्याकडे विशेष उत्सुकतेनें लक्ष पुरवीत, ही गोष्ट या व नंतर घडलेल्या अनेक प्रसंगांनीं दिसून आली. काकांच्यावर लवकरच साबरमतीला रवाना होण्याची पाळी आली आणि त्यांचे त्यावेळचें सर्व विचार तसेच राहिले.

## चलबिचल घालविणारें गीतारहस्य

साबरमतीच्या तुरुंगांतून काकांची सुटका झाली, त्यावेळीं मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीतर्फे त्यांचें स्वागत करण्यांत आलें. मुं. प्रां. काँ. कमिटीचे अध्यक्ष जमनादास मेहता यांनीं राजीनामा दिला होता. उपाध्यक्ष या नात्यानें मीच अध्यक्षाचें काम करीत होतों. म्हणून त्या व इतर अनेक संस्थांतर्फे त्यांचा जो सत्कार झाला त्यांत प्रमुख भाग मलाच घ्यावा लागला होता. तुरुंगवासाचा काकांवर बराच परिणाम झाला होता व सत्कार प्रसंगीं त्यांनीं तो उघडपणें बोलून दर्शविण्यास कमी केलें नाहीं. "घरची मंडळी व इतर मायापाश यांनीं जेव्हां मनांत चलबिचल उत्पन्न होत असे, त्या वेळीं मी गीतारहस्याचें पारायण करण्यास सुरवात करी. अजूनहि माझें श्रोत्यांस हेंच सांगणें आहे कीं, गीतारहस्य हा मनाच्या अस्वस्थतेवर उत्तम उपाय आहे."

बहुतेक प्रत्येक व्याख्यानांत त्यांनीं ही गोष्ट विशद करून सांगितली. लवकरच मिठाचा सत्याग्रह सुरू व्हावयाचा होता. आणि लोकांना हजारोंनीं तुरुंगांत जाण्याचा संदेश महात्माजी देणार होते. त्याची पूर्वभूमिकाच जणूं कांहीं काका तयार करीत होते.

यानंतर माझें काकांच्याकडे घरींहि जाणें येणें वाढूं लागलें. पण त्यांत रिकामपणाऐवजी कामाचाच भाग अधिक होता. एक दिवस मी त्यांच्याकडे गेलों असतांना, दे. गंगाधरराव देशपांडे तेथें आलेले होते. ते वर्किंग कमिटीहून आले होते. तेथील हकीकत विचारण्याकरितांच मी गेलों होतों. मला पाहतांच गंगाधररावांनीं प्रश्न केला 'काय कंबर बांधतां आहांत ना? लवकरच तुरुंगांत जावयाचें आहे!' मीं उलट उत्तर देण्याच्यापूर्वीं काकांनींच आपण होऊन तें काम केलें. "स्वतः जाणार आहेत एवढेंच नव्हे तर अनेकांनाहि बरोबर नेण्याची त्यांची धडपड आहे. मला सुद्धां आतां 'तुम्ही येणार ना' असें विचारण्याकरितां आले असतील" असें काकांनीं उत्तर दिलें. त्यानें मला कितीतरी मांस अंगावर चढल्यासारखें झालें.

## सत्कार करून घेणें गुन्हा

१९३२ च्या नोव्हेंबरमध्यें काकांना साठावें वर्ष पुरें होत होतें. त्यापूर्वी चार महिने नरसोपंत केळकर यांचा पंचषष्ट्यब्दिपूर्तिसमारंभ झाला होता. काकांचाहि असाच समारंभ करावा असा विचार कांहीं मंडळींच्या मनांत आला. त्याकरितां एक कमिटीहि मुकर केली गेली व माझें नांव चिटणीसांमध्यें होतें. किंबहुना मीच यांत पुढाकार घ्यावा अशी बऱ्याच जणांनीं आपली इच्छा दर्शविली होती. माझ्यापुढें तो मोठा बिकट प्रसंग होता. मनांतील विचार त्या मंडळींपुढें मांडण्याचें मनोधैर्य माझ्यांत नव्हतें. १९३२ सालीं स्थानबद्धतेंतून सुटल्यावर आजारीपणामुळें माझ्यावर सक्तीचा

तुरुंगवास लादला गेला नव्हता. तथापि आपले सर्व सहकारी कारावासांत असतांना, आपण बाहेर आहों ही गोष्ट मनाला सारखी खात असे. काकांचीहि तीच स्थिति होती. एक दिवस त्यांच्याकडे गेल्यावर त्यांनीं मला विचारलेंच "काय गडबड आहे! कोणती भानगड सुरू केली आहे? तुम्हांला माहीत आहे ना कीं, मला हा समारंभ करून घ्यावयाचा नाहीं!', मी सरळच सांगितलें "तें खरें! पण मीं तसें म्हणून माझें कोण ऐकणार! उलट मलाच दोष मिळेल." तेव्हां त्यांचें व माझें असें ठरलें कीं, कमिटीच्या सर्व सभासदांना घेऊन मी काकांच्याकडे जावें आणि त्यांनीं स्वतः आपलें सगळें म्हणणें सांगावें. त्याप्रमाणें सुमारें पंचवीस तीस प्रमुख सभासदांचें डेप्युटेशन काकांकडे गेलें व काकांनीं स्पष्ट नकार दिला.

आदले दिवशीं डॉ. साठये मला भेटले. ते म्हणाले तुम्ही हा समारंभ करतां हें चांगलें दिसणार नाहीं. मीं त्यांस सांगितलें, "त्याची काळजी नको. समारंभ होणार नाहीं. परंतु तात्पुरतें नाटक करणें जरूर होतें तेवढें करतों आहें." वरील प्रसंगीं काकांनीं सुमारें तासभर आपल्या मनःस्थितीचें चित्र मंडळीपुढें उभें केलें; व सांगितले कीं, अशा परिस्थितींत असला समारंभ करून घेणें म्हणजे परमेश्वराचे घरीं गुन्हा करणें होय. मीं तो कधीं केला नाहीं, व आतांहि होऊं देणार नाहीं.

## पत्नीचें ऋण

पक्षघातानें काका आजारी पडल्यापासून मी त्यांच्याजवळ बसण्याचे प्रसंग शक्य तों टाळीत असें. सर्व आयुष्यभर दगदगीचीं कामें करावयाची सवय झाल्यानंतर, अशा आजारीपणामुळें त्या कामांतून निवृत्त व्हावें लागत आहे हा विचार आजारी माणसाला दुःख उत्पन्न करणारा असतो. अशा प्रसंगीं तो विचारच मनांत उत्पन्न होऊं नये अशी खबरदारी घेणें जरूर

असतें. पुढें कांहीं वर्षें गेल्यावर दुखणेंहि अंगवळणीं पडलें व हळूहळू कामचलाऊ सुधारणाहि त्यांच्या प्रकृतींत झाली. ही सुधारणा सुद्धां त्यांनीं केवळ आपल्या श्रद्धेच्या बळावर घडवून आणली. "आत्यंतिक श्रद्धा आपणास कोणतेंहि काम करण्याची ताकद देते" असे उद्गार त्यांनीं पूर्वी एकदां काढले होते. त्याचें प्रत्यंतर त्यांच्याच बाबतींत वरील प्रसंगीं अनुभवास आलें.

काकांचें कुटुंब निवर्तल्यावर दहा बारा दिवसांनंतर अशीच कांहीं मंडळी एकत्र बसलों असतांना "तिचें माझें लग्न ती आठ वर्षांची असतांना झालें, तेव्हांपासून आतांपर्यंत आम्ही केव्हांहि एकमेकांना अंतरलों नाहीं" अशा तऱ्हेनें काकांनीं बोलण्यास सुरवात केली आणि आपल्या कौटुंबिक जीवनाचा इतिहास सर्व पण थोडक्यांत सांगितला. "तिच्यामुळेंच मला अशा प्रकारचें संकटांनीं भरलेलें आयुष्य इतक्या पल्ल्यापर्यंत निर्वेधपणें नेतां आलें. यापुढें आतां एकटयानें दिवस काढावयाचे आहेत. तेहि फार नाहींत. ती मात्र लवकर सुटली खरी." अशा वाक्यांनीं त्यांनीं आपलें भाषण संपविलें. इतर मंडळींस सामान्यतः काकांच्या आयुष्यांत त्यांच्या पत्नीचा भाग कितपत होता हें कळणें फारसें शक्य नव्हतें. किंबहुना पत्नी नांवाची एखादी वस्तु संसारांत असते याची जाणीवहि त्यांना नसावी, असेंच दर्शविणाऱ्या कांहीं कांहीं गोष्टी त्यांच्या हातून त्यांच्या स्वभावधर्मामुळें झालेल्या लोकांच्या आठवणींत होत्या. आपल्या पत्नीचें ऋण त्यांनीं वरील प्रसंगीं खुल्या दिलानें कबूल केलें.

## 'आतां आमची पाळी'

नरसोपंत केळकरांच्या मृत्यूनंतर प्रथमच, जेव्हां मी त्यांस भेटावयास गेलों, तेव्हां साहजिकच पहिला विषय तोच होता. "तात्यासाहेब गेले

शेवटीं !" असे उद्गार मीं काढले. मला अधिक कांहीं बोलण्याची संधि न देतां, काका ताबडतोब म्हणाले "आतां आमची पाळी !" मला ते शब्द ऐकून बाईट वाटलें. तथापि आपला अंतसमय जवळ येत चालला आहे असें त्यांना तेव्हांपासून सारखें वाटत होतें. किंबहुना ते त्या समयाची वाटच पहात होते. वरील वाक्यानंतर कांहीं वेळानें ते म्हणाले, "आम्ही थोडक्या अंतरानें जन्माला आलों, तशाच थोडया अंतरानें टिळकांच्या नोकरीला लागलों; त्याच थोडया अंतरानें ही यात्रा संपवावी असाच परमेश्वरी संकल्प दिसतो."

नरसोपंत केळकर व खाडिलकर यांचे परस्पर संबंध कसे होते किंवा कसे असतील यासंबंधीं ज्यांनीं स्वतःच्या कांहीं कल्पना करून ठेवल्या असतील त्यांनीं काकांचे वरील उद्गार ध्यानांत घेण्यासारखे आहेत. त्यांच्या व माझ्या भाषणांत केळकरांचा संबंध फारसा कधीं येत नसे, व आलाच तरी केळकरांच्यासंबंधीं प्रतिकूल उद्गार एकदांहि त्यांनीं आपल्या तोंडून काढला नाहीं. प्रसंगानुसार एकदां त्यांनीं १९०९ सालीं आपण केसरी ऑफिस कसें सोडलें होतें तें सांगितलें होतें. मला वाटतें केळकरांच्या टिळक-चरित्राचे दोन भाग प्रसिद्ध झाले तेव्हांची ती गोष्ट आहे, पण त्यावेळींहि त्यांनीं केळकरांच्याबद्दल एकहि कटु शब्द वापरला नाहीं. आपल्याला झालेल्या अन्यायांची त्यांस जाणीव नव्हती असें नाहीं; पण त्याचरोबरच दुसऱ्यांच्या नांवानें बोटें मोडीत बसणें हेंहि तितकेंच गर्ह्य आहे असें ते म्हणत. टीकांना उत्तर देण्याचा विषय निघाला कीं ते सांगत, माणसानें हा मोह पहिल्यांदा टाळला पाहिजे. उत्तर देऊन खरें काम कधींच होत नाहीं. उलट तें बिघडण्याचाच संभव जास्त आहे. आपल्याला काम करावयाचें आहे, कर्तृत्व शक्ति आहे. मग उत्तर शब्दांनीं कशाला ! कामामुळें आपोआपच उत्तर मिळतें; व आपल्याबद्दल झालेले गैरसमज दूर होतात.

# मुंबईचे माजी मेयर श्री. मधुरादास त्रिकमजी

## खाडिलकरांचें व्यक्तित्व

१९२० च्या नागपूर काँग्रेसमध्यें काँग्रेसची नवी घटना मंजूर झाली, आणि या घटनेप्रमाणें काँग्रेसचा मुंबईचा नवा प्रांत अस्तित्वांत येऊन मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटी १९२१ च्या एप्रिलमध्यें काम करूं लागली. या मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीचें अध्यक्षपद देवी सरोजिनी नायडू यांजकडे होतें. काका खाडिलकर उपाध्यक्ष होते आणि मी त्या कमिटीचा खजिनदार ऑक्टोबरमध्यें झालो. १९२२ च्या मार्चमध्यें भाई शंकरलाल बँकर यांना सजा झाल्यावर मुंबई प्रां. काँ. कमिटीची सेक्रेटरीची जागा माझ्याकडे आली. माझ्याबरोबरचे दुसरे दोन सेक्रेटरी श्री. उमर सोबानी आणि डॉ. वेलकर हे होते. १९२३ च्या ऑगस्टपर्यंत मी सेक्रेटरी होतों. या मुदतींत खाडिलकरांचा आणि माझा संबंध निकटचा असा आला.

खाडिलकरांमध्यें व्यक्तित्व होतें. ते उंच नसले तरी त्यांचा बांधा रुबाबदार होता. त्यांचें मस्तक लक्षांत येण्यासारखें मोठें होतें आणि चेहरा तेजस्वी त्याचप्रमाणें भरदार होता. त्यावेळीं त्यांचें वय साठीच्या जवळपास होतें पण त्यांचें शरीर सुदृढ असें होतें. त्यांचा पोषाख साधा पण व्यवस्थित असे आणि त्यावरून त्यांची साधी रहाणी व्यक्त होत असे.

## दुर्मिळ समतोलपणा

खाडिलकर हे 'लोकमान्यांत' असतांना एक दिवशीं सकाळीं मी त्यांना भेटण्यास गेलों होतों. तो प्रसंग मला चांगला आठवतो. देवी सरोजिनी नायडू या त्यावेळीं मुंबईंत नव्हत्या आणि त्यांच्या गैरहजेरींत खाडिलकरांना

कांहीं कागदपत्र दाखवून त्यांच्याशीं विचारविनिमय करावयाचा होता. सकाळची वेळ ही त्यांची अग्रलेख लिहिण्याची होती हें मला माहीत नसल्यानें मी त्यांच्याकडे सकाळीं गेलों. लोकमान्य ऑफिसांत अगदीं वरच्या मजल्यावर खाडिलकरांचें ऑफिस होतें. तेथें गेलों त्यावेळीं ते अग्रलेख सांगत होते. पण मला खोळंबावें न लागतां त्यांच्या बैठकीपर्यंत चटकन प्रवेश मिळाला. मी तेथें जातांच खाडिलकरांनीं कामांत व्यत्यय आल्याचें किंवा त्रासल्याचें यत्किंचित्हि चिन्ह दाखविलें नाहीं. ते जें वाक्य सांगत होते तें पुरें झाल्याबरोबर त्यांनीं अग्रलेखाचें काम थांबविलें आणि माझ्याशीं ते बोलूं लागले. मी बोलण्यांत अघळपघळ नसून रेखीव असल्यामुळें मी त्यांचा फारसा वेळ न घेतां माझें काम त्यांच्यापुढें आटोपशीर रीतीनें मांडलें आणि काम संपतांच मी तेथून निघालों. अग्रलेख लिहिण्यासारख्या कामांत असतांना यत्किंचित्हि न त्रासतां किंवा तिष्ठत न ठेवतां त्यांनीं जो समतोलपण दाखविला तो दुर्मिळ असा असल्यामुळें तो प्रसंग अद्यापहि म्हणजे सुमारें सत्तावीस अठ्ठावीस वर्षांनंतरहि माझ्या मनांत ताजा आहे. खाडिलकर भटवाडींत गोवर्धनदास मॅन्शनमध्यें रहात असतांना त्यांच्याकडे मी गेल्याचेंहि मला आठवतें. त्यावेळीं त्यांच्या घरची रहाणी फारच साधी असल्याचें मला आढळून आलें.

## नाटकाच्या उत्पन्नांतून खटल्यांचा खर्च

गया काँग्रेसला मी गेलों नव्हतों. पण गया काँग्रेसचें वातावरण समजून घेण्याची माझी फार इच्छा होती. त्यावेळीं श्री. गंगाधरराव देशपांडे हे मुंबईत आलेले होते आणि त्यांचा व खाडिलकरांचा मोठा स्नेह असल्याचें मला आढळून आलें होतें. खाडिलकर आणि गंगाधरराव देशपांडे यांची गांठ घेऊन गया काँग्रेसचें वातावरण मी त्यांच्याकडून समजून घेतल्याचें मला आठवतें.

त्यानंतर १९२५ नंतर मी कांहीं वर्षें मुंबईबाहेर होतों. १९२९ सालीं खाडिलकरांना राजद्रोहाच्या खटल्यांत एक वर्ष शिक्षा व दोन हजार रुपये दंड झाला. खटल्यापूर्वी त्यांचें जें नाटक मराठी रंगभूमीवर आलें होतें त्याचें उत्पन्न या खटल्यांत गेलें असें मला कळलें. त्यानंतर एकदां देवी सरोजिनी नायडू यांना ताजमहालमध्यें मी भेटावयास गेलों असतांना साहजिकच खाडिलकरांविषयींच्या गोष्टी निघाल्या. खाडिलकरांचें वाङ्मयीन लेखन मराठींत असल्यामुळें त्यांच्या महाराष्ट्रीयेतर सहकाऱ्यांना त्यांचीं तितकीशी माहिती नव्हती. त्यावेळीं सरोजिनी नायडूंनीं असे उद्‌गार काढले कीं, 'आमच्या कार्यकर्त्यांच्या इतर कार्याविषयीं आम्हाला पुष्कळदां पुरेशी माहिती नसते.'

# वीर वामनराव जोशी, अमरावती

## 'राष्ट्रमता'मुळें विशेष परिचय

कै. काकासाहेब खाडिलकर यांचा व माझा प्रथम परिचय झाला तो नाटककार या नात्यानें झाला नसून कै. लोकमान्य टिळकांच्या राजकारणांतील एक सामान्य सहकारी या नात्यानें झाला. लोकमान्यांनीं सोंपविलेली नेपाळांतील आपली कामगिरी संपवून कै. काकासाहेब पुण्यास परत जात असतांना कै. दादासाहेब खापर्डे यांना भेटण्यासाठीं अमरावतीस दोनतीन दिवस थांबले होते. तेव्हां या मुक्कामांत कै. दादासाहेब खापर्डे यांनीं कै. काकासाहेबांना माझी पहिल्यानें ओळख करून दिली. पुढें सुरत काँग्रेसच्या वेळीं ही ओळख थोडी अधिक वाढली आणि १९०९ सालीं मुंबईस श्री. गंगाधरराव देशपांडे यांच्याबरोबर लोकमान्यांनीं सुरू केलेल्या दैनिक "राष्ट्रमत" दैनिकांत मी काम करीत असतां तेथें त्यांचा व माझा

बराच निकट सहवास घडून परिचयाचें स्नेहांत रूपांतर झालें.

"केसरी"चें संपादकत्व त्यांना सोडावें लागल्यानंतर "भाऊबंदकी" या नव्या नाटकाच्या तालमीकरितां ते बहुतेक दर आठवड्यास मुंबईस येत असत व "राष्ट्रमतांत" च रहात असत. "राष्ट्रमत" चालविण्याच्या कामांत ते आम्हास वेळोवेळीं मार्गदर्शन करीत व त्या मार्गदर्शनाचा आम्हास फारच उपयोग होत असे. परंतु "राष्ट्रमत" प्रारंभापासूनच त्यावेळच्या नोकरशाहीच्या गैरमर्जीतील असल्यामुळें त्याला थोड्याच काळांत सरकारच्या कोपास बळी पडावें लागलें. ह्या पत्रास एकदां द्रव्याची फार अडचण पडली होती. तेव्हां मी व माझे मित्र पैशांची जुळवाजुळव करीत असतां आम्हांस कै. काकासाहेबांच्या त्यागनिष्ठेचा जो अनुभव आला तो मी आज सांगूं इच्छितों.

## 'राष्ट्रमता'करितां पत्नीच्या दागिन्यांची पुरचुंडी

पैसे जमविण्याकरितां मी व माझे एक मित्र पुण्यास गेलों असतां तेथें कोणास भेटावें या संबंधानें आम्हीं आपसांत चर्चा केली. तेव्हां कै. काकासाहेबांनाहि मदतीची मागणी करावी असें माझ्या मित्राचें म्हणणें पडलें. मला कै. काकासाहेबांच्या परिस्थितीची साधारण कल्पना असल्यामुळें या बाबतींत त्यांच्याशीं आपण बोलूं नये असें माझें म्हणणें होतें. परंतु माझ्या मित्रास तें पटलें नाहीं व आम्ही दोघेहि त्यांच्या घरीं त्यांना भेटण्यास गेलों. त्यावेळीं ते श्री. भाऊसाहेब गोखले यांच्या घरांत रहात होते व माडींत वाचीत बसले होते. भेट झाल्यावर आम्ही त्यांना आपली अडचण सांगितली व मदतीची मागणी केली. त्यांनीं आमचें म्हणणें शांतपणानें ऐकून घेतलें व आम्हांस बसावयास सांगून ते खालीं निघून गेले. आम्ही तेथेंच त्यांच्या उत्तरासाठीं वाट पहात बसलों. थोड्या वेळानें ते परत आले त्यावेळीं

त्यांच्या हातांत एक पांढऱ्या हातरुमालाची छोटीशी पुरचुंडी होती.

ते आमच्या समोर बसले व ती आमच्या समोर ठेवून ते आमच्याशीं बोलूं लागले. ते म्हणाले "तुमच्या अडचणीची मला बरोबर कल्पना आहे. आपला गरिबांचा पक्ष असल्यामुळें आपल्या मार्गांत अशा अडचणी वारंवार येणारच, परंतु त्यांनीं आपण घाबरून जाण्याचें कारण नाहीं. देव सर्व संकटांतून आपणास पार पाडील असा पक्का विश्वास ठेवावा. तुम्ही माझ्याकडे आपुलकीच्या भावनेनें आलांत हें पाहून मला आनंद वाटतो, आणि त्याच आपुलकीच्या भावनेनें मीहि आपणास मदत करणें हेंच उचित आहे. तथापि दुर्दैव इतकेंच कीं तुमची अपेक्षा असेल तितकी मदत करण्याचें आज माझ्यांत सामर्थ्य नाहीं. मी दरिद्री आहें, बेकार आहें. आज माझ्याजवळ रोख एक पैसाहि नाहीं. तथापि तुमच्यासारख्या देशाकरितां कंगाली पत्करलेल्या माझ्या मित्रांनीं मोठ्या भरंवशानें माझ्याकडे यावें आणि त्यांना रिक्तहस्तानें आले तसेच परत पाठविण्याची पाळी माझ्यावर यावी याचें मला अतिशय दुःख होतें. तेव्हां माझ्या पत्नीच्या अंगावर असलेले चार दोन दागिने तुम्हाला देण्यासाठीं मी तिच्या जवळून मागून आणले आहेत. ते मी फूल नाहीं फुलाची पाकळी म्हणून तुम्हांला देतों, तुम्ही घ्यावेत. माझ्या पत्नीनें हे दागिने कोणत्याहि प्रकारचे आढेवेढे न घेतां खुषीनें दिलेले आहेत. तेव्हां त्याबाबतींत तुम्हाला संकोच करण्याचें मुळींच कारण नाहीं." असें बोलून त्यांनीं ती दागिन्यांची पुरचुंडी माझ्या मित्राच्या हातांत देण्यासाठीं पुढें केली.

## स्नेहाच्या तावडींत कायमचा सापडलों

मी तर त्यांचे शब्द ऐकून जागच्या जागीं थंडच झालों होतों. परंतु माझ्या मित्रालाहि ती पुरचुंडी घेण्यास हात पुढें करवेना. तो अगदीं

विरघळून गेला होता. त्याला गहिंवर आवरेना. त्यानें हिंमत करून कापऱ्या स्वरांत उत्तर दिलें, "कृष्णाजीपंत, आम्हाला या दागिन्यांना स्पर्श करवत नाहीं. आपल्यासारख्याला अशा धर्मसंकटांत पाडण्यांत आमच्याकडून मोठाच प्रमाद घडला. आम्हाला क्षमा करा." असें बोलून तो ताडकन उठला व डोळे पुशीत त्यानें तडक जिना गांठला. मींहि त्यांचेंच अनुकरण केलें. कै. काकासाहेब पुरचुंडी हातांत घेऊन आमची समजूत घालण्यासाठीं "असें वेडयासारखें काय करतां" असें म्हणत आमच्या मागोमाग लगबगीनें आले; परंतु आम्ही दोघेहि मागें वळून सुद्धां न पहातां सरळ घराबाहेर पडलों आणि ते दारापर्यंत येऊन पोहोंचतात न पोहोंचतात तोंच झपाझप रस्ता चालून पसार झालों.

तथापि त्यावेळीं त्यांच्या तावडींतून मी सुटलों असलों तरी या अनुभवामुळें त्यांच्या स्नेहाच्या तावडींत मी सांपडलों. अखेरपर्यंत मी तिच्यांतून सुटूं शकलों नाहीं, इतकेंच नव्हे तर तिच्यांतून सुटण्याची इच्छाहि मला कधीं स्वप्नांत शिवली नाहीं.

## दे. हरिभाऊ तुळपुळे, पुणें

पुणें येथील किर्लोस्कर थिएटरांत श्री. एस. एस. भागवत यांच्या अध्यक्षतेखालीं मुलां-मुलींचें एकत्रित शिक्षण करण्याबाबत सभा भरली होती. या सभेंत कै. काकासाहेब खाडिलकरांनीं त्याबाबत ठराव मांडला व ठरावावर बोलतांना त्यांनीं केलेलें भाषण परिणामकारक झालें. त्यांनीं सभा विषयाला अनुकूल करून घेतली. मी त्या ठरावाला अनुमोदन दिलें होतें. त्यानंतर लो. टिळक बोलावयास उठल्यावरोवर त्यांना विरोध करण्यासाठीं चंग बांधून आलेल्या मंडळींनीं टिळकांच्या भाषणाला विरोध करण्यास

सुरवात केली. टिळकांनीं भाषण थांबविलें नाहीं, पण त्यानंतर टिळकांच्या अंगावर अंडी फेकण्यांत आलीं व सभा ठराव पास न होतांच उधळली गेली.

काकासाहेबांना आपल्या घरीं पाहुण्यांनीं उतरावें असें वाटे. आपल्या पक्षांतील मंडळींनीं आपल्याकडेच उतरावें असें त्यांना फार वाटे व त्यासाठीं त्यांनीं कांदेवाडी नाक्यावर नवाकाळ ऑफिस असतांना घरच्या भागांतील दुसरा मजला राखून ठेवला होता. कॉंग्रेसला जातां येतां आम्ही महाराष्ट्रीय काँग्रेसवादी त्यांच्याकडे उतरत असूं. आम्हाला तें निवासस्थान वाटे. चर्चा करीत असूं. त्यांना समाधान वाटे. कै. वासुकाकाहि प्रथम त्यांच्याकडे उतरत व नंतर डॉ. देशमुखांकडे जात असत. काकासाहेब पाहुण्यांचें आदरातिथ्य आपलेपणानें करीत असत.

विरोधी पक्ष आणि आपला यांच्यांत तडजोड झाली असतांना ती पाळण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न काकासाहेब अंतःकरणपूर्वक करीत असत. विरोधी पक्षांनीं जरी ती तडजोड मान्य करून पाळली नाहीं तरी ती पाळणें आपलें कर्तव्यच आहे असें ते म्हणत, व त्याप्रमाणें ते वागत. कै. काकासाहेबांचा चेहरा उग्र व रागीट असा पहिल्या भेटीच्यावेळीं वाटे, पण त्यांच्याशीं जास्त सहवास आला कीं प्रत्येकाला त्यांच्या प्रेमळपणाची साक्ष पटे. त्यांची वृत्ति फणसाप्रमाणें होती. फणसाला बाहेर काटे असले तरी आंतील गरे मधूर, त्याचप्रमाणें काकासाहेबांचें अंतःकरण प्रेमळ होतें.

## दे. हरि गणेश फाटक, पुणें

### मातेचें कोमल अंतःकरण

१९०९ सालीं वऱ्हाडांतून डॉ. बाबासाहेब परांजपे, कै दत्तोपंत आपटे आणि मी पुण्यास सेवा करण्याच्या हेतूनें आलों. त्यावेळीं नोकरशाहीचा

करडा संमल पुण्यनगरींतसुद्धां थैमान घालीत होता. मी म्हणजे एक मामुली सेवक ! मजपाशीं वक्तृत्व व लेखनकला ही नव्हतीच-पण माझें विश्व-विद्यालयीन शिक्षणहि पुरें झालेलें नव्हतें. काकासाहेबांकडे जाऊन कांहीं बोलावें तर आपण मोठा घांस घेतला असें त्यांना वाटेल याची मला भीति वाटे. मी त्यांना होतां होईतों टाळी. ते रस्त्यांत भेटले तर मी बाजूनें जाई. पण काकासाहेबांच्या कठोर व भावनाशून्य दिसणाऱ्या शरीरांत मातेचें कोमल अंतःकरण दडलेलें आहे याचा प्रत्यय एका अनुभवानें मला आणून दिला.

त्या सुमारास 'राष्ट्रमत' दैनिकाचा मी एक नामधारी व्यवस्थापक होतों. लोकमान्यांना शिक्षा झाल्यावर 'राष्ट्रमता'चे वर्गणीदार दहा हजारांवरून पांच हजारांवर आले. 'राष्ट्रमत' एक पैशास विकलें जात होतें. त्याची किंमत दोन पैसे केली असती तर तें आपल्या पायावर उभें राहिलें असतें. पण लोकमान्यांच्या आशीर्वादानें सुरू केलेलें 'राष्ट्रमत' एका पैशालाच विकावयाचें असें संचालक मंडळानें ठरविलें. दररोज कमींत कमी शंभर रुपये तरी तूट येई. संपादकांस व इतर कार्यकर्त्यांस फक्त जेवावयास मिळत असे व त्यांची राहाण्याचीहि सोय केलेली होती. पण ही काटकसर करूनहि तूट भरून निघेना. तेव्हां वऱ्हाड, नागपूर, बेळगांव, कर्नाटक येथून मदतीकरितां पैसे आणले गेले. पुण्यांतहि कांहीं खटपट करावी या हेतूनें मी तेथील पुढाऱ्यांना भेटून पैसे जमा केले.

## संकटांत धावून येण्याचा स्वभावधर्म

मदतीसाठीं काकासाहेब खाडिलकर यांनाहि भेटलों. आपल्या पत्नीच्या अंगावरचे दोन अडीच हजार रुपयांचे दागिने काकासाहेबांनीं तत्काळ

माझ्या हवालीं केले. प्रथमतः मीं त्या दागिन्यांचा स्वीकार केला पण नंतर मीं ते दागिने त्यांचें घरीं परत केले. त्यावेळीं नारायण पेठेंत मुंजाबाचे बोळांत श्री. शास्त्रीबुवा दिवेकर यांचे घरीं आम्ही बिऱ्हाडानें रहात होतों (आज या घरांत शंकराचार्यांचा मठ आहे) त्या घरीं काकासाहेब डोक्यावर पगडी चढवून, मजकडे आले व तावातावानें म्हणाले, "तुम्ही हा काय चावटपणा मांडला आहे? मीं ते दागिनें 'राष्ट्रमता'ला मदत म्हणून दिले आहेत. तुम्ही ते घेतलेच पाहिजेत." मी तितक्याच निग्रहानें काकासाहेबांस सांगितलें कीं, मी दागिने परत घेणार नाहीं आणि माझा निश्चयहि बदलणार नाहीं.

काकासाहेब यांच्यापुढें मी एक यःकश्चित् मनुष्य होतों. त्यांच्या तोंडावर मी हें कसें बोलूं शकलों याचें आजहि मला आश्चर्य वाटतें. पुढें 'राष्ट्रमता'कडून सरकारनें सहा हजार रुपयांचा जामीन मागितला. तो द्यावयाचा नाहीं असें ठरवून संचालक मंडळानें 'राष्ट्रमत' बंद केलें. छापखाना व इतर सामान मिळून कांहीं कर्ज भागविलें; परंतु पुण्याचें एक कर्ज देण्यास सवड झाली नाहीं. मला मोठी काळजी लागून राहिली. काकासाहेबांनीं मला याप्रसंगीं जी बहुमोल मदत केली ती मी कधींच विसरूं शकणार नाहीं. हप्त्याहप्त्यांनीं पैसे देऊन त्यांनीं तें सारें कर्ज फेडून टाकलें.

काकासाहेबांचा स्वभाव मनमिळावू नव्हता. त्यांच्याकडे वरवर पहाणाऱ्याला हा गृहस्थ अंतःकरणानें कठोर असावा असेंच वाटे. माझीहि प्रथम तीच समजूत होती. परंतु या प्रसंगानें त्यांच्याबद्दलची माझी समजूत किती चुकीची होती याचें प्रत्यंतर आलें. आणि त्या दिवसापासून संकटांत धावून येणारा एक पुढारी या दृष्टीनें त्यांच्याकडे मी पाहूं लागलो.

# पं. महादेवशास्त्री दिवेकर, मिरज

उगारखुर्द या माझ्या जन्मभूमीशीं श्री. कृ. प्र. खाडिलकर यांचा घनिष्ट संबंध होता. त्यांचे नातलग श्री. सदाशिव काशिनाथ तथा भाऊ खाडिलकर यांचेकडून आम्हांला लहानपणीं दे. खाडिलकरांची माहिती झाली. जुन्या समर्थ विद्यालयांत असतांना श्री. कृष्णाजीपंतांचा परिचय झाला. तेथें ते एका व्याख्यानास आंले होते. समर्थविद्यालय बुडाल्यावर मी पुण्यास गेलों. दे. गंगाधरराव देशपांडे हे पुण्यास आले कीं, कृष्णाजीपंतांकडे जात येत असत. त्यांचें उतरणें जोगमिल्सकडे तर बैठक बहुतेक कृष्णाजीपंतांकडेच असे. ब्रम्हगिरीबुवा, गंगाधरराव देशपांडे व कृष्णाजीपंत यांचे स्नेहसंबंध होते. पण जॅक्सनच्या खुनानंतर एकमेकांना पत्रेंहि पाठविणें शक्य नव्हतें. अशा परिस्थितींत परस्परांचे निरोप तोंडीं पोंचविण्याचें काम एक-दोन वेळां मला करावें लागलें. निरोप साधेच असत, कृष्णाजीपंत हे केसरीचे संपादक या नात्यानें त्यांचा माझा संबंध तीन-चार वेळां आला. नाशिक येथें भरलेल्या पांचव्या कीर्तन संमेलनाचे ते अध्यक्ष होते. बेळगांव जिल्हा परिषदेचें राजकीय अधिवेशन अथणी येथें श्री. कृष्णाजीपंतांच्या अध्यक्षत्वाखालीं मोठ्या उत्साहानें पार पडलें.

## लोकमान्यांकडून सभा-संचालनाबद्दल प्रशंसा

कै. काकासाहेब खाडिलकर हे बेळगांव जिल्हा परिषदेचें राजकीय अधिवेशन अथणीस भरलें त्यास अध्यक्ष होते. १९१८ साल असावें. लो. टिळकहि तेथें आल्यामुळें फारच उत्साह होता. दिवाळींतच तें अधिवेशन होतें. तेव्हां उत्साहालाहि दिवाळी होती. परंतु त्यावेळीं ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर वाद अगदीं शिगेला पोचला होता. त्या पक्षाचे बेळगांव

जिल्ह्यांतील पुढारी तेथें होतेच. बरीच गडबड होईल असा रंग होता. काकासाहेब यांना हें सर्व अवगत होतें. बेळगांव जिल्ह्याच्या जोरकसपणाचें वर्णन करून अध्यक्षांनीं भाषणास चांगली वरचीच पट्टी लावली. त्याच पट्टींत ठरावावर कर्मवीर शिंदे, केशवराव छापखाने, श्रीनिवासराव कौजलगी यांचीं भाषणें झालीं. त्यामुळें विरोधक थंड झाले. लोकमान्य टिळकांनीं जाहीरपणें श्री. गंगाधररावांच्या योजकतेची व खाडिलकरांच्या कौशल्याची तारीफ केली. त्यावेळीं खाडिलकरांसारखाच खंबीर अध्यक्ष लाभला म्हणून ती परिषद, नव्हे लहानशी काँग्रेसच, मोठी गाजली. अथणीची मंडळी तर अध्यक्षीय भाषणावर बेहोष खूष झाली होती. माझ्या पहाण्यांत मोठी गंभीर, मोठी परिणामकारक व विरोधकांना मोडून काढणारी ती परिषद झाली.

विविध प्रसंगीं त्यांचें जें व्यक्तिदर्शन घडलें त्यावरून श्री. काकासाहेब प्रेमळ, निरलस, निश्चयी, करारी, व चारित्र्यवान देशभक्त होते असा माझा ग्रह झाला.

# डॉ. डी. डी. साठ्ये, मुंबई

लो. टिळक तुरुंगांत गेल्यावर मुंजाबाच्या गणपतीजवळ श्री. धोडोपंत साठे यांच्या येथें आम्हीं जमत असूं. त्यावेळीं कांहींतरी राष्ट्रकार्य करावयाच्या कल्पनेमुळें मेळा काढण्याची कलुप्ति निघाली असतांना काकासाहेब खाडिलकरांनीं मला विचारलें कीं, तुम्हीं या ड्रेसमध्यें मेळ्यांत याल का? मीं होय म्हटलें. त्यावेळीं मी युरोपियन पद्धतीचा ड्रेस करीत असें.

१९१९ सालीं मी सत्याग्रहांत नांव नोंदविण्याच्या वेळीं माझें काकासाहेबांनीं अभिनंदन केलें व आम्हीं तुमच्याबरोबर आहोंत असें त्यांनीं मला सांगितलें. मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळीं मी व ते बरोबर मीठ विकण्यास

गेलों होतों. मुंबईला रोज संध्याकाळीं पांच ते सहापर्यंत माझ्याकडे ते येत असत. चहाचा आग्रह केला तर ते मला म्हणत कीं, मी संध्याकाळीं पांचाच्या पुढें चहा घेत नाहीं कारण चहा घेतला कीं, त्या दिवशीं तर मला रात्रीं झोप येत नाहीं.

# वैद्यपंचानन कृष्णशास्त्री कवडे

## स्वदेशीच्या चळवळींतील परिचय

कृष्णाजीपंतांचा व माझा परिचय माझ्या विद्यार्थीदशेपासूनच अनायासें घडून आला. बंगभंगानें स्वदेशी चळवळ जोराला लागली. या निमित्तानें माझ्या विद्यार्थीदशेंतच मी केसरी ऑफिसांत जाऊं लागलों व या स्वदेशी चळवळीचा प्रचार व पुरस्कार कसा करावा, याविषयीं मी कृष्णाजीपंतांचा सल्ला घेतला. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रीविषयीं कृष्णाजीपंतांनीं विशेष लेख केसरींत लिहिले होते. अर्थात् स्वदेशीचा प्रचार अधिकांत अधिक विद्यार्थीदशेंतहि कसा करणार या-विषयीचें योग्य मार्गदर्शन त्यांनीं मला केलें व त्या मार्गदर्शनानुसार फर्ग्युसन कॉलेजांतील विद्यार्थ्यांत चळवळ करून स्वदेशीच्या पुरस्कारासाठीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत विद्यार्थ्यांच्या जाहीर सभा घडवून आणून हें कार्य मीं केलें. या चळवळीसाठीं मी अनेक वेळां कृष्णाजीपंतांकडे गेलों व त्या अडचणीच्या प्रसंगीं योग्य तें मार्गदर्शन केल्यामुळें पुण्यांतील स्वदेशीची चळवळ विशेष यशस्वी झाली. या निमित्तानेंच त्यांचा व माझा प्रथम परिचय झाला व त्याचें रूपांतर स्नेहभावांत होऊन हा स्नेहभाव अखेरपर्यंत कायम राहिला. त्यामुळेंच ते माझ्या भेटीला नेहमीं येत असत.

## राष्ट्रीय क्लबची स्थापना

सुरत काँग्रेसहून परत आल्यावर राष्ट्रीय पक्षाचे सभासद कसे वाढवितां येतील व या पक्षाची संघटना कशी घडवून आणतां येईल या विषयीं लोकमान्यांच्या सूचनेवरून कै. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखालीं सार्वजनिक सभेच्या गच्चीवर सभा भरविण्यांत आली. त्या सभेंत या प्रश्नाचा ऊहापोह झाला. राष्ट्रीय पक्षाच्या स्थापनेच्या वेळीं कडाक्याचा वाद झाला. त्या वादांतील एक महत्त्वाचा प्रश्न स्वदेशी साखर हा होता. राष्ट्रीय पक्षाच्या सभासदानें कापड स्वदेशीच वापरलें पाहिजे, असा निर्बंध व नियम ठरविण्यांत आला. परदेशी मालावर बहिष्कार घातला पाहिजे म्हणून कमींतकमी दोन वस्तु तरी ब्रिटिश मालापैकीं घेणार नाहीं हा दुसरा निर्बंध घालण्यांत आला. हे दोनहि निर्बंध सर्वांनीं एकमतानें मान्य केले. नंतर साखर स्वदेशीच वापरावी, परदेशी वापरूं नये, असा निर्बंध सुचविण्यांत आला व या सूचनेवर फारच जोराचा वाद झाला. कै. अण्णासाहेब पटवर्धन यांनीं तर या प्रसंगीं, परदेशी साखर सेवन करण्याचा मोह ज्यांना सोडतां येत नाहीं, त्यांनीं स्वराज्य मिळविण्याच्या गोष्टी सोडून द्याव्यात, इतक्या कडक शब्दांनीं परदेशी साखरेचा निषेध व्यक्त केला. लो. टिळकांनीं या बाबतींत भाषण करून आपलें मत सांगितलें. व या सर्वांचा परिणाम साखर ही परदेशी वापरूं नये असें ठरलें. परंतु पक्षाचे सभासद होतांना जें प्रतिज्ञा-पत्रक लिहावयाचें त्यांत कापड अवश्य स्वदेशीच घेण्याची प्रतिज्ञा असून ज्या वस्तूंवर बहिष्कार टाकावयाचा त्या वस्तूंपैकीं निदान दोन वस्तूंवर तरी बहिष्कार घालीन, अशी अट घालण्यांत आली, आणि तडजोड म्हणून परदेशी साखर सोडलीच पाहिजे अशी सक्ति न करतां सभासदानें आपण होऊनच परदेशी साखर सेवन करणार नाहीं असा प्रतिज्ञा लेख लिहून देऊन सभासद व्हावें असें ठरलें. कृष्णाजीपंत यांना लोकमान्यांचा

शब्द प्रमाण असल्यामुळें त्यांच्याप्रमाणेंच परदेशी साखर सेवन न करण्या-विषयींची प्रतिज्ञा त्यांनीं आपल्या प्रतिज्ञालेखांत केली. या क्लबचा चिट-णीस या नात्यानें मला काम करावें लागलें व या क्लबचे सभासदांचे प्रतिज्ञालेख माझ्या जवळ होते. या क्लबचे सभासदांनीं शक्य तर दररोज एक तास एकत्र बसून घालवावा असें ठरलें व सार्वजनिक सभेच्या जोशी हॉलमध्यें दररोज सायंकाळीं ७ ते ८ पर्यंत क्लबाची बैठक सुरू झाली. या क्लबांत दररोज नियमानें येणाऱ्या सभासदांपैकीं प्रमुख सभासद वासुकाका जोशी, कृष्णाजीपंत, अण्णासाहेब परांजपे, तात्यासाहेब करंदीकर, तात्यासाहेब केळकर, सीतारामपंत दामले, दा. वि. गोखले, अण्णासाहेब भोपटकर, न. वि. गाडगीळ, आदि असत. याप्रमाणें राष्ट्रीय क्लब सार्व-जनिक सभेंत कांहीं दिवस भरत असे.

## स्नेहभाव व संघटना

राष्ट्रीय क्लबच्या बैठकीमुळें दररोज नियमानें येणाऱ्या सभासदांच्या विचारविनिमयानें परस्परांची मैत्री दृढ होत गेली. कांहीं काळानंतर दररोज सार्वजनिक सभेच्या हॉलमध्यें जमणें सर्वांना गैरसोईचे वाटूं लागल्यामुळें बुधवार पेठेंतील मोरोबादादांच्या वाड्यांतील आमचें आयुर्वेद चिकित्सागृह हेंच राष्ट्रीय क्लबाच्या रोजच्या बैठकीचें ठिकाण सर्वांनीं पसंत केलें व १९२२ पर्यंत हें क्लबचें ठिकाण समजण्यांत जें येत असे, तें पाळण्यांत आलें. क्लबच्या बैठकींत कृष्णाजीपंत, अण्णासाहेब परांजपे, वासुकाका हे तीन सभासद आले नाहींत असा एकहि दिवस गेला नाहीं. राष्ट्रीय पक्षाचा प्रसार कसा करावयाचा याचा विचार होऊन त्याची अंमलबजावणीहि कशी करावयाची हें सामान्यतः यावेळीं ठरत असे. या क्लबचा फायदा असा झाला कीं, लो. टिळकांच्या अनुयायांपैकीं परगांवांतील जे जे सभासद

पुण्यांत येत, ते ते प्राय: आमच्या चिकित्सालयांत-क्लबांत येऊन जात व त्यामुळें परास्परांच्या भेटीचें निश्चित ठिकाण म्हणून हें ठरल्यासारखें झालें.

मध्यंतरी सर्व सभासदांना एके ठिकाणीं जमणें अशक्य होऊं लागल्यानें राष्ट्रीय क्लबचें रूपांतर फिरत्या राष्ट्रीय क्लबांत करण्यांत आलें व दर आठ दिवसांनीं प्रत्येक शुक्रवारीं प्रत्येक सभासदाच्या घरीं आळीपाळीनें सोयीप्रमाणें जमण्याचें ठरलें. या रीतीनें लो. टिळक, केळकर, खाडिलकर, वासुकाका, परांजपे, दामले, भाऊसाहेब भोपटकर आदि लोकमान्यांच्या पक्षांतील मंडळींच्या घरीं क्लब भरूं लागला. या योजनेनें पक्षाचें बळ पुष्कळच वाढलें, व याचा परिणाम म्युनिसिपल निवडणुकीवरहि होऊं लागला.

## गणेशोत्सवांतील प्रचाराचें दिव्य

१९०८ ते १९१४ पर्यंतचा काळ लोकमान्यांच्या अनुयायांत व पक्षास विशेषच जाणवला. पण याहि काळांत श्रीगणेशोत्सव, श्रीशिवाजी उत्सव आदि कार्यक्रम पूर्वीसारखेच व्यवस्थित पार पाडण्यासाठीं या राष्ट्रीय क्लबाच्या संघटनेचा विशेष उपयोग झाला. गणेशोत्सवांतील व्याख्यानें निश्चित करतांना संमति घेतल्याशिवाय वक्त्यांचीं नांवें व विषय अगोदर कळवून तीं ठरविण्याची जबाबदारी गणेशोत्सवाचा चिटणीस या नात्यानें मजवर असे. ती पार पाडण्याचे कामीं कृष्णाजीपंत, परांजपे, केळकर, करंदीकर आदि मंडळींनीं क्लबांतील स्नेहभावामुळें जो विश्वास व स्नेहभाव प्रकट केला त्याचमुळें हें कार्य होऊं शकलें. या काळांत गणेशोत्सवांतील व्याख्यानें निश्चित करून पार पाडणें हें एक दिव्यच झालें होतें. कित्येक प्रसंगीं तर वक्ते, श्रोते व वार्ताहर ह्यांनाच सर्व कार्यक्रम सहकार्यानें पार पाडावे लागत.

## काकासाहेबांची प्रचाराची कामगिरी

गणेशोत्सवांतील कृष्णाजीपंतांच्या व्याख्यानांची शैली विशेष बहारीची असे. त्यांचें व्याख्यान पाऊण तासावर बहुधा होत नसे. व्याख्यानांतील विषयाची मांडणी व समारोप सामान्यतः दहा दहा मिनिटांत करून मुख्य विषय अर्ध्या तासांत आटोपीत असत. विषय मार्मिकच असावयाचा, पण त्याचें प्रतिपादन व मीमांसा इतक्या कुशलतेनें व मार्मिकपणें केली जात असे कीं, हें व्याख्यान केवळ धार्मिक स्वरूपाचें असलें तरी व्यंगार्थानें तें सद्यःस्थितीवरीलच आहे कीं काय असें श्रोत्यांना वाटत असे. त्यांच्या वक्तृत्वाची शैलीहि वाखाणण्यासारखी परिणामकारक असे. यामुळें कृष्णाजीपंत खाडिलकरांचें व्याख्यान आमच्या गणपतीपुढें द्या, अशी मागणी सार्वजनिक गणपतीवाले करीत असत व कृष्णाजीपंतहि सार्वजनिक गणपतीवाल्यांच्या या आग्रहास मोठया आनंदानें मान्यता देत असत. व्याख्यानाच्या वेळीं नारायण पेठ, शुक्रवारांतील नाईकांचा गणपती, सोमवारांतील नरवडे गणपती व शनिवारांतील नेने घाट गणपती अशा दूरदूरच्या ठिकाणींहि ठरलेल्या व्याख्यानाच्या वेळीं पायानें वाहनांशिवाय जात येत असत व गणपतीवाल्यांचा संतोष संपादून लोकसंग्रह वाढवीत असत.

लो. टिळकांच्या गैरहजेरींत कृष्णाजीपंतांचें व्याख्यान तरी आमच्या गणपतीपुढें होऊ द्या, अशी बहुतेक गणपतीवाल्यांकडून विनंति करण्यांत येऊं लागली. लो. टिळकांच्या अनुपस्थितींत उत्सवाला कोणत्याहि प्रकारचा कमीपणा येऊं नये व उत्सव पूर्वीप्रमाणेंच व्यवस्थितपणें पार पडावा म्हणून कृष्णाजीपंतांनीं या काळांत नेहमींपेक्षां अधिक व्याख्यानें देण्यास आनंदानें संमति दिली. नाशिक कटांतील खटल्यामुळें बिकट परिस्थिति प्राप्त झाली होती व त्यावेळीं गणेशोत्सवांतील व्याख्यानाचा विषय, व्याख्यात्याचें नांव, अध्यक्षाचें नांव हीं आगाऊ डि. मॅ. यांस कळवून परवानगी घेतल्याशिवाय

व्याख्यानें निश्चित देतां येत नव्हतीं. अशावेळीं कृष्णाजीपंतांनीं आपल्या व्याख्यानांचा विषय असा ठेवावा कीं, त्यास कोणालाहि हरकत घेतां येऊं नये व व्याख्यानांत तर अभिप्रेत मत प्रतिपादन करण्यासाठीं सुलभ जावें. या कारणानें १९०८ ते १४ पर्यंतच्या काळांत कृष्णाजीपंतांनीं गणेशोत्सवांत अमोल कामगिरी केली व हें ज्ञानसत्र उत्तम तऱ्हेने यशस्वी केलें.

## राष्ट्रीय प्रश्नांचा उहापोह

लोकमान्यांची रवानगी मंडालेस झाल्यावर राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत झीडवर सही करून जावें कीं जाऊं नये हा प्रश्न उत्पन्न झाला व झीडवर सही करून नंतर राष्ट्रीय सभेस जाण्यापेक्षां तिच्यापासून अलिप्त रहावें, ही विचारसरणी विशेषतः पुढें आल्यामुळें या काळांत राष्ट्रीय सभेपासून राष्ट्रीय पक्षांतील लोक अलग राहिले. १९१४ सालीं लोकमान्य सुटून परत आले व त्यानंतर हा प्रश्न पुनः घसास लागला. गायकवाड वाडयांत भरलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या सभेंत यावर चर्चा झाली. झीडवर सही करून राष्ट्रीय सभेंत प्रवेश करूं नये, असें मत बऱ्याच जणांचें होतें. कृष्णाजीपंतांचेंहि मत प्रथम असेंच होतें. परंतु लोकमान्यांनीं जेव्हां आपलें मत झीडवर सही करूनहि राष्ट्रीय सभेंत प्रवेश करावा असें सांगितलें, तेव्हां कृष्णाजीपंतांनीं आपलें मत बाजूला ठेवून लोकमान्यांचें मत जसें असेल तसेंच सर्वांनीं वागावें, असें सांगून लोकमान्यांविषयींची आपली निष्ठा प्रकट केली.

राष्ट्रीय क्लबच्या बैठकींमुळें प्रत्यहीं जे जे राष्ट्रीय प्रश्न उत्पन्न होत असत त्यांवर मोकळेपणानें चर्चा होत असे व सर्वांच्या विचारानें जें ठरेल त्याप्रमाणें कार्यक्रम होत असत. लोकमान्य परत आल्यावर बॅ. बॅप्टिस्टांच्या अध्यक्षतेखालीं पुण्यास प्रांतिक सभेचें अधिवेशन भरविण्यांत आलें. तें अधिवेशन यशस्वी करण्याचे कामीं या क्लबाच्या बैठकीचा विशेष उपयोग

झाला. क्लबांतील प्रमुख सभासद कृष्णाजीपंत खाडिलकर, अण्णासाहेब परांजपे, वासुकाका जोशी, तात्यासाहेब करंदीकर, सीतारामपंत दामले, हेच असत. या कार्याचें श्रेय पुष्कळ अंशानें कृष्णाजीपंतांकडेच असे, हें सांगण्यासाठीं या सर्व गोष्टींचा उल्लेख करीत आहें.

## संगीताचा अभ्यास

कृष्णाजीपंतांचें कीचकवध गद्य नाटक अत्यंत लोकप्रिय झालें. त्याप्रमाणें इतर गद्य नाटकेंहि लोकप्रिय झाल्यानें गद्य नाटककार म्हणून त्यांची ख्याती झाली. परंतु कीचकवधास बंदी झाली. गद्य नाटकांप्रमाणेंच संगीत नाटकेंहि लिहिण्याचा त्यांचा विचार जाहीर झाला. कृष्णाजीपंत संगीत नाटकें कशीं काय लिहिणार याविषयीं नानाजणांचे नाना तर्कवितर्क सुरू झाले. संगीत नाटकास आवश्यक असलेलें संगीताचें ज्ञान या वयांत कृष्णाजीपंतांना कसें काय मिळणार अशा शंका कित्येकांनीं प्रकट केल्या. परंतु संगीत नाटकें लिहिण्याची कल्पना निश्चित झाल्यानंतर कृष्णाजीपंतांनीं पहिली गोष्ट जर कोणती केली असेल तर संगीताचा अभ्यास करण्यास सुरवात ही होय. त्यांनीं बखलेबुवांच्या भारत गायन समाजाचें सभासदत्व स्वीकारलें. दररोज नियमानें भारत गायन समाजांत संगीताच्या अभ्यासासाठीं जाऊं लागले. या संगीताभ्यासाचा अनुकूल अनुभव मला एक दिवस सहजच ध्यावयास सांपडला. एके दिवशीं सकाळीं साडेसातच्या सुमारास मुंजाबाच्या बोळांतील कृष्णाजीपंतांच्या घरावरून मी जात होतों; तों त्यांच्या घरांत तंबोरा वाजतांना मला ऐकूं आला. त्या तंबोऱ्याच्या स्वरावर कृष्णाजीपंत सा रे ग म स्वरांचा अभ्यास करीत आहेत असें मला दिसून आलें. मला त्यांच्या अभ्यासू वृत्तीचें विशेष कौतुक वाटलें. त्यांचा स्वर गायनाला अनुकूल असा नव्हता. तरीहि स्वरज्ञानासाठीं ते मनापासून रोज गायनाचा

अभ्यास करूं लागले व या अभ्यासाचा परिणाम इतका झाला कीं, स्वयंवरांतील 'स्वकुलतारक सुता' 'नरवर कृष्णासमान' इत्यादि पदें पेटीवर ते स्वतः वाजवून त्या त्या रागांत त्या त्या चालीवर म्हणूं लागले. या गायन अभ्यासाचा उपयोग अर्थातच त्यांच्या संगीत नाटक रचनेस विशेष उपयोगी पडला. भारत गायन समाजांत कृष्णाजीपंत जाऊं लागल्यानंतर गुरुवारचा उपवास त्यांनीं सुरू केला.

## युद्धघटनांचीं विवेचनें

महायुद्ध सुरू झाल्यावर रोज युद्धाच्या निरनिराळ्या बातम्या प्रसिद्ध होत असत. परंतु त्या बातम्यांतील रहस्य सामान्य वाचकांना समजत नसे. या युद्धाचें स्वरूप समजून घेण्यासाठीं आमच्या चिकित्सागृहांतील बैठकींत निरनिराळे सभासद निरनिराळे प्रश्न कृष्णाजीपंतांना विचारीत असत. त्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें कृष्णाजीपंत मोठ्या आवडीनें व आनंदानें देत असत. या महायुद्धाचें खरें स्वरूप समजावून सांगण्यास सुलभ व्हावें म्हणून एक नकाशाहि तेथें ठेवलेला असे. या नकाशावरून त्या बातम्यांतील रहस्य समजावून सांगून ज्या गोष्टी घडून येतील त्या आगाऊ सांगत असत व तें प्रत्यक्ष घडून आलेलें वाचावयास मिळत असे. चित्रमयजगतांतील महायुद्धाचें मासिक समालोचन किती मार्मिक असे हें सर्वांच्या परिचयाचें आहेच. परंतु प्रत्यक्ष विवेचनापेक्षां त्यांच्या तोंडून तें ऐकण्याचें भाग्य ज्यांना लाभलें, ते आपणांस धन्य समजत असत. हा विषय समजावा म्हणून परशरामपंत चिंचळकरादि गृहस्थ त्यांची चातकाप्रमाणें वाट पहात असत.

## पेण–परिषद व चहापान

हल्लींच्या काळांतील अनेक कार्यकर्त्याप्रमाणें कृष्णाजीपंतहि चहा घेत असत. स्वदेशीच्या चळवळीचा प्रचार व पुरस्कार जसजसा होऊं लागला

तसतसा स्वदेशी कृतींत आणण्याचा आग्रह स्वदेशीच्या अनुयायांकडून होऊं लागला. पुढाऱ्यांपैकीं किती मंडळी स्वदेशी कृतींत आणण्याच्या कसाला उतरतात तें पहाण्याचा उत्साही स्वदेशीभक्तांचा प्रयत्न सुरू झाला व पेण येथें कृष्णाजीपंतांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या प्रांतीय अधिवेशनाच्या प्रसंगीं हा कस पर्यायानें कृष्णाजीपंतांसच लावण्यांत आला. विषयनियामक समितींत स्वदेशी आचरणांत यावी, ती कृतींत उरलेली सहज लोकांना दिसावी म्हणून चहापानाच्या निषेधाचा प्रश्न मांडण्यांत आला. निदान त्या बैठकीच्या वेळीं तरी चहापान करूं नये अशी सूचना आग्रहानें मांडण्यांत आली. अनुकूल प्रतिकूल जोराचीं भाषणें झालीं. या प्रसंगीं कृष्णाजीपंत कोणतें मत व्यक्त करतात इकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें. परंतु यावेळीं लोकांचा विशेष आग्रह पाहून या प्रश्नावर सभासद बहुमतानें जो निर्णय देतील तो मान्य करावा असेंच धोरण कृष्णाजीपंतांनीं व्यक्त केलें व या प्रश्नावर मतें घेतां चहापान करूं नये असा ठराव बहुमतानें टाळ्यांच्या गजरांत स्वीकारण्यांत आला. रावबहादूर चिंतामणराव वैद्य यांनीं हा ठराव मान्य आहे असें सांगितलें, यावेळीं कृष्णाजीपंत चहापानाचा पुरस्कार करतील असें कित्येकांस वाटलें होतें. परंतु स्वागत मंडळाच्या वतीनें चहापानाची संपूर्ण व्यवस्था केली असतांनाहि कृष्णाजीपंतांनीं याविषयीं कोणत्याहि प्रकारचा आग्रह न करतां लोकमतास मान देऊन स्वदेशी कृतींत उतरविण्याची आपली तत्परता दर्शविली.

## विडीचें व्यसन कसें सोडलें

कृष्णाजीपंतांना विडीचें व्यसन होतें. कदाचित् ही गोष्ट पुष्कळांना माहितहि नसेल आणि ज्याला एकदां विडीचें व्यसन लागलें तें सुटणें कठीण—जवळ जवळ अशक्यच असें सर्वांच्या अनुभवाचें आहे. कृष्णाजीपंत

दररोज चारच्या सुमारास चित्रशाळेंत बसावयास जात असत. एकदां चित्रशाळेंत बसले असतांना त्यांनीं विडी ओढून टाकली तिनें थोडासा पेटहि घेतला. पण ही गोष्ट लागलीच वासूकाकांच्या लक्षांत आली. त्यांनीं कृष्णाजीपंतांजवळ या गोष्टीचा उल्लेख केला. त्याचा परिणाम कृष्णाजी-पंतांच्या मनावर इतका झाला कीं, त्यांनीं आपल्या हातांतील विडी तत्क्षणीं फेकून दिली. विडी न ओढण्याचा त्यांनीं आपला संकल्प जाहीर केला. हा संकल्प कृतींत कसा आणावा याचा विचार त्यांनीं केला व निग्रहानेंच हें व्यसन सुटलें तर सुटेल असें मनाशीं ठरविलें. त्याप्रमाणें क्रमानें योजना केली व विडीच्या व्यसनांतून ते मुक्त झाले.

तुमचें विडीचें व्यसन कसें सुटलें असा प्रश्न आमच्या चिकित्सागृहांत एकदां विचारण्यांत आला. तेव्हां त्यांनीं या प्रश्नाचें सविस्तर उत्तर दिलें कीं, व्यसन एकदम सुटणें कठीण म्हणून प्रथम विडी घरीं आणण्याचें बंद केलें. तलफच आली तर स्नेह्याचे घरीं जाऊन ती वेळ भागवावयाची असें प्रथमच ठरविलें. यानंतर स्नेह्याच्या घरीं गेलों असतांनाहि स्नेह्यांनीं विडी दिली तरच घ्यावयाची व त्यानंतर स्नेह्यानें आपण होऊन विडी पुढें केली असतांहि नाकारावयाची. शिवाय हें व्यसन सुटण्यासाठीं तपकिरीचा उपयोग करण्यास सुरवात केली. विडी सुटली, पण तपकीर मागें लागली. यांतूनहि सुटण्यासाठीं पानतंबाखू खाण्यास सुरवात केली व आजारी पडेपर्यंत पानतंबाखू ते खात असत. तंबाखू ही कोणत्याहि स्वरूपामध्यें आवश्यकच होऊन बसते असा त्यांनीं आपला अनुभव सांगितला. यानंतर विडीचें व्यसन सुटलें तें कायमचें सुटलें. तें इतकें कीं, कृष्णाजीपंत विडी ओढीत होते, हें कोणास विशेष माहीत नसल्यामुळें आतां सांगितलें तरीहि खरें वाटण्यासारखें नाहीं.

## मतभेद व स्नेहभाव

पेगच्या प्रांतिक परिषदेंत कृष्णाजीपंतांच्या अध्यक्षतेखालीं विषयनियामक समितींत अनेक ठराव चर्चेस आले. अहिंसावृत्तीचा अतिरेक होऊन तरुणांच्या वीरवृत्तीला खच्ची करणारा जो प्रचार चालू झाला होता त्याचा निषेध करणारा ठराव मीं परिषदेंत मांडला. कृष्णाजीपंतांना हा ठराव यावयास नको होता. परंतु त्यांच्या मताविरुद्ध किंवा त्यांना दुखवूनहि मीं व माझ्या मताच्या प्रतिनिधींनीं हा ठराव आग्रहानें मांडला. जोराचा वादविवाद झाला. त्यावेळीं अण्णासाहेब परांजपे यांनींहि आमच्या ठरावाला विरोधक असें प्रभावी भाषण केलें. तरीहि माझा ठराव बहुमतानें पास झाला. कृष्णाजीपंतांच्या मताविरुद्ध जरी हा ठराव मीं मांडला तरी त्यामुळें त्यांच्या व माझ्या स्नेह्यांत यत्किंचितहि अंतर पडलें नाहीं. त्यांचा व माझा स्नेहभाव अगदीं अखेरपर्यंत कायम राहिला. अर्धांगानें विकल स्थितींत पुण्यास आल्यावेळींहि त्यांना फिरवत नव्हतें तरी त्या स्थितींतहि ते मजकडे येत असत व मीहि त्यांच्या घरीं जात असें.

## श्री. माऊसाहेब गोखले, पुणें

काकासाहेब खाडिलकर पुण्याला १९११ सालापर्यंत आमच्या वाड्यांत भाड्यानें जागा घेऊन रहात होते. ते नेपाळहून परत आल्यावर २१ सत्यनारायण करण्याचें त्यांच्या आईनें ठरविलें होतें. नेपाळहून काकासाहेब परत आल्यावर त्यांच्या आईनें सत्यनारायणाचा बेत ठरविला. त्यावेळीं लो. टिळक सिंहगडला गेलेले असल्यामुळें काकासाहेब आईला म्हणाले कीं, लोकमान्य परत येथें आले कीं, नंतर सत्यनारायण करूं.

काकांची आई आमच्या वाड्यांत वारली. काकांचे दोन पुत्र अप्पा व

विनायक यांचे जन्म आमच्या वाडयांतच झाले. काकांच्या आईला ओंकारेश्वरीं सोंवळयानें नेलें होतें.

काकांनीं कै. अण्णासाहेब पटवर्धन यांच्याकडे योगाचा अभ्यास केला व नानासाहेब देशमुखांकडे ज्ञानेश्वरीचा अभ्यास केला. त्यांच्याबरोबर कै. चिंतामणराव वैद्यहि जात असत. मुंबईला येथून जाईपर्यंत हा अभ्यास क्रम चालू होता.

काकांनीं आपल्या थोरल्या मुलीच्या स्मरणार्थ एक हजार रुपये देऊन वैदिक शाळा ब्राम्हणांच्या मुलांस शिकण्यासाठीं ओंकारेश्वरी काढली होती. तेथें श्री. कवडेशास्त्री शिकवीत असत. जॅकसन खुनाच्यानंतर ती शाळा बंद करावी लागली.

काकांना पोहण्यास जाण्याचा नाद फार होता. आट्यापाट्या व खोखोंत काकांचा पाय दुखावल्यावर त्यांनीं हे खेळ सोडले.

काकासाहेब शिस्तीचे कडक वागणारे व तापट स्वभावाचे होते. पण तितकेच ते प्रेमळहि होते. त्यांच्या पत्नी फारच प्रेमळ होत्या. काकांच्या दोन मेहुण्या त्यांच्या घरीं आल्या होत्या, त्यांचें योग्य संगोपन काकांनीं केलें.

# पुंडलीकजी कातगडे, हुबली

## स्वतःला असामान्य समजूं नये

सन १९१७ सालीं बेळगांव जिल्हा परिषद झाली. लोकमान्य व इतर अनेक पुढारी या परिषदेस हजर रहाणार असल्याचें जाहीर झालें असल्यामुळें गावांतील सर्व रस्ते माणसांनीं जणूं फुलून गेले होते.

एक प्रसंगीं चर्चा संपवून परिषदेचे अध्यक्ष श्रीमान कृष्णाजीपंत

खाडिलकर घरीं म्हणजे ते उतरले होते त्या ठिकाणीं जाण्यास निघाले. मी या परिषदेस 'स्वयंसेवक' म्हणून गेलों होतों व माझी नेमणूक लोकमान्यांच्या बंगल्यावर झालेली होती. अर्थात् श्री. खाडिलकरांना त्यांच्या निवासस्थानीं पोहोंचविण्याचें काम माझ्याकडेच आलें. श्री. खाडिलकर आपल्या निवासस्थानीं पायींच जाण्यास निघाले व मी त्यांना मार्ग दाखविण्यासाठीं त्यांच्या पुढें पुढेंच चालू लागलों.

वाटेंत अत्यंत गर्दी असल्यामुळें, लोकांना थोडें बाजूला सारून, श्री. कृष्णाजीपंतांना वाट करून द्यावी लागत असे. लोकांना बाजूला सारतांना मला कांहींतरी तोंडानें सांगावेंच लागे. मी प्रथम "बाजूला व्हा," एवढेंच म्हणत लोकांना हातानें बाजूला सारत असें. ही गोष्टहि कृष्णाजीपंतांना आवडली नाहीं. पण त्यांनीं ते कसें तरी सहन केलें व मला आपल्या पुढें चालू दिलें.

शेवटीं फारच गर्दी जेथें होती तेथें मी केवळ तोंडानें ओरडण्याच्या जोडीला हातानें लोकांना ढकलण्यास व मागें रेटण्यास प्रारंभ केला, आणि ओरडतांना 'लोकमान्यांचा उजवा हात, केसरीचे संपादक' वगैरे अशीं विशेषणें लावून कृष्णाजीपंतांच्या नांवानें ओरडून लोकांना भराभर ढकलून वाट करून घेऊं लागलों. माझीं विशेषणें ऐकून कृष्णाजीपंतांना पहाण्यास लोकांची गर्दी अधिकच होऊं लागली. हा सर्व प्रकार पाहून कृष्णाजीपंत अधिकच चिडले आणि त्यांनीं मला हातानें पकडून आपल्याहि मागें ढकललें आणि म्हणाले, 'ए बाबा स्वयंसेवका, तुम्ही माझ्यापुढें चालण्यापेक्षां मीच तुमच्या पुढें चालून वाट करून घेतलेली चांगली! तुम्ही व्हा मागें!!'

घरीं पोहोंचल्यानंतर श्री. कृष्णाजीपंत मला म्हणाले कीं, असें ओरडूं नये. आम्ही असे कोण मोठे लागून गेलों आहोंत कीं, लोकांनीं भराभर

बाजूला हटून आम्हाला मार्ग करून द्यावा ? सर्वसामान्य मनुष्यापेक्षां स्वतःला असामान्य व मोठें समजूं नये. पुनः कोणापुढेंहि असें ओरडत जाऊं नका.

या प्रसंगानंतर त्यांचा व माझा परिचय सारखा वाढतच गेला.

## खाडिलकरांकडून गंगाधररावांचें समर्थन

बेळगांव जिल्हा परिषदेच्या वेळीं वैष्णव स्वामी व लोकमान्य यांचा वाद सुमारें अडीच तास चालला होता. हा सर्व वादविवाद चालू असतांना लोकमान्य उभे राहूनच बोलत होते.

हा वादविवाद लवकर संपवावा, परिषदेचीं व इतर कामें व कार्यक्रम पुष्कळ आहेत, अशी सूचना कोणीतरी स्वामीजींना केली. ती ऐकतांच स्वामीजी उद्‌गारले कीं, "सहा वर्षें तुरुंगांत बसण्यास आपल्याला सवड होती आणि आतां वादविवादांत खर्च करण्यास दोन घंटेहि सवड आपल्याला नाहीं काय ?"

स्वामीजींच्या तोंडून हे उद्गार निघालेले ऐकतांच, तेथेंच बसलेले श्री. गंगाधरराव देशपांडे मोठ्यानें म्हणाले कीं, "लोकमान्यांचा तुरुंगवास तूं कशाला काढतोस ? त्यांतील रहस्य समजण्याची तुला काय अक्कल ?" पण त्यांच्याजवळ बसलेल्या मंडळींनीं गंगाधररावांना आवरलें व पुढें बोलूं दिलें नाहीं. ही गडबड लोकमान्य पहात होते. लोकमान्यांनीं बसून बोलावें अशीहि एक सूचना आली होती. पण स्वामीजींच्या पुढें बसून बोलण्यास लोकमान्य तयार झाले नाहींत.

श्री. गंगाधरराव देशपांडे यांनीं मध्येंच स्वामीजींना उद्देशून काढलेल्या उद्गारांविषयीं लोकांमध्यें अनुकूल प्रतिकूल अभिप्राय कोठें कोठें व्यक्त होत होते. त्यांनीं 'बरें केलें !' असें म्हणणारांबरोबर 'निदान बहुवचनी तरी संबोधावयाचें होतें' असें म्हणणारेहि कांहीं लोक होते. अशाच

प्रकारचा एक अभिप्राय श्री. कृष्णाजीपंत यांच्या कानावर गेला. त्यावेळीं ते म्हणाले कीं, 'गंगाधररावांच्या तोंडून जें निघालें तें एका अर्थीं खरेंच होतें. स्वामीजी स्वतः भलत्या गोष्टींत उतरल्यानंतर त्यांना एखाद्या जबाबदार मनुष्यानें असें विचारणें, त्यांत मला लोकविलक्षण असें कांहींच वाटलें नाहीं. स्वामीजींचा अपमान करण्याचा गंगाधररावांचा हेतु असण्याचें कारणहि नाहीं.'

# डॉ. गोपाळराव देशमुख, मुंबई

## ती प्रचाराची सभा

मी त्यावेळीं मुंबई नगरपालिकेचा सभासद होऊन एक दोन वर्षें झालीं असतील फार तर! त्याच सुमारास मुंबई विश्वविद्यालयाच्यातर्फे प्रांतिक कायदे–मंडळाच्या निवडणुकी आल्या. निवडणुकीमध्यें जंगी उमेदवार उभे होते. त्यांत मुंबई सरकारचे त्यावेळचे एक मंत्रीहि होते. निवडणूक विरोधाशिवाय होऊं द्यावयाची नाहीं, असा आमच्या स्वराज्यपार्टीच्या गटानें निश्चय केला आणि मी उभा राहिलों. मी उभा राहिलों असें म्हणण्यापेक्षां मला उभें केलें असें म्हटलें तर जास्ती सयुक्तिक दिसेल.

अर्थात् निवडणूक मोहिमेला सुरवात केव्हां तरी करायलाच हवी होती. म्हणून उत्तरेकडून म्हणजे परळ, दादर ह्या भागांतून मोहिमेला सुरवात करायचा आम्हीं बेत केला. सभा संध्याकाळीं सात वाजतां परळ विभागांत कुणाच्याशा चाळींत भरण्याचें ठरलें व सभेची जाहिरात वर्तमानपत्रांतून फडकली. ह्या सभेचें अध्यक्षस्थान दे. कृ. प्र. खाडिलकर सुशोभित करणार होते आणि वक्त्यांच्या यादींत त्यावेळचे सुप्रसिद्ध हॉर्निमन, श्री. अब्दुल्ला ब्रेलवी, जमनादास मेहता, डॉ. साठ्ये इत्यादि नांवें ठळक होतीं.

सभा होती त्या दिवशीं संध्याकाळीं मुं. नगरपालिकेच्या चहापानाच्या खोलींत आम्हीं एकत्र जमलों; आणि तेथून दोन तीन मोटार गाडयांमधून निघालों; येतांना नवाकाळ ऑफिसमधून खाडिलकरांना बरोबर घेतले. होमरूल लीगच्या वेळेपासून सभेसाठीं आपलाच अध्यक्ष आणि जमल्यास आपलाच श्रोतृवर्गहि बरोबर घेऊन जाण्याची आमची प्रथा पडली होतीच. त्याचें कारण त्यावेळच्या नाजूक राजकीय परिस्थितींत सरकारचा कदाचित रोष होईल म्हणून आयत्या वेळीं अध्यक्ष आणि श्रोते आम्हांला मिळत नसत. आम्हीं आमच्याबरोबर किट्सनचे दिवे सुद्धां घेतले होते.

परळला आम्हीं बरोबर सभेच्या अर्धा एक तास आधीं जाऊन पोहचलों. त्यावेळीं थोडा उजेड होता. आम्हीं तो वेळ किट्सनचे दिवे, सतरंज्या वगैरे पसरविण्यांत घालविला. व्यासपीठ तयार केलें व त्यावर सगळ्यांत मोठा दिवा लावून दिला. खाडिलकर व्यासपीठावर बसले. मी त्यांच्या उजव्या बाजूला, हॉर्निमन डाव्या बाजूला, ब्रेलवी, जमनादास मेहता यापलिकडे याप्रमाणें आम्हीं व्यासपीठावर अर्धचन्द्राकार व्यूह रचून बसलों; पण आमच्या श्रोतृवर्गापैकीं अजून कोणींच मला दिसेना. थोडया वेळांत आमच्याबरोबर आम्हीं जी अनुयायी मंडळी नेली होती त्यांनीं श्रोत्यांना पकडून आणायला सुरवात केली; पण प्रौढ सगळेच निसटले व चाळींत जाऊन आपापल्या खोलीच्या समोर गॅलरींत दोन तीन मजल्यांपर्यंत जाऊन उभे राहिले. पण आमचे अनुयायी पडले खंबीर! मोठी मंडळी तर निसटली, तेव्हां त्यांनीं लहान मुलांमुलींना धरायला आरंभ केला. कशी बशीं ५–२५ मुलें मुलीं आणून बसविलीं. कुणाला परकर नाहींत, तर कुणाला तुमानी नाहींत, असा आमचा श्रोतृवर्ग कसाबसा जमा झाला व सभेला सुरुवात झाली.

अध्यक्ष काकासाहेबांचें भाषण अपेक्षेप्रमाणें ज्ञानापासून राजकारणापर्यंत भरीव झालें. पण नंतर लवकरच आमचा श्रोतृवर्ग उतावळा व्हायला लागला. त्यांचे आईबापहि त्यांना चाळींतून आपापल्या खोल्यांसमोरून हांका मारायला लागले. आम्हीं हॉर्निमनला बोलायला उभे केले, तेव्हां जरा स्तब्धता झाली; पण जमनादास मेहतांच्या गर्जनेबरोबर तेहि आरडा-ओरड करूं लागले. शेवटीं मी ज्या वेळीं "स्वराज्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे" या ठेक्यावर भाषण संपविले तेव्हां तर त्यांनीं असा गोंधळ उडवून दिला कीं, खोल्यांतील आपापल्या आईबापांकडे जाण्याचा त्यांचा जन्मसिद्ध हक्क मान्य करून आम्हांला सभा विसर्जन करावी लागली.

## वर्तमानपत्रांत काय येतें तें पहा

परळच्या प्रचार–सभेहून परत येतांना मी व खाडिलकर एकाच मोटारींत होतों. निवडणुकीच्या आरंभींच असा थाट उडालेला पाहून मी जरा म्हणजे बराच खट्टू झालों होतों. निरनिराळ्या भागांतून आमच्या होणाऱ्या सभांचा कार्यक्रम अगोदरच प्रसिद्ध झाला होता. मी खाडिलकरांना म्हटलें "काय अशा सभांचा उपयोग? ही तर केवळ थट्टाच आहे." गंभीरपणानें ते म्हणाले, "उद्यांपर्यंत जरा दम धरा! उद्यां सकाळच्या निरनिराळ्या वर्तमानपत्रांत काय येतें तें पाहूं. महत्त्व आहे हें नुसत्या सभेचें नव्हे; दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रांत काय प्रसिद्ध होतें या वृत्तांतावर सगळें अवलंबून असतें."

दुसऱ्या दिवशीं सकाळींच उठून मीं मुंबईचीं वर्तमानपत्रें पाहिलीं व पाहून थक्कच झालों! "डॉ. देशमुखांनीं आपली मोहीम सुरू केली. जनतेचा डॉ. देशमुखांना पूर्ण पाठिंबा" इ. इ.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं म्युनिसिपालिटीच्या सभेला गेलों, तों काय!

जो तो म्हणत होता "कालची सभा खूप यशस्वी झाली ना? अभिनंदन!"

लोकसेवेंत आयुष्य खर्चिलेले कसलेले अनुभवी पुढारी श्री. खाडिलकर यांनीं सांगितलेल्या या माझेचा अनुभव पुढें सार्वजनिक जीवनांत काँग्रेस-पक्षीयांना कितीतरी वेळा आला, व त्यामुळें मी बऱ्याच जणांना सांत्वनहि देऊं शकलों.

## सौभाग्यवतीला तोच अनुभव

दूर कशाला! सौ. अन्नपूर्णाबाई देशमुख व सौ. लीलावती मुनशी या ३७ सालीं काँग्रेसतर्फे मुंबई कायदेमंडळाकरितां मुंबईतून उभ्या होत्या. भुलेश्वरला स्त्रियांची सभा भरण्याचें ठरलें होतें व त्याप्रमाणें गालीच्यापासून दूरध्वनिक्षेपक यंत्रापर्यंत सगळीं तयारी केली, व वेळहि संध्याकाळची म्हणजे भुलेश्वरांत दुकानांत सामान विकत घेणाऱ्या बायांच्या गर्दीचीच होती. तीन तास घालविले, पण अध्यक्ष व वक्ते मिळून सात बायासुद्धां जमल्या नाहींत!

सौ. घरीं आल्या. लागल्या जळफळायला. "काय त्या बाया! तिथल्या तिथें आग्रह केला तरी पांच मिनिटेंसुद्धां येईनात." मीं थंडपणें सांगितलें "उद्यां सकाळच्यीं गुजराथी, मराठी वर्तमानपत्रें बघ." खाडिलकरांनीं सांगितलेल्या उपदेशाचा उपयोग केला. १५ वर्षांपूर्वीच्या "थक्कपणाचा" अनभव सौभाग्यवतीला पण आला.

ही आमची काँग्रेसपक्षीयांची किल्ली सध्यांच्या काँग्रेस सरकारनेंहि उचललेली दिसते. नुसती उचलली एवढेंच नव्हे तर त्याच्यावरहि ताण करून एकंदर तंत्रच गिळंकृत केल्यासारखें दिसतें. त्यावेळीं निदान लोकमत पाहून वर्तमानपत्रें लिहीत असत. आतां सरकारधार्जिण्या श्रीमंतांनीं वर्तमान-पत्रेंच विकत घेऊन टाकलीं आहेत. त्यांतहि "रेडियो" हा सरकारचाच.

म्हणजे पावसांत पुराची भर. आणि दिवसांतून तीन वेळा सरकार मंत्री काय बोलतात यांनीं वर्तमानपत्रांचे रकाने भरलेले, म्हणजे पाऊस व पुराला चिखलाची जोड. वर्तमानपत्रकर्त्यांनीं हें आपलें व्रतच करून ठेवल्यासारखें दिसतें !

कांहीं स्वतंत्र म्हणविणारीं वर्तमानपत्रें आहेत. तीं देखील निष्कारण भीतीनें दडपून गेलीं आहेत. त्यांतल्या त्यांत कांहीं अजून निर्भीडपणें योग्य मत म्हणजे लोकमत लोकशाही लोकसरकारला कळवून देशाची सेवा करतात हें देशाचें भाग्य आहे.

पण अजूनहि डांगच्या बाबतींत महाराष्ट्राला टांग देणाऱ्या सभा, गायन, परिषदा, शिष्ट–मंडळे वगैरेबद्दल वर्तमानपत्रांतून मजकूर येतो किंवा मुंबई महाराष्ट्रांतून काढण्याच्या भांडवलवाल्यांच्या प्रचंड सभेबद्दल मी वाचतों, त्या वेळीं दे. काकासाहेब खाडिलकरांची मला आठवण येते.

# भाई मो. ग. देसाई, मुंबई

## काकासाहेबांची उपकारक साक्ष

काकासाहेब खाडिलकरांची जी आठवण माझ्या स्मरणांत कृतज्ञपणें सदैव राहील ती म्हणजे १९२९–३० च्या मीरत कटाच्या खटल्यांत त्यांनीं माझ्या वतीनें दिलेली साक्ष. माझें "स्पार्क" नांवाचें साप्ताहिक खटाव-वाडींतील "नवाकाळ" छापखान्यांत छापलें जात असे. हें पत्र माझ्या वैयक्तिक मालकीचें होतें; त्यांत हिंदी कम्युनिस्ट पार्टीचा किंवा कामगार शेतकरी पक्षाचा कांहींहि संबंध नव्हता, हें सिद्ध करण्यांत काकासाहेबांची साक्ष माझ्या बचावाच्या दृष्टीनें फार महत्त्वाची ठरली. स्पार्कमधील मजकूर व लेखांबद्दलहि त्यांना अनेक प्रश्न विचारण्यांत आले. पण अर्धादिवस

चाललेल्या उलट तपासणींतून सरकारी वकिलास स्वतःचा फायद्याचा असा एकहि शब्द काकांच्या तोंडून वदवून घेतां आला नाहीं. सेशन कोर्टांत जरी मला पांच वर्षें सक्तमजुरीची शिक्षा झाली तरी अपिलांत संपूर्ण निर्दोषी सुटण्याचें कारण काकासाहेब खाडिलकर व मि. ब्रेल्सफर्ड ह्या उभयतांनीं माझ्या वतीनें दिलेली साक्षच होय. काकासाहेबांना आरोपीचा साक्षीदार म्हणून कोर्टाकडून पहिल्या दर्जाच्या प्रवासाचा व रहाणीचा खर्च रीतसर देण्यांत आला. काकासाहेब मीरतला आले होते दुसऱ्या वर्गानें व त्यांची रहाण्याची सोय आमच्या ओळखीच्या ब्राह्मण वकिलाच्या घरीं करण्यांत आली होती. तेव्हां काकांनीं सरकारकडून मिळालेल्या रकमेंतून फक्त दुसऱ्या वर्गाच्या तिकिटाचें भाडें कापून बाकी पैसा मीरत डिफेन्स फंडाला देऊन टाकला.

लोकमान्यांना ज्याबद्दल शिक्षा झाली ते खाडिलकरांनीं लिहिलेले लेख शाळेंत असतांना वाचल्यापासून काकासाहेबांच्याबद्दल मला अत्यंत आदर वाटत असे. पण त्यांची प्रत्यक्ष भेट अचानकपणें झाली. ग्रॅजुएट झाल्यावर पुढें काय त्या विचारांत असतां एकदां पुण्यास तिसऱ्या वर्गानें जात होतों. तेव्हां काकासाहेब बोरीबंदरला माझ्या शेजारी येऊन बसलेले पाहून आनंद झाला. त्यांची उग्र मुद्रा पाहून कांहींशी भीति वाटली. तरी स्वतःच ओळख करून मी वृत्तव्यवसायांत पडण्याचा माझा विचार त्यांना सांगितला. त्यांनीं योग्य तोच उपदेश व इषारा दिला.

## छापलेला अंक चुकीमुळें रद्द

विलायतेहून परतल्यावर मी हॉर्निमन साहेबांच्या इंडियन नॅशनल हेराल्डवर काम करीत होतों. तें पत्र डबघाईस आल्यावर एक स्वतंत्र सोशालिस्ट साप्ताहिक काढावें असें माझ्या मनानें घेतलें. पण आपल्या

तुटपुंज्या भांडवलावर हें शक्य आहे काय, ह्या विवंचनेंत असतांना काकांना भेटलों व त्यांनीं माझी काळजी दूर केली. नवाकाळ छापखान्यांत त्यावेळीं थोड्या प्रमाणांत हस्तमुद्रित इंग्लिश लिखाण छापणें शक्य होतें. काकांनीं माझें लहानसें साप्ताहिक अगदीं माफक भावानें छापण्याचें कबूल करून सवडीप्रमाणें पैसे द्या असें सांगितलें.

प्रथमग्रासे मक्षिकापातः म्हणतात तसा स्पार्कच्या पहिल्या अंकाच्यावेळीं अनुभव आला. पहिल्या अग्रलेखांत मी पुढील वाक्य लिहिलें होतें.

"There is neither Moscow gold, nor a Maharaja's treasury nor any Moneyed interests behind the Spark"

"N" अक्षराच्या तुटवड्यामुळें म्हणा किंवा कुणाच्या हलगर्जीपणामुळें तें वाक्य पुढीलप्रमाणें छापून आलें. "There is either Moscow gold, or a Maharaja's treasury or moneyed interest behind the Spark" प्रुफांत चूक नव्हती, पण ती लक्षांत आली तेव्हां अर्ध्याअधिक प्रति निघाल्या होत्या. चूक सुधारून सर्व प्रति पुन्हां छापण्यास काकांच्या परवानगीशिवाय कामगार तयार नव्हते. अशा तऱ्हेचा अग्रलेख वाचकांसमोर गेल्यास माझें पुरतेंच हंसें होणार होतें. तेव्हां अर्ध्या रात्रीं काकांच्या घरीं जाऊन त्यांना उठविणें मला भाग पडलें. माझी अडचण ओळखून काका छापखान्यांत आले व सर्व अंक पुन्हां छापण्याचा हुकूम देऊन नवीन कागद काढून दिला.

माझें पत्र काढून चार दिवस लोटले नाहींत तोंच काकांना १९२९ सालीं राजद्रोहाच्या आरोपावर पकडण्यांत आले. जामिनावर सुटल्यावर मला ते म्हणाले कीं, वातावरण गरम होत चाललें आहे, तर जरा जपून चला. पण ह्या इषाऱ्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. कारण पुढल्याच महिन्याच्या अखेरीस ब्रिटिश बादशहाची हिंदुस्थानवरील राजसत्ता झुगारून देण्याच्या कटांत सामील असल्याच्या आरोपावरून माझ्याहि हातांत बेडया पडल्या.

# वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी, पुणें

## व्याख्यानाची पकड

कै. काकासाहेब खाडिलकर यांचा एकोणिसशें बारा सालीं वैद्यपंचानन कृष्णशास्त्री कवडे यांचे दुकानीं माझा प्रथम परिचय झाला. त्यापूर्वी त्यांचीं व्याख्यानें ऐकावयास जात असें त्यामुळें मी त्यांना ओळखत असें. एकोणीसशें आठ सालापासून महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांमध्यें जहाल वृत्तीचे पुढारी म्हणून श्री. काकासाहेबांना लोक ओळखीत असत. त्यावेळचीं त्यांचीं व्याख्यानें हृदयाला हालवून सोडणारीं असल्यामुळें त्यांचे व्याख्यानाला गर्दी जमत असे. नेनेघाटावरील गणपतीपुढें ( साल आठवत नाहीं ) श्री. काकासाहेबांचें व्याख्यान व्हावयाचें होतें म्हणून आम्ही तेथें गेलों. परंतु कांहीं अडचणीमुळें श्री. काकासाहेब व्याख्यानाला आले नाहींत, त्यांचेऐवजी श्री. तात्यासाहेब केळकर व्याख्यान देतील, असें चिटणिसांनीं सुरवातीला सांगितलें. तें ऐकून श्रोते मंडळींतील जवळ जवळ निम्मे श्रोते उठून गेले. श्री. काकासाहेबांच्या व्याख्यानांचा लोकांच्या मनावर त्यावेळीं परिणाम किती होता हें वरील उदाहरणावरून कळून येईल.

## कमी बोलणारे काका

श्री. कवडेशास्त्री यांचे दुकानांत त्यावेळची जहाल पक्षाची सर्व पुढारी मंडळी जमत असत. त्या त्या दिवशींच्या वर्तमानपत्रांतील बातम्या, सरकार व मवाळ पक्ष यांच्या हालचाली वगैरे राजकीय विषय, तसेंच जहाल पक्षातर्फे वेळोवेळीं करावयाचीं कामें, इत्यादींची चर्चा तेथें चालत असे. श्री. अण्णासाहेब परांजपे, चिंतामणराव वैद्य, वासुकाका जोशी, सीतारामपंत दामले, श्री. केळकर वगैरे पंधरावीस मंडळी तरी रोज जमत

असत. त्या सर्व मंडळींत कमी बोलणारे असे काकासाहेब खाडिलकर हेच असत. परंतु तेथें कोणताहि विषय निघो, मंडळींची चर्चा झाल्यावर शेवटचें निर्णायक उत्तर श्री. काकासाहेब खाडिलकरांचेंच असे, व त्या उत्तराचें बोलण्याचें वेळीं मात्र सर्व प्रमाणें देऊन दहा पंधरा मिनिटेसुद्धां ते बोलत. त्यानें सर्वांचें समाधान होत असे.

काकासाहेब वकील नव्हते परंतु कायद्याचें ज्ञान मात्र त्यांना उत्तम होतें. वाईचे भाऊशास्त्री लेले यांचा एक खटला त्यांच्याविरुद्ध गेला होता. त्यावर अपील करावें म्हणून त्यावेळचे मुंबईचे हायकोर्ट वकील कृ. ह. केळकर हे म्हणूं लागले. चिंतामणराव वैद्य, अण्णासाहेब परांजपे यांचे यावर उलट सुलट अभिप्राय पडले. शेवटीं काकासाहेब खाडिलकरांनीं वकिलांचें म्हणणें खोडून काढून अपील करूं नये असा सल्ला दिला. त्यावेळीं केळकर वकिलांनींहि काकासाहेबांचें म्हणणें मान्य केलें.

## नाटक बोधप्रद पाहिजे

एकदां नाटकांबद्दल गोष्टी निघाल्या तेव्हां नाटक हें पहाणाराला कांहीं बोध करील असें असलें पाहिजे असें ते म्हणाले. जर्मनीमध्यें महारोग, उपदंश म्हणजे गर्मी या रोगांपासून बचाव कसा करावा, हे रोग कुलक्षयकारक कसे होतात, याबाबत उपदेश करणारीं नाटकें लिहिलीं जातात, असें सांगून फ्रान्स, इटली, इंग्लंड, रशिया इत्यादि देशांत कोणत्या प्रकारचीं नाटकें लोकप्रिय आहेत यासंबंधीचीहि माहिती त्यांनीं सांगितली. त्यावेळीं त्यांनीं नाटकें लोकप्रिय होण्याकरितां किती अभ्यास केला असेल यासंबंधीं आम्हांस थोडी कल्पना आली. श्री. काकासाहेबांबरोबर मानापमान, स्वयंवर, कीचकवध हीं तीन नाटकें मीं पाहिलीं. त्यावेळीं नाटक चालू असतां मधून मधून नाटकें रचण्याच्या वेळच्या कल्पनाहि ते सांगत. त्यामुळें नाटकाचें मर्महि नीट समजत असे.

## उद्योगधंद्यांची माहिती

कै. काकासाहेबांना उद्योगधंद्याचीहि माहिती उत्तम होती. कोणताहि धंदा करायचा झाला तर त्याला भांडवल किती लागेल, त्या भांडवलाचा योग्य उपयोग कसा करावा,वगैरे धंद्याचे बाबतींतील सर्व माहिती ते बिनचूक आकडेवारीनें विचारणाराला समजावून देत.

एकोणीसशें पंधरा सालीं असेल, माझे एक स्नेही ज्यांनीं कोकणांत नवीन पद्धतीचे हातमाग घातले होते ते मजकडे आले व लोकमान्य टिळकांची भेट करून द्या म्हणाले. मी त्यांना घेऊन लोकमान्य टिळकांकडे गेलों. त्यावेळीं माझे स्नेह्यांनीं लोकमान्य टिळकांजवळ तळेगांवच्या पैसाफंड संस्थेंतून भांडवलाकरितां पैसे मागितले. त्यावेळीं नवीन उद्योग काढणारांना पैसाफंड कमिटी तीन हजारापर्यंत कर्ज देत असे. लोकमान्य टिळकांनीं याबाबतींत श्री. काकासाहेब खाडिलकरांना भेटा, ते त्या कमिटीवर आहेत असें सांगितलें. आम्ही लगेच श्री. काकासाहेबांना ते अळवणींच्या घरीं रहात असत तेथें भेटलों. माझे स्नेह्यांनीं आपले कारखान्याची हकीकत सांगितली. श्री. काकासाहेबांनीं त्यांना कांहीं प्रश्न केले व शेवटीं सांगितलें कीं, तुमचे कारखान्याला चाळीस हजार रुपये भांडवल पाहिजे. त्याची आंकडेवारीहि सांगितली. यापेक्षां कमी भांडवलांत हा कारखाना चालणार नाहीं. तुटपुंज्या भांडवलानें नुकसान होईल. अशा कारखान्याला पैसाफंडाचे पैसे दिले तर तेहि बुडतील. तरी पुरेसें भांडवल जमवा व तीन हजारांचा तोटा आला तर पैसाफंडाकडून मिळेल असें ताबडतोब सांगितलें. त्यावेळीं त्यांनीं अनेक धंद्यांचीं उदाहरणें व त्यांचा व्यवहार याबद्दल जी माहिती सांगितली ती ऐकून मी व माझे स्नेही यांना आश्चर्य वाटलें. वर्तमानपत्रकाराला अनेक धंद्यांची इतकी बारकाईची माहिती असेल अशी कल्पना नव्हती.

## सहाव्या अध्यायावरील समर्पक टीका

पहिल्यापासूनच काकासाहेबांचा वेदांत विषयाचा अभ्यास होता. १९३३ च्या नोव्हेंबर महिन्यांत मी मुंबईला महिनाभर राहिलों होतों. त्यावेळीं दररोज दुपारीं तासभर मला वेदांत विषयावरील एकेक पाठ ते देत असत. वीस दिवसांत वेदांतांतील मुख्य विषय नवीन दृष्टीची जोड देऊन त्यांनीं मला सांगितले; त्यामुळें मला वेदांतांचीं खरीं तत्त्वें समजून आलीं.

एकदां श्री. केशवराव देशमुख यांचे घरीं श्री. वासुकाका जोशी, मी व केशवराव बसलों असतां गोष्टीवरून गोष्टी निघाल्या व योगशास्त्राची चर्चा सुरू झाली. त्यावेळीं ज्ञानेश्वरीमध्यें सहावे अध्यायांत योगाचें उत्तम वर्णन आहे असें श्री. काकासाहेब म्हणाले. श्री. केशवराव देशमुख यांनीं लगेच ज्ञानेश्वरी काढली. तेव्हां काकासाहेबांनीं सहावे अध्यायांतील ओव्या वाचण्यास सुरवात केली. त्या ओव्यांत कुंडलिनि, चंद्रामृत, सुषुम्ना असे शरीरावयववाचक शब्द आहेत. त्यांचा बरोबर अर्थ काय याची चर्चा सुरू झाली. त्यावेळीं श्री. काकासाहेबांनीं त्या सर्वच ओव्या "शुचौ देशे प्रतिष्ठाप्य" या श्लोकापासून वाचल्या व प्रत्येक ओवीमध्यें असलेली योगासनांची व त्यांचे परिणामांची माहिती सप्रयोग सांगितली. त्यांत सांगितलेला मूलबंध करून दाखविला. अपान अडवून कुंडलिनि जागृत कशी होते हें वर्णन सांगितलें. नागिणीचें पिलें कुंकुमे न्हालें या वर्णनानें कुंडलिनि म्हणजे लहान आंतडें व अपान यांचा संबंध सांगून तिचा व सुषुम्नेचा संबंध कागदावर चित्र काढून दाखविला. याच क्रमानें चंद्रामृताचा संबंध दाखवून व खोढीयाणबंधहि दाखवून ज्ञानेश्वर महाराजांनीं स्वत: अनुभवानें या ओव्या लिहिल्या आहेत असें सांगितलें. मला शारीरशास्त्राची माहिती असल्यामुळें, त्यांनीं या वर्णनाचे वेळीं शवविच्छेदनानें शरीराचें ज्ञान करून घेतल्याप्रमाणें जी शरिराची माहिती सांगितली, ती

ऐकून काकासाहेबांना किती या विषयाचें सूक्ष्म ज्ञान होतें याबद्दल आश्चर्य वाटलें व त्यांच्याबद्दलचा आदर वाढला.

## महाभारताचा अभ्यास

श्री. काकासाहेबांशीं बोलतांना अनेक विषय निघत. ते रागीट व तुसडे असत असें अनेक लोकांनीं आपल्या आठवणींत लिहिलेलें मीं वाचलें. परंतु मला त्यांच्या रागीटपणाचा केव्हांहि अनुभव आला नाहीं. घरगुती गोष्टीपासून राजकीय, शास्त्रीय वगैरे अनेक गोष्टी मोकळेपणानें विचारण्याचें एकच ठिकाण म्हणजे श्री. काकासाहेब खाडिलकर हे मला होते. १९१२ पासून २० सालापर्यंत आठ वर्षें श्री. कवडेशास्त्री यांच्या दुकानीं दोन तास दररोज त्यांचा सहवास घडे व त्यावेळीं त्यांच्या तोंडून अनेक विषयांवरील त्यांचीं सिद्धांतरूप बोलणीं ऐकावयास मिळत. इतक्या अनेक विषयांचा काकासाहेबांचा अभ्यास पाहून सर्वांना आश्चर्य वाटे. त्यांनीं महाभारत अनेकवेळां वाचलें होतें व महाभारतांतील प्रमुख व्यक्तींच्या स्वभावचित्राचें वर्णन करतांना ते रंगून जात.

## दोन पक्षांच्या वेगवेगळ्या बैठकी

महात्माजींच्याविषयीं काकासाहेबांना अतिशय आदर असे. एकोणीसशें एकवीस सालीं होणाऱ्या कायदे-कौन्सिलच्या निवडणुकींत निवडणूक-मंडळानें पुणें जिल्ह्यातर्फे निवडून येणाऱ्या उमेदवारांत काकासाहेबांची नेमणूक झाली होती. परंतु कलकत्ता काँग्रेसनें कौन्सिलवर बहिष्कार पुकारल्यानें त्यांनीं आपली उमेदवारी मागें घेतली. पुण्यामध्यें कलकत्ता काँग्रेसनंतर या कौन्सिल-निवडणुकीवरून दोन पक्ष होऊं घातले होते व वरचेवर पुढाऱ्यांत वाद होत. त्यावेळीं श्री. काकासाहेब हे महात्माजींचें म्हणणें बरोबर कसें आहे हें वेळोवेळीं सांगत. अहमदाबादच्या काँग्रेसनंतर दोन

पक्षांच्या बैठकी वेगवेगळ्या होऊं लागल्या त्यावेळीं काकासाहेब मुंबईला होते. तेव्हांपासून ते पुण्याला आले तरी गांधी पक्षांतील लोकांची बैठक माझे घरीं असे, तेथें श्री. वासुकाकांचेबरोबर येत आणि काँग्रेस व महात्मा गांधी यांचेबद्दल बोलणीं होत.

## काकासाहेबांचें हास्य

एकोणीसशें पंचेचाळीस सालीं महात्मा गांधींनीं माझें औषध घेतलें. तेव्हांपासून महात्माजींच्या व माझ्या वरचेवर भेटी होऊं लागल्या. महात्माजींच्या भेटीनंतर काकासाहेबांची भेट झाली म्हणजे महात्माजींबरोबर माझें काय बोलणें झालें याची व महात्माजींचे प्रकृतीची बारकाईनें चौकशी करीत. महात्माजींच्या व जिनांच्या वाटाघाटी चालल्या होत्या त्यावेळीं महात्माजींच्या बोलावण्यावरून मी पुण्याहून मुंबईला मुद्दाम आलों होतों सकाळीं दहा वाजतां भेटीला बोलाविलें होतें. त्यापूर्वी मी सकाळीं आठ वाजतां काकासाहेबांना भेटलों. मी महात्माजींना भेटायला जाणार असें सांगतांच मला ते म्हणाले 'भेटून आल्यावर मला हकीकत सांगून जा.' मी संध्याकाळीं चार वाजतां काकासाहेबांना भेटलों व त्यांचे प्रकृतीची हकीकत सांगितली. महात्माजींची प्रकृति पहातांना त्यांचें पोट पाहिलें त्यावेळीं महात्माजींनीं मला विचारलें, "पेटमें क्या है" (पोटांत कांहीं विकार आहे काय?) त्यावेळीं मी थोडया विनोदानें महात्माजींना म्हटलें "आपके पेटमें क्या है वह जिनासाहेब जानते है" त्यावेळीं मी जो विनोद केला त्यामुळें महात्माजी हंसले. ही गोष्ट मी काकासाहेबांना सांगितली त्यावेळीं काकासाहेबहि खूप हंसले. एरवीं थोडेंच हंसणारे काकासाहेब त्यावेळीं पुष्कळ हंसले म्हणून ती गोष्ट माझ्या लक्षांत राहिली. हंसणें संपविल्यानंतर मला उद्देशून म्हणाले, तुम्ही केवळ वैद्यच नाहीं, राजकारणीहि आहां.

## स्थितप्रज्ञाचीं लक्षणें

गेलीं आठ वर्षें मी दर आठवड्यास व्यवसायानिमित्त मुंबईला जाऊं लागलों. एकदोन आठवड्यांनीं काकांना भेटण्यास जात असे. ते व त्यांच्या पत्नी दोघेहि आजारीच असत त्यामुळें दोघांनाहि कांहीं ना कांहीं माझें औषध चालूच असे. भेटल्याबरोबर आपला हात पुढें करून नाडी दाखवीत. त्याबद्दल माझें बोलणें झालें कीं लगेच कै सौ. गौरीकाकूंची प्रकृती पहाण्यास सांगत. एवढेंच नव्हे तर मला घेऊन स्वत: त्यांचे खोलींत जात व त्यांचे प्रकृतीबद्दल अतिशय आस्थेनें प्रश्न विचारीत. कै. सौ. गौरीकाकू परस्वाधीन झाल्या होत्या तरी त्यांची शुश्रूषा करण्यांत त्यांचे चिरंजीव व कै. काकासाहेब यांनीं अतिशय मेहनत व काळजी घेतली.

भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें स्थितप्रज्ञाचीं सर्व लक्षणें असलेला पुरुष माझ्या पहाण्यांत अजून आलेला नाहीं. तथापि महात्मा गांधी, वासुकाका जोशी व काकासाहेब खाडिलकर या तीन पुरुषांत स्थितप्रज्ञाचीं बरींच लक्षणें मीं पाहिलीं. सुखदु:खाच्या कोणत्याहि स्थितीचा मनावर परिणाम न होणें हें लक्षण वरील तिन्ही पुरुषांत मीं पाहिलें. काकासाहेब यांना शेवटच्या आयुष्यांत पुष्कळ दु:खाचे प्रसंग आले. शेवटीं मुदतीच्या तापाचे आजारानें त्यांचा नातू गेल्यावर तर दु:खाचा कळसच झाला! तथापि त्यांची मनोवृत्ति नेहमींप्रमाणेंच दिसे. शेवटचीं पांच वर्षें तर त्यांचें शरीरहि त्यांना सुख देणारें नव्हतें. अंतर्गळ, मधुमेह, अर्धांगवायु या विकारांनीं त्यांचे शरिरांत कायमचेंच ठाण मांडलें होतें व त्यांचे सहकारी आजार अनेकवेळां भेट देऊन जात. तथापि त्या विकारांचे त्रासालाहि न जुमानतां नित्यकर्में ते नेटानें करतांना दिसत. दररोज संध्याकाळीं चिपळ्या घेऊन भजन करीत. सकाळपासून रात्रीं झोपण्याचे वेळेपर्यंतचा त्यांचा कार्यक्रम बांधलेला असे. खाणेंपिणेंहि ठरलेलें ठरल्यावेळीं घेत. पथ्यकुपथ्याबद्दल मजजवळ चर्चा करीत.

मला त्यांचेजवळ कोणतीहि गोष्ट बोलण्यास संकोच वाटत नसे. एकेदिवशीं अशाच सुखदुखाःच्या एकमेकांचे प्रपंचाच्या गोष्टी चालल्या असतां मीं विचारलें, तुम्हांला इतके विकार व इतक्या विरुद्ध मानसिक गोष्टी असतां जगण्याचें सुख वाटतें का? तेव्हां ते म्हणाले, मनुष्याला श्वासोच्छवास करतां येतो तेथपर्यंत एकप्रकारचा आनंद वाटत असतो. या अर्थाचें उपनिषद्वांतील वाक्यहि त्यांनीं म्हणून दाखविलें व म्हणाले दुःखें हीं जगण्याच्या आनंदापुढें किंकीं पडतात. याचवेळीं सुख व दुःख याबद्दलहि बरेंच बोलणें झालें. त्यावेळीं त्यांचे स्थितप्रज्ञेबद्दल व एकंदर त्यांचे आयुष्याचे रहस्याबद्दल मला ज्ञान झालें. त्यावेळचे त्यांचे बोलण्याचा परिणाम माझे मनावरहि होऊन माझे वागणुकीलाहि वळण लागलें.

## श्री. श्री. आ. जोग, धारवाड

१९०९ पासून माझा व कै. काकासाहेबांचा घरोबा आहे. मी ज्यांचेकडे शिक्षणाकरितां राहिलों ते नागेश केशव जोग व कृष्णाजी लक्ष्मण ऊर्फ 'किरात' सोमण माझे मावस भाऊ. मी खाडिलकर यांचेकडे वरचेवर जातों हें कै. "किरात" यांना माहीत होतें. किरातांनीं पुष्कळच नाटकें लिहिलीं व मला एक नाटक (नांव लक्षांत नाहीं.) काकासाहेब यांजकडे घेऊन जाण्याबद्दल त्यांनीं सांगितलें. मी इतके दिवस त्यांचे घरीं जातों तरी मी एकदांहि त्यांच्याबरोबर बोललो नाहीं असें सांगितलें. तरी "किरात" साहेब यांनीं 'तूं जाच' असें सांगितल्यामुळें मी अगदीं नाईलाजानें त्यांची वही घेऊन काकासाहेब यांचे घरीं गेलों. भीतभीत माडीवर गेलों; जाऊन उभा राहिलों. मी जाऊन उभा राहिल्यावर, तुला काय पाहिजे आहे, असें त्यांनीं मला विचारलें. मी सोमणांचेकडून त्यांचें हस्तलिखीत देण्यास आणलें

आहे असें सांगितलें. नंतर त्यांनीं मला एक दोन प्रश्न विचारून मोकळें केलें. माझी भीति गेली व माझी कल्पना ते रागीट असतील ही खोटी ठरली. हाच त्यांचे बरोबर बोलण्याचा माझा पहिला प्रसंग.

माझे वडील १९१६ अखेरला वारले व मीं पुण्याचें बिऱ्हाड सोडून आमचे गांवाकडे धारवाडास जाण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें मी सौ. काकूंच्या-जवळ म्हटलें. त्यांनीं शिनप्पा येथून धारवाडकडे रहावयास जाणार अस-ल्याचें काकांना सांगितलें. त्यानंतर त्यांनीं मला मुद्दाम भेटून जाण्यास सांगितलें. मी त्यांना भेटण्यास गेलों. "तू लहान आहेस. एकदम तुझ्यावर संसाराचा भार पडला आहे. उत्पन्न नीट संभाळून रहा. लोकांमध्यें चांगलें म्हणवून घे. उधळपट्टी करूं नकोस. सार्वजनिक काम करत जा. देवाच्या दयेनें तुला नोकरी करणेचें कारण नाहीं" असा उपदेश केला.

मी धारवाडास आल्यावर सार्वजनिक काम करूं लागलों. नागपूर निशाण सत्याग्रहांत भाग घेतला व तेथें मला सहा महिन्यांची सश्रम शिक्षा झाली. पण साधारण तीन महिन्यांनंतर सुटका झाली. सुटका होतांच मी मुंबईस आलों व काकांचेकडेच राहिलों. जेव्हां मी नागपूरहून आल्याचें कळलें तेव्हां त्यांना फार आनंद झाला व तुरुंगांत मला काय काम दिलें होतें वगैरे चौकशी केली. मला १–२ दिवस कोलूचें (तेल काढण्याचें) काम दिलें व नंतर छापखान्यांतलें काम सांगितलें. हें ऐकून त्यांना खरो-खरच समाधान झालें.

मी मधूनमधून गेल्यावेळीं दे माझे घरचेसंबंधीं व व्यवहारासंबंधीं सर्व चौकशी करीत व आपलेपणानें सर्व सांगत. रयताशीं चांगलेपणानें वागावें यांतच आपला फायदा आहे. ते जर उलटले तर आपला निभाव कधींच लागणार नाहीं, वगैरे पुष्कळच सांगत. मी त्याचा उपयोगहि करून घेतला आहे.

———

# काकासाहेबांविषयींच्या वैयक्तिक आठवणी

श्री. विष्णुपंत जोशी, पुणें

## काकांनीं पाठ फिरविली

मी जर्मनींतून आल्यावर प्रथम कै. वासुकाकांचा पुतण्या असल्यामुळें काकासाहेबांच्या घरीं उतरलों होतों. माझ्याशीं काकासाहेब सहसा बोलत नसत. पण जर्मनींतील हकीकत त्यांनीं मला विचारली व ती त्यांनीं शांतपणें ऐकून घेतली. इंडियन इंडिपेंडंन्स कमिटी जर्मनींत १९१४ सालीं स्थापन झाल्याचें मीं त्यांना सांगितलें. हरदयाळ व चट्टोपाध्याय त्या कमिटींत होते. हिंदुस्थानला सहाय्य करण्यासाठींच ही कमिटी स्थापन झाली होती. काकासाहेबांनीं मला विचारलें कीं, हिंदुस्थानसंबंधीं तेथें काय मत आहे? मीं त्यांना सांगितलें कीं, चांगलें आहे हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा म्हणूनच ही कमिटी तेथें स्थापन झाली होती. लो. टिळकांच्याविषयीं जर्मनींत अत्यंत आदर होता. त्याचवेळीं चिरोलवर फिर्याद लावण्यासाठीं लो. टिळक यांचें विलायतेंत जाण्याचें ठरलें होतें. पण जर्मनींतील फॉरेन मिनिस्टरचें मत असें होतें कीं, हा खटला चालवूं नये, कारण ते लोक तुम्हांला न्याय देणार नाहींत. या कमिटींत असें ठरलें कीं, बोट बुडवून त्यांना जाऊं द्यावयाचें नाहीं. ते काकांनीं ऐकल्याबरोबर काका उठून चालू लागले. त्यांनीं तोंड फिरवलें. मी त्यांच्याकडे त्यावेळीं पाहून आश्चर्यचकित झालों व मुकाटयानें निघून गेलों.

## गृहव्यवस्था

काकासाहेब घरांतील व्यवहार पहात नसत. त्यांच्या पत्नी गौरीबाई व्यवहारांत चाणाक्ष असल्यामुळें संसाराचा सर्व व्यवहार त्याच पहात असत. १९१० च्या सुमारास त्यांची थोरली मुलगी गंगू पायानें आजारी होती. प्लॅस्टर बांधावें लागत असे. डॉ. शिखरे येत जात असत. पण काका याविषयीं विशेष लक्ष घालीत नसत. गौरीकाकूच सर्व पहात असत.

## मातीची चाळण

एकदां माती चाळण्याची चाळण काकांनीं वासुकाकांकडून नेली होती. ती बरेच दिवस काकांकडेच पडली होती. वासुकाकांनीं नेहमींप्रमाणें काकासाहेब चित्रशाळेंत आले असतांना काकासाहेबांना म्हटलें कीं, चाळण नेऊन बरेच दिवस झाले पण अजून परत केलीत नाहीं. हा अव्यवस्थेशीरपणा नाहीं का ? काकासाहेब त्यावेळीं फारच संतापले व ते निघून गेले. त्यानंतर वासुकाका जोशी हे शिवरामपंत परांजपे वगैरेंना घेऊन काकासाहेबांच्या घरीं गेले. त्यावेळीं वासुकाका म्हणाले कीं, तुम्हीं संतापलां होतां म्हणून मी डेप्युटेशन घेऊन आलों आहें. पण त्यानंतर काकासाहेब म्हणाले कीं, त्यांत कांहीं नाहीं, राग आला होता, पण तो तेवढ्यापुरताच. मीच तुमच्याकडे येणार होतों. तुम्हीं आलांत डेप्युटेशन घेऊन, तेव्हां आतां चहा वगैरे घेऊन गप्पा मारीत बसूं. त्यावेळीं तिघांत बराच हंशा झाला.

# श्री. का. ह. खाडिलकर, सांगली

माझ्या आयुष्याचा बराच मोठा कालविभाग पुतण्या या नात्यानें ती. काका व ती. सौ. काकू यांचे सान्निध्यांत गेल्यामुळें व मी त्यांच्या आयुष्या-

कडे विशिष्ट भक्तिभावानें पाहण्याच्या वृत्तीचा असल्यानें त्यांच्या सर्वच आठवणी सुखद व उपयुक्त वाटतात. त्यामुळें आठवण द्यावी कोणती व वगळावी कोणती असें साहजिक मला झालें आहे. काका वज्राप्रमाणें कठोर दिसले तरी त्यांचे चेतस कुसुमाप्रमाणें मृदु होतें याबाबत एखादी दुसरी आठवण द्यावयाची तर ते आपत्तींत आपल्या भावना कशा ताब्यांत ठेवीत व खंबीर मनानें दुःखांतून कसा मार्ग काढीत याबद्दलच्या दोन प्रसंगाचे उल्लेख मीं करण्याचें योजलें आहे.

## पत्नीच्या आजारीपणांतील समतोलपणा

पहिला प्रसंग ती. सौ. काकूचा पाय जखमी झाल्यावेळीं मधुमेह आहे असें दिसून आल्यामुळें तोडावा लागला तो सन १९३४ चा प्रसंग. त्यावर्षी काका एप्रिल-मे महिन्यांतील वार्षिक प्रवचनांकरितां सांगलीस येऊन कृष्णाकांठीं त्यांनीं स्थापन केलेल्या श्रीदत्तमंदिराजळ मुद्दाम बांधलेल्या बंगलींत राहिले होते. सौ. काकू पायाला टाचरूं झाल्यामुळें मुंबईसच राहिली होती. काका सांगलीस आल्यानंतर दत्तमंदिराच्या सभामंडपांतील प्रवचनें नेहमींप्रमाणें दररोज सायंकाळीं सुरू झालीं होतीं. विषयाचीं परिपूर्ण तयारी असल्यानें प्रवचनें ते तल्लीनतेनें देत. असेंच एक रंगलेलें प्रवचन पुरें होत आलें असतां तारेचा शिपाई मुंबईची तार घेऊन आला. मीं ती तार उघडून वाचली व काकांना त्यांतील मजकूर त्यांचे जवळ जाऊन सांगितला. तारेंत "मधुमेहामुळें काकूची प्रकृति जास्त झाली आहे, तावडतोब या" अशा अर्थाचा मजकूर होता. काकांनीं तारेंतील मजकूर निश्चलपणानें ऐकून घेतला. त्यांनीं आपलें प्रवचन शांतपणें व नेहमींच्या पद्धतीनें पुरें केलें. श्रोते उठल्यानंतर लागलेच मुंबईला निघावयाचें असें मला सांगून अस्वस्थ मनानें ते सभामंडपांत फेऱ्या घालूं लागले.

मुंबईस पोंचलों तों सौ. काकूची परिस्थिति कल्पनेपेक्षां फार वाईट होती. मधुमेहामुळें चिघळलेल्या जखमेचा परिणाम पाय तोडून तरी भागतें किंवा नाहीं असें वाटण्याइतका भयंकर दिसत होता. ही परिस्थिति पाहून सौ. काकूजवळ गेल्याबरोबर काकांच्या आतांपर्यंत आवरलेल्या भावनांचा बांध फुटला व त्याच्या डोळ्यांत अश्रुधारा खळकन आल्या. दुपारीं सर्जन डॉ. जोगळेकर आले. त्याबरोबर काकांनीं आपल्या भावना निग्रहानें आवरल्या व गंभीरपणें डॉक्टरसाहेबांशीं पुढील उपचाराबद्दल विचारविनिमय केला. पाय तोडणें तर भागच होतें. टाचेला दुखणें असल्यानें पाय कोठपर्यंत तोडावा हा महत्त्वाचा प्रश्न होता. त्याबाबत डॉक्टरांनीं विचारल्याबरोबर काकांनीं आपल्या नेहमींच्या वृत्तीप्रमाणें "रोग्याच्या हिताच्या दृष्टीनें तुम्हींच योग्य तो निर्णय घ्या." असा ताबडतोब निकाल दिला. अशा प्रसंगीं रोग्याचे आप्तजन गोंधळलेल्या मनःस्थितींत असतात व डॉक्टरवर इतक्या निश्चयानें व विश्वासानें क्वचित्च जबाबदारी सोपविण्यास तयार असतात, अशा अर्थाचे विचार डॉक्टरसाहेबांनीं प्रदर्शित करून काकासाहेबांच्या त्वरित व निश्चित दिलेल्या निकालाबद्दल सानंद आश्चर्य प्रदर्शित केलें !

## स्वतःच्या दुखण्यांतील खंबीरपणा

ती. काकांना जून १९३८ सालीं अर्धांगवायूचा झटका आला. त्यावेळीं त्यांनीं जे प्रवचनाचे दौरे सुरू केले होते त्यांत फाल्गुन वद्य एकादशीस श्रीनृसिंहवाडीस जाऊन श्रीदत्तापुढें प्रवचन देऊन आले. नृसिंहवाडींतील हें प्रवचन शरिराच्या बऱ्या स्थितींतील शेवटचेंच झालें व दुसऱ्या दिवशीं त्यांना अर्धांगाचा झटका आला.

दुसरे दिवशीं सकाळीं त्यांना थोडी अस्वस्थता वाटत होती पण ती

त्यांनीं सांगितली नाहीं व दिसूं दिली नाहीं. सायंकाळीं देवापुढें सभामंडपांत फेऱ्या घालत असतां त्यांना एकदम घेरी आल्यासारखें झालें. आम्हीं आसपासच होतों. घरांत येऊन त्यांनीं बैठक मारली. कोणाला काय होतें हें कळेना. आरंभी त्यांच्या नेहमींच्या वृत्तिप्रमाणें ते "कांहीं नाहीं, कांहीं नाहीं, जरा घेरी आल्यासारखें वाटलें." असें म्हणाले, पण नंतर त्यांना बोलवेना व बेशुद्धीसारखी त्यांची स्थिति झाली. ताबडतोब डॉक्टरांना आणण्यांत आले व तपासणींत अर्धांगाचा झटका आला आहे असें त्यांनीं सांगितलें.

पक्षघाताचा झटका पहिल्यानें वाटला तितका सुदैवानें तीव्र ठरला नाहीं, किंवा त्यांनीं आपल्या इच्छाशक्तिबलानें तो आवरला असेल. शरीर विकल झालें तरी मनाच्या खंबीरपणानें मार्ग काढण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यांच्या तत्त्वाप्रमाणें जोरकसपणाच्या मानसिक शक्तीनें या दुखण्यांतून आपण मार्ग काढूं असें त्यांस वाटत होतें. त्यामुळें आठ दिवसांनींच ते कोणाला नकळत तशा अधु हातापायांच्या स्थितींत घरांतून उठून देवापर्यंत गेले व देवापुढें नेहमींचा प्रार्थनेचा श्लोक म्हणावयाचा त्यांनीं प्रयत्न केला. तो पूर्ण साधला नाहीं. ते तसेच परत बंगल्यांत आपल्या जागेवर आले व त्यांनीं आपल्या प्रयत्नाची कल्पना कशीबशी आम्हाला करून दिली. 'कशीबशी' म्हणण्याचें कारण अर्धांगाच्या झटक्याचा परिणाम त्यांच्या जिभेवर झाला होता व शब्दहि त्यावेळीं सुचत नसत. पण त्यांनीं धड बोलतां येत नसतां प्रयत्नानें आपण काय करून आलों तें दर्शविलें. दत्तस्थापनेचा वाढदिवस त्यावेळीं महिन्यावर आला होता. त्या दिवशीं आपण प्रवचन करूं शकूं का असे त्यांना उपचार करणारे डॉ. बापट यांना ते अतुरतेनें विचारत व डॉक्टर बापटहि त्यांच्या मनाच्या समाधानाकरितां अनुकूल उत्तर देत.

वैशाखी एकादशीचा दत्त-स्थापनेचा दिवस उगवला. त्यांनीं अगोदरच सांगून ठेवल्याप्रमाणें त्यांच्या प्रवचनाकरितां सभामंडपांतील सर्व तयारी करण्यांत आली. आम्हा सर्वांनाच त्यांना श्रमाचा त्रास होईल असें वाटत होतें. पण त्यांच्या निश्चयाच्या आड आम्ही कोणी येणें शक्यच नव्हतें. वेळ झाल्याबरोबर ते देवापुढें गेले, देवाला नमस्कार करून आपल्या खुर्चीवर बसले. नेहमींप्रमाणें देवापुढें कापत असलेले दोन्ही हात जोडल्या-सारखे करून त्यांनीं नेहमींची प्रारंभींची "नमो जी आद्या" ही ज्ञानेश्वरीची ओवी म्हणण्याचा प्रयत्न केला—शब्दोच्चार पुढें होईनात. ते तुटक होऊं लागले. नंतर त्यांनीं १-२ मिनिटें कांहीं भाग वाचण्याचा प्रयत्न केला व प्रवचन नेहमींच्या पद्धतीनें लागलेंच पुरें केलें. यांत त्यांचा शारीरिक आपत्तीवर जय मिळविण्याचा निग्रही प्रयत्न दिसून आला. करीत राहिले म्हणजे होऊं लागेल, असें ते म्हणत; व खरोखरच त्या सालीं मुंबईत ते थोडे बरे झाल्यानंतर गेले असतां नवाकाळच्या गणतीपुढें त्यांनीं असाच प्रवचनाचा प्रयत्न केला व त्यावेळीं ते १५-२० मिनिटें कांहीं सांगू शकले त्यावेळीं त्यांनीं मला "आता तें जमूं लागलें" असें नेहमींच्या पद्धतीनें सांगितलें. या त्यांच्या निश्चयी प्रयत्नाचा एक तऱ्हेनें विजय होऊन प्रवचनें पूर्वीसारखीं देऊं शकले नाहींत तरी अखेरपर्यंत ग्रंथलेखन करीत राहिले.

## श्री. वा. वि. लिमये, विलेपार्ले

मी माझे वयाचे ९-१० वे वर्षीं खाडिलकरांचे घरीं विद्यार्थी या स्थितींत होतों. त्यांचा माझा नात्याचाहि संबंध होता. मी इंग्रजी पहिलींत होतों तेव्हां काका हे ७ वींत होते. केव्हां केव्हां ते चेष्टेनें मला म्हणत "तुला बसायला बाक, पण आम्हांला खुर्ची" कारण तेव्हां सांगली हाय-

स्कुलांत सातवीच्या वर्गांत १५-१६ विद्यार्थी असल्यानें त्यांना बसावयाला खुर्च्या असत. एकदां त्यांची माझी शाब्दिक बाचाबाची झाली. त्यावेळेस ते माझ्यावर रागावले. पण त्यांचा राग ताबडतोब निघून गेला. काका १७ वे वर्षीं मॅट्रिक झाले असें मला वाटतें.

एकदां आम्हीं दुपारीं जेवावयास बसलों असतांना एक भिकारी दारापुढें आला. त्यावेळेस काकांनीं त्या भिकाऱ्यास पुढें होण्यास सांगितलें. त्यावरोबर त्यांच्या मातोश्री म्हणाल्या, "कृष्णा, दोनप्रहरीं देव हे भिकाऱ्याच्या वेषानीं सत्वपरीक्षेस येतात. तर त्यांवर न रागावतां त्यांना उलट मदत करावी."

मॅट्रिक झाल्यावर काकासाहेब पुण्यास कॉलेज शिक्षण घेण्यास गेले व तें संपवून पुन्हां तीन वर्षांनीं ते सांगलीस परत आले. ते सांगलीच्या हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून राहिले. मी त्या वेळेस इंग्रजी ४ थींत होतों. व मी ६ वींत असेपर्यंत म्हणजे दोनअडीच वर्षें तेथें ते शिक्षक होते. सहावींत ते आम्हाला इंग्रजी शिकवीत असत. शिकविण्याची त्यांची धाटणी उत्तम तऱ्हेची असे. सांगलीस त्यावेळचे त्यांचे समकालीन म्हणजे यशवंतराव शिंत्रे, वामनराव पटवर्धन, श्री. मोरोपंत मराठे वगैरे आणखी दोन मित्र होते. संध्याकाळीं हे लोक शाळा सुटल्यावर कृष्णाबाईचे वाळवंटांत खेळावयास जात असत व काकाहि त्यांत उत्साहानें भाग घेत असत. त्या वेळेस त्या कंपूमध्यें श्री. गणपतराव दातार नांवाचे एक उत्तम आटयापाटयापटू होते. तसेंच हे दातार पोहण्यांतहि निष्णात म्हणून त्यांची ख्याती होती. दर शनिवारीं सकाळीं शाळा सुटल्यावर ही सर्व मंडळी कृष्णाबाईचे स्नानास जात व पोहण्यांतहि काकासाहेबांचा भाग असे. चैत्र वैशाखाचे दिवसांत वाळवंट असल्यानें आंघोळीच्या वेळीं वाटवंटांत मारामारीहि करीत असत ( अर्थात् गमतीनें ).

काकांचा त्यावेळचा पोषाख म्हणजे अंगरखा व डोक्यास रुमाल असे.

परंतु शाळेंत जातांना ते डोक्याला टोपी घालीत असत. काकांना त्यावेळेस लॉन टेनीस खेळण्याचा नाद असे व त्यासाठीं ते आंबराईंत टेनीस खेळण्यास जात असत. त्यांची टेनीस बॅट असल्यानें मीहि त्यांच्या बॅटचा उपयोग करून टेनीसचा एक खेळाडू झालों होतों.

एकदां शाळेंतून घरीं आल्यावर काका मातोश्रींस म्हणाले "आज गोविंदाला ( मी तेथें गोविंदा या नांवानें संबोधिला जात असें ) खावयास देऊं नकोस, कारण मी त्याला आज शाळेंत व्यवस्थित 'खाना' दिलेला आहे." यावरून त्यांचा थट्टेखोर स्वभाव दिसून येतो.

काका मुंबईस आल्यानंतर समुद्रावर रोज फिरावयास येत व तेथें केव्हांतरी त्यांची माझी गांठ पडे. त्यांचा माझ्यावरील रोष म्हणजे माझ्या थोरल्या भावाची पेढी असून सुद्धां मी सरकारी नोकरी करतों हा असे व म्हणून त्याबाबत ते मला नेहमीं बोलत असत. "तुम्हांला साहेबांच्या लाथा खावयास आवडतात पण मोठ्या भावाचें बोलणें सहन होत नाहीं, हें आश्चर्य आहे. स्वतंत्र धंदा तो धंदाच, हें तुम्हास कसें समजत नाहीं ? हल्लींची स्थिति कशी आहे याचीहि तुम्हांला जाणीव नाहीं." असें ते मला नेहमीं बोलत असत.

त्यांनी शेवटीं अनेक संकटांस व कौटुंबिक अडचणीस तोंड दिलें. त्यांची पत्नी मयत झाली तेव्हां "५५ वर्षें बरोबर असलेली सोबतीण" निघून गेल्याबद्दल त्यांनीं खेद व्यक्त केला.

## वैद्य स. ग. काळे, मुंबई

### मोठ्यांची छोटी मुलाखत

कै. श्री. सौ. गौरीबाई यांच्या शेवटच्या आजारीपणांत मी काका-

साहेबांच्याकडे वारंवार जात असें. त्या त्या वेळीं कै. काका हे अध्यात्म विषयांतच गुंग झालेले आढळून येत असत. श्री. सौ. गौरीबाई यांचें समाधान करण्यास त्यांना घरांतच भगवान श्रीकृष्ण भेटल्याचा भास होई.

नंडोऱ्याचे श्री. सखाराम पाटील यांनीं बरेच वर्षें काकांना भेटण्याचा ध्यास घेतला होता. श्री. पाटील हेहि जबरदस्त कर्मयोगी निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्ते व देवभक्त आहेत. त्यांनीं शेतीसाठीं साठ वर्षें परिश्रम करून एक उत्कृष्ट आदर्श कृषीबल म्हणून महाराष्ट्रापुढें आपल्या जीवनाचा कित्ता ठेवला आहे.

मी बाबासाहेब पाटलांना सांगितलें कीं, तुम्ही केव्हांहि या मी आपणास काकांचें दर्शन करून देतों. पाटलांनीं काकांचे कांहीं अध्यात्मिक ग्रंथ वाचले होते व फारसें शालेय शिक्षण नसतांहि आतां ते आपला काळ अभ्यास–चिंतनांत व वाचनांतच घालवितात.

एवढया ऐशींच्या घरांत आलेले पाटील माझा पत्ता काढीत चुकत चुकत मजकडे गेल्या शुद्ध कार्तिक एकादशीला ( श. १८६९ ) आले. मला फार आनंद झाला. मी त्यांना लगेच काकांकडे नेले. अप्पांनीं लगेच पाटलांना काकांच्याकडे नेलें. पाटलांनीं पादवंदन केलें. फारसें बोलणें असें झालेंच नाहीं. पाटील म्हणाले मी धन्य झालों. मला आश्चर्य वाटलें. बोलणें ऐकलें तें एवढेंच कीं, मी नंडोऱ्याचा सखाराम पाटील, आपलें पालघरला व्याख्यान झालें तेव्हां मी बोललों होतों. काका म्हणाले "आठवतें." झालें, हीच मुलाखत. एवढया मोठया माणसांची पहिलीच असूनहि इतकी छोटी मुलाखत मला अनुभवावयास मिळाली. पाटलांना धन्यता वाटली. त्यांनीं काकांचीं सर्व पुस्तकें घेतलीं व ते परतले. त्यांचें तें ग्रंथवाचन नित्य चालूच आहे. याला म्हणतात अंत:करणें बोलतात ! अशी प्रेमळ भेट पाहिल्याबद्दल मलाहि धन्यता वाटली.

## तीन पिढ्यांचा संबंध

कै. काकांचा व आमचा तीन पिढ्यांचा संबंध. आमचे आजोबा कडक शिस्तीचे होते व खाडिलकरांच्या घरींहि त्यांचा दरारा असे ही गोष्ट मला कै. श्री. सौ. गौरीबाई व ती. काकासाहेब या उभयतांनीं सांगितली. व त्यांच्या शिस्तीमुळें आम्हालाहि चांगलें वळण लागलें असे समाधानाचे उद्गार तीं उभयतां काढीत असत.

कै. काकासाहेब हे पदवीधर होऊन आल्यावर सांगली हायस्कुलांत प्रथम शिक्षक होते. त्यावेळीं त्यांचा स्वभाव अत्यंत कडक होता असें आमचे वडील सांगत असत. त्यावेळीं आमचे वडील सांगली हायस्कुलांत काकांच्या वर्गांतच होते.

## कोकोनाडाच्या काँग्रेसमध्यें

मी काकांना कोकोनाडा येथें १९२३ सालीं काँग्रेसच्या वेळीं भेटलों. तेथें त्यांच्या झोंपडीच्या शेजारच्याच गाळ्यांत मी उतरलों होतों. तेथें चित्रशाळेचे कै. वासुकाका जोशी हेहि आमच्याबरोबर होते.

त्या काँग्रेसच्या प्रथम दिवशीं दु. ३ ते रात्रीं ९ वाजेपर्यंत सारखें सहा तास मौलाना महमद अलींचें भाषण चाललें होतें. इतकें लांबलचक अध्यक्षीय भाषण त्यापूर्वी किंवा त्यानंतरहि कधींच झालेलें नसेल. सर्व मंडळी दमून गेलेली होती. दिव्याची व्यवस्था जेमतेमच होती. बहिर्दिशेला जाण्यासाठीं कंदिलांची सोय मुळींच नव्हती.

कै. वासुकाका म्हणाले "आतां या काळोखांतून कसें जायचें?" इतक्यांत चंद्रोदय होत होता तिकडे बोट दाखवून काकासाहेब म्हणाले, "दिव्याची फिकीर कसली करतां! तो पहा, "उदयति हि शशांकः कामिनी-गंडपाडुः" मग खूप हंशा पिकला.

# नवचित्रकार प. ज. खाडिलकर

मी त्यावेळीं काकासाहेबांचेकडे पुण्यास रहात असें. एकदां रात्रीं १० वाजतां काकासाहेब शतपावली घालीत असतां त्यांना खिडकींतून मातोश्री स्वयंपाकघरांत पोतेरें घालत असलेल्या दिसल्या. मातोश्री रात्रींचें पोतेरें घालत असलेल्या पाहून त्यांचा पारा चढला. ते स्वयंपाक घरांत गेले व मातोश्रींच्या हातांतील पोतेरें, शेणखळा व पातेलें त्यांनीं काढून घेतलें. पोतेरें व शेणखळा रस्त्यांत भिरकविला व पातेलें विसळून घरांत ठेवलें.

मातोश्री दारांत उभ्या राहून हा प्रकार शांतपणें पहात होत्या. काकासाहेब जाऊं लागल्यानंतर त्या हळूच म्हणाल्या, अरे कृष्णा, रागानें पोतेरें फेकलेंस, पातेलें नाहीं फेकलेंस ?

मांतोश्रींच्या या प्रश्नानें काकांचा राग मावळला. हा प्रकार पाहून नंतर आम्ही मात्र पोट धरून हसलों.

# श्री. के. शि. खाडिलकर, मुंबई

आमचें घर मुंबईस आल्यानंतर व कै. ती. काकासाहेब मुंबईस आल्यानंतर त्यांचा आमचा घरोबा वाढला. नवाकाळमध्यें पैशाच्या पेटीवर खात्रीचा इसम पाहिजे म्हणून आमचे वडील कै. ती. शिवरामपंत यांना नवाकाळचे व्यवस्थापक मंडळांत घेण्यांत आलें. पुढें माझे बंधु कै. ती. विष्णुपंत यांना त्यांनीं नवाकाळमध्यें जागा दिली. दुर्दैवानें कै. ती. शिवरामपंत व कै. ती. विष्णुपंत फार दिवस जगले नाहींत. नंतर मलाहि त्यांनीं नवाकाळमध्यें घेतलें.

कै. ती. काकासाहेबांना आमचे वडिलांचे बद्दल आदर होता, व तो

त्यांच्या श्राद्धतिथीच्या दिवशीं त्यांनीं आमचे घरीं एकदां प्रवचन करून व्यक्त केला.

## श्री. गो. वा. मोघे, मुंबई

काकासाहेबांनीं स्वत:चे मालकीचा म्हणून 'नवाकाळ' काढला तेव्हांपासून मी त्यांचेकडे जाहिरातीचें काम करूं लागलों. मीं जेव्हां कोकणांत घर बांधलें त्यावेळीं मला सर्वस्वी त्यांचीच मदत होती. एक वेळ मी नवाकाळची वसुली व जाहिरातींच्या बिलांचे पैसे घेऊन येत असतांना कोणी माझी पैशांची पिशवी लांबवली. त्यावेळीं मला त्यांनीं बरीच सूट देऊन हिशोब पुरा करून घेतला.

धुळ्याचे श्री. शंकर श्रीकृष्ण देव हे श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या मठाचा जीर्णोद्धार करीत होते. त्यांनीं काकासाहेबांना सूचना केल्यावर एक हजार रुपये कै. नरहरशास्त्री गोडसे यांचे मध्यस्थीनें कै. शेट जीवनदास वल्लभदासकडून देवविले व त्यांचें कार्य केलें. काकांच्या सबंध आयुष्यांत कोणाचें कांहीं नुकसान तर त्यांचेकडून झालेलें नाहींच. जें कांहीं झालें ते उपकारच आहेत व त्यांच्या त्या उपकारांची फेड कोणालाहि करतां येणें त्या प्राण्याच्या शक्तिबाहेरची गोष्ट होय. भले किती नुकसान होवो, कोर्टाची पायरीच आयुष्यांत ते चढले नाहींत. अशीं स्वार्थत्यागी माणसें पहावयास मिळणें दुर्मिळच आहे.

## श्री. रामभाऊ पटवर्धन, देवल सर्कस

### सर्कशीची जाहिरात

इ. स. १९०० सालीं महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध 'देवल सर्कस' बरोबर

मी पुण्यास आलों तेव्हां कै. काकासाहेब खाडिलकर यांचा व माझा प्रथम परिचय झाला. मी काकासाहेबांना सर्कशीच्या खेळाचें निमंत्रण दिलें व माझ्या निमंत्रणास मान देऊन काकासाहेबांनीं एक दिवस सर्कशीला भेट दिली. थोडया दिवसांनीं पुन्हां काकासाहेबांची गांठ घेऊन त्यांना खेळासंबंधीं मीं मत विचारलें. तेव्हां त्यांनीं अनुकूल अभिप्राय व्यक्त केला. सर्कशीचें पाऊल पुढें पडण्याला तींत आणखी कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत असा प्रश्न विचारतां काकासाहेब म्हणाले कीं, आपल्या अंगांतील गुण लोकांपुढें नीट रीतीनें मांडल्यास त्याची छाप लोकांवर बसून धंद्यांत प्रगति झाल्याखेरीज राहणार नाहीं. असें म्हणून दिशा दाखविण्याच्या हेतूनें काकासाहेबांनीं नमुन्यादाखल कांहीं महत्त्वाचा मजकूर सर्कशीच्या हस्तपत्रकांत प्रसिद्ध करण्यासाठीं लिहून दिला. तो त्रोटक रीतीनें खालीं देत आहे. " सिंहांचे पिंजऱ्यांतील अत्यंत साहसाचें काम, बंगाली जातिवंत वाघाशीं सलगीचें वर्तन, अस्खल चित्र्यांची प्रेक्षणीय कुस्ती, हत्तीच्या गजाननी आसनाचा देखावा, बंगाली कुमारीचा तारेवरील चित्ताकर्षक नाच " इ. अशा रीतीनें आस्थापूर्वक केलेलें मार्गदर्शन धंद्याच्या वाढीस कारणीभूत झालें.

## गुरुशिष्य

लो. टिळकांचें व काकासाहेबांचें गुरुशिष्याचें नातें होतें. लो. टिळक विलायतेला निघाल्यावेळीं त्यांना निरोप देण्यासाठीं मुंबईच्या सरदारगृहांत अलोट गर्दी जमली होती. त्यावेळीं अनेकांनीं अनेक प्रकारे टिळकांना वंदन करून निरोप दिला; परंतु काकासाहेबांनीं मात्र टिळकांच्या चरणीं आदरपूर्वक मस्तक ठेवून वंदन केलें. त्यावेळीं काकासाहेबांचे नेत्र अश्रूंनीं भरून आलेले मीं प्रत्यक्ष पाहिले.

माझ्या लेखामुळें टिळकांना शिक्षा भोगावी लागत आहे याबद्दल मला फार वाईट वाटत आहे, असें काकासाहेब एकसारखे म्हणत होते. पुढें सांगली मुक्कामीं एका प्रकट सभेंत भाषण करतांना काकासाहेबांनीं याच गोष्टीचा उल्लेख जाहीर रीतीनें केला. त्याच भाषणांत आपण स्वतः

शिक्षा भोगीत असतांना टिळकांच्या गीतारहस्याच्या वाचनानें तुरुंगांतील हालअपेष्टा भोगण्याचें सामर्थ्य व धैर्य आपल्या अंगीं कसें आलें याची हकीकत त्यांनीं सांगितली. यावरून टिळकांसारख्या सद्गुरूवर काकासाहेबांची किती अढळ श्रद्धा होती हें दिसून येतें.

# पुरुषोत्तम वासुदेव लिमये, संध्याकाळ, मुंबई

## पुढें आलेलें अन्न गोड !

काकासाहेबांनीं सांगलवाडीस मळी घेऊन तेथें श्रीदत्तात्रयाची स्थापना केली व ते मधून मधून तेथें येऊन राहूं लागले. सांगलीच्या त्यांच्या मुक्कामांत त्यांच्या प्रवचनांची व इतर व्यवस्था प्रथम कांहीं वर्षें माझ्याकडे असे. प्रवचन सायंकाळीं ५ वाजून ४५ मिनिटांनीं सुरू होई व ६ वाजून ५५ मिनिटांनीं संपे इतकें तें नियमित असे. हा नियमितपणा त्यांच्या इतरहि जीवनांत असे. ते दुपारीं ३ वाजतां चहा घेत. एकदां मळींत दुपारीं ३ वाजतां मी व काकासाहेब असे दोघेच असण्याचा योग आला ! अर्थात् त्यांच्याकरितां मी चहा करण्याचें संकट अटळ झालें ! त्यावेळीं चहाची व माझी मुळींच तोंडओळख नव्हती, मग चहा करणें तर दूरच. पाकशास्त्राच्या पुस्तकांतील जिन्नसांचीं प्रमाणें घेऊन जिन्नस बनविणाऱ्या नवथर सुग्रणीप्रमाणें ऐकीव प्रमाणावर चहा तयार केला. पण चहा पांचट व अगोड झाला असावा. काकासाहेबांचे हातीं देतांना कपबशा लटलटत होत्या. चहा पिऊन काकासाहेबांनीं कांहीं एक न बोलतां कपबशी खालीं शांतपणें ठेवली व माझा जीव कपांत पडला ! ही हकीकत मी सौ. काकूंना सांगितली तेव्हां त्या म्हणाल्या "पुढें आलेल्या अन्नाला ते कधींच नांवें ठेवीत नाहींत ?" त्यांच्या नियमितपणाइतकाच अन्नाला परब्रम्ह मानण्याचा त्यांचा गुण घेण्यासारखा होता.

## दत्तस्थापनेंतील धोरण

काकासाहेबांनीं मळींतील दत्ताच्या मूर्तीची स्थापना कांहीं विशिष्ट ध्येयानें केली होती तेथील पाण्याचा हौद सर्व जातीच्या लोकांना मुक्त होता, पण हरिजन तेथपर्यंत येण्यास भीत एकदां दुपारीं कांहीं हरिजन स्त्रिया मळीच्या दाराशीं उभ्या राहून पाणी मागूं लागल्या. पण त्यांच्या विनंतीकडे इतर पाणी भरणारे लक्ष देईनात. तेव्हां काकासाहेब स्वतः बाहेर आले व त्यांनीं हरिजन स्त्रियांना आंत घेऊन त्यांना पाणी मिळण्याची व्यवस्था केली. ती पूर्ण होईतों ते तेथें उभे राहिले. हौद सर्वांना खुला असल्याचें त्यांनीं बजाविलें. अर्थात् हा सर्व प्रसंग रुद्रस्वरूपांतच पार पडला होता.

मळींतील दत्तात्रेयाच्या मूर्तीची पूजा करणाऱ्या पुजाऱ्याच्या मतें दत्तमंदिरास जाळीचें दार लावावें असें होतें. दत्तात्रेयाच्या पायाला कोणीहि हात लाबतो हें त्यास खपत नसे. काकासाहेबांच्या पुढें ही सूचना गेल्यानंतर त्यांनीं ती साफ नाकारली. ते म्हणाले "माझ्या दत्ताच्या पायांना कोणीहि स्पर्श करावा. त्यांत स्त्री–पुरुष, शूद्र–ब्राम्हण हा भेद नाहीं. दत्तमंदिर सतत खुलेंच पाहिजे" अर्थात् काकासाहेबांच्या सूचनेपुढें पुजाऱ्याला मूग गिळूनच बसावें लागलें. दत्तापुढें ठेवल्या जाणाऱ्या तांदुळ व पैशासाठीं पेटी ठेवावी ही सूचना पुजाऱ्यानें केली. कोणीहि पैसा–तांदुळ पळवितो, चिमण्या–पाखरें तांदुळ खातात, अशी पुजाऱ्याची तक्रार होती. पण काकासाहेबांनी हीहि सूचना मानली नाहीं. 'दत्तमंदिर ही उत्पन्नाची बाब नव्हे' अशी त्यांची या बाबतची वृत्ति होती.

काकासाहेबांच्या प्रवचनांतील अन्नब्रम्हाबद्दलचें व परब्रम्ह–परमेश्वराबद्दलचें विवेचन आणि त्यांच्या जीवनांतील वरील तीन उदाहरणें 'बोले तैसा चाले' अशींच आहेत. अशा श्रेष्ठ व वडील पुरुषांची पावलें सतत वंदनीयच आहेत.

# काकांचे आप्त 'षडानन' यांच्या आठवणी

## दुःखांचा व नियमांचा उच्चार नाहीं

काका पुण्याहून मुंबईला रहावयाला आल्यावर एक वर्षाच्या आंत त्यांची मुलगी सौ. शांता करंदीकर प्रसूत होऊन लगेच कालवश झाली. काकांची ती फार लाडकी होती. नातवंड पहाण्याच्या अपेक्षेंत काका असतांना त्यांना मुलीचा मृत्यु पहावा लागला. तथापि दुःखाचा उच्चारहि न करितां त्यांचे नित्यक्रम सुरू होते. काका त्यावेळीं पानसुपारी खात असत. पान-सुपारीच्या तबकांत नित्याप्रमाणें विड्याचीं पानें आम्हीं ठेवीत होतों. तबकांतील विड्याचीं पानें जशीच्या तशीं कायम आहेत आणि तीं वाळून जात आहेत असें थोड्या दिवसांनीं लक्षांत आलें. काकांनीं त्यावेळीं पानसुपारी सोडली आणि सुमारें वर्ष दीड वर्ष ते पानसुपारी खात नव्हते. त्याच सुमारास श्री. ना. वि. कुळकर्णी हे आपल्या नव्या 'माईसाहेब' नाटकास त्यांना बोलवावयास आले होते. सध्यां मीं नाटकांना जात नाहीं असें त्यांनीं उत्तर दिलें. तेव्हां मुलीच्या मृत्यूनंतर त्यांनीं वर्ष दीड वर्ष नाटक पहाण्याचें सोडलें आहे असें कळून चुकलें. त्यांच्या दुःखाप्रमाणें त्यांचे नियमहि ते बोलून दाखवीत नसत. त्यांच्या वागणुकीवरून अनुमानानें ते ओळखावे लागत.

## 'सोसू पुरेशा' शरीर यातना

मानसिक दुःखाप्रमाणें शारीरिक दुःखहि त्याचा उच्चार न करितां ते सोसत असत. शेवटची दहा साडेदहा वर्षें ते अर्धांगवाताच्या बिकारानें आजारी होते, पण त्यांनीं दुखण्याबद्दल दीनवाणा शब्द कधीं शेवटपर्यंत काढला नाहीं. त्यांची थोरली सून सुमारें एक वर्षपर्यंत आजारी होती.

दुखण्याशीं तिनें मोठी 'ब्रेव्ह फाईट'-निधडेपणानें झुंज-दिली असें वर्णन काका तिच्या मृत्यूनंतर करीत असत आणि दुखणें कसें शूरपणानें सोसावें हें मी तिच्यापासून शिकलों असें ते म्हणत. सबंध दुखण्यांत काकांनीं शेवटपर्यंत मानीपणा कायम ठेवला होता. मध्यंतरी त्यांच्या अंगाला ठिकठिकाणीं भाजल्यासारखे फोड येत आणि प्रसंगीं ते आंब्याएवढेहि मोठे होत. फोड फुटल्यावर बरे होण्यास क्वचित् महिनाहि लागे. औषधोपचार करणाराहि ते फोड पाहून व फोड फुटल्यानंतरची अवस्था पाहून हळहळत असे. पण काकांना विचारलें म्हणजे ते सांगत, 'तसा फारसा त्रास होत नाहीं, सोसूं पुरेसा आहे.'

१९४७ सालीं पहिला स्वातंत्र्य-दिन झाला त्यावेळीं ते आपल्या विकल अंगानें स्वातंत्र्य-दिनाचा दीपोत्सव बघून आले. आपल्या सबंध जीवनांत काका प्रथमच 'लाइट' पहाण्यास गेले असतील. स्वातंत्र्यप्राप्तीच्या उत्साहाच्या भरांत ते गाडींतून लाइट पाहून आले, पण नंतर दोनचार दिवसांतच आजारी पडून ती यातायात त्यांना दोन तीन महिने निस्तरावी लागली. त्यापूर्वी सुमारें दोन वर्षें त्यांना तीन चार महिने खोकल्याचा फार त्रास झाला. खोकल्याच्या त्रासामुळें रात्रभर ते खुर्चीवर बसून असत. त्यांचा खोकला ऐकूनहि कळवळल्यासारखें होई. पण दुसरे दिवशीं उठून 'रात्रीं फार त्रास झाला काय' म्हणून त्यांना विचारावें, तर ते उत्तर देत 'खोकला येत होता, पण तसा त्रास झाला नाहीं. खोकला नसतांना खुर्चीवर बसल्या बसल्या डुलक्या लागत असत, त्यामुळें आतां सकाळीं हुषारी वाटत आहे. दुखणें सोसूं पुरेसें आहे.' दुसऱ्यास आपल्या दुखण्याची शारीरिक तर नव्हे पण मानसिक तोशीस पडूं नये ह्याबाबत ते फार दक्ष असत व केव्हांहि कोणत्याहि दुखण्याविषयीं विचारलें तर 'सोसूं पुरेसें आहे' असें ठराविक उत्तर देऊन ते हंसल्यासारखें करीत.

## शेवटपर्यंत स्वावलंबन व मनन-चिंतन

आयुष्याच्या शेवटच्या घडीलाहि त्यांचा हा बाणा कायम होता. मृत्यूच्या दिवशीं शेवटचा एक तासभर त्याना आकस्मिक मोठी धाप लागली. माता फुंकल्याप्रमाणें स्त्रासोच्छ्वास होत होता. 'फार त्रास होतो आहे काय?' म्हणून प्रश्न विचारला. 'फार त्रास होत नाहीं, सोसूं पुरेसा आहे, आतां कमी होईल' असें उत्तर धाप टाकीतच त्यांनीं दिलें. आधी सुमारें अर्धा तासच आपल्या पायानें आणि पुढें केलेल्या हाताचा आधार नाकारून ते शौचास जाऊन आले. धाप जोरांत असतांनाच कोणत्याहि गोष्टीच्या मुळापर्यंत जाऊन त्याचें कारण शोधून काढण्याची त्यांची मननशीलता आपलें काम करीत होती. संध्याकाळीं दोन करंज्या खाल्ल्या त्या मला बाधल्या, प्राणायाम आटोपून श्वासोच्छ्वास स्थिरावल्यावर मी झोपीं जातों-आज प्राणायाम सुरू असतांनाच डोळा लागला त्याचा त्रास होतो आहे, असा आपल्या आकस्मिक दुखण्याचा उलगडा ते जवळच्या लोकांजवळ व डॉ. सी. का. गोखले यांच्याजवळ करीत होते. शेवटल्या क्षणापर्यंत आपली मननशीलता, कणखरपणा व स्वावलंबी वृत्ति त्यांनीं कायम ठेवली होती, किंबहुना त्यांच्या सोबतीनेंच त्यांनीं मृत्युमुखांत शांतपणानें प्रवेश केला.

## अपत्य-सुखाबाबत अभागी

अपत्यसुखाच्या बाबतींत काकांना नशीबवान म्हणतां येणार नाहीं. त्यांना चार मुलगे व तीन मुली झाल्या. त्यापैकीं दोन मुलगे व एक मुलगी अर्भकावस्थेंत वारली. दोन मुली न्हात्या धुत्या वारल्या आणि काकांना सत्तरावें वर्ष लागण्याच्या सुमारास त्यांचा धाकटा मुलगा विनायक नरसोबाची वाडी येथें त्याच्या वयाची तिशी उलटल्यावर वारला. विनायक त्यांचा आवडता होता आणि त्याच्या मृत्यूचें दुःख त्यांना फार झालें. पण दुःख-

विव्हलतेला विवेकाचा बंधारा घालून आल्या प्रसंगाला तोंड देण्याची त्यांची वृत्ती त्यावेळींहि दिसली. त्यावेळीं आपल्या धाकट्या सुनेला सांत्वनपर दोन ओळी लिहितांना 'आतां विनायकच्या ठिकाणीं तूंच आहेस हें विसरूं नकोस' असे शब्द त्यांच्या लेखणींतून उतरले आणि शेवटपर्यंत सुनेशीं ते पुत्रवत् वागले.

विनायक गेल्यावर तिसरे कीं चौथे दिवशीं त्यांनीं नेहमींच्या शिरस्त्या-प्रमाणें औपनिषदीय ग्रंथांचा मजकूर लिहिण्याची वही हातीं घेतली व लेखनास ते उद्युक्त झाले. स्नान झाल्यावर दररोज दहा बारा ओळी जेवढया लिहवतील तेवढया लिहावयाच्या हा त्यांचा शिरस्ता होता व याच शिरस्त्याच्या जोरावर शेवटच्या सात आठ वर्षांत उपनिषदावरचे सहा ग्रंथ त्यांनीं पुरे केले. या शिरस्त्याप्रमाणें त्यांनीं वही पुढें घेतली तेव्हां त्यांना विचारलें, 'आज लिहिणार काय?' हें ऐकतांच त्यांना हुंदका आला, डोळ्यांत पाणी उभें राहिलें आणि ते कोंदटलेल्या आवाजांत, 'लागतो लिहावयास, दुसरें काय करावयाचें' असें ते म्हणाले. भावना अनिवार झाल्या पण क्षणभरच. डोळ्यांतलें पाणी वाहून गेलें, हुंदका आवरला आणि लेखणी आपलें कार्य करूं लागली. अतिशय भावनाशील पण त्याचबरोबर अत्यंत विवेकी अशा विरोधी गुणांचें मिश्रण अशा विशेष प्रसंगीं इंद्रधनुष्या-प्रमाणें त्यांच्या आचारविचारांत प्रकटत असे.

## शेवटचा उरलेला प्रश्न

काकांचें आजारीपण सुरू झाल्यापासून शेवटचीं सुमारें दहा वर्षें रात्रीं निजण्यापूर्वी ते औषधोपचार करून घेत असत आणि सर्वांची विचारपूस करून ते झोंपी जात. विनायक झोंपला? मुलें (नातू) निजलीं? सूनबाईचा ताप बरा आहे? असे प्रश्न ते करीत व आपलें सामानसुमान जागेवर आहे

किंवा कसें याची चाचपणी करून मग दिवा मालवण्यास सांगत. काळानें या प्रश्नांची संख्या कमी करण्यास हळूहळू सुरुवात केली. प्रथम त्यांची थोरली सून वारली व तिच्याबाबतचा प्रश्न बंद पडला. नंतर विनायक नरसोबाच्या वाडीला गेला व त्यावेळीं त्याच्याविषयींचा प्रश्न जो तात्पुरता कमी झाला तो त्याच्या मृत्युमुळें कायमचाच सुटला.

मुलें निजलीं काय ? हिची तब्येत कशी आहे ! असे दोन प्रश्न उरले. १९४५ सालीं त्यांची पत्नी सौ. काकू वारली. आदले दिवशीं रात्रीं त्यांनीं 'हिची तब्येत कशी आहे' असा प्रश्न विचारला होता. अभावितपणें दुसरे दिवशीहि रात्रीं त्यांनीं तो प्रश्न विचारला. त्या प्रश्नाला उत्तर काय देणार ? प्रश्नामागोमाग उत्तर आलें नाहीं, तेव्हां एक दोन सेकंदच ते थांबल्यासारखे झाले आणि उद्गारले, तो प्रश्न आतां संपला. त्यांच्या प्रश्नाप्रमाणेंच त्यांच्या या उद्गारांनींहि ऐकणाराचें अंतःकरण पिळवटून निघालें.

मुलें (नातू) निजलीं काय, ह्या प्रश्नालाहि काळाची दृष्ट लागली. १९४७ सालीं त्यांचा थोरला नातू तात्या वारला. दुसरे दिवशीं रात्रीं जड हातानें त्यांची शुश्रूषा चालली होती व जड मनानें ते ती करून घेत होते. अंथरुणावर आडवे झाल्यावर एखाद्या यंत्राप्रमाणें त्यांनीं नेहमींचा प्रश्न विचारला, मुलें निजलीं ? त्यांचा तो थंड आवाजांतला प्रश्न वातावरणाची जडता अधिकच वाढविण्यास कारणीभूत झाला. उत्तराच्या अभावीं त्यांनीं एक सुस्कारा सोडला आणि त्यांनीं प्रश्न बदलून विचारला, निळू (धाकटा नातू) निजला ? होकारार्थी उत्तर मिळाल्यावर त्यांनीं दिवा मालवण्यास सांगितलें.

शेवटच्या दिवसापर्यंत तो एकुलता एक शिल्लक राहिलेला प्रश्न ते विचारीत होते. निधनाच्या दिवशींहि पूर्वरात्रीं दिवा मालवण्यापूर्वी त्यांनीं तो

प्रश्न विचारला. वर्षं होत आलें, तो प्रश्न आतां कानांना ऐकूं येत नाहीं. पण त्यांच्या प्रश्नांची आठवण सारखी होते आणि त्याबरोबरच इतरहि अनेकविध आठवणी उसळून येतात. मनांतल्या आठवणींना मर्यादा नसते; पण कागदावर उतरणाऱ्या आठवणींना मर्यादा आहे. ती मर्यादा गाठल्यावर 'धीर-वीर-पुरुष-पदा नमन असो' हें काकांचेंच स्वयंवरांतील नमनाचें कडवें आठवून लेखणीला विराम दिला पाहिजे !

———

# खाडिलकर-स्मरणीची सांगता

ता. २६ ऑगस्ट १९४९ च्या नवाकाळमधील अग्रलेख जरूर त्या फेरफारांसह पुढें दिला आहे—

काकासाहेब खाडिलकर यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या आजच्या दिवशीं ता. २६ ऑगस्ट १९४९ रोजीं गेलें सुमारें एक वर्षभर 'नवाकाळ'मध्यें सुरू असलेल्या खाडिलकर-स्मरणीची पूर्तता करण्यांत येत आहे. काकासाहेबांच्या निधनानंतर सुमारें पंधरवड्यानें ता. ५ सप्टेंबर १९४८ रोजीं खाडिलकर-स्मरणीस 'नवाकाळ' मध्यें सुरुवात करण्यांत आली आणि दररोज एक याप्रमाणें 'नवाकाळ' च्या २९५ अंकांत काकासाहेबांच्या स्मरणी सतत येत राहिल्या. स्मरणीचा प्रारंभ काकासाहेबांच्या आत्मनिवेदनपर आठवणींनीं झाला; आणि नंतर वृत्तपत्रक्षेत्रांतील, नाट्यक्षेत्रांतील, वाङ्मय-क्षेत्रांतील व राजकीय क्षेत्रांतील त्यांच्या निरनिराळ्या चहात्यांनीं लिहिलेल्या आठवणी देण्यांत येऊन खाडिलकर-स्मरणीची सांगता करण्यांत येत आहे. काकासाहेबांचे निरनिराळ्या क्षेत्रांतील सहकारी, स्नेही व चहाते जे महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेर आहेत त्यांच्याच भरंवशावर एक वर्ष स्मरणीचें सदर चालू ठेवण्याचा संकल्प करण्यांत आला होता. काकासाहेबांविषयींच्या आपुलकीची व आस्थेची ज्यांच्या बाबतींत खात्री वाटली त्या सर्वांना आठवणींसाठीं विनंति करण्यांत आली; आणि विनंतीपेक्षांहि काकासाहेबांबद्दलची आपुलकी प्रभावी ठरून क्वचित् अपवाद वगळले तर सर्वांकडून एकप्रकारच्या स्वयंप्रेरणेनें काकासाहेबांच्या आठवणी अपेक्षेप्रमाणें वेळेवर आल्या व स्मरणीचें सदर वर्षभर निर्वेधपणें अखंड चालू राहिलें, याबद्दल आठवणी पाठविणाऱ्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार


मानीत आहों. स्मरणीच्या काळांत काकासाहेबांचे दिवंगत सहकारी कै. अण्णासाहेब परांजपे, कै. चिंतामणराव वैद्य, कै. वासुकाका जोशी, कै. दादासाहेब खापर्डे त्याचप्रमाणें त्यांचे बालपणचे सवंगडी कै. वामनराव पटवर्धन, विनायकराव करमरकर, गणपतराव अभ्यंकर, बेळगांवचे कै. मोरोपंत मराठे वगैरेंची आठवण सतत होत होती. काकासाहेबांबद्दलच्या त्यांच्या साऱ्या आठवणी त्यांच्याबरोबरच गेल्या. तथापि श्री. ना. राजाजी, गंगाधरराव देशपांडे, लो. ना. अणे, यांच्या काकासाहेबांबद्दलच्या आठवणी खाडिलकर स्मरणींत याव्या हें आपलें मोठें भाग्य आम्हीं समजतों. काकासाहेबांबद्दलच्या आठवणी ज्यांच्याकडून मिळूं शकल्या असत्या अशा कित्येकांना आठवणींसाठीं विनंति करण्याचें राहून गेलें असण्याचा संभव आहे, आणि अशा लोकांच्या बाबतींत व स्मरणीच्या वाचकांच्या बाबतींत तो एक प्रमादच आमच्याकडून झाला आहे यांत संशय नाहीं. तथापि अनवधानानें किंवा अज्ञानानें तो प्रमाद घडलेला असल्यामुळें तो क्षम्य मानला जाईल अशी आशा आहे. ज्यांनीं ज्यांनीं आपल्या आठवणींनीं खाडिलकर–स्मरणीस अखंडपणा व प्रगल्भपणा आणला त्या सर्व खाडिलकरप्रेमी सज्जनांना आम्ही पुन्हां एकवार अंत:करणपूर्वक धन्यवाद देत आहों.

काकासाहेबांच्या प्रथम पुण्यतिथीच्या प्रसंगीं त्यांचे पुतणे श्री. का. ह. खाडिलकर यांनीं लिहिलेलें खाडिलकरचरित्र दे. गंगाधरराव देशपांडे यांच्या हस्तें सांगलींत प्रसिद्ध झालें आहे. खाडिलकर–स्मरणी म्हणजे त्यांच्या अनेक स्नेही–सहकाऱ्यांनीं लिहिलेल्या त्यांच्या छोटेखानी चरित्रांचा संग्रहच होय असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. आठवण लिहिणाऱ्या प्रत्येकाला काकासाहेबांचें जें वैशिष्ट्य प्रकर्षानें आढळलें तेंच त्याच्यापुरतें खाडिलकरांचें चरित्र होय. या स्मरणीवजा चरित्रांत काकासाहेबांची नाट्य-

विषयक, राजकीय, वृत्तपत्रविषयक, साहित्यविषयक कामगिरी तत्कालीन परिस्थितीच्या वर्णनासह सांगण्यांत आलेली आहे. कार्याची तत्परता पण प्रसिद्धिविन्मुखता, परंपरेचा आणि पक्षाचा अभिमान पण परोपकारी वृत्ति, संशोधक पण समतोल बुद्धि, श्रद्धाळू पण चिकित्सक प्रज्ञा, रसज्ञ पण विरक्त मनोरचना, जोरकस पण नियमबद्ध जीवन, कलानिपुण पण तत्त्वज्ञानी लेखणी, स्पष्टवक्ता पण गुणगौरवशील स्वभाव, असा काकासाहेबांचा लोकोत्तर वैशिष्ट्यसमुच्चय ज्यांच्या जसा नजरेस आला तसा प्रत्येकानें आपल्या आठवणींत वर्णिला आहे. खाडिलकरस्मरणी म्हणजे या दृष्टीनें सहस्रशीर्ष व सहस्राक्ष अशा समाजपुरुषानें अनेक प्रातिनिधिक हस्तांनीं सिद्ध केलेलें काकासाहेबांचें एकप्रकारचें चरित्रच होय. काकासाहेबांच्या पहिल्या पुण्यतिथीला त्यांचें चरित्र प्रसिद्ध होत आहे त्याचप्रमाणें खाडिलकर-स्मरणीचें निराळ्या स्वरूपांतील चरित्र पूर्तता पावत आहे. काकासाहेबांबद्दलच्या वाङ्मयांत खाडिलकर–स्मरणीला योग्य तें स्थळ मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं, हें उघड आहे.

आमच्या दृष्टीनें काकासाहेबांच्या नवाकाळमध्यें आलेल्या आठवणींना विशेष महत्त्व आहे.काकासाहेबांची जीवनयात्रा समाप्त होऊन नवाकाळ त्यांच्या दररोजच्या मार्गदर्शनास मुकला आणि पायाखालची भूमि व मनगटांतील बळ सुटल्यासारखें होऊन काकासाहेबांच्या आधाराशिवाय भावी काळ कसा निभवावयाचा अशी विवंचना मनाला ग्रासून राहिली. अशा मनःस्थितींत नवाकाळ असतांना खाडिलकरस्मरणीच्या निमित्तानें काकासाहेबांच्या स्नेह्या-सोवत्यांनीं, सहकाऱ्यांनीं व चहात्यांनीं दररोज काकासाहेबांच्या निरनिराळ्या गुणांचें, व्यक्तिमत्त्वाचें व सच्छीलाचें स्मरण देऊन नवाकाळचें एक प्रकारें लालनपालन व संगोपनच केलें. काकासाहेब गेले तरी त्यांच्या आठवणी आमच्याजवळ आहेत, त्यांचें लेखन आमच्यासमोर आहे, त्यांचें

तेजस्वी व त्यागी चरित्र आम्हाला मार्गदर्शक होणारें आहे, त्यांच्या स्नेह्या-सोबत्यांची व सहकाऱ्यांची मायाममतेची पांखर आमच्यावर आहे, ही जाणीव आत्मविश्वासप्रेरक ठरल्याशिवाय रहात नाहीं. काकासाहेबांचें तपोनिष्ठ जीवन हा आपला आदर्श, त्यांची तेजस्वी निःपृहता हें आपलें बळ व त्यांची श्रद्धापूर्ण मननचिंतनपर प्रज्ञा ही आपली मार्गदर्शिका आहे, अशा भावनेनें काकासाहेबांनंतरचें एक वर्ष नवाकाळनें पुरें केलें असून याच त्यांच्या समाधिधनावर भावी काळांतून पार पडण्याची नवाकाळची उमेद आहे. याच मार्गानें गेलें असतां काकासाहेबांच्या हयातींत समाज-पुरुषाची जशी कृपादृष्टि होती तशीच त्यांच्या पश्चातहि नवाकाळवर व आम्हां नवाकाळच्या आश्रितांवर सतत राहील अशी आमची मनोमय खात्री असून, समाजपुरुष ती सफल करील असा भरंवसा आहे !



REFBK-000715 8

खाडिलकरांची

# आध्यात्मिक ग्रंथमाला

(१) खाडिलकरांचा रुद्र (२) खाडिलकरांचें संध्यावंदन व पुरुषसूक्त (३) खाडिलकरांचें ऐतरेय आणि ईशावास्योपनिषद् (४) खाडिलकरांचें तैत्तिरीयोपनिषद् (५)खाडिलकरांची ॐकाराची उपासना. (६) खाडिलकरांचा याज्ञवल्क्य–मैत्रेयी संवाद व त्रिसुपर्णाची शिकवणूक.

कै. कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांनीं वैदिक वाङ्मयाचें सतत भक्तिपूर्वक मननचिंतन करून वरील ग्रंथ तयार केलेले आहेत. या सहाहि ग्रंथांत मूळ मंत्र साथ व सटीप दिलेले आहेत. वैदिक शिकवण दररोजच्या संसारापासून ब्रह्मप्राप्तीपर्यंत सर्वत्र उपयुक्त कशी आहे याबद्दलचा अभिनव प्रकाश पाडणारीं त्या त्या ग्रंथावरील विस्तृत चे तेजस्वी विवेचनें प्रत्येक पुस्तकांत दिलेलीं त्यामुळें आहेत. नित्य पाठांतरासाठीं व अध्ययन–मननासाठीं हे ग्रंथ अत्यंत संग्राह्य असे झाले आहेत. किंमत प्रत्येकीं १ रुपया.

**ग्रंथ मिळण्याचीं ठिकाणें:**—नवाकाळ ऑफिस, मुंबई नं. ४ चित्रशाळा प्रेस, पुणें; दुकान, मुंबई; दत्त एजन्सी, बुधवार पेठ, पुणें.